# अर्थविज्ञान

## भारताचा आर्थिक इतिहास विशेषांक

आधुनिक भारतीय व्यवसायी वर्गाचे मूलस्त्रोत–
ध. रा. गाडगीळ, म. बि. नामजोशी

मुगलकालीन अर्थव्यवस्थेतील भांडवलशाही विकासाच्या संभाव्यता–
इरफान हबीब

अठराव्या शतकामध्ये महाराष्ट्रात असेही घडले असेल–
मा. द. आपटे

ऐतिहासिक चौकटीमध्ये आढळून येणारी उद्यमशीलतेची प्रादेशिक प्रतिमाने : १८५७ सालापर्यंतचा पूर्व भारताचा प्रकरणाभ्यास–
अमलेंदु गुह

भारताचा आर्थिक इतिहास (१५२६–१९००) :
... सूचीविषयक निबंध–

Xm2, N59
155 L1-1
139383

जून १९७१

गोखले अर्थशास्त्र संस्था, पुणे ४

अर्थविज्ञान

# भारताचा आर्थिक इतिहास विशेषांक

SERVANTS OF INDIA SOCIETY'S LIBRARY
POONA
4

अर्थविज्ञान

# भारताचा आर्थिक इतिहास

(काही लेख)

गोखले अर्थशास्त्र संस्था, पुणे ४

संपादक व प्रकाशक :
वि. म. दांडेकर
गोखले अर्थशास्त्र संस्था,
पुणे ४

किंमत : पाच रुपये

या विशेषांकाच्या प्रकाशनासाठी
महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाकडून
अनुदान मिळाले आहे.

जून १९७१

139383.

मुद्रक :
सुजित पटवर्धन
संगम प्रेस लि.,
१७ कोथरूड, पुणे २९

SERVANTS OF INDIA SOCIETY'S LIBRARY POONA 4

# संपादकीय

'अर्थविज्ञाना'च्या प्रकाशनास मार्च १९५९ मध्ये सुरुवात झाली. त्या वेळी जी अनेक उद्दिष्टे नजरेसमोर ठेवली होती त्यांत लेखकांना इंग्रजीबरोबरच आपापल्या मातृभाषांतून, भारतीय देशी भाषांतूनही अर्थशास्त्रीय संशोधनात्मक लिखाण करण्यास प्रोत्साहन द्यावे हे एक प्रमुख उद्दिष्ट होते. त्या हेतूने 'अर्थविज्ञाना'च्या प्रत्येक अंकात निदान एक तरी लेख भारतीय देशी भाषेत असावा असे धोरण प्रथमपासूनच ठेवले होते. त्यानुसार मार्च १९६६ पर्यंतच्या सात वर्षांत 'अर्थविज्ञाना'ने एकूण ९ भारतीय भाषांत ३१ लेख प्रकाशित केले. शिवाय एक नेपाळी आणि एक सिंहली असे दोन अन्य भाषांतील लेखही प्रकाशित केले. हे सर्व लेख देवनागरी लिपीत छापावेत, या सर्व लेखांच्या शेवटी त्यांचा सारांश इंग्रजीत द्यावा आणि सर्व इंग्रजी लेखांचा सारांश हिंदीत द्यावा असे संपादकीय धोरण असे.

या धोरणाचे पुष्कळांनी अभिनंदन केले, प्रशंसा केली. परंतु पुष्कळ प्रयत्न करूनही लेखकांचा प्रतिसाद अपुरा पडू लागला. वाचकांनाही देशी भाषांतील पुष्कळसे लेख दुर्बोध वाटू लागले. तत्त्वत:सुद्धा कोणत्याही वाचकास इंग्रजीशिवाय फक्त त्याच्या मातृभाषेतील लेखच वाचणे शक्य होते. खेरीज लिपीचा प्रश्न होताच. या सर्व अडचणी लक्षात घेऊन मार्च १९६६ पासून हा प्रयत्न नाइलाजाने सोडून द्यावा लागला. त्यानंतर काही काळ इंग्रजी लेखांचा हिंदी सारांश देणे चालू होते. दोन वर्षांनी तेही बंद झाले.

परंतु अर्थशास्त्रीय संशोधनात्मक लिखाण देशी भाषांत झाले पाहिजे, त्याकरिता आग्रहपूर्वक प्रयत्न केला पाहिजे हा मूळ विचार पूर्णत: बाजूस ठेवणे शक्य नव्हते. म्हणून प्रस्तुत अंकाच्याद्वारा नव्याने प्रयत्न करीत आहोत. मागील अनुभव जमेस घेऊन एक संपूर्ण अंकच एका देशी भाषेत काढावा असा विचार करून आम्हांस त्यातल्या त्यात सुलभ म्हणून असा पहिला अंक मराठीत काढण्याचे ठरविले. परंतु त्याकरिताही लेखांची वाण पडू लागली. शेवटी नाइलाजाने उपलब्ध इंग्रजी लेखांचे मराठी भाषांतर करून लेखांची भरपाई करावयाची असे ठरविले. लेखांची निवड करताना ते शक्य तर एका विषयाशी संलग्न असावेत हे ओघानेच आले. प्रस्तुत अंकात भारतीय आर्थिक इतिहासाशी संलग्न असे पाच लेख अंतर्भूत केले आहेत. शिवाय पुस्तकपरीक्षणेही आहेत.

अंतर्भूत केलेल्या पांच लेखांपैकी फक्त एकच लेख मूळ लेखकाने मराठीत लिहिला आहे. बाकीचे चार लेख मूळ इंग्रजीवरून भाषांतरित केलेले आहेत. भाषांतराचे काम श्री श्रीपाद जोशी यांनी केले आहे. श्री श्रीपाद जोशी हे एक तज्ज्ञ भाषांतरकर्ते आहेत. भाषांतरकर्त्यांच्या मर्यादा संभाळून त्यांनी शक्य तेवढे सुलभ भाषांतर केले आहे. ते अधिक सुलभ व वाचनीय व्हावयाचे तर मूळ लेखकांनीच स्वभाषेत लेखन करण्याचा यत्न केला पाहिजे.

हा अंक विशेषांक म्हणून काढीत आहोत. 'अर्थविज्ञाना'चे नियमित त्रैमासिक अंक नेहमीप्रमाणे प्रकाशित होतील. वाचकांस हा विशेषांक उपयुक्त वाटेल अशी आशा आहे. परंतु अर्थशास्त्रीय संशोधनात्मक लिखाण देशी भाषांत प्रकाशित करण्याचा हा मार्ग आम्ही गौण मानतो; आणि केवळ नाइलाजाने तो पत्करीत आहोत. याविषयी उपयुक्त प्रगती व्हावयाची तर मूळ लेखकांनीच आग्रहपूर्वक स्वभाषेत लिखाण केले पाहिजे. एका भारतीय देशी भाषेतून दुसऱ्या भारतीय देशी भाषेत तज्ज्ञाकडून भाषांतर करवून घेणे अपरिहार्य आहे. ते पुष्कळसे सुलभ व शक्यही आहे. परंतु मूळ इंग्रजीतून केवळ तज्ज्ञ भाषांतरकर्त्यांने कोणत्याही भारतीय देशी भाषेत केलेले भाषांतर पूर्णतया समाधानकारक होणे संभवनीय नाही. म्हणूनच आम्ही हा मार्ग गौण मानतो. भारतीय अर्थशास्त्रज्ञांनी याविषयीची आपली जबाबदारी आता ओळखली पाहिजे. त्यांनी प्रतिसाद दिला तर 'अर्थविज्ञान' सर्व भारतीय भाषांबाबत आपली जबाबदारी आनंदाने स्वीकारील.

# अनुक्रम


संपादकीय

१. आधुनिक भारतीय व्यवसायी वर्गाचे मूलस्रोत–
ध. रा. गाडगीळ, म. वि. नामजोशी — १–५४

२. मुगलकालीन अर्थव्यवस्थेतील भांडवलशाही विकासाच्या संभाव्यता–
इरफान हबीब — ५५–१०२

३. अठराव्या शतकामध्ये महाराष्ट्रात असेही घडले असेल–
मा. द. आपटे — १०३–११५

४. ऐतिहासिक चौकटीमध्ये आकळून येणारी उद्यमशीलतेची प्रादेशिक प्रतिमानें : १८५७ सालापर्यंतचा पूर्व भारताचा प्रकरणाभ्यास–
अमलेंदु गुह — ११६–१५८

५. भारताचा आर्थिक इतिहास (१५२६–१९००) :
अभ्यासवाङ्मयसूचीविषयक निबंध–
नसीब बेंजामिन — १५९–१९०

६. पुस्तक परीक्षणे — १९१–२१३


टीप : या अंकातील क्र. ३ चा डॉ. मा. द. आपटे यांचा लेख मूळ मराठीत लिहिलेला असून इतर सर्व लिखाण मूळ इंग्रजीत आहे. त्याचा मराठी अनुवाद श्री श्रीपाद जोशी यांनी केला आहे.

मान

# या अंकातील अनुवादित लेखांची मुळातील शीर्षके व मूलस्रोत

क्र. १ *Origins of the Modern Indian Business class—*
An Interim Report
प्रकाशक : International Secretariat, Institute of Pacific Relations, 333 Sixth Avenue, New York, 14. N.Y. 1959. (चक्रमुद्रित).

क्र. २ '*Potentialities for Capitalistic development in the economy of Mughal India*'—'The Journal of Economic History,' Vol. 29, No. I, 1969.

क्र. ४ *Regional Models for Entrepreneurship in Historical Perspective :* A case study of Eastern India to 1857. (अप्रकाशित).

क्र. ५ *Economic History of India* (1526-1900),
A Bibliographic Essay. (अप्रकाशित).

# आधुनिक भारतीय व्यवसायी वर्गाचे मूलस्रोत

ध. रा. गाडगीळ                                                                                    म. वि. नामजोशी

## विषय-प्रवेश

या अध्ययनामध्ये आपल्याला 'आधुनिक भारतीय व्यवसाय' या विषयाचा विचार करावयाचा आहे. या वाक्यांशातील 'व्यवसाय' या शब्दामध्ये सर्व प्रकारच्या आर्थिक प्रवृत्तीचा समावेश होतो; परंतु त्यात औद्योगिक व व्यापारविषयक प्रवृत्तींकडे खास लक्ष पुरविण्यात आले आहे. भारतातील एकूण आधुनिक व्यवसायाचा उदय व विकास यांमध्ये बिगर भारतीय लोकांनी फार मोठा भाग घेतलेला आहे. त्यामुळे आधुनिक भारतीय व्यवसायाचा उदय व विकास यांचा मागोवा घेतांना भारतीयेतर व्यावसायिक आणि भारतातील त्यांचे कार्य यांच्याकडे खूपच अधिक लक्ष पुरविणे क्रमप्राप्त ठरते. या संपूर्ण अध्ययनामध्ये तसे ते पुरविण्यात आले आहे.

'आधुनिक' या शब्दाची व्याख्या करणे फार अवघड आहे. या शब्दाचा वापर केवळ काल-निदर्शक अर्थानेही करिता येतो. उदाहरणार्थ, आधुनिक व्यवसाय हा गेल्या दोनशे वर्षांतील व्यवसाय आहे, असे म्हणता येईल. आमच्या या अध्ययनात कालतत्त्व पूर्णपणे वगळलेले आहे, असे नाही; परंतु त्याखेरीज आणखीही काही अर्थ त्यामध्ये अभिप्रेत आहे. या संदर्भामध्ये 'आधु-निक' याचा संबंध आधुनिक काळात उदयास आलेल्या, विशेषत: इंग्लंडातील औद्योगिक क्रान्ती-नंतर घडून आलेल्या घडामोडींशी संबंधित आर्थिक प्रवृत्तींची वैशिष्ट्ये व स्वरूपे यांच्याशी अधिक निश्चित स्वरूपात जोडलेला आहे. औद्योगिक क्रांतीनंतरच्या आर्थिक प्रवृत्तींचे संघटन हेच मुळी क्रांतिपूर्व काळात अस्तित्वात असलेल्या संस्था व नमुने यांतून हळूहळू विकसित झाले होते. भारतामध्ये औद्योगिक क्रांतीच्या फार पूर्वीपासून बिगर भारतीय व भारतीय व्यवसाय जोडीने विद्यमान होते; आणि ज्या परिस्थितीत भारतीय व्यावसायिक कार्य करीत होते त्या परिस्थिती-वर बिगर भारतीय व्यवसायाने आधीच अनेक प्रकारे परिणाम केलेला होता. अशा परिस्थिती-मध्ये औद्योगिक क्रांतीशी संबंधित संघटनात्मक व इतर वैशिष्ट्ये भारतात कशी आली ते त्या काळातील सर्व प्रकारच्या भारतीय व बिगर भारतीय व्यवसायाच्या सर्वसामान्य अध्ययनाद्वारेच जाणून घेता येणे शक्य आहे. भारतामध्ये आधुनिक व्यवसायाचा प्रारंभ कसा झाला याचे अध्ययन करण्याचा सर्वोत्कृष्ट मार्ग म्हणजे औद्योगिक क्रांतीपूर्वीच्या लगतच्या काळापासून सुरुवात करून त्यानंतर एकूण भारतीय परिस्थितीत घडून आलेल्या परिवर्तनाचा मागोवा घेणे हा होय.

या पुढील विवेचनात याच तत्त्वाचे अनुसरण करण्यात आले आहे आणि १७५० पासूनचा कालखंड विवेचनासाठी घेण्याचे एक कारण हेच आहे. १७५० हे वर्ष आरंभस्थान म्हणून निवड-ण्याचे दुसरे कारण असे की याच सुमारास भारताच्या राजकीय रंगभूमीवर युरोपीय लोकांच्या भूमिकेत बदल घडून आला होता. आपली मूळची भूमिका बदलून भारताच्या राजकीय घडा-

मोडींमध्ये प्रत्यक्ष हस्तक्षेप केल्यास आर्थिक दृष्ट्या आपला खूप मोठा लाभ होण्याची शक्यता आहे ही गोष्ट पहिल्या प्रथम फ्रेंचांनी, विशेषत: डुप्ले याने ओळखली. ही गोष्ट १७५० च्या पूर्वी एक-दोन दशके आधी घडून आली. तथापि, हस्तक्षेपाची जी कृत्ये कालांतराने यशस्वी ठरली ती ब्रिटिशांकडून केली गेली आणि त्यानंतर त्यांच्या राजकीय–आर्थिक प्रभावाची क्षेत्रे सतत वाढत राहिली. या सार्‍या हालचालींचा प्रारंभ १७५० नंतरच्या पहिल्या दशकात झाला असे म्हणण्यास मुळीच हरकत नाही.

**१. १७५० च्या सुमारास असलेली राजकीय परिस्थिती**

अठराव्या शतकाच्या मध्यास भारताचे राजकीय चित्र सतत बदलते आणि अनिश्चिततेने भरलेले होते. १७५० साली मुगल सम्राटाची सत्ता प्रत्यक्षपणे व परिणामकारक रीत्या उत्तर भारताच्या एका लहानशा विभागापुरतीच मर्यादित राहिली होती. देशाच्या बहुतेक भागात मुगल सम्राटाची जागा अनेक लहानलहान वारसदार राज्यांनी घेतलेली होती. यांपैकी काही राज्ये विशिष्ट प्रदेशांतील (उदाहरणार्थ अवध, बंगाल व गुजरात येथील) मुगल सत्तेच्या माजी राज्यपालांनी किंवा प्रतिनिधींनी निर्माण केलेली होती. इतर काही राज्ये मुगल सत्तेला यशस्वीपणे विरोध करून निर्माण करण्यात आलेली होती. पश्चिम, मध्य व पूर्व भारताच्या फार मोठ्या भागात मराठ्यांनी स्थापिलेली राज्ये आणि नंतर पंजाबात शिखांनी स्थापन केलेले राज्य यांचा या संदर्भात विशेष उल्लेख करिता येईल. मराठ्यांच्या नियंत्रणाखाली असलेल्या वेगवेगळ्या भागांवरील त्यांच्या सत्तेचे स्वरूप विविध प्रकारचे होते. त्यांनी व्यापलेल्या काही भागावर (विशेषत: त्यांची स्वत:ची मातृभूमी असलेल्या पश्चिम भारतातील भागावर) त्यांची प्रत्यक्ष सत्ता होती. इतर मोठ्या प्रदेशांवर (विशेषत: मध्य भारतातील प्रदेशांवर) त्यांचा फक्त विशिष्ट प्रमाणात महसूल प्राप्त करण्याचा हक्क होता. तथापि प्रत्यक्ष परिणामाच्या दृष्टीने या हक्कासाठी राजकीय सत्ता प्रस्थापित करण्याचे प्रयत्न होत राहिले. कारण महसुलाचा वाटा मिळविण्याचा एकमेव व्यावहारिक मार्ग म्हणजे राजकीय सत्ता प्रस्थापित करून स्वत:च महसूल गोळा करणे हा होता. मराठा सत्तेखालील प्रदेश व त्या सत्तेचा खूप मोठ्या भागावरील प्रभाव यांचे स्वरूप एकाच प्रकारचे नव्हते; कारण त्यांच्या कबजाच्या समर्थनाशी संबंधित असणार्‍या संकल्पना वेगवेगळ्या होत्या. दक्षिणेकडील परिस्थिती अनिवार्यत: अस्थिर होती. त्या भागावर माजी मुगल सुभेदार, जुनी हिंदू राजघराणी, स्थानिक अधिकारी अथवा केवळ लष्करी साहसवादी (मुसलमान किंवा हिंदू) यांचे प्रतिनिधित्व करणार्‍या अनेक घटकांचा कबजा होता. अठराव्या शतकाच्या दुसर्‍या चतुर्थांशापर्यंत येथील राजकीय परिस्थितीत आणखी एका महत्त्वाच्या अस्वस्थ करणार्‍या घटकाची भर पडली. युरोपीय सत्तांच्या हालचाली हा तो घटक होय.

अशा प्रकारे अठराव्या शतकाच्या मध्यास येथील परिस्थिती प्रवाही किंवा अस्थिर होती. बहुतेक भागांमध्ये राजसत्तांची उलथापालथ होण्याची, एकाची सत्ता कमी होऊन दुसर्‍याची वाढण्याची अथवा अगदी नवीनच सत्ता निर्माण होण्याची पुष्कळच शक्यता त्या वेळी होती. या ठिकाणी हे लक्षात ठेवले पाहिजे की हे काही अठराव्या शतकाच्या मध्याचेच वैशिष्ट्य नव्हते. एकूण भारताचा विचार करिता बहुतेक सर्वच कालखंडांत अशी स्थिती नेहमीच राहात आली होती असे म्हणण्यास हरकत नाही. मुसलमानांच्या स्वार्‍या सुरू झाल्यापासून दिल्लीच्या राजघराण्यांमध्ये सतत बदल घडून येत होते; आणि त्या प्रमाणात वेगवेगळ्या प्रांतांमध्ये सुभेदार म्हणून काम करणार्‍या राज्यपालांवरील दिल्लीच्या राजघराण्याच्या सत्तेतही फेरबदल होत होते. दख्खन व

दक्षिण भारत हा प्रदेश सतराव्या शतकाच्या मध्यापर्यंत दिल्लीच्या राजवटीच्या प्रभावक्षेत्रापासून जवळजवळ पूर्णपणे अलिप्त होता; आणि तेथील सरकारांचे स्वरूप सतत बदलत होते. तेथे अनेक मुस्लिम सुलतानांच्या व हिंदू राजांच्या रियासती चालू होत्या. अकबर व त्याच्या मागून आलेले त्याचे वारसदार यांच्या आधिपत्याखाली असणाऱ्या काही प्रदेशांमध्ये काही दशके त्या मानाने स्थैर्याचा काळ टिकून राहिला. असे असले तरी, एकूण भारताचा विचार करिता, आपल्याला असे दिसून येते की १६५० साली असलेले चित्र हे १७५० सालच्या चित्राहून फारसे भिन्न नव्हते. दक्षिण भारतामध्ये १६५० साली मुगलांच्या स्वाऱ्यांच्या दडपणामुळे पूर्वीच्या शत-कात असलेले राजसत्तेचे तुलनात्मक स्थिर स्वरूप पूर्णपणे नाहीसे झाले होते; आणि अत्यंत खळबळीचा व शीघ्र परिवर्तनाचा कालखंड सुरू झाला होता. याच वेळी देशाच्या इतर सर्व भागांतही उलथापालथी घडून येत होत्या आणि ज्या बंधुहत्येच्या युद्धांमध्ये औरंगजेब विजयी झाला होता ती युद्धे संपल्यानंतरही देशातील उत्तर व पूर्व भारताच्या फार मोठ्या भागात अस्वस्थता कायमच होती. १६५० च्या सुमारास दिल्ली भोवतालच्या बऱ्याच मोठ्या प्रदेशात दीर्घ काळपर्यंत तुलनात्मक शांतता होती यात शंका नाही. तथापि, १७५० साली सारे चित्रच बदललेले नव्हते तर फक्त त्याचा समतोल बदलला होता असे म्हणता येईल. फरक एवढाच की अठराव्या शतकातच दिल्ली भोवतालच्या प्रदेशाऐवजी मुख्यतः पश्चिम भारतातील पुण्याच्या भोवतालच्या प्रदेशात तुलनात्मक दृष्ट्या दीर्घकालीन शांतता टिकून राहिली होती.

१७५० सालच्या परिस्थितीचे एक चमत्कारिक वैशिष्ट्य लक्षात घेण्यासारखे आहे. त्याचा संबंध मुगल साम्राज्याच्या वारशाशी आहे. मुगल सम्राटाची प्रत्यक्ष सत्ता जवळ-जवळ नामशेष झालेली होती. तरीदेखील त्याच्या कायदेशीरपणाची भावना विद्यमान होती. या वस्तुस्थितीमुळे भारतातील युरोपीय सत्तांच्या प्रतिनिधींना आपल्या वडेजावाच्या योजना यशस्वी करण्यास एक महत्त्वाचे साधन मिळाले.

भारताच्या आर्थिक प्रवृत्तीवरील युरोपीय लोकांचा प्रभाव औद्योगिक क्रांतीच्या कितीतरी शतके आधीपासून विद्यमान होता. तथापि, आपल्याला ज्या प्रश्नाचा विचार करावयाचा आहे त्याच्या दृष्टीने या पूर्वीच्या कालखंडाचे महत्त्व फार थोडे आहे. १७५० च्या आधी दोन शतकांहून अधिक काळापूर्वी, युरोपीय लोकांनी भारताच्या सभोवतालच्या समुद्रांवर आधिपत्य स्थापन केले होते; आणि समुद्रमार्गाने होणाऱ्या भारताच्या विदेशी व्यापारावर फार मोठ्या प्रमाणात नियंत्रण मिळविले होते. पंधराव्या शतकाच्या अखेरीस भारतात आलेल्या पोर्तुगीजांनी, काही दशकांच्या अवधीतच, तांबड्या समुद्रापासून मलाक्कापर्यंतच्या आपल्या मोहिमांच्या द्वारे भारतीय समुद्रातून चालणाऱ्या व्यापाराचे नियंत्रण अरबांकडून फार मोठ्या प्रमाणात हिसकून घेतले होते. तथापि, पोर्तुगीजांनी राजकारण व धर्मप्रसार यांमध्ये फार मोठ्या प्रमाणात भाग घेतला आणि ते व्यापारी म्हणून वागण्यापेक्षा जेते म्हणूनच वागले. या सर्व भूमिका त्यांना टिकवून धरिता आल्या नाहीत. त्यामुळे सतराव्या शतकात जेव्हा डच व इंग्लिश हे त्यांना जोरदार प्रतिस्पर्धी म्हणून पुढे आले तेव्हा व्यापाराच्या क्षेत्रातील आपली मक्तेदारी फार काळ टिकवून धरिता येईल एवढे सामर्थ्य पोर्तुगीजांजवळ नव्हते. डच, इंग्लिश व फ्रेंच हे एकामागून एक या क्षेत्रात उतरले; परंतु त्या सर्वांनी आपले कार्यक्षेत्र भारतातील व्यापारापुरते मर्यादित ठेवले आणि अठराव्या शतकाच्या पूर्वार्धापर्यंत राजकीय सत्ता मिळविण्यासाठी त्यांनी नजरेत भरण्यासारखे प्रयत्न केले नाहीत.

जून १९७१

पोर्तुगीजांच्या हालचालीही भारतीय द्वीपकल्पाच्या पश्चिम किनाऱ्यापुरत्याच मर्यादित होत्या; आणि त्यांनी जास्तीत जास्त ज्या सलग भूमीवर आपले आधिपत्य स्थापन केले ती म्हणजे गोव्याच्या सभोवतालची भूमी होती. पोर्तुगीजांनी व्यापलेल्या भूप्रदेशांवर व त्यांना लागून असलेल्या भागांवर पोर्तुगीज अमलाचे जे काही कायमचे परिणाम घडून आले असतील ते असोत, परंतु उर्वरित भारतातील राजकीय घडामोडींवर मात्र पोर्तुगीजांचा फारच थोडा प्रभाव पडला.

या काळातील युरोपीय लोकांचे तंत्रज्ञानातील श्रेष्ठत्व हे मुख्यत: त्यांची जहाजबांधणी व जहाजांच्या हालचाली आणि दारूगोळा हत्यारांची निर्मिती यांमध्ये होते. अर्थातच युरोपीय लोकांना भारतामध्ये पाय रोवण्याच्या दृष्टीने आणि आपली व्यापारी ठाणी टिकवून धरण्याची व त्यांचे संरक्षण करण्याची तसेच केव्हा केव्हा आपल्या शेजारच्या हिंदी राज्यांच्या विरोधापासून आत्मरक्षण करण्याची त्यांची क्षमता या दृष्टीने हे श्रेष्ठत्व महत्त्वाचे होते. त्याच्यामुळे ते भारतीय व्यापारी व नौकाचालक यांच्यापेक्षा वरचढही ठरले आणि समुद्रावरील चाचेगिरीला ते तोंड देऊ शकले. या सर्व शतकांमध्ये फार मोठ्या जलप्रदेशावर चालणारी चाचेगिरी ही एक नेहमीची बाब होऊन बसलेली होती असे म्हणण्यास हरकत नाही. उत्तम बांधणीची व व वेगवान अशी युरोपीय जहाजे शस्त्रसज्ज ठेवण्याच्या प्रघातामुळे त्यांची चाच्यांना तोंड देण्याची क्षमता अधिकच वाढली होती. युरोपीय जहाजांना युद्धनौकांप्रमाणे शस्त्रसज्ज ठेवण्याची गरज केवळ समुद्रावरील चाचेगिरीमुळेच निर्माण झालेली नव्हती तर खुद्द युरोपीय राष्ट्रांतच वारंवार जी युद्धे होत असत आणि प्रतिस्पर्धी राष्ट्रे आफ्रिकेतील व आशियातील अनुकूल स्थानांवरून एकमेकांना हुसकून लावण्याचे जे प्रयत्न सतत करीत असत त्यांना तोंड देण्यासाठीही त्याची गरज होती.

## २. १७५० च्या सुमारास शेतीची परिस्थिती

आता आपण १७५० साली भारताची आर्थिक स्थिती कशी होती ते थोडक्यात पाहू भारतीय शेतीचे ठळक वैशिष्ट्य स्वावलंबन हे होते, असे म्हणता येईल. या संदर्भात स्वावलंबन हे वैयक्तिक कुटुंबाचे नव्हे तर त्या गावाचे किंवा त्या प्रदेशाचे स्वावलंबन असे समजावयाचे. स्थानिक गरजा भागण्याच्या दृष्टीने शेतमालाचे किती उत्पादन होते यावरून स्वावलंबनाची कल्पना येत असे; आणि एखाद्या प्रदेशातील शेतीतून काय उत्पादन होते यावरून त्या प्रदेशाच्या उपभोगसवयी लक्षात येत असत. लोकांचे मुख्य अन्न असलेली तृणधान्ये व डाळी, ते वापरीत असलेली वनस्पती तेले आणि त्यांच्या वापरात असलेल्या साखरेचे अथवा गुळाचे प्रमाण व प्रकार या सर्व गोष्टी प्रामुख्याने स्थानीय व प्रादेशिक कृषि-उत्पादनावरून निश्चित होत असत. याचाच एक नैसर्गिक उपसिद्धांत म्हणून स्थानीय कृषि–उत्पादनात शक्य तेवढी जास्तीत जास्त विविधता आणण्याचा प्रयत्न केला जात असे. अर्थात् या विविधतेला भौतिक परिस्थितींमुळे आपोआप मर्यादा पडत असे.

सापेक्ष स्वावलंबन हा शेतमालाच्या मर्यादित बाजारपेठेचा परिणाम होता. या ठिकाणी मर्यादा घालणारा सर्वांत महत्त्वाचा घटक म्हणजे वाहतूक हा होता. सामान्यतः वाहतूक ही महाग व वेळ खाणारी बाब होती. खुष्कीच्या मार्गाने होणारी वाहतूक ही ओझ्याच्या जनावरां-कडून केली जात असे. किनारपट्टीच्या खास प्रदेशात आणि ज्या भागात निदान वर्षातील काही दिवस अंतर्गत जलवाहतूक शक्य असे तेथे, वाहतुकीला बराच वाव असे. तथापि, अंतर्गत जल-वाहतूक ही मुख्यत: सिंधू, गंगा, ब्रह्मपुत्र, गोदावरी आणि कृष्णा यांसारख्या मोठ्या नद्यांच्या पात्रांतूनच होत असे; आणि नद्यांच्या किनाऱ्यांपासून अंतर्गत भागांत होणारी वाहतूक बहुधा

मर्यादित प्रमाणातच असे. जेथे तुलनात्मक दृष्ट्या स्वस्त जलवाहतूक उपलब्ध असे तेथे धान्याचा व्यापारही बराच दूरवर चालत असे, ही गोष्ट खरी आहे. तशी शक्यता जेथे नसे तेथे वस्तूचे प्रमाण आणि तिचा नाशवंतपणा यांमुळे सर्वप्रकारच्या शेतमालाची वाहतूक व व्यापार यांना फार मोठी मर्यादा पडत असे.

त्याच बरोबर काही मर्यादित प्रदेशांमध्ये विविध प्रकारच्या शेतमालाची वाहतूक व व्यापार चालूच असे. त्या कालखंडातील इतर देशांशी तुलना करिता भारताच्या अनेक प्रदेशांचे सापेक्षतः नागरीकरण झालेले होते. सर्वांत अधिक नागरीकरण झालेले प्रदेश हे एकतर समुद्र-किनाऱ्यावरचे होते किंवा अंतर्गत जलवाहतुकीच्या मार्गावरचे होते. उदाहरणार्थ, गुजरात व सौराष्ट्र यांच्या तुलनात्मक दृष्ट्या सुविकसित प्रदेशांची आणि बंगाल व बिहार या प्रांतांची स्थिती अशी होती. तथापि, भारतात अन्यत्रही लहान-मोठ्या नगरकेंद्रांचा पुष्कळच चांगला विकास झालेला होता. या देशात अनेक शहरे विद्यमान होती, यावरून नागरी लोकवस्तीच्या गरजा भागविण्यासाठी आवश्यक असणारे अतिरिक्त कृषि-उत्पादन उपलब्ध होते, असा अंदाज बांधता येतो. तसेच लहानमोठ्या शहरांना जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा करावयाचा म्हणजे किमान पातळीवरील वाहतुकीच्या सोयीही उपलब्ध असण्याची जरूर होती.

शिवाय, खूप विस्तृत भूप्रदेशांवर सुसंघटित सरकारांची सत्ता प्रस्थापित झालेली होती व त्यांचा राज्यकारभार पुष्कळच सुविकसित प्रशासन प्रणालींच्या द्वारे चालत होता, यावरूनही अतिरिक्त शेतमाल विद्यमान होता, असे दिसून येते. या सरकारांजवळ त्यांची न्यायालये, सैन्य व प्रशासन यांच्याशी संबंधित नोकरवर्ग होता; आणि या नोकरवर्गाचा निवास व कामकाज यांची केंद्रे म्हणून शहरांचा विकास झाला होता. सर्व सरकारांच्या महसुलाचे प्रमुख साधन भूमिकर हे होते. अठराव्या शतकाच्या मध्यापर्यंत भारताच्या बहुतेक भागांत जमीन महसुलाच्या भरण्याचे स्वरूप बदलून गेले होते. पूर्वी जमीन महसुलाचा भरणा उत्पादनाच्या हिश्श्याच्या स्वरूपात केला जात असे आणि हंगामाच्या वेळी वस्तूंच्या रूपात तो भरला जात असे. आता तेवढ्याच किमतीच्या पैशाच्या रूपात तो भरला जाऊ लागला होता. शेतकरी आपल्या उत्पादनाचा बराच मोठा भाग कर म्हणून पैशाच्या रूपात देऊ शकत होता याचा अर्थ असा की विशिष्ट अंतराच्या मर्यादेत शेतमालाची वाहतूक करून तो पैशाच्या मोबदल्यात विकण्याची शक्यता त्यावेळी विद्यमान होती.

सरकारच्या महसुलाप्रमाणे जमीनमालकाला द्यावयाच्या खंडाचाही विचार करिता येईल. खंड घेणाऱ्या वर्गाचा आकार (संख्या); खंडाचे परिमाण (volume) किंवा शहरांतून राहाणाऱ्या जमीन मालकांचे प्रमाण याबाबतीत सर्वसामान्य असा सिद्धांत काढता येणार नाही. तरीपण काही विशिष्ट परिस्थितीत हे प्रमाण पुष्कळच अधिक असण्याची शक्यता आहे.[1]

---

१. पेशवे दप्तरांतील कागदपत्रांच्या संग्रहामध्ये १७९७-९७ या वर्षाशी संबंधित एक नोंद आढळते. तिच्यामध्ये पेशव्यांच्या प्रशासन कार्यालयांमध्ये नोकरीस असलेल्या सुमारे १२५ व्यक्तींची नावे आढळतात. (त्यांवरून ते सर्वजण कोकणातील ब्राह्मण होते हे उघड दिसते). या लोकांना कोकणातून तांदूळ व इतर वस्तू आणतांना वाटांतील खिंडीत वगैरे ठिकाणी वाहतूक जकात द्यावी लागत नसे. हे लोक जो माल आणत तो बहुधा कोकणात मोठ्या प्रमाणावर खरेदी केलेला माल असावा; परंतु त्यात काही भाग खंड म्हणून मिळालेला शेतमालही असण्याची शक्यता आहे. त्यावरून महत्त्वाच्या अंतर्गत स्थलांतर-हालचालींमुळे अंतर्गत व्यापाराचे प्रवाह कसे वाहत असतील याची कल्पना येते. संग्रह ५, दुसरा बाजीराव, पृ. २०१-२०७.

येथे हे लक्षात ठेवले पाहिजे की जमीनमहसूल (अथवा खंड) देण्यासाठी शेतमालाच्या निर्यातीला उत्तेजन मिळत असे; परंतु सामान्यतः त्याच प्रमाणात शेतकऱ्यांची क्रयशक्ती मात्र वाढत नसे, अथवा खेड्यांमध्ये बिगर शेतमालाची मागणीही वाढत नसे. शेतमालाची निर्यात अथवा विक्री यांची शेतकऱ्याचा सरकारसारा अथवा जमीनमालकाचा खंड देण्याच्या कामी मदत होत असे; परंतु त्यातून त्याला शहरी उद्योगांतून तयार होणाऱ्या वस्तू विशेष प्रमाणात विकत घेता येतील इतका पैसा सामान्यतः मिळत नसे. या संदर्भात हे लक्षात ठेवले पाहिजे की शेतकऱ्याला द्यावा लागणारा सरकारसारा हा नेहमीच तुलनात्मक दृष्ट्या अधिक असे. औरंगजेबाच्या कारकीर्दीच्या सुरुवातीच्या काळात (१६६५–१६७०) देखील शेतकऱ्यांचे फरारी होणे ही प्रशासनाच्या दृष्टीने एक गंभीर बाब झालेली होती. यावरून शेतकऱ्यावरील शेतसाऱ्याचे ओझे किती असह्य झालेले असावे याची कल्पना येते.[२]

अशा प्रकारे शेतकऱ्याच्या उपभोगाचे स्वरूप हे मुख्यतः स्थानीय उत्पादनावरून निश्चित होत असे. आणि तो जे काही अतिरिक्त उत्पादन करीत असेल त्याचा फार मोठा भाग सरकारसारा व जमिनीचा खंड देण्यात खर्च होत असे. शेतमालाचा व्यापार हा प्रामुख्याने स्थानीय किंवा प्रादेशिक स्वरूपाचा असे; आणि सरकारसारा भरण्याचे व शहरांतील लोकांच्या शेतमालाच्या गरजा भागविण्याचे एक साधन म्हणूनच बहुधा तो केला जात असे.

१७५० सालापूर्वी अनेक शतके उत्तर भारताच्या बहुतेक भागांत शेतसाऱ्याच्या भारी दडपणामुळेच नव्हे तर त्या प्रणालीच्या अंमलबजावणीशी संबंधित असलेल्या इतर सर्व गोष्टींमुळे वैयक्तिक प्रयत्न व सर्वसामान्य शेतीविकास यांना प्रोत्साहन मिळण्याऐवजी उत्साहभंग होत असे. सर डब्ल्यू. एच्. मोरलँड यांच्या ग्रंथातील पुढील उताऱ्यांवरून ही गोष्ट उत्तम प्रकारे स्पष्ट होईल :—

"शेवटी, आतापर्यंत वर्णन केलेल्या वस्तुस्थितीचे आर्थिक मर्म काय यासंबंधी चार शब्द सांगणे योग्य होईल. हळूहळू परंतु सातत्याने प्रगती करणारी कृषिविकासाची कल्पना चौदाव्या शतकातही विद्यमान होतीच. बहुधा ती पूर्णपणे कधीच नाहीशी झालेली नव्हती. परंतु ती सफल होण्याच्या दृष्टीने राजकीय व सामाजिक परिस्थिती सामान्यतः प्रतिकूल होती. शेतसाऱ्याने अगदी वरची पातळी गाठली होती. ती जवळजवळ पूर्ण आर्थिक भाड्याच्या (full econonic rent) पातळीवर होता. इस्लामी धर्मग्रंथांच्या आधारे या शेतसाऱ्याचे समर्थन करण्याची एखाद्याने तसदी घेतली तर तसे समर्थन करणे अगदी शक्य आहे. परंतु त्याचा वास्तविक हेतू मात्र एकामागून एक अधिकारावर आलेल्या राजवटी आणि त्यांचे अधिकारी यांच्या गरजांमध्ये पहावयास मिळतो. या शेतसाऱ्याचा परिणाम विविध प्रकारच्या जबरी वसुल्यांमुळे अपरिहार्यपणे वाढतच होता. या जबरी वसुल्यांना अधूनमधून मनाई केली जात असे. परंतु प्रत्येक मनाईनंतर त्या अगदी नियमितपणे चालू होत. याचा प्रत्यक्ष परिणाम म्हणून शेतकऱ्याकडून जेवढे काही वसूल करणे शक्य असेल तेवढे काढून घेतले जाई आणि अशा प्रकारे त्याचे खालच्या पातळीवरील साचेबंद जीवनमान कायम राही. याखेरीज आणखीही एक परिणाम घडून येई. तो असा की ज्या शेतकऱ्याला चांगला पैसा मिळत असे त्यांला आपल्य खेड्याबाहेरील प्रत्येक व्यक्तीपासून, आणि बहुधा आपल्या शेजाऱ्यांपासूनही आपले वैभव लपवून ठेवण्याची गरज भासे. अशा प्रकारे प्रशासन

२. डब्ल्यू. एच्. मोरलँड, 'अॅग्रेरियन सिस्टिम ऑफ मुस्लिम इंडिया', (१९२९), पृ. १४४.

व शतकरी यांच्यांतील संघर्ष कायम चालू असे. शेतकरी जे काही टिकवून व लपवून ठेवण्याचा प्रयत्न करीत ते शोधून काढून हस्तगत करण्याची धडपड प्रशासनाकडून केली जाई. अशा परिस्थितीत शेतीचा विकास फार मोठी वाटचाल करू शकला असता अशी अपेक्षाच बाळगता येणार नाही.

"शेतजमीन पूर्णपणे वहिवाटीखाली असती तर अशी परिस्थिती फार काळ चालू शकली नसती; कारण, मग शेतकऱ्यांतील चढाओढीमुळे त्यांच्या खंडाची रक्कम इतकी वाढली असती की एक तर शेतकऱ्याचे जीवन जगण्यालायकच उरले नसते, किंवा प्रशासनाला आपले धोरण बदलणे भाग पडले असते. वस्तुत: एकोणिसाव्या शतकात भारताच्या फार मोठ्या भागात असेच घडले. त्यावेळी सरकारला आपले धोरण बदलणे भाग पडले. तथापि, संपूर्ण मुस्लिम कारकीर्दीत, सामान्यत: अतिरिक्त शेतजमीन विद्यमान होती आणि शेतकऱ्यांना गमावून बसण्याच्या धोक्यामुळे प्रशासनाच्या जबरी वसुलीला थोडाफार आळा बसला. मला वाटते, हा धोका देशाच्या या किंवा त्या भागात मधूनमधून प्रत्यक्षात अवतरला असावा. तो इतिहासकारांचे लक्ष वेधून घेण्याइतक्या मोठ्या प्रमाणात घडून आला नसेल; परंतु इतिहासात अशा दोन घटना पहावयास मिळतात. पहिली घटना म्हणजे मुहम्मद तघलकाच्या आधिपत्याखालील नदीप्रदेश (River Country) निर्जन झाला होता ही होय; आणि दुसरी घटना म्हणजे सतराव्या शतकाच्या उत्तरार्धात सर्वसामान्य अर्थव्यवस्था ढासळली होती, ही होय. या दोन्ही बाबतींत प्रशासनाने विद्यमान प्रणालीवर ती मोडून पडेल इतके दडपण आणले होते आणि ती प्रणाली खरोखरीच मोडून पडली. परंतु ज्या दीर्घंतर कालखंडात ही प्रणाली चालू होती त्यावेळी घडलेल्या अत्यंत वाईट घटना म्हणजे वैयक्तिक उत्साह दडपला गेला होता, आणि देशाचे वार्षिक उत्पन्न वाढविण्यासाठी एकोप्याने प्रयत्न करण्याऐवजी फाटाफूट करण्याच्या दृष्टीने संघर्ष करण्यावरच सारी शक्ती केंद्रित करण्यात आली होती, या होत. मुसलमान राज्यकर्त्यांनी आपल्या मागून येणाऱ्यांसाठी ठेवलेला हा नुकसानीचा वारसा होता. ही नुकसानी अजूनही भरून निघालेली नाही."[3]

हे वर्णन दक्षिण भारताला, विशेषत: सोळाव्या शतकापूर्वीच्या दक्षिण भारताला लागू पडेलच असे नाही. तथापि, विजयनगर साम्राज्याचा नाश आणि त्यानंतर काही दशकांतच सुरू झालेल्या मुगल सम्राटांच्या दक्षिणेकडील स्वाऱ्या यांमुळे दक्षिण भारतात खूप मोठ्या उलथापालथी घडून आल्या आणि सतराव्या शतकात त्या प्रदेशामध्ये अत्यंत अस्थिर परिस्थिती निर्माण झाली.

शेतमालाच्या बाबतीत सामान्यत: स्वावलंबनाची परिस्थिती विद्यमान होती, याचा अर्थ असा नव्हे की त्यावेळी खास प्रकारचा माल तयार होत नव्हता आणि या मालाचा व्यापार केव्हा केव्हा फार दूरपर्यंत चालत नव्हता. त्या काळात चालणाऱ्या सर्व प्रकारच्या लष्करी हालचालीसाठी खुष्कीच्या मार्गाने दूरदूरपर्यंत फार मोठ्या प्रमाणावर धान्याची देखील वाहतूक करावी लागत असे. त्यामुळे स्वारीवर असणाऱ्या लष्करांच्या गरजा भागविण्यासाठी ओझ्याच्या जनावरांकडून ओढल्या जाणाऱ्या मोठमोठ्या गाड्यांतून मालाची वाहतूक करण्याच्या खास धंद्याचे महत्त्व वाढत असल्याचे आपल्याला दिसून येते. सैन्यासाठी शेतमालाची वाहतूक करण्याव्यतिरिक्त असाही काही खास माल तयार होत होता की ज्याचा व्यापार दूरदूरपर्यंत चालत

३. कित्ता, पृ. २०७-२०८.

असे. सामान्यतः ज्या मालाचे उत्पादन या ना त्या कारणाने विशिष्ट प्रदेशांपुरतेच मर्यादित असे अशा प्रकारचा तो माल असे. अशा मालापैकी अत्यंत महत्त्वाच्या मालाचा परदेशांशीही व्यापार चाले. नीळ व मिरी यांचा यात समावेश होतो. तथापि, अधिक व्यापक प्रदेशात उत्पन्न होणाऱ्या मालाचाही थोडाफार व्यापार चालत असावा. या काळातील सार्वत्रिक स्वावलंबनाच्या वैशिष्ट्याचे उदाहरण म्हणून आपल्याला सबंध देशभर सापेक्षतः विस्तृत प्रमाणावर होणाऱ्या कपाशीच्या लागवडीकडे बोट दाखविता येईल. सामान्यतः, कपाशीच्या स्थानिक उत्पादनातून स्थानिक उद्योगाच्या गरजा भागत असत; आणि तयार होणारे बहुतेक कापड आसपासच्या गावांत किंवा त्या प्रदेशात खपत असे. अशा परिस्थितीत, कपाशीचे प्रादेशिक उत्पादन आणि कापडाची प्रादेशिक मागणी यांमुळे त्या प्रदेशातील विणकाम-उद्योगाच्या विकासाला मर्यादा पडत असल्या पाहिजेत. काही विशेष परिस्थितीमुळे एखाद्या प्रदेशातील कापडउद्योगातील उत्पादनाला वाढती मागणी आली तर कपाशीच्या स्थानिक उत्पादनाला प्रोत्साहन मिळत असे; एवढेच नव्हे तर इतर प्रदेशांतून कापूस आयात करण्याचीही गरज उत्पन्न होत असे.

अठराव्या शतकात अशा प्रकारे कापूस आयात करण्याची गरज दोन प्रदेशांमध्ये उत्पन्न झाली होती असे दिसून येते. ते दोन प्रदेश म्हणजे बंगाल आणि आंध्राचे किनारी जिल्हे हे होत. या प्रदेशांमध्ये कापसाच्या आयातीची ही जी गरज उत्पन्न झाली तिचे मुख्य कारण परकीय कारखान्यांच्या एजंटांनी निर्यातीसाठी फार मोठ्या प्रमाणावर कापडाची खरेदी करण्यास सुरुवात केली, हे होते. या काळात सामान्य प्रकारच्या कपड्याचा देशामध्ये फार दूरवर व्यापार चालत असेल असे समजण्यास फारसा पुरावा नाही. कापडाचा अखिल भारतीय स्वरूपाचा व्यापार हा त्या काळी अत्यंत उत्कृष्ट प्रकारच्या कापडापुरताच मर्यादित होता. हा चैनीच्या मालाचा व्यापार होता. त्याची किंमत बहुधा खूप असे, परंतु ज्या मालाचा तो व्यापार होता त्याचे प्रमाण फार मर्यादित असे. या व्यापारामुळे कोणत्याही प्रदेशातील कापडउद्योगातील कापसाची मागणी फार मोठ्या प्रमाणावर वाढत नसणार. बंगाल व आंध्र येथील कापडाला निर्यातीसाठी फार मोठी मागणी असल्यामुळे तेथील स्थानिक कापसाचा पुरवठा अपुरा पडला व त्यांना परप्रांतांतून कापूस आयात करण्याची गरज भासली.

परकीय लोकांकडून येणाऱ्या कापडाच्या मागणीमुळे ज्यावर अशा प्रकारचे दडपण येत असे असा आणखी एक प्रदेश म्हणजे गुजरात हा होय. तथापि गुजरातच्या बाबतीत कापसाच्या स्थानिक उत्पादनात वाढ करण्याची शक्यता पुष्कळ होती. यामुळे कापडाच्या निर्यातीच्या प्रचंड मागणीचा परिणाम म्हणून गुजरातला बाहेरून कापूस आयात करावा लागत नसे.

अठराव्या शतकाच्या मध्यास दूर अंतरापर्यंत ज्याचा अंतर्गत व्यापार चालत असे असा शेतमाल म्हणून केवळ कापसाचाच उद्योग महत्त्वाच्या उदाहरणादाखल करावा लागेल असे वाटते. तथापि, या व्यापाराचे प्रमाण केवढे होते आणि कापूस निर्यात करणाऱ्या प्रदेशांवर या व्यापाराचा काही परिणाम होत असल्यास त्याचे स्वरूप काय होते याविषयी आपल्याजवळ फारशी माहिती उपलब्ध नाही. या बाबतीत कापसाचा व्यापार हा जमीन महसूल भरण्यासाठी केल्या जाणाऱ्या मालाच्या निर्यातीपेक्षा अगदी वेगळ्या प्रकारचा व्यापार होता असे म्हणता येईल. कापसाच्या निर्यातीची मागणी पुरी करावयाची म्हणजे व्यापारी पिकांखालील क्षेत्र वाढविणे, या पिकांचा व्यापार व त्यासाठी लागणारा भांडवलपुरवठा आणि त्या निमित्ताने ग्रामीण अर्थव्यवस्थेत होणारा व्यापारी व सावकार यांचा प्रवेश इत्यादि प्रश्न उपस्थित होत असले पाहिजेत. सारांश,

यातून शेतीचे वाणिज्यीकरण झाले असणार; आणि आधुनिक अवस्थेचा तो पूर्वटप्पा ठरला असणार. या काळातील कापसाच्या व्यापारासंबंधी फारच थोडी माहिती उपलब्ध आहे. तथापि कापसाच्या व्यापारासारखेच प्रश्न असणाऱ्या निळीच्या व्यापारासंबंधी मात्र थोडीफार पुरेशी आकडेवारी उपलब्ध आहे. त्यावरून असे दिसून येते की, एखाद्या प्रदेशात निळीसारख्या व्यापारी पिकाची सुरुवात व प्रस्थापना यांमुळे पुढील शतकात शेतीच्या सर्वसामान्य वाणिज्यीकरणामुळे जशा प्रकारचा व्यापार व अर्थव्यवहार प्रचलित झाला अगदी तशाच प्रकारचा व्यापार व अर्थव्यवहार सुरू झाला.[४]

आतापर्यंत ज्या प्रमुख मुद्यांवर भर देण्यात आला ते असे :– ग्रामीण अर्थव्यवस्थेची स्वयंपूर्णता, वाणिज्यीकरणाचा अभाव, अतिरिक्त शेतमालाचा शहरांच्या दिशेने वाहणारा एकमार्गी प्रवाह, आणि नीळ व कापूस यांसारख्या उत्पादित वस्तूंच्या व्यापाराचे अपवादात्मक स्वरूप. येथे आपण शहरी भांडवल-पुरवठा व व्यापार–प्रणाली आणि ग्रामीण अर्थव्यवस्था यांच्यांतील सापेक्ष संबंधविच्छेद अथवा भेदही नमूद करण्यास हरकत नाही. ग्रामीण भागात सरकार व महसूल अधिकारी यांच्या द्वारे येणारे शहरी प्रभाव महत्त्वाचे होते. त्यामुळे व्यापार व सावकारी करणाऱ्या समाजापैकी जेव्हा कोणी मुख्यतः जमीन महसूल भरण्याची जबाबदारी उचलीत असे तेव्हा ग्रामीण अर्थव्यवस्थेचा या समाजांशी संबंध प्रस्थापित होई.

ग्रामीण अर्थव्यवस्थेचे हे विवेचन पूर्ण करण्यापूर्वी पिके बुडण्याचा धोका आणि प्रत्यक्ष पिके बुडण्याच्या घटना यांचा उल्लेख करणे भाग आहे. येथील प्रदेश भूवेष्टित होते आणि त्यांना शेतमालाची निर्यात करणे शक्य नव्हते. त्यामुळे तेवढ्या प्रमाणात शेतमालाच्या आयातीचा खर्च व अडचणीही मोठ्या होत्या. म्हणून देशाच्या अधिकांश भागात पिके बुडण्याचा गंभीर प्रसंग ओढवला असता शेतमालाचा प्रत्यक्ष तुटवडा निर्माण होई आणि तो आयातीने भरून काढणे शक्य होत नसे. अशा परिस्थितीत गंभीर अवर्षण पडले असता माणसे व गुरे यांचे फार मोठ्या प्रमाणावर स्थलांतर घडून येई आणि लागोपाठ वाईट पिके आल्यास एखाद्या प्रदेशाच्या अर्थव्यवस्थेवर एका संपूर्ण पिढीच्या दृष्टीने परिणाम होऊन ती पंगू बने.[५]

प्राचीन काळापासून पाटबंधारे सुस्थितीत ठेवणे व त्यांची वाढ करणे याची जबाबदारी राजावर व प्रशासनावर असे; आणि त्यामानाने शांततेच्या काळात या कामाकडे नेहमीच लक्ष पुरविण्यात येई. खरे म्हणजे, सामान्यतः एखाद्या राजाकडून केल्या जावयाच्या चांगल्या कामांमध्ये इतर गोष्टींबरोबर पाणी पुरवठ्याच्या साधनांत वाढ आणि पाटबंधारे यांचा समावेश असे. तथापि, अशा प्रकारे वाढ करण्याचे काम अगदी लहरीपणाने आणि फार थोड्या राजांकडून हाती घेतले जाई. याच्या उलट, युद्धे, रोगांच्या साथी व दुष्काळ यांमुळे अधूनमधून जी अस्थिरता

४. सतराव्या शतकाच्या प्रारंभी बयाना येथे निळीचा व्यापार चालत असे. त्यावेळी निळीचे पीक काढणाऱ्याला त्या पिकावर काही महिने आधी आगाऊ रक्कम देऊन त्याने येणारे पीक दुसऱ्या कोणालाही विकता कामा नये असे बंधन घातले जात असे. पाहा. एफ्. पेल्सार्ट, 'जहांगीर्स इंडिया', पृ. १५–१६. १८०० सालची मलबारमधील परिस्थिती वर्णन करतांना श्री बुकनन असे नमूद करतात की तेथेही अगदी अशीच परिस्थिती होती. तेथील शेतकऱ्याला नारळ व मिरी या दोन्ही पिकांसाठी आगाऊ रक्कम घ्यावी लागत असे व त्याने त्यांची पुष्कळच सोय होत असे. पाहा : डी. एच्. बुकनन, 'डेव्हलपमेंट ऑफ कॅपिटॅलिस्ट एंटरप्राइज इन इंडिया', (१९३४) पृ. ४०१ आणि ४५५.

५. पाहा : डब्ल्यू. एच्. मोरलँड, 'फ्रॉम अकबर टु औरंगजेब', प्रकरण ७, पृ. २०५–२२०.

निर्माण होई तिच्या योगे पाणी पुरवठयाच्या साधनांची दुरुस्ती न होणे, त्यांचा वापर न होणे, व ती नादुरुस्त होणे यांसारख्या गोष्टी वारंवार घडत. त्यामुळे कोणत्याही कालखंडात या बाबतीत एकूण प्रगती फारशी मोठी होण्याची शक्यता नसे.

अशा प्रकारे १७५० साली देशाचा ग्रामीण विभाग, आणि विशेषत: शेती ही भारतातील आधुनिक उद्योगाच्या विकासाला कोणत्याही प्रकारे भरीव हातभार लावण्याच्या अवस्थेत नव्हती. हे कार्य करण्याची संधी, क्षमता व साधनसंपत्ती असणारे घटक शहरी क्षेत्रांत होते. म्हणून या ठिकाणी, अठराव्या शतकाच्या मध्यास असणारी भारतातील शहरे, व्यापार व व्यापारी मार्ग यांसंबंधीच्या ठळक गोष्टींचा उल्लेख करणे आवश्यक आहे.

### ३. नागरीकरण व शहरांचा आकार

१७५० च्या सुमारास भारतामध्ये जेवढे नागरीकरण झालेले होते ते इंग्लंड, फ्रान्स व इटली या देशांतील नागरीकरणाशी तुलना करिता येण्याएवढे असावे, असे वाटते. परंतु या विधानाच्या पुष्टयर्थ आकडेवारीचा ठाम पुरावा सादर करणे मात्र शक्य नाही. आपल्याजवळ वेगवेगळ्या शहरांच्या आकारांसंबंधी विश्वसनीय आकडेवारी देखील नाही. पुणे शहरातील घरांची संख्या इत्यादीसंबंधीच्या तत्कालीन नोंदींची सविस्तर छाननी केल्यानंतर १७६० साली त्या शहराची लोकसंख्या सुमारे ४० हजार असावी असे अनुमान निघते. त्या शतकाच्या अखेरपर्यंत ही लोकसंख्या १ लाखावर जाऊन पोहोचली होती. अठराव्या शतकाच्या प्रारंभी पुण्याची लोकसंख्या बहुधा २० हजाराहून अधिक नसावी. या आकडयांवरून अठराव्या शतकात झपाट्याने खूप मोठ्या राजकीय महत्त्वाच्या स्थानावर जाऊन पोहोचलेल्या परंतु मूलत: महत्त्वाचे औद्योगिक किंवा व्यापारी केंद्र नसलेल्या आणि आपल्या विकास-प्रक्रियेत तसे केंद्र न बनलेल्या अशा एका शहराच्या वाढीची कल्पना येते.[६]

इतर बहुतेक शहरांच्या बाबतीतील आकडे समकालीनांनी नोंद करून ठेवलेल्या अंदाजांवर आधारलेले आहेत; आणि जेथे जेथे एकाहून अधिक अंदाज उपलब्ध आहेत तेथे तेथे हे आकडे सामान्यत: एकमेकांहून खूपच भिन्न असल्याचे आढळून येते.[७] तथापि या काळात भारतात आलेले युरोपीय प्रवासी येथील शहरांच्या दाट लोकवस्तीने खूपच प्रभावित झाले होते हे उघड आहे. क्लाइव्ह याला त्याच्या काळातील मुर्शिदाबाद शहर लंडनशी तुलना करिता येईल असे

६. ध. रा. गाडगीळ, 'पूना : ए सोशियो-एकॉनॉमिक सर्व्हे,' (१९५२), प्रकरण १.

७. मुंबई शहराच्या गॅझेटिअरमध्ये (१९०९) जुन्या काळातील लोकसंख्याविषयक अंदाजांचा काळजीपूर्वक खुलासा दिलेला आहे. त्यावरून ज्या शहराच्या बाबतीत एरव्ही उपलब्ध नसणारी भरपूर आकडेवारी उपलब्ध आहे तेथील आकडेवारीचे स्वरूप स्पष्ट होते. १७५० च्या आधीच्या शतकाविषयी पुढीलप्रमाणे महत्त्वाचे लोकसंख्याविषयक अंदाज उपलब्ध आहेत : ६०००० (१६७०); १६,००० (१७१५); आणि ७०,००० (१७४४) १७६४ या वर्षाविषयीचे परस्परांपासून खूप भिन्न असे अंदाज विद्यमान आहेत (१,४०,००० व ६०,०००). हे दोन्ही अंदाज अविश्वसनीय समजले गेले आहेत. एकोणिसाव्या शतकाच्या पहिल्या चतुर्थांशातील सर्वसामान्य खानेसुमारीवरून मुंबईची लोकसंख्या सुमारे २,००,००० असावी असे दिसते. १८४९ व १८६४ या वर्षांतील स्थूल गणनेवरून अनुक्रमे ५,६६,००० आणि ७,८४,००० असे आकडे उपलब्ध होतात. परंतु १८७२ व १८८८ यावर्षी झालेल्या खानेसुमारीत तेथील लोकसंख्या अनुक्रमे ६,४४,०० व ७,७३,००० असल्याचे आढळून आले आहे. इतर अनेक स्थानांप्रमाणेच मुंबईच्या बाबतीतही नियमित शिरगणती सुरू होण्यापूर्वीच्या दशकातील आकड्यांची शिरगणतीत उपलब्ध झालेल्या आकड्यांशी तुलना केल्यास ते अंदाज वाजवीपेक्षा अधिक फुगलेले दिसतात.

असल्याचे वाटत होते, ही गोष्ट मशहूर आहे. वेगवेगळ्या शहरांच्या भाग्यांमध्ये काही थोड्या वर्षांच्या अवधीत फार मोठे बदल घडून येऊ शकतात आणि त्यांचा परिणाम म्हणून त्यांच्या लोकसंख्येतही चढ-उतार होऊ शकतात. उदाहरणार्थ, अठराव्या शतकाच्या पूर्वार्धात दिल्ली शहराला झपाट्याने उतरती कळा लागली आणि पंजाबातील शहरांना अत्यंत खडतर काळातून जावे लागले. देशाच्या इतर अनेक भागांतील भारतीय शहरांच्या भाग्यामध्येही अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात फार झपाट्याने बदल घडून आले. भारतीय शहरांच्या अठराव्या शतकातील लोकसंख्येसंबंधी आपल्यापाशी जवळजवळ काहीही आकडेवारी उपलब्ध नाही; आणि एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धातील लोकसंख्येसंबंधीही सापेक्षतः फार थोडी विश्वसनीय माहिती उपलब्ध आहे.

एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभिक काळातील छोट्या शहरांच्या आकारासंबंधी थोडीफार कल्पना थॉर्नटन्स गॅझेटियर या ग्रंथासारख्या प्रकाशनामध्ये दिलेल्या आकडेवारीवरून करिता येईल. ही आकडेवारी बहुधा अत्यंत अधिकृत व समकालीन दप्तरांतून गोळा केलेली व प्रस्तुत केलेली असावी असे दिसते.[८] यामध्ये सामान्यतः १८०० ते १८४० या दरम्यानच्या काही वर्षांचे अत्यंत विश्वसनीय उपलब्ध अंदाज मिळतात. १७५० पासून ज्या शहरांची लोकसंख्या घटली असावी, असे अनुमान काढता येते त्या शहरांशी संबंधित आकडेवारी आपण प्रथम पाहू. ती आकडेवारी अशी :– ढाका १,००,००० (१८१४ च्या आसपास), मुर्शिदाबाद १,५२,००० (१८३०), आग्रा ७५,००० (१८४०), पाटणा ३,००,००० (१९ व्या शतकाच्या सुरुवातीस) नागपूर १,१०,००० (१८४०), तंजोर ८०,००० (१८४०). या सर्व शहरांच्या बाबतीत असे म्हणता येते की वर नमूद केलेल्या काळाच्या आधी पन्नास–साठ वर्षे त्या शहरांचे राजकीय व आर्थिक महत्त्व थोडे फार कमी होऊ लागले होते. तथापि या आकड्यांवरून ही शहरे १७५० साली किती मोठी होती याचा अंदाज आपल्याला येऊ शकत नाही; अथवा त्यांच्या परस्पर क्रमासंबंधीही काही अनुमान काढता येत नाही. उदाहरणार्थ, ढाका, मुर्शिदाबाद व पाटणा ही तीन्ही शहरे अठराव्या शतकाच्या पूर्वार्धात फार मोठी होती असे वर्णन करण्यात आले होते. १७५० नंतर त्या सर्वांना बरीच उतरती कळा लागली; परंतु पाटण्यापेक्षा मुर्शिदाबाद व ढाका यांना ती फार झपाट्याने लागली असण्याचा संभव आहे.

अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात सुरतेची लोकसंख्या सुमारे ३,००,००० असावी असा एक अंदाज आहे. या ठिकाणी हे नमूद करण्यासारखे आहे की सतराव्या शतकातील प्रवाशांच्या अहवालांवरून सुरत व अहमदाबाद ही दोन्ही फार मोठी शहरे होती आणि त्यांची लोकसंख्या प्रत्येकी सुमारे १० लाख असावी असे दिसते. या आकड्यांमध्ये पुष्कळच कपात केली तरी अहमदाबाद व सुरत या दोन्ही शहरांच्या बाबतीत असे गृहीत धरावेच लागते की सतराव्या शतकात किंवा अठराव्या शतकाच्या सुरुवातीस ही शहरे अत्युच्च शिखरावर जाऊन पोचली होती आणि त्यानंतर त्यांना उतरती कळा लागली. वर दिलेल्या आकड्यांवरून असे सूचित होते की अहमदाबादची लोकसंख्या व व्यापार यांना प्रामुख्याने १७८० पूर्वी उतरती कळा लागली होती; आणि तेव्हापासून परिस्थिती स्थिर राहिलेली होती. याच्या उलट सुरतेचा ऱ्हास मुख्यतः १७५०

---

८. समग्र भरतखंडातील ईस्ट इंडिया कंपनीच्या व एतद्देशीय संस्थानांच्या अमलाखालील प्रदेशांचे गॅझेटियर (स्थलवर्णन कोश) मा. कोर्ट ऑफ डायरेक्टर्सच्या अधिकृत अनुमतीने व प्रामुख्याने त्यांच्या ताब्यातील कागदपत्रांच्या आधारे एडवर्ड थॉर्नटन यांनी १८५४ साली चार खंडांत संकलित केले.

नंतर सुरू झाला असावा असे दिसते. शहरांची लोकसंख्या निश्चित करणारे घटक विविध आहेत. मिर्झापूर ही १८४० साली भारतातील सर्वात मोठी कापसाची बाजारपेठ होती असे म्हटले जाते. परंतु त्या शहराची त्यावेळची लोकसंख्या फक्त ८०,००० होती. हैदराबाद व लखनऊ या दोन महत्त्वाच्या जुन्या शहरांच्या बाबतीत मात्र त्यांचे राजकीय व इतर महत्त्व चालू राहिल्यामुळे त्यांना उतरती कळा लागली नसावी किंवा ती नजरेत भरण्याइतकी मोठी नसावी असे दिसते. १८४० साली या दोन शहरांची लोकसंख्या अनुक्रमे सुमारे २ लाख व ३ लाख होती.

भारतीय शहरांच्या या हकीगतीला युरोपीय लोकांच्या हालचालीचा प्रत्यक्ष परिणाम म्हणून उदयास आलेल्या शहरांच्या खास उल्लेखाची पुरवणी जोडण्यास हरकत नाही. यांपैकी बहुतेक शहरांचे मूळ एखाद्या राजाकडून अथवा स्थानिक अधिकाऱ्याकडून मिळविलेल्या जमिनींच्या अथवा खेड्यांच्या देणगीत असल्याचे आढळते. त्या ठिकाणी युरोपीय कंपनी प्रथम काही निवासस्थाने व वखारी उभारी आणि सामान्यत: त्यांच्या भोवती तटबंदी केली जाई. युरोपीय व्यापाऱ्यांचे व्यवहार सुरुवातीला कालिकत, सुरत, ठठ्ठा, आग्रा, पाटणा, मच्छलीपट्टण यांसारख्या विद्यमान महत्त्वाच्या व्यापारी केंद्रांमध्ये चालू होते. ज्या प्रदेशांत विशिष्ट ठिकाणी व्यवहाराचे फार मोठे केंद्रीकरण झालेले नसेल अथवा जेथे काही कारणामुळे ते त्यांना गैरसोयीचे वाटत असेल तेथेच प्रामुख्याने त्यांना आपली स्वतंत्र व्यवस्था करून घेण्याची गरज भासत असे. अशा कारणांमुळे कोरोमंडल किनाऱ्याच्या दक्षिणेस व गंगेच्या मुखाजवळील त्रिभुज प्रदेशात सतराव्या शतकाच्या अखेरीस वसाहती केल्या गेल्या असाव्यात असे दिसते. १७५० साली ट्रांकोबार, नागपट्टणम, पाँडिचेरी, आणि मद्रास ही कोरोमंडल किनाऱ्यावरील ठिकाणे अनुक्रमे डेन, डच, फ्रेंच व इंग्लिश लोकांनी वसविली होती; आणि हुगळीच्या प्रदेशात कलकत्ता, श्रीरामपूर व चंद्रनगर ही शहरे अनुक्रमे इंग्लिश, डेन व फ्रेंच लोकांनी वसविली होती. याच्या उलट मुंबईची स्थापना ही भौगोलिक स्थिती अथवा गरज यांपेक्षा एका युरोपीय राजघराण्यातील लग्नाच्या देवाण-घेवाणीच्या ऐतिहासिक योगायोगाचा परिणाम म्हणून झाली असे दिसते.

दक्षिणेच्या कोरोमंडल किनाऱ्याच्या प्रदेशात मोठ्या सुस्थापित केंद्रांचा अभाव आणि शेजारच्या प्रदेशातील अस्थिर परिस्थिती या दोन्ही गोष्टी विद्यमान होत्या. त्याचबरोबर हा किनारा पूर्वेकडील देशांत व्यापार वाढविण्याच्या दृष्टीने सोयीचा होता ही एक महत्त्वाची गोष्ट त्यात होती. १७५० च्या आधीच्या शतकात आग्नेय आशिया व चीन या भागांतील युरोपीय कंपन्या व व्यापारी यांच्या व्यापाराची वाढ बरीच झालेली होती आणि त्यामुळे व्यापारातील त्यांची स्पर्धाही खूप वाढलेली होती. या कंपन्यांच्या दृष्टीने पूर्व व आग्नेय आशियातील व्यापारी हालचालींचा तळ म्हणून कोरोमंडल किनाऱ्यावर एक ठाणे असणे महत्त्वाचे होते. पूर्व भारतातील व्यापाराचे प्रमाण व मूल्य झपाट्याने वाढल्यामुळेच प्रामुख्याने हुगळीच्या प्रदेशात एक केंद्र निर्माण करण्याची गरज उत्पन्न झाली होती.

दक्षिण कोरोमंडल किनाऱ्यावरील युरोपीय कंपन्यांच्या वसाहतींची स्थापना ही मूलत: त्यांच्या व्यापाराच्या गरजांतून झाली; तर या वसाहतींची वाढ मुख्यत: देशाच्या या भागातील अत्यंत अस्थिर परिस्थितीमुळे झाली असे दिसते. प्रबल राजसत्तेच्या अभावामुळे युरोपीय कंपन्यांना पूर्णपणे तटबंदी असलेली शहरे वसविता आली; आणि या (शेजारच्या) प्रदेशात नेहमी अस्थिर परिस्थिती राहिल्यामुळे येथील भारतीय व्यापारी, कारागीर वगैरे फार मोठ्या संख्येने या केंद्रांकडे आकर्षित झाले. या सर्वांचा एकूण परिणाम असा झाला की १७५० साली

पांडिचेरी व मद्रास ही सर्व दृष्टींनी दक्षिण भारतातील सर्वांत मोठ्या शहरांमध्ये गणली जाऊ लागली.[९] ही शहरे कोणत्याही कारागिरीच्या अथवा इतर उद्योगांची महत्वपूर्ण शहरे बनलेली नव्हती अथवा त्यांच्या भोवतालच्या प्रदेशातून शेतमालाचा अथवा इतर उत्पादनांचा फारसा व्यापारही सुरू झालेला नव्हता; तरीही हे घडून आले ही विशेष गोष्ट होय. मद्रासच्या लोकसंख्येसंबंधीच्या जुन्या अंदाजांवर भाष्य करणे काहीसे अवघड आहे. १८७१ च्या शिरगणतीप्रमाणे या शहराची लोकसंख्या ४ लाखाहून थोडीशी कमी होती, आणि १८८१ च्या शिरगणतीत ४ लाखाहून थोडी अधिक झालेली होती. एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात १८२२ साली झालेल्या मोजणीत ती ४, ७० ००० होती तर १८६७ साली ती ४, ५०,००० होती. १७६३ साली या शहराची लोकसंख्या अंदाजे १० लाख होती आणि त्यानंतर काही वर्षांनी ती ७,५०,००० झाली होती. अठराव्या शतकातील हे अंदाज अतिरेकी वाटतात. तरीपण १७५० साली मद्रास शहराची लोकसंख्या सुमारे ३ लाख असावी असे दिसते; आणि यावरून भारतातील सर्वांत मोठ्या शहरांमध्ये त्याची गणना होत होती, असे म्हणता येते.

कलकत्याची लोकसंख्या १७१० साली सुमारे १० ते १२ हजार असावी असे समजले जाते. या शहराची अठराव्या शकतात, विशेषतः १७५७ च्या प्लासीच्या युद्धातील विजयानंतर झपाट्याने वाढ झाली. तथापि १८२२ साली या शहरातील रहिवाशांची संख्या २ लाखांहून अधिक नसावी, असा अंदाज आहे. त्यामुळे १७५० साली त्याची लोकसंख्या सुमारे १ लाख असण्याची शक्यता आहे. मुंबई शहराच्या लोकसंख्येसंबंधीचे अंदाज यापूर्वी नमूद केलेच आहेत.

### ४. व्यापारी मार्ग व व्यापारी प्रदेश

यानंतर व्यापारी मार्ग व व्यापारी प्रदेश यांच्यासंबंधी थोडक्यात विचार करू. या संदर्भात एक गोष्ट स्पष्ट केली पाहिजे, ती अशी की एकूण राजकीय आर्थिक परिस्थितीत स्थैर्याचा सापेक्षतः अभाव असल्यामुळे एखाद्या विशिष्ट कालखंडाला लागू पडेल असे वर्णन प्रस्तुत करणे अशक्य आहे.

शहरे व व्यापार यांच्या भाग्यांमध्ये घडून येणाऱ्या मोठ्या परिवर्तनांच्या शक्यता अठराव्या शतकाच्या मध्यास असणाऱ्या सिंधमधील परिस्थितीच्या संदर्भात उदाहरण घेऊन स्पष्ट करिता येतील. सतराव्या शतकाच्या अगदी अखेरीपर्यंत, आपल्याला असे आढळून येते की, सर्व युरोपीय प्रवासी या शहरात होणारा प्रचंड व्यापार व त्या शहराशी असणारी मोठी जलवहातूक यांच्या संबंधी लिहितात. सतराव्या शतकात ठठ्ठा हे केवळ मोठ्या प्रमाणावर बंदरातून होणाऱ्या आयात-निर्यातीच्या मधल्या टप्प्याच्या व्यापाराचेच (entrepot trade) केंद्र किंवा उतारपेठ नव्हते, तर कारागिरीच्या मोठ्या उद्योगाचेही ते केंद्र होते. या काळातही सिंधचा व्यापार हा फक्त या प्रांताच्या दृष्टीने नव्हे तर मध्य आशियाशी चालणाऱ्या व्यापाराच्या मार्गांपैकी एक मार्ग या दृष्टीनेही तो महत्त्वाचा होता. या व्यापाराच्या भारतीय प्रदेशातील प्रतिनिधींची कार्यालये किंवा वखारी आणि यांना जोडणारे दुवे पश्चिम पंजाब व उत्तर सिंध येथे होते. पंजाबचे मुलतान शहर आणि सिंधमधील बक्कर, सक्कर व रोहडी ही तीन शहरे सतराव्या शतकातील अशा प्रकारच्या केंद्रांपैकी सर्वांत महत्त्वाची केंद्रे होती. अठराव्या शतकाच्या पूर्वार्धातील अशांत

---

९. " १७५६ च्या लढाईपूर्वी पाँडिचेरी हे बहुधा भारतातील सर्वोत्कृष्ट शहर होते." रेनेल, ' मेमॉयर ऑफ ए मॅप ऑफ हिंदोस्तान ', ( १७८८ ), पृ. १९८–९९

राजकीय परिस्थितीमुळे व इतर कारणांमुळे या स्थितीत खूपच बदल घडून आला. ठठ्ठाचा ऱ्हास खूपच झपाट्याने झाला आणि वर उल्लेखिलेल्या तीन शहरांचे उत्तर सिंधमधील स्थानांना जोडणारे दुवे या नात्याने असणारे महत्त्व नाहीसे झाले. १७५० नंतर शिकारपूर या शहराला महत्त्व प्राप्त झाले आणि त्याने वरील शहरांची जागा घेतली. राजकीय परिवर्तनांमुळेही सिंधच्या व्यापाराचे महत्त्व खूपच कमी झाले आणि हा ऱ्हास दीर्घकाळपर्यंत चालत राहिला. कारण बर्नेस याने १८३५ साली असे नमूद करून ठेवले आहे की सिंधू नदीच्या काठी चालणारा व्यापार महत्त्वाचा नव्हता तर सिंधू नदीतून चालणारा व्यापार महत्त्वाचा होता.[१०] सर्व अस्थिर काळात आणि सिंधमधील आर्थिक ऱ्हासाच्या कालखंडात सिंधी हिंदू व्यापाऱ्यांनी मध्य आशियाशी चालणाऱ्या व्यापारात जी भूमिका बजावली ती महत्त्वाची होती; आणि १७५० नंतर शिकारपूर हे व्यापाराच्या दृष्टीने नव्हे तर "अस्त्राखान पासून कलकत्त्यापर्यंत" चालणाऱ्या व्यापाराला भांडवलपुरवठा करणारे एक महत्त्वाचे केंद्र होते.[११]

अर्थात सिंधच्या व्यापाराची मुख्य धमनी सिंधू नदी होती. तिचा उपयोग केवळ काबुल-कंदाहाराशीच नव्हे तर पंजाब व उत्तर भारत यांच्याशीही व्यापार करण्यासाठी केला जात होता. तथापि, त्याखेरीज काही महत्त्वाचे खुष्कीचे मार्गही चालू होते आणि त्या मार्गांनी थोडा-फार व्यापार नेहमीच चालत असे. पाली व अजमेर या शहरांवरून जाणारा हैदराबाद ते आग्रा हा मार्ग होता; आणि जैसलमीर मार्गे सिंधमधील शहरांवरून जाणारा आग्रा व अजमेर यांना जोडणारा रस्ताही होता.

अठराव्या शतकाचा पूर्वार्ध हा बहुतेक संपूर्ण पंजाबच्या दृष्टीने अत्यंत अस्वस्थतेचा काळ होता. सरहद्दीच्या पलीकडून होणाऱ्या स्वाऱ्या, शिखांचा उदय, त्यांचा छळ करण्याचे झालेले प्रयत्न आणि सरतेशेवटी झालेला त्यांचा विजय या महत्त्वाच्या घटना होत्या. त्यांच्यामुळे अनेक दशकांपर्यंत पंजाबची परिस्थिती अत्यंत अस्थिर राहिली. व्यापाराच्या, विशेषतः थेट व्यापाराच्या दृष्टीने याचा परिणाम अत्यंत वाईट झाला. वारंवार येणारे अडथळे आणि त्या मार्गांत असणारे धोके यांमुळे पंजाबमधील प्रस्थापित व्यापारी मार्ग टाळण्याचा प्रयत्न व्यापारी करू लागले; आणि अगदी उत्तरेकडील डोंगराळ प्रदेशातून व अगदी दक्षिणेकडील राजस्थानातून जाणाऱ्या मार्गांकडे त्यांनी आपला व्यापार वळविला. असे सांगितले जाते. शांततेच्या काळात लाहोर हे नेहमीच आंतरराष्ट्रीय व्यापाराचे महत्त्वाचे केंद्र म्हणून ओळखले जात होते. तेथून सिरहिंद मार्गे

---

१०. जे. बर्नेस, 'नॅरेटिव्ह ऑफ ए व्हिजिट टु कोर्ट ऑफ सिंध' (१८२९). (कच्छच्या इतिहासाचा आराखडा व एक परिशिष्ट यांसह). परिशिष्ट क्र. २, पृ. १८–१९. (सिंधू नदीपर्यंतचा व्यापार आणि त्या नदीतील जलवाहतूक यांसंबंधीच्या सर अलेक्झांडर बर्नेस यांच्या व्यावहारिक टीपा). "सिंधू नदीवरील व्यापारासंबंधी परदेशांत बऱ्याच चुकीच्या कल्पना निर्माण करणे व सुधारणे शक्य आहे यात शंका नाही; परंतु, सध्या तरी, सिंधू नदीच्या काठी व्यापार चालत नसून तो त्या नदीतून चालतो. खरे म्हणजे पश्चिम व मध्य आशियाशी चालणाऱ्या व्यापाराचा तो मधला टप्पा (transit trade) आहे. तथापि सोनमियानी पासून कंदाहारपर्यंत आणि भावनगरपासून पाली व उपरि भारतापर्यंतच्या मार्गाची जागा घेणारा तो मार्ग आहे. खुद्द सिंधमध्ये ब्रिटिश मालाचा खप वाढेल अशी आशा तिथल्या व्यापारी समाजाला वाटत असेल तर त्याला निराश व्हावे लागेल. तशी स्थिती कालांतराने येऊ शकेल; परंतु सध्या तरी बहुसंख्य जनता अत्यंत गरीब आहे आणि तेथे खरोखरी कोणी खरेदीदारच नाहीत."

११. किता, परिशिष्ट ३. शिकारपूर व उपरि सिंध यांचा व्यापार, लेखक : सर अलेक्झांडर बर्नेस, पृ. २३.

दिल्ली किंवा आगऱ्यापर्यंत किंवा सहारणपूरमार्गे लखनऊ व अवधपर्यंत व्यापारी मार्ग जात होते.

अठराव्या शतकाच्या पूर्वार्धात लाहोर ज्या राजकीय अशांततेत अडकले होते ती अशांतता कमीअधिक प्रमाणात लुइ दिल्लीलाही अनुभवावी लागली होती. या अशांततेपासून आग्रा शहर त्या मानाने मुक्त होते आणि त्याला त्याच्या भौगोलिक स्थानाचा फायदा पुढेही मिळत राहिला. आग्रा येथे पश्चिम (सिंध व राजस्थान), उत्तर (दिल्ली व पंजाब), पूर्व (अवध, बिहार व बंगाल), आणि दक्षिण (मध्य भारत व माळवा) या दिशांनी येणारे व्यापारी मार्ग एकत्र येऊन मिळाले होते. निदान वर्षातील काही महिने तरी पूर्वेकडील प्रांतांतून जलमार्गाने मालाची वाहतूक आगऱ्यापर्यंत होण्याची शक्यता असे. त्या दृष्टीनेही ते महत्त्वाचे केंद्र होते. अशा प्रकारे गंगा व यमुना यांच्या खोऱ्यांतील अंतर्गत जल-वाहतुकीच्या मार्गावरील शेवटचे ठिकाण म्हणून आगऱ्याचे महत्त्व होते.

या काळात बंगाल, बिहार व अवध यांचा एक व्यापारी विभाग बनलेला होता असे समजण्यास हरकत नाही. या प्रदेशातील विभागांना जोडणारा प्रमुख दुवा म्हणजे गंगा व तिच्या उपनद्या यांतून होणारी महत्त्वाची अंतर्गत जलवाहतूक हा होता. त्यामुळे हा एक फार मोठा व्यापार-विभाग बनला होता; आणि त्या काळात तेथे फार मोठ्या प्रमाणावर व्यापारी हालचाली चालू असत. जलवाहतुकीच्या सोयीमुळे अंतर्गत व्यापाराचे प्रमाण खूप मोठे होते; आणि त्याच कारणामुळे समुद्रमार्गे होणारा व्यापार अथवा परदेशी व्यापार अंतर्गत अर्थव्यवस्थेच्या अनेक उपशाखांवरही परिणाम घडवून आणू शकत असे अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात या अंतर्गत जलवाहतुकीमुळे ३० हजार खलाशांना सतत रोजगार मिळत असे, असे समजले जाते. [११]

अंतर्गत व्यापाराचे आकारमान व त्याची वाढ यांची कल्पना येऊ शकेल, अशी त्यासंबंधीची तपशीलवार माहिती आपल्याजवळ उपलब्ध नाही. तथापि, परराष्ट्रीय व्यापारासंबंधीच्या आकडे-वारीवरून या बाबतीत थोडीफार कल्पना येऊ शकेल. अठराव्या शतकाच्या पूर्वार्धात भारतातून ग्रेट ब्रिटनमध्ये होणाऱ्या निर्यातीत मूल्य व परिमाण या दोन्ही दृष्टींनी दुपटीहून अधिक वाढ झाली असा अंदाज आहे. विशेषतः सुरुवातीच्या दशकांत वाढ झपाट्याने झाली. १७३५ नंतर ती मंदावत गेली; आणि काही विशिष्ट वर्षांमध्ये तर देशांच्या काही भागांतील अशांत राजकीय परिस्थितीमुळे निर्यातीत पिछेहाटही झाली. ग्रेटब्रिटनमध्ये भारतातून निर्यात होणाऱ्या भाकांपैकी कच्चे रेशीम, रेशमी वस्तू व नवसागर (सोरामीठ) या वस्तू मुख्यतः पूर्व भारतातून येत असत. तसेच निर्यात होणाऱ्या कापडाचा महत्त्वाचा भागही याच प्रदेशातून येत असे. या सर्व गोष्टींवरून त्या अर्धशतकात मोठ्या प्रमाणावर व सातत्याने निर्यातीत वाढ झाली असल्याचे दिसून येते. भारतातून होणाऱ्या निर्यातीपेक्षा भारतात परदेशांतून होणाऱ्या आयातीचे प्रमाण मोठे नव्हते; आणि स्थानिक मालाच्या खरेदीसाठी भांडवल-पुरवठा करण्याकरिता भारतात होणारी सोन्या-चांदीची आयात ही या व्यापाराच्या आकारमानातील वाढीच्या बरोबरीने वाढली असावी, असे दिसते.[१२] या घडामोडींचे अंतर्गत अर्थव्यवस्थेवर महत्त्वाचे परिणाम घडून आले असले पाहिजेत.

---

११. जे. रेनेल, 'मेमॉयर ऑफ ए मॅप ऑफ हिंदोस्तान', पृ. २५५.

१२. बालकृष्ण, 'कमर्शियल रिलेशन्स बिट्वीन इंडिया अँड इंग्लंड (१६०१–१७५७)', प्रकरणे ७ व ८.

या अर्थव्यवस्थेतील बंगाल व बिहार या प्रदेशांच्या अर्थव्यवस्थेचा मोठा हिस्सा व तिची सापेक्षत: अधिक मोठी अंतर्गत एकात्मता या दोन्ही कारणांमुळे बंगाल व बिहारच्या अर्थव्यवस्थेच्या संदर्भात हे परिणाम खास उल्लेखनीय ठरले असले पाहिजेत. बिहार व बंगालमधील भारतीय महाजनांच्या साधनसंपत्तीतील विस्मयजनक वाढीसंबंधीच्या समकालीन नोंदी आणि विक्रेय वस्तूंच्या वाढत्या किमतींसंबंधीचे उल्लेख हे त्या काळच्या भरभराटीचे, तसेच मोठ्या प्रमाणावरील विक्रेय वस्तूंची निर्यात व सोन्याचांदीची आयात यांमुळे अर्थव्यवहारात निर्माण झालेली तीव्रगती यांचे पुरावे होते असे म्हणण्यास हरकत नाही.

या काळी बंगालमध्ये मालदा, रंगपूर, कासिमबाजार यांसारखी अनेक लहान लहान शहरे होती. या शहरांमध्ये नानाप्रकारचे कारागीर, विशेषत: सुती व रेशमी कापड विणणारे विणकर होते. यांखेरीज ढाका, मुर्शिदाबाद आणि वाढत असलेले बंदरनगर कलकत्ता यांसारखी मोठी शहरेही तेथे होती. भारताच्या इतर भागांतून बंगालमध्ये कच्च्या कापसाची वाढत्या प्रमाणात आयात होत असल्याचा उल्लेख यापूर्वी आलाच आहे. ही आयात म्हणजे कापडाच्या वाढत्या मागणीच्या दडपणाचा परिणाम होता, हे उघड आहे. १७५० साली बंगालमध्ये येणारा कापूस मुख्यत: गुजरातचा असे व तो सुरतेहून समुद्रमार्गाने येत असे.

बंगालबिहारमधून भारताच्या इतर प्रांतांत निर्यात होणारा माल म्हणजे मुख्यत: उच्च प्रतीचे सुती व रेशमी कापड, कच्चे रेशीम व मीठ हा होता. कच्चे रेशीम अंशत: समुद्रमार्गे सुरतेला (म्हणजे गुजरातला) रवाना होत असे; आणि अंशत: मिर्झापूर व बनारस मार्गे उत्तरेकडील व पश्चिमेकडील बाजारपेठांना जात असे. बंगालचे मीठ बिहारला व आसामला जाई. समुद्रकिनाऱ्यावरील व्यापार प्रामुख्याने युरोपीय लोकांच्या हातांत होता. या व्यापाराच्या वस्तूंमध्ये वर उल्लेखलेल्या प्रमुख मालाखेरीज धान्ये, डाळी, साखर, तूप, मसाले इत्यादि वस्तूंचा समावेश असे.

गुजरात हा प्राचीनकाळापासून भारतातील बहुधा सर्वांत अधिक नागरीकृत प्रदेश राहिलेला आहे. दुसऱ्या कोणत्याही प्रांतापेक्षा या प्रांताचा बाहेरच्या जगाशी अधिक मोठ्या प्रमाणावर व अधिक सातत्यपूर्ण संपर्क राहिलेला आहे. समुद्रमार्गाने मालाची वाहतूक करण्यास सोयीच्या अशा ठिकाणी तो प्रांत वसलेला असून समुद्रमार्गे होणाऱ्या व्यापाराची दीर्घ परंपरा त्याला लाभलेली होती. १७५० साली देखील सुरत हे गोव्याच्या उत्तरेकडील भारताच्या पश्चिम किनाऱ्यावरील सर्वांत अधिक महत्त्वाचे बंदर होते. १६ व्या शतकात खंबायत बंदराला उतरती कळा लागल्यापासून सुरतेने आपले हे स्थान टिकवून धरलेले होते. गुजरातमध्ये तुलनात्मक दृष्ट्या फार मोठी शहरी व कारागिरांची लोकवस्ती असल्यामुळे तेथे कारागिरीच्या वस्तूंचे उत्पादन बऱ्याच मोठ्या प्रमाणात होत असे. त्यांपैकी उल्लेखनीय म्हणजे तेथील सुती कापडाचे प्रचंड उत्पादन हे होय. या कापडाला परदेशातून सतत भरपूर मागणी असे. त्याचबरोबर शेतीच्या दृष्टीने तो एक संपन्न प्रदेश होता. तेथे मोठ्या प्रमाणावर शेतमालाचे, विशेषत: कापूस व नीळ यांचे उत्पादन होत असे. तुलनात्मक दृष्ट्या मोठी शहरी लोकसंख्या आणि खाद्येतर शेतपिकांच्या उत्पादनावर दिला जाणारा सापेक्षत: वाढता भर याचा परिणाम म्हणून खाद्यपदार्थांची आयात करण्याची गरज निर्माण झाली. अन्नधान्ये आणि नारळ, तूप, मसाले यांसारखे इतर खाद्यपदार्थ आयात करण्याचा व्यापार गुजरातेत खूप चालत असे. यापैकी अधिकांश माल समुद्रकिनाऱ्यावरील व्यापाराच्या द्वारे प्राप्त केला जाई. हा व्यापार गोव्याच्या दक्षिणेकडील पश्चिमी समुद्रकिनाऱ्याशी किंवा सौराष्ट्र व सिंध येथील बंदरांशी चालत असे.

सुरतेपासून उत्तर भारतापर्यंत म्हणजे आग्रा व दिल्लीपर्यंत खुष्कीचे दोन प्रमुख मार्ग होते. पहिला मार्ग तापी नदीच्या खोऱ्यातून, बऱ्हाणपूरवरून माळव्यातून जात असे; आणि दुसरा मार्ग भडोच व अहमदाबाद मार्गे राजस्थानातून जात असे. खुष्कीच्या मार्गाने होणाऱ्या व्यापाराचे महत्त्व व आकारमान यांमध्ये नेहमीच चढउतार होत असे. १८ व्या शतकात महत्त्वाचा अस्थिर घटक म्हणजे अंतर्गत परिस्थिती, विशेषतः, व्यापारी मार्गांवरील राजकीय परिस्थिती हा असे. १७५० सालापूर्वीच्या वर्षांमध्ये विशेषत: माळवा व मध्यभारत येथे अत्यंत अशांतता माजलेली होती. त्यामुळे बऱ्हाणपूर मार्गाचे महत्त्व अठराव्या शतकात निश्चितपणे कमी झाले. एकेकाळी अहमदाबादला मधल्या टप्प्यातील (entrepot) व्यापाराचे केंद्र किंवा उतारपेठ म्हणून महत्त्वाचे स्थान प्राप्त झालेले होते आणि गुजरातच्या बंदरांतून येणाऱ्या मालाचे संबंध प्रदेशात वितरण करण्याची भूमिका त्याला बजावता येत होती. या दोन्ही गोष्टींना खंबायतचे महत्त्व कमी झाल्यानंतर काही प्रमाणात उतरती कळा लागली. तथापि, गुजरातची राजकीय राजधानी म्हणूनच नव्हे तर कारागिरीच्या उद्योगांचे, विशेषत: सुती व रेशमी विणकामाचे फार मोठे केंद्र आणि नीळ व कापूस यांसाठी विशेष प्रख्यात असलेल्या समृद्ध शेतीच्या प्रदेशाचे केंद्र म्हणूनही अहमदाबादचे महत्त्व चालू राहिले.

मराठा सत्तेच्या उदयाचा परिणाम म्हणून मराठ्यांच्या स्वत:च्या प्रदेशातील म्हणजे पश्चिम महाराष्ट्र, वऱ्हाड व नागपूर या भागातील परिस्थितीला स्थैर्य प्राप्त झाले होते. याच्या उलट मराठ्यांच्या प्रत्यक्ष अमलाखाली नसलेल्या प्रदेशांवर त्यांनी महसुलाचा हक्क प्रस्थापित केल्यामुळे तेथे सतत स्वाऱ्या व लढाया चालू असत व त्याचा परिणाम म्हणून तेथील आर्थिक जीवन अस्थिर राहात असे. ही स्थिती माळवा, मध्यभारत, छत्तीसगड, ओरिसा आणि बंगाल व बिहार यांच्या सरहद्दीवरील मुलूख या ठिकाणी प्रकर्षाने दिसून येई. विश्वसनीय आकडेवारीच्या अभावामुळे या अशांततेचे प्रमाण केवढे होते, ती किती काळ चालू राहिली आणि त्यामुळे कोणते बदल घडून आले हे ठरविणे कठिण आहे. उदाहरणार्थ, सुरतेपासून बऱ्हाणपूर मार्गे जाणाऱ्या रस्त्याचे महत्त्व काही अंशी कमी झालेले दिसत असले तरी अहमदाबादमार्गे जाणाऱ्या रस्त्याचे महत्त्व तितकेच कमी झाल्याचे दिसत नाही.

इंदूर हे नवे केंद्र उदयास आले, या व्यतिरिक्त माळवा व मध्यभारत यांच्या व्यापारी परिस्थितीत विशेष उल्लखनीय घटना घडून आल्याचे दिसत नाही. माळवा व मध्यभारत यांच्यापेक्षा राजस्थानावर अशांत परिस्थितीचा कमी परिणाम झाला असावा असे दिसते. पाली, जेसलमीर, जोधपूर व अजमेर यांसारख्या राजस्थानच्या जुन्या व्यापारी केंद्रांनी आपले पूर्वीचे सर्व महत्त्व टिकवून धरले असे दिसते. अठराव्या शतकाच्या पूर्वार्धात, राजा जयसिंग याच्या कारकीर्दीत जयपूर शहर उदयास येऊन ते भरभराटीला पोचले, ही गोष्ट तेथील सापेक्षत: स्थिर परिस्थितीचे द्योतक आहे, असे वाटते. पंजाबमधील अशांत परिस्थितीमुळे काही थेट व्यापार राजपुतान्याच्या मार्गाने सुरू झाला याचाही तो अंशत: परिणाम असण्याची शक्यता आहे.

अठराव्या शतकात महाराष्ट्राला सतराव्या शतकातील आत्यंतिक अशांततेपासून थोडीफार उसंत मिळाली. भारताच्या या विभागाच्या दृष्टीने त्यामानाने हा शांततेचा व भरभराटीचा काळ होता. या प्रदेशात दोन सापेक्षत: नवी शहरे (पुणे व नागपूर) उदयास आली आणि १७५० नंतरच्या काही दशकांत त्यांचे महत्त्व बरेच वाढले. महाराष्ट्राच्या पूर्व भागात नागपूर हे एका महत्त्वाच्या व्यापारी विभागाच्या केंद्रस्थानी असल्यामुळे त्याचा विकास घडून आला. हे शहर

सर्व दिशांना जाणाऱ्या रस्त्यांशी जोडलेले होते. मात्र आग्नेयीकडील क्षेत्र हा प्रामुख्याने आदिवासी विभाग असल्यामुळे त्या दिशेला रस्ता नव्हता. नागपूर हे कच्च्या कापसाच्या व्यापाराचे केंद्र बनले; आणि विणकामाचे केंद्र म्हणूनही त्याचे महत्त्व झपाट्याने वाढले. पश्चिमेला पुणे हे आकाराने व राजकीय हालचालींमुळे मोठे शहर बनले; आणि मुख्यत: अत्यंत प्रभावशाली राजनैतिक राजधानी म्हणून ते ख्याती पावले. पुण्याच्या राजकीय संबंधांमुळे काही काळपर्यंत ते आर्थिक उलाढालींचे महत्त्वाचे केंद्र बनले. मात्र ते व्यापार व उद्योग यांचे केंद्र बनले नाही.

महाराष्ट्र प्रदेशाचा परराष्ट्रीय व्यापारात त्या मानाने फारच थोडा वाटा होता. त्याची किनारपट्टी (कोकण) पर्वतांच्या रांगांमुळे इतर प्रदेशापासून वेगळी पडलेली होती आणि अशा प्रकारे महाराष्ट्राचा मुख्य प्रदेश भूवेष्टित झालेला होता. किनारपट्टी अरुंद व नापीक होती; आणि तेथे शेतीचे अथवा औद्योगिक स्वरूपाचे विशेष उल्लेखनीय उत्पादन होत नव्हते. कोकणामध्ये चौल, दाभोळ व राजापूर यांसारखे अनेक महत्त्वाचे परंतु लहान लहान भाग होते. मात्र ते केवळ किनारी व्यापाराच्या दृष्टीनेच महत्त्वाचे होते. ती बंदरे प्रामुख्याने रसद व विश्रांती घेण्याची ठिकाणे होती. कोकणाच्या उत्तर व दक्षिण टोकांना असलेल्या सुरत व गोवा या बंदरांप्रमाणे ती महत्त्वाची व्यापारी केंद्रे नव्हती.

या काळात हैदराबाद हे मध्यवर्ती ठिकाणी असलेले एक महत्त्वाचे स्थान होते. एका शक्तिशाली व सापेक्षत: स्थिर राजवटीची ती राजधानीही होती. त्याचा व्यापार मुख्यत: मद्रास व मच्छलीपट्टण या बाजूला होता. हैदराबाद प्रदेशाच्या या भागाच्या दृष्टीने गोदावरी नदी हा एक महत्त्वाचा व्यापारी मार्ग होता; आणि त्या नदीच्या काठाभोवतालच्या प्रदेशातून इमारती लाकूड वगैरे सारखा महत्त्वाचा माल गोदावरी नदीपर्यंत आणला जात असे. या प्रदेशाला त्या काळच्या युरोपीय लोकांनी उत्तर सरकार असे नाव दिले होते. त्यामध्ये प्रामुख्याने गोदावरी व कृष्णा या नद्यांच्या खोऱ्यांचा समावेश होता. या प्रदेशाला लांबलचक किनारा लाभलेला होता; आणि तेथील अंतर्गत जलवाहतुकीची प्रणाली त्या मानाने चांगली विकसित झालेली होती. त्यामुळे या प्रदेशात किनारी व्यापार व युरोपीय व्यापाऱ्यांच्या हालचाली यांचा पुष्कळच जोर होता. मागावरील कापडाच्या ख्यातीच्या बाबतीत हा प्रदेश बंगाल व गुजरात यांच्याशी स्पर्धा करीत होता; आणि कापडाच्या वाढत्या निर्यातीत त्याचा फार मोठा वाटा होता. त्यामुळे बंगाल प्रमाणेच येथेही बाहेरच्या प्रांतांतून कापूस आयात करण्याची गरज निर्माण झाली. त्या शतकाच्या अखेरीस या आयातीची नोंद ब्रिटिश दप्तरात ठळकपणे पाहावयास मिळते.

भारतामध्ये आधुनिक युरोपीय लोकांच्या हालचालींना भारतीय द्वीपकल्पाच्या अगदी दक्षिण टोकाला सुरुवात झाली, आणि त्यामुळे दोन्ही किनाऱ्यांच्या अगदी दक्षिणेकडील भागांत युरोपीय लोकांची अनेक ठाणी तयार झाली. हा एक असाही प्रदेश होता की जेथे सतराव्या शतकात व अठराव्या शतकाच्या सुरुवातीस युरोपीय लोकांची प्रबळ भारतीय राजसत्तांशी समोरासमोर गाठ पडली नव्हती. युरोपीय वसाहतींपैकी सर्वांत महत्त्वाच्या वसाहती पाँडिचेरी व मद्रास येथील होत्या. या प्रदेशातील राजकीय परिस्थिती देखील अनिश्चित होती; आणि १७५० च्या पूर्वी थोडे दिवस या प्रदेशाच्या फार मोठ्या भागात लढाया सुरू झाल्या होत्या. या लढायांमध्ये इंग्रज व फ्रेंच हे दोघेही सामील झाले होते. दक्षिण भारतातील अस्थिर परिस्थिती जवळ जवळ १८०० सालापर्यंत चालू राहिली. तिचा परिणाम म्हणून व्यापार व इतर आर्थिक प्रवृत्ती यांना सामान्यत: उतरती कळा लागली. मद्रास हे संरक्षित बंदर असल्यामुळे ते किनारी

व्यापाऱ्याचे एक महत्त्वाचे केंद्र होते. परदेशांशी, विशेषतः भारताच्या पूर्वेकडील देशांशी होणाऱ्या व्यापाराचेही ते महत्त्वाचे केंद्र होते. कोरोमंडल किनाऱ्यावर मद्रास हे मध्यवर्ती ठिकाण होतें. या किनाऱ्यावरून ज्या वस्तूंचा व्यापार होत असे त्यांमध्ये प्रामुख्याने धान्ये, कापड, कापूस, नीळ व मिरी यांचा समावेश असे.

हैदराबादच्या दक्षिणेकडील प्रदेशात बंगलोर हे अंतर्गत व्यापाराच्या दृष्टीने सर्वांत मोठे व अत्यंत क्रियाशील केंद्र होते; आणि मद्रासच्या दक्षिणेकडील भागात तंजावर हे महत्त्वाचे केंद्र होते. मलबारच्या किनाऱ्यावर कोचीम, कालिकत व मंगलोर यांसारखी महत्त्वाची बंदरे होती. पोर्तुगीज व डच लोकांचा प्रवेश झाल्यापासून या किनाऱ्यावरून फार मोठ्या प्रमाणावर परदेशी व्यापार सुरू झाला. तथापि, अस्थिर परिस्थितीचा या किनाऱ्यावरही परिणाम झाला; आणि अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात येथील आर्थिक प्रवृत्तीला ओहोटी लागली. सुरत, कोकणातील बंदरे आणि मलबार किनारा यांच्या दरम्यान पुष्कळच किनारी व्यापार चालत असे. मलबार-मध्ये आयात होणाऱ्या मालात प्रामुख्याने धान्ये, डाळी व साखर यांचा समावेश असे; तर तेथून होणाऱ्या निर्यातीत सागवानी लाकूड व नारळ यांचा विशेप भरणा असे.

**५. व्यापारी जमाती व त्यांची प्रादेशिक विभागणी**

भारतातील १७५० सालच्या व्यावसायिक प्रवृत्तीचे वर्णन करितांना त्या प्रवृत्तीत गुंतलेल्या जाती व जमाती यांच्याकडे लक्ष पुरविणे आवश्यक आहे. भारताच्या पारंपरिक सामाजिक व्यवस्थेतील वैशिष्ट्यामुळे ही गरज निर्माण होते. भारतीय समाज हा असंख्य जाती-जमातींमध्ये विभागलेला होता; आणि यांपैकी प्रत्येक विभागाचे फार मोठ्या प्रमाणावर स्तरीकरण झालेले होते. पहिली गोष्ट म्हणजे हा समाज वेगवेगळ्या प्रदेशांत आणि हिंदू, मुसलमान इत्यादीं सारख्या धार्मिक गटांत विभागलेला होता. या समाज-घटकांत फारच थोडी गतिशीलता होती; आणि एका गटातून दुसऱ्या गटात सहजासहजी प्रवेश होऊ शकत नसे. काही प्रसंगी फक्त धर्मांतरामुळेच हे संक्रमण घडून येऊ शकत असे. प्रत्येक उपविभागात, विशेषतः हिंदूंमध्ये, आणखी स्तरीकरण होऊन जाती-उपजातींच्या गटांमध्ये त्यांची विभागणी झालेली होती. हे गट एकमेकांपासून खूपच वेगळे पडलेले होते. परिणामतः कुटुंबांचा धंदाच पुढे चाल-विण्याची नेहमीची प्रथा अधिक दृढ बनली होती; आणि एका व्यवसायातून दुसऱ्या व्यवसायात क्वचितच प्रवेश केला जाई. अशा परिस्थितीत आधुनिक व्यवसायाचा उदय व विकास यांचा इति-हास हा बहुंशी काही विशिष्ट गटांतील लोकांच्या प्रवृत्तीचाच इतिहास बनणे स्वाभाविक होते.

आता आपण १७५० साली भारतात आर्थिक महत्त्वाच्या व्यवसायांमध्ये गुंतलेल्या प्रमुख जमातींसंबंधी थोडक्यात विचार करू. या बाबतीत व्यापार व भांडवलपुरवठा यांच्यापुरतेच आपण लक्ष केंद्रित करणार आहोत. कारागिरी व हस्तोद्योग यांच्याकडे आपल्याला विशेप लक्ष द्यावयाचे नाही. कारागिरांची व कारागीर-केंद्रांची संख्या, कारागिरी-उद्योगांची विविधता आणि वेगवेगळ्या प्रदेशांमध्ये त्या उद्योगांत गुंतलेल्या जातींची प्रचंड विविधता यांमुळे प्रस्तुत प्रकारच्या सर्वसामान्य पाहणीमध्ये कारागिरी-उद्योगांच्या परिस्थितीकडे लक्ष पुरविणे अशक्य ठरते. तसेच, पूर्वी सूचित केल्याप्रमाणे, आपल्या अध्ययनाच्या दृष्टीनेही मोठ्या प्रमाणावरील व्यापार व भांडवलपुरवठा हीच महत्त्वाची क्षेत्रे आहेत. भांडवलाचा संचय, नवीन पायंडा पाडणे वगैरे गोष्टी व्यापारी व सावकार यांच्या वर्गांमध्ये जितक्या मोठ्या प्रमाणावर शक्य होत्या आणि जितक्या ठळकपणे त्या दिसून येण्याची शक्यता होती तितक्या प्रमाणात व तितक्या

ठळकपणे त्या विखुरलेल्या, परंपराबद्ध व सापेक्षतः गरीब अशा असंख्य कारागिरांमध्ये दिसून येण्याची शक्यता नव्हती.

व्यापारी व सावकार या वर्गांच्या परिस्थितीचे वर्णन करितांना भारताचा वायव्य भाग (म्हणजे पंजाब व सिंध) आणि इतर भाग यांच्यातील एका महत्त्वाच्या फरकाचा निर्देश करणे आवश्यक आहे. वायव्य भागात अधिकांश लोक, विशेषतः ग्रामीण लोक १७५० पर्यंत मुसलमान झाले होते. ग्रामीण भागातही व्यापार व सावकारी यांवर हिंदूंचे नियंत्रण असले तरी ते फक्त शहरांमध्येच महत्त्वाचे घटक होते. जातीजमातींतील भेदभावांचे नियम इतर भागांतल्या प्रमाणे येथे अनेक कारणांमुळे कडकपणे पाळण्यात येत नव्हते. या कारणाने येथे घडून आलेला प्रमुख फरक म्हणजे हिंदूंमध्ये व्यावसायिक विशेषज्ञतेचा झालेला विकास हा होय. आपल्या विवेचनाच्या संदर्भात ही विशेषज्ञता पंजाबातील खत्री जमातीत प्रकर्षाने दिसून येते. ही उत्साही शहरी हिंदू जमात केवळ पंजाबातच नव्हे तर अफगाणिस्तान, मध्य आशिया वगैरे भागांतही व्यापारांमध्ये उल्लेखनीय रीत्या गुंतलेली होती. खत्री लोकांनी प्रागतिक व्यावसायां ( liberal professions) मध्येही महत्त्वाची भूमिका बजावली; आणि मुस्लिम राजकर्त्यांनी प्रशासक वगैरे जागांवर ज्या काही हिंदूंच्या नेमणुका केल्या त्यांमध्ये खत्री लोकांचा भरणा फार मोठा असे. इतर प्रांतांतील परिस्थितीहून, उदाहरणार्थ, जेथे ब्राह्मण, कायस्थ व वनिये यांच्या व्यवसायांचे विभाजन अधिक कडकपणे झालेले होते अशा उत्तरप्रदेश व बिहार या प्रांतांतील परिस्थितीहून ही परिस्थिती सर्वस्वी भिन्न होती.

पंजाबातील मातबर व्यापारी व सावकार यांमध्ये खत्री लोक सर्वांत अधिक महत्त्वाचे होते. सिंधमध्ये त्यांची जागा लोहाणा जातीच्या लोकांनी घेतली होती. अर्थात्, खत्री लोकांना राज्यकारभारात जे थोडेफार स्थान उपलब्ध होते ते सिंधमधील मुस्लिम राजवटीत लोहाणा जमातीला उपलब्ध नव्हते असे दिसते. तथापि, अठराव्या शतकात लोहाणा लोकांनी शेजारच्या कच्छच्या हिंदू राज्यात राजकारण व प्रशासन यांमध्ये महत्त्वाचा भाग घेतला हे लक्षात ठेवण्यासारखे आहे. लोहाणा जमातीचे मूळस्थानही पश्चिम पंजाबात असावे, असे दिसते. परंतु ते मुख्यतः सिंधमधून पश्चिमेकडे व दक्षिणेकडे पसरले आणि नंतर कच्छमध्ये आले. तेथून ते कालांतराने सौराष्ट्रात व पुढे मुंबईपर्यंत येऊन पोचले. त्यांच्याशी संबंधित असलेल्या भाटिया जमातीचे मूळस्थान व पार्श्वभूमी ही त्यांच्यासारखीच होती. परंतु ती जमात लोहाणा जमातीच्या आधी मुंबईत येऊन पोचली. याच्या उलट खत्री लोक प्रथम पूर्वेकडे गेले आणि नंतर दक्षिणेकडे वळले. खत्री व लोहाणा या दोन्ही जमाती एकाच वेळी अफगाणिस्तानच्या व मध्य आशियाच्या व्यापारात महत्त्वाची भूमिका बजावीत राहिल्या. शिकारपूरचे लोहाणाकेंद्र अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात महत्त्वाचे स्थान प्राप्त करू लागले होते; आणि त्यानंतरच्या काळात सावकार व व्यापारी या नात्याने लोहाणा जमातीचे महत्त्व चालू राहिले.

गंगेच्या खोऱ्यात आपल्याला काहीशी विलक्षण परिस्थिती पहावयास मिळते. या प्रदेशामध्ये कोणतीही एक प्रादेशिक जमात अथवा जमाती वेगळ्या काढून दाखविता येणे शक्य नाही.[१४]

---

१४. श्री भट्टाचार्य यांनी आपल्या ग्रंथात बंगाल व ओरिसा येथील वनिये, गुजरातचे वनिये, दक्षिण भारतातील व्यापारी जमाती, तेलुगु प्रदेशातील वणिक जाती, आणि उत्तर भारतातील वनिये यांची यादी दिली

[ पुढील पानावर

राजस्थानातील वैष्णव व जैन बनिया या व्यापारी जमातींचे महत्त्व भारताच्या संपूर्ण आधुनिक इतिहासात फार मोठे आहे. तथापि, भारताच्या सामाजिक–आर्थिक इतिहासाकडे सापेक्षतः झालेल्या दुर्लक्षामुळे या जमातींच्या स्थलांतराचा सुव्यवस्थित वृत्तांत उपलब्ध नाही. १७५० साली उत्तर प्रदेश व बिहार या प्रांतांतील प्रमुख व्यापारी जमाती म्हणजे राजस्थानातून तेथे गेलेले बनिया असावेत असे दिसते. राजस्थानात मूलस्रोताच्या (locational origin) पुराव्याच्या आधारे रसेल व हिरालाल हे मध्यप्रांतीय बनिये या विषयासंबंधीच्या चर्चेत असे प्रतिपादन करतात की महत्त्वाचे बनिया गट हे मूळचे राजपूत वंशाचे असावेत.[१५] रसेल व हिरालाल यांनी अग्रवाल, ओसवाल, माहेश्वरी यांसारख्या ज्या बनिया जमातींचे विवेचन केलें आहे त्या सर्व उत्तर प्रदेश व बिहार येथीलही व्यापारी जमाती होत्या. या जमातींचे स्थलांतर, विशेषत. उत्तर प्रदेश व मध्य भारत या भागांत पुष्कळच आधी घडून आले असण्याची शक्यता आहे. तथापि उत्तर प्रदेश व मध्य भारत यांखेरीज इतर प्रदेशांत त्यांचे झालेले स्थलांतर सतराव्या शतकाच्या फार पूर्वी झालेल्या असण्याची शक्यता नाही.[१६] ते अधिक मोठ्या संख्येने अठराव्या शतकात झालेले असण्याची जास्त शक्यता आहे. हे स्थलांतर प्रामुख्याने पूर्वेकडे व दक्षिणेकडे झाले. उत्तरेला व पश्चिमेला मुस्लिम बहुसंख्य प्रदेश होते. तेथे मांडवली साधनसंपत्ती व उच्च कुशलता असणाऱ्या महत्त्वाच्या हिंदू व्यापारी जमाती पूर्वीपासूनच काम करीत होत्या. नैर्ऋत्येला गुजरात व सौराष्ट्र येथेही अत्यंत सुसंघटित तज्ज्ञ व्यापारी जमाती आधीपासूनच विद्यमान होत्या.

युरोपीय प्रवाशांना सतराव्या शतकात आढळलेल्या भारतीय व्यापारी जमातींमध्ये राजस्थानच्या बनिया जातीचा फारच थोडा खास उल्लेख पाहावयास मिळतो. बिहार आणि मध्य-भारत यांच्या खालोखाल महाराष्ट्रामध्ये हे स्थलांतरित फार जुन्या काळी आले असण्याची शक्यता आहे. परंतु या प्रदेशांतही अठराव्या शतकाच्या पूर्वी त्यांचे अस्तित्व असल्याचा फारसा पुरावा उपलब्ध नाही. पेशव्यांच्या काळात पुण्यामध्ये गुजराती बनियांचे असलेले प्राबल्य आणि १८२० सालच्या पुण्याच्या पेठवार यादीतील धंद्यांनुसार व स्थानांनुसार असलेली विभागणी यावरून असे दिसते की मारवाडी (राजस्थानी बनिया) लोकांचे उल्लेखनीय संख्येने पुणे शहरात झालेले आगमन हे अठराव्या शतकाच्या शेवटच्या चतुर्थांशातच झाले असले पाहिजे. राजस्थानातील बनिया जमातीचे लोक (यांना कालांतराने सामान्यतः मारवाडी या नावाने संबोधण्यात येऊ लागले) हे १७५० साली मुख्यतः उत्तर प्रदेश, बिहार व मध्यभारत या प्रदेशांतच महत्त्वाचे व्यापारी घटक होते असे म्हणावयास हरकत नाही.

हिंदूंमधील जाती ज्या अर्थाने वेगवेगळ्या जमाती आहेत त्या अर्थाने शीख ही एक जमात नाही. शीख हा हिंदूंशी काही अंशी मिळती-जुळती समाजरचना असलेला समाजाचा एक वेगळा

---

मागील पानावरून ]

आहे. ते असे नमूद करतात की, उत्तर भारतातील बनियांपैकी सर्वांत श्रीमंत व सर्वांत साहसी जमाती "आपले मूळ ठिकाण राजपुतान्यात व त्याच्या आसपासच्या भागात असल्याचा दावा करतात. मात्र या जमाती सतलज नदीपासून ब्रह्मपुत्र नदीपर्यंत पसरलेल्या उत्तर भारताच्या प्रत्येक भागात आढळतात." जे. एन्. भट्टाचार्य, 'हिंदू कास्ट्स अँड सेक्ट्स', (१८९६), पृ. २०४.

१५. रसेल आणि हिरालाल, 'ट्राइब्स अँड कास्ट्स ऑफ सेंट्रल प्रॉव्हिन्सेस', खंड २, पृ. ११६.

१६. या जमातीच्या गटाशी संबंधित असणाऱ्या जगत शेठांच्या घराण्याच्या कौटुंबिक इतिहासात पाटण्यामध्ये या घराण्याचा संस्थापक सतराव्या शतकाच्या अखेरीस आला असे नमूद करण्यात आले आहे.

भाग आहे असे बहुतेक बाबतीत समजावे लागते. शिवाय, शिखांना हिंदूंपासून वेगळे करणारे एक महत्त्वाचे वैशिष्टय असे की त्यांच्या धर्मात सतत नवनवीन लोकांची भरती होत होती. म्हणून आपल्या विवेचनाच्या दृष्टीने एखादी व्यक्ती हिंदू होती की शीख हा महत्त्वाचा मुद्दा नसून ती व्यक्ती व्यापारी जमातीतील होती किंवा नव्हती, हा मुख्य मुद्दा आहे. उदाहरणार्थ, शीख धर्माच्या प्रारंभीच्या काळात खत्री लोकांनी फार महत्त्वाची कामगिरी बजावली होती; अर्थात शीख धर्माने लढाऊ स्वरूप धारण करण्यापूर्वी शीख लोक अंतर्गत व बाह्य व्यापाराच्या बाबतीत महत्त्वाचे लोक होते असे समजले जाते. शिखांमध्ये खत्री लोकांसारख्या जमातींचा भरणा झालेला असल्यामुळे असे घडणे स्वाभाविकच होते. कलकत्त्याचा अमीचंद व्यापारी हा शीख होता असे म्हणतात. या घटनेकडे याच वस्तुस्थितीच्या दृष्टिकोणातून पाहिले पाहिजे.

बंगालची स्थिती काहीशी वैशिष्टयपूर्ण आहे. बंगालमध्ये सुवर्ण वणिक यांसारख्या परंपरेने व्यापार व व्यवसाय यांत प्राविण्य मिळविलेल्या जमाती होत्या. या जमाती इतर प्रदेशांतील वनियांसारख्या होत्या. तथापि, १७५० साली बंगालमध्ये या जमातींना सावकारी व व्यापार यांमध्ये महत्त्वाचे स्थान असावे असे दिसत नाही. १७५० साली बंगालमधील परिस्थितीवर ब्रिटिश व इतर युरोपीय लोकांच्या आगमनांमुळे काही अंशी अधिक परिणाम घडून आलेला होता असे दिसते. याचे महत्त्वाचे द्योतक म्हणजे युरोपीय लोकांच्या सहकार्याने भारतीय समाजातील काही घटकांनी महत्त्वाचे स्थान प्राप्त करून घेतले होते हे होय. या ठिकाणी परदेशी लोकांच्या भारतीयांशी असणाऱ्या संबंधांमुळे फरक करणे जरूर आहे. हे संबंध दोन प्रकारचे होते. परदेशीय व्यावसायिक व देशी व्यावसायिक यांच्यांतील संबंध आणि परकीयांचे दलाल म्हणून काम करणारे भारतीय व परदेशी लोक यांच्यांतील संबंध. अर्थात ह्या दोन्ही प्रकारच्या भूमिका एकाच प्रकारच्या लोकांनी केल्या नसतील असे समजण्याचे कारण नाही. भारतीय व्यापाऱ्यांना, लहान प्रमाणात, परदेशी व्यापाऱ्यांचे दलाल म्हणून काम करणे व अशा प्रकारे आपली स्वतःची प्रगती करून घेणे शक्य होते. असे घडले असावे असे दिसते. उदाहरणार्थ, गुजरातमधील शहरांत असे घडलेले दिसते. ज्या भारतीय जमाती पूर्वीपासूनच व्यापारात होत्या त्यांना परदेशी लोकांशी दलाल म्हणून आणि एका व्यापाऱ्याने दुसऱ्या व्यापाऱ्याशी ज्या पातळीवरून व्यवहार करावा त्या पातळीवर देवाणघेवाण करिता येणे शक्य होते. परंतु ज्या भारतीय जमातींचा व्यापारात शिरकाव झालेला नव्हता त्यांना निदान सुरुवातीला तरी परकीयांचे दलाल म्हणूनच काम करिता येणे शक्य होते. अशा प्रकारे ज्यांना धंदेवाईक व प्रशासकीय घटक म्हणता येईल अशा लोकांनी परकीयांचे दलाल म्हणून व्यवसायात प्रवेश केला असण्याची शक्यता आहे. बंगालमध्ये कलकत्त्याच्या स्थापनेपासूनच्या पुढील काळात इंग्रजांनी मुख्यतः प्रशासकीय सहायक व व्यापारातील दलाल मिळविण्याचा प्रयत्न केला. परिणामतः ज्यांना व्यापारामध्ये पूर्वीचा काही अनुभव नव्हता अशा बंगालमधील ब्राह्मण व कायस्थ यांसारख्या जमातींनी ब्रिटिश व्यावसायिकांचे मदतनीस व दलाल म्हणून व्यापारात प्रवेश मिळविला.

दक्षिण भारतामध्ये आंध्रप्रदेशातील कोमटी आणि तमिळनाडूतील चेट्टी या दोन सर्वांत महत्त्वाच्या व्यापारी जमाती होत्या. त्यांनी आपापले मूळचे प्रदेश संपूर्णपणे व्यापले होते आणि त्याशिवाय शेजारच्या प्रदेशांमध्येही त्यांनी प्रवेश मिळविला होता. कर्नाटकातील सर्वांत महत्त्वाची व्यापारी जमात (बुकनन यांनीही तिचा उल्लेख केला होता) पंचम बुंजीगार (बणजीगार) ही होती. केरळच्या किनाऱ्यावर व्यापारात गुंतलेल्या स्थानिक हिंदू जातींमध्ये कोणी महत्त्वाचे

घटक नव्हते. अरब व स्थानिक जनता यांच्या मिश्रणातून निर्माण झालेले मोपला मुसलमान विशेषतः अंतर्गत व्यापाराच्या दृष्टीने महत्त्वाचे होते. काही प्रमाणात, पोर्तुगीजांकडून प्रोत्साहन मिळविलेले स्थानिक सीरियन ख्रिश्चनही व्यापारात गुंतलेले होते. शिवाय, तेथे स्थानिक झालेल्या कोचिन ज्यूंची जमातही अत्यंत महत्त्वाची होती.

भारतीय द्वीपकल्पाच्या उत्तरेकडील भागात व्यापारी दृष्टया खुरटलेल्या प्रदेशाचे एक उद्बोधक उदाहरण म्हणून महाराष्ट्राचा उल्लेख करिता येईल. वाणिज्य व व्यापार यांमध्ये प्राविण्य मिळविलेली कोणतीही महत्त्वाची हिंदू अथवा अहिंदू स्थानिक जमात तेथे नव्हती. काही प्रमाणात, विशेषतः पूर्व भागात, यजुर्वेदी ब्राह्मण सावकारी व देशी पद्धतीचा बँकव्यवसाय (पेढी) यांमध्ये पुष्कळच भाग घेत होते. तसेच अठराव्या शतकाच्या पूर्वार्धात कोकणातून चित्पावन ब्राह्मणांनी वाढत्या प्रमाणात देशावर स्थलांतर करण्यास सुरुवात झाल्यापासून त्यांच्यांपैकी अनेक जणांनी सावकारी व पेढीचा व्यवसाय सुरू केल्याचे आढळून येते. दक्षिण कोकणातील व्यापार व्यवहाराशी सारस्वत ब्राह्मणांचा संबंध होता. ब्राह्मणांतील पोटजातींनी व्यापार व बँकिंग व्यवसायाच्या क्षेत्रातील काही प्रवृत्तींमध्ये प्रामुख्याने भाग घ्यावा ही गोष्टच स्थानिक जातींमध्ये वनिया जमातीचा अभाव असल्याचे सूचित करते. याचो कारणे काहीही असोत, त्याचे परिणाम मात्र स्पष्ट होते. मुंबईमधील सारा व्यापारीवर्ग कोकणातून येण्याऐवजी सुरत, दक्षिण गुजरात, सौराष्ट्र व कच्छ या भागातून आला. हीच गोष्ट अठराव्या शतकात पुणे व नागपूर या शहरांचा विकास होत असतांना घडून आली. पुण्यामध्ये सर्वांत जुन्या काळचे स्थलांतरित हे गुजराती वनिया व बोहरी असल्याचे आढळून येते. या दोन्ही जमाती बऱ्हाणपूर व औरंगाबाद मार्गे पुण्यास आल्या असण्याची शक्यता आहे. याच्या उलट नागपूरमधील स्थलांतरित व्यापारी हे मध्य व उत्तर भारतात पसरलेले राजस्थानचे वनिये होते. वऱ्हाड-नागपूर भागातून कापसाची निर्यात सुरू झाल्यानंतर याच लोकांनी या व्यापारावर कबजा मिळविला.

सबंध भारत वर्षात गुजरात व सौराष्ट्र हाच काय तो बहुधा सर्वांत अधिक नागरीकरण झालेला व विकसित प्रदेश होता; आणि शतकानुशतके त्याचा सातत्याने परदेशाशी व्यापार चालू होता. या प्रदेशात अत्यंत विकसित वनिया जमात होती. हिंदू व जैन या दोन्ही धर्मांत या जमातीचे लोक होते. शिवाय तेथे मोठमोठ्या मुस्लिम व्यापारी जमातीही होत्या. या गुजराती मुस्लिम व्यापारी जमाती आणि इतर प्रदेशांतील व्यापारी व अन्य मुसलमान यांच्यांतील फरक महत्त्वाचा आहे. सौराष्ट्र व कच्छ या भागांतून आलेल्या खोजा व कच्छी मेमण यांसारख्या मुस्लिम व्यापारी जमाती अधिकांशपणे लोहाणा या महत्त्वाच्या जमातीतून धर्मांतरित झालेल्या होत्या; आणि बोहरा ही जमात मुख्यतः गुजराती व्यापारी व कारागीर जमातींतून मुसलमान धर्मात आलेली होती. या मुस्लिम जमातींनी स्वतःची अशी खास संघटनात्मक वैशिष्ट्ये टिकवून धरली होती आणि इतर मुसलमानांपासून त्या जमाती ठळकपणे वेगळ्या उठून दिसत होत्या. तसेच त्यांनी आपल्या परंपरागत व्यापारी प्रवृत्तीही तशाच कायम ठेवल्या.

गुजरातमध्ये हिंदू व जैन वनिया आणि मुस्लिम व्यापारी जमाती यांच्या खेरीज पारशी लोकांचाही उदय झाला होता हे लक्षात ठेवणे महत्त्वाचे आहे. ही घटना मुख्यतः सुरत व मुंबई येथील युरोपीय व्यापाऱ्यांच्या कामांच्या संबंधात घडून आली असावी असे दिसते. फार जुन्या काळापासून पारशी लोकांनी युरोपीय व्यापाऱ्यांशी दलाल म्हणून आपले संबंध प्रस्थापित केले होते. पारशांच्या बाबतीत लक्षात ठेवण्यासारखे एक उल्लेखनीय वैशिष्ट्य असे की त्यांचे परंपरा-

गत व्यवसाय व्यापार अथवा सावकारी यांच्याशी संबंधित नव्हते. सतराव्या शतकातील प्रवाशांच्या प्रवासवर्णनांत पारशी लोकांचा उल्लेख मुख्यतः सुतार, विणकर इत्यादि कारागीर म्हणून आलेला आहे. मुंबईतील त्यांचे प्रमुख स्थानही प्रारंभिक अवस्थेत त्यांच्या जहाजबांधणीतील कौशल्याशी निगडित होते. कालांतराने त्यांनी इतर गुजराती जमातींप्रमाणे प्रमुख व्यापारी व सावकार जमात म्हणून आपले वर्चस्व प्रस्थापित केले असले तरी त्यांची मूळची कारागीर-पार्श्वभूमी हे एक महत्वाचे व लक्षणीय वैशिष्टय आहे.

युरोपीय लोकांव्यक्तिरिक्त महत्त्वाचा एकमेव बिगर भारतीय उल्लेखनीय व्यापारी घटक म्हणजे आर्मीनियन लोक हा होय. या लोकांना सतराव्या शतकातच महत्त्व प्राप्त झाले होते असे दिसते. पेलाझार्टला ते बयाना येथे निळीच्या व्यापारात असल्याचे आढळून आले होते; आणि ओव्हिंगटनने असे नमूद करून ठेवले आहे की ते सुरतेचे बडे व्यापारी आहेत. अठराव्या शतकात ते सर्वत्र महत्त्वाचे बनले असे दिसते. ते सिरोंज व बऱ्हाणपूर येथे व्यापार करीत असल्याचे मनुचीने नमूद करून ठेवले आहे. हे लोक कलकत्त्याला प्रथम येऊन वसाहत करणाऱ्यांपैकी होते; आणि (फिलिपाइन्समधील विशिष्ट परिस्थितीमुळे) अठराव्या शतकाच्या पूर्वार्धात मद्रासमध्ये मॅनिलाशी चालणाऱ्या व्यापाराची जवळजवळ मक्तेदारीच त्यांच्याकडे होती. मलबार किनारा आणि मुंबई येथेही त्यांचा व्यवसाय मोठ्या प्रमाणावर चालत होता असे दिसते.

विशिष्ट जमातींचा व्यवसाय कोणकोणत्या प्रदेशांमध्ये पसरलेला होता त्याचे थोडक्यात दिग्दर्शन करून आपण हा विषय संपवू. या दृष्टीने पाहिल्यास वायव्य भाग (सिंध व राजस्थान), दिल्ली व आग्रा भाग, आणि पंजाब यांचा एक विभाग बनतो. या विभागामध्ये खत्री व लोहाणा या जमातींचे वर्चस्व होते. अंतर्गत व्यापारावर तर त्यांचा ताबा होताच, शिवाय, भारताच्या सरहद्दीपलीकडील अफगाणिस्तान व मध्य आशिया यांसारख्या प्रदेशांशी चालणाऱ्या व्यापारातही त्यांचा महत्त्वाचा भाग होता. खत्री लोक कमी-अधिक प्रमाणात याच प्रदेशापुरते मर्यादित राहिले. तथापि त्यांच्यापैकी काही थोडे लोक आपल्या प्रदेशातील व्यापाराच्या स्वाभाविक विस्ताराचा परिणाम म्हणून पूर्वेकडे गेले असावेत; आणि पाटणा, कलकत्ता व मुर्शिदाबादपर्यंत जाऊन पोचले असावेत. लोहाणा लोकांनीही सरहद्दीपलीकडील व्यापाराव्यक्तिरिक्त काही प्रमाणात समुद्र ओलांडून दक्षिण सिंध व कच्छ पर्यंत प्रवेश केला असावा. त्यांच्या पेढ्या व मुनीम थेट कलकत्त्यापर्यंत पोचलेले दिसतात; परंतु सागरी व्यापाराच्या कोणत्याही खास शाखेत त्यांचे महत्त्व प्रस्थापित झाल्याचे आढळून येत नाही.

गुजरात व सौराष्ट्र भागातील हिंदू व मुस्लिम व्यापारी जमाती आपल्या स्वतःच्या प्रदेशांत व्यापार करीत असतानाच सर्व प्रकारच्या सागरी व्यापारातही अत्यंत सक्रियपणे भाग घेत होत्या. हा सागरी व्यापार पश्चिमेला इराणचे आखात, अरबस्तान व आफ्रिका या प्रदेशांशीही होता आणि दक्षिणेला व आग्नेयीला भारताच्या किनाऱ्यापासून मलाया, इंडोनिशिया इत्यादि देशांशीही होता. मलबारशी चालणाऱ्या व्यापारामध्ये त्यांचे स्थान महत्त्वाचे होते; आणि युरोपीय व्यापाऱ्यांच्या आगमनापूर्वी आग्नेय आशियाशी असणाऱ्या व्यापारात त्यांनी अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावली होती. इंडोनेशियाला इस्लामची दीक्षा देण्याचे श्रेय गुजरातेतील मुसलमान व्यापाऱ्यांना आहे असे समजले जाते. कोरोमंडल किनाऱ्यावरील व्यापारामध्ये गुजराती जमातींना महत्त्वाचे स्थान असल्याचे दिसत नाही. तरीपण बंगाल व बिहारमधील कापूस,

कच्चे रेशीम, आणि सुती व रेशमी कापड यांच्याशी संबंधित व्यापारामध्ये ते प्रामुख्याने भाग घेत असल्याचे दिसून येते.

मलबारच्या व्यापारी जमातींनी आग्नेय आशियातील व्यापारामध्ये–यात ब्रह्मदेशाशी होणाऱ्या व्यापाराचाही समावेश होता–गुजरातच्या व्यापारी जमातींच्या बरोबरीने भाग घेतला. तमिळनाडचे चेट्टी व आंध्रचे कोमटी यांनी ब्रह्मदेश व मलाया या देशांशी होणाऱ्या व्यापारात थोडाफार भाग घेतला असला पाहिजे हे उघड आहे.

वर सांगितल्याप्रमाणे बंगाल व बिहार येथील व्यापाराने सर्वच प्रदेशातील व्यापारी जमातींना आपल्याकडे आकर्षित करून घेतले होते. दक्षिण भारतातील व्यापारी जमातींखेरीज इतर सर्व एतद्देशीय व परदेशी व्यापारी जमातींचा उल्लेख या प्रदेशातून प्रवास केलेल्या लोकांच्या प्रवासवर्णनांतून आढळतो. १७५० पर्यंत राजस्थानचे बनिये बंगालमधील महत्त्वाच्या व्यापारी केंद्रांत जाऊन पोचले होते. तथापि त्या काळात ते सागरी व्यापार किंवा विदेशी व्यापार या क्षेत्रांत प्रमुख स्थानी असल्याचा मात्र उल्लेख आढळत नाही. (हिंदू व मुस्लिम) गुजराती, पंजाबी आणि आर्मेनियन या साऱ्याच जमती प्रमुखस्थानी आढळतात. व्यवसायक्षेत्रातील बंगाली नावे त्या मानाने बिनमहत्त्वाची आहेत; आणि जेथे ती आढळतात तेथे ती स्थानिक व्यापारी घटक म्हणून नव्हे तर उदीयमान व्यावसायिक दलाल-वर्ग म्हणून आलेली आहेत.

## ६. व्यावसायिकांचे सामाजिक स्थान

भारतातील आधुनिक व्यवसायाच्या मूल्यमापनाची स्पष्ट कल्पना यावयाची असेल तर भारतीय समाजात व्यापारी व कारागीर यांचे स्थान काय होते ते समजून घेणे आवश्यक आहे. हिंदू समाजाच्या तात्त्विक संकल्पनात्मक चौकटीमध्ये व्यापारी, कारागीर व शेतकरी यांचा समावेश तिसऱ्या म्हणजे वैश्य वर्णात करण्यात आलेला आहे. तथापि या वर्णाची फार पूर्वीच अनेक जातींत व पोटजातींत विभागणी झालेली होती; आणि वैश्य ही संज्ञा (किंवा त्या अर्थाचे इतर शब्द) १६ व्या शतकात व त्यानंतरच्या काळात शेती करणाऱ्या कोणत्याही जातीला लावण्यात येत नव्हती. या अर्थाच्या संज्ञा जेव्हा वापरल्या जात तेव्हा त्या शहरी जातींपुरत्या, विशेषतः व्यापार व वाणिज्य करणाऱ्या जातींपुरत्या मर्यादित अर्थानेच वापरल्या जात. शहरी समाजातही व्यापार व त्याच्याशी संबद्ध व्यवसाय करणाऱ्या जाती आणि कारागीर व हस्तोद्योग करणाऱ्या जमाती यांच्यांत फार मोठा फरक करण्यात येऊ लागला. कारागीर वगैरे लोक जे उद्योग करीत होते त्या उद्योगांनुसार सामान्यतः त्यांच्या जातींना नावे देण्यात येऊ लागली. अशा प्रकारे कोष्टी, रंगारी, सोनार ही धंद्यांनुसार वेगवेगळया जातींची नावे रूढ झाली. याच्या उलट व्यापारउदीम करणाऱ्या गटाला बनिया या सर्वसामान्य नावाने संबोधण्यात येऊ लागले. या जमातीच्या पोटजाती ते लोक करीत असलेल्या आर्थिक व्यवहारांच्या प्रकारावरून अथवा विशिष्ट वस्तूच्या व्यापारावरून ठरण्याऐवजी त्यांच्या मूळ स्थानावरून किंवा व्यवसायेतर अन्य वैशिष्ट्यांवरून पडत गेल्या.

भारताच्या नागरी जीवनात सर्वसामान्य व्यापारी वर्गाला उच्च सामाजिक-आर्थिक स्थान प्राप्त झालेले होते. जातींच्या उतरंडीमध्ये या वर्गाच्या वर ब्राह्मण व क्षत्रिय हे दोन जातिगट सिद्धांततः विद्यमान होते; परंतु या दोन्ही जातींपैकी कोणतीही जात नागरी समाजाचा संपूर्णपणे अविभाज्य भाग बनलेली नव्हती. खरे म्हणजे, ब्राह्मण व क्षत्रिय या जमाती प्रत्यक्षपणे नागरीही नव्हत्या अथवा ग्रामीणही नव्हत्या. याचे कारण असे की त्यांचे परंपरागत जातिव्यवसाय ग्रामीण

अथवा नागरी अर्थव्यवस्थेशी परस्पर सम्बद्ध नव्हते. ते सर्वसामान्यपणे उपाध्येपण करणारे, लष्करी, सत्ताधारी व प्रशासकीय वर्ग होते. ते शहरांत व खेड्यांत दोन्हीकडे विद्यमान होते. परंतु त्यांचा शहराच्या अथवा खेड्याच्या दैनंदिन आर्थिक जीवनाशी काहीच घनिष्ठ संबंध नव्हता. शहरांच्या सामाजिक-आर्थिक जीवनात व्यापारी व सावकार यांचे स्थान सर्व प्रकारे वर्चस्वपूर्ण होते.

श्रीमंत व्यापाऱ्यांचा केवढा आदर केला जात असे आणि त्यांना किती महत्त्व होते याचा उल्लेखनीय पुरावा अठराव्या शतकाच्या प्रारंभी राज्यव्यवहारशास्त्रा (statecraft) संबंधी लिहिल्या गेलेल्या एका मराठी विवेचनपर ग्रंथात पाहावयास सापडतो. त्या ग्रंथात व्यापारी व सावकार यांच्यासंबंधी एक खास प्रकरण असून त्यात विदेशी व्यापाऱ्यांचाही समावेश आहे. त्यामध्ये असे प्रतिपादन करण्यात आले आहे की राज्याची भरभराट व्यापारी व सावकार यांच्यावर अवलंबून असते. ते स्थानिक प्रदेशात न मिळणाऱ्या वस्तू उपलब्ध करून देतात आणि अडीअडचणीला पैशाचा पुरवठा करतात. त्यांना संरक्षण देण्यात राज्याचा फायदा असतो म्हणून त्यांना इतमामाने वागविण्यात आले पाहिजे.[१७] अशा प्रकारे जातिव्यवस्थेमुळे व्यापारी वर्गाला सामान्यत: लष्करी किंवा प्रशासकीय सत्तेच्या स्थानांवर जाता येत नसले तरी एकूण भारतीय समाजातील त्याचा दर्जा व प्रभाव मुळीच कमी नव्हता आणि नागरी समाजात तर त्याला बहुधा प्रमुख स्थान असे.

हे विधान कारागीर वर्गांना लागू पडत नाही. कारागीर कितीही कुशल असले तरी एखाद्या खास वस्तूच्या उत्पादनात गुंतलेले असत; आणि त्या कामात त्यांना नेहमीच थोडेफार शरीरश्रम करावे लागत. या किंवा इतर कारणांमुळे जातिव्यवस्थेत त्यांचे स्थान व्यापाऱ्यांच्या स्थानाहून निश्चितच खालच्या क्रमांकाचे असे.[१८] हस्तोद्योगांच्या घटकांना अनेक कारणांमुळे त्यांच्या आकाराचा विस्तार होण्यात मर्यादा पडत असत; आणि म्हणून त्यांचे एकूण आर्थिक सामर्थ्यही मर्यादित असे. हस्तव्यवसाय करणारा माणूस कितीही कुशल व सुखवस्तू असला तरी तो आपल्या व्यवसायाशीच बांधलेला राही; आणि सर्वसामान्य व्यापारी किंवा दुकानदार बनणे त्याला शक्य होत नसे. याच्या उलट, याच अचलतेमुळे हस्तव्यवसायी हा भांडवल-पुरवठा व आपल्या वस्तूंचा

---

१७. 'आज्ञापत्र' या शिवाजी महाराजांची राजनीती वर्णन करणाऱ्या ग्रंथाच्या पाचव्या प्रकरणात प्रारंभीच पुढील विचार व्यक्त करण्यात आलेले आहेत:-

"साहुकार म्हणजे राज्याची व राजश्रीची शोभा. साहुकारांकरितां (साहुकारांमुळें) राज्य अबादान होतें. न मिळे तें वस्तुजात राज्यात येतें. राज्य श्रीमंत होतें. पडिलें संकटप्रसंगी पाहिजे तें कर्जवाम मिळतें. तेणेंकरून आलें संकट परिहार होतें. साहुकाराचे संरक्षणमध्यें बहुत फायदा आहे. याकरितां साहुकाराचा बहुमान चालवावा. कोण्हे-विषयीं त्यावरी जलल (जुलूम) अथवा त्याचा अपमान होऊं न द्यावा. पेठांपेठांत दुकानें, बखारा घालोन हत्ती, घोडे, नरमिना (उंची रेशमी कापड), जरबाव (जरतारी वस्त्र), पशमी (लोकरी कापड) आदिकरून वस्त्रजात व रत्नें व शस्त्रें आदिकरून अशेष वस्तुजात यांचा उदीम चालवावा. हुजूरबाजारा (मुख्य पेठे) मध्येंही थोरथोर सावकार आणोन ठेवावे."

१८. सतराव्या शतकाच्या सुरुवातीस पेलझार्ट याने लिहून ठेवलेल्या वर्णनात कारागिरांमध्ये सोनार, रंगारी, भरतकाम करणारे, गालिचे बनविणारे, सूत किंवा रेशीम विणणारे, लोहार, तांबट, शिंपी, गवंडी, गृह-शिल्पी, पाथरवट वगैरे 'एकूण शंभर व्यावसायिकांचा' समावेश केला आहे. हे सारे अत्यंत गरीब असल्याचे तो सांगतो. तो पुढे म्हणतो, "कारागिरापेक्षा दुकानदाराचा मान मोठा समजला जातो आणि त्यांच्यापैकी काहीजण सुखवस्तूही आहेत." पेलझार्ट, पूर्वोक्त, पृ. ६० व ६३.

व्यापार यांसाठी अपरिहार्यपणे व्यापाऱ्यावर अवलंबून असे. याचा परिणाम म्हणून कारागीर वर्गांना आर्थिकदृष्ट्या कायमचे गौणस्थान पत्करावे लागले.

हिंदू समाजामध्ये व्यापारी-दुकानदार वर्ग आणि लष्करी, उपाध्येपण करणारे व राज्यकर्ते-प्रशासक वर्ग यांच्यांत मुळीच परस्पर-चलनशीलता नव्हती. म्हणजेच, एका वर्गातून दुसऱ्या वर्गात प्रवेश करण्याची प्रवृत्ती नव्हती. समाजातील जातिव्यवस्थेने निर्माण केलेल्या व टिकवून धरलेल्या या अचलनशीलतेचे फार महत्त्वाचे परिणाम झालेले होते. उपाध्येपण करणाऱ्या किंवा लष्करी जाती व्यापारी जातींशी विवाहसंबंध करीत नसत, एवढ्याच अर्थाने त्यांच्यांत अचलनशीलता होती असे नव्हे तर मंत्रिमंडळात अथवा उच्च प्रशासकीय स्थानांवर व्यापारी वर्गातील व्यक्तींची फारच क्वचित नेमणूक केली जाई. प्रांताची सुभेदारी यांसारख्या जागा त्यांना मिळत नसत; किंवा लष्करी अथवा उपाध्येपणाच्या जागांवरही ते जाऊ शकत नसत. मुसलमानांच्या अमदानीत देखील या क्षेत्रांतील उच्च स्थानांवर जे हिंदू असत ते सामान्यतः व्यापार व सावकारी करणाऱ्या जातींमधील नसत. मुस्लिम राजवटीत प्रशासन व लष्कर या खात्यांतील सर्वोच्च स्थानांवर वंशपरंपरेने चालत आलेल्या हिंदू राज्यकर्त्यांच्या व सरदारांच्या जागा वगळता, केवळ मुसलमानांचीच नेमणूक केली जाई.[१९] या सर्वाचा परिणाम असा झाला की एका बाजूने व्यापारी, सावकार जमाती पूर्णपणे आपापल्या व्यवसायांत गढून गेल्या; आणि दुसऱ्या बाजूने त्या जमातींना नेहमीच कमी-अधिक प्रमाणात दरबारांच्या व बड्या प्रशासकांच्या मर्जीवर सतत अवलंबून राहावे लागले.

इस्लामी समाजात व्यापाऱ्याला मानाचे स्थान होते. दुसऱ्या कोणत्याही वर्गापेक्षा तो कमी प्रतीचा समजला जात नसे. तसेच, हिंदू जातिव्यवस्थेत व्यापारी आणि लष्करी व प्रशासकीय कामांमध्ये जसा अडसर होता तसा इस्लाममध्ये नव्हता. त्यामुळे इस्लामी समाजात व्यापारी, लष्करपेशा लोक व प्रशासक यांच्या स्थानांमध्ये चलनशीलता असण्याची अधिक शक्यता होती. तथापि, भारतामध्ये सतराव्या व अठराव्या शतकांत या तात्त्विक शक्यतेतून प्रत्यक्षपणे काही महत्त्वाचे परिणाम निष्पन्न झाल्याचे दिसत नाही; आणि मुस्लिम व्यापारी लष्करी अथवा प्रशासकीय स्थानांवर गेल्याची महत्त्वाची उदाहरणे नमूद झालेली नाहीत. शिवाय, मुसलमानांमध्ये कारागीर व व्यापारी यांच्यांत जातीचा अडसर निर्माण होण्याचे कारणच नव्हते. यामुळे त्यांच्यामध्ये कारागीर वर्गातून व्यापारी-दुकानदार वर्गात प्रवेश केलेल्या व्यक्तींची उदाहरणे असण्याची शक्यता आहे. तथापि, आपण हे लक्षात ठेवले पाहिजे की भारताच्या फारच थोड्या भागांत एक संपूर्ण व एकजिनसी इस्लामी समाज प्रस्थापित झाला होता. अनेक प्रदेशांमध्ये (उदाहरणार्थ सिंधमध्ये) बहुसंख्य शेतकरी, कारागीर वगैरे आणि राज्यकर्ते हे मुसलमान होते, तर सर्व व्यापारी व दुकानदार हिंदू होते. याच्या उलट, इतर प्रदेशांत मुस्लिम व्यापारी वर्ग कार्य करीत होते तेथे कारागीर वर्ग हिंदू असण्याचीही शक्यता होती. म्हणून या बाबतीतही समाजाची रचना प्रामुख्याने हिंदू समाजव्यवस्थेसारखीच होती. शिवाय, इस्लामचा स्वीकार केलेले अनेक लोक आपल्या मूळच्या जातिव्यवस्थेत असलेले लग्नाच्या बाबतीतील निर्बंध पूर्वीप्रमाणेच पाळत होते, ही गोष्टही लक्षात ठेवण्यासारखी आहे.

---

१९. पंजाबातील खत्री लोक याला काही अंशी अपवाद होते. तसेच राजस्थानच्या दरबारांत राजस्थानी वनियेही काही प्रमाणात मंत्री म्हणून घेतले जात असत, असे दिसते.

७. व्यापार व हस्तव्यवसाय संघटना

जुन्या काळी भारतात व्यापार व हस्तव्यवसाय यांच्या संघटनेचे स्वरूप काय होते या संबंधी फार थोडी समकालीन माहिती उपलब्ध आहे. व्यापारी संघ व संस्था यांच्या संघटने-संबंधी माहिती मिळण्याची प्रमुख साधने म्हणजे गॅझेटियरे आणि बहुतांशपणे एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धातील उद्योग व व्यापार यांचे वर्णन करणारी इतर प्रकाशने ही होत. या साहित्याच्या संबंधात दोन मुद्दे लक्षात घेतले पाहिजेत: पहिला असा की, त्यामध्ये व्यापारी संघ वगैरेची जी अवस्था त्या काळी किंवा नजीकच्या भूतकाळात विद्यमान होती ती नुसती नमूद न करिता थोडी अधिक माहिती देण्यात आली आहे. दुसरा मुद्दा असा की, त्यांमध्ये जी तपशीलवार वर्णने आलेली आहेत ती जवळजवळ पूर्णतः गुजरातमधील शहरांच्या परिस्थितीशी संबंधित आहेत. या घटनेचा खुलासा करण्यासाठी अनेक गृहीतकृत्ये प्रस्तुत करिता येतील. पहिली गोष्ट अशी की, जेथे अशा प्रकारच्या संघटना विकसित झाल्या नाहीत असे काही प्रदेश असण्याची शक्यता आहे. विशेषतः ज्या भागात मुसलमान बहुसंख्य होते आणि मुस्लिम राजे राज्य करीत होते, परंतु जेथील व्यापार हिंदूंच्या हातांत होता तेथे असे घडले असण्याची शक्यता आहे. महाराष्ट्रासारख्या व्यापारात मागासलेल्या प्रदेशांतही हीच परिस्थिती असण्याची शक्यता आहे. काही प्रदेशांत शहरांचा नाश अथवा ऱ्हास झाल्यामुळे जुनी संघटना मोडून पडली असेल. दिल्ली अथवा आग्रा, किंबहुना मुर्शिदाबाद व ढाका या शहरांच्या बाबतीत असे घडले असण्याची शक्यता आहे. तसेच, असेही काही प्रदेश असतील की जेथे जातिसंघटनांच्या प्रचंड सामर्थ्यामुळे अथवा व्यवसाय हा काही जमातींपुरताच अत्यंत मर्यादित राहिल्यामुळे जात व व्यावसायिक संघटना यांमध्ये फार थोडा फरक उरला असेल. ही गोष्ट प्रामुख्याने दक्षिणेत घडली असण्याची शक्यता आहे. बेंगळूरचे बनिगार, पांचाल व कोमटिग यांसारख्या जातींच्या संघटनांचे बुकननने जे बारकाव्यांसहित वर्णन केले आहे त्यावरून व्यापार अथवा उद्योगसंघटनांनी जातिसंघटनांवर ताण केली असल्याचा काहीही निर्देश मिळत नाही.[२०] फक्त गुजरातेतच या प्रकारांच्या सुस्पष्ट अभिव्यक्तीला व त्यांच्या टिकून राहण्याला अनुकूल असणारे सर्व घटक विद्यमान होते असे दिसते. गुजरातच्या गॅझेटियरात व्यापारी संघाचेही थोडेफार वर्णन आले आहे. त्या वर्णनावरून कारागीर जातींच्या सर्वसामान्य निकृष्ट आर्थिक परिस्थितीचीही स्पष्ट कल्पना येते.

अशा प्रकारे फार थोडे साधनसाहित्य उपलब्ध असल्यामुळे गुजरातमध्ये एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात जी परिस्थिती होती तिच्या वर्णनापासून आम्ही प्रारंभ करीत आहोत. त्यासाठी आवश्यक असणारी माहिती पुढील उदाहरणांमध्ये प्रस्तुत करण्यात आलेली आहे:-
" प्रत्येक शहरात केवळ व्यापाऱ्यांचेच नव्हे तर सोनार, सुतार, धातुकाम करणारे, गवंडी, रंगारी, कुंभार, तेली आणि इतर बहुतेक सर्व कारागीर यांचे व्यापारी संघ विद्यमान असून त्यांनी व्यवसायाचे नियम घालून दिलेले असतात व संघनेत्यांच्या मार्गदर्शनाने व्यावसायिक तंटे सोडविले जातात. एका धंद्यातील सर्व लोक एकाच जातीचे असल्यास या व्यापारी संघांचा विकास खूपच सुलभपणे होई. परंतु भारतीय लोकांमधील एकत्रित राहण्याची प्रवृत्ती इतकी प्रबळ आहे की हा अनुबंध विद्यमान नसतांनाही आपल्या खऱ्या अथवा काल्पनिक हितांना उचलून धरण्यासाठी फारशी अडचण न येता ते एकजूट करू शकत असत. ही सामुदायिक सत्ता स्थानिक राजवटीमध्ये अधिक

/२०. एफ्. बुकनन, खंड १, पृ. २३६.

सामर्थ्यवान बनली. या अवस्थेच्या रूपाने सरकारी अधिकाऱ्यांना आपली बेकायदेशीर जबरी वसुली विभागण्याचे व अमलात आणण्याचे एक सोयिस्कर साधन मिळाले होते. त्यामुळे त्यांनी तिला प्रोत्साहन देण्याचे धोरण अवलंबिले. वीरमगामचा एक म्हातारा रंगारी सांगतो, 'पूर्वीच्या काळी एखाद्या सरकारी अधिकाऱ्याला आपले कापड रंगवून घ्यावयाचे असले की तो ते कापड आमच्या पुढाऱ्याकडे पाठवी. तो पुढारी ते कापड रंगवून घेई; आणि त्याचा सारा खर्च सामुदायिक निधीतून तरी करी किंवा त्या कामासाठी सर्वच रंगाऱ्यांवर खास पट्टी बसवी. त्याच्या मोबदल्यात आपला धंदा करीत असता सामुदायिक जबाबदारीतील आपला वाटा उचलण्यास नकार देणाऱ्या अथवा पुढाऱ्याची आज्ञा न मानणाऱ्या माणसाविरुद्ध केल्या जाणाऱ्या तक्रारीची दखल घेण्यास सरकार सदैव तयार असे. अशा प्रकारे जो माणूस गैरवर्तन करी त्याला बहुधा कोर्टात खेचण्यात येई आणि जमातीसमोर तो नमेपर्यंत किंवा ते गाव सोडून जाईपर्यंत त्यानंतर येणारी प्रत्येक मागणी पुरी करण्याचे संपूर्ण ओझे त्याच्यावर लादले जाई.' ब्रिटिश राजवटीत देखील काही काळपर्यंत या व्यापारी संघटनांचा उपयोग 'कसबवेरा' किंवा व्यापारी कर गोळा करण्यासाठी करून घेतला जात होता. व्यवसायावर अथवा उद्योगावर वट्ट रकमेने लादलेले हे कर त्या त्या व्यवसायांच्या प्रमुखांकडून वसूल केले जात. यामध्ये सरकारचीही सोय होई."[२१] "तत्त्वतः व्यापारीमंडळ हे जातिमंडळापेक्षा वेगळे असते. उदाहरणार्थ, अहमदाबादमध्ये सुतारांच्या चार जाती आहेत. त्यामुळे जातीच्या कामांसाठी चार वेगवेगळ्या संघटना आहेत. परंतु सुतारांचा व्यावसायिक संघ (महाजन) मात्र एकच आहे. याचप्रमाणे या शहरातील रेशीम व मशरू यांचे विणकाम करणाऱ्यांच्या संघात कणबी व बनिया या दोन्ही जातींचे लोक आहेत. अशी इतरही अनेक उदाहरणे सांगता येतील. हा मुद्दा ध्यानात घेणे महत्त्वाचे आहे. कारण, विशेषतः लहान शहरांतून एखाद्या विशिष्ट व्यवसायामध्ये त्याचे नियम ठरविणे व नियमभंगाबद्दल शिक्षा देणे या गोष्टी एकाच संस्थेकडून सरसकटपणे अमलांत आणल्या जातात. वेगवेगळ्या जमातींच्या एकत्रित संघांमध्ये ही ऐहिकता व धार्मिकता यांच्यांतील सीमारेषा फार काटेकोरपणे पाळली जात नाही. तशी अपेक्षाही बाळगली जात नाही. उदाहरणार्थ, थोड्याच दिवसांपूर्वी अहमदाबादच्या एका विसाश्रीमाळी वनियाने विधवा विवाह करून आपल्या जातीच्या नियमाचे उल्लंघन केले होते. त्याबद्दल तो ज्या कापड व्यापारी संघाचा सभासद होता त्यातून त्याला काढून टाकण्यात आले. त्याचा परिणाम म्हणून त्याला आपले दुकान बंद करून गाव सोडून जावे लागले."[२२] उच्च वर्गातील लोकांच्या संघटनेला गुजरातीत 'महाजन' असे म्हणतात. खालच्या वर्गातील लोकांच्या संघटनेला, विशेषतः तिचा जातीशी घनिष्ठ संबंध असल्यास तिला 'पंचायत' असे म्हणतात. प्रस्तुत विषयाच्या संदर्भात या दोन्ही शब्दांचे भाषांतर 'ट्रेडगिल्ड' (व्यापारी संघ) असे करण्यात आले आहे. याचे कारण त्या शब्दातून अचूक अर्थ निघतो हे नसून गोळाबेरीज अर्थ व्यक्त करण्यासाठी त्यातल्या त्यात तो शब्द बरा आहे हे होय."[२३]

ही विधाने भारताच्या इतर भागांना लागू करितांना त्यात काही अपवाद करावे लागतील अथवा त्यांना काही मर्यादा घालाव्या लागतील. पहिली गोष्ट अशी की 'महाजन' हा शब्द

---

२१. अहमदाबाद गॅझेटियर (१८७९) खंड ४, पृ. १०७.

२२. कित्ता, पृ. १०७, तळ टीप २

२३. कित्ता, पृ. १०६, तळ टीप २

इतरत्र सर्रास वापरला जात नाही; आणि पंचायत या शब्दाचा वापर सामान्यतः उच्च व नीच अशा सर्व जातींच्या संघटनांसाठी करण्यात येतो. शिवाय जात किंवा सामजिक संघटना आणि व्यवसाय अथवा आर्थिक संघटना यांच्यांतील फरक गुजरातेत जेवढा दिसून येतो तेवढाही इतरत्र आढळून येत नाही. व्यवसायासंबंधीचे नियम घालून देणाऱ्या आणि व्यावसायिक तंटे मिटविणाऱ्या संघटना भारताच्या इतर भागांतील कारागीर व व्यापारी यांच्यामध्येही विद्यमान होत्या. परंतु गुजरातच्या मानाने त्या पुष्कळच कमी सार्वत्रिक स्वरूपाच्या होत्या. भारताच्या बहुतांश इतर भागांत एकाहून अधिक जातींचा समावेश असलेल्या व्यापारी संघटना अठराव्या शतकात फारच क्वचित आढळत. तेथे सामाजिक व आर्थिक कामे जमातीमध्येच एकत्रित होऊन तिच्यामार्फतच त्यांची अंमलबजावणी होई. उदाहरणार्थ, पुण्यामध्ये अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात महाराष्ट्राबाहेरच्या प्रदेशांतून मोची (चांभार), कुंभार, सुतार इत्यादि कारागीर मोठ्या प्रमाणात येऊन वसले. त्याचबरोबर हे व्यवसाय करणारे स्थानिक कारागीरही आपले हस्तव्यवसाय करीत राहिले. परप्रांतांतून हे कारागीर महाराष्ट्रात आले व येथे स्थायिक झाले याचे मुख्य कारण असे की एक तर ते अशा वस्तू निर्माण करण्यात प्रवीण होते ज्या स्थानिक जातींकडून सामान्यतः निर्माण केल्या जात नसत, अथवा त्यांच्याजवळ स्थानिक जमातींपेक्षा अधिक कौशल्य होते. एकाच हस्तव्यवसायात गुंतलेल्या या दोन जमातींच्या गटांना एका व्यावसायिक संघटनेत समाविष्ट करण्यात आले असे सूचित करणारा कोणताही समकालीन अथवा नंतरचा पुरावा उपलब्ध नाही. बनारसच्या रेशीम विणकर संघाच्या विशाल संघटनेचे जे स्वरूप विसाव्या शतकाच्या पहिल्या दशकात विद्यमान होते त्याच्या तपशीलवार वर्णनावरूनही अशा प्रकारची संघटना एकेका जातीपुरती किंवा जमातीपुरती मर्यादित असे, हीच गोष्ट प्रकर्षाने दिसून येते. बनारसचे हे विणकर मुसलमान होते या गोष्टीवरून या वर्णनाला खास वैशिष्ट्य प्राप्त होते.[२४]

व्यापारी व सावकार यांच्या संघटनांची स्थिती कारागिरांच्या संघटनेपेक्षा वेगळी असली पाहिजे, हे उघड आहे. एका केंद्रात एक हस्तव्यवसाय चालविणारे लोक सामान्यतः एका जातीचे किंवा जमातीचे असणार; आणि वेगवेगळ्या जातींच्या कारागिरांनी आपली एक आर्थिक संघटना बनविण्याची फारच थोडी गरज अथवा संधी तेथे असणार. व्यापारी व दुकानदार यांची स्थिती कारागिरांच्या स्थितीपेक्षा नेहमीच वेगळी असणार. वर सूचित केल्याप्रमाणे व्यापारी-दुकानदार गटातील लोकांच्या जाती विशिष्ट, विशेषीकृत आर्थिक व्यवहारावर आधारलेल्या नसत. त्यामुळे अधिक मोठ्या केंद्रांतील व्यापारी-दुकानदारांच्या गटात एकाहून अधिक जातींचे व जमातींचे सभासद नेहमीच समाविष्ट असत. व्यापारी लोक नेहमी दूरदूरचा प्रवास करीत आणि मोठमोठ्या एतद्देशीय सावकारी पेढ्यांचे प्रतिनिधी अथवा शाखा सर्व प्रमुख व्यापारी केन्द्रांमध्ये असत. त्यामुळे मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या व्यापारी गटात वेगवेगळ्या जातींचा समावेश होऊन तो एक काहीसा संमिश्र गट बनलेला असे. अशा प्रकारे मोठ्या व्यापारी केंद्रांमध्ये गोळा झालेल्या व्यापाऱ्यांच्या बाबतीत आर्थिक उद्देशासाठी आपल्या गटांची संघटना निर्माण करण्याचा प्रश्न नक्कीच उपस्थित होत असला पाहिजे.

अशा परिस्थितीत, गुजरातेतील शहरे वगळता इतरत्र अठराव्या व एकोणिसाव्या शतकांतील व्यापारी संघटनांसंबंधी काहीही माहिती आपल्याजवळ नसावी, हे लक्षात ठेवण्यासारखे

२४. ' ट्रेड गिल्ड्स इन इंडिया ', मॉडर्न रिव्ह्यू, मार्च १९११.

आहे. विघटनेची जी वाढ या देशात घडून आली असे दिसते तिच्यावरून या घटनेचा अंशतः खुलासा होऊ शकतो. जुने वृत्तांत, कोरीव लेख इत्यादींच्या आधारे असे दिसून येते की दक्षिण भारताच्या फार मोठ्या भागात पंधराव्या शतकात व्यापाऱ्यांची एक संघटना अस्तित्वात होती. तिचे कार्यक्षेत्र पुष्कळ व्यापक प्रदेशात विस्तारलेले होते आणि तिच्या सभासदांमध्ये वेगवेगळ्या जातींचेच नव्हे तर विभिन्न धर्मांचेही लोक होते.[२५] तथापि, समकालीन अथवा नंतरच्या लेखकांच्या लिखाणामध्ये अठराव्या शतकात दक्षिण भारतात अनेक जातीजमातींचा समावेश असलेल्या संघटना विद्यमान होत्या असे सूचित करणारा कोणताही पुरावा उपलब्ध नाही. यावरून असे अनुमान काढता येते की सोळाव्या व सतराव्या शतकांमध्ये समाईक व्यापार संघटना हळूहळू लुप्त होत गेल्या आणि त्यांची जागा पूर्णपणे जातवार संघटनांनी घेतली. त्यानंतरच्या सगळ्या पुराव्यावरून जातवार गटांच्या संघांच्या स्वरूपातील संघटना विद्यमान होत्या आणि त्यांनी प्रामुख्याने व्यापारी जमातींना व्यापक स्वरूपात आपल्या छत्राखाली आणले होते असे दिसते. विजयनगरचे साम्राज्य नष्ट झाल्यामुळे आणि पोर्तुगीजांचे आगमन झाल्यानंतर दक्षिण भारतात जी राजकीय अस्थिरता निर्माण झाली तिच्याशी व्यापाऱ्यांच्या संघटनांच्या या पिछेहाटीचा संबंध असण्याची शक्यता आहे. तसेच अठराव्या शतकातील मद्रास रेकॉर्डस आणि बुकननचे वृत्तांत यांमध्ये डाव्या व उजव्या जातींतील दीर्घकालिक झगड्यांचा वारंवार उल्लेख आलेला आहे. त्यांच्याकडेही या संदर्भात लक्ष वेधता येईल. अशा प्रकारचे तीव्र वैमनस्य विद्यमान असतांना एखादी सर्वसमावेशक संघटना चालू शकणार नाही, हे स्पष्ट आहे.

गुजरातेतील व्यापारी व कारागीर यांच्या संघांचे कामकाज कसे चालत होते यासंबंधी गॅझेटियरमध्ये देण्यात आलेल्या वर्णनांचा गोषवारा प्रस्तुत करण्याची आपल्या विवेचनाच्या दृष्टीने काही आवश्यकता नाही. तथापि, दोन उद्बोधक मुद्यांकडे लक्ष वेधण्यास हरकत नाही. त्यांतील हकीगतीवरून कारागिरांची सामाजिक आर्थिक स्थिती सर्वसामान्यपणे निकृष्ट दर्जाची होती असे स्पष्टपणे दिसून येते. खंबायतमधील जवाहिराचा उद्योग व व्यापार यांच्याशी संबंधित पंचायतींचे जे तपशीलवार वर्णन त्यात दिलेले आहे त्यावरून ही गोष्ट अत्यंत स्पष्ट दिसून येते. या उद्योगामध्ये हिऱ्यामाणकांना झिलई देणे, भोके पाडणे यांसारख्या प्रत्येक वेगवेगळ्या प्रक्रियेसाठी असणारे कारखाने वेगवेगळ्या पंचायतींमध्ये संघटित झालेले होते. परंतु त्या संपूर्ण संघटनेच्या शिरोभागी जवाहिऱ्यांची पंचायत होती. हे जवाहिऱ्ये अनघड खडे विकत घेऊन आपल्या स्वतःच्या कारखान्यांत त्यांना पैलू पाडून घेत; आणि मग त्यांच्यावर इतरांकडून योग्य त्या प्रक्रिया करवून घेत.[२६]

अनेक जातींचा समावेश असलेल्या व्यापारी संघांची नोंद करण्याव्यतिरिक्त गुजरात गॅझेटियरमध्ये ज्यांना नागरी संघटना म्हणता येईल अशा संघटनांचे अस्तित्वही नमूद करण्यात आले आहे. "लहान शहरांमध्ये सावकारांची संख्या तुलनात्मक दृष्ट्या लहान असल्यामुळे ते बहुतेक सर्व कामांसाठी एकत्र येऊन आपला एक संघ बनवितात. त्यामध्ये सावकारांप्रमाणेच प्रतिष्ठित व्यापाऱ्यांचाही समावेश असतो. हा संघही त्या गावातील बहुंशी सर्वांत अधिक प्रभावशाली संस्था असते; आणि सामान्यतः इतर सर्व लोकांना ती आपल्याबरोबर ठेवू शकते. सर्व प्रति-

२५. अप्पादोराई ए., 'एकॉनॉमिक कंडिशन्स इन सदर्न इंडिया, इ. स. १०००–१५००', प्रकरण ३.
२६. गॅझेटियर ऑफ दि बॉबे प्रेसिडेन्सी, स्टॅटिस्टिकल अकाउंट ऑफ कँबे (१८७७), पृ. ३०–३२.

ष्ठित संस्थांचा हा संघ बाहेरच्या जगाला ' नगरमहाजन ' या नावाने परिचित असतो. " "याच्या उलट ' अहमदाबाद महाजन ' ही संज्ञा चुकीची आहे. ज्या अर्थाने घोलेरा महाजन ही संस्था घोलेराचे प्रतिनिधित्व करिते त्या अर्थाने अहमदाबाद महाजन ही संस्था संपूर्ण अहमदाबाद शहराचे प्रतिनिधित्व करीत नाही. कारण तेथे व्यापारी संघाची कायम स्वरूपाची संघटना विद्यमान नाही. नगरशेठ आणि कापड व्यापाऱ्यांचा पुढारी यांचा संयुक्त प्रभाव सामान्यतः सर्वांची निष्ठा प्राप्त करू शकतो; परंतु त्या परिस्थितीत वेगवेगळे व्यापारी संघ केवळ तात्कालिक कारणासाठीच संघटित झालेले असतात. लहान शहरातल्याप्रमाणे ते एका संघटनेत एकत्रित होत नाहीत. "

मोठया शहरांमध्ये औपचारिक रीत्या नगर महाजन अशी एखादी संस्था विद्यमान नसली तरी तेथे सर्वसामान्य, वंशपरंपरागत नगरशेठ असे; आणि तो सार्वजनिक जीवनात महत्त्वाची भूमिका बजावीत असे. उदाहरणार्थ, १७२५ साली अहमदाबादच्या त्यावेळच्या नगरशेठाने मराठ्यांच्या लुटालुटीपासून शहराचे रक्षण केले होते; आणि या त्याच्या कामगिरीबद्दल शहरातील सर्व व्यापारी संघांनी एकत्रितपणे नगरपालिकेच्या काटयावर वजन करण्यासाठी येणाऱ्या सर्व मालावर पाव टक्का कर वसूल करण्याचा कायमचा अधिकार त्याला बहाल केला होता.

पंचायती व व्यापारी संघ यांची संघटना ही बहुधा पूर्णपणे स्वायत्त संस्था असे, हे नमूद करण्यासारखे आहे. त्यांच्या कार्यक्षेत्राच्या संबंधात सरकारकडून त्यांना मान्यता मिळालेली असे; आणि त्यांना त्यांचे अधिकार योग्य प्रकारे वापरता यावेत म्हणून सरकार आपल्या सत्तेचा पाठिंबा त्यांना देत असे. त्याचप्रमाणे, राजा, सरकारी अधिकारी अथवा सर्वसामान्य सार्वजनिक प्रसंग किंवा आणीबाणीची परिस्थिती यांच्यासाठी ते त्यांचा उपयोग करून घेई. त्यांची संघटना अथवा तिचा अंतर्गत कारभार यांमध्ये राजसत्ता काही हस्तक्षेप करीत नसावी, असे दिसते. संस्थेची स्थापना व कार्य यांतील ही स्वायत्तता नव्या केंद्रांच्या कामकाजाचे निरीक्षण केल्यास आपल्या लक्षात येईल.

अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात पुणे शहरामध्ये ज्या प्रकारच्या घटना ज्या प्रमाणात घडल्या त्या लक्षात घेतल्यास या क्षेत्रात कोणत्या शक्ती कार्य करीत होत्या याची चांगली कल्पना येईल. अठराव्या शतकाच्या सुमारे मध्यापर्यंत पुणे हे त्या मानाने एक लहान शहर होते. त्याचा आकार आणि राजकीय महत्त्व ही त्या शतकाच्या उत्तरार्धात झपाटयाने वाढली; आणि त्यामुळे तेथील व्यापार व आर्थिक उलाढाल यांत वाढ झाली. पश्चिम महाराष्ट्रात विकसित स्थानिक व्यापारी जमातींचा अभाव असल्यामुळे बाहेरच्या प्रदेशांतून, मुख्यतः गुजरातेतून व्यापार व सावकारी करणाऱ्या जमाती स्थलांतर करून तेथे आल्या. गुजरातेतून आलेले सर्व स्थलांतरित हिंदू वनिया जातीचे होते. परंतु ते वेगवेगळया ठिकाणांहून आलेले आणि वेगवेगळया पोटजातींचे होते. त्यांपैकी कोणत्याही पोटजातीच्या गटाची संख्या पुरेशी मोठी नसल्यामुळे वेगवेगळया पोटजातींच्या लोकांनी आपली एक समाईक सामाजिक संघटना उभारली. तिचे नाव महाजन. गुजरातमधील महाजनांपेक्षा या महाजन संस्थेचे स्वरूप अनेक बाबतींत अपरिहार्यपणेच वेगळे होते. पहिली गोष्ट अशी की तिचा आधार व्यापाराची किंवा उद्योगाची कोणतीही विशिष्ट शाखा हा नव्हता. दुसरी गोष्ट अशी की तिने कोणतेही आर्थिक कार्य पार पाडले नाही; तसे करणे तिला शक्यही नव्हते. पुण्यामध्ये सर्व जाती – जमातींचा समावेश असणारी व्यापारी संघटना केव्हाच अस्तित्वात आली नव्हती असे दिसते. परंतु त्याचबरोबर, पुण्यामध्ये गुजराती

वाणिया गटाचे महत्त्व अठराव्या शतकाच्या शेवटच्या चतुर्थांशात खूप वाढले आणि तो गट संघटित झाला तेव्हा त्या गटाचा पुढारी दुल्लभदास गोविंदजी याने पुण्याचा नगरशेठ हा किताब धारण केला. तसे करण्यास त्याला सार्वजनिक लोकमताची मूकसंमती असली पाहिजे, हे उघड आहे. दुल्लभदास याच्या प्रमुखपदाचे सामाजिक स्वरूप बारनात महाजन या संस्थेच्या सभासदांमध्ये परंपरेने चालत आलेल्या या समजुतीवरून स्पष्ट होते की महाजनाच्या सुरुवातीच्या काळात जातिभोजनांसारखे सामाजिक कार्यक्रम घडवून आणण्यासाठी दुल्लभदासाकडून परवानगी घ्यावी लागत असे.[२७] अशा प्रकारे एका बाजूने एका महत्त्वाच्या स्थलांतरित व्यापारी जमातीने आपल्या समाजप्रमुखाला नगरशेट म्हणून संबोधण्यास सुरुवात केली आणि नगरशेठ या नात्याने त्याला मान देण्याची तिला परवानगीही मिळाली; परंतु दुसऱ्या बाजूने गुजरातच्या शहरांतील नगरशेठांना जो प्रभाव अथवा जे स्थान प्राप्त झालेले होते तो प्रभाव अथवा ते स्थान मात्र या नगरशेठाला मुळीच प्राप्त झाले नाही. दुल्लभदासाने पेशव्यांचे मुख्य मंत्री नाना फडणवीस यांना लिहिलेल्या एका पत्रावरून ही गोष्ट स्पष्ट होते. दुलभशेठकडे टांकसाळी संबंधीचे काही व्यवहार सोपविण्यात आलेले होते. आपला हा अधिकार आपल्या कडून काढून घेण्याचे कारस्थान चालू असल्याचा संशय दुल्लभशेठला आल्यावरून त्याने नानांना हे पत्र लिहिले होते. आपल्या या पत्रात दुल्लभशेठ असे उघडपणे कबूल करतो की नानांनी दिलेल्या आश्रयामुळेच त्याला नगरशेठचे उच्च स्थान प्राप्त झालेले होते. त्यामुळेच रामेश्वरापासून लाहोरपर्यंतच्या सावकारांनी दुल्लभशेठला पुण्याचा नगरशेठ म्हणून मान्यता दिलेली होती. आपली ही ख्याती कायम राहावी, यासाठी इतर भागांतून सावकार मंडळी जेव्हा पुण्यास येतील अथवा येथे येऊन राहातील तेव्हा त्यांना त्यांच्या योग्यतेप्रमाणे मानसन्मान मिळेल अशी व्यवस्था करण्यात आली पाहिजे, आणि सर्वांचे समाधान होईल अशा प्रकारे देवघेवीचे सर्व व्यवहार व तंटे मिटविण्यात आले पाहिजेत, असे त्याने आपल्या पत्रात नमूद केले होते. हे कार्य निःस्वार्थबुद्धीने पार पाडले जात आहे, हे पाहून नानांनी दुल्लभशेठला प्राप्तीचे एक साधन असावे म्हणून टांकसाळीच्या व्यवहाराची सवलत त्याला उपलब्ध करून दिली होती. यातून मिळणारे उत्पन्न त्या सन्माननीय स्थानावरून कराव्या लागणाऱ्या खर्चास जेमतेम पुरेल एवढेच होते.*

गुजरातेतील शहरांमध्ये ज्या प्रकारच्या 'महाजन' संस्था अस्तित्वात होत्या तशा प्रकारच्या महाजन संस्था पुण्यात कधीच स्थापन झाल्या नसाव्यात असे दिसते. नगरशेठ या पदवीला नंतर काही अर्थ उरला नाही; आणि कालांतराने तिचे अस्तित्वही हळूहळू नाहीसे झाले. १८८० साली विद्यमान असलेल्या परिस्थितीची चर्चा करितांना दि पूना गॅझेटियर असे म्हणते, "या जिल्ह्यामध्ये व्यापारी संघटना किंवा महाजन संस्था अस्तित्वात नाहीत; अथवा येथे कोणीही नगरशेठ किंवा

---

२७. पाहा : शाह गोविंददास गोपाळदास, 'पूनाना श्रीबारनात महाजननो इतिहास', (१९५६).

* मूळ पत्रातील मजकूर असा : "स्वामींनीं सेवकाची प्रतिष्ठा वाढवून लौकिकास आणलें. तेणेंकरून रामेश्वरापासुन लाहोरपावेतों सावकारेयात जाणतात कीं पुण्यांत नगरशेठ दुल्लभशेट आहे. त्यास हें स्वरूप राहिलें पाहिजे. म्हणोन हरएक देशींचे सावकार पुण्यांत आहेत व येतात. त्यांचे स्वरूपाप्रमाणें करून, सर्वांस समाधान राखोन व्यवहार तंटे सांभाळावे लागतात. त्यास निर्लोभपणें सरकार चाकरी होते. हें जाणोन स्वामींनी टांकसाळींवर उत्पन्न करून दिल्हे आहे. त्या प्राप्तीमध्यें प्रतिष्ठाखर्च याचा मात्र निर्वाह होतो." [इतिहाससंग्रह, सं. द. बा पारसनीस, १९१३-१४, 'ऐतिहासिक टिपणें'; भाग ६ (मेणवली दप्तरांतील कागद), पृ. २८]. 'पुणें शहरांतील महाजन व नगरशेठ', ध. रा. गाडगीळ, पृ. २५.

व्यापारी क्षेत्रातील सर्वमान्य प्रमुख नाही. दयाराम आत्माराम हा पंधरा वर्षांपूर्वी निधन पावलेला वाणी सावकारी व्यवसायातील सर्वमान्य प्रमुख होता. पुण्याचा तोच शेवटचा नगरशेठ होय."

ही सारी परिस्थिती लक्षात घेता गुजरातेतील शहरांत एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात विद्यमान असणाऱ्या व्यापारी संघटनांच्या ज्या परिस्थितीचे चित्र गॅझेटियरमध्ये रेखाटण्यात आलेले आहे तीच या देशातील सर्वांत अधिक विकसित स्थिती होती, असे समजणे वस्तुस्थितीला धरून होईल. त्याचप्रमाणे गॅझेटियरमध्ये गुजरातेतील शहरांमधील व्यापाराचे स्वरूप व संघटना यांविषयी जी माहिती देण्यात आलेली आहे त्याहून १७५० साली तेथील स्थिती वेगळी होती, असे समजण्याचेही काही कारण नाही. इतर बहुतेक भागांमध्ये कारागीर व व्यापारी यांची अशी सांगोपांग संघटना एकतर मुळातच अस्तित्वात नव्हती अथवा ज्या संघटना विद्यमान होत्या त्या विशिष्ट जाती-जमातींच्या संघटनांपासून वेगळ्या काढता येण्यासारख्या नव्हत्या.

८. व्यापारी व व्यावसायिक यांचे प्रकार

आग्नेय आशियातील सोळाव्या व सतराव्या शतकांतील व्यापाराचे वर्णन करिताना जे. सी. व्हानल्यूर हे त्या व्यापारात असणाऱ्या दोन वर्गांमध्ये 'फेरीवाले' आणि 'प्रतिष्ठित व्यापारी' असा ठळक भेद करतात.[२८] भारतीय परिस्थितीच्या संदर्भात अशा प्रकारच्या कोणत्याही दोन वर्गांमध्ये स्पष्ट फरक कल्पिणे फारसे योग्य होईल असे वाटत नाही. मूठभर फार मोठे व्यापारी आणि बहुसंख्य लहान व्यापारी यांच्या व्यवहाराच्या प्रमाणामध्ये पुष्कळच अंतर होते यात शंका नाही. परंतु त्यायोगे व्यवसायांचे प्रकार अथवा पद्धती यात काही वैशिष्ट्यपूर्ण फरक पडला नाही. काही व्यापारी व्यक्तिशः खूप श्रीमंत बनले; परंतु त्यांनीही खूप वेगवेगळ्या प्रकारचे व्यवसाय केले. मोरलँड यांनी सतराव्या शतकातील दोन प्रमुख व्यापाऱ्यांच्या व्यवहारांतील भिन्नता व प्रमाण यांचे जे वर्णन केले आहे त्यावरून ही गोष्ट पूर्णपणे स्पष्ट होते. इंग्रजी कागदपत्रांनी या वर्णनाला दुजोरा दिला आहे. ते वर्णन असे :-" वीरजी वोरा हा प्रामुख्याने व्यापारी होता. जीवनोपयोगी वस्तूंची खरेदी व विक्री तो करीत असे. ज्या वस्तूच्या व्यापारात नफा मिळण्याची आशा असेल अशा वस्तूचा व्यापार तो करी. परंतु त्याचबरोबर तो मालवाहतुकीसाठी जहाजे भाड्याने देत असे, सावकारी करीत असे, ठेवी ठेवून घेई आणि आपल्या पेढ्यांवर हुंड्या वटविण्याचीही सोय करी. मलय्याच्या पेढीचे व्यवहारही असेच बहुविध प्रकारचे होते. सावकार व व्यापारी यांच्या हिशेबाच्या वह्यांमध्ये फार फरक असल्याचे किंवा कोणताही महत्त्वाचा व्यापारी एका विशिष्ट प्रकारच्या मालाचाच व्यवसाय करीत असल्याचेही मला आढळून आले नाही."[२९] व्यक्तिशः भारतीय व्यापाऱ्यांजवळ अथवा व्यापारी कुटुंबांजवळ असणारी संपत्ती व त्यांच्याकडून केले जाणारे मोठमोठे व्यवहार यासंबंधीचे अनेक उल्लेख तत्कालीन युरोपीय प्रवाशांच्या वर्णनांमध्ये सापडतात. या वर्गांपैकी १७५० मध्ये ठळकपणे दिसून येणारे प्रातिनिधिक घराणे म्हणजे मुर्शिदाबाद व पाटणा येथे पेढ्या असलेले जगतशेठचे घराणे होय. परंतु हे जगतशेठचे घराणेही युरोपीय व्यापारी संस्थांच्या कक्षेबाहेर राहून चार प्रमुख मसाल्यांच्या पदार्थांचा किरकोळीचा व्यापार करीत असे.[३०]

भारतामध्ये १७५० साली लहान व मोठ्या व्यापाऱ्यांच्या व्यवसायाचे प्रकार व पद्धती

---

२८. जे. सी. व्हानल्यूर, 'इंडोनेशियन ट्रेड अँड सोसायटी', (१९५५), प्रकरण, २.

२९. मोरलँड, 'फ्रॉम अकबर टु औरंगजेब', (१९२३), पृ. १५८.

३०. सिन्हा, पृ. १४०.

यांच्या स्वरूपात फारच थोडा फरक असे. विशेषत: व्हान ल्यूर यांनी 'व्यापारी' या शब्दाला 'प्रतिष्ठित' हे विशेषण लावल्यामुळे जो आभास निर्माण होण्याची शक्यता आहे तशा प्रकारे या दोन व्यापाऱ्यांमध्ये सामाजिक प्रतिष्ठा अथवा घरंदाजपणा या दृष्टीने काही फरक नव्हता. लहान व मोठे व्यापारी हिंदू असल्यास ते दोन्ही व्यापारी जातींतील असत; आणि मुसलमान असल्यास सामान्यत: प्रमुख व्यापारी जमातींतील असत. त्याचप्रमाणे, आर्मेनियन लोकांसारख्या बाहेरून आलेल्या एकजिनसी गटांमध्येही लहान व मोठे असे दोन्ही प्रकारचे व्यापारी असत. मोरलँड यांनी आधीच्या काळाचे जे वर्णन केले आहे ते १७५० साली विद्यमान असलेल्या परि-स्थितीलाही तितकेच लागू पडते, असे दिसून येईल. ते लिहितात, "आमच्या काळातील भारतीय व्यापारी–केन्द्रामध्ये असंख्य व्यापारी लोक होते आणि त्यांची वेगवेगळ्या दर्जांमध्ये विभागणी झालेली नसून त्यांची कार्यक्षमता व भांडवलावरील त्यांचे प्रभुत्व लक्षात घेऊन त्यांचा क्रम लागत असे, असे समजण्यास हरकत नाही."[३१]

त्याचबरोबर, व्हान ल्यूर यांची ही समजूतही भारतीय परिस्थितीच्या बाबतीत तितकीच बरोबर आहे. असे वाटते की, येथील व्यापार मुख्यत: असंख्य लहान व्यापाऱ्यांकडून चालविला जात होता, त्यांच्याजवळ मालाचा साठा थोडाच असे आणि ते स्वत: लांब पल्ल्याच्या प्रवासाचा धोका स्वीकारीत असत. हा लांब पल्ल्याचा व्यापार समुद्राच्या व खुष्कीच्या अशा दोन्ही मार्गांनी होत असे. अनेक व्यापाऱ्यांच्या मंडळ्यांचे मालवाहू जनावरांचे तांडे खुष्कीच्या मार्गाने लांब पल्ल्याचा व्यापार करण्यात गुंतलेले असत. ही परंपरा भारतात फार जुन्या काळापासून चालत आलेली होती. जातकांच्या काळापासून अशा व्यापारी तांड्यांचे उल्लेख मिळतात.

अशा या व्यापारी तांड्यांचा एक खास प्रकार म्हणून सतराव्या व अठराव्या शतकांतील वंजारी व लमाण यांचा उदय झाला असे समजण्यास हरकत नाही. तथापि, अनेक वैयक्तिक व्यापाऱ्यांचे योगायोगाने एकत्र येणे आणि प्रत्येक प्रवासात त्या त्या मोक्याच्या जागी एकत्र आल्यामुळे तांडे बनणे असे वंजाऱ्यांच्या तांड्यांचे स्वरूप नव्हते. त्याऐवजी त्यांच्या तांड्यांमध्ये जनजातीच्या संघटनेप्रमाणे कायमचे एकत्र आलेले मोठेमोठे जनसमूह असत. ते सतत प्रवास करीत आणि फिरस्त्यांच्या पद्धतीचा व्यापार करीत. मुगल बादशहांनी दक्षिणेत स्वाऱ्या करण्यास सुरुवात केली तेव्हापासून, आणि विशेषत: औरंगजेबाच्या महाराष्ट्रावरील स्वारीपासून हे तांडे अस्तित्वात आले असे सामान्यत: समजले जाते.[३२] त्यांची मुख्य वैशिष्ट्ये म्हणजे शिस्तबद्धपणे चालत राहणाऱ्या ओझ्याच्या बैलांची प्रचंड संख्या आणि त्यांच्या व्यापाराने व्यापलेले खूप मोठे क्षेत्र ही होती. मध्य व दक्षिण भारताचा फार मोठा भाग त्यांनी व्यापलेला होता असे दिसते. ते

---

३१. मोरलँड, पूर्वोक्त, पृ. १५८.

३२. "आमच्या गव्हर्नराने अत्यंत अन्यायाने व विनादिक्कतपणे काही वंजाऱ्यांना (बंजारा म्हणजे फिरता व्यापारी) साखरेची एक गोणी स्वत:ला विकण्यास भाग पाडले आणि त्या व्यवहारात बेकायदेशीरपणे १००० रुपये कमावले. या प्रकरणापासून त्याला अशी चटक लागली आहे की आपण या भागातील एकमेव व्यापारी बनावयाचे त्याने ठरविले आहे. या शहरात व आसपासच्या खेड्यापाड्यांतून, जेवढी नीळ मिळू शकेल तेवढी आपल्या ताब्यात घेऊन हा एकाधिकार मिळविण्याचा त्याचा विचार आहे..." विल्यम फॉस्टर, 'इंग्लिश फॅक्टरीज इन इंडिया (१६४६–१६५०)', पृ. १३०.

"वंजाऱ्यांकडून आम्हाला सध्या किंवा भावी काळात सोरामीठ विकत घेता येईल अशी आशा दिसत नाही; कारण येथील राजा (मुराद बख्श), त्याचा दिवाण व अधिकारी यांनी त्यांचा इतका छळ केला आहे की त्यांनी तो व्यापार जवळजवळ सोडूनच दिला असून ते सोरामीठ आणीतच नाहीत." विल्यम फॉस्टर, पूर्वोक्त, पृ. ७१.

प्रामुख्याने धान्य व मीठ यांचा व्यापार करीत; परंतु इतर महत्त्वाच्या वस्तूही विक्रीसाठी जवळ बाळगीत. स्वारीवर असलेल्या मोठमोठ्या सैन्यांना मालाचा पुरवठा करण्याच्या कामी त्यांचा खास उपयोग होई; परंतु त्याचबरोबर खेड्यांतून व शहरांतून स्थायिक झालेल्या लोकांनाही नेहमीच्या जीवनोपयोगी वस्तूंचा पुरवठा ते करीत. सर्वसामान्य संकेत व प्रथा म्हणून त्यांना बहुतांशपणे खास संरक्षण व विशेषाधिकार दिले जात असावेत असे दिसते. त्यामुळे ज्या राजाच्या प्रदेशातून ते जात अथवा त्यांना वाटेत जी लष्करे भेटत त्यांच्याकडून त्यांना उपद्रव होत नसे; आणि सामान्यत: त्यांना वाहतुकीच्या जकातीमध्ये खास सवलती दिल्या जात असत.

व्हान ल्यूर यांच्या माहितीप्रमाणे येथील भूस्वामी मोठ्या प्रमाणावरील व्यापारात किंवा उलाढालींत भाग घेत असत. अर्थात्, राजा किंवा त्याचे प्रतिनिधी सामान्य परिपाठ म्हणून व्यापार व इतर उलाढाली यांवर नियमित व अनियमित किंवा प्रासंगिक कर बसवीत असत. ही प्रक्रिया तापदायक होऊ शकत असे. शाही दरबारात थोडेफार वजन असूनही युरोपीय व्यापाऱ्यांना हे कर भरणे अवघड जात असे; आणि केव्हा-केव्हा विशिष्ट केंद्रांतील आपला व्यवहार पूर्णपणे बंद करणेच अधिक श्रेयस्कर असल्याचे त्यांना दिसून येई.[२३] याखेरीज राजा, त्याचे सुभेदार, दरबारी अथवा सरदार हे स्वत: देखील व्यापारी उलाढालींत भाग घेऊ इच्छित असत. सुरतेचा सुभेदार काही विशिष्ट व्यापारी उलाढालींमध्ये आपल्याशी भागीदारी करू इच्छित असावा, अशी धास्ती वीरजी वोरा याला वाटत असल्याचा उल्लेख मोरलँड यांनी केला आहे. तसेच, व्हान ल्यूर यांनी नमूद केलेल्या उदाहरणांमध्ये राजपुत्र खुर्रम याने एका इंग्लिश जहाजातून व्यापारासाठी पाठविलेल्या व्यापारी मालाबरोबर जाणाऱ्या खुर्रमच्या एका बंदर-बाटाड्याचेही उदाहरण आहे.[२४] अर्थात्, या व्यापारापैकी अधिकांश भाग धंदेवाईक व्यापाऱ्यांनी सुरू केलेल्या व चालविलेल्या व्यापारातून मिळणाऱ्या फायद्याचा काही भाग मिळविण्यासाठी आपल्या स्थानाचा उपयोग करून घेण्यापुरताच मर्यादित असावा. भारतामध्ये येथील राज्यकर्ते, सरदार, प्रशासक, लष्करी अधिकारी इत्यादींपैकी काही लोकांनी व्यापारी उलाढालींना सक्रियपणे प्रोत्साहन देण्यासाठी किंवा व्यापारामध्ये आपले नातेवाईक वगैरे लोकांना शिरकाव करून देण्यासाठी आपल्या स्थानाचा वापर केल्याची उदाहरणे फारच क्वचित आढळतात. गोवळकोंड्याचा दिवाण मीरजुम्ला याच्या कारकीर्दीचे एकमेव अपवादात्मक उदाहरण या संदर्भात इतिहासात नमूद आहे. या ठिकाणी हे लक्षात ठेवण्यासारखे आहे की मीर जुम्ला हा स्वत: इराणातून आलेला व स्वत:च्या कर्तबगारीवर मोठा झालेला व्यापारी असूनही त्याला मुगल सम्राटाच्या नोकरीत प्रवेश केल्यानंतर व्यापाराच्या क्षेत्रात काही करिता आलेले दिसत नाही. मराठा राजवटीत अनेक महाराष्ट्रीय लोकांनी, विशेषत: ब्राह्मणांनी व्यापार व सावकारी यांच्या क्षेत्रांत भाग घेतलेला असला तरी मराठा संघराज्याच्या कोणत्याही भागात मराठा किंवा ब्राह्मण सरदारांनी व्यापारी उलाढालींत भाग घेतल्याचे एकही उदाहरण आढळून येत नाही.[२५]

---

२३. पाटणा येथील इंग्लिश फॅक्टरीत घडून आलेल्या स्थित्यंतराची हकीगत समजून घेण्यासाठी, पाहा : एम्. एन्. राय, ' दि ॲनल्स ऑफ दि अर्ली इंग्लिश सेटलमेंट इन बिहार. '

२४. व्हानल्यूर, पूर्वोक्त, पृ. २०६-२०७.

२५. कॅनानोरच्या मोपला व्यापाऱ्यांकडे अनेक जहाजे होती आणि अरबस्तान, बंगाल व सुमात्रा यांच्याशी त्यांचा व्यापार चालू होता असे बुकनन यांनी नमूद केले आहे. या घटनेचा खुलासा म्हणून असे सांगता येईल की मोपला ही एक प्रसिद्ध व्यापारी जमात होती. एफ्. बुकनन, पूर्वोक्त, खंड २, पृ. ५५५.

या घटनेचे मुख्य कारण असे दिसते की व्यापारी जाती व जमाती यांनी व्यापारात सक्रियपणे भाग घेण्याच्या दृष्टीने विशेष प्राविण्य संपादन केलेले असे. मुगलांच्या राजवटीत या प्रक्रियेला अडथळा आणणारी खास कारणे विद्यमान होती. पहिले कारण असे की, प्रांतिक उच्च अधिकाऱ्यांच्या वारंवार बदल्या होत असत. दुसरे कारण असे की सर्व मनसबदारांची मालमत्ता त्यांच्या मृत्यूनंतर बादशहाच्या मालकीची होत असे. या दुसऱ्या कारणामुळे आपल्या कुटुंबाची मालमत्ता निर्माण करण्यास परिणामकारक प्रतिबंध होत असे; आणि एखाद्या विशिष्ट कामात पिढ्यानुपिढ्या सातत्याने कायम राहाण्याची शक्यता उरत नसे.

या संदर्भामध्ये व्यापारी वर्ग अथवा व्यक्तिशः श्रीमंत व्यापारी यांचा सरकारवर अथवा प्रशासनावर किती प्रभाव असे याचाही उल्लेख करणे प्रस्तुत होईल. हा प्रभाव फार मोठा नसावा असे दिसते.[३६] आपल्या स्वतःच्या व्यवहारांच्या बाबतीत व्यापारी लोक प्रामुख्याने आत्मनियंत्रित असत. ही स्वायत्तता म्हणजे भारतीय समाजव्यवस्थेचे एक सर्वसामान्य वैशिष्ट्य होते.[३७] तथापि, व्यापाऱ्यांजवळ फारसा राजकीय प्रभाव असेल असे वाटत नाही. मुस्लिम राजवटीत हिंदू व्यापारी जमातींचे स्थान फारसे बळकट नसणार हे उघड आहे; परंतु जेथे मुसलमान व्यापारी किंवा त्यांचे व्यापारी हितसंबंध विद्यमान होते तेथे देखील त्यांनी प्रशासनावर आपला प्रभाव वापरला असावा असे दिसत नाही. भारताच्या सर्व भागांमध्ये बहुतेक मुस्लिम राजवंशांमध्ये सत्ता ही प्रामुख्याने बाहेरून आलेल्या इराणी, अरबी, तुर्की इत्यादि वंशांच्या लोकांच्या हाती होती. हे लोक व्यापारातील भरभराटीच्या जोरावर नव्हे तर राज्याची सेवा करून सत्ताधारी बनले होते. मराठा रियासतीच्या बाबतीतही पेशवे व इतर सर्व मोठे मोठे सरदार नेहमीच कर्जबाजारी असले तरी जुन्या व्यापारी जमातींनी अथवा व्यापार व सावकारी यांत नव्यानेच प्राविष्ट झालेल्या ब्राह्मणांनीही राजकीय सत्ता हस्तगत केल्याचा अथवा राजकीय कारस्थानात भाग घेतल्याचा काही पुरावा आढळत नाही. दक्षिणेत कर्नाटकात अठराव्या शतकाच्या मध्यास फ्रेंचांनी व इंग्रजांनी रचलेल्या कारस्थानांत व केलेल्या युद्धांत त्या भागातील स्थानिक व्यापारी व सावकार यांच्या हितसंबंधांचा काही प्रभाव निर्माण झाला असल्याचे आढळून येत नाही. या युद्धामध्ये सर्व संबंधित पक्ष आर्थिक अडचणींत सापडलेले असत. या युद्धांमध्ये बुसीने 'दक्षिण भारतातील मोठा पेढीवाला' असलेल्या भुकनजीकडून कर्ज घेतल्याचा उल्लेख डॉड्वेल करतात.[३८] तथापि, या काळात घडलेल्या घटनांवर प्रभाव पाडणाऱ्या अनेक व्यक्तींच्या व संस्थांच्या यादीत व्यापारी अथवा व्यापारी हितसंबंध यांचा उल्लेख आढळत नाही.

त्यामुळे जगत शेठांच्या पेढीने बंगालच्या राजकारणांत जी भूमिका पार पाडली ते एक अपवादात्मक उदाहरण समजले पाहिजे. सरकारी महसूल स्वीकारणे व खजीनदार या नात्याने त्याचा सांभाळ करणे ही कामे ही पेढी करीत असे. त्यामुळे सरकारशी तिचा फार घनिष्ठ

३६. सुरतेमध्ये "श्रीमंत व्यापारी वर्गाच्या हाती राजकीय सत्ताही असे, (पूर्वोक्त, पृ. २०४)" हे विधान व्हान ल्यूर कोणत्या आधारावर करतात हे स्पष्टपणे लक्षात येत नाही.

३७. नाना फडणवीस (१७१७ - १७९५) यांच्या काळातील पुणे शहराच्या न्यायव्यवस्थेचे वर्णन करणाऱ्या एका ऐतिहासिक कागदावरून असे दिसते की पेढीवाले, सावकार व कापडव्यापारी यांच्याशी संबंधित खटल्यांमध्ये या वर्गातील लोकांना न्यायसहायक (असेसर) म्हणून बोलावण्यात येत असे. 'पेशवे दप्तरातून निवडलेले कागद' खंड ४५, लेखांक ४८.

३८. एच्. डॉडवेल, 'डुप्ले अँड क्लाइव्ह', (१९२०), पृ. ९२.

संबंध होता. ही पेढी हळूहळू बहुतेक महसूलधारकांची जामीनदार बनली; आणि नवाबाच्या गादीवर येणाऱ्या प्रत्येक वारसदाराला पैशाचा पुरवठा करणारी संस्था हे स्थान तिला प्राप्त झाले; कारण नवाबाच्या गादीवर यावयाचे ही नेहमीच कटकटीची व खर्चाची बाब असे. ही पेढी युरोपीय कंपन्या व खाजगी व्यापारी यांनाही वारंवार कर्जे देत असे. देशातील तिचे असाधारण स्थान आणि सरकार, प्रशासन, भांडवलपुरवठा व व्यापार यांच्याशी सर्व बाजूंनी असणारे तिचे संबंध यांमुळे स्वाभाविकपणेच राजकीय उलाढालींमध्ये तिला गुंतावे लागले. या संदर्भात ही गोष्ट नमूद करण्यास रखी आहे की बंगालमध्ये १७५० पूर्वीच्या काही दशकांमध्ये उच्च पातळीवरील प्रशासकांत हिंदूंचा फार मोठा भाग असे. देशाच्या इतर भागांतील मुस्लिम राजवटींत हिंदूंची जी संख्या सामान्यतः असे तिच्याहून बंगालमधील हिंदू प्रशासकांची संख्या खूपच मोठी असे.

९. भारतीय पेढीवाले–सावकार

एकूण व्यापारी वर्गांचा विचार करिता त्यांच्यामध्ये सापेक्षतः फारच थोडे विशेषीकरण झालेले होते, हे खरे असले तरी ज्यांचा खास विचार केला पाहिजे असे दोन वर्ग आपल्याला आढळतात. पहिला म्हणजे ज्यांचे वर्णन दिले आहे ते पेढीवाले किंवा सावकार व त्यांच्या सावकारी पेढ्या यांचा वर्ग होय; आणि दुसरा म्हणजे युरोपीय व्यापाराच्या संबंधात आढळून येणारा दलालांचा वर्ग होय.

व्यापारी–सावकार वर्गांपैकी थोडेफार विशेषीकरण झालेल्या लहानशा परंतु अत्यंत महत्त्वाच्या अशा पेढीवाल्यांच्या वर्गाचा खास विचार करण्यात आला पाहिजे. त्याकाळी भारतीय पेढीवाले किंवा त्यांच्या पेढ्या प्रामुख्याने तीन प्रकारची कामे करीत असत. पहिले काम म्हणजे नाणे बदलून देण्याचे. देशातील सरकारांची संख्या फार मोठी होती आणि ती सरकारे अस्थिर असत. नाणी पाडण्याच्या कामाचे मोठ्या प्रमाणावर केंद्रीकरण झालेले नव्हते आणि स्थानिक स्वरूपाच्या अनेक टांकसाळी देशात होत्या. त्यामुळे देशात प्रचलित असलेल्या नाण्यांमध्ये खूपच विविधता होती. शिवाय नाणी खराब होऊ शकत आणि त्याच टांकसाळीतून ती पुनः नव्याने तयार करावयाची म्हणजे सामान्यतः त्याला अधिक खर्च येई व नाण्यांची किंमत वाढे. त्यामुळे वेगवेगळ्या मोठ्या उलाढालीच्या प्रसंगी अनेक प्रकारच्या नाण्यांचा व्यवहार आणि त्यांची परस्परांशी असणारी विनिमयमूल्यांची निश्चिती वगैरेची कार्यवाही करावी लागे. याचा परिणाम म्हणून वेगवेगळ्या प्रकारच्या नाण्यांतील भरणा स्वीकारण्यास तयार असणाऱ्या अथवा एका प्रकारचे नाणे घेऊन त्याच्या बदली दुसऱ्या प्रकारचे नाणे देण्यास तयार असणाऱ्या संस्था निर्माण झाल्या. काही वेळा नाणी बदलून देण्याचे काम करणारे लोक तेवढेच एक काम करीत; परंतु सामान्यतः नाणी बदलून देण्याचे काम सावकारी अथवा पेढीचे काम यांच्या व्यवसायाशी निगडित झालेले असे.

भारतीय पेढ्यांचे दुसरे काम म्हणजे हुंड्या पुरविणे हे होते. सामान्यतः जीवनोपयोगी वस्तूंच्या व्यापारातून हुंड्यांची जरुरी निर्माण होई. व्यापारासाठी भांडवलपुरवठा करणे अथवा व्यापारी कामांसाठी पैसा पाठविणे याचे ते साधन असे. त्यासाठी व्यापाराच्या एकूण प्रदेशात पेढ्यांच्या शाखा किंवा प्रतिनिधी असण्याची आवश्यकता असे. अठराव्या शतकाच्या सुरुवातीपूर्वी भारतामध्ये अशा प्रकारची व्यवस्था पूर्णपणे विकसित झालेली होती. या व्यवस्थेमुळे दूर अंतरावर नाण्यांचा खूप मोठा साठा वाहून नेण्याची गरज उरली नाही. तत्कालीन वाहतूक-

व्यवस्था व राजकीय परिस्थिती यांचा विचार करिता अशा प्रकारे नाण्यांची वाहतूक करणे ही गोष्ट धोक्याची व खर्चाचीही असली पाहिजे, हे उघड आहे. भारतामध्ये हुंड्यांचे अत्यंत विकसित प्रकार अस्तित्वात आले होते आणि त्यांच्या सुरक्षिततेचीही चांगली व्यवस्था असे. येथील महत्त्वाच्या व्यापारी केंद्रांमध्ये असणाऱ्या अनेक पेढ्या संबंध देशभर आपल्या शाखा किंवा प्रतिनिधी यांच्या नावे हुंड्या देऊ शकत असत. यांपैकी सर्वांत महत्त्वाच्या पेढ्यांजवळ फार मोठी साधनसंपत्ती होती;[३९] आणि त्यांच्यापैकी काही पेढ्यांजवळ त्यांची स्वत:ची टपाल वाहतूकही होती.[४०]

तिसरे कार्य सरकारी वित्तव्यवस्थेशी संबंधित होते. याचे अनेक वेगवेगळे पैलू म्हणजे महसूल गोळा करणे, तो स्वीकारणे, तो पाठवून देणे आणि सरकारला कर्जे देणे हे होत. स्थानिक अधिकारी अथवा अंमलदार यांनी गोळा केलेला महसूल स्वीकारण्याचा आणि तो मुख्यालयाकडे पाठवून देण्याचा अधिकार पेढ्यांना दिला जात असे. जेथे त्यांना असा अधिकार प्रत्यक्षपणे दिलेला नसे तेथे देखील जमा झालेली रक्कम पाठवितांना चलनपरिवर्तनाचे काम या पेढ्यांनाच करावे लागे.[४१] जेथे कमाविसीची (सरकारसारा गोळा करून देण्याच्या मक्तेदारीची) प्रथा अमलात होती तेथे या पेढ्या कमाविसदारांना भांडवल पुरविण्याचे काम करीत असण्याची शक्यता आहे

शेवटी, एक नैसर्गिक उपसिद्धांत म्हणून, कोणत्याही प्रकारची महसूलविषयक कामे हाती घेऊ शकतील एवढ्या मोठ्या व प्रभावशाली पेढ्या सरकारांनाही कर्जे देत असतील असे समजण्यास हरकत नाही. ही कर्जे चालू आर्थिक गरजा भागविण्याच्या स्वरूपाची असत अथवा लष्करी स्वाऱ्या किंवा इतर प्रकारची साहसे यांसाठी लांब मुदतीचा भांडवल-पुरवठा करण्याच्या स्वरूपाचीही असत. यांपैकी दुसऱ्या प्रकारच्या आकस्मिक स्वरूपाच्या कर्जांच्या बाबतीत पैसा देणारी पेढी त्या कर्जाच्या मोबदल्यात आपल्याला काही खास विशेषाधिकार मिळावेत अथवा विशिष्ट प्रदेशांतील महसूल गोळा करण्याचा हक्क प्राप्त व्हावा अशी अपेक्षा बाळगीत असली पाहिजे. ही विधाने सरकारी वित्तव्यवस्थेला मोठ्या प्रमाणावर लागू पडतात. तथापि, ज्या पेढ्या, व्यापारी किंवा इतर वजनदार मंडळी यांचा सरकारी वित्तव्यवस्थेच्या कोणत्याही पैलूशी संबंध नसे त्यांच्याकडूनही बऱ्याच मोठ्या प्रमाणावर सरकारला मुदतीची कर्जे मिळावीत अशी अपेक्षा बाळगली जात असली पाहिजे व त्यांच्याकडे तशी कर्जे मागितली जात असावीत, असे वाटते. अशा कर्जांवरील व्याजाचा दर सामान्यत: बराच अधिक असे.[४२]

---

३९. जगत शेठ यांची अशी ख्याती होती की ते एका वेळी एक कोटी रुपयांच्या हुंड्या देऊ शकत असत. पाहा : एच. सिन्हा, 'अर्ली युरोपियन बँकिंग इन इंडिया', (१९२७), पृ. २, या ग्रंथातील 'सैर मुताखरीन' : (केंब्रेची आवृत्ती, खंड २, पृ. ४५७ – ८) चे उद्धरण. तसेच, एन्. के. सिन्हा, 'एकॉनॉमिक हिस्ट्री ऑफ बेंगॉल', (१९५६), पृ. १४०.

४०. सरकारी व खासगी टपाल व्यवस्थेच्या माहितीसाठी पाहा : ना. गो. चापेकर, 'पेशवाईच्या सावलीत', पृ. ४१.

४१. "मराठा राजवटीत ज्या अनियमित पद्धतीने महसूल गोळा केला जात असे त्यामुळे आणि दक्षिणेकडे (महाराष्ट्रात) जो पैशाचा ओघ चालू होता त्यामुळे हुंड्यांची बरीच मोठी वाहतूक चालू असे. या कामी अहमदाबादच्या व्यापाऱ्यांबरोबर मारवाड्यांच्या व्यापाऱ्यांचीही भागीदारी असे." अहमदाबाद गॅझेटियर, पृ. ६५.

४२. बाळाजी बाजीराव पेशव्यांनी १७४०-४१ ते १७६०-६१ या काळात जी वेगवेगळी कर्जे घेतली त्यांची एक तपशीलवार यादी उपलब्ध आहे. तिच्यावरून असे दिसते की त्यावेळी व्याजाचा दर दरमहा दर शेकडा बारा आण्यां

[ पुढील पानावर

या कामांखेरीज या पेढ्या खासगी लोकांनाही व्यापारासाठी किंवा इतर कामांसाठी भांडवल पुरवीत असत. भारतातील बहुतेक केंद्रांतील युरोपीय मंडळींना अगदी सुरुवातीच्या काळापासून आपल्या मालखरेदीसाठी वेळोवेळी भारतीय पेढ्यांकडून पैसे कर्जाऊ घेण्याची आवश्यकता वाटू लागली आणि त्यांना ते कर्ज मिळतही होते.

मोठ्या पेढ्या मुख्यतः भांडवल-पुरवठ्यावरच भर देत. परंतु या सर्व पेढ्या मूलतः व्यापार व सावकारी अशी दोन्ही कामे करीत असत. त्यांच्यापैकी सर्वांत मोठ्या पेढ्या लाभदायक व्यापाराची संधी कधीही सोडत नसत; आणि सर्वांत मोठे व्यापारी पेढ्यांचीही काही कामे अंगावर घेत असत.

**१०. व्यवसायाचे घटक आणि भांडवल–निर्मिती**

व्यापारी संस्थेचा घटक हा सामान्यतः सर्वत्र कुटुंब हाच होता. एकत्र कुटुंबाविषयीच्या मान्यताप्राप्त कायदेशीर संकल्पना संबंध देशभर जरी सारख्याच नसल्या तरी सामान्यतः परंपरागत हिंदू एकत्र कुटुंबच आर्थिक क्षेत्रात कार्य करीत असे. मात्र त्याच्या कार्याचे स्वरूप सर्वत्र फारसे सारखे नसे. तसेच, ज्यावेळी एखाद्या कुटुंबात पुरुष वारसदार नसेल तेव्हा दत्तक घेऊन घराण्याचे सातत्य चालू ठेवण्याची हिंदू प्रथा सर्व देशभर प्रचलित होती. विशिष्ट कामापुरती किंवा अल्प मुदतीसाठी व्यावसायिक भागीदारी करण्याची प्रथा येथे प्रचलित असल्याचे आढळून येत नाही. परंतु त्याचबरोबर अनेक जवळचे नातेवाईक असलेले व दत्तकप्रथा रूढ असणारे मोठे एकत्र कुटुंब पिढ्यानुपिढ्या अबाधितपणे एखादी पेढी किंवा व्यवसायसंस्था चालवू शकत असे. आणि अशा प्रकारे पिढ्यानुपिढ्या सतत यशस्वीपणे व्यवसाय चालविल्यामुळे काही थोड्या कुटुंबांच्या हातांत खूप मोठी साधनसंपत्ती गोळा होऊ शकत असे. म्हणून, सामान्यतः व्यवसायघटक हा कुटुंबघटकच असला तरी एका कुटुंबाच्या हातांत फार मोठी साधनसंपत्ती गोळा होण्यास त्या स्थितीमुळे प्रतिबंध झाला असल्याचे दिसत नाही.

यातून स्वाभाविकपणेच भांडवलनिर्मितीच्या प्रकारांचा प्रश्न निर्माण होतो. वर सूचित केल्याप्रमाणे, शेतीच्या विकासामध्ये सातत्याने भांडवलगुंतवणूक करण्यास येथील परिस्थिती अनुकूल नव्हती; आणि कृषि-अर्थव्यवस्था व शहरी व्यापारी वर्ग यांच्यांत फारच थोडा संबंध होता. आणि त्यामुळे पुष्कळ काळपर्यंत साधनसंपत्तीची बरीच बचत करणे शक्य होई. भांडवलपुरवठा, सावकारी व व्यापार चालविण्यास या साधनसंपत्तीची काही प्रमाणात गरज असे. भांडवलपुरवठ्याच्या प्रणालीचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे नाण्यांची अदलाबदल आणि हुंड्यांच्या द्वारे एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी पैसे पाठविणे हे होते. पैसे पाठविण्यासाठी पेढ्यांच्या शाखा व प्रतिनिधी यांचे व्यापक जाळे पसरविण्यात आलेले होते. त्यामुळे ही प्रणाली कार्यान्वित करण्यासाठी वापरली जाणारी साधनसंपत्ती खूप मोठी असे. वाहतुकीतील विलंबामुळे वेगवेगळ्या केंद्रांमध्ये असणारा पैसा सापेक्षतः वापरात न येता पडून राहात असे, म्हणून या पद्धतीमध्ये रोख रक्कम फार मोठ्या प्रमाणात असण्याची गरज भासत असली पाहिजे. नाण्यांची अदलाबदल हाही एक

---

मागील पानावरून ]

पासून (७५ पैशांपासून) अडीच रुपयांपर्यंत (२ रु. ५० पैशांपर्यंत) होता. १७५५ नंतर सर्वसामान्य व्याजाचा दर दरमहा दर शेकडा एक रुपया दोन आणे (रु. १ = १२) असावा असे दिसते. 'बाळाजी बाजीराव पेशवे यांची रोजनिशी', खंड २, पृ. १७० – १८०.

लाभदायक व्यवसाय होता; परंतु त्यासाठी धातूंच्या नाण्यांचा फार मोठा व विविधप्रकारचा साठा बाळगावा लागे. मालाचा साठा करणे व तो दीर्घकाळपर्यंत चालू ठेवणे यासाठीही व्यापारी लोकांना त्या मानाने फार मोठे भांडवल गुंतवावे लागे.

या अत्यावश्यक खेळत्या भांडवलाव्यतिरिक्त भांडवल-निर्मितीचे अन्य कोणते प्रकार अस्तित्वात असतील ? वर सूचित केल्याप्रमाणे, येथील दुकानदार-व्यापाऱ्यांचा उद्योगधंद्यांशी फार थोडा संबंध होता. ते ज्या वस्तूंचा व्यापार करीत असत त्या वस्तूंच्या उत्पादनात गुंतलेल्या कारागिरांना भांडवल-पुरवठा करण्याचे काम ते करीत असले पाहिजेत, यात शंका नाही; परंतु सामान्यतः ते जोखीम घेऊन भांडवल न पुरविता कर्जाऊ भांडवल देत असले पाहिजेत. त्यामुळे दुकानदार-व्यापाऱ्यांच्या हातांत गोळा होणाऱ्या भांडवलाच्या योगे औद्योगिक उत्पादनात गुंतविल्या जाणाऱ्या भांडवलात कोणत्याही प्रकारे वृद्धी होत नसे. औद्योगिक कारागिरांकडून केल्या जाणाऱ्या उत्पादनाचा घटक हा एखादा लहानसा कारखाना असे. ज्यावेळी एखादा राजा किंवा सामर्थ्यवान सरदार प्रामुख्याने वैयक्तिक किंवा सरकारी उपयोगासाठी एखाद्या उत्पादनाचे संघटन करीत असे तेव्हाच अधिक मोठे घटक अस्तित्वात येत. याचे सर्वांत महत्त्वाचे उदाहरण म्हणजे विविध प्रकारच्या उपयुक्त किंवा चैनीच्या वस्तू निर्माण करण्यासाठी मुगल सम्राटांनी चालविलेले कारखाने हे होय.[४३] हे कारखाने दिल्लीला आणि लाहोर, आग्रा, अहमदाबाद व बऱ्हाणपूर यांसारख्या केंद्रांमध्ये असत. तथापि, १७५० पर्यंत अशा प्रकारचे सरकारी कारखाने उत्तर व दक्षिण भारतातून बव्हंशी नष्टप्राय झाले असावेत, असे दिसते. मराठ्यांचे कारखाने हे मुख्यतः दारूगोळा व खोगिरे यांसारखे लष्करी सामान पुरविण्याचेच काम करीत असत.[४४]

व्यापार व भांडवल-पुरवठा यांमध्ये भांडवलाची जी गुंतवणूक केली जात असे तिच्या व्यतिरिक्त दुकानदार–व्यापारी प्रामुख्याने घरे, बागा इत्यादींमध्ये आणि शहराभोंवतालच्या अन्य प्रकारच्या स्थावर वतनवाडीत अथवा मालमत्तेत पैसा गुंतवीत असत. या प्रकारे व्यापारातून संचित होणाऱ्या पैशाचा शेतीच्या अथवा हस्तोद्योगांच्या उत्पादकतेवर काही परिणाम होत नसे. शहरांतील व्यापाऱ्यांची वाढती भरभराट बाह्य स्वरूपातून व्यक्त होत असे. हा बाह्य भपका सुरक्षिततेला बाधक ठरणार नाही, अशा प्रकारे त्याची अभिव्यक्ती होई. उदाहरणार्थ, गुजरातच्या शहरांतून व्यापाऱ्यांच्या वाड्यांचे दरवाजे भरपूर कलाकुसरीने सजविलेले असत. तसेच देवळे, तलाव, धर्मशाळा वगैरे बांधून धार्मिक किंवा दानधर्माच्या कामांच्या स्वरूपात ही श्रीमंती व्यक्त केली जाई.

सार्वजनिक क्षेत्रातील सरकारी भांडवलनिर्मिती ही काही राज्यकर्त्यांच्या अमदानीत रस्ते, कालवे, तलाव बांधणे अथवा टपाल वहातुकीची सोय करणे यांसारख्या गोष्टींचेही स्वरूप धारण

४३. पाहा : यदुनाथ सरकार, 'मोगल ॲडमिनिस्ट्रेशन', (१९२४), प्रकरण १०.

४४. पाहा : एस्. सेन, 'ॲडमिनिस्ट्रेटिव्ह सिस्टिम ऑफ दि मराठाज', (१९२५), पृ. ७२–७५, ४९४–४९५, ६५९–६६४ व ६६८. पृ.६६८ वर श्री सेन यांनी 'कारखाना' या शब्दाच्या वेगवेगळ्या अर्थासंबंधी विवेचन केले आहे. "प्रा. सरकार आपल्या 'मोगल ॲडमिनिस्ट्रेशन' या ग्रंथात 'कारखाना' या शब्दाचा अनुवाद 'फॅक्टरी' असा करतात. परंतु मराठ्यांनी जनान्याचा समावेशही कारखान्यात केलेला होता. (पाहा : रामचंद्रपंत अमात्यांची 'राजनीती'), आणि म्हणून प्रा. डॉवसन यांनी 'ए रॉयल एस्टॅब्लिशमेंट' असा जो अनुवाद केला आहे तो अगदी बरोबर आहे." आम्ही वर जो कारखान्याचा उल्लेख केला आहे त्यात फक्त उत्पादन करणाऱ्या संस्थांचाच समावेश आहे.

करी. तथापि सार्वजनिक क्षेत्रातील भांडवली खर्च प्रामुख्याने सोळाव्या व सतराव्या शतकांतील बांधकामांवर झाला असल्याचे दिसून येते. ही बांधकामे प्रचंड सार्वजनिक इमारतींची होती व त्यापायी फार पैसा खर्च झाला होता. त्यांच्यापासून आर्थिक किंवा सामाजिक स्वरूपाचा कोणताही वास्तविक लाभ झाला नाही. मशिदी, कबरी, राजवाडे व प्रमोदउद्याने ही सारी या प्रकारच्या बांधकामांची उदाहरणे होत; आणि यांवर झालेला खर्च हाच प्रामुख्याने सरकारकडून केला गेलेला सर्वांत महत्त्वपूर्ण भांडवली खर्च होता. अर्थात् हा खर्च प्रमुख राजकीय केंद्रांमध्ये अथवा प्रबळ सरदारांच्या शहरांमध्ये केंद्रित होणे अपरिहार्य होते.

या शतकांच्या आर्थिक जीवनात सोने-चांदी व जडजवाहीर यांनी अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावली असल्यास नवल नाही. या वस्तू सहजासहजी लपविता येत (आणि राजकीय असुरक्षिततेच्या काळात या गोष्टीला फार महत्त्व होते), त्यांच्या मूल्यात घट होण्याचा धोका त्या मानाने फार थोडा असे, आणि त्यांची वाहतूक करणे सोपे असे, ही त्यात सोय होती. उत्पादक किंवा विकासाच्या कामांमध्ये भांडवलाची गुंतवणूक करण्याचे मार्ग विद्यमान नसल्यामुळे या काळातील संपत्तिसंचय सोन्या-चांदीच्या व जडजवाहिराच्या साठेबाजीत परिणत होणे स्वाभाविकच होते.

### ११. ब्रिटिश व युरोपीय व्यवसाय

भारतातील परकीय आधुनिक व्यवसायांचे सिंहावलोकन करतांना आपला संबंध प्रामुख्याने ब्रिटिश लोकांच्या कामांशी येतो. भारतातील ब्रिटिश लोकांच्या राजकीय व आर्थिक व्यवहारांच्या पद्धती व प्रणाली यांची घडणही काही अंशी त्यापूर्वीच्या दोन किंवा अधिक शतकांतील इतर युरोपीय लोकांच्या, विशेषतः पोर्तुगीज, डच व फ्रेंच लोकांच्या आशियातील हालचाली व अनुभव यांवर आधारलेली होती. आशियातील युरोपीय लोकांच्या हालचालींचे मार्गदर्शन व नियंत्रण बहुंशी त्यांच्या त्यांच्या देशांतील सरकारांशी घनिष्ठ संबंध असलेल्या सामर्थ्यशाली संघटनांकडून केले जात होते. पोर्तुगीज राजांना परदेशी व्यापाराच्या नव्या संधींचा फायदा घेण्यासाठी खासगी व्यापाऱ्यांच्या मंडळ्या स्थापन करण्याच्या त्यांच्या प्रयत्नांस पुरेसा प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे पोर्तुगीज व्यापार हा नेहमीच पोर्तुगालच्या शाही मक्तेदारीच्या स्वरूपात राहिला. तथापि, अगदी सुरुवातीच्या काळापासून जहाजांवरील अधिकारी व खलाशी यांना स्वतःच्या जबाबदारीवर व्यापार करण्यासाठी जहाजांमध्ये थोडीफार जागा दिली जात असे आणि जलवहातुकीत होणाऱ्या नफ्यामध्येही त्यांना अल्प-सा वाटा दिला जात असे. कालांतराने या सवलती आशियाच्या सागरी प्रदेशातील वेगवेगळ्या बंदरांमध्ये होणाऱ्या व्यापारामध्येही दिल्या जाऊ लागल्या. अशा प्रकारे, वेगवेगळ्या हितसंबंधांमध्ये तीव्र संघर्ष निर्माण झाला आणि पोर्तुगीज राजांच्या दृष्टीने ती एक कायमची गंभीर समस्या होऊन बसली. याच समस्येच्या प्रतिरूपाने ब्रिटिश प्रशासकांनाही १७५० नंतरच्या दशकांमध्ये हैराण केले.

पोर्तुगीजांनी पूर्वेकडील व्यापारामध्ये आपली मक्तेदारी प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या आगमनापूर्वी आशियातील व्यापार मुसलमानांच्या व मुख्यतः अरबांच्या ताब्यात होता. यांना त्या क्षेत्रातून हुसकावून लावणे व पुन्हा आत येऊ न देणे हे पोर्तुगीजांचे उद्दिष्ट होते. ते उद्दिष्ट साध्य करण्यात ते यशस्वी झाले. परंतु अरबांना हुसकून लावण्याने त्यांचे समाधान झाले

नाही. त्या क्षेत्रात संपूर्णपणे आपलीच मक्तेदारी राहिली पाहिजे, असा आग्रह त्यांनी धरला. खासगी पोर्तुगीज किंवा इतर युरोपीय व्यापाऱ्यांनाही त्यात शिरकाव करू देण्यास ते तयार नव्हते. जलवाहतुकीपायी येणारा प्रचंड खर्च आणि जलपर्यटनातील मोठे मोठे धोके यांमुळेच आपली मक्तेदारी प्रस्थापित करण्याची इच्छा त्यांच्या मनात निर्माण झाली असावी, असे समजण्यास हरकत नाही. मक्तेदारीतून नफ्याची भरपूर प्राप्ती होण्याची शक्यता असल्याखेरीज ही जोखीम घ्यावयास कोणी तयार झाले नसते; आणि एकदा ही द्रव्यप्राप्ती झाल्यानंतर तिचे प्रचंड प्रमाण पाहून ही मक्तेदारी कायमची आपल्याकडेच कशी राहील या दिशेने प्रयत्न सुरू झाले. पोर्तुगीज व त्यांच्यानंतर आलेले डच या दोघांनीही आशियाई व्यापारात आपली राष्ट्रीय मक्तेदारी प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. डच व इंग्लिश यांनी एकजूट करून पोर्तुगीज मक्तेदारी मोडून काढली. त्यामुळे सोळाव्या शतकानंतर हिंदी महासागरातील व्यापारामध्ये पोर्तुगीजांना प्रमुख स्थानसुद्धा उरले नाही. आपली मक्तेदारी स्थापन करण्याच्या डच लोकांच्या प्रयत्नांना इंडोनेशियाच्या भागात आंशिक यश प्राप्त झाले; परंतु भारताच्या कोणत्याही भागात मात्र ते यशस्वी होऊ शकले नाहीत. इंग्रज लोक या भागात पोर्तुगीज व डच लोकांनंतर आले आणि त्यांना या दोघांच्या विरोधाला तोंड द्यावे लागल्याने त्यांनी या प्रदेशावर राष्ट्रीय मक्तेदारी प्रस्थापित करण्याच्या कल्पनेला कधीच थारा दिला नाही. तरीदेखील त्यांनी त्या काळी सर्व जगभर मान्यता पावलेल्या नियंत्रण-कल्पनेचा अंगीकार केलेला होता. एका देशाच्या रहिवाशांमध्ये व्यापाराचे विशेषाधिकार परवानाधारकांच्या मर्यादित संख्येपुरतेच नियंत्रित राहिले पाहिजेत, अशी ती कल्पना होती.

सतराव्या शतकापर्यंत युरोपीय राष्ट्रांतील परदेश-व्यापार चालविणाऱ्या प्रमुख संघटनेचे स्वरूप निश्चित झालेले होते. राष्ट्रीय, सनदप्राप्त किंवा विशेषाधिकार-प्राप्त मंडळी (कंपनी) असे ते स्वरूप होते. ज्या प्रमाणात त्या मंडळीला यश मिळे व तिचा व्यवसाय लाभदायक ठरे त्या प्रमाणात तिच्या मक्तेदारीचा लोकांना हेवा वाटे आणि देशातील संघटित गटांचा तिला विरोध होई. ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीला सतराव्या शतकात जो विरोध झाला त्याचा इतिहास सारांशरूपाने पुढील शब्दांत व्यक्त करण्यात आला आहे:– "पहिल्या स्टुअर्टांच्या कारकीर्दीत हा संघर्ष कंपनी आणि कंपनीच्या सनदेचे उल्लंघन करून राजाने ज्या व्यक्ती किंवा संस्था यांना परवाने दिले त्यांच्यांत होता. कॉमनवेल्थ किंवा राष्ट्रकुटुंबाच्या काळात हा संघर्ष अधिक व्यापक बनला. कंपनीतील पुराणमतवादी गट आणि पुरोगामी मंडळी यांच्यांत तो निर्माण झाला. या पुरोगामी मंडळींचे भारताशी खुला व्यापार असला पाहिजे असे म्हणणाऱ्या बाहेरच्या भांडवलदारांशी सख्यसंबंध होते १६५० मध्ये झालेल्या राजसत्तेच्या पुनःस्थापने (रिस्टोरेशन) नंतर कंपनी आणि बहुसंख्य स्वतंत्र व्यापारी वर्ग यांच्यामध्ये दावे व खटले यांचे युद्धच सुरू झाले. हे युद्ध राज्यक्रांतीनंतरच्या महान संसदीय एकत्रीकरणानेच संपले." ४५ फ्रान्ससारख्या ज्या देशांत देशाचे सरकार व राष्ट्रीय कंपनी यांच्यांतील सहयोग घनिष्ठ होता तेथे हा विरोध इंग्लंडातील विरोधाइतका उघडपणे पुढे आला नाही. तथापि, तेथेही कोर्टकचेऱ्यांच्या द्वारे होणारा विरोध अनेकदा दिसून येई; आणि राष्ट्रीय सरकारांशी घनिष्ठ संबंध असलेल्या किंवा त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या कंपन्यांना एक जादा तोटा सहन करावा लागला. तो असा की त्या सरकारांच्या दुबळे-

---

४५. डब्ल्यू. डब्ल्यू. हंटर, 'ए हिस्ट्री ऑफ ब्रिटिश इंडिया', (१९०० ), खंड २, पृ. १२०–१२१.

पणाचा व उपद्रवांचा त्यांच्यावर परिणाम झाल्याशिवाय राहात नसे.

या कंपन्यांच्या संघटनेचे स्वरूप संयुक्त भांडवल मंडळी (जॉइंट स्टॉक कंपनी) असे होते. संयुक्त भांडवल सिद्धांताचा कसा विकास घडून आला हे ईस्ट इंडिया कंपनीच्या इतिहासातून पाहाणे उद्बोधक ठरेल. संयुक्त भांडवल सिद्धांताची निर्मिती व कार्य यांतील बदल, हे अनेक उदाहरणांमध्ये, विरोधकांना आपल्यात समाविष्ट करून घेणे आणि वरील परिच्छेदात पाहिल्याप्रमाणे संघटनेचा पाया व्यापक बनविणे या प्रक्रियेशी निगडित होते. श्री हंटर प्रारंभिक कालखंडाचे दोन भाग पाडतात. १६०० पासून १६१२ पर्यंतचा पहिला भाग हा तथाकथित वेगवेगळ्या जलप्रवासांचा काळ होता. त्यांपैकी प्रत्येक जलप्रवास तत्त्वतः स्वयंपूर्ण असे; आणि जहाजे परत आल्यानंतर नफ्याची वाटणी झाली की तेवढ्यापुरते ते प्रकरण समाप्त होई. १६१२ पासून १६६१ पर्यन्तचा दुसरा कालखंड हा संयुक्त भांडवलाचा काळ म्हणून प्रसिद्ध होता. एकेका खेपेसाठी वर्गणी गोळा न करिता अनेक खेपांची मिळून किंवा काही ठराविक वर्षांच्या अवधीतील व्यापार चालविण्यासाठी वर्गणी गोळा केली जाई. तथापि, प्रत्येक संयुक्त भांडवल विशिष्ट काळानंतर गुंडाळण्यात यावे व त्यातून मिळणारा नफा निकाली स्वरूपात वाटून घेण्यात यावा, ही कल्पना तेव्हाही तेथे विद्यमान होती. प्रत्यक्ष व्यवहारात मात्र एकाच वेळी होणारे वेगवेगळे जलप्रवास अथवा अधून मधून होणारे संयुक्त जलप्रवास हे केवळ कंपनीमध्ये असणाऱ्या कायमच्या उच्च अधिकाऱ्यांच्या एकीकरणाच्या प्रभावामुळेच शक्य होत असत. तसेच, एकामागून एक येणाऱ्या संयुक्त भांडवल मंडळ्यांची नियामक मंडळे आणि विशिष्ट व सर्वसामान्य जलप्रवास कंपन्या यांमध्ये बहुतांशी तीच माणसे असत; आणि वेगवेगळ्या कामांसाठी उभारले जाणारे भांडवल काही अंशी त्याच वर्गणीदारांकडून गोळा होत असे.[४६] त्यामुळेही या जलप्रवासांचे सातत्य टिकून राही.

क्रॉमवेलने घडवून आणलेल्या व दुसऱ्या चार्लसने मंजुरीचे शिक्कामोर्तब केलेल्या समेटानंतर प्रारंभिक कालखंड समाप्त झाला. यावेळी दोन मूलभूत बदल घडून आले. पहिला बदल असा की, संघटित व स्थायी संयुक्त भांडवलाची कल्पना उदयास आली. भांडवलाचे वारंवार विसर्जन करण्याऐवजी काही वर्षांनंतर कंपनीच्या मालमत्तेचे ठराविक काळानंतर मूल्यमापन करण्याची तरतूद करण्यात आली. त्यायोगे कोणत्याही भागधारकाला निवृत्त व्हावयाचे असल्यास तसे करण्याची व त्याच्या मूळच्या भांडवलाचे चालू दराने मूल्यमापन होऊन त्याला ते परत मिळण्याची सोय झाली. परंतु संयुक्त भांडवल हे कंपनीचे समाईक भांडवल म्हणून चालूच राहील आणि निवृत्त होणाऱ्या सभासदांनी काढून घेतलेली रक्कम त्या कंपनीत सामील होऊ इच्छिणाऱ्या दुसऱ्या लोकांकडून मिळविण्यात येईल, अशी त्यात व्यवस्था होती. त्याचबरोबर या नव्या समेटामुळे कंपनीमध्ये भांडवल गुंतविण्याचा मार्ग आम जनतेला खुला झाला. परिणामतः, जुन्या कंपन्यांचे नोकर व शिकाऊ उमेदवार यांसारख्या वेगवेगळ्या गटांच्या सभासदांनाच नव्हे तर भारतातील व्यावसायिक व खाजगी व्यापारी यांनाही त्यांची इच्छा असल्यास कंपन्यांचे भागीदार म्हणून स्वीकृत करण्यात येऊ लागले. अशा प्रकारे वेगवेगळ्या परस्परविरोधी हितसंबंधांचे एका स्थायी संयुक्त भांडवल मंडळीत एकत्रीकरण झाल्याने नव्या कंपनीत तिची स्वतःची मक्तेदारी सुरक्षित राहील अशी भरपूर तरतूद झाली; आणि खासगी व्यापाऱ्याला कंपनीमध्ये किंवा कंपनीच्या बाहेर कसलेही मेहेरबानीचे स्थान उरले नाही.

---

४६. कित्ता, खंड २, पृ. १८१.

सतराव्या शतकाची शेवटची दशके कंपनीच्या दृष्टीने अत्यंत भरभराटीची ठरली; आणि राजसत्तेच्या पुनःस्थापनेनंतर काही थोड्या मूठभर लोकांच्या हाती कंपनी जात असल्याच्या तक्रारी पुनः सुरू झाल्या. बाहेरचे भांडवलदार आणि अनधिकृत व्यापारी हितसंबंध यांचा विरोध इतका जोरदार बनला की एका नव्या कंपनीसाठी ते पार्लमेंटचा पाठिंबा मिळवू शकले. त्यानंतर काही काळपर्यंत या दोन कंपन्यांमध्ये तुंबळ संघर्ष माजला. तेव्हा सरकारने हस्तक्षेप करून या दोन कंपन्यांचे एकत्रीकरण करणारा कायदा केला आणि त्यांच्याकडून सरकारला मोठे कर्ज मिळावे अशी त्यात तरतूद केली. त्यानंतर हा संघर्ष थांबला. या घटनेमुळे कंपनीचा पाया अधिक व्यापक बनण्यास व तिची भांडवली साधनसंपत्ती मजबूत बनण्यास मदत झाली. तथापि, या कायद्यामुळे १६६१ साली कंपनीचे जे स्वरूप निश्चित करण्यात आले होते त्यामध्ये काहीही महत्त्वाचा फरक घडून आला नाही; किंवा तिचे विशेषाधिकार अथवा मक्तेदारी यांनाही कात्री लागली नाही. हा संघर्ष व त्यानंतर घडून आलेले एकत्रीकरण यांचे जे परिणाम घडून आले त्यांपैकी एक परिणाम असा होता की सतराव्या शतकात व्यापारामध्ये अनधिकृत व्यापारी घटकांचे जे प्रस्थ माजलेले होते ते अठराव्या शतकात पुष्कळच कमी झाले.

१७५० च्या सुमारास ईस्ट इंडिया कंपनीची संघटना आणि कार्यपद्धती यांचे थोडक्यात वर्णन हे असे करिता येईल.[४७] कंपनीच्या कामावर संचालकांची प्रत्यक्ष देखरेख असे. ही देखरेख ते 'परस्परव्याप्त व बोजड अशा आपल्यांतून संघटित केलेल्या समित्यांच्या द्वारा' करीत असत. संचालक मंडळ ही कार्यकारी संस्था होती; आणि ही संस्था व मालक मंडळ (court of proprietors) या दोहोंमध्ये 'जहाज मालकांचे हितसंबंध' सुरक्षित ठेवण्याची प्रबळ भावना विद्यमान होती, हे आपण लक्षात ठेवले पाहिजे. त्यामुळे भारताशी चालणाऱ्या व्यापारासाठी आवश्यक असणारी खास प्रकारची जहाजे विकत घेण्याऐवजी ती भाड्याने घेण्याचे धोरण ठेवणे कंपनीला भाग होते. हितसंबंधांतील हा संघर्ष आणि भारतातील कंपनीच्या नोकरांच्या हितसंबंधांशी असणारा विरोध विद्यमान असूनही कंपनीला नफा होत असे. तिचा लाभांश दर-साल ७ ते ८ टक्क्यांवर कायम टिकून राहिला; आणि स्वदेशातील व परदेशातील तिची कर्जे अवास्तव मोठी नव्हती.[४८]

आता भारतातील संघटनेचा विचार करिता आपल्याला असे आढळून येते की वसाहतींमध्ये व्यापारी हा प्रशासकही असे; परंतु १७५० पूर्वी प्रशासकाच्या कामाला फारसे महत्त्व नसे. ज्येष्ठता पद्धती प्रस्थापित झालेली होती. (तथापि, खालच्या जागांसाठी नोकर भरती करताना वशिल्याचा वापर केला जात असे). जे लोक नोकर म्हणून भारतात येत ते पाच वर्षेपर्यंत कारकून म्हणून काम करीत असत. नंतर ते गुमास्ता व कनिष्ठ व्यापारी या टप्प्यांतून पुढे जात. यांपैकी प्रत्येक टप्पा तीन वर्षांचा असे. शेवटी ते वरिष्ठ व्यापारी बनत. त्यांतून सर्व वरच्या नेमणुकी केल्या जात. पगार फार कमी असत; आणि खासगी व्यापाराची संधी हेच भारतात येण्यासाठी प्रमुख प्रलोभन असे.

बहुतेक महत्त्वाच्या वसाहतींमध्ये काही मुक्त व्यापारीही विद्यमान असत. त्यांना भारतात येऊन खासगी व्यापार करण्याची परवानगी कंपनीकडून मिळालेली असे. त्याशिवाय कंपनीच्या

---

४७. पाहा : हॉल्डेन फर्बर, 'जॉन कंपनी ॲट वर्क', (१९४८), पृ. ११-१५.

४८. कित्ता, पृ. १५.

परवानगीशिवाय आलेले किंवा कंपनीचे नोकर म्हणून आलेले आणि नंतर व्यापारात नशीब काढण्यासाठी नोकरी सोडून दिलेले लोकही असत. यांच्या व्यतिरिक्त पोर्तुगीज, आर्मीनियम वगैरे लोकही होतेच. या लोकांनी, विशेषतः अठराव्या शतकाच्या पूर्वार्धात, फार महत्त्वाची भूमिका बजावली. प्रत्येक विभागात इतर काही युरोपीय देशांचे नागरिकही सक्रिय असत ब्रिटिश नागरिक युरोपशी जो व्यापार करीत त्यावर कंपनीची कडक नजर असे आणि त्या कामासाठी फक्त कंपनीचीच जहाजे वापरली जात. भारतात व इतर आशियाई देशांतही किनारपट्टीच्या व्यापाराच्या बाबतीत प्रत्येक युरोपीय कंपनी आपल्या स्वतःच्या देशाच्या नागरिकांच्या हालचालींवर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न करी. कंपनीच्या हितसंबंधांना बाधक ठरणाऱ्या हालचाली त्यांनी करू नयेत, असा त्यात हेतू असे. परंतु हे कार्य परिणामकारकपणे घडवून आणण्यातील अडचणी फार मोठ्या होत्या. काही विभागांत काही युरोपीय राष्ट्रांनाही अडथळे व उणीवा यांना तोंड द्यावे लागत असे. उदाहरणार्थ, मद्रासहून फिलिपाइन्सशी चालणाऱ्या व्यापाराच्या बाबतीत आर्मीनियन लोकांना जे खास स्थान प्राप्त झालेले होते तो त्या प्रदेशात ब्रिटिशांविरुद्ध केल्या जाणाऱ्या भेदभावाचा परिणाम होता.

१७५० साली खासगी व्यापारी आणि परवाना नसलेले युरोपीय व्यापारी यांचीही संख्या त्यामानाने कमी होती; आणि किनारपट्टीच्या व ग्रामीण भागातील व्यापारामध्ये ब्रिटिश लोकांचे वर्चस्व असले तरी फ्रेंच, डच, डॅनिश वगैरे लोकांनाही त्यात भागीदारी प्राप्त झालेली होती.

भारताचा युरोपशी असलेला व्यापार अठराव्या शतकाच्या पूर्वार्धात झपाट्याने वाढला. तथापि, या काळात त्या व्यापाराच्या मूलभूत स्वरूपात फारसा बदल झाला नाही. पूर्वीप्रमाणेच या काळातही युरोपीय मालाला भारतात फारशी मागणी नव्हती. परदेशांतून, विशेषतः ब्रिटिश लोकांकडून भारतात आणल्या जाणाऱ्या मालामध्ये सर्वात अधिक प्रमाण लोकरीच्या कापडाचे होते. या कापडाला भारतात फारच मर्यादित मागणी होती. आयात होणाऱ्या इतर युरोपीय मालात मुख्यतः शिसे, लोखंड, कथील, तांबे व पारा यांसारखे धातू असत. निर्यात होणाऱ्या व आयात केल्या जाणाऱ्या मालांच्या किंमतीतील तफावत बरीच मोठी होती. ती भरून काढण्यासाठी सोन्याचांदीची—मुख्यतः चांदीची—आयात करावी लागे. अठराव्या शतकाच्या पूर्वार्धात ब्रिटिशांकडून भारतात आयात केल्या जाणाऱ्या सोन्याचांदीचे प्रमाण परदेशी व्यापाराच्या मूल्यातील चढउतारानुसार कमीजास्त होत होते. आयात केलेली सोने-चांदी व मालाच्या विक्रीतून मिळालेला पैसा यांची गुंतवणूक निर्यातीसाठी भारतीय माल विकत घेण्यासाठी केली जाई. भारताच्या सर्व भागांतून निर्यात होणाऱ्या मालात प्रामुख्याने हातमागाचे कापड आणि त्याच्या खोलोखाल कच्चे रेशीम व रेशमी कापडाचे तागे यांना महत्त्वाचे स्थान होते. इतर मालामध्ये बिहारमध्ये मिळणारे सोरा मीठ (खनिज मीठ) ही सर्वात अधिक महत्त्वाची वस्तू होती. भारतातून होणारी निळीची निर्यात सतराव्या शतकात फार महत्त्वाची होती; परंतु अठराव्या शतकाच्या सुरुवातीस ती खूपच खाली घसरली होती.

या कंपन्यांना मिळणारा नफा हा मुख्यतः भारतीय व आशियाई मालाची युरोपला निर्यात करण्याच्या व्यवहारात नफ्याला जो प्रचंड वाव होता त्यातून मिळत असे. हा वाव सुती व रेशमी कापड, कच्चे रेशीम व सोरा मीठ या सर्व वस्तूंच्या व्यापारात होता. भारतात आयात होणाऱ्या मालाच्या बाबतीत नफ्याला फारसा वाव नसे. भारतात लोकरी कापडाला फारच थोडी मागणी असे; आणि येथील बाजारपेठेत ब्रिटिश मालाचा नेहमीच सुकाळ असे. धातूंच्या बाजारपेठेत

इतर युरोपीय लोकांकडून, विशेषतः डचांकडून होणाऱ्या तीव्र स्पर्धेला इंग्रजांना तोंड द्यावे लागे. डच लोक धातूच्या पुरवठ्याच्या पर्यायी साधनस्रोतांचा उपयोग करून घेत. उदाहरणार्थ, ते जपानहून तांबे आणीत आणि मलायातून कथील व कच्चे जस्त आणीत यासंबतीत डचांची स्थिती अठराव्या शतकाच्या पूर्वार्धात ब्रिटिशांच्या स्थितीपेक्षा निश्चितच अधिक चांगली होती. आग्नेय आशियातील काही प्रदेशांवर त्यांचा एकाधिकार होता; आणि इतर प्रदेशांतही त्यांनी विशेषाधिकार मिळविले होते. त्यामुळे त्यांना अनेक देशांशी आंतरराष्ट्रीय व्यापार कायम ठेवणे शक्य झाले आणि सोन्या-चांदीची आयात करण्याची त्यांची गरज कमी झाली.[४९] भारतामध्ये सोन्याचांदीची आयात करण्याची गरज शक्य तितकी कमी व्हावी या हेतूने सर्व युरोपीय लोक आंतर आशियाई व्यापाराच्या शक्यता अजमावून पाहू लागले. अशा प्रकारच्या आंतर आशियाई व्यापारामुळे – यात किनारपट्टीवरील व्यापाराचाही समावेश होता (यालाच त्या काळात व्यापक अर्थाने 'देशी व्यापार' (कंट्री ट्रेड) असेही म्हटले जाई). भारतीय माल खरेदी करण्यासाठी लागणारी भांडवलाची गुंतवणूक करण्यासाठी हवा असणारा पैसा अंशतः प्राप्त होऊ शकेल अशी आशा बाळगण्यात आली होती. हा देशी व्यापार हेच युरोपीय खाजगी व्यापारी व दलाल आणि खासगीरीत्या व्यापार करणारे कंपनीचे नोकर यांचे प्रमुख कार्यक्षेत्र होते.

१७५० च्या आधी काही काळ भारतात हा जो देशी व्यापार चालत असे त्याचे तीन प्रमुख विभागांत वर्गीकरण करण्यात आले आहे. किनारी, पश्चिमेकडील व पूर्वेकडील. सुरत व मुंबई या पश्चिम भारतातील फार मोठ्या व्यापारी पेठा होत्या. या आणि पश्चिम किनाऱ्यावरील इतर बंदरांचा इराणी व अरबी आखातांशी फायदेशीर व्यापार चालत होता, व त्यापासून भारताला खूप रोकड पैसा मिळत होता; एवढेच नव्हे तर बंगालच्या उपसागरातील बंदरातून थेट या बंदरांमध्ये कच्चे रेशीम, कापडाचे तागे व साखर यांचीही आवक होत असे. त्या मानाने चीन व मलाया द्वीपसमूह यांच्याशी चालणारा व्यापार बराच कमी होता. या काळात भारताच्या पूर्व-किनाऱ्याचा मुख्यतः पश्चिम किनाऱ्याशी व्यापार चालत होता. बंगालचा चिनी समुद्रातील बंदरांशी आणि मलबारचा किनारा व चीनमध्ये चालणाऱ्या व्यापाराशी जवळजवळ काहीही संबंध नव्हता. हा व्यापार प्रामुख्याने पोर्तुगीजांच्या हातात होता आणि त्याचे प्रमाण सापेक्षतः अत्यंत अल्प होते. भारत आणि पूर्वेकडील बेटे यांच्यांतील भक्कम दुवा म्हणजे कॉरोमंडल किनारा व मलाया यांच्यांतील व्यापार आणि मद्रासचा फिलिपाइन्सशी चालणारा व्यापार हा होता. यांपैकी मलायाशी चालणाऱ्या व्यापारावर डच लोकांचे नियंत्रण होते आणि फिलिपाइन्सशी चालणारा व्यापारही ब्रिटिशेतर लोकांच्या हातात होता.

हा देशी व्यापार सबंध अठराव्या शतकात वाढत होता. त्याने साहसी युरोपीय खलाशांना व इतरांना स्वतःचे नशीब उघडविण्याच्या आणि परिणामतः स्वतःच्या मालकीचे 'देशी जहाज' मिळविण्याच्या मोठमोठ्या संधी उपलब्ध करून दिल्या. हे लोक मवले दलाल किंवा कंपनीच्या जहाजांवर अथवा अन्य नोकरीत असणारे नोकर असत. ते आपल्या नोकऱ्या सोडून या व्यापारात पडत. १७५० पूर्वीच्या, त्यामानाने सुखवस्तू काळात या लोकांच्या हालचालींकडे करड्या नजरेने पाहिले जात नसे आणि त्यांच्या कामात कंपनी सामान्यतः हस्तक्षेप करीत नसे. याचे मुख्य कारण असे की या देशी जहाजांच्या कप्तानांचे ईस्ट इंडिया कंपनीच्या नोकरांशी, त्यांच्या

---

४९. पाहा : के. ग्लॅमन, 'डच एशियाटिक ट्रेड ( १६२०-१७४० )', १९५८.

खासगी व्यापारविषयक व्यवहारांशी फार महत्त्वाचे संबंध असत. अठराव्या शतकाच्या उत्तरार्धा-तील घटना व व्यापारी संघटना यांचा विकास समजून घेण्याच्या दृष्टीने खासगी व्यापार व व्यवसाय यांच्या संदर्भातील कंपनीच्या नोकरांचे स्थान निर्णायक ठरते.

कंपनीचा नोकर हा आपल्या ठाण्याशी बांधलेला असे; आणि भांडवलपुरवठा व आपल्या स्थानाच्या योगे त्याला प्राप्त होणारा विशेषाधिकार अथवा प्रतिष्ठा यांच्या रूपानेच तो या देशी व्यापारात भाग घेऊ शकत असे. तसे करण्यासाठी त्याला खासगी व्यापारी अथवा एखाद्या जहाजाचा कप्तान यांच्याशी भागीदारी करावी लागे. खूप मोठे अंतर, जलप्रवासाला लागणारा दीर्घ काळ आणि सतत बदलणारी राजकीय व आर्थिक परिस्थिती यांमुळे जहाजांच्या कप्तानांना भरपूर निर्णयस्वातंत्र्य असलेले भागीदार किंवा प्रतिनिधी समजावे लागत असे. त्यावेळच्या बहुतेक व्यापारी उलाढाली तदर्थ स्वरूपाच्या संयुक्त भांडवल भागीदारीच्या असत. कंपनीच्या नोकरांचे खासगी हितसंबंध आणि कंपनीचे हितसंबंध यांमध्ये संघर्ष निर्माण होई. जहाजांमध्ये माल भरण्या-साठी विशेषाधिकाराने प्राप्त झालेल्या जागेत वाढ करून घेणे, कंपनीच्या जहाजांत वाजवीपेक्षा जास्त माल भरणे, एखाद्या केंद्रात उपलब्ध असलेल्या आर्थिक साधनसंपत्तीचा उपयोग कंपनी-साठी गुंतवणूक करण्याऐवजी तिचा ओघ खासगी व्यापाराला भांडवलपुरवठा करण्याकडे वळ-विणे, परवानाधारक नसलेल्या अथवा अनधिकृतपणे व्यापार करणाऱ्या लोकांच्या व्यवहारांकडे दुर्लक्ष करणे, इतर युरोपीय लोकांच्या सेवांना अधिक पसंती देणे, इत्यादि घटनांतून हा संघर्ष निर्माण होई.

१७५० पूर्वी भारतातील कंपनीचे नोकर प्रामुख्याने व्यापारी असत. त्यांना थोडा फार राजनैतिक दर्जाही प्राप्त असे; आणि भारतीय राजेरजवाडे व सरदार यांच्याशी व्यवहार करण्या-साठी लागणारे संबंधही त्यांनी निर्माण केलेले असत. शिवाय प्रमुख वसाहतींमध्ये त्यांनी अनेक प्रशासकीय कर्तव्ये पार पाडण्यासही सुरुवात केलेली होती. तथापि, ते मुख्यतः व्यापारीच असत. इंग्लंडहून आलेला माल जास्तीत जास्त किफायतशीर भावाने भारतीय व्यापाऱ्यांना विकणे आणि उपलब्ध साधन-संपत्तीचा वापर करून आवश्यक तो भारतीय माल, विशेषतः सर्व केंद्रां-मध्ये मुख्य समजल्या जाणाऱ्या कापडासारख्या विक्रेय वस्तू प्राप्त करणे यांवरच ते आपले लक्ष केंद्रित करीत असत.[५०]

सुरुवातीपासून कंपनीच्या नोकरांना खासगी व्यवसाय करण्याची परवानगी देण्यात आलेली होती; इतकेच नव्हे तर व्यापारासाठी जाणाऱ्या जहाजांमध्ये त्यांच्या मालासाठी जागा राखून ठेवणे यांसारखे काही विशेषाधिकारही त्यांना बहाल करण्यात आले होते. या सर्व नोकरांना त्यांच्यावरील जबाबदाऱ्या व त्यांना सोसावा लागणारा त्रास यांच्या मानाने फारच कमी पगार दिला जाई. त्यामुळे त्यांनी स्वतःचा खासगी व्यापार चालविल्यास त्यातून त्यांना स्वतःची भर-भराट करून घेता आली नाही तरी आपल्या निर्वाहापुरते धन मिळविता यावे, अशी दृष्टी त्यात होती. हा खासगी व्यवसाय मुख्यतः फक्त दोन प्रकारचा असे:– जहाजामध्ये त्यांना कंपनीकडून मिळणाऱ्या जागेशी संबंधित व्यवसाय; आणि किनारपट्टीवरील अथवा देशी व्यापारामध्ये

---

५०. कंपनीच्या व्यापाऱ्यांनी आणलेल्या सुती कापडाची प्रतवारी लावण्याच्या कामात, लाँगहॉर्नच्या काळा-मध्ये, इतर मुलकी नोकरांबरोबर कंपनीच्या मंडळा (कौन्सिल) चे सभासदही भाग घेत असत. हे काम इतके कंटाळवाणे व अप्रिय होते की ते योग्य प्रकारे पार पाडण्यासाठी मॅके याला खास हुकूम काढावे लागले...पाहा: '**व्हेस्टिजेस ऑफ ओल्ड मद्रास**', सं. लव्ह, खंड २, पृ. २४८.

स्वतःच्या जबाबदारीवर भाग घेऊन त्यांनी केलेला व्यवसाय. मुलकी किंवा लष्करी मालाच्या पुरवठयातून किंवा भारतीय राज्यकर्त्यांना भांडवल पुरविण्याच्या अथवा त्यांच्याशी इतर प्रकारचा व्यवसाय करण्याच्या उलाढालीतून भरपूर नफा कमावण्याची संधी १७५० नंतरच मिळू लागली. सुरुवातीच्या काळात ती जवळजवळ नव्हतीच असे म्हणण्यास हरकत नाही.

या वैशिष्टयपूर्ण परिस्थितीमुळे परवानाधारक खासगी व्यापारी आणि परवाना नसलेले परंतु ज्यांच्या व्यवहारांकडे कानाडोळा केला जात असे, ते देशी व्यापार करणाऱ्या जहाजांचे कप्तान व मालक यांचा कंपनीच्या सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांशी अनेक संयुक्त व्यापारी व्यवहारांमध्ये घनिष्ठ संबंध होता. एका अर्थाने असे म्हणता येईल की युरोपीय राष्ट्रांचा विशेषतः ब्रिटिशांचा एकूण व्यापार हा अशा प्रकारे किनारपट्टीच्या व देशी व्यापाराच्या विकासाशी अप्रत्यक्षपणे निगडित होता. या किनारपट्टीच्या व देशी व्यापारामध्ये प्रमुख कंपन्या फारशा गुंतलेल्या नव्हत्या. या व्यापारापासून कंपनीला मिळणारा प्रत्यक्ष फायदा फारसा नव्हता; आणि त्या व्यापारामुळे कंपनीचे हितसंबंध व कंपनीच्या नोकरांचे खासगी हितसंबंध यांच्यांत संघर्ष निर्माण होईल अशी परिस्थिती उत्पन्न होत होती (आणि त्या संघर्षात कंपनीच्या हितसंबंधांना जवळजवळ अपरिहार्यपणे धक्का पोचत होता), तरी देखील देशी व्यापारात झालेल्या उल्लेखनीय वाढीचा एकूण परिणाम म्हणून त्या त्या युरोपीय राष्ट्राच्या व त्याच्या नागरिकांच्या आर्थिक व राजकीय स्थानाला अधिक बळकटी प्राप्त झाली आणि त्या योगे कंपनीचे सामर्थ्य व नफा यांमध्ये अप्रत्यक्षपणे भरच पडली.

अगदी सुरुवातीच्या काळापासून युरोपीय लोकांनी भारतातील व्यापारासाठी भारतीय दलालांचा उपयोग करून घेतला होता. [५१] मोरलँड यांनी असे नमूद केले आहे की, युरोपीय कारखान्यांच्या जुन्या कागदपत्रांत सामान्य व्यापाऱ्यांपेक्षा दलालांना अधिक महत्त्व दिले गेले होते आणि त्यांचा उपयोग करून घेण्याची प्रथा सार्वत्रिक होती. व्यापारी व दलाल यांच्यातील विभाजन रेषा म्हणजे भांडवलाचे स्वामित्व ही होती, असे त्यांनी गृहीत धरले आहे. [५२] सुरतेच्या कागदपत्रांत कंपनीच्या दलालांचा वारंवार उल्लेख येतो; परंतु या दलालांचा ठराविक किंवा कायमचा असा मर्यादित गट असावा असे दिसत नाही. सुरतेचे युरोपीय लोक अनेक व्यापाऱ्यांशी प्रत्यक्षपणेही व्यवहार करीत; आणि पैशाच्या तजविजीसाठी त्यांना मोठया भारतीय पेढ्यांचा आधार घ्यावा लागे. प्रारंभीच्या काळात सुरतेमध्ये या व्यवहाराचे जे स्वरूप विकसित झाले ते भारतीय व्यापारी जमातींची भरपूर संख्या असणाऱ्या मोठया व्यापारी केंद्रांमध्ये देशी राजांच्या संरक्षणाखाली कार्य करणाऱ्या युरोपीय लोकांच्या परिस्थितीला अनुरूप असे होते.

जेव्हा युरोपीय लोकांनी आपल्या स्वतःच्या वसाहती स्थापन केल्या, आणि विशेषतः कालांतराने जेव्हा भारतीय व्यापाऱ्यांना इंग्रजांच्या वसाहतीत जाऊन वसती करणे फायद्याचे आहे असे आढळून आले आणि त्यांना ब्रिटिश राजाची प्रजा म्हणून वागविण्यात येऊ लागले तेव्हा ही परिस्थिती बदलली असे दिसते. मद्रास, कलकत्ता व मुंबई यांसारख्या वसाहतींमध्ये

---

५१ "मालखरेदी आणि कंपनीच्या मालाची अधिक किफायतशीर विक्री यांसाठी दलालांची नेमणूक करण्यात आली आहे. हे लोक बनिया जातीचे असून भारतातील विक्रेय वस्तूंचे दर व किमती यांच्या बाबतीत ते चांगले जाणकार आहेत. या कामी ते जी काळजी व तसदी घेतात त्याबद्दल त्यांना तीन टक्के दलाली दिली जाते." जे. ओव्हिंग्टन, 'ए व्हॉयेज टु सूरत इन दि ईयर १६८९' (सं. रॉलिन्सन), १९२९, पृ. २३३.

५२. मोरलँड, पूर्वोक्त, पृ. १५७-१५८.

राहणारे व्यापारी कंपनीच्या आधिपत्याखाली आले व त्या नात्याने कंपनीचे त्यांच्याशी व्यवहार सुरू झाले. त्यानंतर त्यांच्याशी होणाऱ्या व्यवहारांचे स्वरूप दलालीचे न राहाता अमुक एका कालखंडात पूर्ण करावयाच्या उलाढालीचे निश्चित करार असे झाले असावे, असे दिसते.

मद्रासच्या जुन्या कागदपत्रांवरून असे दिसून येते की तेथील फोर्ट सेंट जॉर्जच्या जवळ-जवळ सुरुवातीपासून 'कंपनीचे व्यापारी' असे संबोधिल्या जाणाऱ्या भारतीयांची एक जमात अस्तित्वात होती. ही जमात म्हणजे वैयक्तिकरीत्या अत्यल्प प्रमाणात भाग धारण करणाऱ्या भागधारकांची एक प्रकारची कायमची संयुक्त भागीदारी होती. अर्थात् या जमातीच्या घटकां-मध्ये वेळोवेळी बदल होत गेले; परंतु एक-दोनदा पडलेला अल्पकालीन खंड सोडल्यास १७७१ साली हेस्टिंग्जने ही संस्था बरखास्त करून टाकीपर्यंत तिचे मध्यवर्ती स्वरूप कायम राहिले.[५३] व्यापाऱ्यांच्या या संस्थेशी भारतात आयात केलेल्या मालाची विक्री व भारतातून निर्यात करावयाच्या मालाची खरेदी असे दोन्ही प्रकारचे व्यवहार कंपनी करीत असे. मद्रासला विशिष्ट कालखंडात आयात केलेला माल (उदाहरणार्थ, लोकरीचे कापड) विशिष्ट किमतीला विकत घेण्याचे आणि सुती कापडाच्या गाठी ठरलेल्या दराने कंपनीला पुरविण्याचे असे वेगवेगळे करार करण्यास 'कंपनीच्या व्यापाऱ्यांनी' मान्यता दिली होती. या करारापोटी व्यापाऱ्यांना काही आगाऊ रकमा मिळाल्या असाव्यात असे दिसते. परंतु स्थूलमानाने या उलाढालींसाठी लागणारे भांडवल प्रारंभी कंपनीच्या भारतीय व्यापाऱ्यांनीच उभे केले होते.[५४] कंपनीला तिच्या गुंतव-णुकीसाठी किंवा इतर कामांसाठी तिच्या भारतीय व्यापाऱ्यांकडून फार मोठ्या रकमा कर्जाऊ दिल्या जाऊ शकतील अशी त्यांची आर्थिक स्थिती असेल असे वाटत नाही. मद्रासमध्ये कंपनीला मिळालेल्या कर्जासंबंधी जे कागदपत्र उपलब्ध आहेत त्यांवरून ब्रिटिश, पोर्तुगीज किंवा आर्मीनियन व्यापाऱ्यांकडून तिला कर्ज मिळाल्याचे आढळून येते. त्यांमध्ये भारतीय व्यापाऱ्यांचा उल्लेख सापडत नाही.

कलकत्त्यामध्ये ही पद्धत काहीशी वेगळी असावी असे दिसते. तेथे विशिष्ट व्यापाऱ्यांशी विशिष्ट काळासाठी विशिष्ट वस्तूंचा अमुक इतक्या प्रमाणात पुरवठा अथवा विक्री करण्याचे निश्चित करार कंपनी करीत असे. सर्व व्यापाऱ्यांना मिळून दादनी व्यापारी असे म्हणत असत; परंतु त्यांच्याशी करावयाचे करार मात्र सामुदायिक स्वरूपात न करिता प्रत्येक व्यापाऱ्याशी स्वतंत्र करार केला जाई.[५५] या करारांमध्ये आयात केलेल्या कापडाची विक्री व कंपनीला हव्या असलेल्या हातमागाचे कापड, सोरामीठ इत्यादि वस्तूंचा पुरवठा यांचा समावेश असे. मद्रास-

---

५३. 'व्हेस्टिजेस ऑफ ओल्ड मद्रास' सं. लॅव्ह, खंड ३, पृ. १० – ११.

५४. पाहा : 'मद्रास इन दि ओल्डन टाइम' (सं. व्हीलर) खंड २, पृ. ४२८–४३०. यांमध्ये दिलेल्या एका कराराची प्रत.

५५. " स्थानिक व्यापाऱ्यांशी करार केले जात. करारातील रकमेपैकी काही भाग (सामान्यत: ७० ते ७५ टक्के भाग) आगाऊ दिला जात असे. याला दादनी असे म्हणत. या व्यापाऱ्यांना दादनी व्यापारी असे म्हणत. हे व्यापारी दिलेल्या मुदतीत व ठरलेल्या दराने कंपनीला तिच्या प्रमुख वसाहतींमध्ये माल नेऊन पोचविण्याचे करार करीत. त्यांनी करार पूर्ण केला नाही तर त्यांना दंड द्यावा लागे. त्यांनी किंवा त्यांच्या प्रतिनिधींनी गैर व्यवहार केल्यास स्थानिक कायद्याप्रमाणे त्यांच्यावर इलाज करिता येत असे." राय यांच्या पूर्वोक्त ग्रंथात पृ. १४४ – ४५ वर उद्धृत. ज्यावेळी अशा प्रकारे आगाऊ रकमा देण्याइतका पैसा कंपनीजवळ नसे त्यावेळी त्या रकमांवर त्यांना व्याज द्यावे लागे. पाहा : एन्. के. सिन्हा, 'एकॉनॉमिक हिस्ट्री ऑफ बेंगाल,' (१९५६), विशेषत: पृ. ३०–३१.

प्रमाणे दादनी व्यापाऱ्यांमध्ये केवळ स्थानिक व्यापारीच नसत तर बिहार व बंगाल येथील काही अत्यंत धनाढ्य व्यापाऱ्यांचाही त्यांत समावेश असे. त्यामुळे जगत शेठांसारख्या ज्या पेढ्यांकडून युरोपीय कंपन्यांना प्रामुख्याने भांडवल पुरवठा होत असे त्यांच्या व्यतिरिक्त हे धनाढ्य व्यापारी कंपनीला कर्जेही देऊ शकत असत.

१७५० पूर्वीच्या मद्रास संबंधीच्या कागदपत्रांवरून कंपनीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी नोकरीस ठेवलेल्या भारतीय नोकरांचे सामर्थ्य वाढत होते असे दिसते. मद्रासच्या अध्यक्षांच्या दुभाष्यांनी जबरीने पैसा वसूल केल्याची जी हकीगत नमूद आहे तिच्यावरून ही गोष्ट स्पष्ट दिसून येते.[५६] तथापि त्या काळात कंपनीच्या ताब्यातील प्रदेशांची संख्या मर्यादित होती आणि भारतीय व्यापाऱ्यांवर त्यांची निरंकुश सत्ता नव्हती. अशा परिस्थितीत अशा प्रकारच्या गैरवर्तनाने फारसे काही साधले जाण्याची शक्यता नव्हती. शिवाय,साधन संपत्ती वगैरेंच्या बाबतीत कंपनीचे वर्चस्व प्रचंड स्वरूपाचे नव्हते. विशेषतः बंगालमध्ये व पश्चिम भारतात कंपनीजवळ जी साधनसंपत्ती होती आणि जे व्यवहार ती करीत होती त्यांच्या द्वारे बड्या भारतीय व्यापाऱ्यांपेक्षा फार वरचे स्थान प्राप्त करणे तिला शक्य नव्हते.

अठराव्या शतकाच्या मध्यापर्यंत भारतीय राज्यकर्त्यांशी युरोपीय लोकांचा संपर्क फार मर्यादित होता. युरोपीय लोकांच्या दृष्टीने अशा प्रकारच्या संपर्काचा प्रारंभिक उद्देश अर्थातच वसाहतीशी संबंधित विशेषाधिकार मिळविणे आणि करांच्या बाबतीत, विशेषतः जकाती व उत्पादनशुल्क यांमध्ये सवलती प्राप्त करणे हा होता. अशा प्रकारच्या सवलतींच्या बाबतीत युरोपीय लोकांना रास्त वागणूक मिळविण्यात सामान्यतः फारशी अडचण येत नसे. जेव्हा युरोपीय लोकांनी आपल्या स्वतःच्या मालकीच्या वसाहती निर्माण करण्याचे ठरविले तेव्हाही त्यांना भारतीय राजांकडून जमिनीच्या देणग्या मिळाल्या; आणि त्यांच्या वसाहतींमध्ये राजकीय स्वातंत्र्य नसले तरी स्वायत्त शासनाचा दर्जा त्यांना प्राप्त झाला. परंतु त्यानेही ते देशाच्या प्रचलित प्रशासकीय व राजकीय जीवनाच्या निकट संपर्कात प्रत्यक्षपणे आले नाहीत. तथापि, अशांततेच्या काळांत, आपल्या भोवती जे काही घडत होते त्याच्याकडे पूर्णपणे दुर्लक्ष करणे त्यांना शक्य नव्हते. ज्या शहरांमध्ये त्यांचे कारखाने होते त्या शहरांवर बाहेरून हल्ला होण्याची शक्यता असे आणि मग शक्य असल्यास आपल्या कारखान्यांचे संरक्षण करण्याची आवश्यकताही त्यांना भासत असे. जेथे स्वतंत्र वसाहती होत्या तेथे ही आवश्यकता अधिक तीव्रतेने निर्माण होत असण्याची शक्यता आहे. आपल्या वसाहतींच्या सभोवती असणाऱ्या प्रदेशात अशांतता अथवा युद्ध चालू असल्यास त्यापासून अलिप्त राहाणे त्यांना कठिण जात असले पाहिजे. अशा स्थितीत जेथे शक्य असेल तेथे स्वतःच्या सामर्थ्यावर आपला बचाव करण्याचा प्रयत्न ते करीत असले पाहिजेत. त्यासाठी आपल्या जागेची तटबंदी करणे किंवा तिच्या सभोवार खंदक खणणे यांसारख्या बचावात्मक उपाययोजनांचा वापर ते करीत असले पाहिजेत. हे करण्यापूर्वी स्थानिक राजाकडून औपचारिक परवानगी मिळविणेही त्यांना शक्य होत नसेल. अशा वेळीच भारतीय राज्यकर्ते व भारताचे राजकीय जीवन यांच्या संपर्कात येणे त्यांना अटळ होत असले पाहिजे.

आणखी एका बाबतीत त्यांचा सुरुवातीपासून खास संबंध येत होता. ती म्हणजे समुद्रपर्यटन आणि सागरी व्यापार व दळणवळण यांचे संरक्षण ही होय. समुद्रपर्यटन करणाऱ्या युरोपीय

---

५६. पाहा, 'मद्रास इन दि ओल्डन टाइम्स', (सं. व्हीलर) प्रकरणे, ३२, ३८ व ३९.

जहाजांचे श्रेष्ठत्व अनेक शतकांपासून प्रस्थापित झालेले होते. अरबांविरुद्ध पोर्तुगिजांनी केलेल्या उपाययोजना आणि आपल्या जहाजांना भारताला जाण्याचा व तेथे व्यापार करण्याचा हक्क आहे हे शाबित करण्यासाठी इंग्रज व डच लोकांनी पोर्तुगीजांशी केलेल्या लढाया यांमुळे त्यांचे हे स्थान पूर्णपणे प्रस्थापित झाले होते. या प्रक्रियेतून भारतीय नौकानयनात अडचणीही निर्माण झालेल्या होत्या. भारतीय नौकानयन दुबळे असल्यामुळे त्याला नेहमीच युरोपीय लोकांची धास्ती वाटे. शिवाय समुद्रातील चाचेगिरीला आळा घालण्यास भारतीय राज्यकर्तेच समर्थ नसल्यामुळे भारतीय जहाजांना चाच्यांच्या हल्ल्यांचीही भीती सदैव वाटे. त्यामुळे युरोपीय लोकांनी मुगल बादशाहाकडे जेव्हा विशेषाधिकारांची मागणी केली तेव्हा त्यांना काही जबाबदाऱ्याही स्वीकारणे भाग पडले. उदाहरणार्थ, सुरतेतील इंग्रज, फ्रेंच व डच वसाहतकारांना एका सुरक्षा करारावर सह्या करण्यास भाग पाडण्यात आले होते. या करारानुसार पश्चिम समुद्रात चाच्यांकडून होणाऱ्या लूटमारीमध्ये मुगल साम्राज्याच्या प्रजाजनांचे जे काही नुकसान होईल ते भरून देण्याची जबाबदारी या वसाहतकारांवर टाकण्यात आलेली होती.[१७]

सतराव्या शतकाच्या शेवटच्या चतुर्थांशात मुगल सम्राटाविरुद्ध लढाई करण्याचा ब्रिटिशांनी जो निष्फळ प्रयत्न केला होता तो या सागरी सामर्थ्यावर आधारलेला होता. आणि अठराव्या शतकाच्या प्रारंभापूर्वी देखील सागरी व्यापार व सामर्थ्य यांच्या बाबतीतील युरोपीय लोकांच्या खास जबाबदाऱ्यांमध्ये उघड उघड राजकीय हेतू होते. मुंबईला ब्रिटिशांनी आंग्र्यांविरुद्ध जी आरमारी चढाई केली होती ती फ्रेंच व ब्रिटिश लोकांनी कर्नाटकातील युद्धांमध्ये हस्तक्षेप करण्यास सुरुवात करण्याच्या पूर्वीची घटना आहे. तथापि या हस्तक्षेपाच्या प्रसंगानेच खरोखरी युरोपीय लोक व भारतीय सत्ताधारी यांच्यांतील राजकीय संबंध पूर्णपणे बदलून टाकले आणि परिणामतः भारत–युरोपीय संबंधांचे सारे स्वरूपच पालटले.

## अभ्यासवाङ्मय सूची


'अॅडमिनिस्ट्रेटिव्ह सिस्टिम ऑफ दि मराठाज',–युनिव्हर्सिटी ऑफ कलकत्ता, १९२५.

'आज्ञापत्र', प्राचार्य पांढरीपांडे व प्रा. कोलते यांच्या प्रस्तावनेसह. नागपूर, बाबूराव चिमोटे, १९३९.

अप्पादोराई, ए. 'एकॉनॉमिक कंडिशन्स इन सदर्न इंडिया, इ. स. १००० ते १५००', मद्रास, युनिव्हर्सिटी ऑफ मद्रास, १९३६.

भट्टाचार्य जे. एन्., 'हिंदू कास्ट्स अँड सेक्ट्स', कलकत्ता, १८९६.

बुकनन, डी. एच्. 'डेव्हलपमेंट ऑफ कॅपिटॅलिस्ट एन्टरप्राइज इन इंडिया', न्यूयार्क, मॅकमिलन कं., १९३४.

बुकनन फॅन्सिस, 'ए जर्नी फ्रॉम मद्रास थ्रू दि कंट्रीज ऑफ मैसोर, कॅनरा अँड मलबार', लंडन, टी. कॅडेल अँड डब्ल्यू. डेव्हिस अँड ब्लॅक, पॅरी अँड किंग्जबरी, १८०७.

बर्नेस, जे., 'नॅरॅटिव्ह ऑफ ए व्हिजिट टु कोर्ट ऑफ सिंध'. कच्छच्या इतिहासाची रूपरेषा व एक परिशिष्ट यांसह. परिशिष्ट क्र. २ चे लेखक सर अलेक्झांडर बर्नेस. यात सिंधू नदीपर्यंत


---

[१७] पाहा : हंटर पूर्वोक्त, खंड २, पृ. ३५५.

होणारा व्यापार आणि तिच्यातून होणारे नौकानयन यासंबंधी व्यावहारिक टिपणे आहेत. परिशिष्ट क्र. ३ चे लेखक सर अलेक्झांडर बर्नेस हेच असून त्यात शिकारपूर व अपर सिंध येथील व्यापाराची माहिती आहे. एडिंबरो, जॉन स्टार्क, १८३९.

चापेकर, ना. गो. 'पेशवाईच्या सावलीत', पुणे, ल. ना. चापेकर, १९३७.

डॉडवेल, एच्. 'डुप्ले अँड क्लाइव्ह', दि बिगिनिंग ऑफ एम्पायर', लंडन, मेथुएन अँड. कं., १९२०.

फॉस्टर, विल्यम, 'इंग्लिश फॅक्टरीज इन इंडिया (१६४६–१६५०)', लंडन, क्लॅरेंडन प्रेस, १९१४.

फर्बर, हॉल्डेन, 'जॉन कंपनी अँट वर्क', केंब्रिज, मॅसेच्युसेट्स, हार्वर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, १९४८.

गाडगीळ, ध. रा. 'पूना: ए सोशियो-एकॉनॉमिक सर्व्हे', पुणे, गोखले अर्थशास्त्र संस्था, १९५२.

गॅझेटियर ऑफ बॉम्बे सिटी, गव्हर्नमेंट ऑफ बॉम्बे, १९०९.

गॅझेटियर ऑफ दि बॉम्बे प्रेसिडेन्सी, खंडायतची आकडेवार माहिती. गव्हर्नमेंट ऑफ बॉम्बे, १८७७.

गॅझेटियर ऑफ दि बॉम्बे प्रेसिडेन्सी, खंड ४ (अहमदाबाद गॅझेटियर), गव्हर्नमेंट ऑफ बॉम्बे, १८७९.

ग्लॅमन, के. 'डच-एशियाटिक ट्रेड (१६२० ते १७४०)', दि हेग, मार्टिनस निजॉफ, १९५८.

हंटर, डब्ल्यू. डब्ल्यू. 'हिस्ट्री ऑफ ब्रिटिश इंडिया, खंड २', लंडन, लाँगमन्स ग्रीन अँड कं., १८९९.

बालकृष्ण, 'कमर्शियल रिलेशन्स बिट्वीन इंडिया अँड इंग्लंड (१६०१–१७५७)', लंडन, जॉर्ज रूटलेज अँड सन्स, १९२३.

लव्ह, एच्. डी. (संपादक) 'व्हेस्टिजेस ऑफ ओल्ड मद्रास', ३ खंड, लंडन, जॉन मुरे, १९०५.

मोरलँड, डब्ल्यू. एच्. 'दि अँग्रेरियन सिस्टिम ऑफ मुस्लिम इंडिया', केंब्रिज, डब्ल्यू. हेफर, १९२५.

मोरलँड, डब्ल्यू. एच्. 'फ्रॉम अकबर टु औरंगजेब', लंडन, मॅकमिलन अँड कं. (विशेषत: प्रकरण ७).

ओव्हिंग्टन, जे. 'ए व्हॉएज टु सूरत इन दि ईयर १६८९', संपादक: एच्. जी. रॉलिन्सन, लंडन, ऑक्सफोर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, १९२९.

पेलाझार्ट, एफ्. 'जहांगीरर्स इंडिया', अनुवादक: डब्ल्यू. एच्. मोरलँड, केंब्रिज: डब्ल्यू. हेफर, १९२५.

राय, एम्. एन्. 'अॅनाल्स ऑफ दि अर्ली इंग्लिश सेटलमेंट्स इन बिहार', कलकत्ता, कमला बुक डेपो, १९२७.

रेनेल, जेम्स. 'मेमॉयर ऑफ ए मॅप ऑफ हिंदुस्तान ऑर दि मोगल एम्पायर', लेखका-साठी छापून विक्री करणारे जॉर्ज निकोल, लंडन, १७८८.

रसेल, आर. व्ही. आणि हिरालाल, 'ट्राइब्स अँड कास्ट्स ऑफ सेंट्रल प्रॉव्हिन्सेस,' खंड २, लंडन, मॅकमिलन कं., १९१६.

सरकार, यदुनाथ, 'मोगल अॅडमिनिस्ट्रेशन', कलकत्ता, एम्. सी. सरकार अँड सन्स, १९२४ दुसरी आवृत्ती.

'पेशवे दप्तरांतून निवडलेले कागद' (खंड ४५), मुंबई सरकार, १९३४ (लेखांक ४८).

'बाळाजी बाजीराव पेशवे यांची रोजनिशी', खंड २, मुंबई सरकार, १९३०.

शाह, गो. गो. 'पूनाना श्री वारनात महाजननो इतिहास', पुणे, १९५६.

सिन्हा, एच्. 'अर्ली युरोपियन बँकिंग इन इंडिया', लंडन, मॅकमिलन कं., १९२६. (यामधील सीर मुताखिरीन, कॅब्रेची आवृत्ती, खंड २ यातील अवतरणे).

सिन्हा, एन्. के. 'एकॉनॉमिक हिस्ट्री ऑफ बेंगाल', कलकत्ता, दासगुप्ता अँड कं., १९५६.

थॉर्नटन, ई. 'ए गॅझेटियर ऑफ दि टेरिटरीज अंडर दि गव्हर्नमेंट ऑफ दि ईस्ट इंडिया कंपनी अँड ऑफ दि नेटिव्ह स्टेट्स ऑन दि कॉंटिनंट ऑफ इंडिया', ऑनरेबल कोर्ट ऑफ डिरेक्टर्स यांच्या परवानगीने आणि मुख्यतः त्यांच्या ताब्यातील कागदपत्रांवरून एडवर्ड थॉर्नटन यांनी चार खंडांमध्ये संकलित केलेले. लंडन, डब्ल्यू. एच्. अॅलन अँड कं., १८५४.

'ट्रेड गिल्ड्स इन इंडिया', मॉडर्न रिव्ह्यू, मार्च १९११.

व्हान ल्यूर, जे. सी. 'इंडोनेशियन ट्रेड अँड सोसायटी', दि हेग, डब्ल्यू. व्हान होव्ह, १९५५.

व्हीलर, जे. टी. (संपादक), 'मद्रास इन दि ओल्डन टाइम्स', मद्रास, जे. हिगिनबॉथम, १८६१, तीन खंड.

# मुगलकालीन अर्थव्यवस्थेतील भांडवलशाही विकासाच्या संभाव्यता

इरफान हबीब

ब्रिटिशांनी भारतावर ताबा मिळविण्यापूर्वी किंवा त्यानंतर या देशात औद्योगीकरण (आणि भांडवलशाही अर्थव्यवस्थेचा विकास) का घडून आले नाही, हा प्रश्न जेव्हा आपण स्वतःला विचारतो तेव्हा आपण एका जुन्या व सोवळया वादविवादाच्या गाभ्याला स्पर्श करतो. एकेकाळी ब्रिटिश साम्राज्याचे समर्थक व विरोधक यांच्यांत हा वाद माजला होता. ब्रिटिश राजवटीच्या समर्थकांच्या मते, सामान्यतः असे आढळून येई की, याचा दोष भारतीय समाजातील काही अंगभूत दौर्बल्यांकडे जातो. 'निरुत्साहकारक हवामाना' चा परिणाम, 'पौर्वात्य निरंकुशते' चा वारसा, आणि वारंवार माजणारी अराजकता (जिच्यामुळे भांडवलाचा संचय व गुंतवणूक यांना अटकाव होत असे), जुनाट तंत्रे व अज्ञान, जातिव्यवस्थेचा साचेबंदपणा, प्रवृत्तीऐवजी निवृत्तीकडे असणारा कल, या सर्व कारणांमुळे अशी परिस्थिती निर्माण झाली की जिच्यामध्ये जेमतेम तग धरून राहणाऱ्या अर्थव्यवस्थेखेरीज दुसरी अर्थव्यवस्था कार्यंच करू शकत नव्हती. अशा हलाखीच्या परिस्थितीत प्रारंभ करून, कितीही धडपड केली तरी, भारतीय अर्थव्यवस्थेला युरोपीय पातळीवर नेणे ब्रिटिशांना शक्य नव्हते. साम्राज्यवादाच्या टीकाकारांनी या परिस्थितीकडे वेगळ्या दृष्टिकोणातून पाहिले. त्यांनी असे आग्रहाने प्रतिपादिले की ब्रिटिश सत्तेच्या आगमनापूर्वी विद्यमान असलेल्या भारतीय अर्थव्यवस्थेच्या जुनाट स्वरूपावर गैरवाजवी भर देण्यात काही अर्थ नाही; आणि त्यांनी भारताच्या मागासलेपणाचा दोष प्रामुख्याने ब्रिटिश सत्तेच्या मुस्कटदाबी करणाऱ्या धोरणावर, 'देशातील संपत्तीच्या बाहेर जाणाऱ्या लोंढया' वर, हस्तव्यवसायांच्या विनाशावर, असह्य करांवर आणि भारतीय उद्योग व भांडवल यांच्या बाबतीत केल्या जाणाऱ्या भेदभावावर लादला. अशा प्रकारे या वादामध्ये आधुनिक भारताच्या आर्थिक इतिहासाचे अनेक महत्त्वाचे पैलू गुंतलेले असले तरी काही अंशाने का होईना, हा वाद ब्रिटिश सत्तेपूर्वीच्या भारतीय अर्थव्यवस्थेतील विकासाच्या संभाव्यतांवर केंद्रित झालेला होता.[1]

बराच काळपर्यंत या विशिष्ट विषयासंबंधी फारच थोडी माहिती उपलब्ध होती. यासंबंधी अधिक व्यापक प्रमाणावरील वादविवादाला चालना मिळाल्यानंतर डब्ल्यू. एच्. मोरलँड व ब्रिजनारायण यांच्यासारख्या विद्वानांनी मुख्यतः समकालीन पुराव्याच्या आधारे मुगलकालीन

१. या जुन्या वादातील महत्त्वाचे मुद्दे नीट समजण्याच्या दृष्टीने अलीकडेच मॉरिस डी. मॉरिस यांनी 'जर्नल ऑफ एकॉनॉमिक हिस्ट्री', वर्ष २३, अंक ४ (१९६३) या अंकात (पृ. ६०६-६१८) लिहिलेल्या 'टोवर्ड्स ए रिइंटरप्रिटेशन ऑफ नाइन्टीन्थ सेंचरी इंडियन एकॉनॉमिक हिस्टरी' या लेखामध्ये साम्राज्यवादाची बाजू मांडल्यामुळे निर्माण झालेली चर्चा पाहावी. या लेखावर तोरु मात्सुई, विपिन चंद्र, आणि टी. रायचौधुरी यांनी 'इंडियन एकॉनॉमिक अँड सोशल हिस्टरी रिव्ह्यू' (यापुढे या नियतकालिकाचा उल्लेख 'इएसोहिरि' असा करण्यात आला आहे.) वर्ष ५, अंक १ (१९६८) या अंकात (पृ. १ ते १००) टीका केली आहे. या अंकात मॉरिस यांच्या लेखाचेही पुनर्मुद्रण करण्यात आले आहे.

भारताच्या अर्थव्यवस्थेचे अध्ययन व विश्लेषण करण्याचा प्रयत्न केला.[२] त्यामुळे या दिशेने पुष्कळच प्रगती होऊ शकली आहे. त्या वेळपर्यंत जी अनेक सर्वसामान्य विधाने खरी मानली जात होती ती अजूनही अधूनमधून विद्वानांच्या लिखाणांमधून दृष्टोत्पत्तीस येतात ही गोष्ट अलाहिदा. त्यानंतर या संबंधीच्या आपल्या ज्ञानात पुष्कळच भर पडली आहे. तथापि दुर्दैवाने आपल्या माहितीमध्ये बऱ्याच मोठ्या उणीवा अजून राहून गेल्या आहेत; आणि अनेक महत्त्वाच्या पैलूं-संबंधीची आपल्याजवळील आधारसामग्री (data) ही अत्यंत अपुरी आहे. तरीपण आपल्या जवळच्या पुराव्याच्या मर्यादा लक्षात घेऊनही काही सर्वसामान्य विधाने करिता येतील असे वाटते. अशा प्रकारच्या सर्वसामान्य विधानांपैकी अनेक विधाने तात्पुरत्या निष्कर्षांच्या स्वरूपाची किंबहुना अंदाजात्मक ठरण्याची शक्यता असली तरी त्यांमधून निदान मुगलकालीन भारताच्या अर्थव्यवस्थेसंबंधीच्या ज्या समस्या सोडविण्याचा इतिहासकार प्रयत्न करीत आहेत त्या समस्यांचे सूचन तरी निश्चित मिळेल असे वाटते. अगदी काटेकोरपणे सांगावयाचे तर आमच्या या लेखात आम्ही आर्थिक विकासाच्या संभाव्यतांचा विचार करणार नसून मुख्यतः भांडवलशाहीच्या विकासाच्या संभाव्यतांचाच विचार करणार आहोत. तथापि, आजच्या काळातील समाज वगळता इतर सर्व समाजांच्या बाबतीत आधुनिक उद्योगधंद्यांकडे नेणारा एकमेव संभाव्य मार्ग भांडवलशाहीतून असतो असे गृहीत धरणे सयुक्तिक ठरेल. त्यामुळे एखाद्या आधुनिकपूर्व अथवा आधुनिक समाजातील खऱ्या भांडवलशाही संबंधांचे त्या समाजाशी असणारे नैकट्य अथवा दूरत्व ही त्या समाजाच्या विकासक्षमतेची वैध कसोटी असते, असे समजण्यास हरकत नाही. त्यायोगे हे दोन्ही प्रश्न साररूपाने एकच आहेत असे गृहीत धरता येते. त्यामानाने अधिक अवघड प्रश्न हा व्याख्या करण्याचा आहे. भांडवलशाही संबंधांमध्ये कशाचा समावेश होतो? सुसंगती आणि सुस्पष्टता राहण्याच्या दृष्टीने या लेखामध्ये भांडवल व भांडवलशाही या संज्ञांच्या, तसेच काही इतर संज्ञांच्या मार्क्सवादी व्याख्या स्वीकारण्यात आल्या आहेत. त्यामुळे आम्ही भांडवलशाही संबंध हे केवळ पैशाचे अथवा बाजारविषयक संबंध नसून उत्पादनाच्या विशिष्ट पद्धतीवर आधारलेले संबंध असतात, असे गृहीत धरलेले आहे. ज्या उत्पादनपद्धतीत उत्पादक हा त्याच्या अवजारांपासून वेगळा पडलेला असतो, अशी ती पद्धत असते. त्यामुळे या पद्धतीत उत्पादक हा स्वतः रोजंदार श्रमिक असतो तर उत्पादन-साधने, कच्चा माल व तयार माल यांवर रोजगार देणाऱ्याची, भांडवलदाराची मालकी असते. या व्याख्येप्रमाणे औद्योगिक क्रांतीच्या उदयानंतर प्रभावशाली बनलेल्या आर्थिक संघटनेलाच खऱ्या अर्थाने भांडवलशाही अर्थव्यवस्था म्हणता येईल.

जे लोक भांडवलशाहीचा गाभा हा बाजार-अर्थव्यवस्थेत आहे, असे समजतात त्यांचा या व्याख्येला विरोध होईल; आणि युरोपातील भांडवलशाहीचा उदय अठराव्या व एकोणिसाव्या शतकांच्याही आधी झाला असल्याचे ते प्रतिपादन करतील.[३] तथापि, मुगलकालीन भारतीय अर्थव्यवस्थेसंबंधी आमचे स्वतःचे युक्तिवाद काय असतील याचा आभास न देताही असे सुचविता येईल की यंत्रोद्योगाचा विकास झालेला नसताही एखाद्या समाजाजवळ त्याची अशी सुविकसित

---

२. डब्ल्यू. एच्. मोरलँड, 'इंडिया ॲट दि डेथ ऑफ अकबर', (लंडन १९२०) आणि 'अकबर टु औरंगजेब', (१९२३); ब्रिजनारायण, 'इंडियन एकॉनॉमिक लाइफ, पास्ट ॲंड प्रेझेंट', (लाहोर, १९२३).

३. ताडून पाहा: एम्. डॉब, 'स्टडीज इन दि डेव्हलपमेंट ऑफ कॅपिटॅलिझम्', (लंडन, १९४६), पृ. ५-७ या ग्रंथात अशा दृष्टिकोणांचे विवेचन करण्यात आले आहे.

नाणे-अर्थव्यवस्था असण्याची शक्यता असते. म्हणून भांडवलशाहीची (अगदी तंतोतंत नसली तरी) आटोपशीर व्याख्या असणे अधिक बरे. त्याच बरोबर भांडवलशाही विकासाची पूर्व अट म्हणून (त्याचे ते उगमस्थानच असले पाहिजे असे नसले तरी) बाजार-अर्थव्यवस्थेच्या महत्त्वाला योग्य ती मान्यता देण्यात आली पाहिजे;[४] आणि म्हणून मुगलकालीन भारताच्या अर्थव्यवस्थेच्या विविध विभागांमध्ये नाणेसंबंध व उपभोग्य वस्तूंचे उत्पादन यांचे स्वरूप व प्रमाण काय होते याचाही आपल्याला विचार करावा लागेल.

## १

भांडवलशाही म्हणजे भांडवलाची सत्ता. यामध्ये भांडवलाचा संचय अभिप्रेत आहे मात्र हा संचय प्रत्यक्षपणे अथवा अंतिमतः उत्पादनातून किंबहुना अतिरिक्त उत्पादनातून निर्माण होणारा असला पाहिजे. (अतिरिक्त उत्पादन म्हणजे एकूण वट्ट उत्पादन, उणे उत्पादकाच्या उदरनिर्वाहासाठी लागणारा खर्च). ज्यावेळी अतिरिक्त उत्पादन 'प्राथमिक संचय' होऊ शकेल इतकी विशिष्ट किमान पातळी गाठते तेव्हाच भांडवलशाही निर्माण होऊ शकते, असे काही लोक म्हणतील. दर माणशी उत्पादन फारच कमी असेल तर अतिरिक्त उत्पादनाला ती किमान पातळी गाठता येणार नाही; आणि संचयही होऊ शकणार नाही. ब्रिटिश सत्तेच्या आगमनापूर्वी भारतीय अर्थव्यवस्थेची अगदी अशीच परिस्थिती होती, असे खरोखरच काही मंडळींनी नमूद केले आहे.[५] त्यामुळे या प्रश्नाची थोडी चर्चा करणे योग्य होईल.

सर्व व्यावहारिक बाजू विचारात घेता मुगलकालीन भारतामध्ये हा प्रश्न कृषिउत्पादनाच्या पातळीचा प्रश्न असल्याचे दिसून येईल. सतराव्या शतकातील भारतीय शेतीसंबंधी आपल्याला आजच्यापेक्षा कितीतरी अधिक माहिती मिळविली पाहिजे हे खरे असले तरी काही महत्त्वाची तथ्ये आता पुष्कळच सिद्ध झालेली आहेत. पहिली गोष्ट अशी की, त्याकाळी शेतजमिनीची खूप विपुलता होती. मुगल बादशहांच्या काळातील जमिनीसंबंधीची आकडेवारी व इतर भौगोलिक माहिती यांच्या अध्ययनवारून असे दिसते की गंगेच्या खोऱ्याचा मध्य भाग व मध्य भारत यांमध्ये या शतकाच्या प्रारंभी जेवढी जमीन शेतीखाली होती तिच्या सुमारे अर्धी जमीन मुगलांच्या काळात वहितीखाली होती. इतर प्रदेशांमध्ये हेच प्रमाण दोन-तृतीयांशापासून एक-पंचमांशापर्यंत होते.[६] यावरून असा निष्कर्ष काढणे सयुक्तिक ठरेल की १९०० सालाच्या आसपास असणाऱ्या परिस्थितीशी तुलना करिता १६०० साली शेती ही अधिक सुपीक जमिनीपुरतीच मर्यादित होती; तसेच पुष्कळ पडीत जमीन व कुरणे असल्यामुळे अधिक गुरे बाळगणे शक्य होते. (यावरून असे सूचित होते की त्यावेळी केवळ दरमाणशी पशुपालनविषयक उत्पादनच मोठ्या प्रमाणावर होत होते असे नव्हे तर शेतीमध्ये पशुशक्तीचा वापरही अधिक प्रमाणात होत होता); प्रत्येक कुटुंबाची शेतीवाडी त्याकाळी सामान्यतः इष्टतम आकाराच्या जवळपास असावी; आणि

---

४. "ज्या समाजांमध्ये उत्पादनाची भांडवलशाही पद्धत विद्यमान असते त्या समाजांची संपत्ती ही उपभोग्य वस्तूंच्या अत्यधिक संचयाच्या रूपाने प्रकट होत असते."..हे मार्क्सच्या 'कॅपिटल' ग्रंथातील प्रारंभीचे शब्द आहेत. 'कॅपिटल', खंड १, पृ. १. अनुवादक: मूर आणि ॲव्हेलिंज. (पुनर्मुद्रण. संपादक: डोना टोर, लंडन, १९४६). 'कॅपिटल' खंड १, या ग्रंथातील सारे संदर्भ या आवृत्तीतून घेण्यात आहेत.

५. मॉरिस, 'इंएसोहिरि', ५ (१) पृ. ३-७.

६. इ. हबीब, 'ॲग्रेरियन सिस्टिम ऑफ मुगल इंडिया' (मुंबई, १९६३), पृ १-२४ (यापुढील लेखात या पुस्तकाचा उल्लेख 'इ. हबीब' असा करण्यात आला आहे.)

शवटची गोष्ट अशी की दुबार पीक घण्याची अधिक शक्यता त्या काळात असली पाहिजे. त्याच बरोबर १६०० साली जे कृषितंत्र विद्यमान होते ते १९०० साली असणाऱ्या शेतीच्या तंत्राहून फारसे वेगळे नव्हते. अर्थात् १९०० साली एक नवीन महत्त्वाचा घटक अस्तित्वात आलेला होता यात शंका नाही. तो असा की, सिंधूचे खोरे व गांगेय प्रदेशाचा वरचा भाग यांमध्ये ब्रिटिशांनी कालव्याच्या पाटबंधाऱ्यांचे फार मोठे जाळे निर्माण केले होते. असेही म्हणता येईल की, ज्या जमिनी किंवा जे भूप्रदेश विशिष्ट पिकांना अनुकूल होते तेथे ती पिके काढणे आगगाड्यांमुळे सुकर झाले; आणि मका व चहा-कॉफीसारखी मळ्यांतून काढावयाची पिके यांसारख्या काही नव्या पिकांची लागवड एकोणिसाव्या शतकात भरपूर प्रमाणात वाढली. परंतु हे सर्व घटक विचारात घेतले तरी १९०० सालापेक्षा १६०० साली दरमाणशी कृषिउत्पादन कमी असेल असे समजता येणार नाही.[७] तसेच, दर माणशी कृषिउत्पादनक्षमतेच्या बाबतीत मुगलकालीन भारत हा पश्चिम युरोपसह इतर समकालीन देशांशी तुलना करिता मुळीच मागासलेला नव्हता असेही म्हणता येईल.[८]

तथापि, अतिरिक्त उत्पादनाच्या प्रमाणाचे अनुमान काढतांना केवळ उत्पादनाच्या पातळीचाच विचार करावयाचा नसतो. संचयाच्या दृष्टीने प्रत्यक्ष महत्त्वाची बाब उत्पादनाचे परिमाण ही नसून अतिरिक्त उत्पादनाचे परिमाण ही असते. म्हणून उदरनिर्वाहासाठी लागणारा खर्च त्या काळी किती होता याचा विचार करणे महत्त्वाचे ठरते. थंड हवेच्या प्रदेशापेक्षा उष्ण किंवा समशीतोष्ण प्रदेशामध्ये केवळ उदरनिर्वाहासाठी लागणारा खर्च हा कितीतरी कमी असतो हे सिद्ध करण्यासाठी फार मोठा युक्तिवाद करण्याची गरज नाही. खुद्द भारतामध्ये हा निर्वाह-खर्च सगळीकडे सारखा नव्हता; आणि प्रत्यक्षामध्ये जमिनीच्या उत्पादनक्षमतेशी तो बहुधा व्यस्त प्रमाणात राहातो, असे आढळून येईल. उदाहरणार्थ, सतराव्या शतकात उत्तरेकडून दक्षिण भारतात गेलेल्या एका प्रवाशाला असे आढळून आले होते की, दक्षिणेकडे जी प्रचंड व भव्य मंदिरे उभारण्यात आली त्याचे कारण तेथील जमीन अत्यंत सुपीक असून लोकांच्या निर्वाह-विषयक गरजा फारच थोड्या होत्या. (अर्थात् त्याने हे विधान उत्तर भारतातील लोकांच्या तुलनेने केले असले पाहिजे हे उघड आहे). त्यामुळे[९] तेथे उपलब्ध असणारे अतिरिक्त उत्पादन फार मोठे होते. यावरून भारतातील भांडवलशाहीच्या विकासाचा अभाव हा येथील कृषिउत्पा-

---

७. मोरलँड, 'इंडिया अॅट दि डेथ ऑफ अकबर', पृ. १०० – १२४; इ. हबीब, पृ. ३६ – ५७ वर जी विधाने करण्यात आली आहेत त्यांहून मोरलँडचे युक्तिवाद काहीसे भिन्न आहेत.

८. मॉरिस, 'इंएसोहिरि' ५ (१), पृ. ३ – ७, हे परंपरागत भारतीय शेतीच्या 'अल्प उत्पादना'वर एवढा भर का देतात हे माझ्या नीट लक्षात येत नाही. त्यांच्या काही युक्तिवादांमध्ये मनुष्य व जमीन यांचे परस्परप्रमाण अनुकूल असतांना दर एकरी उत्पादन व दर माणशी उत्पादन यांत भेद केल्याचे दिसून येत नाही. उदाहरणार्थ, त्यावेळी वर्षातून दोन पिके घेतली जात असत. त्याला उद्देशून ते 'पिकांचे हंगाम फार अल्प मुदतीचे असतात' असे विधान करतात. त्या संदर्भात हा दोष प्रामुख्याने दिसून येतो. शिवाय एकोणिसाव्या शतकांपूर्वी पश्चिम युरोपापेक्षा भारतामध्ये गव्हासारख्या पिकांच्या बाबतीत बियाणे व उत्पन्न यांचे परस्परप्रमाण सामान्यतः खूपच अधिक असण्याची शक्यता आहे, या गोष्टीकडेही ते दुर्लक्ष करीत असावेत असे दिसते.

९. भीमसेन, 'नुस्खा – ए – दिलकुशा', एम्. अतहर अली यांनी मैसूरच्या इंडियन हिस्ट्री कॉंग्रेस (१९६६) मध्ये वाचलेल्या 'कर्नाटक अॅट दि एन्ड ऑफ दि सेव्हनटीन सेंचरी' या निबंधामध्ये अनुवादून घेतलेला उतारा (टंकलिखित प्रत). मुगलकालीन भारतातील शेतकऱ्यांच्या जीवनाची प्रत्यक्ष परिस्थिती जाणून घेण्यासाठी पाहा : इ. हबीब, पृ. ९० – ९९.

दनाच्या निम्न पातळीमुळे होता असे सोपे समीकरण मांडून हा प्रश्न डावलता येणार नाही, यात मुळीच शंका नाही.

किमान अतिरिक्त कृषिउत्पादन जेव्हा विद्यमान असते तेव्हा वस्तुत: त्या उत्पादनाचा विनियोग व अंतिम वितरण यांच्या पद्धतीमध्येच भांडवलशाहीची बीजे असू शकतात, (परंतु ती असतातच असे नाही), असे म्हणता येते.

अतिरिक्त कृषिउत्पादनाचा विनियोग व वितरण नाना प्रकारांनी होऊ शकते. तात्त्विक दृष्टया बोलावयाचे तर त्या प्रकारांचे दोन मूलभूत स्वरूपांमध्ये वर्गीकरण करिता येते :– (अ) उत्पादकावर बाहेरून लादण्यात आलेली मागणी (अर्थात् खंड); आणि (ब) विनियोजकाने स्वत: उत्पादनप्रक्रिया हाती घेतली किंवा तिचे संघटण केले असता त्याचा परिणाम म्हणून त्याला मिळणारा लाभ (अर्थात् शेतकऱ्याची बचत; भांडवलदार शेतकऱ्याचा नफा). अर्थात् हे वर्गीकरण ऐतिहासिक स्वरूपाचे नसून केवळ तात्त्विक स्वरूपाचे असल्यामुळे त्यामध्ये कालसंगती अंतर्भूत नाही. प्रत्येक वर्गामध्ये आर्थिक विकासाच्या वेगवेगळया टप्प्यांत आढळून येणारे अनेक संबंध–प्रकार विद्यमान आहेत. त्यामुळे खुद्द भांडवलशाही पद्धतीची शेती 'ब' या वर्गात मोडत असली तरी गुलामांकडून करवून घेतली जाणारी शेतीही याच 'ब' वर्गात मोडते. याच्या उलट पिकाच्या व पैशाच्या अशा दोन्ही रूपांनी दिला जाणारा खंड 'अ' वर्गात समाविष्ट आहे. परंतु पैशाच्या रूपाने दिल्या जाणाऱ्या खंडामुळे वस्तूंच्या उत्पादनाला उल्लेखनीय उत्तेजन मिळते असे समजले गेले आहे; त्यामुळे त्या पद्धतीने भांडवलशाहीच्या उदयासाठी भूमिका तयार होते असे गृहीत धरण्यात आले आहे. 'ब' वर्गावर 'अ' वर्गाचे अतिक्रमण होते असेही समजता येईल – उदाहरणार्थ, भांडवलदार शेतकऱ्याकडून जमीनमालकाला मिळणारा खंड – आणि म्हणून त्याचा आधार बनू शकेल असा उत्पादनाचा एखादा विशिष्ट प्रकार त्यामध्ये आपोआप अंतर्भूत होत नाही.

मुगल कालीन भारतात अतिरिक्त-विनियोगाचा प्रमुख प्रकार ज्याला आपण 'अ' म्हणून संबोधले आहे तो होता. त्याचे दोन ठळक घटक म्हणजे शेतकऱ्याकडून केली जाणारी शेती (उत्पादनाची पद्धत या दृष्टीने) आणि जमीन महसूल (विनियोजित अधिकांश अतिरिक्त उत्पादनाचे प्रतिनिधित्व करणारा घटक या दृष्टीने) हे होत. म्हणून कृषि-क्षेत्रातील संभाव्य भांडवलशाही घटकांचा मागोवा घेतांना आपल्याला या दोन घटकांच्या परस्पर संबंधांच्या सखोल परीक्षणापासून सुरुवात करावी लागेल.

काही थोडे संभाव्य अपवाद वगळता भारतीय शेतकऱ्यांकडून केली जाणारी शेती ही वैयक्तिक स्वरूपात संघटित झालेली होती, असे खात्रीपूर्वक सांगण्याइतका भरपूर पुरावा आपल्याजवळ उपलब्ध आहे. प्रत्येक शेतकऱ्याचे स्वतंत्र शेत असे. जमीन विपुल असल्यामुळे बहुतेक प्रदेशांतील जमिनीला फार थोडी किंमत होती, किंवा मुळीच किंमत नव्हती. परंतु बी-बियाणे व गुरे ही शेतकऱ्यांची महत्त्वाची संपत्ती होती; आणि इतर कार्यकारक घटकांकडे दुर्लक्ष केले तरी शेतीच्या व्यक्तिगत मालकीमुळे शेतकऱ्यांमध्ये अपरिहार्यपणे स्तरीकरण झाले असले पाहिजे.[१०] त्याचबरोबर भारतीय खेडे हा एक बंदिस्त व रूढि-आधारित असा सामाजिक व आर्थिक घटक होता. शेतकऱ्यांची एकामेकांना लागून असलेली घरे आणि शेतकऱ्यांना

---

१०. इ. हबीब, पृ. ११९ व टीपा.

स्थलांतर करितांना ते समूहाने करण्याची वाटणारी गरज या गोष्टी अधिक चांगले संरक्षण मिळावे या हेतूने घडत. यातून घराणे व जात यांच्या चौकटीत शेतकऱ्यांची एक सामाजिक संघटना बनण्यासाठी आधार मिळे. ही संघटना म्हणजेच भारतीय ग्राम-समाज होय. या समाजाशी वंशपरंपरागत कारागीर व ग्रामसेवक संबंधित असत. ते शेतकऱ्यांना लागणाऱ्या वस्तू व सेवा पुरवीत. त्यांना सारे शेतकरी सामुदायिकपणे कामाचा मोबदला देत (कारण या समाजाचा एक सामूहिक निधी असे). शिवाय रूढ दरांप्रमाणे व्यक्तिशः देखील ते मोबदला देत. हा मोबदला सामान्यतः वस्तूंच्या रूपात किंवा जमिनी नेमून देऊन दिला जाई.[११] काही अंशी भारतीय खेडे हा एक सुस्थिर आर्थिक घटक होता. हा घटक स्वतःच्या उपभोगविषयक गरजा भागविण्याच्या बाबतीत अपरिहार्यपणे स्वयंपूर्ण व स्वावलंबी होता. त्यामुळे भारतीय ग्राम-समाजाच्या कोणत्याही अंतर्गत विकासातून अभिजात स्वरुपाचा आंतर ग्रामबाजार अथवा भांडवलशाही घटक यांचा उदय कसा झाला असता हे समजणे कठिण आहे. त्या काळी उत्पादनाची संघटना वैयक्तिक स्वरूपाची होती आणि शेतकरी समाजात आर्थिक स्तरीकरणही असले पाहिजे. हे लक्षात घेता अशा घटकाचा उदय होणे अशक्यच होते.

अतिरिक्त उत्पादनाचा जो विनियोग केला जाई तो वस्तूंच्या रूपात असे आणि त्याचा उपभोग एक तर प्रत्यक्ष मालकाच्या घरात घेतला जाई अथवा त्या वस्तू त्याच्या नोकरांमध्ये वाटल्या जात. अशा परिस्थितीत कोणत्याही स्थानिक सत्ताधाऱ्याकडून केल्या जाणाऱ्या अतिरिक्त उत्पादनाच्या सामान्य विनियोगातून कोणताही बदल घडून येण्याची मुळीच शक्यता नव्हती.[१२] शेतकऱ्याच्या उत्पादनातील वाटा मिळविण्याचा वंशपरंपरागत हक्क बाळगणाऱ्या जमीनदारांकडून होणाऱ्या विनियोगांच्या बाबतीत तर ही गोष्ट जास्तच खरी होती. अवध प्रांतातील जे एकमेव उदाहरण आपल्याजवळ उपलब्ध आहे त्यावरून शेतकऱ्याच्या उत्पादनावरील जमीनदाराच्या हक्काचा 'रूढ' दर आपल्याला समजतो. त्यावरून वस्तूंच्या स्वरूपातील होणाऱ्या जमेपेक्षा (प्रत्येक बिघ्यातील पिकामागे दहा शेर) पैशाच्या रूपात होणारी जमा (दर बिघ्याला एक तांब्याचे नाणे) फारच कमी होती, असे दिसते.[१३]

तथापि, मुगलकालीन भारतात 'खंडा' मध्ये असणारा जमीनदाराचा हिस्सा निश्चितपणे गौण स्वरूपाचा होता. तो सामान्यतः उत्तर भारतात जमीन महसुलाच्या १० टक्के व गुजरातेत २५ टक्के असे.[१४] दुसऱ्या शब्दांत सांगावयाचे म्हणजे जमीन महसूल हाच खंडाचा प्रमुख

---

११. इ. हबीब, पृ. ११८–१२९. अलाएव्ह आणि पावलोव्ह या रशियन लेखकांनी ग्रामसमाजाच्या बाहेर असणाऱ्या विणकरांच्या (आणि त्यांच्या जोडीला सूत कातणारे व तेली यांचीही गणना आपल्याला करिता येईल) अस्तित्वाला इतके महत्त्व का द्यावे आणि भारतीय ग्राम समाजाच्या 'विभागणीत' ही घटना उल्लेखनीय भूमिका बजावीत होती असे का समजावे ते मला नीट समजलेले नाही. पाहा : व्ही. आय. पावलोव्ह, 'इंडियन कॅपिटॅलिस्ट क्लास : ए हिस्टॉरिकल स्टडी', इंग्लिश अनुवाद (दिल्ली, १९६४); पृ. १२–१३. जोपर्यंत अशा कारागिरांचे गावकऱ्यांशी असणारे संबंध रूढीने ठरविले जात होते तोपर्यंत ग्रामसमाजात उलथापालथ घडून येण्याचे काहीच कारण नव्हते.

१२. ताडून पाहा : कार्ल मार्क्स, 'कॅपिटल', १, ६१०.

१३. इ. हबीब, पृ. १४५ व टीपा. तथापि, तळटीपेत दिलेल्या या दस्तऐवजाच्या भाष्यामध्ये एकदोन ठिकाणी पाठशुद्धी केली पाहिजे असे आता मला वाटते.

१४. इ. हबीब, पृ. १४५–१५०.

घटक असे.[१५] त्यामुळे त्याचे स्वरूप व व्याप्ती यांचे अध्ययन करणे आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेवर त्याचे काय परिणाम होत असतील याचा विचार करणे महत्त्वाचे ठरते.

'माल' किंवा जमीन महसूल हा, खरे पाहाता जमिनीचे भाडे नसून पिकावरील कर असे. मूलतः तो पिकातील वाटा असे; आणि तो गोळा करण्याचा सर्वांत सोपा प्रकार म्हणजे पिकाची प्रत्यक्ष विभागणी (बटाई=भागी) करणे हा असे. परंतु प्रत्यक्ष व्यवहारात अधिक गुंतागुंतीच्या (आणि प्रशासकीय दृष्टया कमी दगदगीच्या) पद्धतींचा वापर केला जाई. उदाहरणार्थ, जमिनीचा सारा वस्तूंच्या रूपात ठरविला जाई. परंतु प्रत्यक्ष किती सारा आकारावयाचा ते पिकाची पाहाणी करून ठरविण्यात येई.[१६] याला पिकाची आणेवारी (कनकूत) असे म्हणतात. एखाद्या शेतात एकूण पीक किती येईल याचा अंदाज घेऊन त्या प्रमाणात सारा बसविला जाई. जमीनमहसूल हा उत्पादनाचा ठराविक हिस्सा असल्यामुळे एकूण जमीनमहसुलाची आकारणी किती असेल हे वस्तूच्या रूपात आता सांगता येईल. त्याचबरोबर बाजारभाव किंवा अंदाजी किमती विचारात घेता पैशाच्या रूपात जमीनमहसूल किती असे हे रूपांतरित करून सांगता येईल. अत्यंत विकसित शेतांच्या बाबतीत जमिनीच्या क्षेत्रफळाच्या प्रत्येक घटकावर त्या–त्या पिकाप्रमाणे पैशाच्या रूपातील प्रमाणित दर आकारला जाई (जब्त). अधिकांश प्रांतांमध्ये हा दर मोठया प्रमाणावर प्रचलित होता. शिवाय, कोष्टकवार याद्या तयार करण्यासाठी जमीनमहसूल हा पिकाचा ठराविक भाग असेल असे गृहीत धरावे लागत असे. वर उल्लेखिलेल्या इतर पद्धतींपैकी कोणत्या तरी एका पद्धतीनुसार जमिनीची करआकारणी केली जात असल्यामुळे असे करणे अधिक अगत्याचे होई. उत्तर भारताच्या अधिकांश भागांत आणि दख्खनमध्ये सर्वसामान्यपणे जमीनमहसूल म्हणून उत्पादनाचा जो भाग वसूल केला जाई तो पिकाच्या एकतृतीयांशापासून एकद्वितीयांशापर्यंत असावा असे दिसते. परंतु काही रुक्ष किंवा कोरडवाहू प्रदेशांत त्याचे प्रमाण बरेच कमी आणि काही सुपीक प्रदेशांत ते बरेच अधिक होते.[१७]

तत्त्वतः प्रत्येक शेतकऱ्याच्या ताब्यातील क्षेत्र व त्या शेतात त्याने काढलेले पीक यांचा विचार करून त्या त्या शेतकऱ्यावर स्वतंत्रपणे जमीनमहसूल आकारला जाई. परंतु वस्तुतः संपूर्ण गाव हा एक घटक समजून त्यावर जमीन महसूल आकारला जाई आणि गावाने तो सामुदायिकपणे भरावा अशी सामान्यतः अपेक्षा बाळगली जाई.[१८]

शेवटचा मुद्दा असा की, जमीनमहसूल हा मूलभूतपणे उत्पादनाचा हिस्सा असला तरी तो बहुतेकदा पैशाच्या रूपातच वसूल केला जाई. जब्त-पद्धतीनुसारच नव्हे तर इतर पद्धतींमध्येही ही वसुली पैशाच्या रूपात केली जाई. त्याकरिता वस्तूच्या रूपातील आकारणीचे पैशाच्या रूपातील आकारणीमध्ये रूपांतर केले जाई. जेव्हा एखाद्या गावावरील जमीनमहसूल ठरविला जाई

१५. मुख्यतः याच कारणामुळे सर्व समकालीन युरोपीय प्रवाशांनी असे नमूद करून ठेवले आहे की मुगल बादशाह (तसेच इतरही भारतीय राज्यकर्ते आपापल्या राज्यांत) भूमीचे एकमेव मालक असत. परंतु दरबारातील अधिकृत लेखकांनी अशा प्रकारचा दावा केल्याचे दिसून येत नाही. इ. हबीब, 'एन्क्वायरी', ३ (२), पृ. ५९

१६. ब्रिटिश – भारतीय जमीनमहसुलाच्या प्रशासनामध्ये परिचित असलेल्या 'डिमांड' (मागणी) व 'रेव्हेन्यू डिमांड' (महसुली मागणी) या संज्ञांना पर्यायवाची म्हणून 'जमेर' ही फारसी संज्ञा वापरणे बहुधा सयुक्तिक ठरेल. तिचा अर्थ जमीनमहसुलाची आकारणी अथवा निश्चित झालेली रक्कम असा होतो.

१७. इ. हबीब, पृ. १९० – २३०.

१८. कित्ता, पृ. २३० – २३६.

तेव्हा पुष्कळदा तो मनास येईल त्याप्रमाणे पैशाच्या रूपात आकारलेला असे, असे त्या रकमेवरून वाटते. दिल्ली प्रदेशात अगदी चौदाव्या शतकाच्या सुरुवातीपासून जमीनमहसुलातील हा रोखीचा दुवा प्रस्थापित झालेला होता असे दिसते. [19] आपल्याजवळ असलेल्या पुराव्यावरून असे स्पष्टपणे दिसून येते की मुगलकालीन भारतात सर्व साम्राज्यभर वस्तूच्या रूपातील जमीनमहसुलापेक्षा पैशाच्या रूपातील जमीनमहसूल कितीतरी अधिक प्रमाणात प्रचलित होता. अर्थात् याला काही स्थानिक अपवाद होते; आणि काही प्रदेशांमध्ये काही कालखंडापुरता जमीनमहसूल वस्तूच्या रूपानेही घेतला गेला असण्याची शक्यता आहे. [20] अधिकारी लोक जेव्हा वस्तूंच्या रूपात जमीन-महसूल गोळा करीत तेव्हा देखील त्यांचा प्रत्यक्षपणे वापर करण्याच्या किंवा साठवणूक करण्याच्या उद्देशाने नव्हे तर त्यांची विक्री करण्याच्या दृष्टीनेच तो गोळा केला जाई. [21]

जमीनमहसुलाची ही वैशिष्ट्ये ऐतिहासिक दृष्ट्या एका सत्ताधारी वर्गाच्या उदयाशी निगडित झालेली होती; आणि या वर्गाच्या निरनिराळ्या घटकांमध्ये महसुली उत्पन्न विभागले जात असे. शेतकऱ्यांकडून प्रत्यक्षपणे राजाच्या नावाने महसूल गोळा केला जाई. ही वसुली सरकारी खजिन्यासाठी राजाच्या अधिकाऱ्यांकडून तरी केली जाई, किंवा राजाने नेमणूक केलेले लोक स्वत:साठी ती करीत. ज्या भागांतील जमीनमहसूल सरकारी खजिन्यात जमा होई त्या भागांना 'खालसा' असे म्हणत. हे खालसा भाग संबंध साम्राज्यभर विखुरलेले असत आणि त्यांचे एकूण क्षेत्रफळ कमी-जास्त होत राही. १६४७ साली खालसा प्रदेशातील जमीनमहसूल एकुण जमीनमहसुलाच्या १३·६ टक्के असावा असा अंदाज आहे. [22] उरलेला भाग जहागिरींचा असे. या जहागिरींचा जमीनमहसूल राजाकडून त्याच्या मनसबदारांना नेमून दिलेला असे. त्यांचे वैयक्तिक पगार व त्यांच्या लष्करासाठी लागणारा खर्च यासाठी ही तजवीज केलेली असे. अशा नेमणुका ज्यांना करून दिलेल्या असत त्यांना जहागीरदार असे म्हणत. परंतु काही मनसबदार सरकारी खजिन्यातूनही आपले पगार पूर्णांशाने किंवा अंशत: रोखीने घेत असत. व्यावहारिक दृष्ट्या विचार करिता हे मनसबदार, विशेषत: उच्च श्रेणीतील अधिकारी, हा मुगल साम्राज्याचा शासक वर्ग होता, असे म्हणण्यास हरकत नाही.

या वर्गाचे मोठ्या प्रमाणावर नागरीकरण झालेले होते; आणि त्यांमध्ये पुष्कळच परकीय लोक होते.[23] या परकीय लोकांना फारसा स्थानिक आधार नव्हता. शिवाय त्यांच्या नोकऱ्यां-मध्ये वारंवार बदल्या घडवून आणून आणि त्यांच्या जहागिरींचेही हस्तांतरण करीत ठेवून त्यांना जमिनीत आपली मुळे रुजवू देण्यास प्रतिबंध करण्यात येई. कोणाही जहागीरदाराला जहागीर म्हणून जो प्रदेश देण्यात येई त्याचा उपभोगकाळ सरासरीने तीन वर्षांपेक्षाही कमी असे.[24]

---

१९. ताडून पाहा : डब्ल्यू. एच्. मोरलँड, 'ॲग्रेरियन सिस्टिम ऑफ मुस्लिम इंडिया', अलाहाबाद, १९२९ च्या आवृत्तीचे पुनर्मुद्रण. प्रकाशन काळ दिलेला नाही. पृ. ११, ११४, १३६-१३७.

२०. इ. हबीब, पृ. २३७-२३९.

२१. कित्ता, पृ. २३७.

२२. कित्ता, पृ. २७२ आणि टीपा.

२३. ताडून पाहा : मोरलँड, 'इंडिया ॲट दि डेथ ऑफ अकबर', पृ. ६९-७०. एम्. अतहर अली यांच्या 'दि मुगल नोबिलिटी अंडर औरंगजेब', (मुंबई, १९६६) या ग्रंथात पृ. ११-३३ वर मुगल सरदारांच्या वांशिक स्वरूपाचे तपशीलवार विश्लेषण करण्यात आले आहे.

२४. मोरलँड, 'ॲग्रेरियन सिस्टिम,' इतस्तत:; इ. हबीब, पृ. २५७-२९०.

नोकरीतील पद अथवा जहागीर यांपैकी कोणतीही गोष्ट वंशपरंपरागत नसे. (फक्त काही अधिपतींच्या बाबतीत यास अपवाद केला जाई). केंद्रीकृत शाही निरंकुशतेसमोर पूर्णपणे नमून असणाऱ्या या अत्यंत शिस्तबद्ध वर्गामुळेच जमीनमहसुलाच्या रूपाने देशाच्या संपूर्ण ग्रामीण अतिरिक्त उत्पादनावर सांगितला जाणारा प्रचंड हक्क त्या महसुलाची वसुली करून प्रत्यक्षात बजावला जाई.

बदल्यांच्या पद्धतीमुळे स्वाभाविकपणेच सरदाराचे कुटुंब व त्याचे लष्कर एखाद्या जहागिरीत कायमचे राहू शकत नसे. त्यामळे त्याचा भूमीशी प्रत्यक्ष संबंध फारसा येत नसे. सामान्यत: जहागीर जेवढी अधिक मोठी असेल तेवढ्या प्रमाणात जहागीरदाराच्या मुक्कामाचे मुख्य ठाणे खेड्यापासून अधिक दूर असे. शिवाय मुगल सरदारांचे फार मोठ्या प्रमाणावर नागरीकरण झालेले होते, आणि ते ग्रामीण जीवनाला अत्यंत तुच्छ लेखीत असत. त्यामुळे जहागीरदार पैशाच्या रूपात जमीनमहसूल गोळा करणे अधिक पसंत करीत, किंवा वस्तूंच्या रूपात जमा होणारा महसूल तागडतोब पैशाच्या रूपात परिवर्तित करण्याकडे त्यांची प्रवृत्ती असे, यात आश्चर्य वाटण्यासारखे काही नाही. शिवाय सरकारी खजिन्यालाही मनसबदार व इतर लोक यांचे पगार रोखीने द्यावे लागत असल्यामुळे खालसा प्रदेशामध्ये देखील पैशाच्या रूपात महसूल गोळा करण्याची प्रवृत्ती फार मोठ्या प्रमाणात असली पाहिजे.

अशाप्रकारे आम्ही यापूर्वी वर्णन केलेल्या जमीनमहसूल पद्धतीच्या प्रमुख पैलूंचा खुलासा सत्ताधारी वर्गाचे सामर्थ्य, संघटना व त्याचे स्वरूप यांवरून होतो. शिवाय यामध्ये ऐतिहासिक घटनेचे मूळही पाहावयास मिळते; आणि त्या संबंधी बरीचशी कागदपत्रेही उपलब्ध आहेत. ती घटना म्हणजे शेतकरी व इतर महसूल देणारे (करदाते) यांच्यावरील दडपण हळू हळू वाढविण्याची प्रवृत्ती ही होय. सतराव्या शतकातील लेखकांनी वारंवार उल्लेखिल्याप्रमाणे, या प्रवृत्तीचे मूळ जहागिरीच्या हस्तांतरणाच्या पद्धतीत होते. त्या पद्धतीमुळे महसूल गोळा करण्याची जबाबदारी ज्याच्यावर असे अशा कोणाही वैयक्तिक मुखत्याराला कोणत्याही विशिष्ट प्रदेशाची महसूल देण्याची क्षमता दीर्घकाळपर्यंत टिकून राहावी किंवा ती वाढावी या दृष्टीने प्रयत्न करण्यात काहीच स्वारस्य नसे.[२५] जादा महसूल प्राप्त करण्यासाठी बेसुमार दडपण आणले गेल्यामुळे सरतेशेवटी मूळ हेतूच विफल झाला. कारण तात्कालिक फायद्याच्या लोभापायी भावी शक्यतांचा बळी देण्यात आला. परंतु जिच्यायोगे या घातक परिणामाला आळा बसला असता अशी कोणतीच परिणामकारक यंत्रणा मुगल पद्धतीत नव्हती.[२६]

जमीन महसुलाच्या वसुलीचे ग्रामीण अर्थव्यवस्थेवर दोन महत्वाचे परिणाम झाले असले पाहिजेत. पहिला परिणाम असा की ग्रामीण क्षेत्रातून प्रचंड प्रमाणावर संपत्तीचा ओघ बाहेर जाऊ लागला. अर्थात् जमीनमहसुलाचा काही भाग काही ग्रामीण घटकांच्या हातांत राहात असे यात मुळीच शंका नाही. वसुलीतील दोष, करमाफी, सूट, चौधरी, कानूनगो (पाटील–

२५. बर्नियर यांनी केलेल्या मुगल राज्यतंत्रातील दोषांच्या प्रख्यात विश्लेषणामध्ये हा एक महत्त्वाचा मुद्दा मानला आहे. पाहा : 'ट्रॅव्हल्स इन दि मुगल एम्पायर, १६५६–१६५८', अनु. ए. कॉन्स्टेबल, संपा. व्ही. ए. स्मिथ (लंडन, १९१६), पृ. २२७. ताडून पाहा : इ. हबीब, पृ. ३२०–३२१.

२६. यादृष्टीने कोणते निर्बंधात्मक उपाय विद्यमान होते ते जाणून घेण्यासाठी पाहा : इ. हबीब, पृ. २७३–२९७; आणि त्यांची निष्फळता जाणून घेण्यासाठी याच ग्रंथाचे पृष्ठ ३२१ व त्यानंतरची पृष्ठे पाहा.

कुळकर्णी) व गांवप्रमुख (मुकद्दम) यांसारख्या काही स्थानिक अधिकाऱ्यांना दिली जाणारी दलाली, महसूल खात्यातील स्थानिक कर्मचाऱ्यांचे पगार व अवांतर प्राप्ती इत्यादींच्या रूपाने हा भाग खेड्यांत राहात असे. काही जहागीरदार आपल्या जहागिरी खेड्यांत राहणाऱ्या आपल्या सैनिकांना पोटभाड्याने नेमून देत असत.[२७] याखेरीज ज्यांना महसुलातून अनुदान मिळत असे अशा वतनदार लोकांचा एक फार मोठा वर्ग विद्यमान होता. (बुद्धिजीवी आणि रिकामटेकडे लोक यांचा त्यात समावेश होता.) सरकारकडून जी पोटगीची अनुदाने (मदद मआश) दिली जात तीच एकूण अंदाजित महसुलाच्या ४ ते ६ टक्के असत.[२८] ही सारी गळती लक्षात घेताही, ग्रामीण भागातून दरसाल एकूण उत्पादनाचा तिसरा किंवा निम्मा हिस्सा जरी बसला तरी निदान एकचतुर्थांश भाग तरी बाहेर जात असला पाहिजे, आणि त्याच्या मोबदल्यात त्या भागाला काहीही मिळत नसले पाहिजे, असा अंदाज बांधण्यास हरकत नसावी.

दुसरी गोष्ट अशी की, ज्या यंत्रणेच्या द्वारा ग्रामीण अतिरिक्त उत्पादनाचा अधिकांश भाग बाहेर नेला जात असे तिच्यामुळे ग्रामीण बाजारपेठा निर्माण होण्यास बरीच मदत झाली. जेव्हा जमीनमहसूल पैशाच्या रूपाने वसूल केला जाई तेव्हा सारा भरणाऱ्याला सारा भरण्यासाठी आपण उत्पन्न केलेला माल विकणे भाग पडे. परंतु जेव्हा तो वस्तूच्या रूपात वसूल केला जाई तेव्हा देखील, आपण पूर्वी पाहिल्याप्रमाणे, महसूल अधिकारी सारा म्हणून गोळा होणारा माल विकून टाकणे पसंत करीत. यांपैकी कोणतीही गोष्ट घडली तरी अधिकांश अतिरिक्त उत्पादन बाजारात विक्रीसाठी जाई. त्यामुळे खरे बोलावयाचे तर कृषि उत्पादनाचा फार मोठा भाग प्रत्यक्ष 'वापरासाठी' नसे तर विक्रेय वस्तूंचे उत्पादन या स्वरूपाचा असे.[२९] एकदा बाजारपेठेची यंत्रणा प्रस्थापित झाल्यानंतर कृषि उत्पादनाच्या स्वरूपावर तिची प्रतिक्रिया घडून आली असली पाहिजे. तिच्यामुळे केवळ 'नैसर्गिक अर्थव्यवस्थेच्या' पद्धतीत पैशाचे संबंध निर्माण झाले; एवढेच नव्हे तर सामान्य पिकांच्या ऐवजी उच्च श्रेणीची पिके व नगदी पिके निर्माण करण्यास प्रोत्साहन मिळाले. (उदाहरणार्थ, भरड धान्यांऐवजी गहू पिकविणे; आणि कापूस, ऊस, तीळ, अफूची बोंडे, तंबाकू इत्यादींची लागवड करणे वगैरे गोष्टींना उत्तेजन मिळाले).[३०]

मुगल महसूल पद्धतीच्या या दुहेरी परिणामामुळे 'शुद्ध' शेतकरी अर्थव्यवस्थेमध्ये पुष्कळच उलथापालथ घडून आली असली पाहिजे. तसेच त्यामुळे आपल्या 'अ' प्रकाराशी

---

२७. इ. हबीब, पृ. २८५–२८६.

२८. कित्ता, पृ. २९८—३१६.

२९. माझ्या माहितीप्रमाणे, मुगल महसूल पद्धतीच्या या महत्त्वाच्या आर्थिक गर्भितार्थांकडे, किंबहुना या परिणामाकडे पहिल्या प्रथम डब्ल्यू. सी. स्मिथ यांनी 'इस्लामिक कल्चर' (१९४४) पृ. ३५८—३५९, या आपल्या ग्रंथातून लक्ष वेधले. त्यानंतर के. अँटानोवाल (१९५७) यांनी त्याकडे लक्ष वेधले. त्यांच्या विवेचनाचा हवाला व्ही. आय. पाव्हलोव्ह यांनी 'दि इंडियन कॅपिटॅलिस्ट क्लास: ए हिस्टॉरिकल स्टडी' या आपल्या ग्रंथात दिला आहे. इंग्रजी अनुवाद, (दिल्ली, १९६४) पृ. २०.

३०. पीकउत्पादनातील या प्रगतीला चौदाव्या शतकात मुहम्मद तुगलक याने एका सोप्या सूत्राने हातभार लावला. शेतकऱ्यांनी सातू ऐवजी गहू पेरावेत, गव्हाऐवजी ऊस लावावा आणि उसाऐवजी द्राक्षे पिकवावीत, याहष्टीने त्याच्या महसूल अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांना उत्तेजन दिले. त्या कामी तोही सहभागी झाला. पाहा: मोरलँड, 'अॅग्रेरियन सिस्टिम', पृ. ५१.

संबंधित इतर शोषणपद्धतींमध्ये बदलही घडून आला असला पाहिजे.[३१]

आपण वर पाहिल्याप्रमाणे जमीन महसुलामुळे ग्रामीण भागातील संपत्ती प्रचंड प्रमाणावर बाहेर जात होती. शिवाय, मुगल पद्धतीत निर्माण झालेल्या प्रवृत्तीचा कल भूमिकर-दात्यावरील दडपण वाढविण्याकडे होता. जमीनमहसुलाच्या अंदाजित आकडेवारीवरून एकूण महसुलात (म्हणजे किमतींच्या स्वरूपात) काही वास्तविक वाढ झाल्याचे दिसून येत नसले तरी त्यावरून उत्पादनाच्या वास्तविक हिश्श्याच्या स्वरूपातील शोषणाचे प्रमाण कायम होते असे समजण्यास काही आधार मिळत नाही. शोषणाच्या अतिरेकामुळे एकूण उत्पादनात घट होणे अपरिहार्य होते; आणि म्हणून कालांतराने प्रत्यक्ष महसुलाच्या वसुलीवर प्रतिकूल परिणाम घडून येणे भागच होते.[३२] युरोपचा आर्थिक इतिहास पाहिल्यानंतर, तेथे ज्याप्रमाणे भाववाढीमुळे शेतकऱ्यांना दीर्घकालीन लाभ मिळाल्याचे आढळून येते त्याचप्रमाणे रोख रकमेत शेतसारा भरण्यामुळे किमतीत जी वाढ झाली तिचा फायदा येथील शेतकऱ्यांना मिळाला असल्याचे दिसून येत नाही-युरोपातील लॉर्ड लोक जमिनीचे 'भाडे' घेत असत. तशी स्थिती येथे नव्हती. त्याऐवजी शेतसारा हा उत्पादनाच्या ठराविक प्रमाणात असावयाचा या संकल्पनेवर येथील शेतसाऱ्याचा दर भक्कमपणे आधारलेला असे; आणि म्हणून पैशाच्या रूपात आकारणी करताना त्यात फेरफारही होत असत. परिणामतः सतराव्या शतकात शेतमालाच्या किमती चढलेल्या दिसल्या[३३] तरी महसुलामध्ये खऱ्या अर्थाने घट झाली नाही.[३४]

आता शेतकऱ्यांच्या दृष्टीने पाहावयाचे तर जमीनमहसूल हा प्रामुख्याने अवरोही (regressive) कर आकारल्यामुळे, त्याचे ओझे श्रीमंत शेतकऱ्यांपेक्षा गरीब शेतकऱ्यांवर अधिक मोठ्या प्रमाणात पडत असे. ज्यावेळी उत्पादनाचा ठराविक हिस्सा कर म्हणून दिला जाई तेव्हा कमी उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांजवळ अधिक उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांपेक्षा कमी उत्पन्न शिल्लक राही, हे उघड आहे ज्यावेळी प्रत्येक शेतकऱ्यावर स्वतंत्रपणे करआकारणी केली जाई तेव्हा स्वाभाविकपणेच ग्रामीण समाज डावलला जाई आणि शेतसारा भरणाऱ्या व्यक्तीलाच सर्व अडचणींना तोंड द्यावे लागे, असाही युक्तिवाद करिता येईल. याच्यामुळेही आर्थिक भेदभाव होत असला पाहिजे. तथापि, आपण वर पाहिल्याप्रमाणे, प्रत्यक्ष व्यवहारात खेडे हा करआकारणीचा नेहमीचा घटक असे; आणि जमीनमहसूल अदा करण्यामध्ये ग्राम-समाज महत्त्वाची भूमिका बजावीत असे, याचा पुरावा आपल्याजवळ आहे. सर्व शेतकऱ्यांनी आपापला वाटा देऊन निर्माण केलेला एक सार्वजनिक निधी असे. या निधीतून जमीनमहसूल, इतर कर

---

३१. या वाक्यातील 'मुगल महसूल पद्धती' या शब्दांचा अधिक खुलासा केला पाहिजे. मुगल महसूल पद्धती काही असाधारण नव्हती. वस्तुतः या पद्धतीच्या वैशिष्ट्यांचे बीजारोपण दिल्लीच्या सुल्तानांच्या कारकीर्दीत, चौदाव्या शतकाच्या प्रारंभिक काळातच झालेले होते. (ताडून पाहा: इ. हबीब, 'इन्क्वायरी,' एन्. एस्. २ (३), पृ. ४५—४६). दुसरी गोष्ट अशी की कारण आणि परिणाम यांच्यांत फरक करणे अवघड आहे. शिवाय, सुल्तान व मुगल यांच्या महसूल पद्धती भारताच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेतील काही विशिष्ट घडामोडींमुळे (उदाहरणार्थ, व्यापार व विक्रेय वस्तूंचे उत्पादन यांची वाढ) शक्य बनल्या, या युक्तिवादालाही थोडाफार वाव द्यावाच लागेल. वस्तुतः या घडामोडी म्हणजे या महसूल पद्धतींचेच परिणाम आहेत, असे गृहीत धरून आपण येथे त्यांचे विवेचन करीत आहेत.

३२. ताडून पाहा: इ. हबीब, पृ. ३२६—३२८.

३३. कित्ता, पृ. ८१—८९.

३४. कित्ता, पृ. १९०—१९६.

आणि खेड्याचा कारभार चालविण्यासाठी लागणारा खर्च भागविला जाई.[३५] यावरून ग्राम-समाजाचे केवढ्या प्रमाणावर नाणकीकरण (monetization) झालेले होतें व एक आर्थिक संघटना या नात्याने त्यात किती लवचिकपणा होता हे स्पष्ट दिसून येते. हे सारे हिशेब रोख रकमेत ठेवले जात असत, ही गोष्ट उल्लेखनीय आहे. तथापि, या व्यवस्थेमध्ये असा धोका होता की, वलिष्ठ (व श्रीमंत) शेतकऱ्यांचे गावावर वर्चस्व राही; आणि गरीब शेतकऱ्यांचे (रेझा रिआया) अहित करून आपल्या भाऊबंदांना कमी सारा द्यावा लागेल अशा प्रकारे कर आकारणीची विभागणी आपल्या मनाप्रमाणे ते करू शकत. अशा प्रकारच्या अन्याय्य विभागणीला आळा घालण्याचा एक उपाय म्हणून वैयक्तिक कर आकारणीचा उपयोग व्हावा अशी महसूल अधिकाऱ्यांची अपेक्षा असे, यात शंका नाही.[३६] काही काही वेळा संपूर्ण खेड्यावर एवढा जबर्दस्त कर आकारला जाई की आपण तो कर भरला नाही तर आपली कत्तल केली जाईल अथवा आपल्याला गुलाम बनविले जाईल अशी भीती शेतकऱ्यांना वाटे.[३७] त्यामुळे आपल्याला असे म्हणता येईल की, जमीनमहसुलामुळे निर्माण झालेल्या प्रवृत्तीचा परिणाम कालांतराने सर्वच शेतकरी वर्गावरील दडपण वाढण्यामध्ये होत असला तरी तिचा प्रारंभिक परिणाम शेतकऱ्यांमधील स्तरीकरण वाढविण्याच्या आणि गरीब वर्गाला अधिक दरिद्री बनविण्याच्या दिशेने होत असे.

नाणकीकरणाचा प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष परिणाम शेतकऱ्याला भिकेस लावण्यामध्येही होऊ शकत असे. विक्रेय वस्तूंचे उत्पादक या नात्याने शेतकऱ्यांचे भयंकर नुकसान होईल अशा प्रकारे किंमतीमध्ये चढउतार होण्याची शक्यता असे.[३८] शिवाय बहुतेक नगदी पिकांसाठी बरेच भांडवल गुंतवावे लागे. उदाहरणार्थ, वारंवार नांगरणी करणे व पाणी देणे यांसाठी गुरे लागत; आणि ऊस गाळण्याचा चरक व कढया, नीळ तयार करण्यासाठी मोठी पिपे वगैरे सामानही द्यावे लागे. तसेच पीकपाणी व किमती यांच्या बाबतीतील मोठे धोकेही त्या पिकांना असत. त्यामुळे अशी पिके काढण्याच्या बाबतीत गरीब शेतकरी आपल्या श्रीमंत बांधवांशी स्पर्धा करू शकत असतील, अशी शक्यता वाटत नाही.

अशा परिस्थितीमध्ये आपला शेतसारा भागविण्यासाठी किंवा औरंगजेबाच्या एका फर्मानात नमूद केल्याप्रमाणे आपले 'अन्नवस्त्र व गुरे' मिळविण्यासाठी शेतकऱ्याला कर्ज काढावे लागणे अपरिहार्य होई. ग्रामीण बाजारपेठेचा विकास एकदा एका विशिष्ट मर्यादेपर्यंत झाल्यानंतर सावकारीचा प्रचार झपाट्याने झाला असला पाहिजे. मुगलकालीन भारतातील शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा हा आतापर्यंत समजला जात होता त्यापेक्षा कितीतरी अधिक प्रमा-

---

३५. कित्ता, पृ. १२४—१२७.

३६. इ. हबीब, पृ. १२८—१२९ आणि टीपा. टी. रायचौधुरी [ ( एन्क्वायरी ) अनिर्दिष्ट, २ ( १ ) पृ. ९६-९७ ] यांनी दाखवून दिल्याप्रमाणे, शेतकऱ्यांचा दर्जा व त्यांची आर्थिक परिस्थिती या गोष्टी परस्परांशी नेहमीच सुसंवादी नसत. उदाहरणार्थ, काही ठिकाणी तात्त्विक दृष्ट्या खालच्या दर्जाच्या शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती गावप्रमुखांच्या स्थितीपेक्षा अधिक चांगली असण्याची शक्यता असे. परंतु असे फरक अपवादात्मकच असावेत, आणि ते फार काळ टिकूनही राहात नसावेत. अर्थात दरम्यानच्या काळात दुसऱ्या एखाद्या भागात असे फरक निर्माण होत असले पाहिजेत.

३७. इ. हबीब, पृ. ३२२—३२३.

३८. कित्ता, पृ. २४९



139383

णात पसरलेला असण्याची शक्यता आहे.[३९] व्याजाचे दर भरमसाट असल्यामुळे[४०] या जबर व्याजाचा परिणाम म्हणून शेतकऱ्यांवरील कर्जाचे ओझे जास्तच वाढलें असले पाहिजे. जबर व्याजाची प्रत्यक्ष रूपे कोणतीही असली तरी आपल्या 'अ' वर्गातील शोषणाचे वास्तविक स्वरूप त्यावरून दिसून येते.[४१] याचा फायदा आपल्या रूढिगत जबरी वसुलामध्ये भर घालणाऱ्या जमीनदारांना (विशेषतः चौधरींना, पाटलांना) आणि गावप्रमुखांना किंवा आपल्या व्याजखोरीच्या द्वारे भांडवलात भर घालणाऱ्या धंदेवाईक सावकारांनाच केवळ नव्हे तर शेतकऱ्यांच्या पिकांवर आपला हक्क प्रस्थापित करण्यासाठी त्यांना नेहमी अगाऊ रकमा देणाऱ्या व्यापाऱ्यांना आणि बहुधा व्यापारी-सावकारांनाही मिळत असे.[४२] व्यापारी-सावकारांच्या बाबतींत व्याजखोरीमुळे व्यापारी भांडवल वाढून व्यापाराचा विस्तार होत असला पाहिजे.

अशा प्रकारे जमीनमहसूल व नाणकीकरण यांच्यामुळे व्याजखोरीच्या स्वरूपात शेतकऱ्यांचे शोषण करण्याच्या इतर साधनांत भर पडली किंवा त्यात वाढ झाली. त्याचबरोबर त्यांच्यामुळे आणखी एका वर्गाकडून शेतकऱ्यांवर वाढते दडपण येण्याची परिस्थिती निर्माण झाली. तो वर्ग म्हणजे जमीनदारांचा वर्ग होय. हे दडपण प्रथम जमीनदाराच्या आर्थिक अधिकारातील फेरफाराच्या द्वारे आणि नंतर अधिकाराच्या क्षेत्रात विस्तार करून घेऊन त्याच्या द्वारे आणले जाई.

अतिरिक्त उत्पादनावरील प्रमुख हक्क या दृष्टीने जमीन महसुलाने जमीनदाराच्या स्वतंत्र आर्थिक हक्कांवर दडपण आणले असावे असे दिसते. हे दडपण एवढे मोठे होते की त्यायोगे जमीनमहसूल व हे हक्क आपसात जोडले गेले. त्यानंतर हे हक्क, गोळा केल्या जाणाऱ्या शेतसाऱ्यावरील हक्कांच्या रूपाने पुन्हा प्रकट झाले. त्या शेतसाऱ्यामध्ये मालकी हक्क म्हणून किंवा इनाम जमिनीच्या रूपाने अथवा दोन्ही मार्गांनी वाटा मिळाला पाहिजे, असा तो दावा होता. त्यानंतर जमीनदाराचे मध्यस्थामध्ये (म्हणजेच तालुकेदारात, किंवा मालगुजारात) रूपांतर झाले. जमीनमहसूल गोळा करून तो सरकारात जमा करण्याची जबाबदारी त्याच्यावर सोपविण्यात आली.[४३] परिणामतः जेव्हा जमीनमहसुलात वाढ होई तेव्हा आपला वाटा गमावावयाचा की शेतकऱ्यांना नुकसान सोसावयास लावून आपल्या प्राप्तीची भरपाई करून घ्यावयाची याचा निर्णय करणे जमीनदारांना भाग पडे. रिकाम्या किंवा मोकळ्या जमिनी शेतकऱ्यांना वाटून देणे, किंबहुना एका शेतकऱ्याला हुसकून लावून ती जमीन दुसऱ्या शेतकऱ्याला देणे यांसारखे जे अधिकार

---

३९. 'कंपॅरेटिव्ह स्टडीज इन सोसायटी ॲंड हिस्टरी', ६ (४), पृ. ३९४—३९५, ३९७. तथापि, मी औरंगजेबाच्या फर्मानातील एका कलमाचे जे भाषांतर पूर्वी केले होते त्यात आता किंचित दुरुस्ती केली आहे.

४०. अठराव्या शतकात बंगालमध्ये दरसाल दरशेकडा १५० हा सरळ व्याजाचा सर्वसामान्य प्रचलित दर होता. परंतु शेतकऱ्यांना सामान्यतः दोन किंवा तीन महिन्यांसाठी कर्ज दिले जाई; आणि त्या मुदतीच्या शेवटी व्याज मुद्दलात जमा केले जाई (कित्ता, पृ. ३९५). महाराष्ट्रातील खेड्यांमध्ये रोखीच्या कर्जाचा सर्वसामान्य दर दरसाल दरशेकडा २४ असे, परंतु लहान कर्जांवर तो ४० टक्के होई. पाहा: थॉमस कोट्स, 'ट्रॅन्सॅक्शन्स् ऑफ दि लिटररी सोसायटी ऑफ बॉम्बे', ३ (लंडन, १८२३), पृ. २१२—२१३.

४१. 'कंपॅरेटिव्ह स्टडीज इन सोसायटी ॲंड हिस्टरी', ४ (४), पृ. ३९७ आणि टीपा.

४२. कित्ता, पृ. ३९४—३९५.

४३. इ. हबीब, पृ. १६९—१७९.

जमीनदारांना देण्यात आलेले होते,[४४] त्यांमध्ये वैयक्तिक शेतकऱ्यांवरील त्यांची सत्ता वाढावी असा हेतू होता. अर्थात शेतजमीन मुबलक असल्यामुळे अशा अधिकारांचे आर्थिक महत्त्व मर्यादितच असले पाहिजे, हे उघड आहे.

याच बरोबर, ज्या भागात पूर्वीपासून रयतवारी पद्धत चालू होती, म्हणजे जेथील जमिनीवर शेतकऱ्यांना कोणताही वरचा अधिकार प्राप्त नसतांनाही ती जमीन त्यांच्या पूर्णपणे ताब्यात होती त्या भागावर जमीनदारीचा विस्तृत हक्क प्रस्थापित करण्यात आल्याबद्दलचा पुरावा उपलब्ध आहे.[४५] हा विस्तार शक्य होण्याच्या मुळाशी दोन महत्त्वाच्या गोष्टी असल्याचे आढळून येईल. पहिली अशी की, नाणकीकरणामुळे जमीनदारीचा अधिकार, निदान सोळाव्या शतकापासून पुढे, ही पूर्णपणे विक्रेय वस्तू[४६] बनली. याचा अर्थ असा की नव्या घटकांना जमीनदाऱ्या विकत घेता आल्या. या घटकांमध्ये सरदार व अधिकारी यांचा लहानसा गट, घोडदळातील सैनिक आणि वतनदार किंवा दुसऱ्या शब्दांत सांगावयाचे तर, ज्या लोकांना प्रामुख्याने जमीन-महसुलातील हिश्श्यामुळे संपत्ती प्राप्त होत होती असे लोक, यांचा समावेश होता. या काळापर्यंत शहरी व्यापाऱ्यांना आपल्या जवळच्या जादा भांडवलाची गुंतवणूक करण्यासाठी जमीनदारी विकत घेण्यामध्ये फारसा फायदा दिसत नसावा असे वाटते;[४८] परंतु ग्रामीण सावकार अधून-मधून आपल्या भांडवलाचे जमीनदारी हक्कांमध्ये रूपांतर करीत असत.[४९] भूमि-अधिकारांच्या या खरेदी-विक्रीमुळे जमीनदार वर्गाच्या बहुजिनसीपणातच वाढ झाली (आतापर्यंत हा वर्ग प्रमुख सुस्पष्ट जाती व घराणी यांनीच बनलेला असे), असे नव्हे तर एकूण जमीनदार वर्गाच्या हाताशी फार मोठे 'भांडवल' ही उपलब्ध झाले.[५०] त्याच्या योगे जमीनदारांना एकतर नवीन शेतकरी वसाहती संघटित करून आपल्या अधिकाराखालील क्षेत्र वाढविणे शक्य झाले असले पाहिजे; किंवा प्रस्थापित शेतकऱ्यांचे अधिकार विकत घेऊन त्यांचे जमीनदारीमध्ये रूपांतर करिता आले असले पाहिजे[५१]

दुसरी गोष्ट अशी की, आर्थिक स्थितीतील वाढती तफावत आणि शेतकरी वर्गातील वाढते सामाजिक स्तरीकरण यांमुळे मुकद्दम, गावप्रमुख इत्यादींसारखा एक वर्चस्वधारी वर्ग उदयास

---

४४. कित्ता, पृ. १४३—१४४. तसेच, पाहा: काझी आला, 'रिसाला अहकाम अल अराजी,' हस्तलिखित, अलीगढ, अब्दुस्सलाम, 'अराबिया' (४): ३३१/१०१, एफ. ४४ ए. हा ग्रंथ अठराव्या शतकाच्या प्रारंभी लिहिण्यात आला होता.

४५. इ. हबीब, पृ. १४१—१४३.

४६. कित्ता, पृ. १५७—१५८; 'इंएसोहिरि', ४ (३), पृ. २१६.

४७. ताइन पाहा: एस्. नूरुल हसन, 'इंएसोहिरि', १ (४), पृ. ९. अशा देवघेवीच्या व्यवहारासंबंधीच्या कागदोपत्री पुराव्यासाठी पाहा: मुन्शी मुझफ्फर हुसैन, 'नामाए मुझफ्फरी' (उर्दू), १, पृ. ३१५ आणि २, पृ. २६३; शम्साबाद डॉक्युमेंट्स, ७ (अलीगढच्या ग्रंथालयातील इतिहास विभागातील छायाचित्रे); इ. हबीब, पृ. ३०९ आणि त्यानंतरची पृष्ठे; 'इंएसोहिरि', ४ (३), पृ. २१७.

४८. ताइन पाहा: 'इंग्लिश फॅक्टरीज इन इंडिया (१६६८—१६६९)', सं. डब्ल्यू. फॉस्टर, पृ. १८४. या ग्रंथातील सुरतेहून १६६९ साली इंग्रज कारखानदारांनी धाडलेला अहवाल.

४९. 'इंएसोहिरि', ४ (३), पृ. २१६—२१७; 'कंपॅरेटिव्ह स्टडीज इन सोसायटी ॲंड हिस्टरी', ६ (४), पृ. ३९८.

५०. 'इंएसोहिरि', (३) पृ. २१५.

५१. 'कित्ता, पृ. २१५—२१६.

आला असण्याची शक्यता आहे. या वर्गाच्या हक्कांतून कालांतराने जमीनदाराचे अधिकार निर्माण झाले असले पाहिजेत.[५२]

अशा प्रकारे आपण 'अ' वर्गात समाविष्ट केलेल्या प्रकारांचे शोषण मुगल काळात हळूहळू तीव्र बनत गेले असण्याची आणि त्यामुळे शेतकऱ्यांकडून केल्या जाणाऱ्या शेतीत पेचप्रसंग निर्माण झाला असण्याची फार मोठी शक्यता आहे. शेतकऱ्यांनी जमीन सोडून पळून जाणे ही सतराव्या शतकात एक नित्याची गोष्ट होऊन बसली होती हे आपल्याला माहीत आहे. भारतीय व परदेशी निरीक्षकांनीही या बाबीची नोंद करून ठेवली आहे. या कालखंडात शेतीच्या लागवडीत एकूण घट झाली असण्याची दाट शक्यता आहे.[५३]

शेतकऱ्यांकडून कसल्या जाणाऱ्या शेतीच्या विनाशामुळे भांडवलशाही अथवा अर्धभांडवल-शाही शेतीचा मार्ग खुला होण्याची शक्यता असतेही आणि नसतेही. काही सोव्हिएट लेखक असे गृहीत धरून चाललेले दिसतात की जमीनदारी-अधिकारांमध्येच 'भांडवलशाही खासगी संपत्ती'ची बीजे विद्यमान असतात.[५४] हा प्रश्न अधिक निश्चित स्वरूपात मांडला पाहिजे, असे मला वाटते. शेतकरी-शेतीच्या विनाशामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेचा केवळ ह्रासच झाला असे नव्हे तर त्यायोगे कृषिभूमिविषयक शोषण 'अ' प्रकारातून 'ब' प्रकारामध्ये रूपांतरित झाले असे म्हणता येणार नाही काय? कारण अशा प्रकारच्या बदलामुळेच कृषि-उत्पादनातील भांडवलशाही संबंध आणि त्यांच्यामुळे 'भांडवलशाही संपत्ती' यांचा विकास घडून येऊ शकतो.[५५]

'ब' प्रकारामध्ये ज्यांचा समावेश करता येईल असे दोन प्रमुख वर्ग सर्वांत अधिक व्यापक प्रमाणावर विद्यमान होते असे दिसते. ते असे: (क) फळबागा, आणि (ख) खुद्द वरच्या वर्गाकडून केली जाणारी शेतजमिनीची प्रत्यक्ष लागवड किंवा मशागत (खुदकाश्त).

समाजातील बहुतेक सर्वच उच्च वर्गातील मंडळींनी फळबागा लावल्या होत्या. स्वतः बादशाह, राजपुत्र व सरदार, वतनदार, जमीनदार, गावप्रमुख, आणि (श्रीमंत?) शेतकरीदेखील फळबागा लावीत असत.[५६] अशा प्रकारे फळबागाइतीत गुंतविले जाणारे 'भांडवल' हे केवळ ग्रामीण भागातूनच नव्हे तर बाहेरूनही येत असे. या भांडवलाचे प्रमाण व आर्थिक महत्त्व कमी लेखता कामा नये. राजा व त्याचे सरदार ज्या फळबागा लावीत असत त्या केवळ स्वतःच्या उपयोगासाठी लागणारी फळे मिळावीत म्हणूनच लावीत नसत तर (आणि मुख्यतः) ती फळे बाजारात विकता यावीत असाही उद्देश त्या मागे असे. हे फळविक्रीचे काम प्रत्यक्षपणे ते स्वतः करीत किंवा धंदेवाईक कंत्राटदारांना एकेका मोसमाची फळे विकण्याचा मक्ता देत.[५७]

---

५२. इ. हबीब, पृ. १३३—१३४.

५३. इ. हबीब, पृ. १२४—१२९.

५४. पावलोव्ह, 'इंडियन कॅपिटॅलिस्ट क्लास', पृ. ४-९. के. एफ्. अशर्फीन, 'दि ॲग्रेरियन सिस्टम ऑफ नॉर्थ इंडिया इन दि थर्टीन्थ—मिड्-एटीन्थ सेंचरीज', (रशियन; मॉस्को, १९६१), यांनीही असेच मत असावे असे दिसते. दुर्दैवाने मला रशियन भाषा येत नसल्यामुळे जुन्या कागदपत्रांच्या आधारे या पुस्तकात करण्यात आलेल्या युक्तिवादाचा तपशील मला नीट समजू शकला नाही.

५५. हा युक्तिवाद बिगर मार्क्सिस्टांना मान्य होईलच असे नाही; परंतु सोव्हिएट विद्वानांना यातील न्याय्यता अधिक सहजपणे आकलन व्हावी.

५६. इ. हबीब पृ. ४९-४९, ३०३; 'इंएसोहिरि', ४ (३), पृ. २१५.

५७. इ. हबीब पृ. ४९.

त्यांच्या बागांतील गुंतवणूक आणि त्यांपासून त्यांना मिळणारे उत्पन्न या दोहोंचे प्रमाण पुष्कळच मोठ असे. कारण ते वेगवेगळ्या प्रदेशांतील फळांची लागवड करीत. त्यांचे बियाणे व माळीही ते बाहेरून आणवीत, पाटबंधाऱ्यांच्या खर्चिक योजना ते अमलात आणीत आणि कलमांच्या तंत्रांना प्रोत्साहन देऊन फळांच्या (विशेषत : आंबे व संत्री यांच्या) जातींत सुधारणा घडवून आणीत.[५८] शहरी बाजारपेठेचे आकर्षण आणि शेतसाऱ्यातील सवलती[५९] यांच्यामुळेही शहरी वर्गांना, विशेषतः वतनदार व जमीनदार यांना, फळबागाईत करण्यास प्रोत्साहन मिळाले असले पाहिजे. नव्या जगातून आणलेली काही नवीन फळे (उदाहरणार्थ, अननस) येथील वातावरणात झपाट्याने रुजल्यामुळेही[६०] काही भागांत फळबागाइतीचा विस्तार होण्यास मदत झाली असली पाहिजे.

तथापि, फळबागाइतीचा विस्तार कितीही झाला असला तरी किसान शेतीला पर्याय म्हणून फळबागाईत केव्हाही समजण्यात आली असण्याची शक्यता दिसत नाही. तिच्या विस्तारामुळे बाजारासंबंधी आणि ग्रामीण भागातील विक्रेय वस्तूंचे उत्पादन यांच्या वाढीवर पुष्कळ प्रकाश पडत असला तरी फळबागायतीचा भांडवलशाही शेतीच्या निर्मितीच्या दृष्टीने फारच थोडा प्रभाव पडला. या दृष्टीने पाहाता, 'ब' वर्गातील आपण वर पाहिलेल्या खुदकाश्त म्हणजे स्वतः शेती करण्याच्या दुसऱ्या प्रकाराला कितीतरी अधिक महत्त्व आहे.

'खुदकाश्त' या संज्ञेचा शब्दशः अर्थ 'स्वतः कसलेली' असा होतो. परंतु तिला एक निश्चित असा वेगळा तांत्रिक अर्थ प्राप्त झालेला आहे.[६१] एका विश्वसनीय हकीगतीमध्ये असे नमूद करण्यात आलेले आहे की, 'खुदकाश्त' शेती करणारे म्होरके "मजुरांना आपले नोकर म्हणून कामाला लावतात आणि त्यांच्याकडून शेतीची कामे करवून घेतात. नांगरणी, पेरणी, कापणी करणे व विहिरीतून पाणी काढणे यांसारखी कामे करण्याबद्दल ते त्यांना ठराविक मोबदला देतात. हा मोबदला रोख रकमेच्या किंवा धान्याच्या रूपात दिला जातो. अशा प्रकारच्या शेतीपासून मिळणारे एकूण उत्पन्न ते स्वतः घेतात."[६२]

खुदकाश्त शेतीचे सर्वांत उद्बोधक वैशिष्ट्य म्हणजे मजुरी देऊन काम करून घ्यावयाचा प्रकार हे होय. मुगल भारतात गुलामगिरी विद्यमान असली तरी ती जवळजवळ सर्वत्रच घरगुती स्वरूपाची होती. काही वेळा शेतीमध्ये अर्ध-गुलामीच्या स्वरूपाचे संबंध विद्यमान असत. परंतु ते केवळ काही विशिष्ट प्रदेशांत असत. उदाहरणार्थ, बिहारच्या काही भागांत ते होते. शेतीच्या किंवा तत्सम कामांसाठी मजुरांकडून वेठ किंवा जबरी सेवा करवून घेतली जात नसे.

---

५८. कित्ता, पृ. ५०—५१.

५९. कित्ता, पृ. २४४—२४५.

६०. कित्ता, पृ. ५०.

६१. मुगल काळातील या संज्ञेच्या वापरासाठी पाहा : इ. हबीब, पृ. ११४—११५, १५७, ३००, ३०३ आणि त्यानंतरची पृष्ठे.

६२. 'दीवान-पसन्द', हस्तलिखित, ब्रिटिश म्यूझियम, Or. 2011, f. 8 a, एकोणिसाव्या शतकाच्या पहिल्या दशकात लिहिल्या गेलेल्या या फारसी ग्रंथात दोआबातील शेतीची परिस्थिती व महसूलपद्धती यांचे वर्णन करण्यात आलेले आहे. ज्या काळात ब्रिटिशांनी या प्रदेशावर आपला अंमल प्रस्थापित केला होता, जवळजवळ त्याच काळातील हे वर्णन आहे. त्यातील अनेक विधाने मुगल काळाच्या अधिकारी व्यक्तींनी केलेल्या विधानांशी जुळणारी आहेत.

(याला बहुधा काश्मीर हा अपवाद असावा). ही वेठ मुख्यतः सामानसुमान वाहून नेण्यापुरती किंवा इतर बिगर-आर्थिक कामांपुरती मर्यादित असे.[६३] उत्पादनामध्ये गुलाम मजुरांचा वापर त्या मानाने जवळ जवळ नव्हताच असे म्हटले तरी चालेल. याचे कारण बहुधा असे सांगता येईल की या देशात भूमिहीन मजुरांचा एक प्रचंड वर्ग विद्यमान होता. त्यांच्या जेमतेम पोटा-पाण्याच्या गरजा भागतील एवढी तरतूद केली की ते शेतांत कामाला येत असत. मुबलक शेत-जमीन असूनही हा एवढा मोठा वर्ग विद्यमान होता याचे कारण मूलतः किंवा प्रमुखतः किसान-शेती पद्धतीच्या अपयशात नसून रूढी व तिची दंडेलशाही यांवर अधिष्ठित असलेल्या सामाजिक रचनेत होते. हे भूमिहीन लोक खालच्या जातींतील होते. शेतकरी व त्यांच्या वरच्या वर्गातील जमीनदार यांच्या हितसंबंधांचे रक्षण करण्यास त्यांना भाग पाडण्यात आलेले होते. त्यामुळे त्यांचा श्रमिकसदृश असा एक मोठा ग्रामीण वर्ग बनला होता. हा वर्ग पूर्णपणे अर्थशास्त्र-बाह्य (पारंपरिक सामाजिक) प्रेरणांमुळेच टिकून राहिलेला होता.[६४] तथापि, कालांतराने ज्यांनी आपल्या जमिनीचा शेतसारा देणे अशक्य झाल्यामुळे स्वतःच्या शेतीची कसणूक करणे सोडून दिले अशा वरच्या जातींतील शेतकऱ्यांची त्यात भर पडली असली पाहिजे.

ग्रामीण मजुरांच्या या वर्गाची निर्मिती मुगल काळात झालेली नव्हती; तर तो अनेक शतकांचा वारसा होता. वरच्या वर्गातील लोकांकडून केल्या जाणाऱ्या शेतीचे प्रमाणही पूर्वीपासून कमी होत आले असले पाहिजे. त्याचे ओझरते दर्शन आपल्याला त्या काळात अधूनमधून घडते.[६५] नैसर्गिक अर्थव्यवस्थेत किंवा जेथे उत्पादन हे प्रत्यक्ष उपयोगासाठी होत असे तेथे ते सहज-पणे विद्यमान असले पाहिजे. परंतु मुगल कालीन भारतात अशा प्रकारची वरच्या वर्गाची किंवा खुदकाश्त शेती बाजारपेठेशी जोडली गेली असावी आणि अशा प्रकारे तिच्यामध्ये 'विक्रेय वस्तूंचे उत्पादन' हा भांडवलशाही शेतीचा आणखी एक महत्त्वाचा घटक समाविष्ट झाला असावा, असे मानण्यास सबळ पुरावा आहे.

नगदी पिकांच्या लागवडीसाठी सामान्यतः अधिक मोठ्या गुंतवणुकीची कशी गरज असे हे आपण वर पाहिलेच आहे. ही गुंतवणूक सामान्य शेतकऱ्याला परवडण्यासारखी नसे. त्यामुळे अशा प्रकारची पिके काढण्यासाठी मोठ्या प्रमाणावर शेती करावी लागत असली पाहिजे आणि त्यामुळे ही शेती लहान शेतकऱ्यांच्या शेतीपेक्षा आर्थिक दृष्ट्या श्रेष्ठ ठरत असली पाहिजे. त्याच प्रमाणे बड्या लोकांना कर्ज व[६६] बाजारपेठ[६७] मिळविणेही अधिक सुलभ जात असले पाहिजे. ज्या वेळी बयाना या निळीच्या व्यापाराच्या मोठ्या केंद्रातील 'श्रीमंत व मातबर व्यापारी'

---

६३. इ. हबीब, पृ. २३९; ग्रोव्हर, 'इंएनेहिहिरे', १ (१), पृ. १९. बिहारमधील शेतकऱ्यांच्या कर्ज-विषयक गुलामीसंबंधीच्या पुराव्यासाठी पाहा: 'जर्नल ऑफ बिहार रिसर्च सोसायटी', ४४ (१९५८) (१ व २), पृ. ५०—५१.

६४. इ. हबीब, पृ. १२०—१२२; टी. रायचौधुरी, 'इन्क्वायरी', अनिर्दिष्ट २ (१), पृ. ९७—९७.

६५. ताडून पाहा: रायचौधुरी, 'इन्क्वायरी', N. S. २ (१), पृ. ३८—४०, ५४—५६.

६६. जमीनदार आणि सावकार यांच्यातील घनिष्ठ संबंधांसाठी पाहा: 'कंपॅरेटिव्ह स्टडीज इन सोसायटी अँड हिस्टरी', ६ (४), पृ. ३९८.

६७. १६३० साली भडोच जवळील एका गावप्रमुखाने (पटेलाने) १००० गुजराती मण (=३३,१९० पौंड) गहू सुरतेला नेऊन पुरविण्यासंबंधी इंग्रजांशी बोलणी केली होती. यांपैकी निम्मा गहू त्या पटेलाचा स्वतःचा होता आणि बाकीचा इतर गावकऱ्यांचा होता ('इंग्लिश फॅक्टरीज इन इंडिया, १६३०-१६३३', पृ. ९९)

शेतकरी बनले आणि ते ज्या विक्रेय वस्तूचा व्यापार करीत असत तिचे उत्पादन करू लागले,[६८] त्या वेळी उच्च प्रतीच्या शेतीच्या वाणिज्यीकरणाने शेवटचे टोक गाठले. खुदकाश्त शेतीचे वर्णन करताना ज्या रोखीच्या मजुरीचा उल्लेख वर करण्यात आला आहे ती मजुरी, शेतमालकांना आपल्या उत्पादनाचा निदान काही भाग बाजारात नेऊन विकल्याखेरीज देता आली नसती हे उघड आहे

खुदकाश्त शेती करणारे वर्ग मुख्यतः जमीनदार, गावप्रमुख आणि वतनदार व जमीनमहसूल खात्यातील अधिकारी असत. [६९] ज्या सरदार-वर्गातील लोक बागायती शेतीमध्ये इतका रस घेत असत त्यांनी सर्वसामान्य जिरायती शेतवाडया निर्माण करण्याकडे कधीच लक्ष दिले नाही, असे म्हणण्यास हरकत नाही. शेतीतील स्वारस्याचा हा अभाव बागायती व जिरायती शेतीसंबंधीच्या समकालीन फारसी ग्रंथांतूनही प्रतिबिंबित झालेला आढळतो. त्यांमध्ये बागायती शेतीच्या विवेचनाला पुष्कळच जागा दिलेली असून त्या मानाने जिरायती शेतीला फार थोडी जागा दिली आहे.[७०] बयाना येथील व्यापारी–शेतकऱ्यांसारखे लोकही याला अपवाद होते; आणि सर्वसामान्यपणे व्यापारी वर्गांनी शेतकरी म्हणून या क्षेत्रात प्रवेश केला असल्याचे दिसून येत नाही. म्हणून स्थूल मानाने खुदकाश्त शेतीसाठी लागणारे भांडवल खुद्द ग्रामीण भागातील वरच्या वर्गांच्या संचयातूनच येत असे, असे समजण्यास हरकत नाही.

दुर्दैवाने, खुदकाश्त शेतीखाली असलेले क्षेत्र अथवा त्याचा विस्तार यांसंबंधी आपल्याजवळ आकडेवार माहिती उपलब्ध नाही. त्याचा खरोखरीच विस्तार झाला असला पाहिजे, आणि हा विस्तार होत असता किसानशेतीवर त्याचे दडपण आले असले पाहिजे. ही गोष्ट वतनदारांनी व महसूल अधिकाऱ्यांनी अशा शेतीचे (रैयतकाश्तचे) रूपांतर खुदकाश्त शेतीत करण्यावर सरकारने जी बंदी घातली होती तिच्यावरून सूचित होते.[७१]

विक्रेय वस्तूंच्या उत्पादनासाठी संघटित केलेली खुदकाश्त शेती ही जवळ–जवळ भांडवलशाही शेतीसारखीच आहे. त्यामुळे रैयतकाश्त शेतीचे नुकसान करून खुदकाश्त शेतीचा झालेला विस्तार आपल्या दृष्टीने फार उल्लेखनीय ठरला असता. परंतु असा विस्तार फार मोठ्या प्रमाणावर घडून आलेला नसावा, असे समजण्यास काही सबळ कारणे आहेत.

पहिली गोष्ट अशी की, जमीनमहसुलासारख्या इतर बाबी दोन्ही प्रकारच्या शेतींमध्ये सारख्याच असल्यामुळे नगदी पिकांव्यतिरिक्त इतर पिकांच्या बाबतीत खुदकाश्त शेतीची दर एकरी उत्पादनाच्या दृष्टीने रैयतकाश्त शेतीशी तुलना होऊ शकत असेल असे वाटत नाही.

---

६८. पेल्झार्ट, ‘रेमॉन्स्ट्रॅन्टी’, मोरलँड व गील यांच्या ‘जहांगीर्स इंडिया’, (कॅम्ब्रिज, १९२५) मधील अनुवाद, पृ. १७.

६९. इ. हबीब, पृ. ११४–११५, १४१, १७५, ३००, ३०३ आणि नंतरची पृष्ठे. जे शेतकरी आपल्या स्वतःच्या खेड्यात शेती करीत असत त्यांना (सध्या उपलब्ध असलेल्या पुराव्याच्या आधारे, मुगल सत्तेनंतरच्या काळात) खुदकाश्त शेतकरी असे म्हणत असत; आणि जे लोक आपल्या गावाबाहेरच्या क्षेत्रात, दुसऱ्या गावांतील शेती करीत त्यांना पाएकाश्त अशी संज्ञा असे. (पाहा: ग्रोन्हर, ‘इंएसोहिरि’ १ (१), पृ. ४–५). अर्थात आपण या ठिकाणी ज्या खुदकाश्त शेतीचा विचार करीत आहोत तिच्याशी या वाक्प्रयोगांचा काही संबंध नाही.

७०. पाहा: ‘नुस्खा दर फन-ए-फलाहात’, हस्तलिखित, १. O. ४७०२; आणि अलीगढ लिटन फार्सिया उलुम, ५१. हा ग्रंथ अमानुल्ला हुसैनी खानाजाद खान या मातबर सरदाराने सतराव्या शतकाच्या पूर्वार्धात लिहिला होता.

७१ इ. हबीब, पृ. ११४-११५.

शिवाय, खुदकाश्त शेतीमध्ये नगदी पिके घेतली जावोत किंवा सामान्य पिके घेतली जावोत, तिचा विस्तार झाल्यानंतर तिच्यावरील वैयक्तिक देखरेख कमी-कमी आणि कमी परिणामकारक होत गेली असली पाहिजे. त्यामुळे खुदकाश्त शेतीच्या वैयक्तिक घटकांचा विस्तार एका विशिष्ट आकाराच्या पलीकडे गेल्यानंतर ती बिनकिफायतशीर होत असली पाहिजे. शेवटची गोष्ट अशी की, खुदकाश्त शेतीसाठी लागणारे सारे 'भांडवल' केवळ ग्रामीण वर्गातूनच येत असल्यामुळे जिच्यामध्ये खूप मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक केली जात असे अशा राजे लोकांच्या व वरिष्ठ वर्गांच्या ताब्यातील बागायती शेतीप्रमाणे या खुदकाश्त शेतीच्या उत्पादनात खूप सुधारणा घडून येणेही शक्य नव्हते.

म्हणून, विक्रेय वस्तूंच्या व्यापक उत्पादनाच्या परिस्थितीत प्रत्यक्ष विनियोगाच्या (प्रकार 'अ') वाढत्या प्रचंड दडपणामुळे नियंत्रणाच्या द्वारे उत्पादनाच्या विनियोगात (प्रकार 'ब') भरीव किंवा निर्णायक वाढ झाली असे म्हणता येणार नाही. दुसऱ्या शब्दांत सांगावयाचे तर रैयतकाश्त शेतीच्या ऱ्हासामुळे प्रत्यक्षपणे अर्धभांडवलशाही पद्धतीच्या शेतीचा उदय झाला नाही. त्याऐवजी असे घडलेले दिसते की, आर्थिक पेचप्रसंगाचे रूपांतर राजकीय पेचप्रसंगात झाले आणि शेतकऱ्यांनी बंडे करण्यास सुरुवात केली. शेतकऱ्यांची ही बंडे बहुधा जमीनदारांच्या नेतृत्वाखाली होत असत. त्याचा परिणाम म्हणून सरतेशेवटी मुगल साम्राज्य ढासळले आणि त्या साम्राज्याने टिकवून धरलेल्या आर्थिक व सामाजिक रचनेतील काही पैलू दुबळे बनले.[७२] याला समांतर अशा घटना चीनच्या इतिहासातही पाहावयास मिळतात, हे लक्षात ठेवण्यासारखे आहे. तेथेही शेतीतील वारंवार उद्भवलेल्या पेचप्रसंगांतून मोठमोठ्या शेतकरी-बंडांची चक्रे सुरू झाली आणि त्यांनी अनेक राजघराण्यांना पदच्युत केले. परंतु त्यातून भांडवलशाहीचा मात्र उदय झाला नाही.[७३]

## २

आता आपण कृषि-अर्थव्यवस्थेकडून कृष्येतर (बिगर शेतीच्या) क्षेत्राकडे वळू. भांडवलशाहीमुळे कृष्येतर (औद्योगिक) उत्पादनामध्ये डोळ्यात भरण्यासारखी वाढ होते. त्यामुळे कृषिक्षेत्र व कृष्येतर क्षेत्र यांच्यांतील संबंधांत भांडवलशाहीमुळे मूलभूत बदल घडून येतो. म्हणून अर्थव्यवस्थेच्या कृष्येतर क्षेत्रात विद्यमान असलेल्या परिस्थितीत भांडवलशाहीच्या प्रारंभाच्या कोणत्या खुणा (किंवा निदान तिची बीजे) आढळतात ते पाहणे स्वाभाविक ठरेल.

मुगलकालीन भारताच्या आर्थिक इतिहासाचे अध्ययन करणाऱ्याला ज्या अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते त्यांपैकी एक महत्त्वाची अडचण म्हणजे परिमाणात्मक माहितीचा, विशेषत: जनगणनाविषयक कोणत्याही प्रकारच्या आकडेवारीचा (census data) अभाव ही होय. सर्वसामान्य शिरगणतीचे आकडे जेथे मिळत नाहीत तेथे व्यवसाय, उत्पन्न अथवा संपत्ती यांच्याशी संबंधित आकडेवारी कोठून मिळणार? त्यामुळे आपल्याजवळ उपलब्ध असलेल्या पुराव्याच्या आधारे कृष्येतर क्षेत्रावर अवलंबून असणाऱ्या लोकांची तुलनात्मक संख्या,

---

७२. यासंबंधीच्या तपशीलवार विवेचनासाठी पाहा : इ. हबीब, पृ. ३१७-३५१.

७३. या सूक्ष्म अवलोकनाचे श्रेय माओत्से तुंग यांना आहे. पाहा : 'सिलेक्टेड वर्क्स', इंग्रजी आवृत्ती, खंड ३, लंडन, १९५४. पृ. ७५-७६.

आणि शहरांत राहाणाऱ्या किंवा हस्तव्यवसायांत गुंतलेल्या लोकांचे प्रमाण काय असेल हे आपल्याला निश्चितपणे सांगता आले नाही तर त्यात काही आश्चर्य नाही. म्हणून प्रामुख्याने अप्रत्यक्ष स्वरूपाच्या असणाऱ्या दुसऱ्या प्रकारच्या पुराव्यावरून जे निष्कर्ष काढता येतील तेच काढणे भाग आहे.

शेतकऱ्यांकडून जमीनमहसूल, इतर कर आणि वरिष्ठ वर्गांचे हक्क यांच्या रूपात जे अतिरिक्त उत्पादन काढून घेतले जाई ते बहुतेक प्रदेशांमध्ये एकूण उत्पादनाच्या जवळजवळ निम्मे असे. स्थूल मानाने याचा अर्थ असा करता येईल, की शेतीच्या उत्पादनातून जितक्या लोकांचे उदरभरण शेतीच्या क्षेत्रात होत असे तितक्याच लोकांचे उदरभरण शेतीच्या क्षेत्राबाहेर होत असे; किंवा दुसऱ्या शब्दांत सांगावयाचे तर कृष्येतर क्षेत्रातील लोकांची संख्या एकूण लोकसंख्येच्या निम्मी होती. यावरून कोणाचाही असा ग्रह होण्याची शक्यता आहे, की अतिरिक्त उत्पादनाचे बाह्य किंवा भौतिक स्वरूप शेतकरी व शेतमजूर यांच्या उदरनिर्वाहासाठी उरलेल्या निम्म्या भागाच्या स्वरूपासारखेच असावे. परंतु प्रत्यक्षामध्ये अशी स्थिती नसे. शेतकऱ्यांकडून अतिरिक्त उत्पादनाचा जो भाग काढून घेतला जाई त्यामध्ये अधिकांशतः उच्च प्रकारची अन्नधान्ये (उदाहरणार्थ, गहू, उत्तम प्रतीचा तांदूळ इत्यादि), चैनीसाठी वापरले जाणारे पदार्थ (साखर, अफू, उच्च प्रतीचा तंबाखू) आणि कच्चा माल (कापूस, नीळ, तीळ, वगैरे) यांचा समावेश असे. नगदी पिकांना भरपूर किंमत येत असल्यामुळे एका एकरात लावलेल्या सामान्य अन्नधान्यांच्या पिकांपेक्षा या पिकांपासून पुष्कळच अधिक पैसा मिळत असला पाहिजे, हे लक्षात ठेवले पाहिजे. ही गोष्ट खाली दिलेल्या तक्त्यावरून स्पष्ट होईल. एकाच क्षेत्रामध्ये १५९५ ते १९२२ या वर्षांतील वेगवेगळ्या पिकांपासून किती रक्कम मिळाली त्याची तुलनात्मक माहिती त्यात दिलेली आहे.[१]

| | अन्न-धान्ये | | | नगदी पिके | |
|---|---|---|---|---|---|
| | १५९५ | १९२२ | | १५९५ | १९२२ |
| गहू | १००·० | १००·० | गहू | १००·० | १००·० |
| तांदूळ | ८२·५ | ६६·६ ते ७७·७ | कापूस | १५३·० | ६६·६ ते ७७·७ |
| सातू | ६५·३ | ५५·५ | तीळ | ७६·९ | ४४·४ |
| बाजरी | ३८·४ | ४४·४ | ऊस (सामान्य) | २११·५ | अप्राप्य |

या तक्त्यावरून असे दिसून येते, की १५९५ साली नगदी पिकांपासून दर एकरी मिळणारे उत्पन्न गव्हापासून मिळणाऱ्या उत्पन्नापेक्षा कितीतरी अधिक होते, आणि गव्हापासून मिळणारे उत्पन्न इतर अन्नधान्यांपासून मिळणाऱ्या उत्पन्नाहून पुष्कळच अधिक होते, एवढेच

१. इ. हबीब, पृ. ४३२. 'ऐने अकबरी' या ग्रंथात प्रत्येक विभागासाठी वेगवेगळ्या पिकांकरिता मंजूर केलेल्या जमीन महसुलाचे रोखीचे दर देण्यात आले आहेत. या तक्त्यात दिलेले १५९५ व १९२२ या सालांसाठी असलेले दर उत्तर प्रदेशच्या मेरठ जिल्ह्यातील आहेत. इतर विभागांतील परिस्थितीचे सर्वसामान्य चित्र जवळ जवळ असेच आहे. पाहा : मोरलँड, 'इंडिया अॅट दि डेथ ऑफ अकबर', जर्नल ऑफ दि रॉयल एशियाटिक सोसायटी (जरॉएसो) १९१८ पृ. ३७५–३८५

नव्हे तर नगदी पिकांपासून मिळणारे उत्पन्न तुलनात्मक दृष्ट्या या शतकापेक्षा १५९५ साली कितीतरी जास्त होते.[२] याचा अर्थ असा, की नगदी पिकाखाली असणाऱ्या अन्नक्षेत्रातून मिळणारे उत्पन्न एकूण उत्पादनाच्या प्रमाणात खूपच अधिक असले पाहिजे. उदाहरणार्थ, पूर्व राजस्थानच्या एका परगण्यामध्ये १६९० सालच्या खरीपाच्या मोसमात ऊस व कापूस या नगदी पिकांखाली असणारे क्षेत्र त्या वेळी एकूण लागवडीखालील पिकांच्या क्षेत्राच्या ८ टक्के होते आणि अन्नधान्यांच्या लागवडीखालील क्षेत्र ७२·९ टक्के होते. परंतु त्यांच्या एकूण उत्पादनाचे मूल्य मात्र अनुक्रमे ३२·६ टक्के आणि ६०·६ टक्के होते.[३]

अतिरिक्त उत्पादनाच्या भौतिक स्वरूपातील फरकाचा, विशेषत: त्यामध्ये अन्नधान्याचा घटक कमी झालेला असेल तर त्याचा कृष्येतर लोकसंख्येचा आकार व तिची रचना (composition) यांवर पुष्कळच परिणाम होत असला पाहिजे. अतिरिक्त उत्पादनातील अन्नधान्याचा घटक हा जवळजवळ उदरनिर्वाहासाठी राखून ठेवलेल्या उत्पादनातील घटकाइतकाच असेल तर त्यातून पुढील निष्कर्ष निघतात : (अ) कृष्येतर लोकसंख्येचे प्रमाण स्थूल मानाने कृषिनिर्भर लोकसंख्येच्या प्रमाणाइतकेच असले पाहिजे; कारण उत्पादनाचा अतिरिक्त भाग हा उदरनिर्वाहासाठी राखून ठेवलेल्या भागाइतकाच असे, आणि त्याव्यतिरिक्त उत्पादनाची उपयोग–पातळी जवळजवळ निर्वाह–पातळी एवढीच असे. (ब) औद्योगिक किंवा हस्तोद्योगांच्या उत्पादनात गुंतलेल्या लोकांची संख्या फारच लहान असली पाहिजे; कारण, शेतकऱ्यांच्या गरजा भागविण्यासाठी राखून ठेवलेल्या कच्च्या मालाचे प्रमाण अतिरिक्त उत्पादनातून ज्यांचा निर्वाह होत असे अशा लोकांच्या गरजा भागविण्यासाठी लागणाऱ्या कच्च्या मालाच्या प्रमाणाइतकेच जवळजवळ असले पाहिजे आणि (क) म्हणून कृष्येतर क्षेत्रातील लोकसंख्येचा फार मोठा भाग अनुत्पादक श्रम किंवा वैयक्तिक सेवा–चाकरी करण्यात गुंतलेला असला पाहिजे. त्यामुळे हे लोक खूपच विखुरलेले आणि नागरीकरण झालेले असले पाहिजेत. हा पहिला टप्पा आहे, असे आपण म्हणू. परंतु याच्या उलट अतिरिक्त उत्पादनात नगदी पिकांचे प्रमाण अधिक असेल–आणि आपण वर पाहिल्याप्रमाणे, अगदी लहान क्षेत्रातून खूप अधिक उत्पन्न देणारे पीक नियत असले पाहिजे–तर त्याचे निष्कर्ष पुढीलप्रमाणे निघतील : (अ) लोकसंख्येच्या परिभाषेत कृष्येतर क्षेत्रातील लोकांची संख्या अतिरिक्त कृषिउत्पादनावर योग्य प्रकारे अवलंबून राहणाऱ्या अशा लोकांच्या संख्येपेक्षा खूपच कमी असली पाहिजे; (ब) या लोकसंख्येचा खूपच मोठा भाग उत्पादक परिश्रमात (हस्तोद्योगात) गुंतलेला असला पाहिजे; आणि (क) कृष्येतर लोकांची संख्या संभवत: शहरांमध्येच केंद्रित होत असली पाहिजे, आणि म्हणून नागरी लोकसंख्येचे प्रमाण पुष्कळच मोठे असले पाहिजे.

लोकशाहीच्या उदयाच्या दृष्टीने पाहिल्यास पहिला टप्पा अधिक मागसलेला टप्पा समजला पाहिजे आणि दुसरा टप्पा सुरू झाल्याखेरीज कृष्येतर उत्पादनाचा मोठा विकास घडून

२. उसाचे उत्पादन आणि त्याचे सापेक्ष मूल्य या गोष्टी वगळल्यास ही स्थिती कायम राहिली असल्याचे उघडपणे दिसून येते. (मोरलँड, 'इंडिया ॲट दि डेथ ऑफ अकबर' पृ. १०३–१०४)

३. (कै. श्रीमती) एस्. एन्. हसन, के. एन्. हसन आणि एस. पी. गुप्ता, 'दि पॅटर्न ऑफ ॲग्रिकल्चरल प्रॉडक्शन इन दि टेरिटरीज ऑफ आंबेर, सुमारे १६५०–१७५०'. १९६६ च्या इंडियन हिस्ट्री काँग्रेसमध्ये सादर केलेला निबंध (टंकलिखित), तक्ते क्र. १ व ५. या ठिकाणी वापरण्यात आलेले आकडे मालारणा परगण्याचे आहेत.

येणे शक्य नव्हते हे उघड आहे. कृष्येतर श्रमिकांचे (शहरांमध्ये) किमान केंद्रीकरण घडून येऊन त्यातून श्रम-बाजार (labour market) निर्माण झाल्याखेरीज भांडवलशाहीचा उदय होण्याची शक्यताच गृहीत धरिता येत नाही.

मुगल कालीन भारताची अर्थव्यवस्था कोणत्या टप्प्याला जवळची होती हे निश्चित करण्यासाठी शेतीच्या अतिरिक्त उत्पादनाचे प्रत्यक्ष भौतिक स्वरूप काय असले पाहिजे, याचा विचार करणे स्वाभाविकपणेच सर्वांत योग्य होईल. (हे अतिरिक्त उत्पादन एकूण उत्पादनाहून वेगळे असेल, हे लक्षात ठेवले पाहिजे.) तथापि या अतिरिक्त उत्पादनाचे परिणाम काय होते हे आपल्याला नक्की सांगता येत नसल्यामुळे (आपल्याजवळ उपलब्ध असलेल्या कागदपत्रांच्या साहाय्याने ते परिमाण कसे शोधून काढता येईल हे सांगणेही कठीण आहे.)[४] आपल्यासमोर केवळ एकच मार्ग उरतो. तो म्हणजे ज्या दिशांनी अतिरिक्त उत्पादनाला (किंवा अतिरिक्त उत्पादनाच्या पैशाच्या स्वरूपातील हक्कांना)वाव मिळत होता त्या दिशांचा शोध घेणे आणि ज्या मार्गांनी त्याचा वापर केला जात होता ते शोधण्याचा प्रयत्न करणे हा होय. या बाबतीतील माहिती मिळाल्यानंतर तिच्यावरून कृष्येतर क्षेत्र पहिल्या टप्प्याला अधिक जवळचे होते, की दुसऱ्या टप्प्याला, याचा निर्णय आपल्याला करता येईल. मुगल कालीन भारतात हे दोन्ही टप्पे तत्त्वत: शक्य कोटीतील होते.

पहिली गोष्ट अशी, की आपण वर पाहिल्याप्रमाणे अतिरिक्त उत्पादनाचा एक विशिष्ट अंश ग्रामीण विभागात राहात असे. जमीनदार व ग्रामप्रमुख यांची राजकोषी देणी ( fiscal dues), भत्ते, अवांतर प्राप्ती इत्यादि, सरकारी अधिकारी, खालसा व जहागिरी यांच्या महसूल खात्यातील कर्मचारी यांचे महसुलाच्या वसुलीवरील हक्क, पोटगीदारांचे उत्पन्न, सावकारांचा नफा इत्यादि स्वरूपात हा अंश ग्रामीण भागात राही. अतिरिक्त उत्पादनातील हिश्शांवर दावा सांगणाऱ्या या सर्व स्थानिक किंवा ग्रामीण हक्कदारांपैकी परिमाणात्मक दृष्टीने जमीनदार हे सर्वांत अधिक महत्त्वाचे होते. जमीनदारांकडून केल्या जाणाऱ्या खर्चाचे स्वरूप काय होते याविषयी आपल्याला फार थोडी माहिती आहे हे खरे आहे. आपल्याला जी निश्चित माहिती आहे ती एवढीच, की आपले वर्चस्व कायम टिकविण्यासाठी किंवा उच्च स्थान मिळविण्यासाठी जास्तीत जास्त नोकर, चाकर व रक्षक बाळगण्याचा आदर्श साध्य करण्याच्या दृष्टीने त्यांची जोराची धडपड चालू असे. १५९५च्या सुमारास करण्यात आलेल्या एका तपशीलवार अधिकृत शिरगणतीप्रमाणे उत्तर भारतातील मुगल साम्राज्यात असणाऱ्या जमीनदाराजवळ सुमारे ४७ लाख रक्षक (तैनाती फौज) होते. त्यांपैकी ४३ लाख पायदळ व ३ लाख घोडदळ होते. प्रत्येक लोकवस्तीचा बारकाईने विचार करून मिळविलेल्या आकड्यांवर ही संख्या आधारलेली असल्यामुळे तिच्याविषयी शंका घेण्याचे काही कारण नाही.[५] त्यांवरून जमीनदारांच्या नोकरीवर अवलंबून

---

४. ज्या वेळी रोखीचा दुवा विद्यमान होता त्या वेळच्या महसुली हिशेबांवरून आपल्याला ही माहिती मिळणार नाही. हे उघड आहे. जेथे पिकामधील वाटा देण्याची पद्धत चालू होती तेथेदेखील अशा प्रकारे गोळा केलेले उत्पादन प्रत्यक्षपणे कृष्येतर क्षेत्राकडूनच वापरले जात होते, असे गृहीत धरता येत नाही. एका प्रकारचे उत्पादन महसूल अधिकाऱ्यांकडून ग्रामीण बाजारपेठेत विकले जात असेल आणि अशा प्रकारे सरते शेवटी ते शेतकऱ्यांच्याच वापरात येत असेल; आणि मग या विक्रीतून मिळणाऱ्या पैशाचा विनियोग अगदी वेगळ्या प्रकारच्या विक्रेय शेतमालाच्या खरेदीसाठी करण्यात येत असेल, अशी शक्यता आहे.

५. इ. हबीब, १, पृ. १६३–१६४.

असणाऱ्या लोकांची संख्या विश्वास बसणार नाही, एवढी प्रचंड असल्याचे सूचित होते. प्रत्यक कुटुंबात सरासरीने ४.५ माणसे असत असे गृहीत धरले तरी अशा लोकांची संख्या २ कोटी १० लक्ष भरते. यांपैकी बरेचसे सैनिक अंशतः शिपाई व अंशतः शेतकरी असण्याची शक्यता आहे; परंतु ही गोष्ट मान्य केली तरी सदर संख्या खूपच मोठी होती हे खोटे ठरत नाही. त्या काळी मुगल साम्राज्याची एकूण लोकसंख्या केवढीही असली[6] तरी तिच्याशी या संख्येचे प्रमाण खूपच मोठे असले पाहिजे.

आपण यापूर्वी केलेल्या युक्तिवादाचा वापर केल्यास आपल्याला असे गृहीत धरता येईल, की ही प्रचंड संख्या एका वस्तुस्थितीचे द्योतन करते. ती वस्तुस्थिती अशी, की जमीनदारांच्या प्राप्तीपैकी फार मोठा भाग निर्वाह पातळीवरील उपभोगासाठी खर्च होत असे, आणि हस्तोद्योगांतून निर्माण होणाऱ्या वस्तूंसाठी कृष्येतर ग्रामीण क्षेत्रामध्ये दर डोई फार मोठी मागणी यातून निर्माण होणे शक्य नव्हते. तरीपण याचा अर्थ असा नव्हे की त्यांच्यामुळे अशा प्रकारच्या वस्तूंच्या मागणीत काहीच वाढ झाली नाही. १५९५ च्या पूर्वी उल्लेखिलेल्या आकडेवारीवरून असे दिसून येते, की बंगालच्या जमीनदारांजवळ ४२६० तोफा व ४४०० नौका होत्या.[7] आणि या वस्तूंची निर्मिती निदान काही अंशी तरी लोहार व सुतार यांच्याकडूनच झालेली होती. तरीपण सामान्याने विचार करता आपल्याला असे समजण्यास हरकत नाही, की अतिरिक्त उत्पादनाचा जो हिस्सा जमीनदार बळकावीत असत तो आपण आखलेल्या पहिल्या टप्प्याच्या परिस्थितीशी पुष्कळच मेळ खाणारा होता.

तथापि, जमीनदारांना अतिरिक्त उत्पादनाचा एक लहानसा भागच मिळत असे. या लेखाच्या पहिल्या भागात आपण असे पाहिले आहे की एकूण महसुलातील सर्व प्रकारची 'गळती' जमेस धरल्यानंतर ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या परिघातून पूर्णपणे बाहेर जाणारा महसूल संभवतः एकूण कृषि-उत्पादनाच्या निम्मा जरी नसला तरी एकचतुर्थांश किंवा एकतृतीयांश असला पाहिजे. यामुळे शेतीच्या अतिरिक्त उत्पादनावरील इतर सर्व हक्क स्वाभाविकपणेच क्षुद्र ठरत; आणि आपल्या प्रस्तुत विवेचनाच्या दृष्टीने अतिरिक्त उत्पादनाची विभागणी आणि अंतिम वितरण याच गोष्टी सर्वांत अधिक निर्णायक महत्त्वाच्या आहेत.

जमीनमहसूल आणि इतर करांपासून मिळणारे उत्पन्न यांचे वाटप प्रत्यक्षपणे एका लहानशा सत्ताधारी वर्गाच्या सदस्यांमध्ये केले जात असे. (हे वाटप महसुली नेमणुकी, जहागिरी वगैरेंच्या द्वारे केले जाई अथवा सरकारी खजिन्यातून रोख पगार देऊन केले जाई. या खजिन्यातही साम्राज्याच्या खालसा भागातून जमा होणाऱ्या महसुलांच्या रूपानेच पैसा येत असे.) या वर्गामध्ये खुद्द बादशाहाव्यतिरिक्त १६४७ च्या एका अधिकृत अंदाजानुसार ८००० मनसबदारांचा समावेश होत असे. त्यांच्यामध्येही काही लोकांकडे साधनसंपत्तीचे प्रचंड केंद्रीकरण होई. ४४५ मनसबदारांचे उत्पन्न साम्राज्याच्या एकूण महसुलाच्या ६१.५ टक्के असे; आणि त्यांच्यामध्येही केवळ ७३ लोकांकडे (म्हणजे एकूण मनसबदारांपैकी ९ टक्के लोकांकडे) एकूण महसुलापैकी ३७.६ टक्के रक्कम जमा होई.[8] बादशाहाच्या स्वतःच्या लवाजम्यासाठी (establish-

६. मोरलँड यांच्या अंदाजाप्रमाणे त्या काळच्या संपूर्ण भारताची लोकसंख्या १० कोटी होती. परंतु हा अंदाज त्यांनी प्रामुख्याने लागवडीखाली असलेल्या एकूण क्षेत्रासंबंधीच्या आपल्या अनुमानावर आधारलेला होता. त्यांचे हे अनुमान बहुधा फारच कमी असावे. ('इंडिया ॲट दि डेथ ऑफ अकबर', पृ. ९-२२).

७. इ. हबीब, पृ. १६४ आणि टीपा.

८. ए. जान कैसर, 'डिस्ट्रिब्यूशन ऑफ दि रेव्हेन्यू रिसोर्सेस ऑफ दि मुगल एम्पायर अमंग नोबिलिटी', भारतीय इतिहास काँग्रेसच्या अलाहाबाद अधिवेशनाचा (१९६७) अहवाल, पृ. २३९-२४०

ment) नेमून देण्यात आलेले उत्पन्नही (म्हणजे मनसबदारांना पगार देऊन उरलेला खालसा मुलुखाचा एकूण महसूलही) विचारात घेतल्यास हे केंद्रीकरण यापेक्षाही कितीतरी मोठे असल्याचे आढळून येईल.[९]

अशा प्रकारे जमीनमहसूल म्हणून बाजूला काढण्यात येणाऱ्या उत्पादनाच्या प्रचंड भागाचा प्रत्यक्ष वापर प्रामुख्याने हा लहानसा शासक वर्ग आपले उत्पन्न कशा प्रकारे खर्च करीत असेल त्यावर अवलंबून असे.

त्यांच्या उत्पन्नावरील पहिला हक्क सैन्याचा असे. सर्वांत वरच्या श्रेणीतील ४४५ मनसबदारांचा घोडदळासाठी होणारा खर्च त्यांच्या एकूण प्राप्तीच्या ७७·२ टक्के असे. बादशाहाच्या वतीने त्यांनी घोडदळ ठेवावे, यासाठी त्यांना ही रक्कम दिली जात असे. सर्वच्या सर्व ८००० मनसबदारांचा विचार करिता ही टक्केवारी थोडीशी कमी असण्याची शक्यता असली तरी ती फार कमी असणार नाही, असा निष्कर्ष आपण काढू शकतो.[१०] या सेनादळांवर होणारा प्रत्यक्ष खर्च अधिकृत अपेक्षेइतका क्वचितच होत असेल असे अनुमान करण्यास हरकत नाही. सरदार लोक अपेक्षेपेक्षा पुष्कळच कमी खर्च करीत असावेत असा संशय त्या वेळीही विद्यमान होता.[११] याच्या उलट सरदारांची सामान्यतः अशी तक्रार असे, की आमच्या सैनिकांना पगार देण्याची आमच्यावर निश्चित स्वरूपातील जबाबदारी असली तरी जहागिऱ्यांच्या बदल्यांमुळे आमच्या उत्पन्नात चढउतार होत असतो आणि पुष्कळ वेळा तर ते अनिश्चितही असते.[१२] त्यामुळे सरदारांचे एकूण उत्पन्न आणि सैन्यावर होणारा प्रत्यक्ष खर्च यांच्यांतील परस्परसंबंध निश्चित करणे कठीण आहे. तथापि हा खर्च उत्पन्नाच्या सुमारे दोन तृतीयांश असावा असे गृहीत धरण्यास हरकत नसावी.

ज्या उत्पादनव्यवस्थेमध्ये प्रामुख्याने आपण कल्पिलेल्या 'अ' प्रकारानुसार शोषण लादण्यात आलेले होते आणि म्हणून ती व्यवस्था अमलात आणण्यासाठी सैनिक सामर्थ्याचा वापर करण्याची अथवा त्याचे भय दाखविण्याची सतत गरज भासत असे, त्या व्यवस्थेमध्ये सैन्यदळ सज्ज ठेवण्यासाठी साधनसंपत्तीचा एवढ्या प्रचंड प्रमाणावर उपयोग करावा लागत असल्यास ते अपेक्षितच म्हटले पाहिजे. म्हणून, जमीनदारांजवळ असणारे मोठे सेनादळ आणि मुगल शासक वर्गाकडून सैन्यावर होणारा प्रचंड खर्च या गोष्टी काही अंशी त्या काळच्या आर्थिक वस्तुस्थितीवरच आधारलेल्या होत्या.

परंतु हे साम्य येथेच संपते. मुगल शासक वर्गाचा लष्करी खर्च, निश्चित आकड्यांमध्ये (absolute figures), जमीनदारांच्या लष्करी खर्चापेक्षा कितीतरी अधिक असला तरी ज्या लोकांमध्ये तो वाटला जात असे त्यांची संख्या पुष्कळच कमी असे. १६४७ सालचे उपलब्ध असलेले अविकृत आकडे सर्वांत अधिक परिपूर्ण आहेत. त्या वर्षी बादशाहाच्या स्वतःच्या हुकमतीखाली ७००० घोडेस्वार व तोड्याची बंदूक वापरणारे अश्वारोही सैनिक होते; आणि मनसब-

९. 'ऐने अकबरी' तील आकड्यांवरून बादशाहाच्या वैयक्तिक खजान्याचा खर्च एकूण अंदाजी महसुलाच्या (१५९४–१५९५) सुमारे ६ टक्के होता. ('ऐने अकबरी', सं. ब्लॉशमन, १, पृ. ९).

१०. ए. जे. कैसर, 'डिस्ट्रिब्यूशन...' पृ. २४०, २४२

११. पेल्झार्ट, 'जहांगीर्स इंडिया', अनु. मोरलँड ॲंड गील, पृ. ५४

१२. पाहा : रियाजू व वुदद, ब्रिटिश म्यूझियम Or. १७२५, f. १८ बी; 'वगाई अजमेर', प्रतिलेख, पृ. ४१३.

दारांनी पदरी बाळगलेले अंदाजे १,८५,००० घोडेस्वार होते. यांखेरीज ४०,००० पायदळ होते. त्यामध्ये 'तोडयाची बंदूक वापरणारे, गोलंदाज (बंदूकची), तोपची व अग्निबाणवर्षक' यांचा समावेश होता. त्यांपैकी १०,००० सैनिकांची नेमणूक राजधानीत केलेली होती आणि बाकीचे सैनिक वेगवेगळया प्रांतांत व किल्ल्यांवर नेमलेले होते.[१३]

लष्करी खर्चापैकी बहुधा सर्वांत अधिक रक्कम घोडदळावर खर्च होत असावी. मुगल सैन्यातील घोडेस्वार हा खरोखरी धंदेवाईक सभ्य सैनिक असे. बहुतेकदा त्याच्याजवळ एकापेक्षा अधिक घोडे असत.[१४] हे घोडे चांगल्या जातीचे असण्याची जरुरी असे. भारतातील घोडे जातींच्या बाबतीत बदनाम असल्यामुळे चांगले घोडे फार महाग पडत. अठराव्या शतकात इंग्लंड-मध्ये एका घोडयाची जी किंमत असे तिच्या चौपट किंमत अशा उत्कृष्ट घोडयासाठी भारतात द्यावी लागे;[१५] आणि इराण व मध्य आशिया या भागांतून त्यांची सतत आयात करावी लागे.[१६] घोडयांच्या आयातीमुळे स्वाभाविकपणेच भारतीय मालाला उलट मागणी निर्माण होत असली पाहिजे. हस्तोद्योगांच्या मालाच्या बाजारपेठेला हा अप्रत्यक्ष आधार मिळे. त्याव्यतिरिक्त सैनिकांकडून अधिक प्रत्यक्ष स्वरूपातही अशा मालाला मागणी असे. त्यांना स्वतःला लागणारी शस्त्रास्त्रे आणि त्यांच्या स्वतःच्या व कुटुंबांच्या सुखसोयी व चैनीच्या गोष्टी यांसाठी ही मागणी असे. शिवाय त्यांच्या पदरी नोकर-चाकर व दास-दासी यांचाही फार मोठा लवाजमा असे.[१७] त्यामुळे त्यांच्या प्राप्तीचा निदान काही भाग तरी सरतेशेवटी निर्वाहपातळीवरील उपभोगामध्ये खर्च होत असे. त्यांच्या स्वतःच्या कुटुंबांसह त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या लोकांची संख्या सुमारे ५० लाख असावी, असे अनुमान करण्यास हरकत नाही.

घोडदळाव्यतिरिक्त तोफखानाही असे. मुगल सैन्याच्या तोफखान्यात किती तोफा वापरल्या जात होत्या अथवा त्यांच्यासाठी किती दारूगोळा लागत होता, याचा अंदाज लावणे शक्य नाही. परंतु तोफखान्यावर काम करणाऱ्या लोकांची संख्या (४०,००० हून अधिक माणसे) लक्षात घेता असे निश्चितपणे सांगता येते, की कोणत्याही कालखंडात कित्येक हजार तोडयाच्या बंदुकी (matchlocks) (त्यांची संख्या कोणत्याही परिस्थितीत २५,००० पेक्षा नक्कीच कमी नसली पाहिजे) वापरात असल्या पाहिजेत. तसेच भारतामध्ये अवाढव्य तोफा जास्त पसंत केल्या जात असत, हे आपल्याला माहीत आहे.[१८] यावरून तोफखान्यावरील वाढत्या प्रमाणातील नेमणुकां-

१३. लाहोरी, 'पादशाहनामा', Bib. Ind. २, ७१५. लाहोरी यांच्या हिशेबाप्रमाणे घोडदळाची संख्या २,००,००० होती. त्यांनी ८,००० मनसबदारांची गणनाही घोडेस्वार म्हणून केल्यामुळे ही संख्या आली आहे.

१४. ताडून पाहा: मोरलँड, 'रँक (मनसब) इन दि मोगल स्टेट सर्व्हिस' (जरॉएसो), १९३६.

१५. ऑर्मे; डब्ल्यू. इरविन यांनी 'दि आर्मी ऑफ दि इंडियन मोगल्स' (पृ. ४७) मध्ये बहुत केलेले अवतरण.

१६. ताडून पाहा: इरविन, 'दि आर्मी...', पृ. ५१–५२.

१७. 'या देशामध्ये पट्टेवाले व नोकरचाकर यांची संख्या फारच मोठी आहे. कारण प्रत्येकजण-मग तो घोडेस्वार असो, व्यापारी असो की राजाचा अधिकारी असो- आपापल्या ऐपतीप्रमाणे व दर्जाप्रमाणे जास्तीत जास्त नोकर बाळगतो.' (पेल्झार्ट, 'जहांगीर्स इंडिया', पृ. ६१). ताडून पाहा: फ्रेअर यांनी केलेले 'कूच करणाऱ्या आदिलशाही घोडेस्वारांचे' वर्णन, 'ए न्यू अकाउंट ऑफ ईस्ट इंडिया अँड पर्शिया, बीइंग नाइन ईयर्स ट्रॅव्हल्स, १६७२-१६८१', खंड १ (लंडन, १९०९), पृ. ३४१.

१८. इरविन, 'दि आर्मी...', पृ. ११८–१२८.

मुळे सोरा मीठ (नवसागर – saltpetor) उद्योग आणि धातुशास्त्रीय व तत्संबद्ध हस्तोद्योग यांच्या विकासाला फार मोठा हातभार लागला असण्याची शक्यता दिसते. जेव्हा भारतातील तांब्याच्या खाणी अपुऱ्या पडू लागल्या तेव्हा तांब्याची प्रचंड प्रमाणावर आयात सुरू झाली.[१९] ही आयात शक्य होण्यासाठी तेवढ्याच प्रमाणात भारतीय मालाची निर्यात करावी लागत असली पाहिजे.

बादशाह आणि त्याचे सरदार हे त्यांच्या कल्पनेप्रमाणे उत्तम व्यवसाय व कला यांचे उदार आश्रयदाते होते. निवृत्तिवेतने किंवा देणग्या देऊन ते आपल्या पदरी विद्वान्, कवी, धर्मशास्त्रज्ञ वैद्य, चित्रकार, संगीतज्ञ व नर्तक-नर्तकी बाळगगीत असत.[२०] या व्यावसायिक 'मध्यम' वर्गामध्ये सरदारांच्या सगळ्या लवाजम्यातील हिशेबनीस व अन्य कर्मचारी यांचाही समावेश करण्यास हरकत नाही. त्यांची संख्या फार मोठी असे. पेल्झार्ट यांच्या मताप्रमाणे, जेथे एक माणूस पुरला असता तेथे दहा माणसे नेमली जात असत.[२१] हीच गोष्ट साम्राज्याच्या प्रशासनातील अवाढव्य नोकरशाही यंत्रणा आणि शाही लवाजमा यांच्या बाबतीतही तितकीच खरी होती. या मध्यम वर्गातील अनेक लोक सरदारांप्रमाणे राहाणी ठेवण्याचा किंवा आपल्या कुवतीप्रमाणे त्यांचे अनुकरण करण्याचा प्रयत्न करीत.[२२] परंतु या वर्गाचे स्वरूप फारच बहुजिनसी असल्यामुळे त्याचे एकूण उत्पन्न व त्याच्या खर्चाचे स्वरूप ही दोन्ही शोधून काढणे अवघड आहे.

सरदारांच्या उत्पन्नाचा दोनतृतीयांश भाग घोडदळ व तोफखाना यांवर आणि एकदशांश भाग व्यावसायिक वर्गाच्या भरणपोषणावर (हा अंदाज पुष्कळच सढळ आहे असे म्हणता येईल) खर्च होत होता, असे आपण गृहीत धरले तरी त्यांना स्वतःच्या खर्चासाठी त्यांच्याजवळ उत्पन्नाचा एकचतुर्थांश भाग उरत असला पाहिजे.

यापैकी बराच पैसा आपला कुल्यात प्रचंड लवाजमा सांभाळण्यासाठी ते खर्च करीत असले पाहिजेत, यात शंका नाही. कारण सरदारांना 'उंट, घोडे व नोकरचाकर यांचे भपकेबाज प्रदर्शन करण्यापायी खूप उधळपट्टी करण्याचा' षोक असे.[२३] बादशाहाच्या खासगीकडेही फार मोठ्या संख्येने गुलाम व नोकरचाकर असत. जनानखान्यात व तबेल्यांमध्ये या लोकांना काम करावे

१९. ताडून पाहा: मोरलँड, 'अकबर टु औरंगजेब', पृ. १८३–१८५; के. ग्लॅमन, 'डच एशियाटिक ट्रेड', पृ. १७६–११७ आणि 'दि डच ईस्ट इंडिया कंपनीज ट्रेड इन जॅपनीज कॉपर', स्कँडिनेव्हियन एकॉनॉमिक हिस्ट्री रिव्ह्यू., १ (१) १९५३, पृ. ५० व नंतरची पृष्ठे.

२०. एम्. अतहर अली, पृ. १६७ व टीपा. दिल्लीतील प्रमुख साहित्यिक, कवी, गायक, संगीतज्ञ, नर्तिका इत्यादींची माहिती दरगाह कुली खान नावाच्या एका खानदानी मुगल लेखकाने १७३८–१७२९ साली 'मुरक्काए दिल्ली' या ग्रंथात लिहून ठेवली आहे. ती पाहावी. सं. सैयद मुजफ्फर हुसैन, हैदराबाद (द.).

२१. पेल्झार्ट, 'जहांगीर्स इंडिया', पृ. ५५.

२२. औरंगजेबाच्या कारकीर्दीच्या सुरुवातीच्या काळात खालच्या श्रेणीतील नोकरवर्गाचे जीवन कसे उत्तम प्रकारे चालले होते ते भीमसेनच्या 'नुस्खा ए दिलकुशा', ब्रि. म्यू. Or. २३, व नंतरची पृष्ठे, २० बी,-२१ ए. या ग्रंथात पाहावयास मिळते. तसेच पाहा: दरगाह कुली खान, (वेगवेगळ्या ठिकाणी).

२३. पेल्झार्ट, 'जहांगीर्स इंडिया', पृ. ५४. ताडून पाहा: बर्नियरने असे नमूद करून ठेवले आहे की भारतातील सरदारांचा नाश 'इतर देशांतल्या सरदारांप्रमाणे खाण्यापिण्यातील उधळपट्टीमुळे घडून आला नाही तर ते बादशाहाला जे भारी किमतीचे नजराणे देत असत आणि अनेक बायका, नोकरचाकर, उंट व घोडे यांचा प्रचंड लवाजमा बाळगीत असत त्यामुळे घडून आला.' पाहा: एम्. अतहर अली, पृ. १६७–१७८.

लागे.[२४] अशा प्रकारे त्या काळी सरदारांकडे पूर्णपणे अनुत्पादक सेवा करणाऱ्या लोकांची संख्या खूपच मोठी होती आणि ते लोक सरदारांकडून केवळ निर्वाहापुरते लागणारे किमान वेतन घेऊन काम करीत असत, असे समजण्यास हरकत नाही.[२५]

सरदार-दरकदारांना नोकरचाकर व गुलाम यांचा भला मोठा तांडा बाळगण्याचा जो षोक होता त्या व्यतिरिक्त आणखीही एक षोक असल्याचे समकालीनांनी नमूद करून ठेवले आहे. तो म्हणजे पैसा-जवाहीर साठवून ठेवण्याचा. मुगल साम्राज्यातील 'सरकारजमा करण्याच्या' प्रथेविषयी फार पूर्वीपासून गैरसमज चालत आला आहे; आणि सरदारांच्या मृत्यूनंतर त्यांची संपत्ती सरकारजमा होत असल्यामुळे त्यांची प्रवृत्ती उधळपट्टीकडे होत असली पाहिजे, असा युक्तिवाद केला जात आला आहे.[२६] या बाबींचा बराचसा खुलासा आता झाला आहे; आणि असे आढळून आले आहे, की वस्तुतः एखाद्या सरदाराच्या मृत्यूनंतर त्याच्या संपत्तीवर पहिला धनको या नात्याने बादशहाचा जो दावा प्रस्थापित केला जाई तत्पूर्वी इतरही काही अटी पुऱ्या व्हाव्या लागत असत.[२७] ते कसेही असले तरी सरदारांच्या मृत्यूनंतर संपत्तीचे प्रचंड साठे मागे उरलेले असत. अधिकृत इतिहासामध्ये असे नमूद करण्यात आले आहे, की एका मोठ्या सरदाराच्या मृत्यूनंतर (१६४५) त्याच्या संपत्तीतून बादशहाला रोख ६० लाख रुपये मिळाले होते;[२८] आणि त्याच्यापेक्षाही वरच्या श्रेणीच्या आणखी एका सरदाराने 'रोख व वस्तूंच्या रूपात' अधिकृत मूल्यांकनानुसार १ कोटी रुपये मागे ठेवले होते (१६५७)[२९]. शाही संपत्तीचा साठा तुलनात्मक दृष्टया फार प्रचंड असे. अकबराने आपल्या मृत्यूनंतर केवढी संपत्ती मागे ठेवली होती, यासंबंधी प्रसृत झालेल्या हकीगती जरी अतिशयोक्तिपूर्ण असल्या,[३०] तरी अधिकृत कागदपत्रांवरून आपल्याला असे दिसून येते, की त्याच्या खजिन्यात त्याच्या मृत्यूनंतर रोख ७ कोटी रुपये शिल्लक होते.[३१] संपत्तीच्या, विशेषतः सोने व चांदी यांच्या साठेबाजीमुळे हस्तोद्योगांच्या वस्तूंसाठी प्रत्यक्ष मागणी निर्माण होत नसे; आणि म्हणून तेवढ्या प्रमाणात भांडवलाचा अपव्यय होत असे, असे म्हणता येईल. परंतु घोडे व तांबे यांच्याप्रमाणेच सोने व चांदी यांच्या आयातीची भरपाई करण्यासाठी जेवढ्या प्रमाणात निर्यात करावी लागत असे तेवढ्या

---

२४. मोरलँड, 'इंडिया ॲट दि डेथ ऑफ अकबर', पृ. ८७-८९

२५. ताडून पाहा : शाही कारखान्याच्या वेगवेगळ्या विभागांतील सामान्य नोकर व गुलाम यांना किती कमी पगार दिला जात असे किंवा ते बाळगण्यासाठी किती कमी खर्च करावा लागत असे याची माहिती 'ऐने अकबरी' मध्ये मिळते.

२६. मोरलँड, 'इंडिया ॲट दि डेथ ऑफ अकबर', पृ. २६२-२६३. तथापि, प्रत्यक्ष व्यवहारात असे का घडून आले नाही आणि तरीदेखील सरदार इतकी संपत्ती का साठवून ठेवीत, याचे कोडे पेल्सार्ट यांना उलगडत नाही. 'जहांगीर्स इंडिया', पृ. ५५-५६

२७. एम्. अतहर अली, 'मुगल नोबिलिटी', पृ. ६३-६८

२८. लाहोरी, 'पातशाहनामा', २, ४७२-४७८. प्रत्येक रुपयाचे वजन १७८ ग्रेन असे आणि तो जवळजवळ शुद्ध चांदीचा असे.

२९. 'आमाले सालिह', Bib. Ind. ३, २४८.

३०. व्ही. ए. स्मिथ, 'दि ट्रेझर ऑफ अकबर' 'जरॉएसो'-(१९१५), पृ. २११-२४३, अब्दुल अजीज यांच्या 'इंपीरियल ट्रेझरी ऑफ दि इंडियन मुगल्स' (लाहोर, १९४२) या ग्रंथात पृ. २८-२९ वर उद्धृत केलेला भाग.

३१. अमीन कझवीनी, 'पादशाहनामा', ब्रि. म्यू. हस्त. Or. १७३, f. २२१ ए-बी.

प्रमाणात अशा प्रकारच्या साठेबाजीमुळे हस्तोद्योगांच्या वस्तूंची मागणी वाढण्यास अप्रत्यक्षपणे हातभार लागत असला पाहिजे, हे उघड आहे.

सरदार मंडळींकडून उपभोग्य वस्तूंना प्रत्यक्षपणे केवढी मागणी असे यासंबंधी परिमाणात्मक स्वरूपात काही सांगता येणे शक्य नाही. परंतु काही सर्वसामान्य पुराव्याच्या आधारे काही निष्कर्ष काढता येण्यासारखे आहेत.

मुगल सरदार आपल्या बादशहांप्रमाणे महान् भवन-निर्माते होते; आणि त्यांनी जे टोलेजंग महाल बांधविले त्यांची भव्यता व त्यांतील सुखसोयी पाहून त्या काळातील अत्यंत विचक्षण युरोपीय टीकाकारांनाही ते आपल्या कल्पनेच्या पलीकडील आहेत, असे मान्य करावे लागले.[३२] याखेरीज त्यांनी कबरी, मशिदी, धर्मशाळा, तलाव व पूलही बांधविले.[३३] ही बांधकामे काळाच्या आघातांना तोंड देऊन त्यांच्या महालांपेक्षाही अधिक सुस्थितीत राहिली आहेत.

सरदार लोक फर्निचर (लाकडी सामान), सजावटीच्या वस्तू व वैयक्तिक वापराचे सामान यांवर खूपच पैसा खर्च करीत असले पाहिजेत, यात शंका नाही. या सामानामध्ये विविध प्रकारच्या वस्तूंचा समावेश असला तरी अधिक मौल्यवान आणि कलाकुसरीच्या वस्तूंवर विशेष भर असे. अशा प्रकारच्या वस्तूंमध्ये अत्यंत मौल्यवान् रत्नांपासून अत्यंत तलम मलमलीपर्यंत अनेक वस्तू असत.[३४] सरदारांना लागणाऱ्या वस्तूंपैकी अनेक वस्तू त्यांच्या स्वतःच्या कारखान्यात तयार होत असत. शाही कारखान्यांचे अधिक चांगले वर्णन करण्यात आलेले आहे; परंतु त्यांचे स्वरूपही अशाच प्रकारचे असे. सामान्यतः कारखाना म्हणजे एक प्रकारचा मोठा दिवाणखाना असे आणि प्रत्येक हस्तोद्योगासाठी एकेक स्वतंत्र दिवाणखाना असे. येथे कारागिरांना कामास बसवीत, कडक देखरेख ठेवली जाई आणि कामासाठी त्यांना सरदाराकडून कच्चा माल पुरविला जाई. या कारखान्यांमध्ये जवळजवळ सर्व प्रकारच्या जिनसा तयार होत. या जिनसा एकतर खुद्द मालकाच्या उपयोगासाठी असत किंवा भेटीदाखल देण्यासाठी तयार करविल्या जात.[३५] अर्थात सरदार लोक बाजारातून तयार वस्तूही विकत घेत असत. लहान सरदारांना त्यांच्या स्वतःच्या कारखान्यांतून पुरेशा वस्तू मिळत नसल्या पाहिजेत, हे उघड आहे. खानदानी गिऱ्हाइकांना मौल्यवान वस्तू विकणारी दुकाने त्या काळी होती.[३६] खरोखरी, दिल्लीतील दुकानांच्या बाह्य स्वरूपाचा तुच्छतापूर्वक उल्लेख करतानाही बर्नियर असे सांगतो की, त्या दुकानांमध्ये 'अत्यंत मौल्यवान वस्तूंचा

---

३२. बर्नियर, 'ट्रॅव्हल्स', पृ. २४६–२४८

३३. ताडून पाहा : एम्. अतहर अली, 'मुगल नोबिलिटी', पृ. १६५–१६६

३४. कोणत्याही खानदानी घरामध्ये कोणकोणत्या विविध वस्तूंची गरज असे, याची मनोरंजक माहिती 'मजालिसे खुशरूई' या पुस्तकात दिलेली आहे. इं. ऑ. हस्त. ८२८. हे पुस्तक शहाजहानाच्या (१६२८–१६५८) कारकीर्दीत लिहिले गेले होते.

३५. एम्. अतहर अली, 'मुगल नोबिलिटी पृ. १५७–१५८. फक्त बादशहाचेच कारखाने असत अशी जी समजूत मोरलँड यांनी करून घेतलेली होती ती उघड उघड चुकीची होती. ('इंडिया ॲट दि डेथ ऑफ अकबर', पृ. १८६ )

३६. पाहा : दरगाह कुली खान याने 'मुरक्काए दिल्ली' या आपल्या ग्रंथात पृ. १७–१९ वर दिल्लीच्या सुप्रसिद्ध चांदणी चौकाचे केलेले बहारदार वर्णन. एखाद्या तरुण सरदाराजवळ १ लाख रुपये असले तरी तेवढ्या पैशांत त्याला हव्या असणाऱ्या वस्तूंपैकी 'फक्त गरजेच्या वस्तू'च विकत घेता येत असत. त्याहून अधिक वस्तू तेवढ्याच पैशांत येत नसत.

अपरंपार साठा' होता.[३७] सरदारांना लागणाऱ्या वस्तूंपैकी अनेक वस्तू परदेशांतून, विशेषतः इराणातून व मध्यआशियातून येत असत. युरोपीय मालाला असणारी मागणी बरीचशी मर्यादित व पुष्कळशी अनिश्चित असे.[३८] आम्ही वर म्हटल्याप्रमाणे निर्यातीला उत्तेजन देऊन हस्तोद्योगांना आधार देण्याचा हाही एक अप्रत्यक्ष मार्ग होता.

या सर्वसामान्य तथ्यावरून जमीनमहसुलाच्या साधनसंपत्तीच्या वितरणाच्या स्वरूपासंबंधी निश्चित चित्र आपल्याला उभे करिता येईल काय ? आणि त्यामध्ये निदान अमुक भाग अनुत्पादक श्रम करणाऱ्यांवर खर्च होत होता आणि अमुक इतका भाग हस्तोद्योगांच्या उत्पादनाकडे खर्च होत होता असे दाखवून देता येईल काय ? आपल्याजवळ सध्या जो पुरावा उपलब्ध आहे त्यावरून नक्की असे काही सांगता येणार नाही, हे उघड आहे. तरीपण आपल्याला बहुधा असा निष्कर्ष काढता येईल, की आपल्या व्याख्येप्रमाणे आपण जे दोन टप्पे कल्पिले आहेत त्या टप्प्यांशी या वितरणाचे स्वरूप मिळते-जुळते होते. याचा अर्थ असा की, त्यावेळी एका बाजूने शुद्ध सरदारांच्या व त्यांच्या सैनिकांच्या सेवाचाकरीवर अवलंबून असणारे आणि इतर आश्रित यांची खूप मोठी संख्या विद्यमान होती. त्यामुळे दिल्लीसारख्या शहरालाही छावणीचे रूप आलेले होते.[३९] आणि दुसऱ्या बाजूने वरिष्ठ वर्गाच्या गरजा भागविण्यासाठी हस्तोद्योग, व्यापार व वाहतूक या कामांत गुंतलेले बरेच कारागीर व अकुशल कामगार विद्यमान होते.[४०] या संदर्भावरून कारागीरवर्गाचे जे प्रमाण सूचित होते त्यापेक्षा प्रत्यक्षात ते खूपच मोठे असले पाहिजे. याचे कारण असे, की उत्पादक व अनुत्पादक कामांमध्ये गुंतलेल्या कामगारांच्या जीवनाच्या अत्यावश्यक गरजा (विशेषतः वस्त्राच्या गरजा) भागवायाच्या, तरीदेखील उत्पादन व वाहतूक यांमध्ये गुंतलेले कारागीर व अकुशल कामगार यांचा फार मोठा वर्ग अस्तित्वात असण्याची आवश्यकता होती. याचा बहुगुणित परिणाम खूपच मोठा असला पाहिजे; कारण निर्मात्यांना जीवननिर्वाहासाठी दरडोई फार थोड्या प्राप्तीची गरज असे, हे जरी खरे असले तरी दरडोई उत्पादनक्षमताही फार थोडी होती. त्यामुळे दुसऱ्या टप्प्याचे घटक काही अंशी पहिल्या टप्प्याच्या घटकांसमवेत विद्यमान असले तरी भारतीय अर्थव्यवस्थेत ते भक्कमपणे रुजले असण्याची शक्यता आहे. म्हणून आपल्याला असे समजण्यास हरकत नाही की शहरी लोकसंख्या पुष्कळच मोठी होती; परंतु संभवतः ती एकूण लोकसंख्येच्या एकपंचमांशापेक्षा कमी असावी.[४१] या विधानाला भारतीय

---

३७. बर्नियर, 'ट्रॅव्हल्स', पृ. २४८. हा असे नमूद करतो की, 'भारी किंमतीचा व्यापारी माल' वस्तुतः गोदामांमध्येच असे; पॅरिसप्रमाणे तो येथील दुकानांत ठेवलेला नसे.

३८. मोरलँड, 'इंडिया अ‍ॅट दि डेथ ऑफ अकबर', पृ. २२७; के. एन्. चौधरी, 'दि ईस्ट इंडिया कंपनी १६००-१६४०', (लंडन, १९६५), पृ. ११७-१२१.

३९. पाहा : बर्नियरने मातीच्या भिंती व गवताची छपरे असलेल्या छोट्या घरांचा उल्लेख करून असे म्हटले आहे की, "त्यांमध्ये सर्व सामान्य सैनिक आणि दरबार व लष्कर यांच्याबरोबर असणारे असंख्य नोकर-चाकर व बाजारबुणगे राहातात." ('ट्रॅव्हल्स', पृ. २४६).

४०. ताडून पाहा : बाबराचा हा उत्साहयुक्त शेरा : 'हिंदुस्थानातील आणखी एक चांगली गोष्ट म्हणजे येथे प्रत्येक प्रकारचे असंख्य व अपरंपार कामगार आहेत.' ('बाबरनामा', अनु. बेव्हरिज, २, ५२०)

४१. एकूण महसुली उत्पन्नावर अवलंबून असणारी कृष्येतर लोकसंख्या एकूण लोकसंख्येच्या एकचतुर्थांश किंवा एकतृतीयांश असली पाहिजे या साध्या गृहीतकृत्यावर हे विधान आधारलेले आहे. अर्थात महसुलाच्या रूपाने वसूल करण्यात आलेले अतिरिक्त उत्पादन आणि बाकी उरलेले उत्पादन यांच्या भौतिक स्वरूपात काही

[ पुढील पानावर

 

शहरांच्या लोकसंख्येसंबंधी आपल्याजवळ असणाऱ्या माहितीने भरपूर आधार मिळतो. सतराव्या शतकाच्या सुरुवातीला मुगल भारतातील सर्वांत मोठी शहरे लोकसंख्येच्या दृष्टीने तत्कालीन सर्वांत मोठ्या युरोपीय शहरांपेक्षा कितीतरी अधिक मोठी होती, असे दिसते. परंतु त्या शतकामध्ये युरोपातील शहरी लोकसंख्या वाढल्यामुळे भारत व युरोप यांतील सर्वांत मोठी शहरे लोकसंख्येच्या बाबतीत बरोबरीची झाली असल्याचे समकालीन युरोपीय प्रवाशांना आढळून आले.[४२] काही शहरांच्या लोकसंख्येचे त्यांनी लावलेले अंदाज (ते विश्वसनीय नसले तरी त्यांचे मर्यादित महत्त्व लक्षात घेऊन ते पुढे दिले आहेत) असे आहेत :–[४३]

| शहर | वर्ष | लोकसंख्या |
|---|---|---|
| आग्रा (हे त्याकाळी सर्वांत मोठे | १६०९ | ५,००,००० |
| शहर समजले जात होते) | १६२९–१६४३ | ६,६०,००० |
| पाटणा | १६७१ | २,००,००० |
| मच्छलीपट्टण | १६७२ | २,००,००० |
| सुरत | १६६३ | १,००,००० |
| ,, | १७०० | २,००,००० |

यावरून आपल्याला असा निष्कर्ष काढता येईल की, मुगल काळातील भारतीय अर्थव्यवस्था कृषिक्षेत्रातून गोळा करण्यात येणाऱ्या प्रचंड जमीनमहसुलावर आणि एका लहानशा सत्ताधारी वर्गाच्या हातात होणाऱ्या त्या महसुलाच्या केंद्रीकरणावर आधारलेली होती; आणि तिचा नागरी क्षेत्रात पुष्कळच विस्तार झालेला होता. नागरी लोकसंख्येपैकी फार मोठा भाग हस्तोद्योगांत गुंतलेला होता, एवढेच नव्हे तर दरडोई प्रत्यक्ष उत्पादनाच्या दृष्टीने पाहिल्यास त्या काळाची या शतकाच्या प्रारंभिक दशकांशी तुलना होऊ शकेल.[४४]

मागील पानावरून ]
फरक नसेल तरच असे घडत असणार. परंतु कृष्येतर क्षेत्रामध्ये हस्तोद्योग-उत्पादनाने उपभोगाचा बराच मोठा भाग व्यापलेला असे; त्यामुळे अतिरिक्त उत्पादनामधील अन्नधान्याचा घटक कृषिउत्पादनाच्या बाकी उरणाऱ्या भागातील अन्नधान्याच्या घटकापेक्षा खूपच लहान असला पाहिजे. म्हणून कृष्येतर लोकसंख्येचे खूपच नागरीकरण झालेले असले तरी तिचा आकार बराच लहान असला पाहिजे.

४२. पाहा : लाहोर व कॉन्स्टंटिनोपल, अहमदाबाद व लंडन, आणि दिल्ली व पॅरिस या शहरांच्या करण्यात आलेल्या तुलना. मोरलँड, 'इंडिया ॲट दि डेथ ऑफ अकबर', पृ. १२–१३; इ. हबीब, पृ. ७५–७६ आणि टीपा.

४३. हे सर्व आकडे त्यांच्या मूळ आधारांसह इ. हबीब यांच्या पुस्तकात पृ. ७६ व टीपा यांमध्ये नमूद केलेले आहेत. मात्र सुरतेसंबंधीचे अंदाज पुढील ग्रंथांतून घेतलेले आहेत. अनु. मॅन्युएल गोडिन्हो, अनु. जी. एम्. मारेस 'जर्नल ऑफ दि बॉम्बे ब्रँच ऑफ दि (रॉयल) एशियाटिक सोसायटी (जबॉब्रॅरॉएसो), n. s. २७, पृ. ii, १२४–१२५; आणि हॅमिल्टन, 'ए न्यू अकाउंट ऑफ दि ईस्ट इंडीज', सं. डब्ल्यू. फॉस्टर, १, ८९.

४४. याहून अधिक तपशीलवार तुलनेसाठी पाहा : मोरलँड, 'इंडिया ॲट दि डेथ ऑफ अकबर', पृ. १४३–१८४, १८६–१९४. येथे हे लक्षात ठेवले पाहिजे की मोरलँड यांनी सतराव्या शतकातील भारताची लोकसंख्या जाणूनबुजून कमी धरलेली नसली तरी आर्थिक व राजकीय परिस्थितीसंबंधी त्यांनी अशा अनेक गोष्टी गृहीत धरल्या आहेत ज्यांच्यामुळे त्यांच्या निष्कर्षांवर प्रभाव पडणे अपरिहार्य होते. त्यामुळे त्यांच्या स्वतःच्या काळातील दर डोई उत्पादनाशी तुलना करिता त्यांनी काढलेले अंतिम निष्कर्ष फारच कमी उत्पादन दर्शविणारे आहेत, हे विशेष उल्लेखनीय आहे.

३

एवढ्या मोठ्या प्रमाणावरील उत्पादन प्राप्त करण्यासाठी वापरल्या गेलेल्या तंत्रांसंबंधी आतापर्यंत फारच थोडे तपशीलवार संशोधन झालेले आहे. आपल्या दृष्टीने त्याला अत्यंत महत्त्व आहे; कारण अवजारांच्या वाढत्या प्रकृष्टीकरणा (sophistication) च्या द्वारेच हळूहळू यंत्राचा विकास घडून येऊ शकतो.

भारतीय हस्तव्यवसायातील अवजारांचे एक सर्वसामान्य वैशिष्ट्य असे राहिलेले आहे, की त्यांमध्ये धातूचा उपयोग अगदी कमी प्रमाणात केला जाई. जेथे लोखंडाचा वापर करावयाचा तेथेही बहुधा लाकूडच वापरले जाई. त्यामुळे सतराव्या शतकातील युरोपीय प्रवाशांना उत्पादनाची भारतीय अवजारे साधीसुधी व ओबडधोबड असल्याचे आढळून आले होते. बर्नियरने तर दिल्लीच्या कारागिरांजवळ 'अवजारांचा तुटवडा' असल्याचे नमूद केले आहे. अवजारांचा विकास आणि कारागिरांचे कौशल्य यांचे एकमेकांशी व्यस्त प्रमाण असावे असे दिसते; कारण, ओबडधोबड अवजारांच्या साह्यानेही ते उत्कृष्ट दर्जाचा माल तयार करीत असत[१] आत्यंतिक किंवा पराकोटीच्या विशेषज्ञतेतून कौशल्याचा विकास घडून आलेला होता. पेलसार्ट आग्र्यातील शंभर हस्तव्यवसायांची माहिती देताना म्हणतो, "जे काम हॉलंडमध्ये एक माणूस करतो तेच येथे पूर्ण होण्यापूर्वी चार माणसांच्या हातांतून जाते."[२] परिणामतः, भारतीय कारागीर नक्कल किंवा अनुकरण करण्यात पटाईत आहेत, परंतु स्वतः काही नवीन नक्षी वगैरे शोधून काढू शकत नाहीत, असे समजले जात असे. तथापि, घड्याळे वगैरेसारख्या यांत्रिक करामतींच्या निर्मितीच्या बाबतीत नक्कल म्हणून देखील काही प्रयत्न झाल्याचे दिसून येत नाही.[४] दुसरी एक मोठी उणीव त्या काळात होती, तिचे खरे महत्त्व आता आपल्या लक्षात येते. ती म्हणजे खाण अभियांत्रिकी (mining engineering) च्या विकासाचा अभाव ही होय. कच्चे लोखंड वरवरच्या खोदकामातून गोळा केले जाई आणि दगडी कोळसा तर खाणीतून मुळी काढलाच जात नव्हता.[५] सामान्यतः येथे खोल खाणीच नव्हत्या. मिठाच्या पट्ट्यातील मिठाच्या खाणी हे एक आश्चर्य समजले जात होते. वस्तुतः मिठाच्या डोंगरातील मिठाचे थर क्षितिजाशी समांतर (आडवे, एकावर एक असे) होते आणि प्रत्येक थर खोदण्याचे काम वेगवेगळे खाणकामगार व्यक्तिशः करीत असत.[६]

अशा या वस्तुस्थितिदर्शक गोष्टीवरून भारतातील उत्पादन-विकास ही विशेषतः अवजारांची गुणवत्ता सुधारण्याऐवजी मानवी नैपुण्यात सुधारणा घडवून आणण्याची बाब होती,

---

१. बर्नियर, 'ट्रॅव्हल्स', पृ. २५४.

२. पेलसार्ट, 'जहांगीर्स इंडिया', पृ ६०.

३. कित्ता, पृ. ९ ताइून पाहा: जे. ओव्हिंग्टन, 'ए व्हॉयेज टु सुरत इन दि ईयर १६८९' (लंडन, १९२९), पृ. १६६.

४. ओव्हिंग्टन, 'व्हॉयेज', पृ. १६६-१६७ भारतीय व चिनी लोकांमधील फरक तो दाखवून देतो. चिनी लोकांनी युरोपीय लोकांची घड्याळे घेऊन ती खोलली व पुनः बसविली होती. त्याच्या मते भारतीयांना घड्याळे बनविण्यात रस वाटत नव्हता याचे कारण येथील धुळीमुळे घड्याळातील चक्रे चोंदून ती चालत नसत, हे होते.

५. मोरलँड, 'इंडिया ॲट दि डेथ ऑफ अकबर', पृ. १४६-१४८.

६. पाहा: 'ऐने अकबरी' तील लाहोर सुभ्याची माहिती देणारा उतारा. तसेच, सुजान राय, 'खुलासतुत्तवारीख,' सं. जफर हसन (दिल्ली १९१८), पृ. ७५.

असा दृष्टिकोण स्वीकारण्याचा मोह आपल्याला अवश्य होईल.[७] परंतु असा दृष्टिकोण स्वीकारणे अगदीच भाबडेपणाचे होईल; कारण उत्पादनप्रक्रियेतील कौशल्य व अवजारे यांच्या भूमिका वेगवेगळ्या समाजांत व वेगवेगळ्या परिस्थितींत वेगवेगळ्या असल्या तरी विशिष्ट उत्पादने हवी असतील तर काही मूलभूत अवजारे लागणारच. त्यांची जागा मानवी नैपुण्य भरून काढू शकणार नाही. उदाहरणार्थ, खोल विहिरीतून शेतीसाठी पाणी काढण्यासाठी रहाटगाडगे वापरणे अत्यावश्यक होते. त्यामध्ये दात्यांची चाके, दंतुरचक्राची यंत्रणा आणि भांड्यांची माळ यांचा समावेश होता. मुगलकालीन भारतात हे रहाटगाडगे लाकूड, दोर व मातीची भांडी यांचे बनविले जाई.[८] एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धापर्यंत पूर्णपणे धातूचे बनविलेले यंत्र वापरात आलेले नव्हते. जेव्हा धातूच्या वापरामुळे येणारा जादा खर्च हा कमी कार्यक्षम अशा लाकडी यंत्राने तेवढ्याच शेतीला पाणीपुरवठा करण्यासाठी उपयोगात आणाव्या लागणाऱ्या पशुशक्तीच्या व श्रमबळाच्या अधिक वापरामुळे येणाऱ्या खर्चापेक्षा कमी असल्याचे सिद्ध झाले तेव्हाच लाकडी रहाटगाडग्याची जागा लोखंडी रहाटगाडग्याला घेता येणे शक्य झाले. यंत्ररचनेच्या तांत्रिक तत्त्वांमध्ये मूलभूत सुधारणा करण्याचा प्रश्न येथे जवळजवळ नव्हताच. तसेच, सर्वसामान्य चरख्यामध्ये दोन महत्त्वाच्या यांत्रिक सुधारणा करण्यात आल्या. त्या म्हणजे शक्तीचें पट्यामध्ये केलेले संक्रमण (belt transmission of power) आणि गतिचक्राचे तत्त्व या होत. अर्थात् हे गतिचक्र (flywheel) पूर्णपणे लाकडीच होते. [९] इतर भारतीय हस्तोद्योगांमध्ये चाकाचा उपयोग धातूंना व मौल्यवान् खड्यांना छिद्रे पाडणे, त्यांची कटाई करणे व त्यांना झिलई देणे यांसाठी केला जात असे.[१०] अशा प्रकारे, जेव्हा इतर वस्तूंची जागा धातू, विशेषतः लोखंड, घेऊ लागते तेव्हाच तंत्रविज्ञानात व्यापक विकास घडून येत असतो, हे खरे असले तरी एखाद्या विशिष्ट परिस्थितीत हा बदल घडून येण्यास विलंब लागण्याचीही शक्यता असते. त्याचे मुख्य कारण असे की तीच वस्तू तयार करण्यासाठी स्वस्त व कुशल कामगार उपलब्ध असल्यामुळे कमी कार्यक्षमतेचे अवजार वापरता येते. त्यामुळे भारतामध्ये सापेक्षतः जे उच्च दर्जाचे कौशल्य विद्यमान होते त्याचे कारण येथील अल्प मजुरी हे असल्याचे पेलझार्ट यांनी नमूद केले आहे.[११]

यावर असा महत्त्वाचा प्रश्न निर्माण होतो की जेथे कुशल कामगाराच्या जागी सुधारलेली अवजारे व नवीन शोध यांचा वापर करणे शक्य नव्हते तेथे या अवजारांचा व शोधांचा उपयोग करण्यात आलाच नाही की काय ? या संबंधात, त्या काळच्या युरोपात व आशियात खऱ्या अर्थाने 'अवजड उद्योग' असलेल्या तोफखान्याशी संबंधित वस्तूंच्या निर्मितीचे अध्ययन करणे अत्यंत उद्बोधक ठरेल. या उद्योगाच्या गरजा भागविण्यासाठी युरोपमध्ये बिडाच्या उत्पादनाला चालना मिळाली. भारतामध्ये अवजड पितळी तोफांचे ओतकाम होत असे; परंतु सर्व लोखंडी तोफा आणि अनेक पितळी तोफा ओतकामाच्या पद्धतीने तयार केल्या जात नव्हत्या. सांधलेल्या

---

७. मॉरिसचे मत जवळजवळ असेच असावे असे दिसते. पाहा : 'इंएसोहिरि', ५ (१), पृ. ६.

८. पाहा : 'बाबरनामा', अनु. ए. एस. बीव्हरिज, २, पृ. ४८६, या ग्रंथात बाबराने केलेले वर्णन ताडून पाहा : इ. हबीब, पृ. २६–२७ व टीपा.

९. ताडून पाहा : लिन व्हाइट, 'मिडीव्हल टेक्नॉलॉजी अँड सोशल चेंज', पृ. ११९.

१०. पाहा : अठराव्या शतकातील कोश, 'बहारे अजम', 'चर्खे' हा शब्द.

११. पेलझार्ट, 'जहांगीर्स इंडिया', पृ. ६०.

कांबी गोल आकारात वाकवून त्या बनविल्या जात असत.[12] ओरिसामध्ये भरपूर लोखंड सापडत असल्याचा उल्लेख आहे. तेथे 'साच्यांमध्ये लोखंड ओतून जहाजांचे नांगर तयार केले जात.' तथापि, येथील पिडाचा दर्जा युरोपात तयार होणाऱ्या पिडाच्या दर्जाइतका चांगला नव्हता, असे म्हटले जाते.[13] सतराव्या शतकात भारतात तयार होणाऱ्या तोफखान्याच्या सामानाची गुणवत्ता व कार्यक्षमता यांविषयी फारसे असमाधान नव्हते, हेही लक्षात ठेवण्यासारखे आहे. उदाहरणार्थ, भारतीय तोडयांच्या बंदुका व शिकारी बंदुका अत्यंत उत्कृष्ट असल्याबद्दल बर्नियर प्रशंसेचे उद्गार काढतो.[14] अकबराचा मंत्री फतहुल्ला शीराजी याने काही कुतूहलजनक शोध लावून यांत्रिक सुधारणा करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केला असल्याचाही पुरावा उपलब्ध आहे. अर्थात् त्याच्या त्या शोधांमध्ये आर्थिक दृष्टया उल्लेखनीय असे फारसे काही नव्हते, ही गोष्ट अलाहिदा.[15]

याचा अर्थ असा की भारतामध्ये तंत्रज्ञानात्मक सुधारणा आणि रूपांतर घडवून आणण्याच्या मार्गात कोणताही मोठा अडथळा नव्हता. सतराव्या शतकामध्ये भारतातील औद्योगिक विकासाची पातळी युरोपीय पातळीच्या फार मागे पडू लागल्याचे दिसू लागले असेल तर त्याचे कारण शरीरश्रमाच्या अनागिक ओढीऐवजी दुसऱ्या काही गोष्टींमध्ये असले पाहिजे. याचे एक संभाव्य स्पष्टीकरण असे की भारतात हस्तोद्योगातील विशेषज्ञता टिकवून धरण्यात समाजरचनेचा म्हणजेच जातिव्यवस्थेचा मोठा वाटा आहे.[16] जातिव्यवस्थेने हस्तोद्योग आणि शिस्त यांची फारकत करून कौशल्यांना वाळीत टाकून, हस्तोद्योगांच्या परस्परांमधील चलनशीलतेत अडथळा निर्माण करून आणि कारागिरांमधील वैयक्तिक महत्त्वाकांक्षा मारून टाकून नव्या शोधांवर बंधने लादून आर्थिक विकासामध्ये प्रचंड अडसर निर्माण केला, असे समजले जाते; आणि वेबर यांनी या मताचे जोरदार समर्थन केले आहे.[17]

परंतु या संपूर्ण उपपत्तीविषयी शंका घेता येण्यासारखा भरपूर आधार उपलब्ध आहे. कारण पूर्णपणे पोथीनिष्ठ जातिव्यवस्था कशा प्रकारे कार्य करीत असेल याविषयी आपण जी गृहीत कृत्ये असतील त्यांच्यावरच हे प्रामुख्याने अवलंबून राहील.[18] या बाबतीत तीन–चार मुद्दे लक्षात ठेवले पाहिजेत. पहिला असा की, सामान्य किंवा अकुशल कामगारांचा प्रचंड राखीव साठा या देशात असे; आणि जेव्हा गरज उत्पन्न होई तेव्हा त्यांतून कुशल कारागिरांचे नवे वर्ग निर्माण होऊ शकत. कर्नाटकातील हिऱ्यांच्या खाणीत काम करणारे लोक असेच शेतकऱ्यांमधून किंवा शेतमजूरांमधून पुढे आलेले असले पाहिजेत; कारण जेव्हा काही खाणी बंद पडल्या तेव्हा तेथील खाण-

१२. डब्ल्यू. इरविन, 'दि आर्मी ऑफ दि इंडियन मुगल', पृ. ११३–११८.

१३. ए. हॅमिल्टन, 'ए न्यू अकाउंट ऑफ दि ईस्ट इंडीज', सं. डब्ल्यू. फॉस्टर, १, २१७.

१४. बर्नियर, 'ट्रॅव्हल्स', पृ. २५४.

१५. पाहा : एम्. ए. अल्वी आणि ए. रहमान, 'फतहुल्ला शीराजी, ए सिक्स्टीन्थ सेंचुरी इंडियन सायन्टिस्ट'. (नवी दिल्ली, १९६८).

१६. ताडून पाहा : कार्ल मार्क्स, 'कॅपिटल', १. सं. डोना टॉर, पृ. ३३०–३२. हस्तोद्योगांतील विशेषज्ञता व जातिव्यवस्था यांच्यांतील संबंधांविषयी तेथे विवेचन आले आहे.

१७. शेवटच्या मुद्यासंबंधी पाहा : पेलसार्ट, 'जहांगीर्स इंडिया', पृ. ६१; आणि बर्नियर, 'ट्रॅव्हल्स', पृ. २६०. तसेच, बी. बी. मिश्र, 'इंडियन मिडल क्लास', (लंडन, १९६१) पृ. ३७–३८.

१८. पाहा : एम्. डी. मॉरिस यांचा हा विचारोत्तेजक लेख : 'व्हॅल्यूज ॲज ॲन ऑब्स्टॅकल टु एकॉनॉमिक ग्रोथ इन साउथ एशिया', जर्नल ऑफ एकॉनॉमिक हिस्टरी, २७ (डिसें. १९६७), पृ. ५८८–६०७.

कामगार ‘आपापल्या शेतीवर परत गेले.’[१९] दुसरा मुद्दा असा की कोणत्याही प्रदेशात एकच व्यवसाय करणाऱ्या एकाहून अधिक जाती असत. त्यामुळे जेथे एखाद्या हस्तोद्योग–उत्पादनाला वाढती मागणी निर्माण होई तेथे त्या जातीचे नवे कारागीर सामान्यत: जाऊन पोचत.[२०] यापेक्षाही अधिक महत्त्वाची गोष्ट अशी की जाती व विशिष्ट धंदे अथवा कौशल्ये यांचा कायमचा अतूट संबंध बांधलेला नसे. दीर्घ कालावधीमध्ये आर्थिक अनिवार्यतांमुळे एखाद्या जातीचा व्यावसायिक आधार आमूलाग्र बदलून जाऊ शकत असे. जुन्या कागदपत्रांचा भरपूर आधार असलेले या बाबतीतील एक उदाहरण म्हणजे महाराष्ट्रातील शिंपी जातीचे होय. या जातीतील एका विभागाने अठराव्या शतकाच्या प्रारंभी रंगाऱ्याचा व्यवसाय पत्करला आणि दुसऱ्या एका विभागाने निळीच्या रंगाऱ्याचा व्यवसाय स्वीकारला.[२१] तिसरा व शेवटचा मुद्दा असा की, काही वेळा निदान प्रशासनाकडून तरी व्यवसायांची दारे उघडी ठेवण्यास अनुकूलता दर्शविली जात असे, असा पुरावा आढळतो. औरंगजेबाने असा हुकूम काढला होता की अहमदाबादेत ज्या कोणाची इच्छा असेल त्या सर्वांना विणकाम, शिवणकाम व भरतकाम शिकण्याची मुभा असली पाहिजे.[२२] काही वेळा जाती या व्यवसाय-संघां (guilds) इतक्याही प्रबळ नसत, असे दिसते. कारण त्यांची संघटना त्या मानाने सैल असल्यामुळे त्यांना पुष्कळदा प्रशासनाच्या पाठिंब्यावर अवलंबून रहावे लागे, किंवा प्रशासनाकडून आपल्या अंतर्गत गोष्टींमध्ये केला जाणारा हस्तक्षेप सहन करावा लागे.[२३]

यावरून आपण असा निष्कर्ष काढू शकतो की जात हा हस्तोद्योग कामगारांच्या चलनशीलतेत दुर्लंघ्य अडथळा नव्हता. युरोपीय व्यापारी व प्रवासी वारंवार भारतातील कुशल

१९. टॅव्हर्नियर, ‘ट्रॅव्हल्स इन इंडिया’, अनु. व्ही. बाल, सं. क्रूक (लंडन, १९२५), १, २३०.

२०. पाहा : दि रिपोर्ट ऑफ मद्रास फॅक्टर्स, १६६२; कासिमबाजारहून हुगळीला विणकर व व्यापारी नेणे शक्य होते; परंतु त्यांना मद्रासला नेणे मात्र शक्य नव्हते. ‘कारण, त्यांची जात अशी आहे की त्यांनी समुद्रप्रवास केल्यास त्यांचे जन्मसिद्ध हक्क नाहीसे होतील.’ ‘इंग्लिश फॅक्टरीज १६६१–१६६४’, पृ. ६५ इंग्लंडहून स्पेन जितके दूर आहे तितकेच बंगालहून मद्रास दूर होते, ही वस्तुस्थिती सदर कारखानदारांच्या लक्षात आलेली नसावी, असे दिसते.

२१. एच्. एफ्. फुकाझावा, ‘स्टेट अँड कास्ट सिस्टिम (जाति) इन दि एटीन्थ सेंचरी मराठा किंग्डम,’ हितोत्सुबाशी जर्नल ऑफ एकॉनॉमिक्स, ९. (१), पृ. ३९–४०.

२२. अली मुहम्मद खान, ‘मीराते अहमदी’, सं. नवाब अली, बडोदा, १,२६०. तसेच पाहा : अहमदाबादेच्या टांकसाळीत धातू वितळविणे व त्यांची तार काढणे या कामाची मक्तेदारी श्रीमाळ जातीची आहे हे मान्य करण्यास नकार देणारा औरंगजेबाचा हुकूम. अशा प्रकारे निर्बंध लादणे कायद्याच्या विरुद्ध आहे या स्पष्ट भूमिकेवरून हा नकार देण्यात आला होता. (कित्ता, पृ. २९२–२९३). अहमदाबादच्या बाबतीत पूर्वीच, म्हणजे १६२९ साली असे जाहीर करण्यात आले होते की, या ठिकाणी कोणाही व्यापाऱ्याला अथवा कारागिराला स्थायिक होता येईल; आणि आपल्या व्यापारावर किंवा कारागिरीवर चरितार्थ चालविता येईल. त्यात कोणाकडूनही हस्तक्षेप किंवा ढवळाढवळ होणार नाही.” (पेल्सर्ट, अनु. मोरलँड, जएहि, ४, पृ. ७५).

२३. पाहा: ‘ऐने अकबरी’, सं. ब्लॉशमन, १, २८४. शहर कोतवालाने शहरातील प्रत्येक व्यावसायिक गटासाठी एक प्रमुख व मध्यस्थ नेमण्यास मनाई करणारा हुकूम या ग्रंथात दिलेला आहे. ताडून पाहा: पावलोव्ह ‘इंडियन कॅपिटॅलिस्ट क्लास’, पृ. २४, फुकाझावा, ‘स्टेट अँड कास्ट सिस्टिम’, पृ. ३२.४४. या दोन ग्रंथांमध्ये मराठा राज्याचे अधिकारी जातींच्या प्रश्नांच्या बाबतीत लवाद म्हणून, किंबहुना कायदे करणारे म्हणूनही कसे कार्य करीत असत ते दाखविणारा भरपूर पुरावा गोळा केलेला आहे.

व्यवसायांच्या वंशपरंपरागत स्वरूपाविषयी बोलत असले तरी त्यामुळे उत्पादनाच्या कोणत्याही शाखेत कामगारांचा तुटवडा पडला असल्याचे ते सांगत नाहीत, हे उल्लेखनीय आहे. याच्या उलट ते सामान्यतः कारागिरांची प्रचंड संख्या व अल्प वेतनमान यांचाच उल्लेख करतात.[२४] हस्तोद्योग कामगारांच्या खुल्या पुरवठ्यातील अधिक मोठा अडथळा हा सरदार लोक कारागिरांकडून बळजबरीने जी वेठीची कामे करून घेत आणि त्यांच्यावर जी सक्तीची इतर बंधने लादीत त्यांच्यामुळेच उत्पन्न होत असावा, असे दिसते.[२५]

अशा प्रकारे मुगलकालीन भारतात कृष्येतर मालाला फार मोठी शहरी बाजारपेठ विद्यमान होती, कौशल्यपूर्ण विशेषज्ञतेवर आधारलेले श्रमविभाजन येथे चालू होते, थोडीफार तंत्रज्ञानात्मक प्रगतीही झालेली होती आणि कुशल कामगारांचा तुटवडा असण्याऐवजी त्यांची अतिरिक्तताच होती, एवढे सिद्ध झाल्यानंतर अशा परिस्थितीत उत्पादनसंघटनेची भांडवलवादी किंवा निमभांडवलवादी उत्पादनाच्या दिशेने कितपत प्रगती झालेली होती याचा विचार करणे योग्य होईल.

आपल्या विवेचनातून शेतकऱ्यांच्या व ग्रामीण समाजांच्या गरजा भागविण्याच्या दृष्टीने कारागिरांकडून केल्या जाणाऱ्या उत्पादनाचा विचार वगळण्यास हरकत नाही. यांपैकी काही कारागीर खेड्यांत राहून ठराविक मोबदल्यामध्ये ठराविक वस्तू व सेवा देत असत. इतर कारागीर खेडोपाडी हिंडून कच्चा माल विकत घेत आणि त्यापासून पक्का माल तयार करून विकत. या मालाच्या किमती बहुधा वस्तूंच्या रूपात ठरत असत. या दोन्ही प्रकारांमध्ये खऱ्या विक्रेय वस्तूंचे उत्पादन केले जात नसले पाहिजे.

शहरी कारागिराच्या बाबतीत याहून अगदी उलटी परिस्थिती होती. तो सामान्यतः विक्रेय वस्तूंचे उत्पादन करीत असे. तो दोन वेगवेगळ्या परिस्थितींत काम करीत असे. पहिली परिस्थिती अशी की आपल्या मालाची बाजारात विक्री करीपर्यंत तो त्या मालाचा मालक असे. दुसरी परिस्थिती अशी कीं उत्पादन-प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत त्यासाठी लागणारा कच्चा माल त्याच्या हातात असला तरी त्यावर त्याची स्वतःची मालकी नसे, तर दुसऱ्या कोणाची तरी असे.

यांपैकी पहिल्या परिस्थितीची कल्पना येण्यासाठी आपण उदाहरणादाखल इंग्रज कारखानदारांनी पाटण्याहून १६२० साली पाठविलेल्या अहवालातील पुढील उतारा घेऊ :–

" येथून १४ कोसांवर लाखौरी नावाचे एक लहान शहर असून ते पिवळसर रंगाच्या (amberty) सुती कापडाचे केंद्र आहे. तेथून हे सुती कापड विकत घेण्याची नेहमीची पद्धत अशी आहे :– जवळपासच्या मोहल्ल्यांतून दररोज विणकर हे कापड घेऊन येतात. ते धुतलेले किंवा इस्त्री केलेले नसते. जहांगिरी गजाच्या मापाने ते १३ वार असते.[२६] त्यांच्याकडून ते त्याच स्थितीत विकत घेतले जाते...ते न धुता विकत घेतल्याबद्दल विणकरांना किमतीत थोडी

---

२४. ' रिलेशन्स ऑफ गोवळकोंडा इन दि अर्ली सेव्हनटीन्थ सेंचरी ', संपा. व अनु. मोरलँड (लंडन, १९३१), पृ. २७; पेल्झार्ट, ' जहांगीर्स इंडिया ', पृ. ६०.

२५. पेल्झार्ट, ' जहांगीर्स इंडिया '; बर्नियर, ' ट्रॅव्हल्स ', पृ. २२८-२२९. ताडून पाहा: ' मीराते अहमदी ', १, २६०. गुजरातमधील भडोच व बडोदा येथील गव्हर्नरांच्या वर्तनासाठी पाहा : ' इंग्लिश फॅक्टरीज ', १६२२-२३, पृ. ९७ आणि १६३४-३६, पृ. २९० ' इंग्लिश फॅक्टरीज ', N. S., ३,३५२-३५३.

२६. जहांगीरी गज हा ४० व ४०.५ इंच लांब असे.

झीज सोसावी लागते. तसेच खरेदी करणाऱ्याला थोडी दलालीही[२७] द्यावी लागते. या दोन्ही गोष्टींसाठी मिळून रुपयाला चार आणे किंवा २५ टक्के रक्कम मूळ किंमतीतून कापून घेतली जाते. अशा प्रकारे दररोज ५०,६० आणि कधीकधी १०० ठाणे विकत घेतली जातात. याच पद्धतीने येथे पाटण्यातही त्यांची विक्री होते. तेथून ती विणकरच आणतात. मात्र येथे ती धुतलेली व इस्त्री केलेली असतात."[२८]

येथे विणकर लोक अपेक्षित मागणी गृहीत धरून स्वतःच सुती कापड तयार करीत असल्याचे आपल्याला दिसून येते. त्यापेक्षाही अधिक महत्त्वाची गोष्ट अशी की काही वेळा ते धोब्यांकडून आपल्या कापडाची धुलाई करवून घेण्यासाठी आपली गुंतवणूक अधिक व्यापक बनवीत असत. वरील अहवालानुसार कापडाची धुलाई व इस्त्री यांसाठी तीन महिने लागत आणि २० ठाणांना ३ रुपये खर्च येई. जे विणकर ही प्रक्रिया स्वतःच घडवून आणीत असतील ते अधिक मोठ्या बाजारपेठेत आपला माल अधिक महाग विकू शकत असले पाहिजेत.

अशा प्रकारच्या धडपडीतून कालांतराने श्रीमंत झाल्यानंतर काही विणकरांना आपले उत्पादन केवळ कुटुंबातील लोकांच्या श्रमापुरतेच मर्यादित न ठेवता ते वाढवून उमेदवार व नोकर ठेवता येणे शक्य होत असले पाहिजे. ही एक महत्त्वाची घटना समजली गेली असती. मार्क्सच्या शब्दांत सांगावयाचे तर 'खालपासून' आणि 'खरोखरी क्रांतिकारक मार्गाने' होणाऱ्या भांडवलशाही विकासातील तो एक टप्पा होता, असे म्हणता आले असते.[२९] परंतु मुगलकालीन भारतात असा विकास घडून आला असेल असे समजण्यास फारसा पुरावा उपलब्ध नाही. बहुधा मौल्यवान धातूंच्या व्यापारात सोनारांना पुष्कळच नफा उरत असावा आणि त्यातून त्यांना आपले कारखाने उभारता येत असावेत, असे दिसते.[३०] परंतु सर्वसामान्यपणे इतर विविध हस्तोद्योगांच्या बाबतीत महत्त्वाचे असे फारच थोडे स्वतंत्र व श्रेष्ठ कारागीर होते.[३१]

दुसऱ्या परिस्थितीमध्ये कारागीर लोक स्वतःच्या जबाबदारीवर उत्पादन न करता व्यापारी व इतर लोक यांच्या वतीने ते उत्पादनाचे काम हाती घेत. जेव्हा व्यापाऱ्यांना विशिष्ट प्रकारचा माल विवक्षित पद्धतीने, ठराविक दरात व ठरलेल्या वेळात तयार करून हवा असे तेव्हा ते कारागिरांना विसार म्हणून काही रक्कम देत आणि त्यांच्या अटी पाळून तो माल तयार करून देण्यास कारागीर स्वतःला बांधून घेत. विसाराची ही प्रथा साऱ्या भारतात प्रचलित होती

---

२७. दस्तूरी = कमिशन, दलाली.

२८. 'इंग्लिश फॅक्टरीज, १६१८–१६२१', पृ. १९२–१९३. यांतील शब्दांच्या वर्णलेखनाचे आधुनिकीकरण करण्यात आले आहे.

२९. 'कॅपिटल' (इंग्रजी आवृत्ती, फॉरेन लँग्वेजेस पब्लिशिंग हाउस, मॉस्को, १९५९), पृ. ३२९–३३० मार्क्सच्या मूळ उताऱ्याचा अर्थ आणि विद्यमान पुराव्याच्या आधारे त्याचा होणारा खुलासा यांसंबंधीचे फलदायक विवेचन 'दि ट्रॅन्झिशन फ्रॉम फ्यूडॅलिझम् टु कॅपिटल' या ग्रंथात पाहावयास मिळेल. या ग्रंथात मुख्यतः पॉल एम्. स्वीझी, एम्. डॉब आणि एच्. के. ताकाहाशी यांचे लेख समाविष्ट आहेत. (लंडन, प्रकाशन काल दिलेला नाही)

३०. पाहा: 'बहारे अजम' मधील 'खाक-बेज' या शीर्षकाखालील कारखानाए जरगरान चा उल्लेख.

३१. ताडून पाहा: बर्नियर, 'ट्रॅव्हल्स', पृ. २२८–२२९.

असे दिसते. अर्थात् ती प्रामुख्याने लांब अंतरावरील व्यापारासाठी लागणाऱ्या वस्तूंच्या निर्मितीच्या बाबतीतच रूढ असावी, असे वाटते.[३२]

या प्रथेमध्ये कच्चा माल विकत घेण्याचे काम कारागिरालाच करावे लागे. परंतु धुलाई व रंगाई यांसारख्या प्रक्रियांमध्ये स्वाभाविकपणेच व्यापाऱ्याला माल विकल्यानंतर कारागिरांना पुनः कच्चा माल द्यावा लागत असे.[३३] याचीच पुढची पायरी म्हणजे व्यापाऱ्यांनी विणकरांना सूत पुरविणे ही होय. गुजरातेतील इंग्रज कारखानदार या पद्धतीचा प्रत्यक्ष अवलंब करीत असावेत असे दिसते.[३४] बंगालमध्ये विणकरांना रोख विसार देणे बंद करून त्याऐवजी कच्चे रेशीम विकत घेऊन ते विणकऱ्यांना देणे अधिक फायदेशीर असल्याचे इंग्रजांना आढळून आले. याचे कारण असे सांगण्यात येते की विणकऱ्यांच्या दारिद्र्यामुळे त्यांना विसार दिला तरी आवश्यक त्या प्रतीचे कच्चे रेशीम विकत घेणे त्यांना शक्य होत नसे.[३५]

यावरून असे दिसून येईल की अंगावर, उक्ते काम देण्याची प्रथा सर्रास रूढ होती. तसेच, रोख विसार देणे व कच्चा माल पुरविणे या प्रथाही प्रचारात होत्या.

अंगावर, उक्ते काम देण्याच्या पद्धतीखेरीज कारखान्यासारख्या उत्पादन संघटनेचे प्रकारही विद्यमान होते. मुघलकालातील मोठमोठी स्मारकशिल्पे व इतर इमारती यांचे बांधकाम घडून येण्यासाठी असंख्य कारागीर व सामान्य मजूर यांना एकत्र आणून सूत्रबद्ध देखरेखीखाली त्यांच्याकडून काम करवून घ्यावे लागत असले पाहिजे, हे सांगण्याची गरज नाही. तथापि, त्यांचे हे एकत्र जमणे सामान्यतः अभावितपणे घडून येत असले पाहिजे; आणि बांधकाम पुरे झाल्यावर त्यांची पांगापांग होत असली पाहिजे, हे उघड आहे. जहाजबांधणीच्या बाबतीतही असेच घडत असले पाहिजे. काही मोठमोठी सागरी जहाजे भारतात बांधली गेली असली तरी एखादे विशिष्ट जहाज बांधण्यासाठी जी संघटना उभारण्यात येत असे ती जहाजाची बांधणी पूर्ण झाल्यानंतर तशीच कायम राहात नसली पाहिजे.[३६]

संभाव्य भांडवलशाहीच्या विकासाच्या दृष्टीने अधिक अर्थपूर्ण बाब म्हणजे सातत्यपूर्ण उत्पादनासाठी अनेक कारागिरांनी व मजुरांनी एकत्र गोळा होणे ही होय. दक्षिणच्या हिऱ्याच्या खाणींचे जे तपशीलवार वर्णन टॅव्हर्नियरने दिले आहे त्यावरून असे दिसून येते की खाणींची क्षेत्रे विभागून त्यांचे भूखंड (plots) पाडले जात व ते व्यापाऱ्यांना व्यक्तिशः भाडेपट्टयाने दिले जात. हे व्यापारी आपापले कामगार लावून काम करवून घेत. एकेका भूखंडावर ३०० पर्यंत

---

३२. ज्या परिच्छेदांवर हा मजकूर आधारलेला आहे त्यापैकी काही परिच्छेद 'इंग्लिश फॅक्टरीज' या ग्रंथातील पुढील पृष्ठांवरील नोंदीत पाहावयास मिळतील:– १६२४–१६२९, पृ. १४९; १६३७–१६४१, पृ. १३७; १६४६–१६५०, पृ. १५९; १६६१–१६६४, पृ. १११–११२; हॉबसन–जॉबसन, 'डंगरी' या शीर्षकाखाली, १६७८ व १६८३ या वर्षांशी संबंधित उद्धरणे. एकदा सुरतेतील कारागिरांनी इंग्रजांना हव्या असलेल्या मापाचे कापड तयार करण्याकरिता आपल्या मागांमध्ये फेरबदल करावे लागतील म्हणून त्याच्या खर्चासाठी पैशाची मागणीही केली होती. ('इंग्लिश फॅक्टरीज, १६६१–१६६४', पृ. २०८–२०९).

३३. उदाहरणार्थ पाहा: 'इंग्लिश फॅक्टरीज १६१८–१६२१, पृ. १९२–१९३; १६२४–१६२९, पृ. १४९.

३४. फ्रीअर, 'अकाउंट ऑफ ईस्ट इंडिया'; १,२२१. Fryer

३५. 'इंग्लिश फॅक्टरीज, १६५५–१६६०', पृ. २९६.

३६. मोरलँड, 'इंडिया ॲट दि डेथ ऑफ अकबर', पृ. १८५–१८६. तसेच जहाजबांधणीच्या माहितीसाठी पाहा: ए. जे. कैसर, 'शिपबिल्डिंग इन दि मुगल एम्पायर', 'इंएसोहिरि', ५ (२), पृ. १४९–१७०.

देखील कामगार काम करीत असत. सगळ्या खाणींवर मिळून ६०,००० कामगार काम करीत होते असे म्हणतात.[३७] शोरामीठ (नवसागर) उद्योगामध्येही अशाच प्रकारची संघटना विद्यमान होती.[३८] असे असले तरी प्रत्यक्ष कारखान्यांच्या अवस्थेपर्यंत आपली मजल जात नाही. कारण या ठिकाणी व्यापारी हे मोठ्या प्रमाणावरील उत्पादनकर्ते म्हणून दिसत असले तरी उत्पादनप्रक्रियेमध्ये विशेषज्ञतापूर्ण कौशल्य किंवा गुंतगुंतीची (संमिश्र – complex) अवजारे यांचा अंतर्भाव होत नव्हता.

उत्पादनागारां (manufactories)चे खरे प्रतिरूप कारखाने हे होते. दिल्लीच्या शाही कारखान्यांचे वर्णन बर्नियरने पुढील शब्दांत केले आहे :–

"अनेक ठिकाणी मोठमोठी दालने पाहावयास मिळतात. त्यांना कारागिरांसाठी असलेले कारखाने असे म्हणतात. एका दालनामध्ये भरतकाम करणारे कारागीर कामात गढून गेले आहेत. त्यांच्यावर एक अधिकारी देखरेख करतो. दुसऱ्या दालनात तुम्हांला सोनार दिसतील. तिसऱ्यात चित्रकार, चौथ्यात लाखकाम व रोगणकाम करणारे, पाचव्यामध्ये जोडकाम, कातकाम करणारे, शिंपी व चांभार. सहाव्यामध्ये रेशमी, जरीचे व तलम मलमलीचे कापड तयार करणारे......असे लोक दिसतील. कारागीर दररोज सकाळी आपापल्या कारखान्यात येतात आणि सबंध दिवसभर तेथे काम करीत राहातात. नंतर संध्याकाळी ते घरी परत जातात. अशा प्रकारे त्यांचा वेळ शांतपणे व नियमितपणे व्यतीत होतो......"[३९]

अशा प्रकारे बाहेर विकसित झालेली विशेषज्ञतापूर्ण कौशल्ये या कारखान्यांमध्ये गोळा होत. मात्र पूर्वी जो कारागीर स्वतंत्रपणे किंवा कंत्राट घेऊन उत्पादन करीत असे त्याचे येथे रोजंदार मजुरात रूपांतर होत असे.[४०] मजूर बनल्यानंतरही आपल्या अवजारांवर किंवा त्यांपैकी काही अवजारांवर त्याची मालकी टिकून राहात असण्याची शक्यता आहे युरोपीय कारखानदारीमध्ये कुशल कामगारांचा एक वेगळा विभाग विकसित झाला तसा विभाग येथे विकसित झाला असावा किंवा नाही याविषयी निश्चित काही सांगता येणार नाही.

आपण वर पाहिल्याप्रमाणे बादशाहाच्या किंवा सरदारांच्या कारखान्यांमध्ये उपभोग्य वस्तूंचे उत्पादन केले जात नसे, तर प्रत्यक्ष वापरासाठी लागणाऱ्या चैनीच्या वस्तूंचे उत्पादन ते करीत असत. स्वाभाविकपणेच त्यांच्या आर्थिक महत्त्वाला मर्यादा पडल्या. तथापि, निदान एक शाही कारखाना वेगळ्या प्रकारचा असे. तो म्हणजे टांकसाळ. मुगल चलन 'मुक्त' होते. याचा अर्थ असा की कोणीही आपल्या चांदीच्या लगडी नेऊन त्यांचे रुपये पाडून घेऊ शकत असे. हे रुपये जवळजवळ शुद्ध चांदीचे असत. नाणे पाडण्याबद्दलचा सरकारी कर व टांकसाळीची नाणे पाडणावळ दिली की रुपये पाडून मिळत. या टांकसाळीचे उत्पादन पुष्कळच मोठे असे. उदाहरणार्थ, सुरतेच्या टांकसाळीतून एके काळी नुसत्या इंग्रजांसाठीच दररोज ३०,००० रुपये

३७. टॅव्हर्नियराच्या माहितीचा सारांश मोरलँडच्या ग्रंथात पृ. १५१–१५२ वर दिला आहे.

३८. पाहा: पेल्झार्ट, 'जहांगीरी इंडिया', पृ. ४६.

३९. बर्नियर 'ट्रॅव्हल्स', पृ. २५८–२५९.

४०. कारखाना व मजुरी यांच्या परस्परसंबंधासाठी पाहा: 'बहारे अजम' या ग्रंथातील 'कारखाना' या शीर्षकाखाली असलेला साएबचा शेर.

४१. मार्क्स, 'कॅपिटल', १. सं. डोना टोर, पृ. ३३०–३३२.

पाडले जात असत.[४२] यावरून आपण अशी कल्पना करू शकतो की या टांकसाळींचा सरंजाम पुष्कळ मोठा असला पाहिजे आणि त्या ठिकाणी वेगवेगळी कौशल्ये असणारे कामगार कडक देखरेखीखाली काम करीत असले पाहिजेत.

समकालीन निरीक्षक शाही व खानदानी (अभिजातवर्गीय, aristocratic) कारखान्यांनी इतके अधिक प्रभावित झाले होते, परंतु व्यापाऱ्यांनी चालविलेल्या तशाच प्रकारच्या कारखान्यांसंबंधी त्यांनी फारसे काही नमूद करून ठेवलेले नाही, याचा अर्थ असा की व्यापाऱ्यांचे कारखाने आकाराने फारच लहान असले पाहिजेत. बर्नियरने असा उल्लेख केला आहे की 'श्रीमंत व्यापारी व व्यावसायिक कामगारांना थोडी अधिक मजुरी देत असत'.[४३] हे विधान बहुधा अशा खासगी 'कारखान्यां'ना लागू पडत असावे. काही व्यापारांमध्ये, उदाहरणार्थ बंगालमधील रेशमाच्या व्यापारात (इंग्रजांसारख्या) मोठ्या व्यापाऱ्यांना कच्च्या रेशमाची धुलाई, भरणी व रंगाई यांसारख्या प्रक्रिया स्वतःच्याच आवारात करवून घेणे अधिक किफायतशीर ठरत असावे असे दिसते.[४४] परंतु एकंदरीने पाहाता असे दिसून येते की बिगर व्यापारी (non mercantile) क्षेत्रात कारखान्यांचा विकास झालेला असूनही उपभोग्य वस्तूंच्या प्रगत उत्पादनाचे वैशिष्ट्यपूर्ण स्वरूप अंगावर मक्त्याने काम देण्याच्या पद्धतीच्या पुढे अजून गेलेले नव्हते.

अंगावर काम घेण्याच्या पद्धतीतून उपभोग्य वस्तूंच्या उत्पादनाच्या कारखानदारीकडे प्रगती झाली असती तर श्रमावरील भांडवलाच्या वाढत्या नियंत्रणातील तो एक महत्त्वाचा टप्पा ठरला असता यात मुळीच शंका नाही. काही तुरळक घटना सोडल्यास मुगल कालीन भारतात असे प्रत्यक्षपणे घडले नाही, याचे मुख्य कारण बहुधा कामगारांची अत्यधिक पिळवणूक करण्याची घरगुती उद्योगाला असलेली अधिक चांगली अनुकूलता हे असावे. घरगुती कारागिराला पगार देऊन त्याच्याकडून जे श्रम घेतले जात त्यांमध्ये त्याची पत्नी व मुले यांच्या श्रमांचाही समावेश असे. हा फायदा व्यापारी पद्धतीच्या कारखानदारीला मिळू शकला नसता. म्हणून कारागिरांना द्यावयाचा कच्चा माल हा ज्याच्या बाबतीत धोका पत्करता येणार नाही इतका मौल्यवान किंवा अवजड नसेल, अथवा उत्पादनाची प्रक्रिया कच्च्या मालाच्या वितरणाची कटकट करावी इतकी दीर्घकालीन नसेल तर आपला वेगळा कारखाना उभारणे फायदेशीर नसल्याचे व्यापाऱ्यांना आढळून आले असल्यास आश्चर्य नाही.

याचा अर्थ असा की मुगल कालीन भारतात उपभोग्य वस्तूंचे व्यापक स्वरूपात उत्पादन होत होते, परंतु त्यातून औद्योगिक भांडवलाची निर्मिती झाली असावी असा मात्र सुगावा लागत नाही. अनेक विद्वानांच्या मते व्यापारी भांडवल व औद्योगिक भांडवल यांच्यातील फरक

---

४२. ही घटना १६७२ साली घडली. याचा आधार: 'सुरत फॅक्टरी आउटवर्ड लेटर बुक', खंड २, १६६३-१६७१-७२, पृ. १८७. मुंबईच्या पुराभिलेख व पुरातत्त्वशास्त्र विभागात हा ग्रंथ आहे. कु. अजीजा हसन यांच्यामुळे मला हा संदर्भ मिळाला. अलीकडेच अलीगढच्या इतिहास विभागाने मिळविलेल्या औरंगजेबकालीन काही कागदपत्रांमध्ये असा उल्लेख आढळतो की व्यापाऱ्यांना व्यक्तिशः सुरतेच्या टांकसाळीतून दररोज ४,००० रुपयेपर्यंत किमतीची सोन्याचांदीची नाणी पाडून घेण्याची परवानगी असे. औरंगजेबाच्या अमदानीत एका रुपयाचे वजन १८० ग्रेन असे.

४३. बर्नियर, 'ट्रॅव्हल्स', पृ. २२८-२२९.

४४. 'इंग्लिश फॅक्टरीज, १६५५-१६६०', पृ. २९६.

मूलभूत नसून केवळ प्रमाणाचा फरक आहे. म्हणून औद्योगिक भांडवलाचा अभाव व्यापारी भांडवलाच्या विकासाच्या अभावातून तर निर्माण झालेला नव्हता ना, याचा विचार करणे आवश्यक ठरते.

अनेक विद्वानांच्या मते वेगवेगळया राजकीय व प्रशासकीय कारणांमुळे मुगल कालीन भारतातील व्यापाऱ्यांना पुरेसा किंवा हमखास नफा मिळू शकत नव्हता आणि त्यांना संपत्तीचा संचय करता येत नव्हता. ती कारणे अशी :—रस्त्यांची असुरक्षितता; बादशाह व त्याचे सरदार यांच्या द्रव्यलोभामुळे व्यापाऱ्यांच्या संपत्तीला सतत भिववणारी असुरक्षिता, आणि मुगल अधिकाऱ्यांकडून मुक्त व्यापारामध्ये केला जाणारा हस्तक्षेप.[४५] हे अधिकारी आपल्या अधिकार-क्षेत्रामध्ये व्यापाराच्या वेगवेगळया क्षेत्रांत आपली मक्तेदारी स्थापन करीत असत.

या विधानाच्या समर्थनार्थ जो पुरावा सादर करता येण्यासारखा आहे त्याच्या तपशिलात शिरण्यापासून काही विशेष फायदा होण्यासारखा नाही. खरा वादाचा मुद्दा वर उल्लेखिलेले घटक खरोखरीच काम करीत होते किंवा नाही हा नसून त्यांच्या कार्यक्षेत्रांची मर्यादा काय होती हा आहे.[४६]

उदाहरणार्थ, एखाद्या प्रवाशाला लुटारूंनी लुटले असले तरी तेवढयावरून रस्ते सुरक्षित नव्हते असा निष्कर्ष काढता येणार नाही. रस्त्यांची सुरक्षितता किती प्रमाणात होती हे देशांतर्गत विम्याच्या (हमीच्या) दरांवरून सर्वांत अधिक उत्तम प्रकारे सूचित होऊ शकेल. अशा प्रकारचे उपलब्ध असलेले थोडेसे दर खाली दिले आहेत.[४७] दोन ठिकाणांमधील जे अंतर पुढील तक्त्यात दिले आहे ते रस्त्याचे अंतर नसून अवकाशातील सरळ अंतर आहे.

| वर्ष | विमा उतरलेला माल | मार्ग | अंदाजे अंतर (मैलांत) | विम्याचे दर (टक्क्यांत) |
|---|---|---|---|---|
| १६४६ | खजिना | दमण-सुरत | ६० | १ |
| १६४७ | व्यापारी माल | अहमदाबाद-ठट्टा | ३१५ | १/२ |
| १६५५ | रंगकृमी (cochineal) | सुरत-आग्रा | ५५० | $२\frac{१}{२}$ |
| १६५५ | रोकड | मच्छलीपट्टण-सुरत | ६७५ | १ |

खरोखरी, या दरांवरून ' राजकीय अस्थिरते'मुळे व्यापारात काही अडथळा निर्माण होत असावा असे सूचित होत नाही. सध्या आपल्याजवळ जी माहिती उपलब्ध आहे तिच्या आधारे इतर प्रमेये सिद्ध करता येतील इतका अशा प्रकारचा भरपूर पुरावा देता येणार नाही. परंतु या

४५. मोरलँड, ' इंडिया ॲट दि डेथ ऑफ अकबर ', विशेषतः पृ. ३५–५२; बी. बी. मिश्र, ' दि इंडियन मिडल क्लासेस ', पृ. २२–३५; एम्. डी. मॉरिस, ' इंएसोहिरि '. ५ ( १ ), पृ. ६. याच्याविरुद्ध दृष्टिकोनासाठी पाहा: ब्रिज नारायण, ' इंडियन एकॉनॉमिक लाइफ, पास्ट ॲंड प्रेझेंट '; पी. शरण, ' प्रॉव्हिन्शियल गव्हर्नमेंट ऑफ दि मुगल्स ( १५२६–१६५८ ) ', ( अलाहाबाद, १९४१ ), पृ. ३९९–४०३.

४६. व्यापाराची सुरक्षितता व कर यांसंबंधी माझे स्वतःचे अभिप्राय पाहा: इ. हबीब, पृ. ६५–६९; तसेच टी. रायचौधुरी, ' इएसोहिरि ', ५ ( १ ), पृ. ८८–९० यांचे प्रत्ययकारी अभिप्राय पाहा.

४७. ' कॉन्ट्रिब्यूशन्स टु इंडियन एकॉनॉमिक हिस्टरी ', सं. टी. रायचौधुरी या ग्रंथातील ' बँकिंग इन मुगल इंडिया ', या माझ्या लेखात दिलेला तक्ता, पृ. १६.

विशिष्ट घटनेवरून आपल्याला असे समजण्यास हरकत नाही की, पुष्कळ मोठ्या पुराव्यांतून थोडेसे तुकडे घेऊन त्यांच्या आधारे सर्वसामान्य सिद्धान्त काढणे धोक्याचे आहे.

आपण निश्चितपणे एवढेच म्हणू शकतो की व्यापारी भांडवल खूपच मोठे होते; आणि कार्यक्षम पतपद्धतीमुळे त्याचा व्याप खूप वाढला होता, एवढेच नव्हे तर त्याच्यात खूप चलनशीलताही निर्माण झालेली होती.

आपण वर पाहिल्याप्रमाणे, मुगल साम्राज्यामध्ये शेतकरी वर्गाच्या शोषणाची जी व्यापक प्रथा प्रचलित होती ती ग्रामीण भागातून शहरांकडे वाहणाऱ्या अन्नधान्यांच्या व इतर शेतमालाच्या प्रचंड ओघावर आधारलेली होती. हा माल मोठ्या प्रमाणावर बाजारात विकला जात होता आणि काही बाबतीत शेतकरी स्वत:च आपला माल स्थानिक बाजारपेठेत विक्रीसाठी नेत असत.[४८] परंतु शेतकऱ्याने आपला माल स्वतःच्या खेड्यात विकला काय, जवळपासच्या जत्रेत विकला काय किंवा शहरी बाजारपेठेत नेऊन विकला काय, सामान्यत: तो खरेदी करणारा ग्राहक व्यापारीच असे. भारतीय व्यापारात धान्याच्या व्यापाराला किती महत्त्व होते ते एका साध्या गोष्टीवरून दिसून येईल. ती अशी की 'बक्काल' (धान्यव्यापारी) हा शब्द इंडोपर्शियन भाषेत 'बनिया' (परंपरागत भारतीय व्यापारी) या अर्थाने वापरला जात असे.[४९] लांब अंतरावरील व्यापार चालविण्यासाठी बंजारा (वंजारी) नावाच्या सुप्रसिद्ध भटक्या वर्गाचा विकास झाला होता. हे बंजारा लोक ऐतिहासिक कागदपत्रांत सर्वप्रथम चौदाव्या शतकात आलेले दिसतात. सतराव्या शतकात ते बहुधा लाखो टन शेतमालाची वाहतूक देशाच्या अधिकांश भागातून करीत असावेत.[५०] शेतमालाच्या व्यापारात एकूण किती भांडवल गुंतलेले असावे ते सांगता येणार नाही; परंतु ते खूपच प्रचंड असले पाहिजे यात शंका नाही.

उपभोग्य वस्तूंच्या शहरी उत्पादनात अनेक कारागीर आपला माल प्रत्यक्ष गिऱ्हाइकांनाच विकत असले पाहिजेत. काही कारागीर सरदारांसाठी काम करीत आणि त्यांच्या प्रत्यक्ष वापरासाठी लागणारा माल निर्माण करीत. यामुळे व्यापाऱ्यांच्या व्यवहारांना बरीच मर्यादा पडत असली पाहिजे. परंतु ही मर्यादा फार मोठ्या प्रमाणावर नसावी. ते कसेही असले तरी सर्व मौल्यवान वस्तूंच्या व्यापाराच्या बाबतीत विशेषत: लांब पल्ल्याच्या बाजारपेठेच्या बाबतीत, व्यापारी लोक कारागिरांकडून मोठ्या प्रमाणात मालाची खरेदी करीत असत, असे दिसते.

या व्यवहारांमध्ये गुंतलेल्या भांडवलाचे प्रमाण केवढे होते ते जाणून घेण्यासाठी आपल्याला सुरतेच्या व्यापाऱ्यांविषयी युरोपीय साधनांच्या मार्फत उपलब्ध असणाऱ्या माहितीचा आधार घेता येईल. युरोपीय कागदपत्रांत असे नमूद करण्यात आले आहे की १६६३ साली सुरतेचे व्यापारी 'अत्यंत श्रीमंत' होते. त्यांच्यापैकी काही जणांजवळ तर ५०–६० लाख रुपयांची संपत्ती होती. वेगवेगळ्या देशांशी व्यापार करणारी पन्नास जहाजे त्यांच्यापाशी होती.[५१] वीरजी वोरा हा त्या काळचा सुरतेतील सर्वांत धनाढ्य व्यापारी म्हणून प्रख्यात होता. त्याची 'मालमत्ता'

---

४८. इ. हबीब, पृ. ७८–७९.

४९. 'कंपॅरेटिव्ह स्टडीज इन सोसायटी ॲंड हिस्टरी', ६ (४), पृ. ४१२ आणि टीपा.

५०. इ. हबीब, पृ. ६१–६३.

५१. गोडिन्हो, अनु. मेरेस, 'जर्नॅल एशियाटिक', काळ अनिश्चित, N. S. २७ (भाग), पृ. १२७. या व यानंतरच्या दोन टीपांमधील काही संदर्भांच्या बाबतीत मी श्री. ए. जे. कैसर यांचा आभारी आहे.

८० लाख रुपये किमतीची होती असे म्हणतात.[५२] असाच दुसरा एक व्यापारी अब्दुल गफूर हा होता. त्याच्याजवळ इतकीच संपत्ती होती, असे सांगितले जाते. त्याच्या मालकीची ३०० ते ८०० टन वजनाची वीस जहाजे होती असे नमूद करण्यात आलेले आहे. संपूर्ण इंग्लिश ईस्ट इंडिया कंपनी जेवढा व्यापार करीत असे तेवढा तो एकटा करीत असे.[५३] आपल्या शहरातील व्यापाऱ्यांच्या संपत्तीच्या बाबतीत सुरत हे अपवादात्मक शहर होते असे समजण्याचे कारण नाही. खूप प्रवास केलेल्या एका युरोपीय प्रवाश्याने असे लिहून ठेवले आहे की, आग्र्यातील तीन आश्चर्यांपैकी एक आश्चर्य 'येथील व्यापाऱ्यांजवळ असणारी अपरंपार संपत्ती' हे आहे. काही घरांमध्ये पैशांनी भरलेल्या पोत्यांची अशी थप्पी लागलेली असे की जणू ती धान्यानेच भरलेली पोती असावीत असे वाटे. हे दृश्य आपण स्वतः पाहिले असल्याचे सदर प्रवाश्याने नमूद करून ठेवले आहे.[५४] यावरून असे निःसंशयपणे म्हणता येते की काही प्रतिकूल गोष्टी विद्यमान असूनही भारतीय व्यापाऱ्यांनी केलेला संपत्तीचा संचय फार मोठा होता.[५५]

व्यापाऱ्यांजवळ असणाऱ्या या संपत्तीव्यतिरिक्त सरदारांनी व्यापारात गुंतविलेल्या रकमाही आपण हिशेबात घेतल्या पाहिजेत. याचे एक ठळक उदाहरण म्हणजे मीरजुमला हे होय. हा त्या काळातील सर्वांत मोठ्या व्यापाऱ्यांपैकी एक होता आणि मुगल साम्राज्याच्या प्रमुख सरदारांमध्येही त्याची गणना होत असे.[५६] संधी मिळताच आपल्या जवळचा पैसा नफा कमविण्यासाठी गुंतविण्यास सरदार लोक मुळीच मागेपुढे पाहात नसत. जहाजांतून ज्या मालाची वाहतूक होई त्याच्यासाठी भांडवल पुरविण्याचा सट्टाही ते खेळत असत.[५७] परंतु अनेक उदाहरणांमध्ये जेव्हा त्यांची ही गुंतवणूक जुलूमजबर्दस्तीने लादलेल्या मक्तेदारीशी निगडित झालेली असे तेव्हा ती गुंतवणूक व्यापारी भांडवलाच्या निधीत भर घालणारी असे, असे समजता येणार नाही.[५८] एकंदरीने पाहाता असे दिसून येईल की मुगल सरदारांच्या प्रचंड साधनसंपत्तीच्या तुलनेने त्यांनी व्यापारात फारच थोडी गुंतवणूक केली होती.

सतराव्या शतकातील देशभक्त भारतीयाला त्या काळी भारतात प्रचलित असलेल्या पत-पद्धतीविषयी आणि बँक व्यवसायाविषयी योग्य अभिमान वाटावा अशीच त्या क्षेत्रातील परिस्थिती होती.[५९] टॅव्हर्नियर असा अभिप्राय व्यक्त करतो की, "भारतामध्ये अगदी लहान खेडे

---

५२. 'इंग्लिश फॅक्टरीज, १६६१–१६६४', पृ. ३०८; 'इंडियन ट्रॅव्हल्स ऑफ थेवेनॉट अँड कारेरी', (नवी दिल्ली, १९४९), पृ. २२.

५३. एन्. दास, 'नॉरिस एम्बसी टु औरंगजेब, (१६९९–१७०२)', संक्षेप व संपादन, एस्. सी. सरकार (कलकत्ता, १९५९), पृ. २२४, टीपा: हॅमिल्टन, १, ८९.

५४. मॅनरिक, 'ट्रॅव्हल्स', अनु. सी. ई. लुआर्ड, २, पृ. १५६. इतर दोन आश्चर्येही उल्लेखनीय आहेत. ती म्हणजे प्रचंड सरकारी खजिना आणि सरदारांचे खूप मोठे उत्पन्न ही होत.

५५. व्ही. आय्. पावलोव्ह यांच्या 'इंडियन कॅपिटॅलिस्ट क्लास', पृ. ७६ व नंतरची पृष्ठे, यांमध्ये भारतीय व्यापाऱ्यांजवळील भांडवलाच्या प्रत्यक्ष संचयासंबंधीची उद्बोधक माहिती एकत्रितपणे देण्यात आलेली आहे.

५६. पाहा: जे. एन्. सरकार, 'लाइफ ऑफ मीरजुम्ला', (कलकत्ता, १९५१). या ग्रंथामध्ये मीर जुम्लाच्या व्यापारविषयक हालचालींची भरपूर माहिती देण्यात आलेली आहे. त्याच्या राजकीय हालचालींचे सूत्र संचालन पुष्कळदा त्याच्या या व्यापारी हालचालींच्या अनुरोधाने होत असे.

५७. टॅव्हर्नियर, 'ट्रॅव्हल्स इन इंडिया', १, ३१.

५८. एम्. अतहर अली, 'मुगल नोबिलिटी', पृ. १५४–१६०.

५९. पाहा: सुजान राय, 'खुलासतुत्तवारीख', सं. जफर हसन, पृ. २५.

वगळल्यास इतर सर्व गावांमध्ये नाणी बदलून देणारा सराफ हा अवश्य असतो. पैसे पाठविणे आणि विनिमयपत्रे (letters of exchange) देणे ही कामे करणारा तो महाजन (बँकर)-ही असतो."[६०] हे सराफ आपल्या स्वतःच्या हुंड्यांच्या द्वारे पैसे पाठवीत असत, एवढेच नव्हे तर व्यापाऱ्यांच्या हुंड्या स्वीकारून ते फार मोठ्या प्रमाणावर व्यापाराला, विशेषतः दूर अंतरापर्यंत चालणाऱ्या व आंतरराष्ट्रीय व्यापाराला भांडवलपुरवठाही करीत असत. या हुंड्यांचा वापर इतक्या झटपट होत असे की अहमदाबादच्या बाजारपेठेत व्यापारी लोक या हुंड्यांचे पैसे देण्याचे किंवा आपली आर्थिक जबाबदारी पार पाडण्याचे काम जवळजवळ नुसत्या कागदपत्रांच्या देवघेवीने करीत असत.[६१] ही पद्धत प्रचलित होती, याचा आणखी एक पुरावा असा की रक्कम देण्यासंबंधीचा जवळजवळ कोणताही आदेश, तो कोणाकडूनही आलेला असला तरी (उदाहरणार्थ, सरदाराने आपल्या सैनिकांचा पगार देण्यासंबंधी दिलेला आदेश) हा व्यापारी दस्तऐवज होऊ शकत असे आणि सराफ त्यात उल्लेखिलेली रक्कम देत असत.[६२]

हुंडीच्या वट्टयामध्ये विम्याचे शुल्कही समाविष्ट असे; कारण एरव्ही ज्या मालावर ती हुंडी काढलेली असे तो माल हरवल्यास त्या हुंडीची रक्कम मिळू शकत नसे. विम्याचा व्यवसायही सराफ करीत असत. त्याचा चांगला विकास घडून आलेला होता. हुंड्या, रवाना करण्यात आलेला माल आणि जहाजावरील माल या सर्वांचा विमा उतरविण्याची सोय होती.[६३]

सराफ लोक प्रत्यक्षपणे कर्जेही देत असत आणि ठेवीही घेत असत. वस्तुतः ते ठेवी ठेवून घेणारे महाजन (बँकर) असत.[६४] त्यामुळे सरकारी खजिन्यात भरणा करण्यासाठी असलेल्या रकमादेखील कर्जाऊ ठेवी म्हणून ते स्वीकारीत असावे असे दिसते. ते स्वतःही 'मातबर लोकांना' व इतरांना भरपूर व्याजाने मोठमोठ्या रकमा कर्जाऊ देत असत आणि अशा प्रकारे आपल्या जवळील ठेवींचा काही भाग शुद्ध व्याजखोर भांडवलात रूपांतरित करीत असत हे खरे; तरीपण व्यापाऱ्यांना मोठमोठी कर्जे देण्याची ऐपत त्यांच्यापाशी असल्यामुळे ठेवींच्या रूपाने त्यांच्याकडे गोळा झालेल्या भांडवलाचा काही भाग व्यापारी भांडवलात रूपांतरित होत असण्याची शक्यता आहे.

व्यापारी भांडवलाच्या विकासाच्या दृष्टीने पाहिल्यास भारतीय अर्थव्यवस्था पुष्कळच प्रगत अवस्थेला जाऊन पोचली होती, असे दिसते. सतराव्या शतकातील युरोपीय व्यापारी व कारखानदार भारतीय पत-पद्धतीवर गंभीरपणे टीका करीत नाहीत आणि तिची अधिकांश वैशिष्ट्ये किंवा युरोपीय पद्धतीशी तुलना करता तिच्यात आढळणारे फरक यांची नोंद ते करीत असले तरी युरोपीय पद्धतीशी तिची बरोबरीच होऊ शकत नाही, असे सूचित करण्याचा प्रयत्न ते करीत नाहीत हे लक्षणीय आहे.

इतके सारे असूनही भारतीय पतपद्धती व्यवहारतः केवळ व्यापाराच्या गरजा भागविण्यासाठीच निर्माण करण्यात आलेली असावी, असे दिसते. त्यामुळे तिच्यामध्ये दीर्घकालीन गुंतव-

---

६०. टॅव्हर्नियर, 'ट्रॅव्हल्स इन इंडिया', १, २४.

६१. 'मीरासे अहमदी', १, पृ. ४१०–४११.

६२. ताडून पाहा: मनुची, 'स्तोरिया दो मोगोर', अनु. डब्ल्यू. इरविन, १, १७९.

६३. पाहा: इ. हबीब, 'कॉन्ट्रिब्यूशन्स टु इंडियन एकॉनॉमिक हिस्टरी', १, ११, १५–१७. या लेखात या विषयाचा अधिक ऊहापोह करण्यात आलेला आहे.

६४. कित्ता, पृ. १७–१९.

णुकीची काही तरतूद नव्हती. व्याजाचे दर महिन्याच्या हिशेबाने मोजले जात.[६५] कोणतेही कर्ज एका वर्षाहून अधिक काळ चालू राहील अशी अपेक्षा नसे; कारण एक वर्ष पूर्ण झाल्यानंतर व्याजाचा दर दुप्पट करण्याची प्रथा चालत आलेली होती.[६६]

ज्याचा खुलासा करणे अवघड आहे असे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे भारतामध्ये सतत चालू राहिलेले व्याजाचे फार मोठे दर हे होय. सुरत, अहमदाबाद, आग्रा आणि दख्खन येथे जे व्याजाचे दर प्रचलित होते ते सगळीकडे समानपणे खूप खाली घसरत होते असे दिसते. इतर माहितीशी तुलना करता ही घटना १६४० च्या सुमारास घडली असावी असे म्हणता येते.[६७] उत्तर भारतात व्याजाच्या दरातील ही घट दरमहा १ ते १ १/२ टक्क्यापासून ३/४, ५/८ किंबहुना १/२ टक्क्यांपर्यंत झालेली होती. दख्खनमध्ये हीच घट, दरमहा २ टक्क्यांपासून १ १/२ टक्क्यांपर्यंत किंवा त्यापेक्षा कमी झालेली होती. या घटीची कारणे नीट लक्षात येत नाहीत. पाश्चात्य देशांतून मोठ्या प्रमाणावर आयात होणाऱ्या सोन्या-चांदीच्या आवकीशी या ना त्या प्रकारे तिचा संबंध जोडता आला तर मात्र तिचा उलगडा होऊ शकतो. ते कसेही असले तरी त्यानंतरच्या काळातही भारतातील व्याजाचे दर इंग्लंडमधील व्याजाच्या दरांपेक्षा खूपच अधिक राहिले; आणि त्या दोन दरांतील अंतर एवढे मोठे होते की इंग्लिश ईस्ट इंडिया कंपनीने केवळ व्याजाने कर्जाऊ देण्याकरिताच भारतात पैसा पाठवावा असे सुचविण्यात आले होते.[६८]

व्याजाच्या या भारी दरांवरून येथील अर्थव्यवस्थेत भांडवलाचा आंतरिक तुटवडा होता असे मात्र सूचित होत नाही. याच्या उलट व्यापारी प्रवृत्तीचा हळूहळू जो विस्तार होत होता त्याच्यामुळे व्याजाचे दर चढे राहिले असण्याची शक्यता आहे. अकबराच्या राजवटीपासून नंतरच्या काळात रोखीचा व्यवहार अधिकाधिक विस्तृत प्रमाणात सक्तीचा होत गेल्यामुळे व्यापारी प्रवृत्तीचा हा विस्तार होत गेला होता. भारतातील परंपरेमुळे येथील व्यापाऱ्याला विक्रेय वस्तूंवर युरोपातल्यापेक्षा अधिक नफा घेता येत असल्यामुळे व्याजाचे भारी दर व्यापारी गुंतवणुकीतून मिळणाऱ्या भारी नफ्याचे द्योतक असण्याचीही शक्यता आहे. या व्यापारी गुंतवणुकीवर विशेष परिणाम करू शकेल अशी चढाओढही येथे नव्हती. तथापि, या सर्व बाबींसंबंधी आपल्यापाशी जवळजवळ काहीच तपशीलवार माहिती उपलब्ध नाही; त्यामुळे नुसती अनुमाने लढवून काहीच लाभ होणार नाही.

---

६५. ' कंपॅरेटिव्ह स्टडीज इन सोसायटी अँड हिस्टरी ', ६ (४), पृ. ४०१-४०२.

६६. अहमदाबादच्या इंग्रज कारखानदारांनी सुरतेला १७ मे १६४७ रोजी पाठविलेला अहवाल: " सुरत फॅक्टरी : इनवर्ड लेटर बुक, १६४६-१६४७ ", पृ. १३० ( डिपार्टमेंट ऑफ आर्काईव्हज अँड आर्कियॉलॉजी, मुंबई ). या संदर्भाबद्दल मी कु. ए. हसन यांचा आभारी आहे.

६७. पाहा: ' कंपॅरेटिव्ह स्टडीज इन सोसायटी अँड हिस्टरी ', ६ (४) पृ. ४०२-४०४ या ग्रंथातील तक्ते. त्या तक्त्यांत १६२८ साली आग्रा येथील व्याजाचा दर ३/४ दिलेला आहे. त्याऐवजी तो २ टक्के आहे असे वाचावे. या लेखामध्ये मी असे सूचित केले आहे की ईस्ट इंडिया कंपनीतील हिशेबाचे नियंत्रण सुधारल्यावर व्याजाचे दर खाली आले. प्रारंभीच्या काळात इंग्रज कारखानदारांनी खरे दर लपविले असले पाहिजेत याविषयी मुळीच शंका नसली तरी माझे ते सूचक विधान मी आता परत घेऊ इच्छितो.

६८. कित्ता, पृ. ४०४-४०५. व्याजाच्या चढ्या दरांचा अर्थ स्वाभाविकपणेच असा होतो की हुंड्यांच्या बट्टयाचे दरही खूप अधिक होते. टॅव्हर्नियर ' ट्रॅव्हल्स इन इंडिया ', १, ३१ या आपल्या ग्रंथात या गोष्टीचा उल्लेख करतो. तथापि, त्याला स्वतःलाही असे वाटते की बट्ट्यामध्ये विम्यापोटी असणाऱ्या रकमेचाही समावेश असल्यामुळे निदान काही अंशाने तरी, बट्ट्याच्या भारी दरांचे कारण विमा हे एक होते.

अशा प्रकारे मुगलकालीन भारतीय अर्थव्यवस्थेसंबंधी आपल्याला जी काही माहिती मिळते तिच्यावरून व्यापारी भांडवल आपल्या स्वतःच्या विकासातून औद्योगिक भांडवलामध्ये रूपांतरित होऊ शकत नाही या मार्क्संच्या विधानाला बळकटी येते. मार्क्स म्हणतो, "भांडवलाचा विकास प्रामुख्याने व्यापारी भांडवलाच्या स्वरूपात स्वतंत्रपणे होतो. याचा अर्थ प्रत्यक्ष उत्पादनक्रिया भांडवलावर अवलंबून नसते. म्हणजेच हे व्यापारी भांडवल ज्या उत्पादनव्यवस्थेच्या आधारावर निर्माण झालेले असते ती उत्पादनव्यवस्था भांडवलशाही नसते. एवढेच नव्हे तर भांडवलशाही उत्पादनव्यवस्थेशी त्याचा काही संबंध नसतो. म्हणून अशा तऱ्हेच्या स्वतंत्रपणे होणाऱ्या व्यापारी भांडवलाच्या विकासाचे समाजाच्या सर्वसाधारण आर्थिक विकासाशी व्यस्त प्रमाण आढळते."[६९]

शेवटी आपण सोळाव्या व सतराव्या शतकात आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या स्वरूपामध्ये जे मोठे बदल घडून आले त्यांचा भारतीय अर्थव्यवस्थेवर काय परिणाम घडून आला याचा विचार करू. नव्या जगाचा आणि केप ऑफ गुडहोपला वळसा घालून जाण्याच्या मार्गाचा शोध लागल्यानंतर हे बदल घडून आले होते. युरोपमध्ये समुद्रपार व्यापाराचा विस्तार आणि त्याच्या बरोबर किमतीत घडून आलेली क्रांती– ही क्रांती पूर्णपणे व्यापारविस्तारामुळे घडून आलेली नसली तरी त्याच्यामुळे तिला तीव्रता प्राप्त झाली होती– यांनी युरोपातील वेगवेगळ्या देशांमध्ये उत्पन्न व संपत्ती यांच्या वितरणात उलटापालट घडवून आणण्यास हातभार लावला. युरोपच्या आर्थिक जीवनावर याचा चिरस्थायी परिणाम झाला. तसेच, या घटनांमुळे जे बदल घडून येणे शक्य झाले त्यांच्यापर्यंत भांडवलशाहीचे धागेदोरे नेऊन पोचविणे शक्य आहे.

मुख्यतः मुगल काळातील किमतींच्या इतिहासासंबंधीची माहिती इतकी अपुरी असल्यामुळेच जेम्स ग्रँट यांच्या सूचनेकडे बराच काळपर्यंत कोणाचे लक्ष गेले नाही. त्यांनी असे सूचित केले होते की नव्या जगातून युरोपच्या द्वारे सोन्या-चांदीचा, विशेषतः चांदीचा जो प्रचंड ओघ भारतात सुरू झाला त्यामुळे येथील किमतीत वाढ होणे अपरिहार्यच होते.[७०] अलीकडील संशोधनावरून असे दिसून येते की सतराव्या शतकाच्या पूर्वार्धात झालेली भाववाढ इतकी मोठी होती की, निदान अधूनमधून का होईना, तिला चलनफुगवट्याची संज्ञा देता येणे शक्य होते. त्या शतकामध्ये किमती जवळजवळ दुप्पट वाढल्याचे दिसून येते. ही गोष्ट सोने व तांबे यांच्या चांदीतील किमती आणि प्रमुख शेतमालांच्या किमती यांसंबंधी आपल्याजवळ उपलब्ध असलेल्या माहितीवरून सूचित होते.[७१] मुगलांच्या टांकसाळीतून तयार होणाऱ्या नाण्यांची संख्या दर्शविणाऱ्या वक्ररेषेचे (दर वर्षी तालिकाबद्ध करण्यात आलेल्या नाण्यांच्या संख्येवर आधारलेल्या आलेखाचे) अमेरिकन संपत्तीचा स्पेनमध्ये जाणारा लोंढा दर्शविणाऱ्या हॅमिल्टनच्या आयत आलेखावरून (histogram) सूचित होणाऱ्या वक्ररेषेशी जे अद्भुत साम्य आहे, त्यावरूनही या

---

६९. मार्क्स, 'कॅपिटल', ३, इंग्रजी आवृत्ती ( मॉस्को, १९५९ ), पृ. ३२२.

७०. जेम्स ग्रँट, 'फिफ्थ रिपोर्ट', सं. फिरमिंजर, २, ४८३.

७१. इ. हबीब, पृ. ८१–८९, ३८४–३९४, आणि पृ. ३२७ वरील तक्ता. मोरलँड यांनी आपल्या 'अकबर टु औरंगजेब' ( लंडन, १९२३ ), या ग्रंथात ( पृ. १६०–१६४ व १८५–१८५ ) ही किमतविषयक पुराव्याची थोडीफार छाननी केली आहे. परंतु ते मुख्यतः सरखेजच्या निळीला मिळणाऱ्या किमतींच्या आधारे असा निष्कर्ष काढतात की सतराव्या शतकाच्या पूर्वार्धात किमत नेहमीच्या पातळीवर गेलेली नव्हती.

विधानाला पुष्टी मिळते.[७२] म्हणून मध्यपूर्वेतून व केप ऑफ गुडहोपला वळसा घालून जसजशी सोनेचांदी भारतात येत गेली तसतसा किमतक्रांतीचा परिणाम भारतावर होत गेला असे निश्चितपणे म्हणता येते.

परंतु आपल्या दृष्टीने सोन्या-चांदीच्या पूर्वेकडे होणाऱ्या आयातीविरुद्ध युरोपात ऐकू येणारी हाकाटी जशी महत्त्वाची आहे तशीच सतराव्या शतकातील भाववाढीसंबंधी भारतीय लेखकांनी पाळलेली मुग्धताही महत्त्वाची आहे. ते ज्या किमती नमूद करतात त्यावरून आपल्याला त्या प्रक्रियेची कल्पना येते परंतु त्यांना स्वत:ला मात्र तिची कल्पना नसावी, असे वाटते. दर-साल हाती येणाऱ्या पिकांनुसार किमतींमध्ये जे मोठे चढउतार होत असत त्यांमुळे भाववाढीची सार्वत्रिक प्रवृत्ती लोकांच्या डोळ्यांवर आली नसण्याची शक्यता आहे.[७३] परंतु याच वस्तु-स्थितीवरून असे म्हणता येते की वार्षिक चढउतारांच्या मानाने या भाववाढीच्या प्रवृत्तीमुळे होणारा आर्थिक बिघाड अल्प प्रमाणात होता. परंपरेने किंवा प्रथेने महसुलाचे किंवा मजुरीचे दर रोख रकमेत ठरविलेले नसल्यामुळे असे घडले असण्याची शक्यता आहे. आपण वर पाहिल्याप्रमाणे, ज्या वेळी किमतींमध्ये दीर्घकालीन बदल घडून येत त्या वेळी मुगल अधिकारी रोख महसुलाच्या अनुसूचींत (schedules) फेरबदल करीत असत असे नव्हे तर करआकारणीचे मूलभूत स्वरूपच बदलून ती रोखीच्या ऐवजी वस्तूंच्या रूपातही ते करू शकत असत. (आणि त्यानंतर बाजारभावाने ते त्या वस्तूंचे रोख रकमेत परिवर्तन करून घेत). याचप्रमाणे, मजुरीचे दर आधीच निर्वाह पातळीवर असतील आणि म्हणून त्यांच्यावर धान्यांच्या किमतींचे प्रत्यक्ष नियंत्रण राहात असेल तर किमती वाढल्यानंतर मजुरीही वाढत असली पाहिजे. या ठिकाणी उदाहरणा-दाखल सुरतेतील अत्यंत कमी पगार असणाऱ्या चपराशांचे किंवा अकुशल नोकरांचे तीन वेग-वेगळ्या काळांतील मासिक पगार उद्धृत करण्यात येत आहेत.[७४]

| वर्ष | पगार (रुपये) | निर्देशांक |
|---|---|---|
| १६१६ | २·४० | १०० |
| १६२३ | ३·०० | १२५ |
| १६९०–१६९३ | ४·०० | १६६ |

दुर्दैवाने, त्याच परिसरातील मजुरी व किमती यांसंबंधीची तपशीलवार आकडेवारी अजून गोळा करण्यात आलेली नाही. कुशल कामगारांच्या खऱ्या वेतनाचे स्वरूप काय होते हे अजून स्पष्ट झालेले नाही. परंतु आपण हे लक्षात ठेवले पाहिजे की त्यांच्यापैकी बहुतेक जण, बिसा-राच्या पद्धतीमध्येदेखील, आपल्या वस्तू विकीत असत; आणि त्यांना त्या वस्तूंच्या ज्या किमती मिळत त्या सामान्यत: बाजारपेठेतील किमतींच्या अनुसार असल्या पाहिजेत. यावरून

७२. अजीज हसन, 'करन्सी आउटपुट ऑफ दि मुगल एम्पायर, अँड दि प्राइस-चेंजेस ड्यूरिंग दि सेव्हन्टीन्थ सेंचुरी', मैसूर येथील १९६६ च्या इंडियन हिस्टरी कॉंग्रेसमध्ये वाचलेला निबंध (अप्रकाशित).

७३. उदाहरणार्थ पाहा: पेल्सार्ट, 'जहांगीर्स इंडिया', पृ. ४४. विक्रेय वस्तूंच्या सर्वसामान्य मागणीवर पीकपाण्याचा काय परिणाम होत असे, याचे विवेचन यात केले आहे.

७४. फॉस्टर, 'सप्लिमेंटरी कॅलेंडर', पृ. ६६; पीत्रो देला वॅले, 'ट्रॅव्हल्स इन इंडिया', अनु. ई. ग्रे, १,६२; ओव्हिंग्टन, 'व्हॉयेज टु सूरत', सं. रॉलिन्सन, पृ. २२९.

एकंदरीने पाहाता सतराव्या शतकातील भाववाढीतून दीर्घकालीन स्वरूपाचा जादा नफा कमावला असेल असे वाटत नाही.

दुसऱ्या शब्दांत सांगावयाचे तर, आपल्याजवळ सध्या उपलब्ध असलेल्या माहितीच्या आधारे आपण असे म्हणू शकतो की मुगलकालीन भारतीय अर्थव्यवस्था विश्वव्यापी मूल्य-क्रांतीच्या परिणामांतून फारशी अडचण सोसावी न लागता सुरक्षितपणे पार पडली.

मुगलकालीन भारतात भांडवलशाही अर्थव्यवस्थेचा विकास कितपत झालेला होता याविषयीचे आपले निष्कर्ष आता आपल्याला सारांश रूपाने सांगता येतील. आपल्याला असे आढळून आले की शेतीच्या व बिगर शेतीच्या अशा दोन्ही उत्पादनांच्या बाबतीत बाजारपेठेसाठी होणाऱ्या उत्पादनाचे क्षेत्र खूपच मोठे होते. शेतीमध्ये खुदकाश्त म्हणजे मालकाने स्वतः जमीन कसण्याची प्रथा होती. अर्थात् हे काम भाडोत्री मजुरांकडून करवून घेतले जाई. भांडवलशाही शेतीच्या दिशेने गाठलेला हा एक पुढचा टप्पा होता. हस्तोद्योगांच्या बाबतीत व्यापारी भांडवलाचा पुष्कळच विकास झालेला होता; आणि कामगारांना त्यांच्या अंगांवर काम देऊन कारागिरांवर नियंत्रण ठेवण्यात आले होते. परंतु एक प्रस्थापित प्रकार या नात्याने विक्रेय वस्तूंच्या उत्पादनाच्या क्षेत्रात कारखानदाराने अद्यापि प्रवेश केलेला नव्हता. दुसऱ्या शब्दांत सांगावयाचे तर, भांडवल हे स्थूल मानाने व्यापारी भांडवल होते; आणि अर्थव्यवस्थेत नाण्याला जरी खूप प्राधान्य प्राप्त झालेले असले तरी घरगुती उद्योगाचेच वर्चस्व तिच्यावर अजून होते.

अशा प्रकारची लक्षणे किंवा वैशिष्ट्ये असणाऱ्या समाजामध्ये यथाकाळी परिपूर्ण भांडवलशाहीचा विकास का घडून आला पाहिजे किंवा का घडून येता कामा नये याची अनेक कारणे सांगता येतील. आपल्या संशोधनातून स्थूल मानाने असे आढळून आले आहे की, राजकीय परिस्थिती आणि जातिभेद यांच्यासारख्या गोष्टींमुळे व्यापाराच्या विस्तारामध्ये अडथळा निर्माण होत होता असे जे पुष्कळदा समजण्यात येते ते तितकेसे बरोबर नाही. ते घटक व्यापारविस्ताराला आळा घालण्याइतके प्रभावी मुळीच नव्हते. तरीपण भांडवलशाहीच्या विकासाला सक्रियपणे हातभार लावणारे घटकही येथे विद्यमान असल्याचे आढळून येत नाही.

या ठिकाणी आणखी एका मुद्याचा विचार केला पाहिजे. तो असा की, मुगल कालीन भारतातील अर्थव्यवस्थेची संपूर्ण व्यापारी संरचनाच (structure) प्रामुख्याने एका लहानशा सत्ताधारी वर्गाकडून केल्या जाणाऱ्या शेतकऱ्यांच्या प्रत्यक्ष शोषणाच्या पद्धतीवर अवलंबून असलेली वांडगुळासारखी परोपजीवी रचना तर नव्हती ना ? शहरी उद्योगांतून निर्माण होणाऱ्या वस्तूंसाठी ग्रामीण बाजारपेठ जवळजवळ उपलब्ध नव्हतीच, हे विसरता कामा नये. त्यामुळे ग्रामीण नाणकीकरण (monetization) हा प्रामुख्याने अतिरिक्त शेतमाल शहरांना देण्याच्या गरजेचा परिणाम होता.

परिणामतः, जेव्हा कृषिप्रणालीमध्येच आणीबाणीची परिस्थिती निर्माण झाली तेव्हा संपूर्ण भारतीय अर्थव्यवस्थेच्या इमल्याला तिची झळ लागणे अपरिहार्य होते. त्या काळातील भांडवल व्यवहारतः वाणिज्यक्षेत्रापुरतेच मर्यादित होते. त्याला स्वतःसाठी कोणताही स्वतंत्र आधार निर्माण करता आला नाही. त्याचे भाग्य मुगल सत्ताधारी वर्गाच्या भाग्याशी निगडित होते; आणि त्या वर्गाचे अधःपतन झाल्यानंतर त्या वर्गाकडून ज्यांना पद्धती व संस्था यांचा

वारसा मिळाला अथवा ज्यांनी त्यांचे अनुकरण केले अशा वर्गाशी ते निगडित राहिले. व्यापारी भांडवलाला मुगल साम्राज्याकडून जी मोठी बाजारपेठ मिळालेली होती ती अठराव्या शतकात संपुष्टात आल्यामुळे त्याला क्षीण होण्याखेरीज दुसरा मार्गच उरला नाही. त्याबरोबर मुगल साम्राज्याच्या चलतीच्या काळात ज्या महत्त्वाच्या आर्थिक गोष्टींना चुकून भांडवलशाहीची वैशिष्ट्ये समजण्यात आले असते त्या गोष्टीही मागे पडल्या.

# अठराव्या शतकामध्ये महाराष्ट्रात असेही घडले असेल

मा. द. आपटे

अठराव्या शतकाच्या कालावधीत आजच्या महाराष्ट्रातील प्रदेशांपैकी बऱ्याच मुलुखावर देशी सत्ता होत्या तशाच काही मुलुखावर परदेशी सत्ताही होत्या. या शतकाच्या उत्तरार्धात या प्रदेशांतील सर्वांत मोठी सत्ता ही मराठ्यांची सत्ता होय. याच्या अगोदरच्या काळात म्हणजे सुमारे दोनशे वर्षांत मुसलमान व मोगल यांच्या सत्ता याच प्रदेशांत होत्या. अशा वेगवेगळ्या सत्ता होऊन गेल्या तरी त्यांच्या कारभाराच्या यंत्रणेत व सत्ता सांभाळून त्याची जोपासना करण्याच्या व्यवस्थेत सारखेपणा अधिक आढळतो. त्यावरून असाही निष्कर्ष काढता येतो की या कालांत जर काही राजकीय स्थित्यंतर झालेच असेल तर ते प्रायः सत्तेच्या चालकांतील बदलापुरतेच मर्यादित होते.

या भिन्न सत्तांच्या आर्थिक व्यवस्था व धोरण इत्यादीबाबतींतील साम्य तर इतके आढळते की त्यांत अपवाद म्हणूनही अंशतःदेखील फरक सापडत नाही. सामान्यपणे स्वकीय प्रजा व परकी प्रजा असा भेद ते मानीत. परकी प्रजा लुटावी, तिची नासधूस करावी या वृत्तीस कोणीही अपवाद आढळत नाही. या बाबतीत जाळपोळ, दंगेधोपे, इत्यादि प्रकार बिनदिक्कतपणे चालत. याउलट स्वकीय प्रजा म्हटली की तिच्या बाबतीत पालकत्वाची भूमिका सत्ता घेत असे. प्रजेच्या पालनपोषणाची दक्षता घेतली जाई. या सर्व सत्तांचे कायदेकानू, शिस्त व आनुषंगिक धोरणे ही प्रजेच्या वसाहती स्थिर होऊन वाढाव्या व वृद्धिंगत होऊन भरभराटीस याव्या अशा हेतूने होती. गावोगावची रयत नैसर्गिकपणे येणाऱ्या अडचणीतही टिकून राहावी अशी त्यांची खटपट असे. गावच्या अडचणींचा व शेतीच्या दुःस्थितीचा कानोसा देशमुख व पाटील यांच्यामार्फत घेण्याच्या बाबतीत हे सत्ताधारी फारच कसोशी दाखवीत. त्यांच्यामार्फत रयतेशी जुळतेमिळते घेऊन आपल्या हक्कांचा उपयोग ते घेत. त्यासंबंधात कोणतीच मग्रुरी ते दाखवीत नसत.

तसेच इतर प्रजेपैकी कसबी व व्यापारी यांना अधिकाधिक सहाय्य करण्याचे त्यांचे धोरण होते. निरनिराळ्या प्रदेशांतून मालाची ने-आण वाढून दूरदूरच्या मुलुखांतून आपल्या मुलुखात माल यावा, एवढेच नव्हे तर परमुलुखांतील व परदेशांतील व्यापाऱ्यांनी आपल्या प्रदेशात कायमच्या व्यापारी पेढ्या व वखारी घालाव्या यासाठीही त्यांची खटपट चालू असे. स्वकीय प्रजेत दंगेधोपे झाले व प्रजा परागंदा झाली तर तिच्या पुनर्वसनासाठी नरमाईचे सौम्य धोरण ठेवून त्यासाठी सर्वतोपरी मदत करण्याचा त्यांचा शिरस्ता होता. अशा वेळी प्रजेवरील सत्तेचे येणे माफ करून टाकणे अगर सूट देणे असा त्यांचा प्रघात होता.

कोणत्याही सत्तेच्या संबंधात वरील प्रकारची धोरणे ही केवळ व्यवहार्य म्हणून होती की काही विशिष्ट हेतूसाठी होती, ही धोरणे निव्वळ प्रजेच्या चिरंतन स्थैर्याच्या दृष्टीने होती की प्रायः सत्तेच्याच जपणुकीसाठी व स्वार्थासाठी होती इत्यादि बाबतींत बिनतोड उत्तर देणे कठीण

आहे. तरीही त्यांच्या विविध बाबतींतील बारीकसारीक धोरणांचा अभ्यास केल्यास त्यातून वरील स्वरूपाचा अन्वयार्थ स्पष्टपणे निघतो.

सरकारी वसुलाच्या संबंधात प्रजेला योग्य वेळी सवलत किंवा सूट व माफी दिली की प्रजेचे जीवनमान टिकून राहाते व प्रजा शेतीमध्ये टिकून राहाते, एवढी जाणीव सर्व संत्तांना होती. या धोरणामुळे प्रजा जरी शेतीत टिकून राहात असली तरी त्याला आणखीही काही किमान गोष्टींची जोड हवी. ती म्हणजे पाण्याची व पैशाची सोय. याबद्दलही काही विचार सत्तांना जाणवलेला दिसतो. पण या सर्व बाबतीत त्यांनी शोधलेले उपाय हे फार मंद गतीने कार्य करणारे व वेळखाऊ होते.

मराठ्यांच्या सत्तेपुरते बोलावयाचे तर आपल्या प्रदेशांतून मिळणाऱ्या उत्पन्नावर आपल्याला सत्ता चालविता येणार नाही व तिचा सांभाळही करता येणार नाही हे स्पष्टपणे वारंवार त्यांच्या अनुभवास येत होते. हळूहळू आपली स्थिती बिकट होत असून आपली आर्थिक कोंडी होत आहे हे त्यांना दिसत होते. पैशाच्या कमतरतेमुळे जी टंचाई निर्माण होई त्यामुळे ते अगदी बेजार होत. उत्पन्नाच्या वसुलाच्या पोटी अगाऊ रकमा कर्जाऊ घेवूनच सत्तेचे आर्थिक व्यवहार भागविले जात. या कर्जाचा विस्तार व विविधता त्यांच्या हिशेबात उघड-उघड दिसून येते. मराठ्यांच्या सत्तेच्या कारभारयंत्रणेत व सत्ता सांभाळण्याच्या व्यवस्थेत सावकार व व्यापारी मंडळींचा संबंध वाढत गेला. उत्पन्नाच्या वसुलीचा कारभारच अप्रत्यक्षपणे सावकार व व्यापारी लोकांकडे गेला. यांतूनही आर्थिक कोंडी काही नष्ट होऊ शकली नाही. परकी प्रजेला लुटून आर्थिक टंचाईची वेळ मारून न्यावी किंवा सावकाराने स्वकीय प्रजा लुटल्यास तिकडे काहीसे दुर्लक्ष करावे असा व्यवहार होऊ लागला.

आपली बिकट परिस्थिती व आर्थिक कोंडी अगर पैशाची वाढती टंचाई झाली तरी स्वकीय प्रजेशी शक्यतो सबुरीने वागण्याचा त्यांचा पायंडा होता. आपला बोजा प्रजेवर टाकण्यास ते तयार नसत. मात्र क्वचित त्यांचा नाइलाज होई व त्यांना तो टाकावा लागे.

कदाचित प्रजेमध्ये तसा बोजा सहन करण्याची ताकदही नसेल किंवा आपली आर्थिक कोंडी होऊन नाकेबंदी झाली तरी प्रजेला धक्का लागता कामा नये, नाहीतर निव्वळ शेतीवरच उभ्या असणाऱ्या गावोगावच्या वस्त्या मोडून जातील व प्रजेची नासधूस होऊन मुलूखही पुन्हा वैराण होईल व असेच चालत राहिले तर सत्तेच्या आर्थिक कोंडीत भरच पडत राहील असाही त्यांचा समज असावा.

मराठ्यांची सत्ता सुमारे शंभर वर्षे टिकून वाढली. त्या कालात महाराष्ट्रातील रयत शेतीमध्ये गुंतून राहात जाऊन व्यापारास व कारागिरीस वाव मिळाला. तिचा विस्तार होऊन दूर अंतरापर्यंतच्या गावांशी देवाणघेवाणीचे संबंध निर्माण होत गेले. यामुळे रयत स्थिर होण्यास व प्रजेची वसाहत विस्तारण्यास योग्य परिस्थिती निर्माण झाली. अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात मराठ्यांच्या सत्तेलादेखील बरे दिवस अनुभवता आले. पैशाच्या व्यवहारातील ओढाताण अल्प प्रमाणात का होईना कमी होऊन किंचित् काळ तरी पैशाच्या व्यवहारातील गोंधळ कमी झाले. तरीही आणखी असाच काही काळ मराठी सत्ता टिकून राहिली असती तर रयतेच्या स्थैर्याचा व प्रजेच्या वसाहतवाढीचा सत्तेला लाभ मिळून तिची तंगी कमी होत गेली असती व भविष्यकाळात ती तगी संपूनच गेली असती इतपर्यंत अनुमान काढणे जरा गैर वाटते. कारण जोपर्यंत निव्वळ शेतीप्रधानच अर्थव्यवस्था असते तोपर्यंत उत्पन्नाची नैसर्गिक अनिश्चितता व उत्पन्नाची

कमतरता यांना प्रजेला व सत्तेला तोंड द्यावे लागते व त्यामुळे काही अनिष्ट परिणाम भोगावेच लागतात. पैशाच्या व्यवहारातील ओढाताण हा या अनिष्ट परिणामांपैकी एक महत्वाचा परिणाम होय.

अशा परिस्थितीत कर्जावर व लुटीवरच केवळ सत्ता सांभाळून तिची जपणूक करावी लागते. व्यापार, उद्योग व इतर उद्योगांतून मिळणारे उत्पन्न अगदीच तोकडे असल्यामुळे वरील उपाया-शिवाय दुसरा पर्यायच संभवत नाही.

मराठ्यांची सत्ता कर्जबाजारी झाली आणि मुलुखातील रयत व प्रजा कर्जबाजारी झाली नाही. येवढेच नव्हे तर या शतकात येथील गावोगावची रयत स्थिरावून प्रजेचे पुनर्वसन झाले. दुसऱ्या प्रदेशापर्यंत संबंध जाऊन पोचले. रयतेची स्थिती बरी झाली व नगरांची वाढ होऊन सधन व श्रीमंत प्रजा निर्माण झाली. हा सर्व प्रकार काहीसा विचित्र वाटतो. हे असे कसे घडले या विचाराने जो अभ्यास केला त्याच्या चिंतनावर पुढील विवेचन केले आहे.

या सर्व अभ्यासाची मर्यादा केवळ ऐतिहासिक अस्सल कागदपत्रापुरतीच आहे. शिवाय ही कागदपत्रे विशिष्ट स्वरूपाची असून आणखीही त्यांच्या अनेक मर्यादा आहेत. त्यातही पुन्हा केवळ लेखकाने समक्ष अभ्यासलेल्या व निवडलेल्या कागदांवरच हा अभ्यास उभारलेला आहे.

पुणे येथील पेशवे दप्तरात मोडी लिपीतील मराठी भाषेतील सहस्रावधी कागद अस्सल स्वरूपाचे आहेत. कागदपत्रांचे राजकीय व बिनराजकीय असेही प्रकार आढळतात. यांपैकी बिनराजकीय प्रकारची जी कागदपत्रे आहेत त्यांतील निवडक कागदपत्रांचा अभ्यास केला.

या शतकातील मराठ्यांच्या सत्तेचा जो इतिहास ज्ञात आहे व ज्याचा आधार ऐतिहासिक मोडी लिपीतील मराठी कागदपत्रे आहेत, त्याचे बहुतांशी स्वरूप राजकीय आहे व या कालात लोकस्थिती कशी होती यासंबंधात बरेच अज्ञान आहे. या कालात येथील वसाहती कसकशा बदलल्या व सर्वसाधारण स्थितीत काही बदल झाले का या गोष्टीची कल्पनाच करता येत नाही. या संबंधात व्यक्त केले जाणारे मत एकच प्रकारचे आढळते. इतर भारतवासीयांप्रमाणे रूढी व परंपरा यांच्या बंधनात येथील लोकही जखडलेले होते व त्यामुळे समाजातील शक्तींचा आवि-ष्कारच मुळी जीवनाच्या कोणत्याच क्षेत्रात झाला नाही. केवळ परंपरागत जीवन चालू ठेवण्यातच समाज गुंतलेला आढळतो.

तात्त्विक दृष्टीने पाहता वरील प्रकारचे मत म्हणजे फारसे चिकित्सा न करता रूढ होऊन बळावलेला एक सिद्धान्त आहे. वास्तविक समाजात स्थित्यंतर होत असणारच. फरक एवढाच की काही समाजांत ते मंद होत असते व काही समाजांत वेगाने होत असते. नैसर्गिक स्थित्यंतरांची प्रक्रिया नेहमी चालूच असते व फक्त त्यांची दखल काही वेळा अभ्यासात घेतली जात नाही. काहीं वेळा हे स्थित्यंतर इतके मंद असते की त्यामुळे स्थित्यंतराचे स्वरूप अतिसूक्ष्म होते. त्यामुळे आपल्या ध्यानात येणारे स्थित्यंतर आभासात्मक आहे असेही वाटण्याची शक्यता असते.

महाराष्ट्रापुरते बोलावयाचे झाले तर येथील प्रजेचा संबंध व दळणवळण इतर अनेक प्रांतांत विस्तारले व सत्तेच्या कारभारात व सत्ता सांभाळण्याच्या ओघात येथील रयतेची व प्रजेची स्थिती ध्यानात येण्या इतकी बदलली.

मराठी सत्तेच्या छत्रपतीची मोगली सत्तेच्या बादशहाने केलेली सुटका ही काही अटींवर होती. या संबंधातील अस्सल कागदपत्र प्रसिद्ध स्वरूपांत उपलब्ध आहेत. त्यावरून या अटींची कल्पना येते. मराठ्यांचा छत्रपती हा मोगल बादशहाचा मांडलिक झाला. त्याला जी सत्ता प्राप्त

झाली ती दक्षिणच्या सहा सुभ्यांतील मुलुखाच्या अंमलाचे संबंधातील होती. या अंमलापैकी चौथाई व सरदेशमुखी एवढे हिस्से मराठयांच्या छत्रपतीला दिले गेले. त्याशिवाय शिवाजीच्या राज्यांतील मुलखाचा सर्व अंमल बहाल करण्यात आला. याचसाठी सनद देण्यात आली. मांडलिक म्हणून दिलेली ती सरंजामी स्वरूपाची नेमणूक होती. याच आधारावर १८ व्या शतकात मराठयांची सत्ता उभी राहिली व इतर प्रांतांतही पसरली. त्याला सुमारे ५० वर्षांचा कालावधी लागला. ह्या पसाऱ्यामागोमाग सत्तेच्या सांभाळासाठी सरंजाम देण्याचा व्यवहार वाढला. या सरंजामी व्यवहाराची इतकी वाढ झाली की मराठी सत्तेच्या व्यापक पसाऱ्याची रचनात्मक बैठक सरंजामी या नावाने ओळखली जाते.

ही सरंजामी पद्धत कसली होती, ती या मुलुखात अगोदरच रूढ होती किंवा काय आणि तशी असल्यास मराठी सत्तेत तिचा समावेश होऊन तिची वाढ होत गेली असे घडले किंवा काय? इत्यादि प्रश्नांचा उलगडा झाला पाहिजे. वरील प्रश्नांस होय म्हणून उत्तर द्यावे लागेल. एवढेच नव्हे तर ही पद्धत बरीच पुरातन असावी असेही आढळते.

ही पद्धत केवळ लष्करी स्वरूपाची की बिनलष्करी स्वरूपाची असा एक महत्त्वाचा प्रश्न उद्भवतो. मुलुखगिरी करावी व मुलुखाची व्यवस्था सांभाळावी व मराठी सत्ता टिकवून धरावी अशा उद्देशाने काही सरंजाम दिलेले होते हे खरेच आहे. मात्र सरंजाम देणे याचा एवढाच मर्यादित अर्थ नाही. सरदार जहागीरदार यांच्या प्रमाणे वतनदार व इनामदार यांनाही सरंजाम दिलेले होते.

पहिले दोन हे लष्करी सरंजाम म्हटल्यास दुसरे दोन लष्करी नव्हते म्हणून त्यांना बिन-लष्करी म्हणता येते. या दोहोंत काही विशेष फरक आहे असे सूचित करण्यात येते. पण त्यात अगदी मर्यादित तथ्य आहे. हे सरंजामी लोक सत्तेचे आश्रित व सेवक होते. त्यांच्यातील फरक हा फक्त सेवेतील फरकच आहे. याव्यतिरिक्त त्यांच्यांत साम्यच अधिक आहे. सरंजाम म्हणजे मुलुखातील उत्पन्न देणे, या मुख्य दृष्टिकोनातून पाहाता व त्यांतून निर्माण होणारा व्यावहारिक व आर्थिक परिणाम विचारात घेता हे सर्व एकाच माळेचे मणी ठरतात. सत्तेच्या उपभोगापैकी उत्पन्नाचे हे वाटेकरी होत, या भूमिकेवरून विचार केल्यास त्यांना एका वर्गाचे किंवा गटाचे म्हणता येते.

लष्करी सरंजाम हे मोठे व बिनलष्करी लहान असाही भेद करता येत नाही. या दोहो-मध्ये अगदी जमिनीच्या छोटया क्षेत्रापासून एका गावच्या आख्या क्षेत्राच्या व एका मुलुखातील विस्तृत क्षेत्राच्या मर्यादेपर्यंत सरंजाम आढळतात. हे दोन्ही सरंजाम पिढयानुपिढया अखंडपणे चालत व त्यांत जप्तीच्या स्वरूपात खंड पडल्यास तो अल्प कालावधीपुरता असे. हा प्रकार दोन्हीतही असे. सरंजाम म्हणजे सत्ता सांभाळण्यासाठी निर्माण केलेले आश्रित होत. या सर्व आश्रितांची उपजीविका सत्तेवर अवलंबून असे. स्वतःचे व आपल्या आश्रितांचे पालनपोषण करण्याची सोय या सरंजामातून होई. या सरंजाम्यांना जमिनीचे सर्व उत्पन्न मिळे. हा उपभोग कायमचा व पिढयानुपिढया घेता येत असल्यामुळे हे सरंजामी लोक जमिनीची मशागत व लागवड करण्यात उत्साहाने भाग घेत असतील. यामुळे त्यांचे शेतीशी हितसंबंध वाढीस लागले असतील. ह्याचा परिणाम म्हणून शेतीची मशागत व लागवड विस्तारली असेल.

अनेक वेळा एका जमिनीच्या क्षेत्रात निरनिराळे सरंजाम असत. त्यामुळे सरंजामाच्या हितसंबंधांत गुंतागुंतीची परिस्थिती निर्माण होई. तरीही सरंजाम्यांपैकी प्रत्येकजण आपला सरंजाम उपभोगण्याच्या बाबतीत जितका दक्ष असे तितकाच तो इतरांच्या उपभोगाच्या बाबतीतही तत्पर

व काटेकोर असे. या सरंजाम्यांना नियंत्रित करणाऱ्या पूर्वापार चालत आलेल्या अशा दोन सत्ता होत्या. एक गावकीची सत्ता व दुसरी राजकीय सत्ता. या बाबतींत सनद व शिरस्ता या दोहोंचे पालन कायद्याप्रमाणे होई.

सरंजामी ज्या ठिकाणी वस्ती करी तेथे त्याचे आश्रित व काहीसा गोतावळा तयार होई. या आश्रयाचा सरंजाम्यांना व त्यांच्या आश्रितांना फार उपयोग होई. सरंजामी आपली दौलत वाढविण्यासाठी या आश्रितांचा उपयोग करून घेई व हे आश्रित आपल्या चरितार्थासाठी सरंजाम्यांकडे नोकरी चाकरी करून राहात. सरंजामदार कायमचे वास्तव्य करण्याच्या मागे असल्यामुळे आश्रितांचीही कायमची सोय होई. सरंजामाच्या वस्तीचा पसारा वाढून गावची वसाहत वाढत जाई. या आश्रितांमध्ये भिन्न भिन्न जातींचे, कारागिरींचे व व्यवसायांचे लोक असत.

सरंजामाच्या दौलतीचा भाग म्हणून कापड-चोपड, दागदागिने, जनावरे, प्राणी, पशुपक्षी व इतरही काही मालाची साठवणूक करून त्याच्या पैदाशीसाठी कारखाने उभारण्याचा व्यवहार होत असे. त्यामुळे तेथे नोकरपेशा लोकांचा बराच गोतावळा निर्माण होई. या वस्तीचे स्वरूपच निराळे होई. तेथील लोकांसाठी बाजारहाट वाढून व्यापाराचा जम बसत असे.

सरंजाम्यांचा संबंध उत्पन्न घेण्यापासून उत्पन्नाची पैदास करण्यापर्यंत येत असे. हा संबंध इतका निकटचा होत गेला की मराठ्यांच्या सत्तेच्या उत्पन्न गोळा करण्याच्या कारभार यंत्रणेमध्ये अगर नोकरशाहीमध्ये सरंजामी लोकांचा समावेश झाला. सत्तेच्या ताब्यातील मुलुखापैकी काही नोकरशाही सरंजामी लोकांकडे जोडली गेली. सरंजामी लोकांकडे गेलेल्या अशा मुलुखाचे प्रमाण अठराव्या शतकाच्या प्रारंभी जे फक्त २५ टक्के होते ते त्या शतकाच्या अखेरीस ७५ टक्के झाले. याचाच अर्थ मराठी सत्तेच्या कारभाराचे स्वरूप प्रायः सरंजामी झाले. वास्तविक उत्पन्न गोळा करून त्याची विल्हेवाट लावणारी दरकदारी या नावाची एक नोकरशाही मराठ्यांच्या सत्तेत होती आणि तिचे नियंत्रण मराठी सत्ता म्हणजे छत्रपती करी. पण जसजसा वाढता मुलूख सरंजामी झाला तसतसे छत्रपतींच्या नियंत्रणाखालील दरकदारीचे क्षेत्र संकुचित होत गेले व अधिकाधिक मुलुखावर सरंजामी सत्ता नियंत्रण करू लागली.

अशा रीतीने अठराव्या शतकात मराठ्यांच्या सत्ताविस्ताराबरोबर सत्तेच्या व्यवस्थेत बदल झाले व तिचे स्वरूप सरंजामी झाले. मराठ्यांची सत्ता म्हणजे मांडलिक व मांडलिकांचे मांडलिक यांनी सांभाळलेली व जतन केलेली सत्ता झाली. या बदलामुळे काही प्रमाणात तिचे राजकीय स्वरूपही बदलले. या बदलामुळे आणखी एक परिणाम झाला. मात्र तो आर्थिक स्वरूपाचा परिणाम आहे. तो परिणाम म्हणजे येथील जमीनधारणेत झालेला फरक होय. येथे दोन प्रकारची जमीनधारणा दिसू लागली. पैकी एक जमीनधारणा मराठ्यांच्या छत्रपतीशी जोडलेली होती; व दुसरी सरंजाम्यांशी जोडलेली होती. या दोन्हीही पद्धती जमीनदारीच्याच म्हणता येतात. एकीमध्ये जमीनदार जमिनीवरील कर घेतो तर दुसरीमध्ये जमीनदार जमिनीचे सर्व उत्पन्न घेतो. दुसऱ्या पद्धतीत मराठी सत्तेच्या छत्रपतीचा संबंध नाममात्र राहातो. याच संदर्भात आणखी एक मुद्दा स्पष्ट केला पाहिजे. मराठी सत्तेच्या मुलुखात गावोगावी जी जमीनधारणेची व्यवस्था होती ती संपूर्ण रयतवारीची होती. त्या बाबतीतील आवश्यक तेवढे विवेचन पुढे दिलेले आहे. या जमीनधारणेत रयतेचा किंवा प्रजेचा संबंध कसा होता तेही पाहिले पाहिजे. गावांतील किंवा नगरांतील प्रजा ही जमिनीची कुळे असत. ही कुळे कायम असत व त्यांच्या वहिवाटीची जमीन कायम असे. अर्थात ही सर्व कुळे पाटलाच्या तर्फेची, सरंजाम्यां तर्फेची असत. गावात लागवड

वाढत जात असताना त्यात गावच्या रयतेबरोबर बाहेरची रयतही समाविष्ट होई.

आपला अभ्यासाचा जो मुख्य विषय, की येथें पुनर्वसन होऊन प्रजा स्थिर वस्ती करून राहू लागली व मराठ्यांचे सत्ताधारी मात्र दु:स्थितीत होते, त्याच्या शोधासाठी ऐतिहासिक कागदपत्राचे जे मंथन केले त्यातून जे प्राप्त झाले त्यातून सत्यांश म्हणून जे वाटले व आढळले ते येथून पुढे सविस्तर दिले आहे.

रयत व प्रजा यांचे संबंधात जी माहिती मिळते त्यावरून त्यांचे संबंधांत पुढील बाबींवर प्रकाश पडतो.

१. खेडेगावाचे क्षेत्र व स्वरूप
२. नगराचे क्षेत्र व स्वरूप
३. ग्रामीण रयतेतील जाती व वर्ग
४. नागर प्रजेतील जाती व वर्ग
५. शेतीचे स्वरूप
६. व्यापाराचे स्वरूप
७. उद्योगाचे स्वरूप
८. गावाचे आर्थिक व्यवहार
९. सत्तेचे आर्थिक व्यवहार
१०. सत्तेचे गावाशी व प्रजेशी संबंध
११. स्थित्यंतराचे स्वरूप

ज्या ऐतिहासिक कागदपत्रांचे मंथन केले व ज्यांचे स्वरूप अगदी सुरवातीस सांगितले, त्याचे मंथन कसे केले हे प्रथम स्पष्ट केले पाहिजे.

गावची दप्तरे ही मुलुखवार क्रमाने जुळवून ठेवलेली व ज्यांचा कॅटलॉग आहे अशी पेशवे दप्तरांत उपलब्ध आहेत. त्यामुळे महाराष्ट्रातील निरनिराळ्या मुलुखांचे संबंधांत अलग अलग कागदपत्रे घेऊन तुलनात्मक अभ्यास करणे शक्य आहे. या तुलनात्मक अभ्यासासाठी ज्या बाबीं-वर अर्थपूर्ण माहिती मिळाली त्या बाबी पुढील प्रमाणे होत :—

१. गावची कुलांची यादी
२. जमिनीची मोजणी
३. गावचा हिशेब
४. वतने, इनामे व सरंजाम यांच्या सनदा
५. गावांतील पट्टया
६. मोहतर्फ
७. गावचा अजमास
८. गावचा ताळेबंद
९. इनामी व सरंजामी जमिनीचा मोजणी
१०. गावच्या पिकांची मोजणी

या बाबींवर जी माहिती मिळते ती बरीचशी मोजणी व हिशेब अशा स्वरूपाची असल्यामुळे त्यावरून कालानुक्रमे संख्यात्मक माहिती जुळविता येते व त्यातून स्थित्यंतराची ढोबळ दिशा व स्वरूप उलगडू शकते. त्या संख्यात्मक माहितीची जुळणी मुलुखवार उभारली असली तरी संपूर्ण

प्रदेशाच्या संदर्भात काही व्यापक स्वरूपाचे व स्थितीचे ज्ञान होईल अशा आशेने या संख्यात्मक माहितीचे संकलन केले. या संख्यात्मक माहितीच्या बाबी पुढील होत :—

१. कुलसंख्या

२. कुलांचे क्षेत्र

३. सरंजामदारांची संख्या

४. सरंजाम्यांचे क्षेत्र

५. गावचा आयव्यय

६ गावातील पट्टयांची संख्या

प्रत्येक मुलुखातील म्हणजे कोकण, गुजरात, खानदेश, नाशिक, नगर, पुणे, सातारा, वगैरे भागांतील प्रत्येकी सुमारे ३० गावे घेऊन ३०० गावांची दप्तरे पाहिली व त्यांतून मिळणाऱ्या वरील बाबींची संख्यात्मक माहिती कच्च्या स्वरूपात नोंदवून घेतली. त्यांची कालवार जुळणी केल्यावर निरपवाद असे आढळले की पहिल्या ५ बाबींत वाढ झालेली आहे. बाकीच्या बाबतीत बदल आढळला नाही.

ऐतिहासिक कागदांच्या म्हणून काही मर्यादा आहेतच. त्या काळासंबंधी राजकीय बाबीं-व्यतिरिक्त इतर सर्वच अज्ञान असल्यामुळे या बाबतीत या कागदांच्या अभ्यासात व अर्थप्राप्ती होण्यात अडचणीच फार. तरीही वरील संख्यात्मक माहितीवरून पुनर्वसनाचा आपला दावा निदान दाखल करता येतो.

दुसरी दप्तरे म्हणजे मराठयांच्या सत्तेची किंवा मराठयांच्या सरकारची होत. या दप्तरांतून पुढील बाबींवर माहिती मिळते :—

१. सरकारचा वार्षिक जमाखर्च

२. सरकारच्या ताब्यांतील मुलूख

३. मुलुखाचे किंवा महालाचे अजमास

४. जकातीचा जमाखर्च

५. पैशाच्या व्यवहारासंबंधी पत्रे

या माहितीची कालवार जुळणी करून तुलना करून पाहिल्यास सरकारच्या सरंजामी व्यवस्थेचा विस्तार सरकारच्या आयव्ययाचे स्वरूप व त्यांतील प्रश्न व अडचणी आणि विशेषत: सत्ता सांभाळताना त्यांची आर्थिक स्थिती कशी होत गेली व त्यातून ते कसा मार्ग काढीत होते याचा उलगडा होतो.

या दोहोंच्या सहाय्याने सरकारचे व प्रजेचे एकमेकांशी जे संबंध होते व त्यांच्या व्यवहाराचे एकमेकांवर जे परिणाम झाले असतील त्यापैकी संभाव्य कोणते याचा विचार करता येणे शक्य आहे. त्यावरूनही असे दिसू लागले की रयतेचे व प्रजेचे पुनर्वसन होण्यास मराठयांच्या सत्तेचे आर्थिक व्यवहार व धोरण यांचे जसे सहाय्य झाले तसेच सरकारच्या सत्ता सांभाळण्याच्या सरंजामी व्यवस्थेचेही फार मोठे सहाय्य झाले.

खेडेगाव व नगर यांच्यांत जो फरक आपण करतो त्या दृष्टीने पाहाता एकूण खेडेगावाचे मिळून जे क्षेत्र होते तेवढेच क्षेत्र सर्व नगरांचे मिळून होते. एवढेच नव्हे तर खेडेगावांची एकूण रयत व नगरांची एकूण प्रजा यांचे प्रमाण सम आढळते. ही गोष्ट जरी विचित्र वाटत असली तरी जी ३०० गावांची दप्तरे पाहिली व त्यांची मुलूखवार जुळणी करून पाहिली त्यावरून ही

मोजणी दिलेली आहे. मुलूखवार गावे घेताना एकाच कारभारयंत्रणेतील ती घेतली होती. त्यात असे दिसले की मौजे म्हणजे खेडे व कसबे म्हणजे नगर या संदर्भातून एकूण मौजे व एकूण कसबे यांची मोजणी करून वरील विधान केलेले आहे.

कदाचित यासंबंधात असेही घडले असेल की नगराच्या निर्मितीची व वाढीची म्हणून जी कारणमीमांसा केली जाते त्याशिवाय ऐतिहासिक कालात विशिष्ट आर्थिक व राजकीय व्यवस्थेमध्ये एक आगळेच कारण असण्याची शक्यता आहे. वतनदार, इनामदार, जहागीरदार, व सरदार यांचे वास्तव्य हेही कारण असेल. त्यांच्या आश्रयामुळे जो गोतावळा जमा झाला त्यामुळे नगराची निर्मिती व वाढ झाली असेल व सरंजाम्यांचे पिढयानुपिढ्या गुंतत गेलेले हितसंबंध नगराच्या भरभराटीस कारणीभूत झाले असतील. या सर्व प्रकारच्या सरंजाम्यांचा जन्म जरी मराठी सत्तेचे प्रतिनिधी म्हणून झाला असला तरी त्यांचे स्थिर झालेले व वंशपरंपरा चालत गेलेले हितसंबंध हे काही निव्वळ राजकीय नव्हते, तर ते मुलकी हितसंबंधच होते. हे सर्व मुलुखाचे व तेथील जमिनीचे रूढ स्वरूपाचे मालक होत. सरंजामी आपले वास्तव्य अधिकाधिक मजबूत करण्यासाठी नेहमी खटपट करीत असत. सरंजाम स्थावर-जंगम इस्टेट करून स्थिर होताना अवतीभवतीच्या प्रजेशी त्यांचे संबंध येऊन ते व्यापारी व उद्योगी लोकांना सहाय्य देतात. नगराच्या बांधणीत व उभारणीत सरंजाम्यांना महत्त्वाचे स्थान मिळते. अठरा पगड जातींचे लोक गोळा होऊन सरंजाम्यांची तैनात वाढत जाते. नगराची भरभराट होते. सरंजाम्यांचे स्थायिकत्व इतके मजबूत होते की त्यांना मज्जाव करणे राजसत्तेलाही कठीण जाई. उत्पन्नाच्या पैदाशीच्या निमित्ताने व उत्पन्न गोळा करण्याच्या व्यवहारामुळे सरंजामी हा गावांगावांचे संबंध निर्माण करण्यास व ते वाढविण्यास अप्रत्यक्षपणे कारणीभूत होतो.

वाहतुकीच्या, दळणवळणाच्या व व्यापाराच्या दृष्टीने सोयीस्कर तसेच धार्मिक किंवा राजकीय माहात्म्य या विविध कारणांमुळे नगरे वसून वाढीस लागतात हे खरेच. याशिवाय १८व्या शतकातील महाराष्ट्रातील नगरांसंबंधी बोलावयाचे तर असे म्हणता येते की सरंजामी लोक व सरंजामी व्यवस्था हेही एक ठळक कारण असेल. यालाच कोणी राजकीय माहात्म्य असेही म्हणेल. यासंबंधात बारकाव्याने असा विचार करता येतो की सरंजामी लोक जन्माने जरी छत्रपतीचे प्रतिनिधी किंवा सेवक असले व सत्तेच्या सांभाळासाठी त्यांची निर्मिती झाली असली तरी त्यांचे वर्षानुवर्षे सातत्याने टिकून राहिलेले अस्तित्व व त्यांचे बिनराजकीय व्यवहार पाहाता त्यांना राजकीय लोक व राजकीय व्यवस्था या संज्ञेने ओळखणे तितकेसे योग्य नव्हे. निदान त्यांच्या अस्तित्वामुळे व सरंजामी व्यवस्थेच्या राबविण्यामुळे जे ठळक परिणाम झाले ते राजकीयपेक्षा मुलकीच अधिक आहेत. मराठ्यांची मुख्य सत्ताच मुळी सैन्य ठेवून ज्या प्रकारची मुलुखगिरी करीत होती ती मुलुखगिरी राजकीय स्वरूपाची नसून मुलकी स्वरूपाची होती. प्रायः सनदेने दिलेल्या व सनदेने मिळेल अशाच उत्पन्नासाठी स्वाऱ्या व मुलुखगिरी असे. अशा रीतीने मराठ्यांची मुख्य सत्ताच मुळी फारशी राजकीय नव्हती तर इतर मांडलिकांच्या मांडलिकांची तऱ्हा वेगळी कशी असणार ?

आतां थोडे उपलब्ध माहितीचे स्वरूप जुळवून पाहू.

खेडेगावाच्या क्षेत्रासंबंधी असे म्हणता येते की सुमारे ३० ते ४० एकरांइतकेही लहान खेडे आढळते. मोठ्या आकाराचे सुमारे १००० एकराचे खेडे आढळते. यावर जमीनधारण करणाऱ्यांची म्हणजे कुळांची संख्या कमीत कमी ४ ते ५ व जास्तीत जास्त ५० ते ६० आढळते.

येथील रयत पाटलातर्फे, किंवा इनामदार, जहागीरदार किंवा सरंजामदार यांच्या तर्फे कूळ म्हणून शेती करीत असते. ही कुळे कायम वहिवाटीची आढळतात. काही कुळे भागीतही शेती करतात.

नगराचा विस्तार म्हणजे क्षेत्र यासंबंधात असे आढळते की कमीतकमी २५०० एकर व जास्तीतजास्त ५००० एकरांपर्यंत लहानमोठी नगरे आढळतात व तेथे जमीनधारण करणाऱ्या कुळांची संख्या कमीत कमी १०० व जास्तीत जास्त ३०० ते ३५० आढळते. नगराची प्रजा खेडेगावाच्या रयतेपेक्षा फारच संमिश्र आढळते. नगरांतील प्रजेचे पुढील वर्ग करता येतात :-

१. हक्कदार वर्ग
२. नोकर वर्ग
३. व्यापारी वर्ग
४. उद्योगी वर्ग
५. शेतकरी वर्ग

खेडे असो वा नगर असो प्रत्येकाचे जीवन शेतीवरच उभारलेले असे. मराठ्यांची मुख्य सत्तादेखील सत्तेच्या सांभाळासाठी व पालनपोषणासाठी शेतीवरच अवलंबून होती. त्यामुळेच सत्तेतर्फे काही गावी व काही जमिनीवर शेती व गुरेढोरे यांची पैदास केली जाई. या ठिकाणाहून शेती व इतर सर्व प्रकारचे उत्पन्न मराठ्यांच्या छत्रपतीला मिळे.

खेडेगावांतून व नगरांमधून अधिकाधिक क्षेत्र व्यापून त्यावर शेती केली जाई. जमिनीतून एक पीक काढण्याप्रमाणे दोन पिकेही काढण्याचा प्रघात होता. मोटेचे व पाटाचे पाणी उपलब्ध करून जिराइतीप्रमाणेच बागायती केली जाई. बागाइतीवर विशेष भर नगरांत दिलेला आढळतो. कुरणांच्या साठीही जमिनी राखून ठेवून त्यांपासून उत्पन्न मिळविण्याचा व्यवहार सर्रास होता.

अभ्यासिलेल्या ३०० गावांच्या दप्तरांतील ऐतिहासिक कागदपत्रांतून विशेषत: कारभाराच्या अलग अलग घटकांच्या संबंधांत जी माहिती मिळते त्यावरून असे आढते की महाराष्ट्रातील सर्व मुलुखातून, प्रत्येक प्रदेशातून मोठ्या प्रमाणात बाजारपेठांचे अलगअलग गट होते. त्यामुळे सर्वत्र सर्व प्रकारच्या मालाच्या बाजारपेठा होत्या; तसेच या बाजारपेठांचे संबंधही फार दूरवर जोडलेले होते. मालाच्या उतारपेठा म्हणूनही काही ठिकाणे प्रसिद्ध होती. गावोगावचा माल बाजारपेठांत येई. बाजारांतून खरेदी करून आणणारे व तेही लांबलांबच्या गावांचे लोक डोकीवरून ओझे घेऊन जात, असे करणाऱ्यांची संख्याही बरीच मोठी आढळते. खेड्यापाड्यांत जाऊन माल विकणारे फिरते व्यापारी व परमुलुखांतून जनावरांच्या पाठीवरून हजारो गुरांचे तांडेच्या तांडे हाकून नेणारे व्यापारीही खूप होते. या लोकांचा बराच सुळसुळाट झालेला होता. नगरांत दुकानांची बाजारपेठच असे; तर खेडेगावांत एखादे दुकान असे. त्यामुळे नियमित व सुरळीत असा व्यापार चाले.

महाराष्ट्रांतील बाजारपेठांतून जो माल आढळतो त्यातील बराच माल परप्रांतांतून आलेला दिसतो. जणू काही मराठ्यांचे राज्य येथे असताना जो शांततेचा काळ मिळाला व जे स्थिर स्वरूपाचे पुनर्वसन होत गेले त्यामुळे येथील बाजारपेठ चांगली म्हणून परप्रांतीयांना परवडली असेल. कदाचित परकीय व्यापाऱ्यांचा हा जम फार पूर्वीच महाराष्ट्रात स्थिरावलेला असेल. या काळात त्याला फिरून उजाळा मिळाला असेल आणि म्हणून पूर्वीपासूनच येथील स्थानिक उद्योगाच्या भरभराटीस पुरेसा वाव मिळाला नसेल.

उद्योगासंबंधी असे आढळते की खेडेगावांतील उद्योग हे अलुतेबलुते चालवीत; त्यामुळे ते जुजबी स्वरूपाचे होते. नगरांमध्ये नोकरी करणारे सेवक व आश्रित यांच्यामुळे व शिवाय कारागीर व व्यापारी यांना सरंजामीच्या मिळणाऱ्या सहाय्यामुळे मालाची पैदास करणे या स्वरूपात उद्योग होऊ शकले. मालास बाजारपेठांत गिऱ्हाईक मिळे; तसेच सरंजामी लोक व इतर नोकर व सेवक हेही मोठेच गिऱ्हाईक असे. त्यामुळे उद्योगाची बरीच वाढ झाली.

कोणच्याही गावाच्या गावकीच्या उत्पन्नाच्या व खर्चाच्या बाबी पाहिल्या तर पुढील गोष्टी आढळतात:—

प्रत्येक कुळाला जमिनीवरचा कर द्यावा लागे. रयतेपैकी ज्याच्याजवळ घर असेल किंवा बकरी असेल किंवा म्हैस असेल त्याला प्रत्येक बाबतीत वेगवेगळा कर द्यावा लागे. जमिनीच्या कराच्या बाबतीत दोन लक्षणे सांगता येतात. कर जमिनीच्या मगदुरावर आकारला जाई व दुसरे म्हणजे जमिनीचा कर वस्तूंत असे व पैशातही असे. इतर करही प्रत्येक संबंधित रयतेला द्यावा लागे. मात्र गावांतील इनामदार, वतनदार सरंजामदार, या सर्वांना या करातून सूट असे. त्यांना प्रजेचे पालक म्हणत व या पालकांना या करांतून सवलत असे. आणखी एक कर असे. त्याला मोहतर्फ म्हणत. हा व्यवसायिकांवरील कर आहे. विविध तऱ्हेचे अलुते-बलुते यांनाच फक्त हा कर द्यावा लागे.

जमिनीच्या कराच्या किंवा साऱ्याच्या बाबतीत दोन पद्धती एकाच वेळी प्रत्येक गावात अस्तित्वात होत्या. या ठिकाणी एक गोष्ट ध्यानात घेतली पाहिजे. गावातील जमिनीपैकी वतनदार, इनामदार, जहागीरदार व सरंजामदार या सर्वांच्या जमिनी या जमीनकरातून वगळलेल्या असत. त्यांवर हा कर नव्हता. बाकीच्या शिल्लक जमिनींवर जी कुळे असत त्या प्रत्येक कुळाला सारा द्यावा लागे. हा सारा एकसारखा आढळत नाही. रूढीप्रमाणे, परंपरेप्रमाणे कुळे सारा देत. सारा देण्याचे प्रमाण अलगअलग आढळते.

दुसरी आकारणी ही सरकारने केलेली आकारणी होय व ती संबंध गावच्या जमिनीची आकारणी होय. ही कुलवार आकारणी नव्हे. याचे दर सर्व गावांना सारखेच आढळतात. या आकारणीचे वळण मोगली व त्याचे नाव तनख्याची आकारणी असे होते.

इतर सर्व करांचे दर सर्व गावांतून सारखेच दिसतात. साधारणपणे प्रत्येक घराला एक रुपया, प्रत्येक बकऱ्याला एक रुपया व प्रत्येक म्हशीला एक रुपया असे दर होते. मोहतर्फाचा कर निरनिराळ्या दराचा आढळतो. तरीही सर्व गावांतून हे दर सारखेच आढळतात.

गावकीच्या खर्चासाठी याशिवाय वर्गणीही गोळा करीत. तिचेही स्वरूप साधारण सारखेच दिसते. या वर्गणीचा संबंध गावकीपुरताच मर्यादित होता.

वर जमिनीचा कर आकारणीच्या ज्या दोन पद्धती सांगितल्या त्यांचे स्वरूप ध्यानात घेता एक रयतवारी आकारणी होती व दुसरी जमीनदारी आकारणी होती असे म्हणता येते. रयतवारी आकारणीप्रमाणे गावात वसूल गोळा होई व गावच्या तनख्याची रक्कम देण्याचे काम पाटील करीत असे. त्या ठिकाणी कुळांचा संबंध येत नसे.

अठराव्या शतकात कालांतराने वरील बाबतीत दिसून येणारे फरक पुढीलप्रमाणे होत :—

रयतवारीची आकारणी ही प्रत्यक्ष शेतीच्या लागवडीखालील जमिनीची असे. जमीनदारीची आकारणी ही एकूण शेतजमिनीवरची असे. यामुळे दोन आकारणींत मुख्य फरक म्हणजे पहिली आकारणी प्रत्यक्ष वसुली दर्शविते व दुसरी संभाव्य वसुली दर्शविते. अठराव्या शतकाच्या

सुरुवातीस या दोहोंत फार अंतर आढळते. पुढे हे अंतर नाहीसे होत गेलेले आहे. म्हणजे अठराव्या शतकाच्या अखेरीस संभाव्य वसुली इतकी सर्व जमीन शेतीच्या लागवडीखाली आल्यामुळे वसुली होऊ लागली.

इतर करांच्या बाबतीतही करांच्या दरात व प्रकारात कोणताही बदल झालेला आढळत नाही. मात्र करांच्या उत्पन्नात वाढ झालेली आहे.

गावातील सर्व जमीन लागवडीखाली येणे, वसुली वाढणे व करांची वसुलीही वाढणे या प्रकारची परिस्थिती या शतकाच्या काळात निर्माण होत गेली असेल तर स्थिर वसाहती होऊन त्या वृद्धिंगत होत गेल्या, या स्वरूपाचा पुनर्वसनाचा आपला दावा सुसंगत व अधिक संभाव्य असा वाटतो.

मराठ्यांच्या सत्तेच्या उत्पन्नाच्या बाबी पुढीलप्रमाणे होत :–

१ प्रत्येक गावातून मिळणारे करांचे उत्पन्न

२ जकातीचे उत्पन्न

१ खंडणीचे उत्पन्न

याशिवाय लूट करूनही कमाई होत असे. पैकी पहिल्या प्रकारचे उत्पन्न हेच मुख्य व मोठे होय. अर्थात हे उत्पन्न शेतीच्या स्थितीवर अवलंबून असल्यामुळे ते सतत बदलत असे. त्यात कमीजास्तपणा नेहमीच आढळतो.

गावांशी व रयतेशी असणारा सत्तेचा संबंध बराचसा उपरा होता. गावोगावचे व्यवहार रूढी, परंपरा व शिरस्ता यांबरहुकूम चालत. एवढेच नव्हे तर सत्तेचे संबंधही शिरस्त्यावरच उभारलेले होते. गावच्या जमिनीपैकी काही जमिनींचे सरंजाम बहाल करण्याच्या निमित्ताने गावच्या व्यवहारात सत्तेचा हस्तक्षेप होई. याव्यतिरिक्त गावचे सर्व व्यवहार परभारे चालत. त्यांचा आर्थिक व्यवहारही अलग अलग चाले. गावचे उत्पन्न वसूल करतानाही सरकार मध्यस्थाची योजना करी. हा मध्यस्थ म्हणजे कमाविसदार होय. कमाविसदार हा निव्वळ मध्यस्थ नव्हे तर सत्तेचा बँकरही असे. या बँकरकडे वसूल डिपॉझिट केला जाई व बँकरकडून अगाऊ उचल व कर्ज अशा स्वरूपांतून पैसे घेऊन सत्ता आपले व्यवहार चालवी.

आता सरतेशेवटी मुलुखातील स्थित्यंतरासंबंधी जी माहिती मिळते तिची तुलनात्मक जुळणी करून हे विवेचन पूर्ण केले आहे.

१. खेडे व नगर यांतील एक फरक म्हणजे विस्ताराचा होय. दुसरा फरक म्हणजे नगरामध्ये बागाइतीत बरीच वाढ आढळते.

२. खेड्यांतील रयत संमिश्र खरी परंतु ती नागर जनतेइतकी बहुरूपी व अठरापगड जातींइतकी संमिश्र नसे.

३. खेडे व नगर यांतील अधिक लोकांचा व्यवसाय शेतीच असे.

४ जमीन-साऱ्याच्या दोन पद्धती होत्या. गावची आकारणी व सरकारी आकारणी. गावची आकारणी म्हणजे काळाच्या ओघात रूढ झालेली विविध स्वरूपाची आकारणी आणि ती स्थानिक वळणाची असे. सरकारी आकारणी म्हणजे तनख्याची आकारणी होय व ती मोगली वळणाची असे.

५. गावची देणी–घेणी पार पाडण्यासाठी गावात जमीन सारा व कर गोळा होई. तसेच वर्गणीच्या स्वरूपात काही फंडही गोळा होई.

६. खेडे व नगर या दोन्ही ठिकाणी सरकारला सारा न देता जमिनीचे उत्पन्न कमावणारा व उपभोगणारा असा एक हक्कदार व सधन वर्ग होता.

७. खेडेगावात दुकान असे तर नगरात बाजारपेठांच्या स्वरूपात अनेक व विविध प्रकारची दुकाने असत.

८. खेडेगावचे उद्योग अगदीच जुजबी तर नगरांत मालाची पैदास करणारे विविध उद्योग असत.

९. नगराचा केंद्रबिंदू सरंजामी हा होता तर खेड्याचा केंद्रबिंदू पाटील हा होता.

१०. नगर हे अवतीभवतीच्या गावांत ये–जा निर्माण करणारे ठिकाण होते.

११. नगरांत घरे नसून वाडे बांधले जात. तटबंदी बांधून गावच्या सोयी व बांधणी यांची वाढ होताना आढळते.

या बाबतीत अठराव्या शतकाच्या अखेरच्या काळात कशी स्थिती होती ते पाहाण्याच्या दृष्टीने जी संख्यात्मक माहिती जुळवली तिच्यावरून पुढील विधाने करता येतात:–

(१) पूर्वीच्या काही खेड्यांची नगरे झाली.

(२) जी खेडी एका जमातीची होती ती कालांतराने मिश्र जमातींची झाल्याचे आढळते.

(३) नगरामध्ये जमीन धारण न करणाऱ्यांची संख्या अठराव्या शतकाच्या अखेरीस आढळते.

(४) स्थानिक सारा आकारणी व सरकारी आकारणी यात आढळणारा वसुलीतील फरक पुढेपुढे कमी होत गेलेला दिसतो.

(५) सरंजामी क्षेत्रात हळूहळू सतत वाढ होताना दिसते,

(६) नगरातील उद्योग वाढून ते नावलौकिकास आले. त्यामुळेच त्या गावची प्रसिद्धी व भरभराट झालेली दिसते.

(७) सरंजाम्यांच्या अवतीभवती सर्व प्रकारचे लोक येऊन स्थिर वस्त्या करून राहिलेले दिसतात.

(८) आपल्या सोयीसाठी व स्वाथ्यासाठी आश्रित सांभाळून भजबूतपणे आपला जम निर्माण करावा अशा तऱ्हेचे व्यवहार वाढलेले दिसतात.

वरील तऱ्हेचे बदल सामान्यपणे पाहाता जरी मूलभूत स्वरूपाचे नाहीत असे वाटले तरी महाराष्ट्रात १८ व्या शतकात असे घडले असण्याची शक्यता आहे. हा बदल विस्ताराच्या दृष्टीने केवढा होता व किती खोलवर होता यासंबंधात ज्ञात गोष्टींपेक्षा अज्ञात गोष्टीच अधिक आहेत. शिवाय अगदी ठामपणे, मर्यादित स्वरूपात का होईना सांगण्याइतकी माहिती आजच्या मर्यादित अभ्यासात मिळालेली नाही.

तरीही अगदी सुरुवातीस मराठी सत्तेच्या सत्ता सांभाळण्याच्या सरंजामी व्यवस्थेचा जो गुणधर्म म्हणून वर्णन करून सांगितला त्याच्या पार्श्वभूमीवर विचार करता, संभाव्य परिणाम म्हणून पुनर्वसन व स्थैर्य असा विषय प्रतिपादन करता येतो.

या शतकाच्या अगोदरपासून सुमारे ३० वर्षे येथील मुलुखात विस्तृत स्वरूपाची दंगल चालू होती. जाळपोळ व कत्तलीही चालू होत्या व प्रजा नागविली जाऊन तिची नासाडी झालेली होती. अशी स्थिती या शतकात पुन्हा कधीच डोकावली नाही. येथील मुलुखात चांगलीच शांतता होती. मराठ्यांची सत्ताही या मुलुखात स्थिर होऊन ती परप्रांतांत पसरली. या सत्ताविस्तारा-

मुळे येथील प्रजेचे संबंध बाहेरही वाढत गेले. त्यामुळेही पुनर्वसन वाढीस लागणे संभाव्य वाटते.

सत्तेच्या धोरणाचाही विचार यासंबंधात महत्त्वाचा ठरतो. रयतेला अडचणीत न टाकता आपली सत्ता सांभाळण्याचे त्यांचे धोरण होते. शेती, व्यापार व उद्योग यांच्या सुरक्षिततेसाठी जे जे आवश्यक असेल तेवढे सर्व ओळखून त्यांनी सोईस्कर धोरणे अवलंबिलेली दिसतात. त्यांच्या या धोरणाचा अतिरेक म्हणजे स्वतःची उपजीविका कर्जावर करण्यापर्यंत त्यांची मजल गेलेली होती.

सरंजाम वाढत गेले व त्यांचे स्वरूप अल्पसे राजकीय व अधिक मुलकी असल्यामुळे त्यांचा उपयोग चांगलाच झाला असला पाहिजे. त्यांच्या आश्रयामुळे नगरे वाढली व भरभराटीस आली. नगरांत सधन प्रजा वाढली. बाजारपेठा निर्माण करण्यास व त्यांच्या उभारणीस आश्रय दिला गेल्यामुळे व्यापारास उत्तेजन मिळाले.

सारांश, पुढील शतकात सुरू झालेल्या औद्योगीकरणास व नंतरच्या औद्योगिक क्रांतीस योग्य अशी पार्श्वभूमी तयार झाली. स्थिर वसाहती, भरभराटलेली मोठी नगरे, सधन वर्ग, व्यापाराचे विस्तारलेले अलग अलग गट व परप्रांतियांशी निर्माण झालेले संबंध व दळणवळण यांमुळे १८ व्या शतकात आर्थिक स्थित्यंतराचे जे कार्य सुरू झालेले होते ते अधिक वेगाने घडवून आणण्याचे तेवढे कार्य पुढील शतकांत करावयाचे होते. इंग्रज आल्यानंतर ही गोष्ट प्रथम मंद गतीने व नंतर द्रुत गतीने सुरू झाली.

# ऐतिहासिक चौकटीमध्ये आढळून येणारी उद्यमशीलतेची प्रादेशिक प्रतिमाने : १८५७सालापर्यंतचा पूर्वभारताचा प्रकरणाभ्यास*

अमलेंदु गुह

१

उद्यमशीलते (entrepreneurship) चा इतिहास ही आता आर्थिक इतिहासाची एक सुस्पष्ट शाखा म्हणून उदयास येत आहे. या क्षेत्रातून गोळा होणाऱ्या नव्या आधार-सामग्रीमुळे भारतातील सामाजिक, आर्थिक परिवर्तनांच्या प्रवाहासंबंधी सध्या आपल्याजवळ असलेल्या माहितीला निश्चितपणे नव्या मिती (dimensions) लाभणार आहेत, त्यामुळे भारतीय संदर्भात या शाखेचे महत्त्व किती अधिक आहे, हे सांगण्याची आवश्यकता नाही. या विशिष्ट क्षेत्रातील आपले संशोधन संपूर्ण भारतीय उपखंडाला लागू करावे की काही विशिष्ट प्रदेशांपुरतेच मर्यादित ठेवावे ? खरे म्हणजे, परंपरा व परिवर्तन यांसंबंधी अधिक आधारभूत विवेचन करावयाचे तर आपल्या देशाच्या वेगवेगळ्या प्रदेशांमध्ये अत्यंत भिन्न व असमान परिस्थिती विद्यमान होती, ही गोष्ट आपण लक्षात घेतली पाहिजे. उदाहरणार्थ, 'प्रत्येक कुटुंबात हस्तव्यवसाय व शेती यांचा सुरेख संगम झालेला होता,' असे अनेकदा म्हटले जाते. परंतु हे विधान पूर्णांशाने खरे नव्हते. अशी परिस्थिती सार्वत्रिक नव्हती. ईशान्य भारतातील असम–मणिपूर भागात आणि अशाच काही मर्यादित, पृथक् प्रदेशांत हे दृश्य पाहावयास मिळत असे. त्या ठिकाणी हातमागावरील विणकाम हे स्त्रीपुरुषांमधील प्राथमिक स्वरूपाच्या श्रमविभागाच्या आधारे प्रत्येक कुटुंबात चालू असे. जात अथवा सामाजिक–आर्थिक दर्जा यांमुळे त्यात काही फरक पडत नसे. त्यातून जे अतिरिक्त उत्पादन होई त्याच्या मोबदल्यात डोंगरी व डोंगरपायथ्याच्या भागांतील लोकांकडून कापूस घेतला जाई. भारताच्या अन्य भागांत विकासाचा हा टप्पा कधीच भूतकाळात जमा झालेला असून खेड्यातील व खेड्या–खेड्यांतील परस्पर देवाण-घेवाणीने त्याची जागा घेतली होती, आणि धंदेवाईक विणकरांचा वर्ग उदयास आला होता. गुजरात व बंगाल या प्रांतांनी सतराव्या शतकापर्यंत विकासाचा जो टप्पा गाठला होता तो ईशान्य भारतातील विकासाच्या टप्प्याहून खूपच पुढचा होता. या प्रांतांमध्ये व्यापार व हस्तव्यवसाय यांची केंद्रे असलेली अनेक लहान मोठी शहरे विद्य-

* 'भारतातील परंपरा व परिवर्तन यांच्या अभ्यासातील ऐतिहासिक प्रतिमाने' या विषयावर सिमला येथे १९–२६ ऑक्टोबर १९६९ या अवधीत इंडियन इन्स्टिटयूट ऑफ ॲडव्हान्स्ड स्टडी या संस्थेतर्फे आयोजित करण्यात आलेल्या परिसंवादात वाचलेला निबंध. प्रा. अमलेंदु गुह हे १९६९–७० साली दिल्लीच्या 'दिल्ली स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स' या संस्थेत अतिथि-प्राध्यापक म्हणून काम करीत असता त्यांनी हा निबंध तयार केला होता.

मान होती आणि जीवनावश्यक वस्तूंच्या प्रसाराची एक सुव्यवस्थित नागर प्रणाली प्रचारात होती. कोणत्याही गंभीर अभ्यासकाला सर्वसामान्य विधान करताना या देशातील काही भागांत टिकाव धरून असलेल्या प्राथमिक अवस्थेतील आदिवासी पद्धतीकडे अथवा इतर काही भागांत विद्यमान असलेल्या त्या मानानें अधिक सुसंस्कृत विकासपातळीकडे दुर्लक्ष करता येणार नाही. भारतातील उदीयमान उद्यमशीलतेची प्रतिमाने (models) निश्चित करताना, अभ्यासाचा घटक निवडण्याच्या वेळी, वेगवेगळ्या अर्थप्रणाली आणि जातीजमाती यांचाही विचार आपल्याला करावाच लागतो. या बाबतीतील श्रेय प्रामुख्याने प्रा. ध. रा. गाडगीळ, प्रा. व्ही. आय. पावलोव्ह व त्यांच्यासारखे इतर विद्वान यांच्याकडे जाते. त्यांच्या प्रयत्नांमुळेच या दृष्टिकोनाचे लाभ दिसून येऊ लागले आहेत.

पश्चिम युरोपच्या अनुभवावर आधारलेली परंपरागत संदर्भ-चौकट (framework of reference) स्वीकारून आपण आपल्या विषयाकडे पाहावे, असा मोह आपल्याला चटकन होतो. परंतु ती चौकट आपल्या दृष्टीने अपुरी आहे. तुलना करण्यासाठी आपण नेहमीच पश्चिम युरोपाकडे पाहिले पाहिजे, असे नाही. याच्या उलट आपल्या शेजारच्या राष्ट्रांकडे त्या दृष्टीने पाहिल्यास ते अधिक फलदायक ठरेल. उदाहरणार्थ, सतराव्या ते एकोणिसाव्या शतकातील रशिया, पुनःस्थापना (Restoration) च्या आधीच्या व नंतरच्या काळातील जपान आणि सतराव्या शतकानंतरचा चीन यांच्याशी तुलना करणे अधिक उपयुक्त ठरेल. ते कसेही असले तरी विकासाच्या बाबतीतील इंग्लंडचा मार्ग हा असाधारण किंवा अपवादात्मकच समजला पाहिजे. ज्या देशांचे औद्योगीकरण खूप उशीरा घडून आले आहे त्यांच्या बाबतीत त्या मार्गाचा अवलंब केला जाण्याची शक्यताही नव्हती आणि तसे घडलेही नाही. त्यामुळे केवळ ब्रिटिश प्रतिमानाच्या संदर्भात भारतातील उद्यमशीलतेच्या विकासाच्या किंवा अविकासाच्या समस्या जाणून घेण्याचा प्रयत्न निरर्थक ठरल्याखेरीज राहाणार नाही.

या निबंधाच्या दृष्टीने आपल्या मार्गात आणखी एक अडथळा आहे. तो असा की उद्यमशीलतेच्या संकल्पनेच्या बाबतीतच पुरेशी सुस्पष्टता आपल्याजवळ नाही. सुदैवाने या क्षेत्रातील वाढत्या संशोधनामुळे उद्यमशील व्यावसायिक म्हणजे 'नवा पायंडा पाडणारा भीमपुरुष, अनिश्चिततांचे ओझे हिमतीने पेलणारा वीरपुरुष,' यांसारख्या कल्पना झपाट्याने मागे पडू लागल्या आहेत. त्याऐवजी उद्यमशील व्यावसायिकाचे कार्य ही 'काही लोकांनी घडवून आणलेल्या मोठमोठ्या परिवर्तनाची मालिका नसून वर्तनातील सतत फेरबदलावर आधारलेली अखंड मालिका असते,'[१] असे वाढत्या प्रमाणात समजले जात आहे. या निबंधामध्ये, आम्ही जो कोणी एखाद्या व्यावसायिक घटकाच्या वतीने – मग तो घटक सरकारच्या मालकीचा असो, व्यक्तीच्या मालकीचा असो अथवा गटाच्या मालकीचा असो, आर्थिक दृष्ट्या महत्त्वाच्या नवीन गोष्टी करतो अथवा नव्या कार्यपद्धती चालू करतो त्याला उद्देशून उद्यमशील व्यावसायिक ही संज्ञा वापरली आहे. हे नाविन्य तंत्रविद्या, लेखाशास्त्र (हिशेब), खरेदी–विक्रीचे संघटन, प्रशिक्षणाच्या पद्धती यांपैकी कोणत्याही किंवा अशाच सर्व बाबतींत असू शकते. यामध्ये परंपरेशी फारकत आहे, परंतु ही फारकत अगदी आमूलाग्रच असली पाहिजे असे नाही. एखादा विशिष्ट बदल किंवा परस्पर-

१. बर्ट एफ्. हॉसेलिट्झ आणि डब्ल्यू. इ. मूर यांनी संपादिलेल्या, 'इंडस्ट्रियलायझेशन ॲंड सोसायटी (युनेस्को, मौटन, १९६३) या ग्रंथातील डब्ल्यू. टी. ईस्टरब्रुक यांच्या, 'दि एंट्रेप्रेन्यूरियल फंक्शन इन रिलेशन टु टेक्नॉलॉजिकल ॲंड इकॉनॉमिक चेंज' या लेखातून उद्धृत, पृ. ५८.

संबद्ध बदलाचा समूह एकदा रुळला की मग आमचा हा उद्यमशील व्यावसायिक आणखी बदल अमलात आणील किंवा तो नेहमीच्या चाकोरीतून निर्णय घेऊ लागेल. त्याने चाकोरीचा अवलंब केला तरीही काही काळपर्यंत तो जाणीवपूर्वक केलेल्या किंवा आपोआप घडून येणाऱ्या अनेक बदलांची परस्परसंबद्ध राष्ट्रीय अर्थव्यवस्थेत भर घालीत राहील. इतर लोक त्याच्या या नवीन गोष्टींशी आपला धागा जोडीपर्यंत किंवा त्याच्या पुढे निघून जाईपर्यंत त्याची ही प्रक्रिया चालत राहील, अशीही शक्यता आहे.

ही संकल्पना अगदी बाळबोध व फार व्यापक आहे असे म्हणता येईल. परंतु विभिन्न प्रकारच्या समाजांतील परंपरा व परिवर्तन यांच्या अभ्यासात ती सर्वसामान्यपणे लागू करता येते, हा तिचा गुण आहे. अलीकडेच विकसित होऊ लागलेल्या देशांमध्ये उद्यमशील व्यावसायिकाची भूमिका जेवढी अनुकरण व अनुकूलन करण्याची असते तेवढी संशोधन करण्याची नसते, या मुद्यावर प्रा. गाडगीळ यांनी दिलेला भर योग्यच आहे. तथापि, अशा समाजामध्ये उद्यमशील व्यावसायिकाचे मूलभूत व प्राथमिक कार्य इतरत्र असते त्याप्रमाणेच, 'आर्थिकदृष्ट्या अर्थपूर्ण असणाऱ्या उद्योगांमध्ये वेळ, भांडवल व शक्ती यांची गुंतवणूक करणे' हे असते; आणि त्यामध्ये पुष्कळच अनिश्चितता गुंतलेली असते.[२] या संकल्पनेचा जो विस्तार वर केला आहे तो लक्षात घेऊन उद्यमशीलतेच्या विकासाच्या प्रादेशिक स्वरूपाशी ज्यांचा संबंध असण्याची शक्यता आहे असे कोणते वस्तुनिष्ठ व आत्मनिष्ठ घटक प्राक्–औद्योगिक (pre–industrial) पूर्व भारताच्या अर्थव्यवस्थेत विद्यमान होते आणि १८५७ पर्यंत औद्योगीकरणाच्या दिशेने मर्यादित प्रगती होण्याची कारणे कोणती होती, याची चर्चा या निबंधात करण्यात आली आहे. भारताच्या संदर्भात, सतरावे शतक या संशोधनाचा प्रारंभबिंदू समजणे सयुक्तिक ठरेल.

१७ व्या शतकात भारतीय समाजाला दोन महत्त्वाच्या आर्थिक आव्हानांना तोंड द्यावे लागले :–(१) शेतकऱ्यांकडून शक्यतोवर मालाच्या ऐवजी रोख रकमेत शेतसारा वसूल करण्याचे सरकारचे प्रयत्न,[३] आणि (२) युरोपात व युरोपीय लोकांच्या वसाहतींमध्ये भारतीय मालाला वाढती मागणी येऊ लागल्यामुळे त्या भागांतून या देशात सोन्या-चांदीचा वाहू लागलेला अखंड प्रवाह (अठराव्या शतकाच्या मध्यापर्यंत) या दोन प्रक्रिया परस्परपूरक व परस्परसहाय्यक ठरल्या.

---

२. ध. रा. गाडगीळ, 'प्लॅनिंग अँड इकॉनॉमिक पॉलिसी इन इंडिया' (पुणे, १९६५), पृ. ९५. हे उद्धरण क्र. (१) मध्ये नमूद केलेल्या ईस्टरब्रुक यांच्या ग्रंथातून घेतले आहे.

३. नाणकीकरणा (monetisation) च्या या पैलूच्या बाबतीत के. ए. अंटानोवा आणि इरफान हबीब या दोघांनीही बरीच अतिशयोक्ती केली आहे असे दिसते. याच्या उलट व्ही. आय. पावलोव यांनी या घटनेचे महत्त्व कमी लेखण्याचा प्रयत्न केला आहे. दुर्दैवाने, अजूनपर्यंत, १७ व्या व १८ व्या शतकांत ज्या प्रदेशांमध्ये शेतसारा प्रामुख्याने नाण्यांत गोळा केला जात असे त्यांचा नकाशा तयार करण्यात आलेला नाही. १९ व्या शतकाच्या प्रारंभी सिंधमध्ये मालाच्या रूपात शेतसारा घेण्याची प्रथा चालू होती. गुजरात, म्हैसूर व राजस्थान या प्रांतांमध्ये मालाच्या व पैशाच्या अशा दोन्ही रूपांत शेतसारा वसूल केला जात असे. मुगल साम्राज्यात नसलेल्या आसामच्या भागात सरकार शरीरश्रमाच्या रूपात सारा वसूल करणे अधिक पसंत करी. त्याचा पर्याय म्हणून शेतकऱ्यांकडून घेतल्या जाणाऱ्या मालाच्या किंवा पैशाच्या रूपातील साऱ्याचे प्रमाण फार थोडे असे.

१६८९ ते १८०४ या काळात पुणे जिल्ह्यातील एका खेड्यातून पेशवे सरकारला रोख पैशांत शेतसारा दिला जात असल्याचा लेखी पुरावा उपलब्ध आहे. या काळात या खेड्यातून मालाच्या रूपाने शेतसारा दिल्याचा उल्लेख आढळत नाही. पाहा: हॅरॉल्ड एच्. मान, 'ए डेक्कन व्हिलेज अंडर दि पेशवाज', 'इंडियन जर्नल ऑफ इकॉनॉमिक्स', ४ (१९२३), भाग १, पृ. १–२७,

सोन्या–चांदीच्या आयातीमुळे नाण्याच्या पुरवठ्यात बरीच वाढ झाली; कारण त्या वेळी नाणी पाडण्यावर फारशी बंधने नव्हती. त्यायोगे वाढत्या नाणकीकरणाची प्रक्रिया सुलभ झाली. याचाच परिणाम म्हणून पैशांमध्ये शेतसारा वसूल करण्याचा प्रयत्न तुलनात्मक दृष्ट्या अधिक सोपा झाला. एका बाजूने, सरकारकडून रोख रकमेत सारा मागितला जाऊ लागल्यामुळे शेतकऱ्यांना नगदी पिके काढणे अधिकाधिक प्रमाणात भाग पडू लागले. याचाच परिणाम म्हणून शेती उत्पादनाचा विस्तार घडून आला. देशातील व परदेशांतील बाजारपेठेत विक्रीसाठी माल पाठविता येईल इतके जादा उत्पादन काढण्याचा प्रयत्न होऊ लागला. विक्रीसाठी काढण्यात येणारे हे जादा उत्पादन निदान शेतकऱ्यांना सरकारकडे जेवढा सारा भरावा लागत होता तेवढी रक्कम मिळू शकेल एवढे तरी असणे भागच होते. परंतु प्रत्यक्षात मात्र सहजासहजी बाजारात विकता येईल एवढे जादा उत्पादन काढता न आल्यामुळे शेतकरी बहुधा शेतसारा भरण्यासाठी धंदेवाईक सावकारांकडून कर्ज काढीत असत; किंवा मग त्यांना बहुतेक प्रदेशांमध्ये मालाच्या रूपात सारा भरण्याचा विकल्प उपलब्ध असल्यामुळे ते त्या रूपात सारा देत. परंतु शेतकऱ्यांकडून शेतमालाच्या रूपात सार मिळाला तरी महसूल खात्याचे अधिकारी तो माल बाजारात किंवा लष्करी तळांना विकीत आणि त्या विक्रीतून येणारी रक्कम सरकारी खजिन्यात भरीत. नाणकीकरणाच्या प्रक्रियेच्या बरोबरीनेच महसूल इजारेदार व सावकार, पेढीवाले व महाजन यांचा वर्गही वाढत गेला असला पाहिजे, हे उघड आहे. ब्रिटिशपूर्व काळात प्रचलित नियमांनुसार शेतकऱ्यांचे जमिनीवरील हक्क बाहेरच्या माणसाला सहजासहजी तबदील करून दिले जाऊ शकत नसत. त्यामुळे पिकाच्या तारणावर मिळणारी रक्कम ही कृषि-उत्पादनाच्या वाढीला प्रोत्साहन देणारी गोष्ट असण्याची खूप शक्यता आहे. कृषि-अर्थव्यवस्थेला सावकार तापदायक बनला ही घटना खूप नंतरची म्हणजे ब्रिटिश सत्तेच्या प्रारंभिक काळात बदललेल्या परिस्थितीतील आहे. तोपर्यंत काही विशिष्ट प्रदेशांत महाजन–सावकारांना अगाऊ सरकार–सारा भरण्यासाठी कर वसूल करण्याचे अधिकार देण्यात आले. तेथे त्यांनी शेतकऱ्यांची पिळणूक केली, यात मुळीच शंका नाही. परंतु त्यांनी शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीवरून मात्र कधीच हुसकावून लावले नव्हते.

वर वर्णिलेली परस्परसंबद्ध प्रक्रिया ही काही थोड्या प्रदेशांपुरतीच मर्यादित असली तरी तिच्यामुळे विक्रेय वस्तूंच्या उत्पादनाला जोराची चालना मिळण्यास सुरुवात झाली. हुंडीच्या द्वारे पैसे पाठविणे, जलमार्गाने व स्थलमार्गाने होणाऱ्या वाहतुकीतील मालाचा विमा उतरविणे, आणि उत्तर भारतातील हमरस्त्याची निर्मिती व डागडुजी यांमुळे दूरदूरच्या प्रदेशांपर्यंत व्यापारी मालाची ने–आण करणे सुलभ झाले. या प्रक्रियेमुळे अनेक प्रदेशांमध्ये प्राचीन काळापासून चालत आलेल्या ग्रामीण समाजव्यवस्थेचा पाया डळमळीत झाला, स्थानिक परिस्थितीतील फरकांनुसार सरंजामदारीसारख्या मालमत्ता अथवा जमिनीवरील शेतकऱ्यांचे हक्क यांना बळकटी आली, आणि बँक–(पेढी)–व्यवसाय, व्यापार, नौकानयन, मालाचे उत्पादन यांमध्ये, एवढेच नव्हे तर शेतीतही उद्यमशील व्यावसायिक हालचालींना सातत्याने जोराची चालना मिळू लागली. या हालचाली कालांतराने का मंदावल्या या घटनेचे संशोधन अद्यापि व्हावयाचे आहे. यापूर्वीच्या शतकात पोर्तुगीजांशी आलेल्या संबंधामुळे तटवर्ती प्रदेशांचा अनेक बाबतीत भयंकर नाश झाला होता, आणि छापखाने व पाणचक्क्या यांचा प्रसार करण्याच्या बाबतीत पोर्तुगीज सत्ता अपेशी ठरली होती. तरीपण त्या सत्तेने भारताला दोन भरीव देणग्या दिल्या होत्या. पहिली अशी की तिच्यामुळे तंबाखू, अननस व मिरच्या यांसारखी अनेक नवीन पिके झपाट्याने प्रचारात आली

होती. दुसरी अशी की, नौकानयन आणि जहाजबांधणी यांची युरोपीय तंत्रे, काही प्रमाणात, मुख्यत: पश्चिम किनाऱ्यावर प्रसृत झाली होती. सतराव्या शतकाचा प्रारंभ मोठ्या आशा-आकांक्षांसह झाला. परंतु प्रत्यक्षात मात्र ती एक निष्कारण लांबणीवर पडत गेलेली दीर्घकालीन प्रक्रिया ठरली. ती अठराव्या व एकोणिसाव्या शतकातही चालत राहिली. त्यानंतर या प्रक्रियेची पद्धतशीरपणे मुस्कटदाबी करून नव्याने उदयास येत असलेल्या साम्राज्यवादी अर्थव्यवस्थेच्या साच्यात या देशाची अर्थव्यवस्था बसेल अशी तरतूद करण्यात आली. तिच्या जागी ब्रिटिश औद्योगिक भांडवलाच्या नेतृत्वाखाली एक नवी द्वैतवादी (dualistic) व दारिद्र्यकारक (immiserising) विकासाची प्रक्रिया सुरू झाली. ही प्रक्रिया पुनरुत्थानात्मक असण्या ऐवजी विध्वंसात्मकच अधिक होती.

सतराव्या शतकातील भारतात असणाऱ्या युरोपीय सत्ता त्यांच्याजवळ असणाऱ्या तोफवाहू जहाजांमुळे जलक्षेत्रात अजिंक्य ठरलेल्या असल्या तरी जमिनीवर अजून त्यांचे आधिपत्य प्रस्थापित झालेले नव्हते. त्यांना व्यापाराच्या बाबतीत सर्व प्रकारचे प्रोत्साहन मिळत असे आणि आपल्या वखारींभोवती तटबंदी करण्याची व आपल्या प्रदेशात चौक्या ठेवण्याची त्यांना परवानगी असे. जुलमी जहागीरदार, जमीनदार व इतर सरकारी अधिकारी यांच्या अवकृपेपासून स्वत:चा बचाव करण्यासाठी व्यापारी, सावकार व कारागीर या परकीय वसाहतींमध्ये आश्रय घेऊ शकत असत. या दृष्टीने पाहिल्यास या वसाहती एक प्रकारे मध्ययुगातील मुक्त शहरांची भूमिका बजावीत असत, असे म्हणता येईल. एकूण विचार करता या वसाहती पश्चिम व पूर्व भारताच्या अर्थ-व्यवस्थेच्या दृष्टीने लाभदायक ठरल्या. अर्थात जोपर्यन्त त्या राजकीय सत्ता हस्तगत करण्याची किंवा जुलमी मक्तेदार बनण्याची धडपड करीत नव्हत्या तोपर्यंन्तच हा लाभ मिळू शकला.

## २

सोळाव्या व सतराव्या शतकांमध्ये गुजरात व बंगाल यांच्यांत आर्थिक संबंध होते आणि ते त्यानंतरही चालत राहिले. गुजरातच्या रेशमी कापडाच्या उद्योगात बंगालमधून आयात केलेले कच्चे रेशीम काही प्रमाणात वापरले जात असे. तसेच, बंगालच्या सुती कापड उद्योगात गुजरातमधून आयात केलेला कच्चा कापूस काही प्रमाणात वापरला जाई. या व्यापारामध्ये साखर हा बंगालचा आणखी एक प्रमुख घटक होता. बंगालचा व्यापार एवढा मोठा व इतका विविध प्रकारचा आणि इतक्या विविध प्रदेशांशी होत होता की बंगालच्या बंदरांतून दरसाल १०० जहाजे भरून माल रवाना होत असे. १६२८ साली येथे आलेला सेबॅस्टियन मॅनरिक या व्यापाराने खूपच प्रभावित झाला होता. १६४२ साली बंगालमधून बंतारा खान नावाच्या व्यापाऱ्याच्या जहाजातून मलाक्काला कापडाचे तागे, तांदूळ व लोणी (तूप?) नेण्यात आले होते. हा माल आश्विन दिया नावाच्या बंगाली व्यापाऱ्याचा होता. अशाच आणखी एका बंगाली जहाजातून १६४५ साली तेथे तांदूळ नेण्यात आला होता.[३अ] १६८१ ते १७१८ या काळातील डच नौकानयनाच्या याद्यांवरून असे दिसून येते की या व्यापारातील पुढाकार प्रामुख्याने गुजराती व बिगर भारतीय व्यापाऱ्यांकडे होता. या कालखंडात एकूण ३७४ आशियाई व्यापारी

[३अ] एस. अरसरत्नम्, 'सम नोट्स ऑन दि डच इन मलाक्का अँड दि इंडो-मलय ट्रेड, १६४१–१६७०' 'जर्नल ऑफ साउथईस्ट एशियन हिस्ट्री', १०, अंक ३, डिसेंबर १९६९, पृ. ४८४.

पिपली, बालासोर व हुगळी या बंदरांतून आपली जहाजे पाठवीत असत किंवा त्यांची जहाजे या बंदरांत येत असत. (यांमध्ये ३४ पोर्तुगीज व्यापाऱ्यांचा समावेश नाही. वस्तुतः त्यांच्यापैकी बहुतेकजण एव्हाना भारताचे स्थानिक रहिवासी (Luso-Indians) समजले जाऊ लागले होते.) या व्यापाऱ्यांपैकी दोघेजण निश्चितपणे गुजराती पारशी होते; ५९ जण हिंदू होते—त्यांपैकी बहुतेकांची नावे गुजराती होती; ५९ आर्मीनियन होते; आणि उरलेले २५४ मुसलमान होते. या मुसलमानांपैकी अधिकांश लोक बहुधा भारतीय तरी असावेत, किंवा अनेक आर्मीनियन लोकांप्रमाणे जुन्या काळी परदेशांतून येऊन भारतात स्थायिक झालेले असावेत. भारतीय मुसलमानांपैकी अधिकांश लोक बहुधा गुजराती असावेत. बंगालच्या आशियाई बाजारपेठेचे स्वरूप पुढील प्रमाणे होते:—

तक्ता क्र. १

बंगालची आशियातील निर्यात पेठ

| कोणत्या भागात निर्यात केली जाई | पिपली, बालासोर व हुगळी या बंदरांतून होणारी निर्यात (गौण वस्तु वगळल्या आहेत) |
|---|---|
| १. पश्चिम भारताचा किनारा | कच्चे रेशीम, तलम कापडाचे तागे, साखर, लोखंड, अफू व सोरा मीठ |
| २. नैर्ऋत्य भारताचा किनारा | अफू, जाडेभरडे व तलम सुती कापड कापूस, रेशमी कापड. |
| ३. कोरोमंडल किनारा | कच्चे रेशीम, कापडाचे तागे, तांदूळ, साखर व अफू |
| ४. सिलोन | तांदूळ |
| ५. मालदीव बेटे | तांदूळ व जाडेभरडे कापड |
| ६. मलाया, इंडोनेशिया, मॅनीला | कापडाचे तागे व तांदूळ |
| ७. भूमध्य सागरातील आखाते व तांबड्या समुद्राचा प्रदेश | साखर, तलम कापडाचे तागे, रेशमी कापडाचे तागे व लोखंड |
| ८. आराकान—पेगू | कापडाचे तागे |

आधार : 'डच शिपिंग लिस्ट्स, १६८१—१७१८'. ओम् प्रकाश यांच्या ग्रंथातून[४].

सतराव्या शतकातील गुजरातेत कोणी बंगाली हिंदू व्यापारी राहात असल्याचा पुरावा उपलब्ध नाही. बंगाली मुसलमान व्यापारी तरी गुजरातेत राहात होते किंवा काय, आणि त्यांची संख्या किती होती यासंबंधीही काही सांगता येणे शक्य नाही. याच्या उलट अगदी १५२८ साली देखील बंगालमध्ये गुजराती जहाजमालक राहात असल्याचे बारबोसा यांना आढळून आले होते.

४. ओम् प्रकाश, 'दि डच ईस्ट इंडिया कंपनी अँड दि एकॉनॉमी ऑफ बेंगॉल, १६५०-१७१७', (डॉक्टरेटचा अप्रकाशित प्रबंध, दिल्ली विश्वविद्यालय, टंकलिखित, पृ. ५५९).

मीर जुम्लाने बंगालमधील अनेक गुजराती व्यापाऱ्यांना चालू बाजारभावाच्या सुमारे निम्म्या दरात आपल्याला कच्चे रेशीम पुरविण्यास भाग पाडले होते.[५] वर उल्लेखिलेल्या डच नौकानयनाच्या १६८१–१७१८ च्या यादीमध्ये आपल्याला विहारी शाह, हरीशाह, खेमचंद शाह, चिंतामणी शाह वगैरे नावे आढळतात. हे सारे बालासोरचे व्यापारी–जहाजमालक होते. यांच्याखेरीज इतरही काही व्यापाऱ्यांची नावे आढळतात. तेही निश्चितपणे बंगालमध्ये राहात होते. ते गुजराती होते की बंगाली, हे सांगणे कठीण आहे. तथापि, त्यांच्याशी संबद्ध असलेल्या इतर गोष्टींवरून असे सूचित होते की ते बंगाली 'साहा' नसून गुजरातीच होते.

१७५० पर्यंतच्या सुमारे दोन दशकांत सुरतेचा मुल्ला मुहम्मद अली हा बंगालमधील गुजराती व्यापाऱ्यांचा पुढारी होता. त्याचा गंगेच्या खोऱ्यात खूप मोठा व्यापार होता, परंतु गुजरातेतील त्याच्या काही घरगुती अडचणींमुळे त्याचा बंगालमधील व्यापार जवळजवळ नष्ट झाला होता. कलकत्त्याजवळ गंगेच्या पूर्व किनाऱ्यावर असलेली त्याची मोठी दुरुस्ती–गोदीही (repair dock) १७५० नंतर पूर्णपणे मोडकळीस आली. १७५५ च्या सुमारास त्याचे वंशज दारिद्र्यात दिवस कंठू लागल्याचे नमूद आहे.[६] तसेच १८ व्या शतकाच्या अखेरीसही दोराब्जी बैरामजी नावाचा एक गुजराती पारशी बंगालमधील प्रमुख भारतीय जहाजमालक होता, असे आढळून येते. १७९० पासून सुरू होणाऱ्या दशकातच गुजराती पारशी हे केप कामोरीन (कन्याकुमारी) च्या पूर्वेस गुजराती मुसलमान व्यापाऱ्यांच्या पुढे जाऊ लागले होते, हे स्पष्ट आहे.

हिंदुस्तान (उत्तर भारत) च्या मध्य भागात असणाऱ्या आग्र्याचे हिंदुस्तानी व्यापारी बंगालमध्ये खूप मोठ्या प्रमाणावर रेशीम खरेदी करून ते १७४० पर्यंत खुश्कीच्या मार्गाने किंवा गलवतांतून गंगेच्या उगमाच्या दिशेने पाठवीत असत. त्यांच्या प्रोत्साहनामुळेच रेशमाचा धागा गुंडाळण्याचे काम करणाऱ्या स्थानिक कामगारांनी (नकौद) १६६९ साली दोरा गुंडाळण्याचे एक नवीन तंत्र हस्तगत केले होते. त्याला तानी असे म्हणत. पूर्वीपासून चालत आलेल्या ताना–बाना पद्धतीच्या जोडीनेच या तानीचाही ते वापर करीत. या तानीपद्धतीमध्ये काही उच्च प्रतीच्या कोसल्यांचा वापर करण्यात येत असे. या पद्धतीने गुंडाळण्यात येणाऱ्या कच्च्या रेशमाच्या प्रतवारीने सात प्रमाणीकृत श्रेणी करण्यात आल्या होत्या. त्यांना बाजारात वाढती मागणी असे.[७] लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट अशी की बंगालच्या कच्च्या रेशीमउद्योगाला आणखी एका सुधारणेतून पुढे जाण्यास शंभराहून अधिक वर्षे लागली. ही सुधारणा म्हणजे सूत गुंडाळण्याची इटालियन पद्धत होय. ही पद्धत कंपनी सरकारच्या प्रोत्साहनाने अमलात आली. सुमारे तीस वर्षांच्या अवधीत हे नवे तंत्रही बंगाली विणकरांनी आत्मसात केले. तथापि, १८ व्या शतकाच्या उत्तरार्धात बंगालचे कच्चे रेशीम व रेशमी कापड यांच्या अंतर्गत व्यापाराला, विशेषतः पश्चिम भारतातील व्यापाराला फार जोराचा फटका बसला. हा फटका काही अंशी मराठा-युद्धांमुळे व काही अंशी १७७० च्या बंगालच्या दुष्काळानंतर कच्च्या रेशमाच्या पुरवठ्याची स्थिती हलाखीची झाल्यामुळे बसला होता.

---

५. कित्ता.

६. एन्. के. सिन्हा यांनी 'एकॉनॉमिक हिस्ट्री ऑफ बेंगॉल: फ्रॉम प्लासी टु दि पर्मनंट सेटलमेंट', १ (कलकत्ता, १९५६), या ग्रंथात पृ. ११६ वरील टीपेत उध्दृत केलेले २७ ऑक्टोबर १७५५ चे, ॲम्स्टरडॅमला गेलेले डच पत्र.

७. ओम् प्रकाश, टीप क्र. ४, पृ, ७४–७६.

तुतीच्या झाडावर रेशमाचे किडे पाळून त्यांपासून रेशीम काढण्यात येई. याखेरीज १७ व्या शतकातील पूर्व भारतातील नकदी पिके पुढील प्रमाणे होती :– कापूस (याचे उत्पादन प्रत्येक जिल्ह्यात होई. परंतु ढाका, मैमनसिंग व असम–भूतानच्या डोंगरपायथ्याच्या तराईचा प्रदेश यांमध्ये खास प्रतीचा कापूस पिकविला जाई), अफू (बिहार), ऊस (मुख्यतः बीरभूम, मिदनापूर, हुगळी व मालदा), लांबट मिरी (जेसोर व असम), आणि सुपारी (बंगालचे दक्षिणी जिल्हे). बंगालचा जादा तांदूळ फक्त समुद्र मार्गानेच निर्यात केला जात नसे तर गंगेच्या उगमाच्या दिशेने पाटण्यापर्यंतही त्याचा व्यापार चालत असे. सारांश, पिकांचे विशेषीकरण आणि पडित जमिनींची लागवड यांच्या बरोबरीने शेतीचा विस्तार होत होता. ढाका हे मलमलीच्या व्यापाराचेच महत्त्वाचे केंद्र होते असे नव्हे तर नदीकाठच्या व समुद्रकिनाऱ्याच्या प्रदेशांत प्रचंड प्रमाणावर पिकणाऱ्या सुपारीच्या व्यापाराचेही ते महत्त्वाचे केंद्र होते.

तथापि इतर सर्व पिकांपेक्षा तुतीच्या पिकापासूनच जमिनीच्या प्रत्येक घटकातून सर्वांत जास्त एकूण किमतीचे उत्पादन मिळत असे. त्यामुळे १८ व्या शतकाच्या सुरुवातीस भात–जमिनीचा सारा दर बिघ्यास रु. ०–७५ इतका होता, तर तुतीचे पीक येणाऱ्या जमिनीचा सारा दर बिघ्यास रु. ३–०० इतका होता. त्या वेळी कासिमबाजार येथील डच कंपनीच्या रेशीम गुंडाळण्याच्या कारखान्यात सुमारे ४ हजार लोक मजुरीने काम करीत होते, हे लक्षात ठेवण्यासारखे आहे. त्याच जिल्ह्यात कासिमबाजारजवळ असलेल्या जंगीपूर या गावी १७७३ साली इंग्लिश ईस्ट इंडिया कंपनीने स्थापन केलेल्या रेशीम गुंडाळण्याच्या कारखान्यातही १८०२ साली सुमारे ३ हजार कामगार काम करीत होते, असे दिसून येते.[८] रेशीम उद्योगाची भरभराट १८७० पर्यंत चालत राहिली. दरम्यानच्या काळात दुष्काळ, युद्धे व सायीचे रोग यांमुळे तिच्यात चढउतार होत राहिले. परंतु १८७० नंतर मात्र त्या उद्योगाला उतरती कळा लागली.

बंगालच्या साखरेला भारताच्या किनारपट्टीत व इराणच्या आखातात परंपरागत बाजारपेठ होती. परंतु या बाजारपेठांना किती साखर निर्यात केली जाई हे निश्चतपणे सांगता येत नाही. डच कंपनी इराणला दरसाल सरासरीने फक्त २०० ते ५०० टन बंगाली साखर निर्यात करीत असे, असे १६५० ते १६८३ या काळातील ज्या मोजक्या वर्षांचे आकडे उपलब्ध आहेत, त्यांवरून दिसून येते.[९] १७५६ साली समुद्रमार्गाने होणारी बंगालच्या साखरेची एकूण निर्यात दरसाल सुमारे १८५० टन होती. त्यानंतर तिला उतरती कळा लागली व ती काही दशके चालू राहिली. अर्थात् भौगोलिक अपरिहार्यतेमुळे साखरेचे जे उत्पादन काही विशिष्ट जिल्ह्यांमध्येच केंद्रित झालेले होते त्याचे वितरण बऱ्याच मोठ्या अंतर्गत बाजारपेठेत होत असणार, हे उघड आहे. १७व्या शतकात शहरी लोकसंख्येमध्ये सतत वाढ होत होती. या लोकसंख्येकडूनही वाढत्या प्रमाणावर साखरेचाच नव्हे तर धान्याचा व इतर जीवनावश्यक वस्तूंचा वापर केला जाऊ लागला असलाच पाहिजे.

हातमाग उद्योगाचा विस्तार निदान १७५० पर्यंत तरी होतच होता. या उद्योगातून तयार होणारा विविध प्रकारचा माल पूर्व भारतात व त्याच्या बाहेरही विकला जात असे. १७व्या शतकाच्या अखेरीपर्यंत युरोपीय कंपन्या व खासगी व्यापारी यांच्या पुढाकारामुळे या उद्योगामध्ये

८. कित्ता, पृ. १५२; एम. साहा (सं.), 'सिलेक्टेड पेपर्स, रेव्ह. जेम्स लॉंग', (कलकत्ता, १९६८), पृ. १००.

९. ओम् प्रकाश, टीप क्र. ४, यांच्या पुस्तकातील कोष्टकात दिलेल्या आकड्यांवरून काढलेला हिशेब. पृ. ३२५.

थोडयाफार प्रमाणात श्रमविभाजन आणि मक्त्याने अंगावर काम देणे व एका छपराखाली उत्पादनाचे केंद्रीकरण या गोष्टी घडून आलेल्या होत्या. ज्या वेळी उत्तर भारतात सरकारच्या व सरदारांच्या मालकीचे कारखाने विकसित होत होते त्याच वेळी पूर्व भारतात ही केंद्रीकरणाची प्रक्रिया घडून येत होती.

अर्थात् विकासाच्या या चित्राच्या बाबतीत फार अतिशयोक्ती करण्याची जरुरी नाही. बंगाल जे काही सोन्याचांदीचे चलन मिळवीत होता त्याचा काही भाग १७३९ पर्यंत शाही दरबारची खंडणी म्हणून आणि सतत फिरत्या असणाऱ्या सुभेदारांकडून व अधिकाऱ्यांकडून बेकायदेशीरपणे उकळल्या जाणाऱ्या रकमेच्या रूपाने हिंदुस्तानाकडे जात असे. या पैशातून ते लोक बंगालमध्ये तयार होणाऱ्या चैनीच्या वस्तू बऱ्याच मोठ्या प्रमाणात खरेदी करीत असत, ही वस्तुस्थिती लक्षात घेतली तरी पैशाचा खूप मोठा ओघ उत्तर भारताकडे चालू होता, हे मान्य करावे लागते. अशा प्रकारे बंगालच्या वाढत्या नाणे-अर्थव्यवस्थेला वाढत्या चलनपुरवठ्यासाठी आवश्यक असलेला सोन्या-चांदीचा पुरवठा पुरेशा प्रमाणात होऊ शकत नव्हता. परिणामत: काही अपवादात्मक वर्षे वगळल्यास सबंध देशामध्ये वस्तूंच्या किमती तुलनात्मक दृष्ट्या खालच्या पातळीवरच राहिल्या. प्रसार-चलना (circulating media) ची ही गरज खासगी व्यक्ती व युरोपीय कंपन्या यांच्या पुढाकाराने मालदीव बेटातून आयात होणाऱ्या कवडयांमुळे थोडयाफार प्रमाणात भागविली जात असे. कवडयांचे हे चलन १९व्या शतकाच्या सुरुवातीपर्यंत असम, उडीसा व बंगाल या प्रांतांतील अनेक दूरवर्ती प्रदेशांमध्ये प्रचारात राहिले. याचे कारण असे की सोन्या-चांदीचा ओघ आता दिल्ली ऐवजी लंडनकडे वाहू लागला होता. हा ओघ थेट लंडनकडे जाई किंवा चीनच्या मार्गे लंडनला जाई. त्याचा परिणाम म्हणून चलनाचा तुटवडा निर्माण झाला आणि तो कायम चालू राहिला.[१०]

बंगालची विनिमय-अर्थव्यवस्था साप्ताहिक व अर्धसाप्ताहिक बाजार, नियतकालीन जत्रा, लहान-मोठ्या शहरांतील कायमच्या बाजारपेठा आणि फिरस्ते व्यापारी (होड्यांतून मालाची नें-आण करणारे बंजाऱ्यांसारखे वैद्य नावाचे मुस्लिम व्यापारी वगैरे) यांच्या योगे अखंडितपणे टिकून राहिली होती. सेसारे फेडेरिसी (१५६७), राल्फ फिश (१८५२), थॉमस बावरी (१६६९), 'ऐने अकबरी', आणि बंगाली साहित्यकृती यांच्यांतून या वर्णनाला पाठिंबा मिळतो. असमसारख्या ज्या तुलनात्मक दृष्ट्या मागसलेल्या प्रदेशात जनता सरकारला शरीरश्रमाच्या रूपात सारा देत असे व अधिकारीही आपले वेतन शरीरश्रमाच्या रूपात गोळा झालेल्या साऱ्याचा वाटा म्हणून घेत असत तेथे देखील, त्याच्या राजधानीच्या शहरी, धान्याचा नसला तरी सुपारीच्या खरेदीविक्रीचा बाजार रोज भरत असे· हे राजधानीचे शहर [ गौहाटी = गुवाहाटी. गुवा = सुपारी + हाटी = बाजार ] म्हणजे वस्तुत: अनेक खेडयांचा एक समुदायच होता. ( शिहाबुद्दीन, १६६२). या बाजारामध्ये शेतकरी व ग्रामीण कारागीर तांब्यापितळेची व काशाची भांडी, लोखंड, मीठ आणि स्थानिक रीत्या ज्यांचे उत्पादन भरपूर प्रमाणात होत नव्हते अशा सुपारी,

---

१०. १९व्या शतकाच्या प्रारंभी काही विशिष्ट प्रदेशांत पडलेल्या चलनाच्या तुटवड्याचे काय परिणाम झाले याचे विवेचन पुढील लेखांत करण्यात आले आहे : ए. गुह, 'कॉलनायझेशन ऑफ आसाम–ईयर्स ऑफ ट्रानझिशनल क्रायसिस ( १८२५-१८४० )', दि इंडियन एकॉनॉमिक अँड सोशल हिस्ट्री रिव्ह्यू, ५, अंक २, जून १९६८, आणि ए. सिद्दीकी, 'ॲग्रेरियन डिप्रेशन इन उत्तर प्रदेश इन १८२८–१८३३', कित्ता, ६, अंक २, जून १९६९.

नारळ व तंबाखू यांसारख्या वस्तू खरेदी करीत असले पाहिजेत असे समजण्यास मुळीच हरकत नाही. व्ही. आय्. पाव्हलॉव हे देखील मान्य करतात की, अठराव्या शतकातील पाटणा वगैरे-सारख्या अनेक शहरांमध्ये पूर्व भारतातील ग्रामीण ग्राहकांच्या जाडेभरडे कापड व घोंगड्या यांसारख्या वस्तूंच्या गरजा भागविणाऱ्या बऱ्याच मोठ्या बाजारपेठा होत्या.[११] ज्या शंखाच्या बांगड्या हिंदू स्त्रिया सौभाग्यचिन्ह म्हणून वापरतात आणि ज्या फार लौकर फुटत असतात, त्यांची खरेदीही ग्रामीण जनतेकडून सातत्याने मोठ्या प्रमाणावर होत असे. शंखांच्या बांगड्यांचा उद्योग ढाका व इतर काही लहान शहरे यांमध्ये केंद्रित झालेला होता.

तथापि, एकूण विचार करता, बाजारांतून ग्रामीण लोकांकडून केली जाणारी खरेदी ही मालाचे प्रमाण व मूल्य यांच्या दृष्टीने फारशी मोठी नव्हती. प्रा. गाडगीळ यांनी या मुद्यावर दिलेला भर योग्यच आहे की, १७ व्या व १८ व्या शतकांत वस्तुविनिमयाचा फार मोठ्या प्रमाणा-वर विकास घडून येण्यास हा व्यापार पुरेसा नव्हता. भारी कर, राजसत्तेशी अविभाज्यपणे संबद्ध असलेल्या व सावकारी करणाऱ्या महसूल अधिकाऱ्यांकडून होणारे भयंकर शोषण आणि त्यावर अवलंबून असलेली नाण्यांची चणचण या सर्व गोष्टींमुळे नाणकीरणाची जी प्रक्रिया चालू झालेली होती तिचा वेग काहीसा कमी पडत होता. आर्थिक जीवनाच्या फार मोठ्या क्षेत्रांत वस्तुविनि-मयाची व वस्तूंच्या रूपात मोबदला देण्याची प्रथा चालूच राहिली, परंतु त्याचे कारण वर उल्ले-खिलेले अडथळे हेच होते. या अडथळ्यांमुळे नाण्यांची चणचण दूर करण्याचे आव्हान सावकारांना आधीच दिलेले होते. या वेळपर्यंत भारतातील बँकिंग प्रणालीचा विकास एका विशिष्ट मर्यादे-पर्यंत झालेला होता. ज्याला प्रत्ययपत्र (credit money) असे म्हणतात, त्याचे प्रचलन अजून झालेले नव्हते. परंतु अशा प्रकारचे पुढचे पाऊल उचलण्यासाठी लागणारी परिस्थिती पुरेशा प्रमाणात परिपक्व झालेली होती. यामुळेच अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात युरोपीय लोकांनी आधुनिक पद्धतीच्या बँका स्थापन करण्याकरिता जे प्रारंभिक प्रयत्न केले त्यांमध्ये ते स्थानिक सावकारांना सहजा सहजी सामील करून घेऊ शकले.

या ठिकाणी हे नमूद केले पाहिजे की महाराष्ट्र व गुजरात या प्रांतांमध्ये सातत्याने प्रभाव-शाली राहिलेली ग्राम समाज ही संस्था पूर्व बंगालमध्ये व मुख्यतः उत्तर बंगालमध्ये लोकांना मुळीच माहीत नव्हती किंवा असली तरी कधीच नामशेष होण्याच्या पंथाला लागली होती. तेथील खेडी सामान्यतः एका जागी केंद्रित झालेली नसत. विखुरलेल्या वाड्यांचे गट म्हणजे खेडी, अशी तेथे परिस्थिती होती, असमीया समाजही वाड्यांमध्ये विखुरलेला होता. तेथे विविध जाती-जमातींनी बनलेला एकसंघ ग्रामसमाज अस्तित्वात नव्हता. परंतु तेथे 'खेल' नावाची एक विशिष्ट संस्था होती. खेल म्हणजे समान व्यवसाय, नातीगोती किंवा शेजारपण या तत्त्वांवर आधारलेला संघटित गट. सरकारला शरीरश्रमाच्या रूपाने सारा गोळा करिता यावा, यासाठी हे गट निर्माण करण्यात आले होते. सारांश, 'ग्रामीण समाजा' चे 'अपरिवर्तनीय' स्वरूप हा मुद्दा या काळातील पूर्व भारताच्या अधिकांश भागांना लागू पडत नव्हता.

आता आपण या विषयाच्या मध्यवर्ती विषयाकडे परत वळू. या संबंधात एक सुसंबद्ध प्रश्न उपस्थित करता येईल. त्या वेळी जी आर्थिक प्रक्रिया चालू होती तिच्यामध्ये बंगाली (किंवा

११. व्ही. आय. पाव्हलॉव, 'दि इंडियन कॅपिटॅलिस्ट क्लास-ए हिस्टॉरिकल स्टडी', (न्यू दिल्ली, १९६४), पृ. १०-११ व २४-२६; प्रा. गाडगीळ यांचे या बाबतीतील मत सदर ग्रंथाच्या पृ. ११वरील टीपेत नमूद करण्यात आले आहे.

स्थानिक) व्यापारी-भांडवलाचा भाग किती प्रमाणात होता ? दूर पल्ल्याच्या, समुद्रपार व्यापाराच्या क्षेत्रातील त्यांचा अभाव डोळयांत भरण्यासारखा होता. अधून-मधून (उदाहरणार्थ, १६०२ साली) मालदीव, सिलोन व पेगू अशा दूर अंतरावरील देशांत ते जात असले तरी किनारपट्टीच्या प्रदेशांतील त्यांचा व्यापार अगदीच नाममात्र होता. पेगूच्या पलीकडे आग्नेय आशियात जाणे त्यांनी पूर्वीच बंद केले होते. बंगाल्यांमध्ये पूर्वीच्या काळी दर्यावर्दीपणाची प्रबळ परंपरा असल्यास ती १७ व्या शतकापर्यंत संपुष्टात आली होती, आणि ती केवळ पुसट स्मृतीच्या रूपाने लोकसाहित्यातच उरली होती. उपलब्ध लेखी पुराव्यावरूनही बंगाली जहाज-निर्मात्यांनी स्थानिक गोद्यांमध्ये समुद्रयात्रा करणारी जहाजे बांधली असल्याचे आढळून येत नाही.

तरी पण, अंतर्मुख बंगाली व्यापाऱ्यांनी अंतर्गत बाजारपेठ आणि नदीतून चालणारी वाहतूक यांवर आपले लक्ष केंद्रित केले होते. नद्या व तळी ही एकमेकांना जोडून तयार करण्यात आलेल्या कालव्यांच्या जाळयामुळे दूर अंतरापर्यंत जीवनावश्यक वस्तू नेऊन पोचविण्याचा प्रश्न पुष्कळच सोपा झाला होता. पतेला नावाची (पातेल्याच्या आकाराची) मोठमोठी गलबते हुगळी नदीतून वाहतूक करीत असत. त्यामध्ये १५० ते २२५ टन माल सामावत असे. १०० मण माल (१ टन=२७·३ मण) पाटण्याहून हुगळीपर्यंत नेण्याचे (सुमारे ३५० मैल) वाहतूक-भाडे १६८८ साली सुमारे १५ रु. आणि १७०९ साली फक्त १० रु. होते.[१२] बंगालच्या नौका-उद्योगातून नदीतून चालणाऱ्या विविध प्रकारच्या नौकांची निर्मिती झाली. बंगालमधील नद्यांचे प्रवाह वेगवेगळया प्रकारचे व अनेकदा नौकानयनाला त्रासदायक असल्यामुळे त्यांना उपयुक्त ठरतील अशा नौका बांधण्यात आल्या. वेगवेगळया स्थानिक व मोसमी परिस्थितींना अनुकूल असणाऱ्या, दोरांनी खेचावयाच्या नौका, तसेच वल्हयाच्या व शिडाच्या नौका बांधण्यात येत असत.

शहरातील दलालांना युरोपीय कंपन्यांकडून मालाच्या मागण्या व त्यांच्या पोटी अगाऊ रकमा मिळत असत. हे दलाल १८ व्या शतकाच्या मध्यापर्यंत बंगालच्या परंपरागत व्यापारी जमातीतील असत. उदाहरणार्थ, ढाक्क्यामध्ये कापसाच्या व्यापाराचा पुष्कळ अनुभव असलेल्या दलालांना अशा प्रकारे अगाऊ रकमा मिळत असत. ते दलाल हा पैसा छोटया व्यापाऱ्यांना वाटून देत. हे व्यापारी जागजागी जाऊन स्थानिक विणकरांना ते पैसे देत.[१३] डच लोक बहुधा विणकरांच्या गटाचे पुढारीपण करणाऱ्या मुख्य विणकऱ्यांशीच प्रत्यक्ष व्यवहार करीत. हा विणकरांचा पुढारी स्वत: उत्पादनाचे काम करणारा असेच असे नाही.[१४] अशा प्रकारे बंगाली व्यापारी-दलालांचा व कारागीर-दलालांचा एक वर्ग उदयास आला. कापड व्यापारातील या दलालांप्रमाणेच इतरही अनेक व्यापारी व कामगार जमातींतील व्यावसायिक या क्षेत्रात होते. सुवर्णवणिक, साहा, तेली, गंधवणिक, मोदक, ताँती इत्यादि जमातींचा त्यांत समावेश होता. ते आपापल्या विशिष्ट क्षेत्रांतील व्यापार करीत राहिले. जाती-जमातींचा साचेबंदपणा सामाजिक जीवनात कटाक्षाने पाळला जाई. परंतु आर्थिक जीवनात तो इतका कडक नव्हता. व्यापाराचे दरवाजे सर्वांना उघडे होते. काही थोडे हस्तव्यवसाय वगळल्यास बाकी सर्व व्यव-

---

१२. ओम प्रकाश, टीप क्र. ४, पृ. १७-१८. इ. स. १७९४ साली बनारस जवळच्या मिर्झापूर गावाहून गंगेतून कलकत्त्यापर्यंत (५५० मैल) कापसाची वाहतूक करण्याचे भाडे १०० मणांना फक्त ३० रुपये होते. 'रिमार्क्स ऑन दि हजबंड्री अँड इंटर्नल कॉमर्स ऑफ बेंगॉल', (दुसरी आवृत्ती, लंडन, १८०६), पृ. १४४.

१३. 'दि डायरीज ऑफ स्ट्रेनशाम मास्टर, १६७५-१६८०', (आर्. टेंपल (सं.) लंडन, १९११), पृ. ४०.

१४. ओम् प्रकाश, टीप क्र. ४, पृ. २२.

सायांत बहुसंख्य लोकांना मुक्तद्वार होते. त्यात जातीचो किंवा धर्माची अडकाठी येत नसे. ब्राह्मण, कायस्थ वगैरे जातींच्या बाबतीत काही बंधने अवश्य होती. परंतु नफ्याचे आकर्षण इतके प्रबळ होते की, या जातींचे लोकही 'बेनामी' (स्वतःचे नाव उघड न करिता दुसऱ्याच्या नावावर ताब्यात ठेवलेल्या) मिठागरांतून मोठ तयार करण्यासारखा 'खालच्या दर्जाचा' व्यवसायही करीत असत. सारांश, पूर्व भारताचा विचार करताना व्यावसायिक वेगळेपणातील सोवळेपणा आर्थिक विकासाला बाधक ठरला, असे म्हणणे अतिशयोक्तिपूर्ण होईल. १५

मारवाडी महाजन–सावकार १७ व्या शतकापासून पूर्वेकडे सरकू लागले. १७५० पर्यंत त्यांच्यापैकी अनेकजण ढाका व मुर्शिदाबाद येथे जाऊन स्थायिक झाले होते. परंतु १८व्या शतकाच्या प्रारंभी आलेल्या पंजाबी (शीख–खत्री) व्यापाऱ्यांपेक्षा त्यांचे महत्त्व फारसे अधिक नव्हते. प्लासीच्या युद्धाच्या सुमारास अत्यंत महत्त्वाच्या समजल्या गेलेल्या जगतसेठ महताबचंद (मृ. १७६४) व अमीचंद (मृ. १७५८) यांच्या पेढ्या वर उल्लेखिलेल्या मारवाडी व पंजाबी घटकांचे प्रतिनिधित्व करीत होत्या. हुजुरीमल (मृ. १७८३) हा पेढीदार अमीचंदचा नातेवाईक होता आणि देवीसिंग हा हरयाण्याचा अग्रवाल होता. जगतशेठाची पेढी १८१०च्या सुमारास बुडेपर्यंत डळमळीत अवस्थेत टिकून राहिली. या वेळेपर्यंत मुर्शिदाबादेत सुमारे सात मारवाडी ओसवाल पेढीदार उदयास आले होते आणि त्यांच्या पेढ्यांच्या शाखा सर्व महत्त्वाच्या शहरांत होत्या. युरोपीय लोकरी कापड, मिरी, कच्चा कापूस व सुती कापड यांची आयात आणि सुंठीची निर्यात ते करीत. तथापि, त्यांचा मुख्य व्यवसाय हुंड्या पुरविण्याचा होता. कलकत्त्यात सध्या असलेल्या मारवाडी व्यापाऱ्यांचे पूर्वज पूर्व भारतात अगदी अलीकडे म्हणजे एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीस येऊ लागले होते. सुरुवातीच्या काळात ते मुख्यतः पेढीचा व सावकारीचा धंदा करीत असत.

१७४० नंतर एक मोठे परिवर्तन घडून आले. ते असे की, बंगाली व्यापाऱ्यांनी सुरतेकडून कच्चा कापूस घेण्याऐवजी मिर्झापूरच्या बाजारातून कापूस घेण्यास सुरुवात केली. त्या बाजारात पूर्व महाराष्ट्रातून मोठ्या प्रमाणावर कच्चा कापूस येऊ लागला होता. मिर्झापूरहून कच्च्या कापसाने भरलेली जहाजे गंगेतून कलकत्त्याकडे जाऊ लागली. या घटनेमुळे गुजरात व बंगाल यांच्यातील आर्थिक संबंध शिथिल होऊ लागले. या ठिकाणी एक गोष्ट नमूद करण्यासारखी आहे. ती अशी की, बंगालच्या हस्तव्यवसायाला उतरती कळा लागल्यामुळे आणि त्याच वेळी ब्रिटनच्या बाजारात कच्च्या कापसाची मागणी वाढू लागल्यामुळे १८२६ नंतर व्यापाराच्या स्वरूपात आणखी एक मोठा बदल घडून आला. तो असा की, पूर्व महाराष्ट्रातील कच्चा कापूस मिर्झापूरमार्गे बंगालला जाण्याऐवजी अधिक अवघड परंतु जवळच्या खुष्कीच्या मार्गाने तो मुंबई बंदरात जाऊ लागला. अर्थात् त्यानंतरही बंगाल हा कापसासाठी मिर्झापूरवरच अवलंबून राहिला; मात्र पूर्वीपेक्षा त्याचे प्रमाण कमी झाले. कापसाची आणखी एक मोठी बाजारपेठ मुर्शिदाबाद जिल्ह्यात

---

१५. 'रिमार्क्स ऑन दि हजबंड्री अँड इंटर्नल कॉमर्स ऑफ बेंगॉल', (१७९४, पहिली आवृत्ती, १८०४; पुनर्मुद्रण, लंडन, १८०६), पृ. १७२.

कोलब्रुक यांना असे आढळून आले की, एकूण लोकसंख्येपैकी सुमारे ८० टक्के लोकांना कोणत्याही वस्तूच्या उत्पादनाचा व्यवसाय करण्याचे स्वातंत्र्य होते. त्यायोगे त्यांच्यावर कसलाही ठपका येत नसे. व्यापार व शेती हे व्यवसाय सर्वांना खुले होते.

१८ व्या शतकाच्या अखेरीस अनेक उच्च वर्णीय हिंदू कापड विणणे, रंगविणे व त्यावर छपाई करणे यांसारखे व्यवसायही करीत असत असा पुरावा आढळतो.

गंगेच्या काठी असलेल्या भगवानगोला या शहरी होती. आसपासच्या कापूस पिकविणाऱ्या प्रदेशांतून येणाऱ्या कच्च्या कापसाची खरेदीविक्री येथे होऊन बंगालमधील हातमाग उद्योगाच्या विभिन्न केंद्रांकडे त्याची रवानगी होत असे.

बंगालमध्ये गुजरातच्या कापसाची मागणी १७४० साली १० लाख रुपयांची होती, ती झपाट्याने घसरत जाऊन १७५० साली केवळ १ लाख रुपयांची झाली. याचा परिणाम म्हणून बंगालमधून सुरतेत येणारे कच्चे रेशीम, रेशमी कापड व साखर यांची आयातही खूप घटली. १७६५ साली साखरेची आयात अगदीच क्षुल्लक होती तर, इतर दोन वस्तूंची आयात एकूण फक्त २, ५७, ६५० रुपयांची होती.[१६] अंतर्गत आयात–निर्यातीतील या घटीचा प्रतिकूल परिणाम किनारपट्टीजवळच्या जहाजवाहतुकीवर व व्यापारावर झाला; आणि त्याचा फटका भारतीय व्यापाऱ्यांना जेवढा बसला त्यापेक्षा कितीतरी अधिक या व्यापारावर अधिपत्य मिळवून बसलेल्या खासगी इंग्रज व्यापाऱ्यांना बसला. तथापि, बंगालच्या अर्थव्यवस्थेचा जो हळूहळू परंतु निश्चित विकास घडून येत होता त्याची प्लासीच्या लढाईनंतरच खरी पीछेहाट सुरू झाली. 'दस्तक' प्रथेचा वाढता दुरुपयोग (मुगल सत्तेकडून ईस्ट इंडिया कंपनीला जकात न भरता मालवाहतूक करण्याचा जो परवाना मिळाला होता त्याला दस्तक असे म्हणतात. कंपनीचे नोकर हा परवाना इतरांना विकून पैसे कमवीत.), बंगालच्या अंतर्गत व्यापारातून इतर प्रतिस्पर्ध्यांची हकालपट्टी, प्लासीच्या युद्धानंतरची लुटालूट आणि त्यानंतर आलेला १७७० चा दुष्काळ, या सर्वांमुळे बंगालची अर्थव्यवस्था आणि स्थानिक व्यापारी उपक्रमशीलता ही दोन्ही लुळी पडली. जहाजांची मालकी बाळगणारी व व्यापार करणारी मुस्लिम घराणी सत्तेच्या क्षेत्रातून झपाट्याने बाहेर फेकली गेली. त्यांच्या सत्तेला उतरती कळा लागली. सेठ व बसाक यांसारख्या प्रस्थापित बंगाली हिंदू व्यापारी घराण्यांना वाईट दिवस आले. त्यांच्यापैकी अनेकांनी शहरी भागांतून आपली ठाणी हलवून ती ग्रामीण भागांत नेली; तर इतरांनी व्यापाराच्या क्षेत्रातून अंग काढून घेऊन शहरी स्थावर मालमत्तेत पैसा गुंतविण्यास सुरुवात केली. प्लासीच्या युद्धानंतरच्या काळात सामान्यतः उच्चवर्णीय हिंदूंमधून भरती केलेल्या 'बनियन-दुभाष' नावाच्या नव्या वर्गाने कंपनीचे भ्रष्ट अधिकारी व युरोपीय खासगी व्यापारी यांचे साथीदार बनून वसाहतवादी लुटालुटीत भाग घेतला. त्यांच्यातून नवश्रीमंत बंगाली भांडवलदारांचा एक वर्ग उदयास आला. त्यांच्यापैकी काही उल्लेखनीय नावे अशी : गोकुल घोषाल (मृ. १७७९), नवकृष्ण देव (१७३२ (?)– १७९७), दर्पनारायण टागोर (मृ. १७९३), मनोहर मुखर्जी, वाराणसी घोष, हिदाराम बानर्जी, कृष्णकांत नंदी (मृ. १७९४), कृष्णपाल, लक्ष्मीकांत धर, निमाईचरण मल्लिक, मदन दत्त आणि अक्रूर दत्त. या मंडळींनी दलाल, भांडवल पुरविणारे सावकार आणि अनेकदा आपल्या युरोपीय आश्रयदात्यांचे भागीदार या नात्याने खूप पैसा मिळविला. युरोपीय लोक जे नाना प्रकारचे लांडीलबाडीचे व्यवहार करीत, कपट कारस्थाने योजीत, मक्तेदारीचा अवलंब करीत आणि सरळ सरळ जबरी वसूल करीत त्यामध्ये हे लोक त्यांचे साथीदार असत.[१७] सारांश, मार्क्सने ज्या प्राथमिक धनसंचय

१६. सिन्हा, टीप क्र. ६, पृ. ९ व १४.

१७. अठराव्या शतकातील बंगाली भांडवलदार, त्यांचे वेगवेगळे व्यवसाय, त्यांनी आपसांत व युरोपीय लोकांशी केलेली भागीदारी, इत्यादींचे सविस्तर वर्णन पूर्वोक्त सिन्हा यांच्या ग्रंथात पृ. २६ व ९१–९६ यांवर आले आहे.

[ पुढील पानावर

(primary accumulation) प्रक्रियेचे यथायोग्य वर्णन केले आहे त्या प्रक्रियेचा फायदा घेण्यात हेही लोक सहभागी होते. सुतानौतीचे जे सेठ व बसाक सुताचा व्यापार करताकरता व्यापारी भांडवलदार बनले होते (उदाहरणार्थ, बस्तमचंद सेठ, मृ. १७५२) ते मागे पडले. जे पटाईत विणकर लहान प्रमाणावरील व्यापारी, भांडवलदार बनण्याच्या बेतात होते तेही चिरडले गेले. कारण अशा प्रकारच्या विकासाला ती परिस्थिती अनुकूल नव्हती.

१७८० नंतर बंगाल दुष्काळाच्या परिणामांतून थोडाबहुत सावरला. कारण एव्हाना कंपनीने सरळ-सरळ लुटालुटीला वाव देण्याचे आपले आतापर्यंतचे अदूरदर्शी धोरण बदलून भारताला इंग्लंडची शेती-वसाहत बनविण्याचा विधायक दृष्टिकोन अवलंबिला होता. स्थानिक नवश्रीमंत आणि अधिकाधिक संख्येने भारतात येऊ लागलेले इंग्रज मुक्त व्यापारी यांना त्यांचा वेळ, भांडवल व उत्साह आर्थिक दृष्ट्या लाभदायक कामांमध्ये गुंतविता येईल अशा काही मर्यादित संधी उपलब्ध करून देण्यात आल्या. दुभाष-बनियन वर्गातील नवश्रीमंतांनी एका नव्या टप्प्यात प्रवेश केला आणि ते इंग्रज मुक्त व्यापाऱ्यांशी धंद्याच्या बाबतीत सातत्याने सहकार्य करू लागले.

चीनशी होणाऱ्या अफूच्या व कापसाच्या व्यापाराला अधिकाधिक महत्त्व प्राप्त होऊ लागले होते. व्यापारी पीक म्हणून बंगालमध्ये निळीचे उत्पादन सुरू करण्यात आले होते. त्याच्या वाढीसाठी सुरुवातीच्या युरोपीय खासगी प्रयत्नांना सरकारकडून आर्थिक मदतीच्या रूपाने भरपूर प्रोत्साहन दिले गेले होते. १७९० नंतरच्या काळात उत्तर हिंदुस्तानातील कच्च्या रेशमाची बाजारपेठही चांगली सुधारली होती. भारतातील राजेरजवाडे व फ्रेंच दरबार यांना उतरती कळा लागल्यामुळे आणि इंग्लंडच्या यंत्रनिर्मित कापडाशी परदेशात वाढत्या प्रमाणावर स्पर्धा करावी लागल्यामुळे सुती व रेशमी कापडाच्या मागणीत जी घट झाली तिचा विशेष गंभीर परिणाम १८२२ पर्यंत दिसून आला नाही. याची अनेक कारणे होती :— (अ) १७७० च्या दुष्काळामध्ये आणि त्यानंतर कातणारे, विणणारे व कच्च्या रेशमाचे उत्पादन करणारे यांच्या

---

मागील पानावरून ]

अक्रूर दत्त याचा उल्लेख पहिल्या प्रथम १७४० साली 'दादनी' व्यापारी म्हणून येतो. (एखाद्या कामासाठी अगाऊ दिल्या जाणाऱ्या रकमेला 'दादनी' असे म्हणत). १७६९ साली तो गोकुळ घोषाल व मदन दत्त यांच्याबरोबर टी. रमबोल्ड, डब्ल्यू. विल्किन्स व एच. व्हेरेलस्ट यांच्या कंपनीत भागीदार होता. ही कंपनी पूर्वेकडील भागात बोटीतून अफू पाठविण्यासाठी स्थापन करण्यात आली होती. अक्रूर दत्त हा रॉबर्ट बर्वेचा प्रमुख बनियन (दलाल व भांडवल पुरविणारा सावकार) आणि १७९०–९५ पर्यंत प्रख्यात गलबतकंत्राटदार होता. घोषाल हा गव्हर्नर व्हेरेलस्टचा बनियन होता. तो १७६९ पासून जे. आर्चेकिनचा भागीदारही होता आणि त्याच वेळी तो महसूल गोळा करण्याचे कामही करीत असे. सिन्हांनी घोषालच्या 'धंद्यातील सचोटीबद्दल पसरलेल्या कीर्ती'चा उल्लेख केला आहे, परंतु महसूल गोळा करणारा अधिकारी या नात्याने तो जी दडपशाही करीत असे तिच्याविरुद्ध सनद्वीपच्या शेतकऱ्यांनी १७६९ साली उभारलेल्या बंडाचा उल्लेख मात्र केलेला नाही.

कृष्णपाल हा तेली जातीचा गृहस्थ मिठाचा व्यापारी होता. त्याने राणाघाटच्या पाल चौधुरी घराण्याचा पाया घातला.

"मीठ, अफू, विड्याची पाने आणि इतर जीवनावश्यक विक्रेय वस्तूंच्या मक्तेदाऱ्या म्हणजे संपत्तीच्या अक्षय खाणी होत्या. त्यांचे मक्तेदार स्वतःच त्यांच्या किमती ठरवीत आणि बिचाऱ्या हिंदूंना ते मनसोक्त लुटीत. सुभेदारांप्रमाणे त्यांना म्हणता या मक्तेदारांचे भाग्य फळफळले. एका शिलिंगाचीही अगाऊ गुंतवणूक करावी न लागता प्राथमिक धन-संचय चालत राहिला." या शब्दांत मार्क्सने आपल्या 'कॅपिटल' या ग्रंथात (भाग १, प्रकरण ३१), १७५७ ते १७८० या कालखंडामध्ये बंगालमध्ये चालू असलेल्या प्रक्रियेचे वर्णन केले आहे.

संख्येत फार मोठी घट झाली.[१८] यामुळे मालाचा पुरवठा कमी झाला. (आ) परदेशी बाजारपेठेत तलम कापडाची मागणी हळूहळू कमी होऊ लागली. (इ) कापडाच्या जाडयाभरडया प्रकारांना असणारी भारतातील देशांतर्गत मागणी वाढली. (ई) विलायतेतील आपला खर्च (home charges) भागविण्याचे एक साधन म्हणून कंपनीला येथे माल गोळा करावा लागत असे. त्यासाठी तिने आपली यंत्रणा अधिक कडक बनविली. अशा प्रकारे भारतीय कापडाची, बव्हंशी बंगालमध्ये तयार होणाऱ्या कापडाची निर्यात १७९८ साली आपल्या उत्कर्षबिंदूपर्यंत जाऊन पोचली होती. त्या वर्षी कंपनीने सुमारे ३० लाख पौंड किमतीचे कापड निर्यात केले. १७९८–९९ साली कलकत्ता हे चांगलेच भरभराटीस आलेले शहर होते. त्या वेळी तेथे ७८,७६० कुटुंबे राहत होती. कलकत्त्यात १७५६ साली फक्त ७० ब्रिटिश कुटुंबे राहत होती. त्यांची संख्या वाढतावाढता १७९८–९९ साली ती ४,३०० झाली होती. एकूण विचार करता बंगालची अर्थव्यवस्था १९ व्या शतकाच्या पहिल्या दोन दशकांत विस्तार पावत होती, असे म्हणता येईल.

१८ व्या शतकाच्या शेवटच्या पंचवीस वर्षांत कापसाचे अंदाजे उत्पादन व वापर यांची जी जिल्हावार आकडेवारी सिन्हा यांनी दिली आहे तिच्यावरून बंगालच्या खेड्यांतील तथाकथित स्वयंपूर्णता किती मोडकळीस आली होती याची कल्पना येते. मालदा एजन्सी (विभाग) आपल्या सुमारे ४० हजार मण कच्च्या कापसाच्या उत्पादनापैकी फक्त ७५ टक्के मालाचा वापर करीत असे आणि उरलेला १० हजार मण कापूस एजन्सीच्या बाहेरच्या बाजारपेठांत विकला जात असे. त्याच वेळी १५०० मण कच्चा कापूस भूतानच्या तराईतून, ७ हजार मण कापूस मिर्झापूरच्या बाजारपेठेतून (१७८० पासून), आणि थोडाफार कापूस सुरतेहून या एजन्सीमध्ये आणला जात असे. रंगपूर जिल्ह्यातील कापड-उत्पादनासाठी स्थानिक कापूस ५ हजार मण, भूतान व असमचा कापूस १८ हजार मण आणि भगवानगोला बाजारातून निश्चितपणे सांगता येणार नाही इतका कापूस वापरला जात असे. बीरभूम जिल्ह्यात ९७ हजार मण कापूस वापरला जात असे. त्यापैकी ८२ टक्के माल स्थानिक उत्पादनाचा असे आणि १८ टक्के मुर्शिदाबाद व पाटणा येथून आणला जाई. हरिलाल फॅक्टरीचा प्रदेश कापूस–उत्पादनाला अनुकूल नसल्यामुळे तिला कच्च्या मालासाठी पूर्णपणे आसपासच्या बाजारपेठांवर आणि सुरतेहून आयात होणाऱ्या कापसावर अवलंबून राहावे लागे. १७८३ नंतर कापूस–पुरवठ्याचे केंद्र म्हणून मिर्झापूरने सुरतेचे स्थान घेतले. जाडेभरडे व तलम कापड तयार करण्यासाठी लागणारा कापूस भगवानगोला येथील व्यापारी देशाच्या अंतर्भागातून खरेदी करीत आणि तो ढाका जिल्ह्यातील वेगवेगळ्या बाजारपेठांना सरळ पाठवून देत.[१९] तथापि, ढाक्याची प्रख्यात मलमल मात्र पूर्णपणे कापसाच्या एका खास स्थानिक जातीपासूनच तयार केली जाई. १९ व्या शतकाच्या सुरुवातीस मलमलीचे उत्पादनच नष्ट करण्यात आल्यामुळे कापसाची ही स्थानिक जातही नाहीशी झाली.

कोलब्रुक (१७९४) व बुकनन हॅमिल्टन (१८०७–१८१०) यांनी कापसाच्या व्यापाराची जी तपशीलवार माहिती नमूद करून ठेवली आहे तिच्यावरून या सापेक्षतः नागर वस्तूंच्या

---

१८. त्यानंतर १७८३ साली पूर्णिया जिल्ह्यात आणखी एक लहान दुष्काळ पडला होता आणि संपूर्ण बिहारमध्येच धान्यटंचाई निर्माण झाली होती.

१९. सिन्हा, टीप क्र. ६, पृ. १०२–१०९.

कापसवंधीच्या चित्राला पुष्टी मिळते. अर्थात् या वस्तूंच्या कच्च्या मालापासून तयार माला-पर्यंतच्या प्रत्येक अवस्थेत खूपच मोठ्या प्रमाणावर श्रमविभाजन होत होते हे उघड आहे. कापडाच्या उत्पादनाची साधने मात्र ओबडधोबड होती. त्यातील हस्तकौशल्य पराकोटीचे विकसित झालेले होते आणि त्याच्यामुळेच अशा कापडाची किंमत खूप वाढत असे. कोलब्रुक यांच्या मते बंगालचे लोक सामान्यतः आपापल्या शेतीतून होणाऱ्या उत्पादनावरच उदरनिर्वाह चालवीत असले तरी कापडाच्या बाबतीत तशी स्थिती नव्हती. बंगालच्या अंतर्गत वापरासाठी बाहेरून बाजारात येणारे कापड अंदाजे ६ कोटी रुपयांचे असे. याच्या उलट, स्थानिक व्यापारी बंगाल-मधील धान्य खूप दूरदूरच्या भागांत नेऊन विकत असत. हे धान्य शहरांतील लोकांच्या उपयोगा-साठी आणि समुद्रमार्गे निर्यातीसाठीही वापरले जाई. त्याची किंमत २ कोटी रुपयांहून थोडी अधिक असे. अर्थात् यामध्ये जवळपासच्या भागांना होणाऱ्या धान्यपुरवठ्याचा समावेश नव्हता.[२०] १७९९–१८०० या वर्षी ४५ हजार टन धान्य समुद्र मार्गे खाजगी रीत्या निर्यात करण्यात आले होते. धान्याची निर्यात वाढत्या प्रमाणावर होती. १८०६–१८०७ साली केवळ कोरोमंडल किनारा व चीन या दोन भागांनाच निर्यात करण्यात आलेला बंगालचा तांदूळ सुमारे १,४५,००० टन होता. बंगालच्या साखरेची जागा जावा साखरेने १७७६ च्या सुमारासच घेतली होती. त्या वर्षी बंगालने बनारस व चीन येथून जेवढी साखर आयात केली होती तेवढीच बंगाली साखर निर्यात झाली होती. तिचे प्रमाण फारच थोडे होते.[२१] १७९३ पासून समुद्रमार्गे पुनः एकदा साखरेची निर्यात सुरू झाली. मलबार किनाऱ्याला निर्यात होणाऱ्या साखरेची सरासरी १७९५–१७९८ या काळात २३० टन होती. ती वाढत १७९८–१७९९ साली २६०० टनापर्यंत गेली. परंतु याच काळात ब्रिटनला निर्यात झालेल्या साखरेचे प्रमाण मात्र घसरत गेल्याचे दिसून येते. सुरुवातीला ते सरासरीने ६००० टन होते, परंतु शेवटच्या वर्षी ते २००० टनांपर्यंत खाली आले होते. परंतु त्याच्या दुसऱ्याच वर्षी ब्रिटनने ७००० टन बंगाली साखर आयात केली. अशा प्रकारे साखरेच्या निर्यातीत चढउतार होत राहिले तरी एकूण विचार करिता साखरेची निर्यात वाढतच होती, असे दिसते. कलकत्ता व श्रीरामपूर येथून जहाजांतून बाहेर जाणाऱ्या साखरेच्या प्रमाणात पुढील प्रमाणे वाढ झाली.

| वर्ष : | १७८७ | १७९६–७ | १७९७–८ | १७९८–९ | १७९९–१८०० |
|---|---|---|---|---|---|
| टन : | ३२७ | ७,१०४ | ५,८६१ | ८,३७६ | २१,००० |

आधार : बेंगाल कमर्शियल रिपोर्टस्.

तथापि, देशी (बिगर ब्रिटिश) जहाज वाहतुकीवरील निर्बंध आणि जगातील साखरेची सर्वांत मोठी बाजारपेठ असलेल्या ब्रिटनमधील भेदभावपूर्ण जकाती यांमुळे त्यानंतरच्या काळात साखरेच्या निर्यातीमध्ये खूपच चढउतार होत राहिले. अखेर १८३६ साली बंगाल व वेस्ट इंडीज येथून ब्रिटनच्या बंदरांत येणाऱ्या साखरेवरील आयात–करामध्ये समानता आणण्यात आली. त्यानंतर मात्र बंगालमधून ब्रिटनला निर्यात होणाऱ्या साखरेत झपाट्याने वाढ होत गेली. (१८३६–७,६०० टन, १८३७–१४,००० टन, १८३८–२०,००० टन, १८३९–२५,००० टन; एकोणिसाव्या शतकाच्या मध्यास ६०,००० टन).

२०. कोलब्रुक, टीप क्र. १५, पृ. १६९–१७०.

२१. 'रिपोर्ट ऑन दि शुगर ट्रेड' (हाउस ऑफ कॉमन्स, १८२२). यामध्ये 'रिपोर्ट ऑफ दि कमिटी ऑफ वेअर हाउसेस, २९ फेब्रुवारी १७९२' याचा समावेश आहे. पृ. १२–१३.

**साखर – उद्योग**

साखर– उद्योगामध्ये, मुख्यत: अंतर्गत मागणीच्या दडपणामुळे वस्तु–विनिमय संबंधांचा पुष्कळच विकास घडून आला होता. उदाहरणादाखल आपण १७९२ हे वर्ष घेऊ. या वर्षी साखरेला बाहेरची बाजारपेठ जवळजवळ मुळीच उपलब्ध नव्हती असे म्हणता येईल. त्या वर्षी पूर्णिया जिल्ह्यात सुमारे १,४३,००० मण खांडसरी तयार झाली होती. तिच्यापासून २१,५०० मण साखर तयार होऊ शकली असती. परंतु प्रत्यक्षात फक्त ४०० मणच साखर तेथे तयार झाली. त्याऐवजी दिनाजपूर, पाटणा व बनारस येथून साखर आणून साखरेची गरज भागविण्यात आली. वीरभूम जिल्ह्यात १८,७९८ मण साखर तयार झाली. त्यापैकी ७५ टक्के साखर जिल्ह्याच्या बाहेर विकली गेली आणि उरलेली २५ टक्के स्थानिक रीत्या वापरली गेली. रंगपूर जिल्ह्यातून मुर्शिदाबाद, कलकत्ता व ढाका या शहरांना साखर व गूळ यांचा मोठ्या प्रमाणावर पुरवठा केला गेला; परंतु त्याच वेळी इतर प्रदेशांतून त्या जिल्ह्याने साखर व गूळ यांची खरेदी केली. इतर निवडक जिल्ह्यांतून किती साखर बाहेर पाठविली गेली त्याचे अंदाजी आकडे असे आहेत :–[२२]

| प्रदेश : | बरद्वान | मिदनापूर | दिनाजपूर | शहाबाद | बनारसची जमीनदारी |
|---|---|---|---|---|---|
| मण : | ४५,८७५ | १५,००० | ११,००० | ९,००० | १,५०,००० |

बनारसची साखर ही भारतातील सर्वोत्कृष्ट साखर होती. तेथे विक्रीसाठी तयार होणाऱ्या साखरेपैकी निम्मी साखर दक्षिण भारतात जाई व उरलेली निम्मी पूर्व भारतात जाई. तेथील बहुतेक सारेच उत्पादन विक्रीसाठी वापरले जाई; आणि स्थानिक लोकांची गरज आसपासच्या प्रदेशांत तयार होणाऱ्या साखरेकडून भागविली जाई.

बंगालमध्ये या उद्योगाची संघटना कशी होती? या संघटनेचे स्थूल मानाने चार भाग पडत असत :–(१) साखरेचे उत्पादक (गोलदार) (२) अडत्ये (पैकार), (३) ऊस–उत्पादक, आणि (४) प्रासंगिक कामगार. 'गोलदार' लोक "श्रीमंत होते, ते त्या व्यवसायात कित्येक पिढ्यांपासून होते आणि कोणावर विश्वास ठेवावा याची त्यांना चांगली कल्पना होती." ऊस-उत्पादक ऊस गाळून रस काढी व तो उकळून त्यापासून गूळ किंवा खांडसरी तयार करी. नंतर हा अर्धपक्व माल तो गोलदाराला देई. उत्पादनाची ही प्रक्रिया सुरू होण्यापूर्वी त्याने गोलदारांकडून अगाऊ रक्कम घेतलेली असे, हे सांगण्याची जरूर नाही. परंतु वीरभूम जिल्ह्यात या बाबतीतील हिशेब उत्पादित माल गोलदाराला दिल्याबरोबर पुरे केले जात असत. संबंधित पक्षांची एप्रिलमध्ये एक सर्वसाधारण सभा होई. त्या सभेत मणाचा भाव ठरविला जाई. तो भाव ठरल्यानंतर अगाऊ रक्कम कापून उरलेले पैसे ऊस–उत्पादकाला दिले जात. दिनाजपूर जिल्ह्यात १८०७–८ साली सामान्यत: दर विघ्याला (सुमारे अर्ध्या एकराला) ऊस–उत्पादनासाठी १२ ते १५ रुपये अगाऊ रक्कम (अॅडव्हान्स) म्हणून दिली जाई. याबाबतीतील कराराचा एक भाग म्हणून व्याजाव्यतिरिक्त, ऊस-उत्पादकाला बाजारभावापेक्षा ६$\frac{1}{4}$ टक्के कमी भावाने गोलदाराला गूळ विकावा लागे. त्यामुळे दिनाजपूरमध्ये अगाऊ घेतलेल्या रकमेवर एकूण १७ ते २० टक्के व्याज द्यावे लागे.

२२. 'अॅपेंडिक्स टु रिपोर्ट ऑन शुगर ट्रेड', (हाउस ऑफ कॉमन्स, १८२२). १७९४ साली ईस्ट इंडिया कंपनीने एकट्या रंगपूर जिल्ह्यातूनच ५५,००० मण साखर खरेदी केली होती. एन्. आर्. घोषाल, 'एकॉनॉमिक ट्रान्झिशन इन बेंगॉल प्रेसिडेन्सी', (दुसरी आवृत्ती, कलकत्ता, १९६६), पृ. ६३.

साखर–उद्योगात वापरली जाणारी उपकरणे ओबडधोबड असत आणि वेगवेगळया भागांत त्यांचे स्वरूप व प्रकारही वेगवेगळे असत. ऊस गाळण्याचा चरक लाकडी असे. त्यात सामान्यत: दोन लहान, ४ ते ६ इंच व्यासाच्या, एकमेकींच्या विरुद्ध दिशांनी फिरणाऱ्या लाटा असत. हा चरक दोन माणसांकडून चालविला जाई. रंगपूरमध्ये जमिनीत वसविलेला एक मोठा चरक असे व तो बैलांकडून चालविला जाई. इतर जिल्ह्यांमध्ये पशुशक्तीवर चालणारे इतर प्रकारचे चरक होते. त्यांची रचना सामान्यत: तेलघाणीसारखी असे. बीरभूममध्ये रस उकळण्यासाठी सामान्यत: चार मातीची भांडी एका संचात वापरली जात. परंतु बनारस व रंगपूर येथे मात्र मातीच्या भांडयांची जागा लोखंडी काहिलींनी कधीच घेतली होती. भागलपूरमध्येही लोखंडी काहिली भाडयाने मिळत असत व त्यांचा वापर केला जाई असे बुकनन–हॅमिल्टन यांनी १८१०–११ मध्ये नमूद करून ठेवले आहे.

चामडयाच्या थैल्यांमधून भरलेली काकवी अथवा गूळ शेतकऱ्यांकडून गोळा करण्याचे काम पैकार करीत. त्यासाठी ते १५, ३० किंवा १०० मैलपर्यंतही जात. हा माल ते गोलदारांना आणून देत. गोलदार काकवी उकळून ती एकचतुर्थांश करी. अशा प्रकारे काकवीपासून साखर तयार करण्यासाठी उकळण्याचे काम दोनदा करावे लागे आणि पुष्कळदा ते वेगवेगळया ठिकाणी व वेगवेगळया वेळी करावे लागे. ज्या उत्पादकांना या टाळता येणाऱ्या अपव्ययाला तोंड द्यावे लागत नसे त्यांना तुलनात्मक दृष्टया कमी उत्पादनखर्चात साखर तयार करिता येत असली पाहिजे हे उघड आहे. साखरेचे वेगवेगळे प्रकार होते आणि त्यांच्या निर्मितीच्या प्रक्रियाही वेगवेगळया असत. उदाहरणार्थ, बीरभूममध्ये दाणेदार साखरही तयार केली जाई. ही साखर बनारसी साखरेइतकीच, किंबहुना तिच्यापेक्षाही अधिक, उत्कृष्ट असे.

बुकनन–हॅमिल्टन यांनी १८०७–८ साली दिनाजपूर जिल्ह्याचा दौरा केला असता त्यांना जिल्ह्यामध्ये १४१ साखर–उत्पादक असल्याचे आढळून आले. त्यांची सर्वांची मिळून २५५ गुऱ्हाळे होती. प्रत्येक गुऱ्हाळात सुमारे एक हजार मण उसाचा रस उकळविला जाई. प्रत्येक गुऱ्हाळामध्ये दोन हजार रुपयांचे भांडवल गुंतलेले असे. परंतु त्यातील ७५ टक्के गुंतवणूक कच्च्या मालासाठी लागणाऱ्या फिरत्या भांडवलाच्या रुपात असे. हंगामाच्या दिवसात प्रत्येक गुऱ्हाळामध्ये सुमारे ११–१२ माणसे कामावर असत. अशा प्रकारे प्रत्येक जिल्ह्यातील साखर–कामगारांची संख्या सुमारे २५०० असे. सर्व गोलदार स्थानिक व पैसेवाले असत. प्रत्येक गुऱ्हाळासाठी किमान भांडवल ३ ते ४ हजार रुपयांचे लागे. काही गोलदारांची अनेक गुऱ्हाळे असत. तथापि, या धंद्यातील नफा कामगारांच्या पिळणुकीतून निर्माण होत नसे; तर वर सांगितल्याप्रमाणे, ऊस–उत्पादकांच्या व्याज रूपाने होणाऱ्या प्रचंड शोषणातूनच तो प्रामुख्याने मिळत असे. अशा प्रकारे गोलदार हे मुख्यत: जबर व्याज आकारणारे सावकार होते. परंतु त्यांचा उत्पादन–प्रक्रियेशीही घनिष्ठ संबंध असल्यामुळे आणि त्यांना तंत्रविद्येच्या आव्हानाला तोंड द्यावे लागत असल्यामुळे सामान्य परिस्थितीमध्ये त्यांच्यांत फेरबदल घडून येणे अपरिहार्य होते.[२३]

या साऱ्या घडामोडी चालू असताना वेस्ट इंडीज पद्धतीचा वापर करून सुधारलेले साखर कारखाने उभारण्याचे प्रयत्न अधूनमधून होत होते. यांपैकी सुरुवातीचा प्रयत्न म्हणजे १७८९ साली बिहारमधील मोतीपूर गावी एका डच गृहस्थाने उभारलेला अयशस्वी साखरेचा कारखाना

२३. 'रिपोर्ट ऑन दि शुगर ट्रेड' (एस्. सी. १८२२). यामध्ये 'रिपोर्ट ऑफ दि कमिटी ऑफ वेअर हाउसेस, २९ फेब्रुवारी १७९२', आणि परिशिष्टे यांचा समावेश आहे.

हा होय. अॅच्यू (Atchew) नावाच्या एका चिनी इसमाने बजबजजवळ ६५० बिघे क्षेत्रात एक साखर कारखाना उभारला होता (१७८१–१८०४). परंतु या बाबतीतील सर्वात यशस्वी प्रयत्न म्हणजे सुखसागर व उमीदपूर येथे १७९२ साली जोसेफ बारेटो व लेविस बारेटो यांनी उभारलेले साखर कारखाने हा होय. हे दोघे बहुधा बंगालचे स्थानिक पोर्तुगीज असावेत. त्यांनी परदेशातून आणलेली लोखंडी नळकांडी (सिलिंडर्स) आणि वेस्ट इंडीज पद्धतीचे घोड्यांकडून व बैलांकडून चालविले जाणारे चरक यांचा वापर करण्याचा प्रयत्न केला. परंतु काम करण्याच्या या 'नव्या पद्धती' किफायतशीर होत नाहीत असे पाहून त्यांनी उत्पादनाच्या स्थानिक परंपरागत पद्धतींचा वापर करण्यास सुरुवात केली. बारेटोच्या सुखसागर येथील साखर कारखान्यात रम (नावाची दारू) तयार करण्याची एक भट्टीही होती. १७९२ ते १७९६ या काळात ईस्ट इंडिया कंपनीने ऊस-लागवडीच्या वेस्ट इंडियन पद्धती बंगालमध्ये रूढ करण्यासाठी अनेक विशेषज्ञ आणले. परंतु त्यांचे प्रयत्नही खासगी युरोपीय व्यावसायिकांच्या प्रयत्नांप्रमाणेच अयशस्वी झाले. तथापि युरोपीय लोकांचे प्रयत्न निष्फळ ठरले तरी बारेटोचे धाडस मात्र चांगलेच फळफळले. सुखसागर या खासगी साखर-नगरीतील उत्कृष्ट रस्तेही खासगी मालकीचे होते. या नगरीचे वैभव इतके उच्च प्रतीचे होते की, तिला 'छोटा कलकत्ता' हे टोपणनाव प्राप्त झाले. १९व्या शतकाच्या प्रारंभी सुखसागरजवळील नदीने आपला प्रवाह बदलला आणि मग सुखसागर मोडकळीस येऊन जवळच दुसरे एक महत्त्वाचे शहर उदयास आले.[२४]

**जहाज–बांधणी :**

१७८० पासून बंगालमध्ये जहाज–बांधणीचे कामही सुरू झाले. प्रारंभी कंपनीच्या मालकीच्या जागेत कर्नल वॅटसन यांनी आपल्या खासगी गोद्या बांधल्या. त्यांना दहा लाख रुपये खर्च आला. या नौनिर्मितिस्थानांची (डॉकयार्डची) मालकी १७८८ ते १८०७ पर्यंत कंपनीचे प्रमुख नौ निर्माते ए. वाडेल यांच्याकडे होती. आणि १८०७ ते १८३६ पर्यंत ती जेम्स किड व त्याचा भाऊ यांच्याकडे होती. हे दोघे अंग्लो इंडियन असून त्यांनी नौनिर्मितीचे प्रशिक्षण ब्रिटनमध्ये घेतले होते. त्यानंतर या गोद्यांवर सरकारची संपूर्ण मालकी प्रस्थापित झाली. याखेरीज बंगाल सरकारने १७९० साली बंकशाल या ठिकाणी नवी गोदी बांधली होती. ती १८ वर्षे वापरात राहिली. १८व्या शतकाच्या शेवटच्या दशकात बंगालच्या सुमारे अर्धा डझन खासगी युरोपीय कंपन्या जहाज–बांधणी उद्योगात मोठ्या प्रमाणावर गुंतल्या होत्या. त्यांच्या स्वतःच्या गोद्या होत्या. पश्चिम भारतात या क्षेत्रामध्ये भारतीय उद्योगपती उतरले होते, परंतु बंगालमध्ये १७५७ पासून १८३६ च्या काळात एकही भारतीय व्यावसायिक या क्षेत्रात आला नव्हता. बंगालमध्ये आपला तळ ठेवून किनारपट्टीशी व चीनशी व्यापार वाढविण्यात युरोपीय लोकांचे हितसंबंध जसजसे अधिकाधिक दृढ होत गेले तसतसा युरोपीय लोकांचा बंगालमधील जहाजबांधणीचा व्यवसाय भरभराटीला येत गेला. १८०० सालापर्यंत जहाजबांधणीच्या क्षेत्रात मुंबई अग्रेसर होती. त्यानंतर ते स्थान कलकत्याला प्राप्त झाले. १७९२ ते १८१५ या काळात इंग्रज व फ्रेंच यांच्यांतील युद्धांच्या दडपणामुळे नौकानयना (navigation) संबंधीचे कायदे बरेच शिथिल झाले होते. त्या वेळी एकूण ३६, ५०० टन वजनाची ७१ सुसज्ज जहाजे कंपनीच्या मुंबई येथील गोद्यांमध्ये

२४. डब्ल्यू. एच्. कॅरे, 'दि गुड ओल्ड डेज ऑफ ऑनरेबल जॉन कंपनी', (न्यू क्विन्स संक्षिप्त आवृत्ती, १९६४, रीप्रिंट कलकत्ता), पृ. ७३.

बांधण्यात आली. (अर्थात भारतीयांच्या मालकीच्या गुजरातमधील गोद्यांमध्ये यापेक्षाही अधिक जहाजे बांधण्यात आली, परंतु त्यांचा एकूण टनभार (टनेज) मात्र खूपच कमी होता.) याच काळात मुंबईच्या गोद्यांत तयार झालेल्या जहाजांच्या तिप्पट टनभाराची जहाजे बंगालच्या गोद्यांमध्ये बांधण्यात आली. तथापि, पश्चिम भारतातील प्रमुख जहाज निर्माते व कुशल कारागीर सामान्यतः गुजराती पारशी असत; तर बंगालमध्ये ते केवळ युरोपीयच असत.

१८ व्या शतकाच्या शेवटच्या दोन दशकांत लंडनबरोबरचा निर्यात व्यापार फार झपाट्याने वाढत होता. त्याचे मुख्य कारण ब्रिटनच्या द्रुतगतीने होणाऱ्या औद्योगीकरणासाठी या निर्यातीची गरज असे हे होय. ही निर्यातवाढ पुढील प्रमाणे होती :–[२५]

| वर्ष | १७७७ | १७८७ | १७९७ | १७९९–१८०० |
|---|---|---|---|---|
| रुपये (लाखांत) | २८ | ७५ | १५१ | ३५० |

काही तुरळक आकडेवारीवरून असे आढळून येते की बंगालच्या अंतर्गत व शेष भारताशी होणाऱ्या व्यापारातही या काळात वाढ होत होती. कॉर्नवालिसने काही अंतर्गत जकाती रद्द केल्या होत्या (अर्थात् काही काळानंतर त्या पुनः बसविण्यात आल्या होत्या). पडीत जमिनी लागवडीखाली आणल्या गेल्यामुळे शेतीचा झपाट्याने विस्तार होत होता आणि व्यापार व कारखाने यांमध्ये वाढत्या प्रमाणावर देशी भांडवल गुंतविले जाऊ लागले होते. या सर्व कारणांमुळे बंगालचा देशांतर्गत व परदेशी व्यापार खूपच वाढला.

१७९८ च्या अखेरीस बंगाली भांडवलदारांमध्ये भरपूर लभ्यांश असणाऱ्या सरकारी कर्जांत पैसे गुंतविण्याची प्रवृत्ती निश्चितपणे निर्माण झाली होती. सरकारी कर्जे, खाजगी गुंतवणूक, देशी व परदेशी व्यापार इत्यादींमध्ये बंगालचे एकूण देशी भांडवल त्या वेळी १६ कोटी रुपयांहून कमी नसावे, असा अंदाज आहे.[२५अ] या दशकामध्ये टिपू सुलतानाशी चालू असलेल्या युद्धाच्या खर्चासाठी बंगालमधून इतर इलाख्यांमध्ये सोन्या–नाण्याचा प्रवाह चालू होता. १७९१ ते १७९८ या काळात वट्टयाचा दर (discount rate) १४ ते २१ टक्के असा कमीजास्त होत राहिला. त्यानंतर कर्जनिवारण निधी (sinking fund) स्थापन करण्यात आला आणि व्यापारात वाढ झाल्याने इंग्लंडहून सोन्यानाण्याचा नवा पुरवठा होऊ लागला. त्याचा परिणाम म्हणून वट्टयाचा दर २ ते ३ टक्के या पातळीवर स्थिर झाला. अशा प्रकारे व्याजाचा दर भयंकर घसरल्यामुळे बंगाली भांडवलदारांच्या वृत्तीत उल्लेखनीय बदल घडून आला. श्री ब्राउन यांनी 'रिपोर्ट ऑन कॉमर्स ऑफ ब्रिटिश इंडिया इन १८०२–३' या अहवालात २८ डिसेंबर १८०४ रोजी असे नमूद केले आहे की,

"त्यांनी आपले लक्ष व्यापाराकडे वळविले आणि आपल्याजवळचा जादा पैसा ब्रिटिश भारतातील वेगवेगळ्या कारखान्यांत व उत्पादनांत गुंतविला. चितगांवसारख्या शहरापासून दिवाण साहेबांच्या अगदी दूरच्या कोपऱ्यांतील राखीव भागांपर्यंत असणाऱ्या प्रत्येक वखारीकडे ते आपला पैसा निःशंकपणे पाठवीत असत. त्यांचे काटकसरीकडे अगदी कडक लक्ष असे. त्यामुळे फार

२५. ए. त्रिपाठी, 'ट्रेड अँड फायनान्स इन दि बेंगॉल प्रेसिडेन्सी, १७९३-१८९३', (कलकत्ता, १९५६), पृ. ८६.

२५अ. एका समकालीन अंदाजाप्रमाणे बंगालच्या स्थानिक लोकांजवळ ३१ जानेवारी १८०१ रोजी असलेल्या सरकारी कर्जरोख्यांची रक्कम १, ८९, ४५, ००० रुपये होती; युरोपीय लोकांजवळच्या कर्जरोख्यांची रक्कम ६, ६९, २०,००० रुपये होती. –सिन्हा, टीप क्र. ६, २, (कलकत्ता, १९६२), पृ. २२३.

थोडया अवधीत त्यांनी बंगाल प्रेसिडेन्सीमध्ये विक्रीची मक्तेदारी मिळविली. व्यापाराच्या या फायदेशीर शाखेत आतापर्यंत युरोपीय लोकांची मक्तेदारी होती. ती त्यांना सोडावी लागली; आणि म्हणून आता त्यांना आपल्या जहाजात व्यापारी माल भरण्याचे काम त्यांच्याकडून करवावे लागते. कारण स्थानिक व्यापारी दरसाल दर शेकडा १० टक्क्यांपेक्षा केवढाही जास्त नफा झाला तरी तो व्यापार फायद्याचा झाला असे समजतात."

व्यापारामध्ये गुंतवणूक करण्याच्या बाबतीतील या आकस्मिक उत्साहाचे कौतुक करून सदर अहवाल पुढे म्हणतो,

"पूर्वी भित्रेपणाने वागणारा हिंदू आता दूरदूरच्या सफरींसाठी जहाजावरील मालाच्या तारण गहाणखतावर (at respondentia) पैसे कर्जाऊ देतो, बंगालच्या वेगवेगळ्या भागांत वायद्याचे व्यवहार करतो आणि वेगवेगळया विमा कचेऱ्यांमधील हमीदार म्हणून बंगालच्या विभिन्न भागांत निळीचे कारखाने उभारतो. सर्वसामान्य युरोपीय व्यापाऱ्यांप्रमाणे व्यापारविषयक तत्त्वे व ब्रिटिश कायदे याचीही त्याला चांगली माहिती असते."

व्यापारामध्ये धोका पत्करणे आणि आपले भांडवल तुलनात्मक दृष्टया दीर्घकाळपर्यंत ज्यांत गुंतून राहाण्याची शक्यता आहे अशा वस्तूंच्या साठयांत त्याची गुंतवणूक करणे, असा जो हा बदल घडून आला तो पुनरुस्थित अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने ऊल्लेखनीय होता. उदाहरणार्थ, १७९८ पूर्वी ३० हजार पौंडाची गुंतवणूक करू इच्छिणाऱ्या परदेशी जहाजाला तेवढया किंमतीचा माल मिळविण्यासाठी बरेच दिवस थांबावे लागत असे. परंतु आता १० लाख पौंड किंमतीचा माल देशी व्यापाऱ्याकडे केव्हाही तयार मिळू लागला. ३०० टनी जहाजाला लागणारा माल २० ते ३० दिवसात भरला जाऊ लागला. लहानलहान व्यापारीही आपला माल सामुदायिक साठ्याच्या रूपात ठेऊ लागले. त्यामुळे त्यांना कलकत्याच्या बाजारात त्याची विक्री करिता येऊ लागली. पुष्कळ वेळा कापडाच्या १०० ठाणांची एक गाठ ८ ते १० वेगवेगळया लोकांच्या समाईक मालकीची असे. बहुधा हे व्यापारी स्वतःच उत्पादक असत आणि आपापली ठाणे एकत्र करून गाठ बनवीत. ही स्थिती अठराव्या शतकाच्या अखेरीस होती. विणकर स्वतःच छोटा व्यापारी भांडवलदार बनू शकेल अशी शक्यता या वेळी दिसून येऊ लागली होती. या पतिस्थितीवर अंतर्गत व बाह्य अशा दोन्ही गोष्टींचा प्रभाव पडलेला होता.

१७९३ साली कायमधारा पद्धती चालू झाली आणि निळीचा उद्योगही सुरू झाला. या दोन्ही घटनांचा, त्यांच्या प्रारंभिक काळापासून सुमारे १८३३ पर्यंत, पडीत जमिनींच्या लागवडीच्या कामी चांगला उपयोग झाला. जंगले तोडून शेतजमीन तयार करण्यासाठी खूप मोठ्या भांडवलाची गुंतवणूक करावी लागणार होती. ते भांडवल या दोन मार्गांनी उपलब्ध झाले. याचा आणखी एक फायदा असा झाला की परदेशी बाजारपेठांत भारताच्या कापडाची मागणी घटल्यामुळे जी बेकारी निर्माण झाली होती तिलाही तोंड देता येणे शक्य झाले. हस्तव्यवसायांतील काही कामगार व भांडवल, पडीत जमिनी लागवडीखाली आणण्याच्या कामी वापरण्यात आल्यामुळे अन्नधान्ये व व्यापारी पिके यांच्या उत्पादनात हळूहळू वाढ होऊ लागली. १७९९ साली बंगालमधून समुद्रमार्गाने होणारी धान्य-निर्यात ४५ हजार टन होती. आधल्या वर्षापेक्षा ही निर्यात १५ हजार टनांनी जास्त होती. धान्याची निर्यात आणखी वाढणार हे उघड होते. अशा प्रकारे सर्व बाजूंनी भरभराट किंवा उत्पादनवृद्धी (buoyance) होत असूनही चलनवाढ किंवा भाववाढ मात्र (inflation) झाली नव्हती. श्री ब्राउन हे आपल्या सप्टेंबर १८०० मध्ये लिहिलेल्या

'कमर्शियल रिपोर्ट फॉर १७९९' या अहवालात म्हणतात. "स्थानिक लोक वापरीत असलेल्या तांदळाच्या व इतर खाद्य वस्तूंच्या किमतींत वाढ होण्याऐवजी गेल्या दहा वर्षांत सरासरीने त्यांचे भाव खूपच खाली राहिले. कंपनीला दिवाणी मिळाल्यापासून यापूर्वी हे भाव इतके खालच्या पातळीवर कधीच राहिले नव्हते."[२६]

चलनवाढ किंवा भाववाढ न होता उत्पादनात 'वाढ' होण्याचा हा जो चमत्कार घडून आला त्याचा संभाव्य खुलासा मी येथे देण्याचा प्रयत्न करतो. इंग्लंडला खंडणी म्हणून अथवा 'चांगल्या सरकारची आयात करण्यासाठी द्यावयाची किंमत' म्हणून बंगालमधून दरसाल सुमारे २ कोटी रुपये इंग्लंडला पाठवावे लागत. त्यासाठी निर्यातयोग्य अतिरिक्त मालाची गरज वाढत्या प्रमाणावर भासणे स्वाभाविक होते. शिवाय दुष्काळानंतरच्या काळात आर्थिक घडामोडींची जी पातळी पार रसातळाला गेली होती तिला वर काढणे आवश्यक होते. कंपनीच्या अधिकाऱ्यांना खासगी व्यापारात भाग घेण्याची सार्वत्रिक बंदी करण्याचे धोरण, १७९४ पासून मर्यादित काळा-पर्यंत नौकानयन कायद्यात करण्यात आलेली शिथिलता, आणि ब्रिटनला पैसे पाठविण्याचे एक साधन म्हणून कापडाऐवजी इतर वस्तूंची निर्यात करावी लागेल याची सरकारला झालेली जाणीव, या सर्व गोष्टींमुळे व्यावसायिक साहसाला अनुकूल असे नवे वातावरण निर्माण झाले. अर्थात् हे वातावरण दीर्घकाळ टिकणार नव्हते हे उघड आहे.

ब्रिटनमध्ये अन्नधान्याचा तुटवडा पडणार या आशंकेने सरकारने १७९४ साली काही अटींवर भारतात बांधलेल्या जहाजांना इंग्लंडला धान्य घेऊन जाण्याची व तिकडून माल आण-ण्याची परवानगी दिली. इंग्रज व फ्रेंच यांच्या युद्धामुळे जहाजांचा तुटवडा निर्माण झाला होता. यामुळे १७९८ साली ही सवलत कलकत्त्याच्या सर्वच मुक्त व्यापाऱ्यांना देण्यात आली. या सवल-तीनुसार हे व्यापारी भारतीय बांधणीच्या जहाजांतून ग्रेट ब्रिटनशी आयात-निर्यात व्यापार करू लागले. शेख गुलाम हुसेन यांचे एक जहाज सेंट हेलेना बेटाला माल घेऊन जाण्यासाठी १८००-१८०१ या वर्षी कंपनीने भाड्याने घेतले होते. सुरुवातीला अनाथ स्थितीत वसुली कारकून म्हणून काम करणाऱ्या व हळूहळू लक्षाधीश बनलेल्या रामदुलाल दे (१७५२-१८२५) या गृहस्थांना त्यांचे 'डेव्हिड क्लार्क' हे जहाज माल्टाला पाठविण्याची परवानगी देण्यात आली होती.[२७] त्यांच्या आधीचे बंगाली जहाजमालक अक्रूर दत्त व मदन दत्त, पांचू दत्त व राम गोपाल मल्लिक हे होते. यांपैकी अक्रूर व मदन दत्तांचा उल्लेख पूर्वी आलाच आहे. १८२३ च्या सुमारास देवी प्रसाद घोष या आणखी एका बंगाली जहाज-मालकाचा उल्लेख आढळतो. त्यांच्या 'मेरोप' नावाच्या २९८ टनी जहाजाच्या कप्तानाचे नाव जी. पार्किन्स असे होते. हे जहाज चीनशी व्यापार करण्या-

---

२६. "(ईस्ट इंडिया अफेअर्स) प्रायव्हेट ट्रेड एक्स्ट्रॅक्टस फ्रॉम... ...दि रिपोर्टर ऑफ एक्स्टर्नल कॉमर्स इन बेंगॉल, फ्रॉम दि इयर १७९५......' (हाउस ऑफ कॉमन्स, टु बी प्रिंटेड ३० एप्रिल १८१२), पृ. ९.

कोलब्रुक यांनी बंगाल इलाख्यातील सर्वांत अधिक स्वस्ताई व महागाई असलेल्या प्रांतांची तुलना करून, वेगवेगळ्या मार्गांनी धान्यांच्या सरासरी किंमतींचा अंदाज काढला होता. त्या अंदाजानुसार तांदूळ, गहू व सातु (बार्ली) यांचा भाव दर मणास रु. ०-७५ (बारा आणे) होता. 'रिमार्क्स ऑन दि हजबंड्री अँड इंटर्नल कॉमर्स ऑफ बेंगॉल' (सेकंड प्रिंट, १८०६), पृ. २४.

२७. एस्. बी. सिंग, 'युरोपियन एजन्सी हाउसेस ऑफ बेंगॉल', (कलकत्ता, १९६६), पृ. १३४.

साठी वापरले जाई.[२८] तथापि, आपण हे विसरता कामा नये की, १८ व्या शतकाच्या अखेरीस समुद्रमार्गाने होणाऱ्या बंगालच्या व्यापारापैकी (त्यामध्ये कंपनीच्या व्यापाराचाही समावेश होता.) फक्त १० ते १५ टक्के व्यापार बिगर युरोपीय लोकांच्या हातात होता, आणि चालू स्थितीत बदल घडवून आणण्याच्या प्रयत्नाला नुकतीच कोठे सुरुवात झाली होती. बंगाली लोक खुद्द आपल्या प्रदेशातही सागरी व्यापार व जहाजबांधणी या क्षेत्रांमध्ये गुजरात्यांच्या खूप मागे होते. १७९७ साली कलकत्ता–लंडन निर्यात व्यापारात वेगवेगळ्या जमातींचा किती भाग होता ते टक्केवारीप्रमाणे पुढील कोष्टकात दाखविले आहे.[२९]

| कंपनी | खासगी व्यापारी | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | अमेरिकन | ब्रिटिश | पोर्तुगीज | फ्रेंच व डेन | | एकूण युरोपीय |
| ५३.६ | १६.२ | ६.९ | ५.९ | २.५ | = | ८५ |

| | आर्मेनियन | तेलंगी | अरब | बंगाली हिंदू | पारसी | मुसलमान | | एकूण भारतीय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ५.७ | ३.० | १.९ | १.८ | १.७ | १.१ | = | १५ |

या आकडेवारीवरून उपलब्ध होणारे चित्र उद्बोधक आहे. गुजराती पारशी जेवढा व्यापार करीत जवळजवळ तेवढाच बंगाली हिंदू करीत. तथापि, त्या वर्षात बंगालमध्ये राहणाऱ्या गुजराती पारशांच्या मालकीची जहाजे बंगाल्यांच्या मालकीच्या जहाजांपेक्षा संख्येने अधिक होती असे स्पष्टपणे आढळून येते. कलकत्यातील सर्वांत मोठे भारतीय जहाजमालक दोराबजी बैरामजी हे होते. त्यांच्या मालकीची ६ जहाजे १८०६ साली होती. १७९३ साली त्यांच्या एका जहाजाचे अधिपती कॅप्टन ईस्टविक हे होते. गुजराती मुसलमान व अरब हे आशियाई समुद्रांत १८ व्या शतकाच्या मध्यापर्यंत पुष्कळच महत्त्वाच्या स्थानावर होते. निदान पारशी व बंगाली व्यापाऱ्यांपेक्षा तरी त्यांचे महत्त्व खूपच अधिक होते. परंतु १७९७ च्या सुमारास कन्याकुमारीच्या पूर्वेकडील भागात त्यांचे महत्त्व जवळजवळ संपुष्टात आले होते. या वेळी पारशी लोक–त्यांच्यापैकी काहीजण कलकत्यात राहाणारे होते–चीनशी चालणाऱ्या लाभदायक व्यापारात वाढत्या प्रमाणावर सहभागी होऊ लागले होते.

बंगाली लोकांची प्रकृती सागरी व्यापाराला फारशी अनुकूल नव्हती. बंगाली बाबूंच्या मालकीची काही थोडी जहाजे होती आणि त्यांचे परदेशांशी व्यापारी संबंधही होते हे खरे; परंतु समुद्रपर्यटन हे त्या काळी निषिद्ध मानण्यात आलेले असल्यामुळे असो अथवा त्यांच्यांतील साहसाच्या अभावामुळे असो, ते खुद्द आपल्या जहाजांतूनही परदेशांत जात नसत. कोणत्याही गुजराती व्यापारी जमातीच्या बाबतीत ही स्थिती नव्हती. राजा राममोहन राय यांच्या आधी शंभर वर्षांपूर्वी एक पारशी गृहस्थ आपल्या कुटुंबासह इंग्लंडला गेले होते आणि सुमारे एक वर्ष तेथे राहून परत आले होते. मधल्या शतकामध्ये अनेक पारशी चीनला जाऊन आले. तथापि, बंगाली लोक व्यापाराच्या व आर्थिक दृष्ट्या महत्त्वपूर्ण असणाऱ्या इतर क्षेत्रांमध्ये पुढे येत होते. १७८४ साली

२८. एच्. आर्. घोषाळ, 'एकॉनॉमिक ट्रॅन्झिशन इन दि बेंगॉल प्रेसिडेन्सी, १७९३–१८३३', (दुसरी आवृत्ती, कलकत्ता १९६६), पृ. २९७.

२९. त्रिपाठी, टीप क्र. २५, यांच्या पुस्तकातील आकडेवारीवरून (पृ. ८६–८७) तयार केलेले कोष्टक.

एशियाटिक सोसायटी ऑफ बेंगॉल या संस्थेची स्थापना झाली. ख्रिस्ती धर्मप्रचारकांनी धर्म-प्रसाराबरोबरच नव्या पद्धतीचे शिक्षण देण्यासही सुरुवात केली आणि याच सुमारास छापखानेही सुरू झाले. या सर्व घटनांमुळे बंगाली लोक पाश्चात्यीकरणाच्या प्रक्रियेत सहभागी होत गेले. श्रीरामपूर येथील डॅनिश मिशनच्या टाइप फाउंड्रीमध्ये (१८००) चार्लस विल्किन्स यांचे बंगाली टाइप बनविण्याचे प्रयोग यशस्वी झाले. या कामी त्यांना पंचानन कर्मकार (मृ. १८०३-४) या बंगाली लोहाराच्या कौशल्याची चांगली मदत झाली. १८व्या शतकाच्या अखेरीस मुंबई व मद्रासप्रमाणे कलकत्त्यामध्येही इंग्रजीच्या कामचलाऊ ज्ञानाची वाढती मागणी पुरी करण्यासाठी अनेक खासगी शाळा सुरू करण्यात आल्या.[३०]

गुजराती मुद्राक्षरे (टाइप) तयार होण्याच्या सुमारे १२ वर्षे आधी बंगाली मुद्राक्षरे तयार करण्यात आली होती. तरी पण गुजराती मुद्राक्षरांची निर्मिती ही दोन दृष्टींनी अधिक उल्लेखनीय होती. १७ व्या शतकात भीमजी पारीख नावाच्या गुजराती बनियाने गुजराती मुद्राक्षरे तयार करण्याचा प्रयत्न केला होता. त्याचा एव्हाना लोकांना विसरही पडला होता. त्याचे ते स्वप्न आता साकार बनले होते. भीमजी पारीखने गुजराती मुद्राक्षरांच्या साह्याने एक छापखाना चाल-विण्याचा १६७० ते १६७८ या काळात सातत्याने प्रयत्न केला होता. परंतु त्याला ईस्ट इंडिया कंपनीची सहानुभूती प्राप्त असूनही त्यात यश आले नव्हते. दुसरी गोष्ट अशी की, मुंबईच्या जीजीभाई छापागर यांनी जेव्हा गुजराती मुद्राक्षरे तयार केली तेव्हा त्यांना युरोपीय मार्गदर्शनाची मुळीच गरज भासली नाही. छापखानेवाल्यांच्या सचित्र नियतकालिकांतून आणि इंग्रजी मुद्राक्षरे कशी ओतली जातात हे पाहून त्यांनी ते ज्ञान प्राप्त केले होते.[३१]

लोकांच्या प्रवृत्तींमधील या फरकांचे स्पष्टीकरण जातीय विधिनिषेधांच्या आधारे होऊ शकत नाही, गुजराती पारशी जमातही खूपच एकजिनसी व अप्रसरणशील जमात होती. ते लोक बिगर पारसी लोकांच्या पंक्तीला बसून जेवत नसत किंवा त्यांनी शिजविलेले अन्नही खात नसत. त्यांच्यामध्ये व्यवसाय निवडण्याचे स्वातंत्र्य पुष्कळच होते, अशी जी सामान्य समजूत आहे, तीही खरी नाही. उदाहरणार्थ, ज्या उद्योगात अग्नीचा वापर असेल तो उद्योग करण्यास धर्मानेच त्यांना मनाई केलेली होती. तरीही विसाव्या शतकाच्या सुरुवातीस भारताचा पहिला आधुनिक धातुशास्त्रीय उद्योग स्थापन करण्याचे श्रेय एका पारशी धर्मगुरूच्या कुटुंबातून पुढे आलेल्या व्यक्तीकडेच जाते. माझ्या या निबंधात या तपशीलांकडे दुर्लक्ष करण्यात आलेले नाही. याचे कारण असे की, त्यांच्यावरून भारतीय उद्यमशीलतेच्या प्रादेशिक प्रतिमानांतील फरक सूचित होतात.

१९व्या शतकापासून छापखान्यांचे युग सुरू झाले आणि १८२७ साली कलकत्त्याच्या हिंदू कॉलेजची स्थापना होण्यापूर्वीही बंगालमध्ये इंग्रजी शिक्षणाचा अरुंद परंतु भक्कम पाया घातला गेला होता. अनुकूल परिस्थिती निर्माण झाल्यास जपानमध्ये राजसत्तेची पुनःस्थापना होण्यापूर्वी 'डच शिक्षणा' च्या बाबतीत जे घडले तसेच येथेही घडण्याची पूर्ण शक्यता होती. स्वयंशिक्षित

---

३०. कॅरे, टीप क्र. २४. पृ. १७४-५. पहिली मिशनरी शाळा दिनाजपूर येथे विल्यम कॅरे यांनी १७९४ साली स्थापन केली होती. १८१७ पर्यंत श्रीरामपूरच्या बॅप्टिस्ट मिशनऱ्यांनी १५० शाळा काढल्या होत्या. त्यांमध्ये १० हजार विद्यार्थी शिकत होते.

३१. अ. का. प्रियोळकर, 'दि प्रिंटिंग प्रेस इन इंडिया', (मुंबई, १९५०).

राममोहन राय (१७७४–१८३३) हे एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभी उफाळून आलेल्या पाश्चात्य ज्ञानाविषयीच्या लालसेचे प्रतीक होते. त्यांनी १८०९ ते १८१५ या काळात युरोपीय विचारांतील आधुनिकतम प्रवृत्ती आत्मसात केल्या, एवढेच नव्हे तर नंतरच्या काळात त्यांनी त्या विचारांमध्ये, अत्युच्च पातळीवर भरही घातली. रामकमल सेन (१७८३–१८४४) हेही स्वयं-शिक्षित होते. त्यांनी आपले इंग्रजी शिक्षण १८०१ साली सुरू केले. त्यांनी हिंदुस्तानी प्रेसमध्ये एक कंपॉझिटर म्हणून कामाला सुरुवात केली. त्या वेळी त्यांना दरमहा सुमारे १० रुपये पगार मिळत असे. परंतु हळूहळू स्वतःच्या परिश्रमांच्या जोरावर त्यांनी आपल्या काळातील एक मान्य-वर विद्वान् म्हणून ख्याती मिळविली. सप्टेंबर १८१९ मध्ये स्थापन झालेल्या ज्या ॲग्री–हॉर्टि-कल्चरल सोसायटीने शास्त्रीय ज्ञानाच्या प्रसारामध्ये अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावली, त्या संस्थेचे ते एक संस्थापक–सभासद होते. एवढेच नव्हे तर सरकारने नियुक्त केलेल्या चहा–समिती-चेही ते सभासद होते. १८३० नंतर आसाममध्ये चहाची लागवड सुरू करून ती यशस्वी कर-ण्याचे श्रेय या समितीला आहे. सेन यांनी संपादिलेला ७०० पृष्ठांचा इंग्रजी–बंगाली शब्दकोश हा या क्षेत्रातील बंगालमधील सुरुवातीच्या प्रयत्नांपैकी एक प्रयत्न होता. राधाकांत देव (१७८४–१८६७) यांना सेंट पीटर्सबर्गच्या अकादमी ऑफ सायन्सेस या संस्थेचे सन्माननीय सभासदत्व बहाल करण्यात आले होते. त्यांनी आणि द्वारकानाथ टागोर (१७९४–१८४६) यांनी हिंदू कॉलेज स्थापन होण्यापूर्वी इंग्रजीचे शिक्षण खासगी शाळांमधून मिळविले होते.

**भांडवलशाहीचा प्रारंभ :**

आता आपण राममोहन व द्वारकानाथ यांचे युग असलेल्या एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात पूर्व भारतामध्ये भांडवलशाहीचा उदय कसा झाला याचे थोडक्यात सिंहावलोकन करू. राममोहन व द्वारकानाथ हे दोघेही परंपरागत खानदानी जमीनदारांचे वंशज होते आणि त्यांना वैदिक एकेश्वरवादाविषयी कितीही आकर्षण वाटत असले तरी ऐहिक जीवनाविषयीचे त्यांचे प्रेम किंचितही कमी नव्हते. त्यांच्या वैभवाचे मूलस्रोत शोधून काढण्याची आपल्याला काही गरज नाही, परंतु प्राथमिक धनसंचयाची प्रक्रिया त्या वेळीही चालू होती एवढे खरे. आपल्या दृष्टीने महत्त्वाचा मुद्दा हा आहे की त्यांनी आपला वेळ, उत्साह व पैसा, व्यावसायिक साहसाचे वातावरण पसर-विण्याच्या बाबतीत कसा कारणी लावला ? राममोहन हुशार होते. त्यांनी जमीनदारी विकत घेतली आणि १७९७ ते १८१५ या काळात युरोपीय खासगी व्यापाऱ्यांना पैसा कर्जाऊ देण्याचा व्यवसाय केला. जमीनदार या नात्याने त्यांना निश्चित प्राप्ती होत होती व आर्थिक सुरक्षितताही लाभलेली होती. यामुळे आधुनिक कल्पनांचा प्रचार व प्रसार करण्याच्या कामी ते आपला सर्व वेळ देऊ शकले. त्यांनी आपल्या जवळच्या भांडवलापैकी काही पैसा अनेक नियतकालिके काढण्याच्या कामी लावला. तसेच त्यांनी ॲंग्लो हिंदू स्कूल नावाची संस्थाही स्थापन केली.

द्वारकानाथ टागोर यांनी मिठाची दलाली व वकिली या व्यवसायांत भरपूर पैसा मिळ-विल्यानंतर आपल्या वडिलार्जित जमीनदारीत भर घातली. परंतु त्याच वेळी त्यांनी अनेक धोक्याच्या, आधुनिक व्यवसायांमध्येही पैसा गुंतविला. त्यांनी भारतातील पहिल्या व्यवस्थापक मंडळीची (managing agency firm) स्थापना केली. त्या मंडळीचे नाव ' कार, टॅगोर ॲंड कंपनी ' (१८३४–४८) असे होते. ते स्वतः त्या कंपनीचे मुख्य सावकार व सर्वांत मोठे भागी-दार होते. कंपनीच्या भागभांडवलापैकी ५६$\frac{1}{4}$ टक्के भांडवल त्यांच्या मालकीचे होते. या कंपनीत भारतीय व ब्रिटिश लोकांची भागीदारी होती. १८३६ ते १८४६ या काळात या कंपनीने सहा

संयुक्त भांडवल कंपन्या काढल्या. त्या सर्वांमध्ये भारतीय व ब्रिटिश लोकांची भागीदारी होती. 'दि युनियन बँक' (१८२९–१८४७) आणि 'कलकत्ता स्टीम टग असोसिएशन' (एका समकालीन पत्रकाराने हिचे वर्णन 'ठग असोसिएशन' असे केले होते ! 'टग' म्हणजे खेचहोडी, इतर नावांना ओढून नेणारी आगबोट) या दोन संस्था बव्हंशी त्यांच्याच पूर्ण नियंत्रणाखाली होत्या. १८३६ साली कार, टॅगोर अँड कंपनीला बेंगॉल मरीन बोर्डाकडून गंगेच्या काठी जागजागी दगडी कोळशाच्या वखारी स्थापन करण्याचे कंत्राट मिळाले. या वेळी गंगेतून होणारी आगबोटींची वाहतूक सरकारमार्फत केली जात असे. ही जबाबदारी पार पाडण्यासाठी कंपनीने बरद्वान, राणीगंज व पाचेत या ठिकाणी कोळशाच्या खाणी खरेदी केल्या. पुढे द्वारकानाथांच्या पुढाकाराने १८४४ साली बेंगॉल कोल कंपनीची स्थापना झाली. कोळशाच्या खाणीचे ते एक प्रकारचे एकत्रीकरणच होते. त्यामध्ये युरोपीय खाणमालकही सामील झाले. द्वारकानाथ क्रांतदर्शी होते, परंतु एवढ्या मोठ्या कंपन्या चालविण्यासाठी लागणारे भांडवल त्यांच्याजवळ नव्हते. त्यामुळे आपोआपच या कंपन्यांचे नियंत्रण त्यांच्या हातातून निघून युरोपीय लोकांकडे गेले. चहाच्या बाबतीतही संयुक्त भांडवल कंपनी स्थापन करण्याच्या दिशेने पहिली पावले टाकणारी कार, टॅगोर अँड कंपनीच होती. त्याच सुमारास लंडनच्या चहा व्यापाऱ्यांनीही या बाबतीत उत्सुकता दाखविली. परिणामतः काही अंशी भांडवलाच्या अपुरेपणामुळे व काही अंशी सरकारच्या हस्तक्षेपामुळे कलकत्ता व लंडन येथील हितसंबंधी लोक एकत्र आले आणि त्यांनी १८३९ साली 'दि आसाम कंपनी' या संस्थेची स्थापना केली. या कंपनीच्या भागधारकांमध्ये किमान २९ भारतीय होते. त्या सर्वांजवळ मिळून २७५ भाग होते. हीच गोष्ट १८४४ साली स्थापन झालेल्या 'दि इंडियन जनरल नॅव्हिगेशन अँड रेलवेज कंपनी' च्या बाबतीतही घडली. या तीन्ही कंपन्यांच्या स्थापनेमध्ये द्वारकानाथांनी खूप सक्रिय भाग घेतला होता. परंतु त्यांच्यावर नियंत्रण मात्र अखेरपर्यंत युरोपीय लोकांचेच राहिले.[३२]

या संयुक्त भांडवल कंपन्यांच्या व्यतिरिक्त द्वारकानाथांनी आपल्या खासगी मालकीची कुमारखाली सिल्क फॅक्टरी, साखर कारखाना, निळीचा कारखाना व अनेक नियतकालिके यांमध्येही भांडवलाची गुंतवणूक केली होती. १८३७ साली सी. आर. प्रिन्सेप यांनी ऑस्ट्रेलिया व भारत यांच्या दरम्यान वाहतूक करण्यासाठी जेव्हा ऑस्ट्रेलियन असोसिएशन नावाची कंपनी स्थापन केली तेव्हा प्रसन्नकुमार टागोर (१८०३–१८६८) व मतिलाल सील (१७९१–१८५४) यांच्याबरोबर द्वारकानाथही तिचे सभासद बनले होते ही गोष्ट लोकांना फारशी माहित नाही.[३३] कलकत्ता ते सुवेझ अशी नियमित आगबोट वाहतूक सुरू करणे कितपत शक्य आहे याचा शोध घेण्यासाठी १८४२ साली स्थापन करण्यात आलेल्या 'प्रिकर्सर स्कीम कमिटी'च्या संस्थापनेत व

---

३२. बी. बी. क्लिंग, 'दि ओरिजिन ऑफ दि मॅनेजिंग एजन्सी सिस्टिम इन इंडिया', 'जर्नल ऑफ एशियन स्टडीज', २६, अंक १, (नोव्हेंबर १९६६), पृ. ३७–३८; एच्. टी. बर्नस्टीन, 'स्टीम बोटस् इन दि गँजिस : ॲन एक्स्प्लोरेशन इन दि हिस्टरी ऑफ इंडियाज मॉडर्नायझेशन थ्रू सायन्स अँड टेक्नॉलॉजी' (कलकत्ता, १९६०) पृ. ११६ व १६९–७०. आसाम कंपनीच्या भागधारकांमध्ये द्वारकानाथ टागोर, प्रसन्नकुमार टागोर, राधाकांत देव, मतिलाल सील, प्राणकृष्ण लाहा वगैरे मंडळी होती.

पाहा : १८४५ चा कायदा क्र. १९, कलम १.

३३. ए. सी. स्टॅपल्स, 'दि प्रिन्सेप इस्टेट इन वेस्टर्न ऑस्ट्रेलिया', इन 'अर्ली डेज' (जर्नल ऑफ दि वेस्टर्न ऑस्ट्रेलियन हिस्टॉरिकल सोसायटी, पर्थ), ५, भाग १, १९५५, पृ. १६–३०.

तिला उदारपणे आर्थिक मदत करण्यात कलकत्त्याच्या ९ युरोपीय नागरिकांबरोबर ज्या ३ भारतीयांनी भाग घेतला होता त्यांमध्येही द्वारकानाथ होते.

दर्पनारायण टागोर यांचे नातू व द्वारकानाथांचे चुलत-चुलत बंधू प्रसन्नकुमार यांच्या तरुणपणी 'रिफॉर्मर' नावाचे एक सुधारणावादी नियतकालिक त्यांच्या मालकीचे होते. त्यांनी तेलघाण्या स्थापन करण्यामध्येही थोडाफार पुढाकार घेतला आणि आपल्या वडिलार्जित जमीनदारीत निळीचा कारखाना चालविण्याचेही मनापासून प्रयत्न केले. ६००० बिघे जमीन निळीच्या उत्पादनासाठी उपलब्ध असलेली त्यांची इस्लामपूर इंडिगो फॅक्टरी ही सुरुवातीला युरोपीय लोकांच्या भागीदारीत चालू होती. परंतु नंतर तिच्यावर त्यांची संपूर्ण मालकी प्रस्थापित झाली. त्या वेळी तिचे भांडवल अंदाजे ६२ हजार रुपये होते. १८६० सालच्या नीळ चौकशी मंडळाला (इंडिगो कमिशनला) प्रसन्नकुमार यांनी असे सांगितले की, "निळीचा कारखाना फायद्यात चालवावयाचा असेल तर कामगारांची अमानुष पिळवणूक केल्याशिवाय भागणार नाही. तसे करणे फक्त युरोपीय लोकांनाच जमेल. म्हणून मी माझा कारखाना १८५६-७ मध्येच बंद करून टाकला. निळीची लागवड बंद करण्यात आली तर एक बिघा देखील जमीन वाया जाईल, असे मला वाटत नाही." प्रसन्नकुमार हे १८३९ ते १८४१ या काळात आसाम कंपनीच्या कलकत्ता बोर्डावरील एक संचालकही होते.

निळीची लागवड करणारे अनेक प्रमुख बंगाली मळेवाले होते. परंतु युरोपीय मळेवाले जसे या लागवडीचे समर्थन करीत असत तसे ते करीत नसत, उलट ते त्या पद्धतीचा तीव्र धिक्कार करीत. याचा अर्थ असा की, एखादा भांडवलदार जेव्हा आपले भांडवल एखाद्या धंद्यात गुंतवितो तेव्हा नफेबाजीखेरीज इतरही काही हेतू त्याच्या मनात असतात. जयपाल चौधुरी या जमीनदार-मळेवाल्यांच्या मालकीचे निळीचे ३२ कारखाने त्यांच्या स्वतःच्या जमीनदारीत होते, आणि इतर ९ कारखान्यांत त्यांचे भाग (शेअर्स) होते. निळीच्या व्यवसायाची चौकशी करणाऱ्या मंडळासमोर साक्ष देतांना त्यांनी असे सांगितले की, "निदान गेल्या वीस वर्षांत तरी एकूण एक शेतकरी (कुळे) निळीची लागवड करण्यास तयार नसत. परंतु त्यांच्यावर जुलूम व अत्याचार करून त्यांना तसे करण्यास भाग पाडण्यात आले. त्यांना गोदामांतून डांबून ठेवण्यात आले, त्यांची घरे जाळण्यात आली, त्यांना मारहाण करण्यात आली, आणि अशाच प्रकारचे जुलूम त्यांच्यावर करण्यात आले." उत्तरपारा येथील जमीनदार, मळेवाले व सावकार असणारे जयकृष्ण मुखर्जी यांच्या मालकीचे ४ लहान कारखाने हुगळी जिल्ह्यात होते. युरोपीय मळेवाल्यांचे शत्रू असलेल्या रामरतन रायांचे बंधू हरनाथ राय हे जेसोरचे जमीनदार होते. त्यांच्या मालकीचे ३० कारखाने फरीदपूर, जेसोर व पबना या जिल्ह्यांत होते. त्यांच्याजवळ असलेल्या जमिनीपैकी सुमारे १९ हजार बिघे जमिनीत निळीची लागवड होत असे. आपल्या कारखान्यांची व्यवस्था पाहण्यासाठी त्यांनी एक युरोपीय व्यवस्थापक व पाच युरोपीय मदतनीस यांची नेमणूक केली होती. शांतिपूरचे जमीनदार उमेशचंद्र राय यांच्या मालकीचा एक लहान कारखाना पूर्णियामध्ये होता आणि नादिया जिल्ह्यात युरोपीय लोकांच्या भागीदारीत त्यांचे ३ कारखाने होते. त्याच्याही आधी आणखी काही उल्लेखनीय मळेवाले विद्यमान होते. ते असे:– कालीनाथ राय चौधुरी हे मोठे जमीनदार व राममोहन राय यांचे समकालीन होते. शिवराम संन्याल यांनी स्वतःचे किंवा युरोपीय लोकांचे हमीदार म्हणून २४ कारखाने चालविले होते. सुवर्णवणिक जातीचे सावकार मथुरा मोहन सेन यांच्या मालकीचे ७ कारखाने जेसोरमध्ये होते. यांची पेढी १८२७ साली

बुडाली. तसेच उदितचंद्र पाल व कमल लोचन बसाक हेही मोठे मळेवाले होते. अर्थात, नीळ-उद्योगातील बंगाली लोकांचा हिस्सा फार मोठा होता असे मात्र यावरून समजण्याचे कारण नाही. उदाहरणार्थ, १८५८–५९ साली निर्यातीसाठी तयार करण्यात आलेल्या उत्तर भारतातील निळीच्या उत्पादनापैकी ८९.६ टक्के भागावर युरोपीय लोकांचे नियंत्रण होते आणि फक्त १०.४ टक्के भाग भारतीयांच्या नियंत्रणाखाली होता. या भारतीयांपैकी बहुतेक बंगाली होते. निळीची अंतर्गत बाजारपेठ अगदीच नगण्य होती. निळीच्या एकूण उत्पादनापैकी जेमतेम ६ टक्के नीळ भारतात खपत होती.

निळीच्या लागवडीत खूप वाढ झाली यात मात्र शंका नाही. क्षेत्रफळाच्या दृष्टीने ही वाढ १८०० ते १८१५ या काळात दुप्पट झाली आणि त्यात खूप मोठे चढउतार झाले तरी १८५७ पर्यंत ती या वाढलेल्या पातळीवरच राहिली. ही वाढ मुख्यतः ब्रिटिश लोकांच्या खासगी पुढाकारानेच झाली असली तरी सहकारी अर्थसाहाय्य आणि जमीनदारांचे व शेतकऱ्यांचेही सहकार्य याचा वाटाही त्यात काही कमी नव्हता. रिकार्ड्स (१८३१) यांच्या मताप्रमाणे नीळ उत्पादनाचा फार मोठा भाग—बंगाल प्रांतात अंदाजे २० हजार पेट्या – " केवळ स्थानिक लोकांनीच पिकविलेल्या व तयार केलेल्या मालाचा होता. हा माल त्यांनी कलकत्त्याच्या इतर स्थानिक लोकांना पाठविला होता." अवध या देशी संस्थानातही मळेवाल्यांव्यतिरिक्त शेतकऱ्यांनीही आपापल्या शेतात नीळ पिकविण्यास सुरुवात केली होती. त्यांच्या मालाची प्रत चांगलीच सुधारलेली होती. तथापि, फार थोडे भारतीय व्यापारी युरोपला प्रत्यक्षपणे निळीची निर्यात करीत असत.

इतके सारे विवेचन केल्यानंतरही बंगालच्या सर्वसामान्य आर्थिक उन्नतीला निळीच्या लागवडीमुळे फारसा हातभार लागला असे म्हणता येत नाही. निळीच्या उद्योगाचे लाभदायक परिणाम सिद्ध करण्यासाठी ए. त्रिपाठी हेत्वारोपात्मकपणे आपल्या विधानाच्या समर्थनार्थ राम मोहन राय यांचे एक विधान उद्धृत करतात. परंतु तसे करताना १९ ऑगस्ट १८३१ रोजी राम मोहनांनी काढलेले उद्गार मात्र ते लक्षात घेत नाहीत.[३४] या उद्योगाची सुरुवातच मुळी आर्थिक प्रोत्साहनांऐवजी जुलूम–जबरदस्तीवर आधारलेली होती. बुकनन-हॅमिल्टन यांच्या मते १८१० च्या सुमारास पूर्णिया जिल्ह्यात जेवढ्या जमिनीतून १ रुपया किमतीची कच्ची नीळ मिळत असे तेवढ्याच जमिनीतून २ रुपये किमतीच्या उन्हाळी तांदळाचे उत्पादन होऊ शकत असे. बंगालच्या अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने निळीचे पीक फायदेशीर होते असे विधान करतांना त्रिपाठींनी बहुधा कलकत्त्यातील निळीच्या किंमती विचारात घेतल्या नसाव्यात. त्या किंमती अनिर्बंध व सट्टेबाजीवर आधारलेल्या असत. खरे म्हणजे, १८१२ सालीच निळीचे शेतकरी विनाशाच्या काठावर जाऊन पोचले होते. कलकत्त्याच्या बाजारपेठेचा विचार करता त्यांच्याकडून बळजबरीने बाजवी-

---

३४. त्रिपाठी, टीप क्र. २५, पृ. २३४. त्रिपाठी असे सांगतात की राम मोहन राय यांनी प्रवास करीत असता निळीच्या मळ्याशेजारी राहणाऱ्या देशी लोकांच्या वस्त्या पाहून असे उद्गार काढले की, " या मळ्यापासून दूर राहणाऱ्या लोकांपेक्षा या लोकांच्या अंगावरील कपडेलत्ते अधिक चांगले होते आणि त्यांची स्थिती अधिक चांगली होती. " राम मोहन राय यांनी ज्या वेळी काही स्थळांना भेटी दिल्या त्या वेळी त्यांनी काढलेले हे उद्गार खरे असण्याची शक्यता आहे. परंतु नंतर १८३१ साली " सबंध देशातील अपरंपार दारिद्र्य पाहून " राम मोहन अत्यंत अस्वस्थ झाले होते. ( या दारिद्र्याला अपवाद फक्त शहरांचा व त्यांच्या आसपासच्या प्रदेशांचा होता. ) या संपूर्ण विषयासाठी पाहा : एस्. सी. सरकार ( सं. ), 'राम मोहन रॉय ऑन इंडियन एकॉनॉमी', ( कलकत्ता, १९६५ ), पृ. २२.

पेक्षा जास्त उत्पादन करवून घेतले जात होते. १८४० नंतर युरोपीय मळेवाल्यांनी फार मोठ्या प्रमाणावर जमीनदाऱ्या व जमिनीच्या कायम वहिवाटीचे (पटनी) हक्क विकत घेण्यास सुरुवात केली आणि आपसांतील स्पर्धा टाळण्यासाठी वेगवेगळे प्रदेश आपसांत वाटून घेतले. तेव्हापासून तर नीळ पिकविणाऱ्या शेतकऱ्यांची स्थिती जवळजवळ भूदासां (गुलामां) सारखीच झाली.

अफूचे उत्पादन मुख्यतः विहारमध्ये होते. त्याच्या बाबतीत सरकारची मक्तेदारी होती. १८०१ ते १८२१ या काळात दरसाल सुमारे ४,८०० पेट्या एवढेच उत्पादन होईल अशा प्रकारे त्यावर नियंत्रण ठेवण्यात आले होते. तोपर्यंत शेतकऱ्यांना ठराविक किंमत मिळत होती. परंतु पुढे सरकारचा धारा भयंकर वाढला. १८०० साली जो शेतसारा २४ लाख रुपये होता तो १८१५ साली ८१ लाख झाला. १८५८ साली अफूच्या एका पेटीची किंमत १२१० ते १६०० रुपये असे. त्यामध्ये अफूच्या उत्पादनाचा खर्च फक्त सुमारे २५० रुपये असे. शेतकऱ्यांना फक्त तेवढ्याच प्रमाणात फायदा मिळाला. त्यामुळे १८२० नंतर अफूच्या निर्यातीत वाढ झाली तरी त्याचा फायदा अफूची लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांना मिळाला नाही. * किंबहुना, मार्क्सने दाखवून दिल्याप्रमाणे बंगाल प्रांतात बळजवरीने अथवा अगावू रकमेचे प्रलोभन देऊन अफूच्या लागवडीमध्ये जी वाढ करण्यात आली तिच्यामुळे "देशाच्या उत्पादक साधनसंपत्तीचा भयंकर नाश झाला" ('न्यूयॉर्क डेली ट्रिब्यून', २५ सप्टेंबर १८५७). अफूच्या महसुलाचा उपयोग गुंतवणूक व व्यापार यांच्या गुंतागुंतीच्या यंत्रणेच्या द्वारे भारतातील संपत्ती धुवून नेण्यासाठी करण्यात आला. मुख्यतः बिगर बंगाली भारतीय व्यापाऱ्यांच्या प्राथमिक धनसंचयात त्यामुळे पडलेली भर ही केवळ आनुषंगिक होती. चहाच्या मळ्यांमध्ये मुख्यतः युरोपीय लोकांचे भांडवल गुंतले होते. त्या उद्योगामुळे वाह्यतः तरी असमचा फार झपाट्याने विकास घडून आला. परंतु त्यायोगे स्थानीय किंवा बिगर युरोपीय व्यावसायिकांना आपला विकास करून घेण्याची मुळीच संधी मिळाली नाही. आसाम कंपनीचे माजी असमीया नोकर मणिराम देवान (दिवाण) (१८०२–५८) यांचे उदाहरण या संदर्भात लक्षात ठेवण्यासारखे आहे. त्यांनी १८५३ च्या सुमारास आपले स्वतःचे दोन चहा-मळे तयार केले. या क्षेत्रात पदार्पण करणाऱ्या प्रत्येक युरोपीय व्यक्तीला, एकही अपवाद न करिता, सवलतीने जमीन देण्यात आली होती. मणिराम देवान यांना मात्र अशी जमीन देण्यात आली नव्हती. पुढे १८५७ च्या बंडाशी मणिराम यांचा संबंध जोडून त्यांना १८५८ साली फाशी देण्यात आले. त्यांचे मळे जप्त करण्यात आले आणि पुढे ते शेजारच्या युरोपीय मळेवाल्यांच्या मळ्यांत सामील करण्यात आले.

### उपसंहार

या साऱ्या विवेचनाचा निष्कर्ष म्हणून आपण असे म्हणू शकतो की, आपल्या विवेचनाच्या काळातील बंगाली बाबू उद्योगधंद्यांमध्ये नवनवीन क्षेत्रे पादाक्रांत करण्यात मुळीच मागे नव्हते, आणि सर्वसामान्यपणे नफा मिळविणे हाच त्यांचा प्रमुख उद्देश असे. तसेच बंगाली शेतकरीही फारसे रूढिग्रस्त नव्हते. १७ व्या शतकात त्यांनी तंबाखू व मिरची यांसारखी नवी पिके फार झपाट्याने आत्मसात केली होती आणि त्यानंतरच्या काळातही बटाटा, टोमॅटो आणि निळीच्या उत्पादनाच्या नव्या पद्धती यांचा अंगीकार केला होता. पहिल्यांदा १७ व्या शतकात आणि दुसऱ्यांदा

* अफूची सरासरी किंमत १८१२ साली दर पेटीस १४२७ रुपये होती. ती १८१६ साली २१७८ रुपये झाली. त्रिपाठी, टीप क्र. २५, पृ. १५६.

१८ व्या शतकात अशा दोनदा, रेशमाचा धागा गुंडाळण्याच्या नव्या पद्धती अगदी थोडया काळात त्यांनी आत्मसात केल्या होत्या. १९ व्या शतकाच्या सुरुवातीस युरोपीय भाजीपाल्याची लागवड कलकत्त्यात व कलकत्त्याच्या आसपास फार झपाटयाने करण्यात आली. ज्या ॲग्रो-हॉर्टिकल्चरल सोसायटीशी विल्यम कॅरे, रामगोपाल, रामकमल व इतर अनेक लोक सक्रियपणे संबद्ध होते, तिने या बाबतीत फार महत्त्वाची भूमिका बजावली. चहाच्या लागवडीच्या बाबतीतही चहाचे पहिले मळे अस्तित्वात आल्यापासून १४ वर्षांच्या आत एक स्थानिक उद्यमी या क्षेत्रात उतरला होता हे आपण मागे पाहिलेच आहे.[३४ अ] रामदुलाल दे यांनी सुंदरबन भागात नवीन जमीन लागवडीखाली आणण्याच्या व तेथे वसाहती वसविण्याच्या एका धाडशी योजनेत भाग घेतला होता. जोपर्यंत अमेरिकन जहाजे कलकत्ता बंदरात येत होती तोपर्यंत एक व्यापारी या नात्याने रामदुलालांची भरभराट होत गेली आणि ती जहाजे भारतात येण्याचे थांबल्यानंतर त्यांच्याही वैभवाला उतरती कळा लागली. एका अमेरिकन गृहस्थांनी आपल्या जहाजाचे नाव 'रामदुलाल' असे ठेवले होते, आणि काही अमेरिकनांनी मिळून त्यांना जॉर्ज वॉशिंग्टन यांचा पूर्णाकृती पुतळा भेट म्हणून दिला होता. १७८० ते १८४० या लहानशा कालावधीत इंडोअमेरिकन व्यापाराचे जे संबंध निर्माण झाले होते ते वसाहतवादाच्या दडपणापासून मुक्त होते. त्यांत अधूनमधून व्यत्यय येत राहिला तरी आर्थिक वर्तुळामध्ये आश्रित व आश्रयदाते या स्वरूपाच्या इंडोब्रिटिश संबंधापेक्षा हे संबंध बंगाली व्यापाऱ्यांच्या दृष्टीने अधिक लाभदायक ठरले.

१८ व्या शतकाच्या शेवटच्या चतुर्थांशाप्रमाणे १९ व्या शतकाच्या पूर्वार्धातही पूर्व भारताचा बँकिंग व्यवसाय प्रामुख्याने गुजराती व मारवाडी महाजनांच्या (पेढीदारांच्या) हातात होता; त्यांची आणि संख्या वाढत्या प्रमाणावर होती. गंगाविष्णू मल्लिक (मृ.१७८८), रामकृष्ण मल्लिक (मृ. १८०३) आणि मथुरा मोहन सेन यांच्यासारखे परंपरागत सुवर्णवणिक जातीचे महाजन अजूनही या क्षेत्रात टिकून होते. अद्वैतचरण आढ्य (सुमारे १८१३–१८७३) हे गृहस्थही जातीने सुवर्णवणिक होते. ते फोर्ट विल्यम आर्सिनलमध्ये हिशेबनीस होते. त्यांनी 'कलकत्ता लोन ऑफिस' (याचेच नाव पुढे, 'पूर्णचंद्र लोन ऑफिस' असे बदलण्यात आले) आणि 'लँड मॉर्टगेज बँक' यांची स्थापना केली. याच ग्रहस्थांची 'यू. सी. आढ्य अँड कंपनी' नावाची संस्था कंपनी सरकारच्या रोख्यांचे व स्थावर मालमत्तेचे काम करीत असे. त्यांच्या मालकीचे, १८३८ साली स्थापन झालेले छापखाने व एक पुस्तकांचे दुकानही होते.[३५]

तथापि, परंपरागत हिंदू-मुस्लिम व्यापारी जमातींच्या बाहेरचा जो नवा व्यापारी वर्ग उदयास आला होता त्याने आधुनिक बँकांच्या स्थापनेत युरोपीय लोकांशी सहकार्य केले. १८१० साली स्थापन झालेल्या 'दि बँक ऑफ बेंगॉल' मध्ये अनेक बंगाली भागधारक होते आणि महाराजा सुखमय राय हे त्या बँकेच्या संचालक मंडळात होते. 'दि कमर्शियल बँक' (१८१९–३३) या बँकेत मॅकिनटॉश अँड कंपनी व प्रसन्नकुमार टागोर यांचे थोरले बंधू सूर्यकुमार टागोर हे दोन प्रमुख भागधारक होते. तसेच 'कलकत्ता बँक' (१८२४–३०) या संस्थेचे प्रमुख भागीदार

---

३४अ. असमचा प्रदेश १८२६ साली ब्रिटिश भारताला जोडण्यात आला होता. तो १८७४ पर्यंत बंगाल इलाख्याचा भाग म्हणूनच राहिला. काही थोडे अपवाद वगळल्यास स्थानिक व्यावसायिकांचा जवळजवळ संपूर्ण अभाव हे असमच्या चहामळ्यांच्या बाबतीत एक वैशिष्ट्यच होते.

३५. एन्. एन्. लाहा, 'सुवर्णवणिक कथा ओ कीर्ति', ३ (बंगाली भाषेत, कलकत्ता, १९४२) पृ. १५३–१५५ व २९८.

पामर अँड कंपनी व रघुराम गोस्वामी हे होते. १८३५ साली युनियन बँकेचे जे २०२ मालक (प्रोप्रायटर) होते त्यांपैकी १२९ युरोपीय व ७३ भारतीय होते. भारतीय मालकांपैकी अधिकांश बंगाली होते. या आकड्यांवरून खपलेल्या भांडवलामध्ये भारतीयांचा वाटा किती असेल याचे जे सूचन होते त्यापेक्षा भारतीयांचा वाटा बराच मोठा असला पाहिजे, असे वाटते. बँकेचे दिवाळे काढण्याचा प्रसंग आल्यास न्यायालयाकडून ज्या मालमत्तेवर जप्ती आणता येईल अशी पुरेशी प्रत्यक्ष मालमत्ता बहुतेक युरोपीय सभासदांजवळ या देशात उपलब्ध नसल्यामुळे प्रामुख्याने भारतीय सभासदांनाच जोखीम उचलावी लागली होती. १८४२ साली बँकेने मालाच्या व रोखे, शेअर्स वगैरे कागदपत्रांच्या तारणावर दिलेल्या कर्जांची व उधारीची रक्कम ९८ लाख रुपये इतकी होती. ही रक्कम पुढील प्रमाणे वेगवेगळ्या व्यवसायांत गुंतून पडलेली होती.[३६]

| एकूण | नीळ | रेशीम | कोळशाच्या खाणी | माल | शेअर्स | सार्वजनिक संस्था | व्यापारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१००) | ५९·१ टक्के | १·६ टक्के | २·९ टक्के | २१·६ टक्के | ८·७ टक्के | २·६ टक्के | ४·० टक्के |

अधिकांश रक्कम युरोपीय लोकांच्या निळीच्या कारखान्यांत अडकून पडली होती. १८४६–४८ च्या आर्थिक अरिष्टाच्या वेळी हे कारखाने एकामागून एक कोलमडले आणि त्यामुळे सरतेशेवटी बँकही बुडाली. त्याबरोबर द्वारकानाथ टागोर व त्यांचे आजीवन मित्र रुस्तमजी कावसजी बानाजी (१७९२–१८५२) यांचे सारे परस्पर–संबद्ध व्यवसाय पत्त्यांच्या बंगल्याप्रमाणे पार कोसळले. रुस्तमजींनी हावडा व सलकीया येथील युरोपीय गोद्या विकत घेतल्या होत्या, आणि त्यांनी बंगालमधील भारतीयांच्या मालकीची पहिली संयुक्त भांडवलाची डॉकिंग कंपनी स्थापन केली होती. तसेच कलकत्त्यातील आधुनिक विमाव्यवसायाच्या आद्यप्रवर्तकांपैकी ते एक होते. हे दोघे सर्वांत श्रीमंत भागधारक असल्यामुळे बँकेची देणी फेडण्यासाठी त्यांच्या मालमत्ता जप्त करण्यात आल्या. बँकेच्या दिवाळ्याचा दिगंबर मित्र (१८१७–७९) यांच्यावरही परिणाम झाला. परंतु आपल्या रेशमाच्या व निळीच्या अनेक कारखान्यांत गुंतलेले भांडवल काढून घेण्यात ते यशस्वी झाले. त्यांनी आपला बाग-बंगला विकला आणि १८५१ साली एक जमीनदारी खरेदी केली. त्यानंतर ते प्रसन्नकुमार यांच्याप्रमाणे राजकारणात पडले आणि त्यात यशस्वी झाले. महाराजा सुखमय राय यांचे वंशज राजकुमार राय यांचे लाखो रुपये बँकेत बुडाले.[३६अ] १८४७–४८ च्या आर्थिक अरिष्टाचा प्राणकृष्ण लाहा (१७९०–१८५३) यांनाही चांगलाच फटका बसला.

मतिलाल सील, हरिमोहन सेन व रामगोपाल घोष यांच्यासंबंधी अधिक माहिती दिली नाही तर आपली ही हकीकत पूर्ण होणार नाही. मतिलाल हे एका कापड व्यापाऱ्याचे चिरंजीव होते. त्यांनी एका युरेशियन शाळेतून इंग्रजीचे कामचलाऊ ज्ञान मिळविले आणि रिकाम्या बाटल्या व बुचे विकून प्राथमिक भांडवल जमा केले. एका जहाजाशी बनियन म्हणून संबद्ध झाल्यानंतर त्यांनी आपले भांडवल, जहाजांच्या कप्तानांनी त्यांना मिळालेल्या सवलतीतून आणलेला परदेशी माल विकत घेण्यासाठी वापरण्यास सुरुवात केली. हा माल ते चांगला नफा घेऊन बाजारात

३६. बी. चौधुरी यांच्या 'ग्रोथ ऑफ कमर्शियल अॅग्रिकल्चर, १७५७–१९००', १ (इंडियन स्टडीज पास्ट अॅंड प्रेझेंट, कलकत्ता, १९६४) या ग्रंथातील आकडेवारीवरून पुढील कोष्टक तयार करण्यात आले आहे.

३६अ. ज्ञानेंद्रनाथ कुमार राय, (सं.) 'वंशपरिचय', (कलकत्ता, १३३८ बंगाली संवत्) १४, पृ. १७–३५.

विकू लागले. १८२३ पर्यंत ते तीन व्यापारी संस्थांचे संचालक बनले. १८३९ साली काही काळपर्यंत त्यांनी आसाम कंपनीच्या कलकत्ता येथील संचालकांपैकी एक संचालक म्हणून काम केले. तसेच त्यांनी कलकत्त्यात निळीची एक बाजारपेठच वसविली. वेगवेगळ्या वस्तूंच्या खरेदीसाठी त्यांनी सबंध इलाखाभर आपल्या शाखांचे जाळे पसरविले. उदाहरणार्थ, छपरा येथे सोरा मीठ, गाझीपूरला साखर, रामपूर बोवालिया येथे रेशीम, आणि विभिन्न ठिकाणी नीळ व तांदूळ खरेदी करण्यासाठी त्यांनी आपले अडत्ये नेमले. एक काळ असा होता की ज्या वेळी त्यांच्या मालकीची १२ गलबते होती. त्यांमध्ये इतर होड्यांना खेचून नेणारे 'बनियन' नावाचे वाफेवर चालणारे एक जहाजही होते. १८४० साली त्यांनी दार्जिलिंगचा थंड हवेचे ठिकाण म्हणून विकास घडवून आणण्याचे काम करणाऱ्या समितीला लोखंडी पत्रे व दोन वाफेची इंजिने देणगी म्हणून दिल्याचा उल्लेख आढळतो.[३७] आपल्या मुलांनी उद्योगधंद्यात पडावे अशी त्यांची इच्छा होती. म्हणून त्यांनी ओस्वाल्ड, सील अँड कंपनी नांवाची एक कंपनीही त्यांना काढून दिली होती. परंतु ही कंपनी काही प्रगती करू शकली नाही.

रामकमल सेन यांचे चिरंजीव हरिमोहन यांना १८४४ साली त्यांच्या वडिलांच्या नंतर बँक ऑफ बेंगॉलची दिवाणगिरी मिळाली, परंतु ते त्या जागेला चिकटून राहिले नाहीत. त्यांच्या वडिलांनी त्यांच्यासाठी आपल्यामागे थोडीफार संपत्ती ठेवली होती. हरिमोहन धंद्यात पडले आणि त्यांनी इमारती लाकडाने समृद्ध असलेल्या ओरिसामध्ये गलबते बांधून ती नदीतील वाहतुकीसाठी विकण्याचा प्रयत्न केला. परंतु हा प्रयत्न अव्यवहार्य व म्हणून अयशस्वी ठरला. त्यानंतर त्यांनी वाहतुकीची आणखी एक धाडसी योजना हाती घेतली. १८५० नंतर त्यांनी कलकत्ता ते दिल्ली अशी घोडागाडीच्या साहाय्याने चालणारी डाक कंपनी सुरू केली. या धंद्यामध्ये बरेच मोठे स्थिर भांडवल गुंतविण्याची जरूर होती. ते त्यांनी गुंतविले आणि हा उपक्रम यशस्वी करून दाखविला. या कंपनीमुळे बंगालमध्ये प्रथमच लांब अंतरावर जाणाऱ्या प्रवाशांच्या जलद व कार्यक्षम वाहतुकीची सोय झाली. अर्थात आगगाड्या सुरू होताच ही कंपनी गुंडाळावी लागली.

रामगोपाल घोष (१८१५–१८६८) हे 'यंग बेंगॉल मूव्हमेंट' (तरुण बंगाल आंदोलन) या चळवळीचे एक नमुनेदार प्रतिनिधी होते. त्यांनी एका ज्यू व्यापाऱ्याचा नोकर म्हणून आपले व्यावसायिक जीवन सुरू केले आणि ते लवकरच केलसाल, घोष अँड कंपनीचे कनिष्ठ भागीदार बनले. रामगोपाल यांनी १८३९ साली आपल्या मित्राला लिहिले होते, " मी माझ्या मालकाचा धंदा सोडून स्वतंत्र व्यापारी म्हणून काम करावयाचे ठरविले आहे. स्वतंत्र व्यापारी बनणे हा एक सन्मान्य व्यवसाय आहे. त्याच्या भावी यशाच्या कल्पनेने मी आनंदाने थरारून जातो. " त्यांच्या इच्छेप्रमाणे १८४६ साली जेव्हा केलसाल यांच्याशी असलेली त्यांची भागीदारी संपुष्टात आली तेव्हा स्वतंत्र व्यावसायिक म्हणून काम करण्याची त्यांची अभिलाषा पूर्ण झाली. रामगोपाल यांनी आपल्या मित्राला लिहिलेल्या पत्रावरून अशीही माहिती मिळते की, त्यांच्या यंग बेंगॉल चळवळीतील अनेक सहकारी त्या वेळी व्यापारात गुंतले होते. त्यांपैकी कालाचांद सेठ व पियरी चांद मित्र हे दोघे होते. यांपैकी पियरी चांद हे एका बनियन कुटुंबातून आलेले होते.[३८] या पुराव्यावरून

३७. बर्नस्टीन, टीप क्र. ३२, पृ. १७०–१७१.

३८. गोविंदचंद्र बसाक यांना २४ नोव्हेंबर १८३९ रोजी लिहिलेले पत्र. हे पत्र आर. जी. संन्याल यांच्या 'ए जनरल बायॉग्राफी ऑफ बेंगॉल सेलेब्रिटीज', १ (कलकत्ता, १८८९) या ग्रंथात पृ. १७९–८० वर उद्धृत करण्यात आले आहे.

असे दिसून येते की, यंग बेंगॉल मूव्हमेंटच्या सभासदांमध्ये उद्योगधंद्यांविषयी फारसे आकर्षण नव्हते ही समजूत चुकीची होती.[३९] खरे म्हणजे, ब्रह्म समाज व यंग बेंगॉल मूव्हमेंट या दोन्ही आंदोलनांमुळे नव्याने उदयास येणाऱ्या मध्यम वर्गाला (bourgeoisie) एक विचार प्रणाली (ideology) प्राप्त झाली. तंत्रज्ञानाप्रमाणे ही विचारप्रणालीही प्रगत देशांकडून उसनवार घेण्यात आलेली होती आणि ती येथील परिस्थितीशी जुळती करून घेण्याची गरज होती. व्यापार व उद्योग या गोष्टी प्रतिष्ठितपणाच्या आहेत असे ती सांगत होती, परंतु येथील मातीत आणि उत्पादन-प्रक्रियेत ही विचारप्रणाली खोलवर रुजली नसल्यामुळे तिने व्यवहार्य मार्ग म्हणून इंडो-ब्रिटिश सहकार्याचाही पाठपुरावा केला.

आता आपण मूलभूत प्रश्नावर येतो. तो प्रश्न असा की, बऱ्याच मोठ्या प्रमाणावर उद्यमशीलतेचा उद्रेक होऊनही बंगालमध्ये औद्योगीकरण का घडून आले नाही ? बंगाली व इतर भारतीय व्यावसायिकांच्या व्यतिरिक्त या ठिकाणी ब्रिटिश उद्योगपती सातत्याने येत होते. त्यांना त्यांच्या देशांतील औद्योगिक क्रांतीचा अनुभव होता. बेल्जियम, जर्मनी व रशिया या युरोपीय देशांमध्ये नवे तंत्रज्ञान आवश्यक असणारे अनेक प्रारंभिक औद्योगिक कारखाने इंग्रज प्रवर्तकांनी सुरू केले होते. इंग्लंड हा जगातील पहिलाच औद्योगीकरण झालेला देश असल्यामुळे त्यात आश्चर्य वाटण्यासारखे काही नव्हते. तर मग इंग्रज लोकांनी आपली ही भूमिका आपल्या स्वतःच्या वसाहतीत, भारतात आणि विशेषत: बंगालमध्ये का बजावली नाही ? त्यांच्याकडून ही गोष्ट घडली नाही याला अनेक आंतरिक व बाह्य कारणे असण्याची शक्यता आहे. परंतु आमच्या मते त्यांपैकी बाह्य कारणच निर्णायक होते यात मुळीच शंका नाही. वसाहतीच्या एकूण चौकटीमध्येच असे काही अंगभूत कार्यतंत्र (mechanism) होते की, ज्या योगे व्यापारी भांडवलाचे औद्योगिक भांडवलामध्ये रूपांतर होण्याची प्रक्रियाच अवरुद्ध होत होती.

आधुनिकीकरणाच्या दिशेने नव्याने वाटचाल करणाऱ्या देशांमध्ये औद्योगीकरण घडवून आणण्याच्या बाबतीतील शासनाची भूमिका ही अत्यंत महत्त्वाची, किंबहुना अटळ असते ही गोष्ट आता सामान्यत: सर्वमान्य झाली आहे. इंग्लंडमध्ये आपल्या धोरणाचे प्रतिकूल पडसाद उमटतील या भीतीने कंपनी सरकार आपली ही भूमिका बजावण्यास तयार नव्हते. तरी पण त्रिपाठी मात्र असा युक्तिवाद करतात की, निरंकुश अर्थव्यवस्थेच्या त्या युगात कंपनीने आपल्या काळाच्या पुढे जावयास हवे होते अशी अपेक्षा बाळगता येणार नाही. त्या काळातील रशिया व जर्मनी या देशांतील घडामोडींकडे आपण पाहिल्यास त्यांचा हा मुद्दा बरोबर आहे असे वाटत नाही. दुसरी गोष्ट अशी की, सुमारे १८५० पर्यंत भारत व ब्रिटन यांच्यांतील परस्परसंबंध मुक्त व्यापाराच्या तत्त्वांवर आधारलेले नव्हते. आमच्या मते हा मुद्दा आम्ही या लेखात पुरेसा स्पष्ट केला आहे. व्यापाराच्या बाबतीत ब्रिटनला संरक्षण देण्यात येऊन त्याला अनुकूल असा भेदभाव करण्यात येत होता. आणि भारत ही ब्रिटिश मालाच्या प्रवेशासाठी मुक्त बाजारपेठ बनविण्यात आली होती, हेच बंगालच्या हलाखीचे मूळ होते. देशातील सार्वभौम सत्ता आणि नफा मिळवू

---

३९. जी. चट्टोपाध्याय (सं.) 'अवेकनिंग इन बेंगॉल इन अर्ली नाइनटीन्थ सेंचुरी, सिलेक्टेड डॉक्युमेंट्स, १,' (कलकत्ता, १९६५) या ग्रंथाच्या प्रास्तविकातून.

एका समकालीन नियतकालिकात हिंदू कॉलेजच्या विद्यार्थ्यांचे वर्णन पुढील शब्दांत केलेले आढळते : "हे लोक दिवाणांचे चिरंजीव, कारकुनांचे भाऊ, खजीनदारांचे पुतण्ये किंवा सरकारांचे नातू असून मालाची विल्हेवाट (disposal), लिलाव व विक्री करण्याचा व्यवसाय करीत असतात."

पाहाणारी व्यावसायिक संस्था या दोन्ही दृष्टींनी ईस्ट इंडिया कंपनीने आपल्या नियंत्रणाखाली असलेल्या बंगालच्या कताईच्या व हातमागाच्या उद्योग–क्षेत्रात अनुकरणात्मक नवे पायंडे पाडून १७८० ते १८४० च्या ब्रिटिश औद्योगिक क्रांतीचे आव्हान स्वीकारले असते तर ते अधिक स्वाभाविक ठरले असते. तंत्रज्ञानात्मक दृष्टिकोनातून पाहिल्यास तसे करणे अवघडही नव्हते. कारण सुरुवातीची सारी यंत्रे ही साधी लाकडी उपकरणे होती. ४० चात्या असलेल्या विणाईच्या यंत्राला १७९२ साली इंग्लंडमध्ये फक्त ६ पौंड पडले असते. आणि पिंजण यंत्राला फक्त एक पौंड द्यावा लागला असता. तर मग कंपनीने १८व्या शतकाच्या मध्यास बंगालमध्ये रेशीम गुंडाळण्याची इटालियन यंत्रे रूढ केली असताही ही ब्रिटिश पिंजणयंत्रे व विणाईयंत्रे या देशात सुरू करण्याच्या कामी पुढाकार का घेतला नाही ? वसाहतवादाच्या नकारात्मक भूमिकेवर प्रकाशझोत टाकल्याखेरीज या प्रश्नाचे योग्य उत्तर देणे कोणालाही शक्य होणार नाही.

ढाका कर्मशियल रेसिडेन्सीचे जॉन बेव यांनी १७८७ च्या सुमारास आर्कराइटचे यंत्र भारतात सुरू करता येईल किंवा कसे याबद्दल आपल्या वरिष्ठांकडे विचारणा केली होती. परंतु ब्रिटिश उद्योगपतींनी अशा प्रकारच्या हालचालीला मुळीच अनुमती दिली नसती, म्हणूनच बहुधा, या चौकशीकडे कोणी लक्ष दिले नसावे. १८२५ पर्यंत कापडउद्योगातील यंत्रांच्या निर्यातीवर सर्वसामान्यपणे बंदी होती. तरी देखील, १७९० च्या सुमारास ग्लासगोच्या संशयग्रस्त व भयग्रस्त व्यापाऱ्यांनी भारताला अशा यंत्रांच्या होणाऱ्या संभाव्य निर्यातीवर बंदी घालण्याबद्दल खरोखरीच ब्रिटिश सरकारकडे अर्ज केला होता.[४०] नेपोलियनशी चालू असलेल्या युद्धांच्या दरम्यान नौकानयन कायद्यांमध्ये जी थोडीफार सूट देण्यात आली होती तिलाही ब्रिटिश जहाज–उद्योगातील हितसंबंधी मंडळींनी जोराचा विरोध केला होता. कारण भारतात बनणारी सागवानी जहाजे ही ब्रिटनमध्ये तयार होणाऱ्या ओकाच्या (लाकडाच्या) जहाजांशी अधिक यशस्वीपणे स्पर्धा करू शकत होती. वस्तुतः भारतात तयार होणाऱ्या जहाजांतील दोन-पंचमांश भाग ब्रिटनमधून आयात केलेल्या मालापासूनच बनत असे. तरीही ब्रिटिश जहाजमालक भारतीय जहाजांना भीत होते. त्यामुळे १८१४ व १८२२ सालच्या अधिनियमांनुसार नौकानयन कायदे अधिक कडक बनवून भारतीय जहाजांना युरोपीय सागरांत प्रवेश करता येणार नाही, अशी तरतूद करण्यात आली. हे कायदे १८४९ पर्यंत अमलात राहिले आणि त्यांची कडक अंमलबजावणीही करण्यात आली. या वेळेपर्यंत रुस्तमजी कावसजी बानाजी यांचा कलकत्त्यातील जहाजबांधणीचा उद्योग जवळजवळ नष्ट झाला होता.

या काळातील बंगालच्या व्यवसायातील यश प्रामुख्याने कलकत्ता या महानगरीतील हितसंबंधांशी जुळवून घेण्याच्या क्षमतेवर अवलंबून होते. गुजराती व बंगाली सवर्ण हिंदू व्यापारी मांडवलदार या कलेत श्रेष्ठ ठरले. परंतु जुन्या परंपरागत मुस्लिम व्यापारी घराण्यांनी अशा प्रकारे जुळते घेण्यास नकार दिल्यामुळे ती मागे पडली. न्यायदानाच्या क्षेत्रातही वर्णविद्वेष इतक्या मोठ्या प्रमाणावर चालू होता की युरोपीय व्यापारी व अधिकारी यांच्यावर कलकत्त्याच्या हद्दीबाहेर कोणत्याही दिवाणी किंवा फौजदारी न्यायालयात खटला भरता येत नसे. त्यामुळे जेव्हा देशी व युरोपीय लोकांच्या व्यापारी हितसंबंधामध्ये संघर्ष निर्माण होई तेव्हा देशी लोकांना त्वरित व परिणामकारक न्याय मिळत नसे. अधिकाऱ्यांचा आणि राजाच्या न्यायालयांचाही

४०. एन्. सी. सिन्हा, 'स्टडीज इन दि इंडो-ब्रिटिश एकॉनॉमी हंड्रेड इयर्स अगो', (कलकत्ता, १९४६), पृ. २८. त्रिपाठी, टीप क्र. २५, पृ. २५.

स्वाभाविक कल युरोपीय लोकांना अनुकूल राहण्याकडे असे. मार्क्सने ब्रिटिश भारतीय न्याय-पद्धतीला उद्देशून वापरलेला 'तिरस्करणीय' (abominable) हा शब्द अगदी योग्य होता.[४१] अशा स्थितीत एखाद्या ब्रिटिश अधिकाऱ्याची मेहेरनजर आणि ब्रिटिश नांव असलेली पाटी या गोष्टी कोणताही व्यवसाय यशस्वी होण्यासाठी अपरिहार्यच असत. म्हणूनच पूर्व भारताच्या इंडो-ब्रिटिश व्यावसायिक जगात आश्रयदाता व आश्रित अशा प्रकारचे संबंध वर्चस्व गाजवीत होते.

शिवाय, संपत्तीचा ओघ अखंडपणे बाहेर चालला होता. ब्रुक ॲडॅम यांचा सिद्धांत अतिशयोक्तिपूर्ण असू शकेल, परंतु तो अगदीच निराधार खास नव्हता. प्लासीच्या लुटीचा जो अपुरा हिशेब उपलब्ध आहे त्याच्यावरूनही असे दिसून येते की, इंग्लंडच्या अंदाजे एकूण राष्ट्रीय उत्पादनातील आणि विशेषतः त्याच्या स्वदेशातील गुंतवणुकीतील या लुटीचा वाटा काही अगदीच दुर्लक्षिण्यासारखा नव्हता. ही लूट पुरी झाल्यानंतर आणि सर्व काही स्थिरस्थावर झाल्यावर बंगालमधील संपत्तीच्या ओघाने अतिरिक्त निर्यातीचे गोंडस रूप धारण केले. ही निर्यात दृश्य व्यापाराच्या स्वरूपात होती. इंग्लंडमधून भारतात जे लोक नोकऱ्या अथवा अन्य कामे करण्यासाठी येत त्यांच्यावर होणारा खर्च भागविण्यासाठी, म्हणजेच आमच्या दृष्टीने अनुत्पादक व परिहार्य अशा सेवांच्या अदृश्य आयातीचा खर्च भागविण्यासाठी ही दृश्य निर्यात करावी लागे.[४२]

भारतातून इंग्लंडकडे संपत्तीचा ओघ वळविण्यासाठी ज्या क्लृप्त्या योजण्यात आल्या होत्या त्यांपैकी एक क्लृप्ती म्हणजे युरोपीय अधिकाऱ्यांच्या टोळक्याच्या फायद्यासाठी बंगालच्या महसुलातून मोठेमोठे पगार वसूल करण्याची प्रथा ही होय. उदाहरणार्थ, १८२७ साली १३०६ युरोपीय अधिकाऱ्यांनी भारतातून एकूण २ कोटी रुपये पगारादाखल घेतले. यांपैकी सुमारे ५६ टक्के अधिकाऱ्यांची नेमणूक बंगालमध्ये झालेली होती आणि त्यांनी एकूण पगारापैकी ६० टक्के पगार घेतला.[४३] या वसाहतवाद्यांच्या वापरातील वस्तूंचे स्वरूप अशा प्रकारचे होते की, त्यांच्याकडून

---

४१. 'न्यूयॉर्क डेली ट्रिब्यून' या दैनिकाच्या २० जुलै १८५३ च्या अंकात मार्क्सने 'दि गव्हर्नमेंट ऑफ इंडिया' या शीर्षकाचा एक लेख लिहिला होता. त्यामध्ये त्याने १८५७ पूर्वीच्या भारतातील ब्रिटिश सत्तेमध्ये असलेले पाच प्रमुख दोष नमूद केले होते. ते असेः- (१) कायमची आर्थिक तूट, (२) सतत चालू असलेली व इतरांवर लादलेली युद्धे, (३) सार्वजनिक कामांचा संपूर्ण अभाव, (४) कर आकारणीची तिरस्करणीय पद्धती, आणि (५) तितकीच किळसवाणी न्याय व कायदा यांची पद्धती. त्याच्या मते 'ईस्ट इंडिया सनदे'चे हे पाच मुद्दे होते'.

४२. ग्रेट ब्रिटनचे, १८ व्या शतकाच्या मध्यास असणारे, एकूण राष्ट्रीय उत्पादन जास्तीतजास्त सुमारे १२ कोटी पौंड असावे, असा अंदाज आहे. त्यामुळे अंतर्गत धनसंचय (internal accumulation) स्थूल मानाने दरसाल ८० ते ९० लाख पौंड असावा, असे अलीकडील संशोधनावरून सूचित होते. या आकड्यांशी तुलना करिता क्लाइव्हने व इतरांनी केलेली लूट महत्त्वाची नव्हती असे म्हणता येत नाही. १८०१ च्या सुमारास ग्रेट ब्रिटनचे एकूण राष्ट्रीय उत्पादन प्रचलित दराने २२ कोटी ७० लाख पौंडांच्या आसपास झाले होते. त्या वेळी भारतातून इंग्लंडला दर साल सुमारे २० लाख पौंडांची संपत्ती रवाना होत होती. ब्रिटनच्या एकूण राष्ट्रीय उत्पादनासाठी पाहा:- पीटर मॅथियास, 'दि फर्स्ट इंडस्ट्रियल नेशन : ॲन एकॉनॉमिक हिस्टरी ऑफ ब्रिटन, १७००-१९१४', (लंडन, १९६९), पृ. ४१ व ४४.

४३. कार्ल मार्क्स व दादाभाई नौरोजी यांच्या कितीतरी आधी राम मोहन राय यांना या संपत्तीच्या बहिर्गमनाची समस्या कळलेली होती. त्यांनी अधिकृत कागदपत्रांतून जमविलेली व तक्त्यांच्या रूपात मांडलेली आकडेवारी सरकार यांनी संपादिलेल्या टीप क्र. ३४ च्या ग्रंथात (पृ. ७४ ते ७९) पाहावी.

तसेच पाहा :- अ. गुह, 'कार्ल मार्क्स ॲंड दि ड्रेन थियरी', 'अर्थविज्ञान', वर्ष १०, अंक ३-४, सप्टेंबर-डिसेंबर १९६८, पृ. ४७७-४९५.

स्थानिक उद्योगांना फारच थोडे प्रोत्साहन मिळाले. हे लोक जुन्या मोगल बादशाहांप्रमाणे एवढा मोठा लवाजमा बाळगत असत की, त्यावर होणारा खर्च म्हणजे साधनसंपत्तीची निव्वळ उधळपट्टी असे. हे लोक इंग्लंडहून आयात होणारा मालच वापरीत असत. त्यामुळे त्या मालाची चोरटी आयात सुरू झाली. तो मिळविण्यासाठी या नव श्रीमंतांमध्येही अहमहमिका सुरू झाली. त्यामुळे त्यांच्यावरही या आयातीचा दृश्य परिणाम होऊ लागला. परंतु अशा प्रकारे बेसुमार खर्च केल्यानंतरही या लोकांजवळ बचत करण्याइतका पैसा शिल्लक राहात असे. कारण त्यांची प्राप्ती खूपच मोठी होती. आपली ही बचत ते मुक्त इंग्रज व्यापाऱ्यांना कर्जाऊ देत असत. अशा प्रकारे ही संपत्ती भांडवल म्हणून या देशात वापरली जाई. परंतु हा पैसा अचानकपणे व वारंवार परत घेतला जाई. नोकरीतून निवृत्त झाल्यामुळे, मृत्यूमुळे अथवा वेळोवेळी योग्य संधी मिळताच ग्रेट ब्रिटनला पाठवून देण्यासाठी त्यांना या पैशाची गरज लागे. त्यामुळे या पैशाचा वापर झटपट होऊ शकणाऱ्या उलाढालींकडे करण्याची त्या काळात प्रवृत्ती होती. याचा परिणाम असा झाला की, स्थिर भांडवलाची निर्मिती होईनाशी झाली आणि अधूनमधून व्यावसायिक कंपन्यांकडे पैसे परत मागणाऱ्यांची अकस्मात गर्दी होऊ लागली. या परिस्थितीत व्याजाच्या दरांत भयंकर चढउतार होऊ लागले, आणि मग बंगाली भांडवलही सरकारी कर्जरोख्यांतून खासगी कंपन्यांच्या ठेवींमध्ये अथवा याच्या उलट मार्गाने झपाट्याने जाऊ-येऊ लागले. १८३० पर्यंत जमीनदाऱ्या व स्थावर मिळकती यांमध्ये केली जाणारी गुंतवणूकही नफादायक समजली जात असे आणि या मालमत्तेची खरेदी–विक्री चालू असे. परंतु १८२६ ते १८३३ या काळातील आर्थिक अरिष्टाचा अनुभव घेतल्यानंतर मात्र या वृत्तीत बदल घडून येऊ लागला. १८४६ ते १८४८ या काळातील आर्थिक अरिष्टामुळे ही वृत्ती अधिक दृढ झाली. त्यानंतर बंगाली भांडवलदारांच्या व्यावसायिक हालचालींची निश्चित पीछेहाट सुरू झाली. त्यांनी जमीनदाऱ्या व स्थावर मालमत्ता यांच्या सुरक्षित घरकुलात आश्रय घेतला. ते आपला वेळ व उत्साह राजकारणात व सांस्कृतिक कार्यांत खर्च करू लागले. मात्र त्या शतकामध्ये त्यांनी उद्योगधंद्यांच्या नादी लागून पुनः कधी आपले हात पोळून घेतले नाहीत.

१८३३ सालापूर्वी युरोपीय लोकांना कलकत्ता शहराच्या बाहेर जमीन खरेदी करण्यास बंदी होती. त्यामुळे जे लोक येथे राहत होते त्यांना दीर्घ मुदतीच्या गुंतवणुकीमध्ये उत्साह राहिला नाही आणि तेवढ्या प्रमाणात संपत्तीचे बहिर्गमन वाढले. जेव्हा सुवेझ कालवा अस्तित्वात आलेला नव्हता आणि उतारू जहाजांची वाहतूकही सुरू झालेली नव्हती असा तो काळ होता. त्यामुळे संचित धन ब्रिटनला पाठविण्यास उत्तेजनच मिळत होते. अशा प्रकारची बंदी नसती तर बहुधा अनेक युरोपीय लोकांनी भारतालाच आपले घर मानून येथे कायमची वस्ती केली असती. तसे झाले असते तर त्यांचे संचित धन स्थानिक स्वरूपात विखुरले गेले असते. राममोहन व द्वारकानाथ यांनी मर्यादित प्रमाणावर निवडक वसाहतीकरणाची कल्पना अत्यंत उत्साहाने उचलून धरली होती.[४४] तथापि, संभाव्य वसाहतकारांसाठी राममोहनांनी ज्या अटी सुचविल्या होत्या त्या, आज भारतातील ब्रिटिश हायकमिशन, नोकरीचे प्रमाणपत्र मिळवून इंग्लंडात जाऊन राहू इच्छिणाऱ्या भारतीयांना तसा परवाना देताना जशा अटी घालते तशाच स्वरूपाच्या होत्या.

---

४४. सरकार (सं.), टीप क्र. ३४, पृ. ८४–८९. या ग्रंथातील, लंडन येथे १४ जुलै १८३१ रोजी राममोहन राय यांनी 'युरोपीय लोकांची भारतातील वसाहत' या विषयावर व्यक्त केलेली मते. तसेच, पृ. १६ व १८ वरील प्रश्न क्र. ४८ व ५२ यांना राममोहनांनी दिलेली उत्तरे.

तथापि इंग्रजांचा अडत्या म्हणून काम करणाऱ्या बंगाली पुंजीजीवी वर्गाचा (bourgeoisie) १८५० पूर्वीपासून ब्रिटिश हितसंबंधांशी निळीचे उत्पादन व वर्णविव्देष यांसारख्या प्रश्नांवरून वाढत्या प्रमाणावर संघर्ष होऊ लागला होता. उदीयमान पुंजीजीवी वर्गामध्ये परकीय नियंत्रणापासून थोडेबहुत मुक्त राहण्याची असणारी स्वाभाविक आकांक्षाही या संघर्षाच्या मुळाशी नव्हती असे नाही. रुस्तमजी कावसजी बानाजी यांनी टर्नर अँड कंपनीशी असलेली आपली भागीदारी समाप्त केली, परंतु युरोपीय विमा कंपन्यांशी मात्र सहकार्य करणे चालू ठेवले. द्वारकानाथांचे युरोपीय भागीदार वारंवार बदलत होते, परंतु ते स्वतः मात्र कार, टॅगोर अँड कंपनीचे कायमचे वरिष्ठ म्हणून राहिले. तथापि, कालांतराने त्यांच्या कंपनीने सुरू केलेल्या संयुक्त भांडवल कंपन्यांमध्ये सामील झालेल्या वड्या युरोपीय उद्योगपतींची ते बरोबरी करू शकले नाहीत. त्यांना त्या कंपन्यांवरील आपले नियंत्रण सोडावे लागले. राम गोपाल आपल्या युरोपीय भागीदारापासून १८४६ साली वेगळे झाले. सरकारने न्याय खात्यातील वांशिक भेदभाव कमी करण्याच्या उद्देशाने मांडलेल्या विधेयकाला त्यांनी पाठिंबा दिल्यामुळे अॅग्रो हॉर्टिकल्चरल सोसायटीच्या युरोपीय सभासदांनी त्यांना त्या संस्थेतून बहुमताच्या जोरावर काढून टाकले, ही मोठी लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट आहे. अखेर, द्वारकानाथ टागोर यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या मुलांनीही कार, टॅगोर अँड कंपनीतील आपल्या युरोपीय भागीदारांचे भांडवल परत केले आणि त्यानंतर त्यांना सदर कंपनी बुडेपर्यंत पगारी नोकर म्हणून कामावर ठेवले.

तथापि, साकल्याने विचार करता, युरोपीय लोकांशी चांगले संबंध ठेवण्याचीच प्रवृत्ती अजूनही चालू होती. बंगाली भांडवलदार हे मुळात दलाली करून श्रीमंत बनलेले होते, शोषणाच्या सरंजामशाही पद्धतींशी त्यांचे घनिष्ठ संबंध होते आणि त्यांच्याजवळील भांडवली साधनसंपत्ती मर्यादित होती. या कारणांमुळे सहकार्याच्या राजकारणावरील त्यांची श्रद्धा कधीच कमी झाली नाही. याच्या उलट युरोपीय मुक्त व्यापाऱ्यांना स्थानिक पुंजीजीवी वर्गीयांशी संयुक्त आघाडी निर्माण करण्याची आता गरज उरली नव्हती; कारण अनिर्बंध, मुक्त व्यापाराची सनद आपल्याला मिळावी, ही त्यांची मागणी १८३३ साली मान्य झाली होती. त्यामुळे तेव्हापासून आपले सामाजिक संबंध चालू ठेवण्याच्या बाबतीत ते अधिकाधिक बेफिकीर बनू लागले. अिलबर्ट बिलावरील वादाने त्यांच्या या वृत्तीवर प्रकाशझोत पडला. १८५७ च्या भारतीयांच्या बंडाने युरोपीय समाजाची भारतीय समाजाच्या इतर घटकांशी सामाजिक फारकत घडवून आणण्याची प्रक्रिया पूर्ण झाली.

भारतीय मालापासून ब्रिटिश मालाला संरक्षण देण्याचे धोरण ब्रिटनने अवलंबिले होते, आणि त्या धोरणाविरुद्ध काहीही करणे भारताला शक्य नव्हते. त्याचे काय दुष्परिणाम झाले हे जगजाहीर आहे. १८३१ साली बंगालमधील ११७ 'अत्यंत आदरणीय देशी व्यक्तींनी' ब्रिटनच्या प्री. व्ही. कौन्सिलला एक अर्ज सादर केला होता. त्या अर्जात असे दाखवून देण्यात आले होते की, ब्रिटिश कापड भारतात आणले जाते तेव्हा त्याच्यावर कोणतीही जकात आकारली जात नाही. परंतु भारतीय सुती कापडाला मूल्यानुसार (advalorem) १० टक्के आणि रेशमी कापडाला २४ टक्के जकात ब्रिटनच्या बंदरात प्रवेश करताच द्यावी लागते. शिवाय त्या काळात बंगालमध्ये मालाच्या अंतर्गत वाहतुकीवर जे कर चालू होते त्यांच्यामुळेही व्यापारामध्ये खूप अडथळा निर्माण होई. १८३६–३७ पर्यंत यांपैकी बहुतेक अडथळे कमीजास्त प्रमाणात दूर करण्यात आले, परंतु तोपर्यंत अशी परिस्थिती निर्माण झालेली होती की, केवळ मुक्त व्यापार

धोरणाचा काही उपयोग होणार नव्हता. भारतीय मालाला निश्चित स्वरूपात संरक्षण देण्याची गरज एव्हाना उत्पन्न झालेली होती.

१८१६ साली अमेरिकेने सरंक्षक जकातीचे धोरण अवलंबिले. त्यायोगे आयात कापडावर ६० ते ७० टक्के जकात बसविण्यात आली. या धोरणाचा बंगालवर खूपच प्रतिकूल परिणाम झाला. अमेरिकन जहाजे कलकत्त्याला येण्याचे बंद झाले. १८१७ पासून १८३३ पर्यंतच्या १७ वर्षांत अमेरिकेच्या सुती कापडाच्या उत्पादनात २८० पटीहून अधिक वाढ झाली. जे कापड-उत्पादन सुरुवातीला ८,४०,००० वार होते ते २३ कोटी १० लाख वारापर्यंत वाढले. १८३० नंतरच्या दशकात अमेरिकेत तयार झालेले विनधुवट, जाडेभरडे कापड बंगालमधील खेडोपाडी जाऊन पोचले होते. हे कापड ३० इंची पन्ह्याचे असे. तीन वार कापडाचे वजन १ पौंड असे, आणि त्याची किंमत वाराला चार आणे असे.[४५] याच सुमारास बंगाली भाषेच्या शब्दभांडारात कापडाचा एक प्रकार या अर्थाने 'मार्किन' (अमेरिकन) हा शब्द समाविष्ट झाला. अमेरिकन सरकारच्या संरक्षणाखेरीज या साऱ्या गोष्टी इतक्या झपाट्याने घडून येऊ शकल्या असत्या काय?

तथापि, त्रिपाठी असा युक्तिवाद करतात की, ब्रिटिश (व अमेरिकन) कापड उद्योगाने भारतीय कापड उद्योगाला जे स्थानच्युत करून टाकले त्याचे कारण व्यापार-विषयक जकाती हे नसून तंत्रज्ञानातील श्रेष्ठत्व हे होते. वरवर पाहता, आणि मथितार्थानेही हे खरे आहे. परंतु ते एका महत्त्वाच्या पैलूकडे दुर्लक्ष करतात. अशा प्रकारच्या जकातींची जरूर नसतांनाही त्या विद्यमान राहिल्यामुळे भारतातील संभाव्य गुंतवणदारांना या गोष्टीची सतत जाणीव राहात असे की, जेव्हा गरज भासेल तेव्हा ब्रिटिश हितसंबंधांचे संरक्षण करण्यात येईल; परंतु वसाहतीचे जिणे जगणाऱ्या भारताला त्यावर प्रत्याघात म्हणूनही काही हालचाल करता येणार नाही. अशा प्रकारचे प्रतिकूल वातावरण असताही १८३० च्या सुमारास कलकत्त्याजवळील फोर्ट ग्लूस्टर वर्क्स या ठिकाणी भारतातील पहिली कापड गिरणी उभारण्यात आली होती. या ब्रिटिश गिरणीमध्ये १०० यंत्रमाग होते, परंतु विणाई फायदेशीर पडत नाही, असे दिसून आल्यामुळे ती बंद करण्यात आली. फक्त ५० अश्वशक्तीच्या वाफेच्या दोन इंजिनांच्या साह्याने कताईचे काम तेवढे चालू राहिले. या गिरणीची मालकी सारखी बदलत राहिली आणि १८३६ साली ती ६० हजार पौंडांना विकण्यात आली. वस्तुतः या गिरणीच्या उभारणीला २ लाख पौंड खर्च आला होता. १८४० च्या सुमारास या गिरणीतून दरसाल २० ते ५० नंबरा-पर्यंतचे सुमारे ७ लाख पौंड सूत तयार होत असे. आयात होणाऱ्या ब्रिटिश सुताच्या प्रतिस्पर्धेमुळे या गिरणीला यापेक्षा अधिक तलम सूत काढणे परवडत नसे. या गिरणीच्या एका मालकाने १८४० साली असे भविष्य वर्तविले होते :–[४६]

---

४५. के. डब्ल्यू. पोर्टर यांच्या 'दि जॅकसन्स ॲंड दि लीज : टू जनरेशन्स ऑफ मॅसॅच्युसेटस मर्चंटस, १७६५–१८४४', २, (हार्वर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, १९३७) या ग्रंथातील बोस्टनच्या हेन्री लीने मद्रासच्या विल्यम वॅंडेल्ला २९ मार्च १८४१ रोजी लिहिलेले पत्र, पृ. १४५१–३.

अमेरिकेतील कापड-उत्पादनाच्या आकडेवारीसाठी पाहा:– वी. झेविन, 'दि ग्रोथ ऑफ कॉटन टेक्स्टाइल्स प्रॉडक्शन आफ्टर १८१५'. सदर लेख आर्. डब्ल्यू. फॉगेल व एल्. एंजर्मन यांनी संपादिलेल्या 'दि रिइंटरप्रिटेशन ऑफ अमेरिकन एकॉनॉमिक हिस्टरी', (न्यूयॉर्क, १९६७) या संग्रहात आहे.

४६. 'रिपोर्ट फ्रॉम दि सिलेक्ट कमिटी ऑन ईस्ट इंडियन प्रोड्यूस टुगेदर विथ मिनिट्स ॲंड एव्हिडन्स : ॲन अपेंडिक्स ॲंड इंडेक्स', (हाउस ऑफ कॉमन्स, टुबी प्रिंटेड, २१ जुलै १८४०). या अहवालातील हेन्री गूगर यांची साक्ष, पृ. ११६–१३४.

" सध्याची गिरणी चालविण्यासाठी जो अफाट खर्च करावा लागत आहे तो लक्षात घेता सूत तयार करणारी दुसरी एकही गिरणी येथे अस्तित्वात येऊ शकणार नाही, असे मला वाटते. "

परंतु आपण ज्या कालखंडाचा विचार करीत आहोत त्या कालखंडाच्या अखेरीस ही भविष्य-वाणी खोटी ठरली. पश्चिम भारतातील गुजराती भांडवलदारांनी मुंबई व अहमदाबाद येथे आधुनिक कापड उद्योगाचा पाया घातला; परंतु बंगाल मात्र अजून मागेच रेंगाळत होता. फोर्ट ग्लूस्टर वर्क्स आपल्या सुरुवातीच्या अडचणींना तोंड देतादेताच मृत्युमुखी पडले.

सारांश, भारतातील, विशेषत: बंगालमधील उद्यमशीलतेच्या मार्गातील प्रमुख अडथळे राजकीय स्वरूपाचे होते. शेतकऱ्यांकडून त्यांच्या उत्पादनापैकी इतका मोठा भाग कर रूपाने हिसकावून घेतला जात असे की, त्याच्याजवळ जेमतेम त्याच्या पोटापुरते शिल्लक उरत असे. परंतु जपानमध्ये ज्याप्रमाणे सरकार शेतकऱ्यांचे शोषण करून जे काही मिळवी ते पुन: उत्पादक गुंतवणुकीमध्ये वापरीत असे त्याप्रमाणे येथे घडले नाही. व्यावसायिक धाडसाचा अथवा तंत्र-ज्ञानाचा अभाव हा येथे महत्त्वाचा प्रश्न नव्हता. यापैकी व्यावसायिक धाडसाची चर्चा आम्ही येथवर विस्ताराने केली आहे. तंत्रज्ञानाच्या बाबतीत बोलावयाचे तर आपण हे लक्षात घेतले पाहिजे की, रेल्वेचे युग सुरू होण्याच्या पूर्वीचे तंत्रज्ञान हे गुंतागुंत नसलेले व कमी खर्चाचे होते. प्रारंभीच्या काळातील यंत्रे ही बहुधा सामान्य लाकडी यंत्रके (contrivances) असत. त्यांचा नमुना मिळाल्यास कोणालाही त्याबरहुकूम यंत्रे बनविता येत असत. उदाहरणार्थ, टिटाघर येथील गोलोकचंद्र नावाच्या एका सामान्य लोहाराने १८२८ च्या जानेवारीत कोणाच्याही मदतीशिवाय नमुन्यादाखल एक कुतूहलजनक वाफेचे इंजिन तयार करण्यात यश मिळविले होते. त्याबद्दल त्याला अॅग्रो-हॉर्टिकल्चरल सोसायटीकडून फक्त ५० रुपयांचे रोख पारितोषिक मिळाले होते. भारतामध्ये बाष्प युगाच्या प्रारंभिक काळात परदेशांतून आणण्यात आलेली अनेक इंजिने नुसती पडून होती किंवा त्यांच्याकडून पुरेसे काम करवून घेतले जात नव्हते. याचे कारण असे की, त्यांच्या द्वारे होणाऱ्या उत्पादनाचे प्रमाण आणि त्याचा खप लक्षात घेता त्यांचा वापर करणे फायदेशीर ठरत नसे. परंपरागत उद्योगांमध्ये मालाची मागणी लक्षात घेता प्रचलित तंत्राचा वापर पुरेसा होता. सुधारलेल्या तंत्राचा वापर करण्याइतकी मागणीत वाढ झालेली नव्हती.

भारतामध्ये बाष्प युगाचा प्रारंभ १८१९ सालापासून झाला. त्या वर्षी अवधचे नबाब गाझीउद्दीन हैदर (१८१४–१८२७) यांनी गोमती नदीवर एक छोटी बाष्पनौका चालू केली. त्याच्या पुढच्या वर्षी श्रीरामपूरच्या डॅनिश वसाहतीत वाफेच्या इंजिनाच्या साहाय्याने चालणारी एक कागदाची गिरणी सुरू झाली. याच सुमारास कलकत्ता बंदरामध्ये नदीच्या तळातील गाळ काढण्यासाठी कंपनीने ८ अश्वशक्तीचे एक वाफेचे इंजिन उपयोगात आणले.[४६अ] मेसर्स किड अँड कंपनी यांनी १८२३ साली ३२ अश्वशक्तीची 'दियाना' नावाची आगबोट तयार करून ती पाण्यात सोडली होती. त्यानंतर लौकरच अनेक आगबोटी वापरात येऊ लागल्या. १८२५–२६ च्या सुमारास कलकत्त्याच्या टांकसाळीत वाफेची ५ यंत्रे बसविण्यात आली होती. ती सर्व मिळून १३८ अश्वशक्तीची होती. १८३० नंतरच्या दशकात वाफेची काही यंत्रे खाणींतून

४६अ. मुंबईच्या गोदीमध्ये दुरुस्तीची कामे करण्याच्या भागातून पाणी बाहेर काढण्यासाठी एक वाफेचे इंजिन यापूर्वीच म्हणजे १८१३ च्या सुमारास उपयोगात आणले गेले होते. पाहा:– सी. एन्. पार्किन्सन, 'ट्रेड इन दि ईस्टर्न सीज, १७९३–१८१३ ', ( लंडन, १९३७ ), पृ. २५५.

वापरण्यात येऊ लागली होती.[४७] स्थानिक लोहारांना प्रशिक्षण देऊन उत्कृष्ट यंत्रचालक बनविण्यामध्ये कसलीच अडचण निर्माण झाली नाही. मार्क्सने ही वस्तुस्थिती नमूद केली आहे. भारतातील नियोजित रेलमार्गाच्या संभाव्य परिणामांविषयी या वस्तुस्थितीने त्याला काहीसे विशेष आशावादी बनविले होते. तो लिहितो :–[४८]

"म्हणून, भारतामध्ये आगगाडीचा प्रारंभ खरोखरी आधुनिक उद्योगधंद्यांचा श्रीगणेशा ठरेल. खुद्द ब्रिटिश अधिकाऱ्यांनीच हिंदूंना सर्वस्वी नवीन प्रकारच्या परिश्रमाशी जुळवून घेण्याची आणि यंत्रांविषयीचे आवश्यक ज्ञान प्राप्त करून घेण्याची विशिष्ट योग्यता मिळविण्याची परवानगी दिली आहे. यामुळे हे भाकीत अधिक ठामपणे खरे ठरेल. कलकत्त्याच्या टांकसाळीत स्थानिक यंत्रज्ञ अनेक वर्षांपासून वाफेची यंत्रे चालविण्याचे काम करीत आहेत. तसेच, हरद्वारच्या कोळशाच्या खाणींमध्ये अनेक वाफेच्या यंत्रांशी देशी लोकांचा संबंध आलेला आहे. हे लोक ज्या कार्यक्षमतेने व तज्ज्ञपणे हे काम करीत आहेत त्यावरून आणि इतर घटनांवरून या विधानाला भरपूर पुष्टी मिळते."

आपल्या या अपेक्षा खोटया ठरल्या असून, विकासाच्या वसाहतवादी पद्धतीमुळे आगगाडया कमीअधिक प्रमाणांत 'हिंदूंच्या दृष्टीने निरुपयोगी' ठरल्या आहेत, हे प्रत्यक्ष पाहाण्याइतके आयुष्य काल मार्क्सला लाभले.

मतिलाल, द्वारकानाथ व रामगोपाल यांच्यापैकी प्रत्येकाजवळ स्वतःच्या आगबोटी होत्या. द्वारकानाथांनी १८३० नंतरच्या दशकात वाफेच्या यंत्राच्या साहृयाने साखर–गिरणी चालविण्याचे केलेले प्रयोग उद्‌बोधक आहेत. त्यांनी आपल्या इंग्रज व्यवस्थापकाला मॉरिशसमधील साखर-उत्पादनाची माहिती शिकून येण्यासाठी तिकडे पाठविले होते. सतत तीन वर्षे प्रयत्न करूनही त्यांच्या साखरेचा उत्पादनखर्च देशी पद्धतीने तयार केल्या जाणाऱ्या साखरेच्या बाजारभावापेक्षा कितीतरी अधिक राहिला. वारंवार प्रयोग करण्यापायी त्यांना एकूण २ लाख रुपये खर्च आला. अखेर त्यांना देशी पद्धतीकडे वळणे भाग पडले. "अद्यापिही मी मोठया प्रमाणावर साखर तयार करतो.", द्वारकानाथांनी कलकत्ता कमिटी ऑफ एमिग्रेशन (१८३८–४०) ला कडवटपणे सांगितले, "परंतु मी स्थानिक लोकांकडून गूळ विकत घेतो, आणि जेव्हा मी स्वतः ऊसाचे उत्पादन करून त्याचा रस उकळत होतो तेव्हा साखर तयार करण्यासाठी मला जेवढा खर्च येत असे त्याच्या एकचतुर्थांश खर्च आता मला साखर तयार करण्यास येतो."[४९] या उदाहरणामध्ये नवीन तंत्रज्ञान मिळविण्यातील अडचण हा मुद्दा नव्हता–हे तंत्रज्ञान परदेशातून मिळविता येण्यासारखे होते–तर बाजारपेठेची किंवा साखरेच्या खपाची मर्यादितता हा खरा मुद्दा होता. शेतकऱ्यांजवळ त्यांच्या उदरनिर्वाहापुरतेच उत्पादन ठेवून त्यांचे संपूर्ण शोषण करण्याच्या ब्रिटिशपूर्वकाळातील धोरणामुळे आणि त्या काळी जगातील सर्वांत मोठया व झपाटयाने व्यापक

---

४७. बर्नस्टीन, टीप क्र. ३२, पृ. २८–३३.

४८. कार्लमार्क्स, 'दि फ्यूचर रिझल्ट्स ऑफ ब्रिटिश रूल इन इंडिया', 'न्यूयॉर्क डेली ट्रिब्यून', ८ ऑगस्ट १८५३.

मी असे सुचवितो की पुढे उद्धृत केलेल्या मजकुरामध्ये 'हरद्वार' ऐवजी 'बरद्वान' असे वाचावे. बहुधा ही छपाईची चूक असावी. आतापर्यंत एकाही संपादकाला अथवा प्रकाशकाला या संभाव्य मुद्रणदोषाची कल्पना आलेली दिसत नाही, ही आश्चर्याची गोष्ट आहे.

४९. पाहा : एन्. सी. सिन्हा, टीप क्र. ४०, पृ. ८३-८४.

बनत असलेल्या ब्रिटनच्या साखरेच्या बाजारपेठेत प्रवेश करण्यास बंगालच्या साखरेवर घालण्यात आलेल्या निर्बंधांमुळे ही परिस्थिती जास्तच बिकट बनली होती. १८३६ साली वेस्ट इंडीज व बंगाल यांच्या साखरेवर ब्रिटनमध्ये असलेल्या आयात-करात समानता आणण्यात आल्यानंतर देखील बंगालच्या रम (मद्य) विरुद्ध असलेला भेदभाव चालूच राहिला.

याखेरीज काही अंतर्गत विरोधी घटकही विद्यमान होते. बंगाली पुंजीजीवी वर्ग ग्रामीण अर्थव्यवस्थेला सरंजामशाहीच्या तावडीतून मुक्त करण्यास तयार नव्हता. किंबहुना, कायमधारा पद्धतीमुळे निर्माण झालेले नवीन सरंजामशाही संबंध कायम टिकवून ते अधिक मजबूत बनविण्याची त्यांची इच्छा होती. निळीच्या उत्पादनपद्धतीला त्यांचा विरोध होता, असे आपण वर पाहिले आहे. हा विरोधही शेतकरी वर्गावर आपली पकड मजबूत बनविण्याच्या आकांक्षेतूनच निर्माण झालेला होता. जुने राजकीय व सामाजिक निर्बंध नाहीसे झाले होते, आणि मालमत्तेचे अधिकार व न्यायप्रणाली यांसंबंधीची ब्रिटिश संकल्पना प्रस्थापित झाली होती. शिवाय शेतीचेही वाढत्या प्रमाणावर वाणिज्यीकरण होऊ लागले होते. या सर्व गोष्टींमुळे जमीनदार, व्यापारी व सावकार यांचे सामर्थ्य खूपच वाढले होते. बंगाली पुंजीजीवी वर्गामध्ये या दोन्ही वर्गाचे पुष्कळ अंशी मिश्रण झालेले होते. त्यामुळे वसाहतवादाच्या शृंखला तोडून आगेकूच करण्यासाठी शेतकरी वर्गाने सुरू केलेल्या संघर्षामध्ये आपलेही हित आहे हे त्याला समजले नाही व त्यात तो वर्ग सामील झाला नाही.

ब्रह्मसमाज आणि तरुण बंगाल या दोन्ही आंदोलनांनी परदेशातून आयात झालेल्या भांडवलशाही विचारप्रणालीचे अग्रदूत म्हणूनच कार्य केले. परंतु या विचारप्रणालीचे प्रवर्तक व अनुयायी असणाऱ्या या लोकांचे स्वरूप मूलतः पाश्चात्यांचे दलाल हे होते आणि उत्पादन-प्रक्रियेमध्ये त्यांची पाळेमुळे रुजलेली नव्हती. यामुळे ज्या वर्गाचे त्यांनी प्रतिनिधित्व केले तो दुर्बळच राहिला. या मंडळींनी कितीही जहाल घोषणा केल्या असल्या तरी १८५७ साली ज्या लोकांनी बंड केले त्यांना त्यांनी तोंडघशीच पाडले. या नवीन विचारप्रणालीचा संदेश ग्रामीण भागातील छोट्या मध्यम वर्गापर्यंत-लहान जमीन मालकांपर्यंत-नेऊन पोचविण्यात आला असता तर भारताच्या पहिल्या स्वातंत्र्ययुद्धामध्ये स्वातंत्र्यसैनिकांना आपल्या नेतृत्वासाठी ऱ्हासशील अभिजात वर्गाकडे (decadent aristocracy) कदाचित पाहावे लागले नसते. १८४६-४८ च्या आर्थिक अरिष्टामुळे बंगालची अर्थव्यवस्था व प्रवृत्तीही नंतरची अनेक वर्षे अवरुद्ध राहिली. स्थानिक उद्यमशीलतेचे साधनस्रोत सुकून गेले आणि औद्योगीकरणाच्या दिशेने घडलेल्या प्रारंभीच्या घटना निष्फळ ठरल्या.

## प्रादेशिक प्रतिमानांच्या दृष्टीने सुसंबद्ध मुद्दे

वर ज्या अडथळ्यांचे विवेचन करण्यात आले आहे त्यांपैकी अनेक अडथळे बंगाल व गुजरात या दोन्ही प्रदेशांच्या बाबतीत समान होते. तरी पण गुजराती पुंजीजीवी वर्गाने अधिक चांगली कामगिरी बजावली. त्याची कारणे अशी :-

१. निदान १७व्या शतकापासून तरी व्यापार व कृषिउत्पादनातील विशेषज्ञता या बाबतीत ते लोक सतत आघाडीवर होते.

२. औद्योगीकरणाच्या दिशेने करावयाच्या वाटचालीच्या प्रारंभिक काळात बंगाल इलाख्याला इंग्रजांच्या स्पर्धेला जेवढे तोंड द्यावे लागले त्या मानाने पश्चिम भारतात ही स्पर्धा कमी होती. बंगाल प्रांत ब्रिटिशांच्या आधिपत्याखाली सर्वांत आधी आला होता. त्यामुळे तेथे इंग्रज अधिकारी व मुक्त व्यापारी यांची संख्या सर्वांत अधिक होती. त्यांच्या बाबतीत बंगालची अर्थव्यवस्था म्हणजे एक मोकळे कुरणच बनले होते.

३. गुजरात्यांना दर्यावर्दीपणाची परंपरा होती. समुद्रपर्यटन त्यांना निषिद्ध नव्हते. बंगालच्या निदान निम्म्या लोकसंख्येच्या बाबतीत तरी अशी स्थिती नव्हती.

४. पश्चिम भारतातून मध्यपूर्वेकडे सुलभतेने जाता येई. मध्यपूर्वेचा हा भाग आर्थिक दृष्ट्या अधिक लाभप्रद होता. त्या मानाने बंगालचे ज्या आग्नेय आशियाशी सुलभ दळणवळण होते तो भाग फारसा लाभदायक नव्हता.

५. भारतातून लंडनकडे जाणाऱ्या संपत्तीचा पुरवठा हा जवळजवळ पूर्णपणे बंगालमधून होत होता. याचे कारण असे की, आपण ज्या कालखंडाचा विचार करीत आहोत त्या काळात बंगालमधून जो पैसा जबरदस्तीने वसूल केला जात असे त्यातील काही भाग ब्रिटिश लष्करी यंत्रणेकडून पश्चिम व दक्षिण भारतात खर्च करण्यात येत असे.

६. पश्चिम भारतात मुंबईतील गोद्या कंपनीच्या मालकीच्या होत्या; आणि तेथील जहाजबांधणीचे काम १८ व्या शतकाच्या सुरुवातीपासून संपूर्णपणे गुजराती (पारशी) निर्मात्यांकडून केले जात असे. सुरतेला तर त्याच्याही आधीपासून जहाज बांधणीचे काम चालू होते. बंगालमध्ये मुंबईप्रमाणे कंपनीच्या मालकीच्या गोद्या नव्हत्या. तेथे जहाजबांधणीचे काम जवळजवळ पूर्णपणे खासगी युरोपीय कंपन्यांकडून केले जाई. तेथील जहाजनिर्मातेही युरोपीय लोकच असत. या वस्तुस्थितीमुळे मुंबई व कलकत्ता येथील परिस्थितीत खूपच फरक पडला. मुंबईच्या गोद्यांमध्ये व्यावहारिक तंत्रज्ञानात्मक कौशल्याचा सतत विकास होत गेला; परंतु कलकत्त्यामध्ये या बाबतीत बंगाल्यांजवळ फारच मर्यादित साधने होती.

७. पश्चिम महाराष्ट्रात रयतवारी पद्धत अस्तित्वात असल्यामुळे सुखवस्तू शेतकऱ्यांचा एक वर्ग तेथे विद्यमान होता. बंगालमध्ये असा वर्ग त्या मानाने जवळजवळ नव्हताच म्हटले तरी चालेल.

८. ' बंगालमध्ये आज जो विचार उदयास येतो तो उद्या सर्व भारतात पसरतो ', असे जे त्या काळाबद्दल म्हटले जाई तेही खरे नव्हते. आधुनिकीकरणाच्या अनेक प्रारंभिक प्रयत्नांमध्ये, या कालखंडात, गुजराती लोक बंगाल्यांच्या पुष्कळ पुढे होते.

९. शिवाय, भारतातील बडे भांडवलदार किंवा पुंजीजीवी (bourgeoisie) म्हणून प्रथम गुजराती व नंतर मारवाडी लोक उदयास आले. त्याचा प्रारंभ गुजराती पुंजीजीवी लोकांपासून झाला होता. १८५७ च्या पूर्वी प्रारंभिक भांडवलशाहीचा जो काळ निर्माण झाला होता तो निष्फळ ठरल्यामुळे १९व्या शतकाच्या उत्तरार्धातील अधिक कठीण परिस्थितीत बंगालला पुन: नव्याने सुरुवात करावी लागली. तोपर्यंत पगारदार व धंदेवाईक लोकांचा नवा वर्ग औद्योगीकरणाकडे वळला होता. त्यामुळे बंगाली पुंजीजीवी वर्ग लघुउद्योगांचे प्रतिनिधित्व करू लागला. हे उद्योग फारसे टिकाव धरू शकले नाहीत. तरी पण या वेळेपर्यंत बंगाली पुंजीजीवी वर्गही एक महत्त्वाचा घटक बनला होता. त्यांनी पूर्वीच्या सत्ताधारी पक्षांशी असलेली आपली निष्ठा बदलून प्रादेशिकतेचे जोरदार प्रतिनिधित्व करणाऱ्या संयुक्त आघाड्यांकडे ती वळविली होती.

१०. फक्त पंजाबमध्येच आपल्याला उत्पादन-प्रक्रियेत समरस झालेले कारागीर व उत्पादक हळूहळू छोटे भांडवलदार म्हणून पुढे येत असलेले या काळात आढळून येतात. त्यामुळे बाजार-पेठेतील परिस्थितीशी जुळवून घेण्याइतके ते तंत्रज्ञानाच्या बाबतीत प्रगतिशील व उपक्रमशील असल्याचे आढळून येते. पंजाबचा झपाट्याने जो विकास झाला त्याचे श्रेय इतर गोष्टींबरोबरच या नव्या प्रकारच्या उद्यमशील लोकांच्या ओघाला आहे.

माझ्या अभ्यासनातून निष्पन्न होणारी उद्यमशीलतेची वेगवेगळी प्रादेशिक प्रतिमाने ही अशी आहेत.

# भारताचा आर्थिक इतिहास

## ( १५२६-१९०० )

### अभ्यासवाङ्मयसूचीविषयक निबंध

नसीब बेंजामिन

भारताचा आर्थिक इतिहास ही अर्थशास्त्र व इतिहास या दोन्ही विषयांतील एक दुर्लक्षित शाखा आहे. भारतीय अर्थशास्त्रज्ञ सामान्यतः भूतकाळाकडे दुर्लक्ष करून वर्तमानकाळातील समस्यांवरच आपले लक्ष केंद्रित करीत आले आहेत. मानवी संस्थांचा अभ्यास हा प्रामुख्याने सातत्यांचा अभ्यास असतो आणि म्हणून आपण कोणताही पैलू घेतला तरी वर्तमानकाळाप्रमाणेच भूतकाळातही प्रवेश करणे अपरिहार्य असते, या वस्तुस्थितीला त्यांनी पुरेसे महत्त्व दिलेले दिसत नाही. इतकेच नव्हे तर बहुतेक भारतीय इतिहासकारांनी आर्थिक इतिहासाला राजकीय, प्रशासकीय व सामाजिक इतिहासांच्या मानाने दुय्यम किंवा गौण स्थान दिलेले आहे; आणि एकूण चित्र पुरे करण्यासाठी एखाद्या विशिष्ट कालखंडातील आम जनतेच्या आर्थिक परिस्थितीची स्थूल रूपरेखा देण्यावरच समाधान मानले आहे. याची अत्यंत ठळक उदाहरणे म्हणजे ' दि केम्ब्रिज हिस्टरी ऑफ इंडिया ' (एस्. चंद अँड कं., नवी दिल्ली), खंड ४, ५ व ६ आणि ' दि हिस्टरी अँड कल्चर ऑफ दि इंडियन पीपल ' (भारतीय विद्याभवन, मुंबई), खंड ९ व १० ही होत. तरी पण या विषयासंबंधी वेळोवेळी ग्रंथ व निबंध प्रकाशित होत आलेले आहेत; आणि त्यांची सूची व विश्लेषण करण्याचेही अनेक प्रयत्न झालेले आहेत. या दिशेने झालेला पहिला प्रयत्न डब्ल्यू. एच्. मोरलँड यांनी केलेला होता. ' रीसेंट वर्क इन इंडियन एकॉनॉमिक हिस्टरी ' हा त्यांचा लेख ' दि एकॉनॉमिक हिस्टरी रिव्ह्यू 'च्या खंड २, अंक १, जानेवारी १९२१ च्या अंकात प्रकाशित झाला होता. दुसरा प्रयत्न एम्. डी. मॉरिस आणि बी. स्टेइन यांनी केला होता. ' दि एकॉनॉमिक हिस्टरी ऑफ इंडिया : ए बिब्लिओग्राफिक एसे ' हा त्यांचा निबंध ' दि जर्नल ऑफ एकॉनॉमिक हिस्टरी ' खंड २१, अंक २, जून १९६१च्या अंकात प्रकाशित झाला होता. तिसरा प्रयत्न खूपच लहान प्रमाणावर झालेला होता. तो टी. रायचौधुरी व ई. एन्. कोमारोव्ह यांनी केलेला होता. टी. रायचौधुरी यांनी संपादित केलेला ' काँट्रिब्यूशन्स टु इंडियन एकॉनॉमिक हिस्टरी ' खंड १।२ (फिरमा के. एल्. मुखोपाध्याय, कलकत्ता १९६० आणि १९६३) हा ग्रंथ म्हणजे लेखांचा संग्रह आहे. इतर लेखांबरोबर त्यांचा स्वतःचाही एक लेख त्यात आहे. त्याचे शीर्षक, ' सम रीसेंट रायटिंग्ज ऑन दि ब्रिटिश इंडियन एकॉनॉमिक हिस्टरी ' असे आहे. त्यात १४ ग्रंथांचे परीक्षण करण्यात आले आहे. रशियन भाषेचे चांगले ज्ञान असणाऱ्यांना ई. एन्. कोमारोव्ह यांचा ' सर्व्हे ऑफ रशियन प्रीरेव्होल्यूशनरी अँड सोव्हिएट स्टडीज ऑन मॉडर्न इंडियन एकॉनॉमिक हिस्टरी ' हा लेखही उपयुक्त वाटेल; कारण त्यामध्ये या विषयासंबंधी प्रामुख्याने रशियन भाषेत असलेल्या ग्रंथांचीच सूची देण्यात आलेली आहे.

प्रस्तुत लेखामध्ये या विषयावरील सर्व महत्त्वाच्या ग्रंथांची व्यापक सूची देऊन त्यांचे

थोडक्यात मूल्यमापन करण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे. या पूर्वीच्या अभ्यासवाङ्मयसूचीविषयक निबंधांच्या प्रकाशनापूर्वी आणि नंतर प्रसिद्ध झालेली पुस्तके आणि लेख[1] यांचा समावेश या लेखात करण्यात आलेला आहे. केवळ इंग्रजी भाषेत आलेल्या अभ्यासग्रंथांचीच पाहाणी येथे करण्यात आलेली आहे. अर्थात् आतापर्यंत या क्षेत्रातील सर्वांत महत्त्वाचे संशोधन इंग्रजीतूनच झालेले आहे.

उपलब्ध साहित्याचे वर्गीकरण करतांना १७५७ हे वर्ष विभाजन-रेखा म्हणून गृहीत धरलेले आहे. त्यामुळे या विषयातील पुस्तके प्रथम कालखंड (१५२६–१७५७) किंवा द्वितीय कालखंड (१७५७–१९००) यांपैकी कोणत्या तरी एका कालखंडांत समाविष्ट करण्यात आलेली आहेत. अर्थात् या दोन्ही कालखंडांशी संबंधित असणाऱ्या ग्रंथांचे असे वर्गीकरण करणे कठिण आहे, यात शंका नाही. ही अडचण टाळण्यासाठी ज्या कालखंडाशी अशा पुस्तकांचा अधिक निकटचा संबंध असेल त्यात त्यांचा समावेश करण्यात आलेला आहे. परंतु विषयाचे सातत्य टिकून राहावे यासाठी भारताशी असणाऱ्या युरोपीय लोकांच्या व्यापारविषयक व्यवहारांशी संबंधित ग्रंथ, ते १७५७ पूर्वीच्या व्यवहारांविषयी असले तरी दुसऱ्या कालखंडात समाविष्ट करण्यात आलेले आहेत. शिवाय अखिल भारतीय व सर्वसमावेशक स्वरूपाच्या अभ्यासांचे विवेचन सामान्यत: प्रथम करण्यात आलेले असून विशिष्ट स्वरूपाच्या व प्रादेशिक अभ्यासांची चर्चा त्यानंतर करण्यात आली आहे.

**प्रथम कालखंड (१५२६–१७५७)**

या कालखंडातील भारतीय अर्थेतिहासाचे सर्वांत जुने अभ्यासक डब्ल्यू. एच्. मोरलँड हे आहेत, यात मुळीच शंका नाही. 'इंडिया अॅट दि डेथ ऑफ अकबर : अॅन एकॉनॉमिक स्टडी', (मॅकमिलन अँड कं. लि., लंडन, १९२०) या त्यांच्या ग्रंथात सोळाव्या शतकाच्या अखेरीस व सतराव्या शतकाच्या सुरुवातीस उत्तर भारताची एकूण आर्थिक स्थिती कशी होती याचे विवेचन करण्यात आले आहे. 'फ्रॉम अकबर टु औरंगजेब : ए स्टडी इन इंडियन एकॉनॉमिक हिस्टरी' (मॅकमिलन अँड कं. लि., लंडन, १९२०) या आपल्या दुसऱ्या ग्रंथात त्यांनी आपले विवेचन जहांगीर व शहाजहान यांच्या राजवटीपर्यंत पुढे नेले आहे. विषयाच्या परिपूर्णतेसाठी 'अॅग्रेरियन सिस्टिम ऑफ मुस्लिम इंडिया,' (डब्ल्यू. हेफर अँड सन्स लि. केंब्रिज, १९२९) या त्यांच्या तिसऱ्या ग्रंथाचाही उल्लेख येथे करणे आवश्यक आहे. या ग्रंथात आर्थिक जीवनाच्या केवळ एकाच पैलूचा विचार करण्यात आलेला असला तरी इतर दोन ग्रंथांच्या जोडीने याचेही वाचन केल्यास ते उपयुक्त ठरेल. हे तीन्ही ग्रंथ खरोखरी अत्यंत उच्च कोटीचे आहेत. परंतु या विषयाच्या बाबतीतील मोरलँड यांची सर्वांत मोठी देणगी म्हणजे प्रथमच त्यांनी भारताच्या आर्थिक इतिहासाचा शोध घेण्यासाठी बिगर इंग्लिश युरोपीय साधनसामग्रीचा वापर केला ही होय. त्यायोगे त्यांच्या मागून येणाऱ्यांना साधनसामग्रीची नवी भांडारे उघडी झाली. या संबंधी मार्गारेट एच्.

---

१. लेखांचा उल्लेख तळटीपांमध्ये करण्यात आलेला आहे. व्यावहारिक अडचणींमुळे फक्त महत्त्वाच्या लेखांचाच उल्लेख करण्यात आलेला आहे. त्याच लेखकांनी लिहिलेल्या ग्रंथांवर आधारलेले लेख गाळण्यात आले आहेत. इंडियन हिस्टरी कॉंग्रेसमध्ये (भारतीय इतिहास परिषदेत) वेळोवेळी सादर करण्यात आलेले निबंध यात समाविष्ट करण्यात आलेले नाहीत, कारण त्यांचे फक्त सारांशच प्रकाशित झालेले आहेत. तसेच, इंडियन हिस्टॉरिकल रेकॉर्ड्स कमिशनला (भारतीय ऐतिहासिक अभिलेख महामंडळाला) सादर करण्यात आलेले निबंध साधनसामग्रीच्या स्वरूपातील असल्यामुळे तेही गाळले आहेत.

केस यांचा अभिप्राय अगदी यथोचित वाटतो : " १९२० साली मोरलंड यांनी आपल्या साधन-सामग्रीची व्याप्ती खूपच वाढविली आणि तिच्यात ब्रिटिश, फ्रेंच व पोर्तुगीज लोकांनी त्या-त्या भाषांमध्ये व लॅटिन भाषेत लिहिलेल्या प्रवासवर्णनांचा समावेश केला. डच साधनसामग्रीचा सुगावा लागताच त्यांनी तावडतोब डच भाषा शिकण्यास सुरुवात केली; आणि जुनी ब्रिटिश हस्तलिखिते वाचण्याची ज्यांना सवय आहे त्यांना जुनी डच भाषा अगदी सहज शिकता येते, असे सांगून इतरांनीही आपल्याप्रमाणे डच भाषा शिकावी असे त्यांनी आग्रहाने प्रतिपादले. " (' दि हिस्टॉरिकल क्रॅफ्ट्समनशिप ऑफ डब्ल्यू. एच्. मोरलंड, ' दि इंडियन एकॉनॉमिक अँड सोशल हिस्टरी रिव्ह्यू, खंड, २, अंक ३, जुलै १९६६. या पुढे या नियतकालिकाचा उल्लेख ' इंएसोहिरि ' असा करण्यात आलेला आहे.) मोरलंड यांचे ग्रंथ प्रमाणभूत संदर्भग्रंथ समजले जाऊ लागले. तथापि, ब्रिटिश अमदानीपेक्षा मुगल अमदानीत भारतीय जनता कमी सुखी होती, अशी जी भूमिका मोरलंड यांनी घेतली, तिच्याविषयी वादंग माजले आणि पुराव्यासह किंवा पुराव्या-शिवाय, याहून वेगळी भूमिका घेतली जाऊ लागली.

या काळासंबंधी आणखी काही सर्वांगीण ग्रंथ उपलब्ध आहेत. एच्. एल्. छबलानी यांचा ' दि एकॉनॉमिक कंडिशन ऑफ इंडिया ड्यूरिंग दि सिक्स्टीन्थ सेंचुरी ' (ऑक्सफर्ड बुक अँड स्टेशनरी कंपनी, दिल्ली, १९२९) हा ग्रंथ मुख्यतः युरोपीय लोकांची प्रवासवर्णने आणि अबुल फजलचा ' ऐने अकबरी ' यांवर आधारलेला आहे. त्यांनी या साधन सामग्रीची फारशी चिकित्सा न करिता तिचा वापर केला आहे. सोळाव्या शतकातील भारत म्हणजे ' सुवर्णभूमी ' होती अशी त्यांची श्रद्धा आहे. त्यांच्या मते शेती, उद्योग व व्यापार यांचा येथे चांगला विकास घडून आलेला होता; आणि सोन्याचांदीची प्रचंड आयात होत असतांनाही येथील सर्वसामान्य किमतींवर त्याचा काही परिणाम झालेला नव्हता. या कालखंडात उत्पादनामध्ये झपाट्याने जी वाढ झाली तिच्यामुळे हे घडले, असे त्यांना वाटते. एस्. एस्. कुलश्रेष्ठ यांच्या ' दि डेव्हलपमेंट ऑफ ट्रेड अँड इंडस्ट्री अंडर दि मुगल्स (१५२६–१७०७) ', (किताबमहल, अलाहाबाद, १९६४) या ग्रंथात आर्थिक जीवनाच्या बहुतेक सर्व पैलूंचा विचार करण्यात आलेला आहे. लेखक अधून-मधून मुगल-पूर्व भारतातील आर्थिक परिस्थितीचीही वाचकाला थोडीबहुत कल्पना आणून देतात. त्यांचा दृष्टिकोण परिमाणात्मक किंवा संख्यात्मक (quantitative) आहे. परंतु ते आकड्यांचे वजन न पारखता आकडेवारीचा वापर करतात. या ग्रंथाचे सर्वात मोठे वैगुण्य असे की फारसी साधनसामग्रीव्यतिरिक्त लेखकाने दुय्यम स्वरूपाच्या साधनसामग्रीचा, मुख्यतः मोरलंड यांच्या ग्रंथांचा, वेसुमार वापर केला आहे. परिणामतः, एकंदरीने पाहता, हा संशोधन-ग्रंथ बनण्याऐवजी ते एक पाठ्यपुस्तक बनले आहे.[२] तिसरा ग्रंथ राधाकमल मुखर्जींचा

---

२. या संदर्भात खालील लेखही पाहावेत :—

(१) थॉमस, पी. जे., ' इंग्लंड्स डेट टु इंडियन हँडीक्रॅफ्ट्स: ॲन अकाउंट ऑफ दि बिगिनिंग्ज ऑफ कॅलिको प्रिंटिंग इन इंग्लंड ', इंडियन जर्नल ऑफ एकॉनॉमिक्स ( यापुढे या नियतकालिकाचा उल्लेख ' इंजए ' असा करण्यात आला आहे ) खंड १२, अंक ४, १९३२.

(२) सतीश चंद्र, ' कमर्शियल ॲक्टिव्हिटीज ऑफ दि मुगल एम्परर्स ड्यूरिंग दि सेव्हन्टीन्थ सेंचुरी ', बेंगॉल पास्ट अँड प्रेझेंट ( यापुढे याचा उल्लेख ' बेंपाप्रे ' असा करण्यात आला आहे ), खंड ७८, भाग १, १९५९.

(३) अरसरत्नम्, एस्., ' इंडियन मर्चंट्स अँड देअर ट्रेडिंग मेथड्स ( इ. स. सुमारे १७०० )', ' इंएसोहिरि ', खंड ३, अंक १, १९६६.

'एकॉनॉमिक हिस्टरी ऑफ इंडिया, १६००–१८००', (किताबमहल, अलाहाबाद, १९६७) हा आहे. सर्व-सामान्य प्रवाहांचे विश्लेषण त्यात करण्यात आले आहे. इ. स. १६०० पासून १९३८ पर्यंत रुपयाच्या क्रयशक्तीला आणि उत्तर प्रदेशातील वास्तविक वेतनांच्या पातळीला जी उतरती कळा लागलेली होती त्याचे उद्‌बोधक विवेचन लेखकाने या ग्रंथात केले आहे.

या ठिकाणी आणखी दोन ग्रंथांचा उल्लेख केला पाहिजे. त्यांपैकी एक ब्रिजनारायण यांचा 'इंडियन एकॉनॉमिक लाइफ पास्ट अँड प्रेझेंट' (उत्तरचंद कपूर सन्स, लाहोर, १९२९) हा आहे. यातील पहिली पाच प्रकरणे इतिहासविषयक असून त्यांत मुगल कालखंडाचा काही भागही आलेला आहे. लेखकाचा एकूण निष्कर्ष असा आहे: "काही झाले तरी, सोळाव्या शतकाची शेवटची दोन दशके आणि सतराव्या शतकाची पहिली पंचवीस वर्षे या कालखंडाच्या बाबतीत आपल्याजवळ असा भरपूर विश्वसनीय पुरावा उपलब्ध आहे की ज्यावरून भारतामध्ये सर्वसामान्य काळात अत्यंत सुबत्ता होती व जीवनमान खूप स्वस्ताईचे होते, असे म्हणता येते. तसेच, सामान्य मजूर व कारागीर यांना मिळणाऱ्या मजुरीसंबंधीचा सारा पुरावा लक्षात घेता ते सुखासमाधानाने जगत होते याविषयी शंका उरत नाही." अकबराच्या मृत्यूच्या काळी असणाऱ्या भारतापेक्षा विसाव्या शतकाच्या सुरुवातीस असणारा भारत कितीतरी अधिक सुखी होता, हे मोरलँड यांचे विधान त्यांनी तर्कशुद्धपणे खोडून काढले आहे. त्यावर हा निष्कर्ष आधारलेला आहे. दुसरा ग्रंथ 'रीडिंग्ज इन इंडियन एकॉनॉमिक हिस्टरी', सं. बी. एन्. गांगुली, (एशिया पब्लिशिंग हाउस, मुंबई, १९६४) हा आहे. त्याचे पाच भाग असून दुसऱ्या भागात मध्ययुगातील शेती, उद्योग व व्यापार यांसंबंधीचे लेख आहेत.

अर्थात, मुगलकालीन भारताच्या आर्थिक इतिहासासंबंधी आणखीही काही ग्रंथ आहेत, हे खरे; परंतु त्यांमध्ये आर्थिक जीवनाच्या एका विशिष्ट पैलूसंबंधीच विचार करण्यात आलेला आहे. त्यांपैकी इ. हबीब यांच्या 'दि अ‍ॅग्रेरियन सिस्टिम ऑफ मुगल इंडिया' (एशिया पब्लिशिंग हाउस, मुंबई, १९६३) या ग्रंथाचा प्रथम उल्लेख करण्यास हरकत नाही. अधिक परिचित साधन-सामग्रीव्यतिरिक्त समकालीन प्रशासकीय नोंदी, पत्रे इत्यादि फारसी हस्तलिखितांचाही या ग्रंथामध्ये वापर करण्यात आला आहे. संपूर्ण कृषि-अर्थव्यवस्थेचा सर्वांगीण विचार या ग्रंथात करण्यात आलेला आहे. या ग्रंथाच्या शेवटच्या प्रकरणामध्ये मुगल साम्राज्यातील कृषिविषयक पेचप्रसंगाचे विवेचन करण्यात आले आहे.[3] यामध्ये एन्. ए. सिद्दीकी यांच्या पुढील पुस्तकाची भर घालणे उपयुक्त ठरेल: 'लँड रेव्हेन्यू अ‍ॅडमिनिस्ट्रेशन अंडर दि मुगल्स, १७००–१७५०', (एशिया पब्लिशिंग हाउस, मुंबई, १९७०). लेखकाने केवळ मुगलांच्या जमीन महसूल प्रशासनाच्या स्थूल बाबींची माहिती दिली आहे. प्रादेशिक तफावतींची चर्चा त्याने टाळली आहे. लेखकाचे

---

३. या संदर्भात पुढील लेखही पाहावेत :—
(१) ग्रोव्हर, बी. आर., 'नेचर ऑफ लँड-राइट्स इन मुगल इंडिया', कित्ता, खंड १, अंक १, १९६३.
(२) नूरुल हसन, एस्., 'दि पोझिशन ऑफ दि जमीनदार्स इन मुगल एम्पायर', कित्ता, खंड १, अंक ४, १९६४.
(३) ग्रोव्हर, बी. आर., 'नेचर ऑफ देहात-ए-तअल्लुका (जमीनदारी व्हिलेजेस) अँड दि इव्होल्यूशन ऑफ दि ताल्लुकदारी सिस्टिम ड्यूरिंग दि मुगल एज', कित्ता, खंड २, अंक २–३, १९६५–६६.
(४) हबीब, आय., 'एव्हिडन्स फॉर सिक्स्टीन्थ सेंचुरी अ‍ॅग्रेरियन कंडिशन्स इन दि गुरु ग्रंथसाहेब', कित्ता, खंड १, अंक ३, १९६४.

म्हणणे असे की मुख्यत: १७१२ साली बहादुरशहाचे निधन झाल्यानंतरच 'इजारा' पद्धती म्हणजे खालसा जमिनींचा महसूल गोळा करण्याची पद्धती सार्वत्रिक झाली.

एच्. के. नक्वी यांच्या 'अर्बन सेन्टर्स अँड इंडस्ट्रीज इन अपर इंडिया, १५५६–१८०३' (एशिया पब्लिशिंग हाउस, न्यूयॉर्क, १९६८) या ग्रंथात आग्रा, दिल्ली, लाहोर, पाटणा व बनारस या शहरांचा तेथे चालणाऱ्या उद्योगांच्या, विशेषत: सुती कापडाच्या उद्योगाच्या संदर्भात विचार करण्यात आला आहे. त्या काळामध्ये नागरीकरणाकडे निश्चित कल असल्याचे आढळून येते. याचा अर्थ असा की उद्योग-निर्मित मालाचे उत्पादन त्यावेळी वाढत्या प्रमाणावर होत होते. परंतु या कालखंडाच्या शेवटी राजकीय कारणांमुळे या शहरांना उतरती कळा लागू लागली. यामध्ये एन्. एस्. गुप्ता यांच्या 'इंडस्ट्रियल स्ट्रक्चर ऑफ इंडिया ड्यूरिंग मेडिईव्हल पीरियड', (एस्. चंद अँड कं., नवी दिल्ली, १९७०) या ग्रंथाची भर घालता येईल. यामध्ये मुगलपूर्व व मुगल काळांचा विचार करण्यात आला आहे. लेखकाची भूमिका प्रशंसकाची असून त्याने मूळ फारसी साधनांकडे दुर्लक्ष केले आहे.

आणखी एक ग्रंथ म्हणजे बी. के भार्गव यांचा 'इंडीजिनस बँकिंग इन एनशंट अँड मेडिईव्हल इंडिया' (डी. बी. तारापोरवाला सन्स अँड कं., मुंबई, १९३४) हा ग्रंथ होय. यामध्ये लेखकाचे म्हणणे असे की अगदी जुन्या काळापासून भारतात एतद्देशीय बँक-व्यवहार (पेढी-व्यवहार) विद्यमान होता आणि मुसलमानांच्या आगमनानंतर त्याला धार्मिक व राजकीय कारणांमुळे उतरती कळा लागली. ही परिस्थिती अकबराच्या काळापर्यंत चालत राहिली. त्यानंतर मात्र या व्यवसायाचे पुनरुज्जीवन झाले. या व्यवसायाची भरभराट जहांगीर व शहाजहान यांच्या अमदानींमध्ये चालू राहिली. परंतु औरंगजेबाच्या कर्मठपणाचा त्याच्यावर प्रतिकूल परिणाम झाला. लेखकाने हा विषय प्रशंसेच्या भावनेने व साहित्यिक पद्धतीने हाताळला आहे. उदाहरणार्थ, तो एके ठिकाणी सांगतो, "शाएस्ताखान एकदा म्हणाला होता की, 'एका गोष्टीचे मला मोठे आश्चर्य वाटते. ती अशी की एक विशिष्ट म्हातारा, श्रीमंत सावकार कधीच खोटे बोलला नव्हता.'"

डी. पंत यांचा 'दि कमर्शियल पॉलिसी ऑफ दि मुगल्स', (डी. बी. तारापोरवाला, सन्स अँड कं., मुंबई १९३०) हा ग्रंथ म्हणजे या प्रकारच्या साहित्यात पडलेली एक उपयुक्त भर आहे. अर्थात लॉर्ड मेस्टन यांनी आपल्या प्रस्तावनेत या ग्रंथासंबंधी जे म्हटले आहे ते खरेच आहे. ते म्हणतात, "या ग्रंथाचे शीर्षक 'हाऊ दि मुगल्स हॅड नो कमर्शियल पॉलिसी' असे ठेवले असते तरी ते योग्य ठरले असते." या ग्रंथाच्या पहिल्या खंडात १५५६ पर्यंतच्या भारताचे आर्थिक सिंहावलोकन करण्यात आलेले असले तरी लेखकाला मुख्यत: १५५६ ते १७०७ या कालखंडासंबंधीच प्रामुख्याने विचार करावयाचा आहे. आर्थिक इतिहासकाराला पंतांच्या विवेचनातील पुढील विषय उद्बोधक वाटतील:– (१) व्यापारी मार्ग व वाहतूक प्रणाली; (२) भांडवल-संघटना, चलन व त्याचे नियमन, पेढ्या, हुंड्या; आणि (३) व्यापारातील सरकारचा हस्तक्षेप व मक्तेदाऱ्या. पंत यांनी एक मनोरंजक मुद्दा सांगितला आहे. तो असा की, बादशाहाच्या व सरदारांच्या घराण्यांतील लोक व्यापारी उलाढाली करून भरपूर नफा मिळवीत असत.[४] सी. जी.

४. या संदर्भात पुढील लेखही पाहावेत :—

(१) सिरहिंदी, बी., 'वर्ल्ड फेमस सुपरफाइन क्लॉथ ऑफ समाना (नियर पटियाळा)' दि एकॉनॉमिक टाइम्स, ता. ६ एप्रिल १९७०.

[पुढील पानावर

एफ्. सिमकिन यांच्या 'दि ट्रॅडीशनल ट्रेड ऑफ एशिया', (ऑक्सफोर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, लंडन, १९६८) या ग्रंथात मध्ययुगीन भारतातील व्यापाराची हकीगत दिलेली असल्यामुळे त्याचाही येथे उल्लेख करण्यास हरकत नाही. जे. एन्. सरकार यांच्या 'दि लाइफ ऑफ मीर जुम्ला', (फिरमा के. एल्. मुखोपाध्याय, कलकत्ता, १९५१) या ग्रंथात मीर जुम्लाच्या व्यापारी हालचालींचे विश्लेषण करण्यात आलेले आहे.

बी. के. सरकार यांच्या 'इनलँड ट्रान्सपोर्ट अँड कम्युनिकेशन इन मेडिईव्हल इंडिया', (कलकत्ता युनिव्हर्सिटी प्रेस, कलकत्ता, १९२५) या ग्रंथात मुगलपूर्व व मुगल काळांचा समावेश करण्यात आलेला आहे. सरकार असे सांगतात की उत्तर भारतातील जलवाहतुकीचे प्रमुख साधन नौका ही होती. परंतु दक्षिण भारतातील नद्या सामान्यत: जलवाहतुकीस उपयुक्त नसल्यामुळे अंतर्गत व्यापारासाठी सागर किनारी वाहतुकीचा वापर करण्यात येत होता. खुष्कीच्या मार्गावरील वाहतुकीच्या बाबतीत बैलगाड्या व घोडागाड्या यांचा वापर प्रचलित होता. भारतामध्ये इंग्लिश घोडागाड्यांचा वापर सर थॉमस रो यांनी सतराव्या शतकाच्या प्रारंभी सुरू केला. येथील ओझ्याची व गाड्या ओढणारी नेहमीची जनावरे म्हणजे बैल, रेडे व उंट ही होती. घोड्यांच्या किमती फार असल्यामुळे त्यांचा वापर फार क्वचित केला जाई. या ग्रंथात जी माहिती ग्रथित करण्यात आलेली आहे तिला पुढील दोन ग्रंथांची पुरवणी जोडल्यास ते उपयुक्त ठरेल : (१) राधाकुमुद मुखर्जी यांचा 'ए हिस्टरी ऑफ इंडियन शिपिंग अँड मॅरिटाइम अॅक्टिव्हिटी फ्रॉम दि अर्लिएस्ट टाइम्स', (लाँगमन्स, ग्रीन अँड कं, लंडन, १९२२); आणि (२) जी.

---

मागील पानावरून ]

(२) इरविन, जे. 'इंडियन टेक्स्टाइल ट्रेड इन दि सेव्हनटींथ सेंचुरी', जर्नल ऑफ इंडियन टेक्स्टाइल हिस्टरी, अंक १ ते ४, १९५५-१९५९.

(३) फर्बर, एच्., 'दि ओव्हरलँड रूट टु इंडिया इन दि सेव्हन्टीन्थ अँड एटीन्थ सेंचुरीज', जर्नल ऑफ इंडियन हिस्टरी', (यापुढे या नियतकालिकाचा उल्लेख 'जइंहि', असा करण्यात आला आहे.) खंड २९, भाग २, १९५१.

(४) सतीशचंद्र, 'सम आस्पेक्ट्स ऑफ दि ग्रोथ ऑफ ए मनी एकॉनॉमी इन इंडिया ड्यूरिंग दि सेव्हनटीन्थ सेंचुरी', 'इंएसोहिरि', खंड ३, अंक ४, १९६६.

(५) अरसरत्नम्, एस्., 'इंडियन मर्चंट्स अँड देअर ट्रेडिंग मेथड्स (सुमारे इ.स. १७००)', कित्ता, खंड ३, अंक १, १९६६.

(६) गोपाल, एस्., 'ट्रेडिंग अॅक्टिव्हिटीज ऑफ इंडियन्स इन राशिया इन दि एटीन्थ सेंचुरी', कित्ता, खंड, ५, अंक २, १९६८.

(७) कोहन, बी. एस्., 'दि रोल ऑफ दि गोसाईंज इन दि एकॉनॉमी ऑफ एटीन्थ अँड नाइन्टीन्थ सेंचुरी अपर इंडिया', कित्ता, खंड १, अंक ४, १९६४.

(८) हसन, ए., 'सिल्व्हर करन्सी आउटपुट ऑफ दि मुगल एम्पायर अँड प्राइसेस इन इंडिया ड्यूरिंग दि सिक्स्टीन्थ अँड सेव्हन्टीन्थ सेंचुरीज', कित्ता, खंड ६, अंक १, १९६०. 1969

(९) ओमप्रकाश आणि कृष्णमूर्ति, जे., 'सिल्व्हर करन्सी आउटपुट ऑफ दि मुगल एम्पायर अँड प्राइसेस इन इंडिया ड्यूरिंग दि सिक्स्टीन्थ अँड सेव्हन्टीन्थ सेंचुरीज: ए क्रिटिक', कित्ता, खंड ७, अंक १, १९७०.

[ पुढील पानावर

एफ्. हूरानी यांचा 'अरब सीफेअरिंग इन दि इंडियन ओशन इन एनशंट अँड मेडिईव्हल टाइम्स' (प्रिन्स्टन युनिव्हर्सिटी प्रेस, प्रिन्स्टन, १९५१).[५]

शेवटी उल्लेख करावयाचा तो इ. थॉमस यांच्या 'दि रेव्हेन्यू रिसोर्सेस ऑफ दि मुगल एम्पायर इन इंडिया' या मुन्शीराम मनोहरलाल ओरिएंटल पब्लिशर्स, दिल्ली यांनी १९६७ साली पुनर्मुद्रित केलेल्या ग्रंथाचा. लेखकाने या ग्रंथात सुरुवातीला फीरोजशाह तुगलक आणि बाबर यांच्या अमदानीतील जमीन महसुलाचे तुलनात्मक विश्लेषण केले असले तरी नंतरच्या भागात त्याने अकबर, जहांगीर, शाहजहान आणि औरंगजेब यांच्या महसूल-साधनांवर आपले लक्ष केंद्रित केले आहे, त्यासाठी त्याने प्रत्येक बादशाहाच्या साधनसंपत्तीविषयक स्थितीचे स्वतंत्रपणे विश्लेषण केले आहे. थॉमस यांनी वेगवेगळ्या प्रांतांतून जमा होणाऱ्या महसुलाचे आणि अकबर, जहांगीर व औरंगजेब यांच्या एकूण महसुलाचे तक्ते दिलेले आहेत. एकंदरीने पाहाता, हा ग्रंथ म्हणजे एकूण जमीनमहसुलाचे केवळ एक विश्लेषण किंवा पृथक्करण आहे. लेखकाने जमीनमहसुलाव्यतिरिक्त व्यक्तिशः जमा होणाऱ्या इतर महसुलाकडे दुर्लक्ष केले आहे.[६]

तथापि, इतिहासकारांची सर्वसामान्य प्रथा एकूण राजकीय, प्रशासकीय व सामाजिक इतिहासात आर्थिक इतिहासाचा समावेश करण्याची आहे. अशा प्रकारे आर्थिक इतिहासाच्या महत्वपूर्ण भागांचा समावेश पुढील ग्रंथांत केलेला आढळतो:- जे एन्. सरकार, 'मुगल अॅडमिनिस्ट्रेशन', (एम्. सी. सरकार अँड सन्स, कलकत्ता, १९२४), एस्. आर. शर्मा, 'मुगल गव्हर्नमेंट अँड अॅडमिनिस्ट्रेशन', (हिंद किताब्स लि. मुंबई, १९५१), आणि पी. शरण, 'दि प्रॉव्हिन्शियल गव्हर्नमेंट ऑफ दि मुगल्स, १५२६–१६५८', (किताबिस्तान, अलाहाबाद, १९४१). भारताच्या आर्थिक इतिहासाच्या ज्ञानात भर घालणारे आणखी काही ग्रंथ असे आहेत:– एस्. एम्. इक्राम, 'मुस्लिम सिव्हिलायझेशन इन् इंडिया', (कोलंबिया युनिव्हर्सिटी प्रेस, १९६४); पी. एन्. चोपडा, 'सम आस्पेक्ट्स ऑफ सोशल लाइफ ड्यूरिंग दि मुगल एज, १५२६–१७०७', (शिवलाल आगरवाल, अँड कं. (प्रा.) लि., आग्रा, १९६३); के. दत्ता, 'सर्व्हे ऑफ इंडियाज

मागील पानावरून ]

(१०) हसन, ए., 'सिल्व्हर करन्सी आउटपुट ऑफ दि मुगल एम्पायर अँड प्राइसेस इन इंडिया इन दि सिक्स्टीन्थ अँड सेव्हन्टीन्थ सेंचुरीज: ए रिप्लाय' कित्ता, खंड ७, अंक १, १९७०.

(११) हबीब, आय्., 'उशरी इन मेडिईव्हल इंडिया', कंपॅरेटिव्ह स्टडीज इन सोसायटी अँड हिस्टरी, खंड ६, अंक ३, १९६३–६४.

(१२) स्पेंग्लर, जे. जे., 'कॉमेंट ऑन इरफान हबीब्स 'उशरी इन मेडिईव्हल इंडिया', कित्ता

५. तसेच पाहा:— जान कैसर, ए., 'शिपबिल्डिंग इन दि मुगल एम्पायर ड्यूरिंग दि सेव्हन्टीन्थ सेंचुरी', 'इंएसोहिरि', खंड ५, अंक २, १९६८.

६. या ग्रंथासाठी पुरवणी वाचन म्हणून पुढील लेख पाहावेत:—

(१) मिश्र, एस्. सी., 'रेव्हेन्यू सिस्टिम ऑफ शेरशाह', 'जइंहि', खंड, ३७, भाग १, १९५९.

(२) सिद्दीकी, एन्. ए., 'लँड रेव्हेन्यू डिमांड अंडर दि मुगल्स', 'इंएसोहिरि', खंड २, अंक ४, १९६५.

(३) सरकार, एस्. आर., 'सेल्सटॅक्स हॅज ए हिस्टरी इन इंडिया', 'इंजए', खंड ३४, अंक २, १९५३.

(४) मलिक, झेड., 'फिनॅन्शल प्रॉब्लेम्स ऑफ दि मुगल गव्हर्नमेंट अंडर फर्रुखसियर्स रेन', 'इंएसोहिरि', खंड ४, अंक ३, १९६९.

सोशल लाइफ अँड एकॉनॉमिक कंडिशन इन दि एटीन्थ सेंचुरी, १७०७–१८१३', (फिरमा के. एल्. मुखोपाध्याय, कलकत्ता, १९६१); व्ही. पी. एस्. 'रघुवंशी, 'इंडियन सोसायटी इन दि एटीन्थ सेंचुरी', (असोशिएटेड पब्लिशिंग हाऊस, नवी दिल्ली, १९६९); आणि 'मेडिईव्हल इंडिया–२ मिसलेनी,' खंड १, (अलीगढ मुस्लिम युनिव्हर्सिटी, एशिया पब्लिशिंग हाउस, मुंबई, १९६९); तसेच, व्ही. ए. स्मिथ यांचा 'अकबर दि ग्रेट मोगल, १५४२–१६०५', (ऑक्सफोर्ड अॅट दि क्लॅरेंडन प्रेस, दुसरी आवृत्ती), आणि ए. एल्. श्रीवास्तव यांचा 'अकबर दि ग्रेट,' खंड २ (शिवलाल आगरवाला अँड कं., आग्रा, १९६७) हे दोन ग्रंथही, विशेषतः यांतील दुसरा ग्रंथ, उपयुक्त आहेत. झेड्. फारूकी यांचा 'औरंगजेब अँड हिज टाइम्स', (डी. बी. तारापोरवाला सन्स अँड कं, मुंबई, १९३५) आणि एम्. अतहर अली यांचा 'दि मुगल मोबिलिटी अंडर औरंगजेब', (एशिया पब्लिशिंग हाउस, मुंबई, १९६६) या दोन ग्रंथांमध्येही आर्थिक स्थितीचे विवेचन करण्यात आलेले आहे.

या कालखंडातील प्रादेशिक आर्थिक इतिहासांचा विचार करावयाचा तर टी. व्ही. महालिंगम् यांच्या 'एकॉनॉमिक लाइफ इन दि विजयानगर एम्पायर', (युनिव्हर्सिटी ऑफ मद्रास, मद्रास, १९५१) या ग्रंथाचा उल्लेख करावा लागेल. हा त्या प्रदेशाचा सर्वांगीण आर्थिक इतिहास असून त्यात १५२६ च्या पूर्वीचा व नंतरचा असे दोन्ही कालखंड समाविष्ट करण्यात आले आहेत.[७] दुसरा एक ग्रंथ एस्. पी. छबलानी यांचा 'एकॉनॉमिक कंडिशन्स इन सिंध, १५९२ ते १८४३,' (ओरिएंट लाँगमन्स लि., मद्रास, १९५१) हा आहे. या ग्रंथामध्ये मोहनजोदडो व अरबांचे आगमन यांसारख्या जुन्या कालखंडातील घटनांचा वारंवार उल्लेख आलेला असला तरी लेखकाने आपले लक्ष प्रामुख्याने १५९२ ते १८४३ या कालखंडावर, म्हणजेच अकबराने सिंध जिंकून घेतल्यापासून तो ब्रिटिशांच्या ताब्यात जाईपर्यंतच्या काळावर केन्द्रित केले आहे.[८] इतरत्र उल्लेख केल्याप्रमाणे, बाकीच्या प्रादेशिक अध्ययनांतील सर्वसामान्य प्रवृत्तीही राजकीय, प्रशासकीय व सामाजिक परिस्थितीपेक्षा आर्थिक परिस्थितीला कमी महत्वाचे किंवा दुय्यम स्थान देण्याचीच आहे. पुढील ग्रंथ या प्रकारात मोडतातः– टी. व्ही. महालिंगम्, 'अॅडमिनस्ट्रेशन अँड सोशल लाइफ अंडर विजयनगर', (युनिव्हर्सिटी ऑफ मद्रास, १९४०); ए. सी. रॉय, 'हिस्टरी ऑफ बेंगॉल मुगल पीरियड', (नवभारत पब्लिशर्स, कलकत्ता, १९६८) टी. रायचौधुरी, 'बेंगॉल

७. तसेच पाहा :— स्टेइन, बर्टन, 'दि स्टेट, दि टेम्पल अँड अॅग्रिकल्चरल डेव्हलपमेंट–ए स्टडी इन मेडिईव्हल साउथ इंडिया', 'दि एकॉनॉमिक वीकली' (यापुढे या नियतकालिकाचा उल्लेख 'एवी', असा करण्यात आला आहे.) खंड १३, अंक ४, ५, ६, फेब्रुवारी १९६१ (बारावा वार्षिक विशेषांक).

८. पश्चिम भारतासंबंधीच्या खालील तीन लेखांचा येथे उल्लेख करणे उपयुक्त होईल :—

(१) कुलकर्णी, ए. आर., 'व्हिलेज लाइफ इन डेक्कन इन दि सेव्हन्टीन्थ सेंचुरी,' 'इंएसोहिरि', खंड ४, अंक १, १९६७.

(२) काळे, व्ही. जी., 'करन्सी इन शिवाजीज किंग्डम', 'इंजए', खंड ११, अंक २, १९३०.

(३) काळे, व्ही. जी., 'मनी मार्केट इन महाराष्ट्र टू सेंचुरीज अॅगो', कित्ता, खंड १७, अंक ३, १९३७. तसेच पाहा :—झा, जे. एस्. 'लँड रेव्हेन्यू अॅडमिनिस्ट्रेशन अंडर दि खांडवाल रूलर्स ऑफ दरभंगा (फ्रॉम १५७४ टु १८८०)', जर्नल ऑफ हिस्टॉरिकल रिसर्च, (यापुढे याचा उल्लेख 'जहिरि' असा करण्यात आला आहे.) खंड ९, अंक २, १९६७. सिन्हा, एस्. एन्., 'एकॉनॉमिक कंडिशन ऑफ दि सूबा ऑफ अलाहाबाद अंडर दि मुगल्स, १५२६–१७०७', इस्लामिक कल्चर अँन इंग्लिश क्वार्टर्ली, खंड ४०, अंक ३, १९६६.

अंडर अकबर अँड जहांगीर–अॅन इनट्रॉडक्शन इन सोशल हिस्टरी', (ए. मुखर्जी, कलकत्ता, १९५३); ए. चॅटर्जी (पूर्वाश्रमीच्या) बसू, 'बेंगॉल इन दि रेन ऑफ औरंगजेब, १६५८–१७०७,' (प्रोग्रेसिव्ह पब्लिशर्स, कलकत्ता, १९६७); ए. करीम, 'डाक्का : दि मुगल कॅपिटल', (एशियाटिक सोसायटी ऑफ पाकिस्तान, ढाका, १९६४); आणि 'मुर्शिद कुली खान अँड हिज टाइम्स', (एशियाटिक सोसायटी ऑफ पाकिस्तान, ढाका, १९६३); एम्. अकबर, 'दि पंजाब अंडर दि मुगल्स,' (रिपन प्रिंटिंग प्रेस, लाहोर, १९४८); बी. एस्. निज्जर, 'पंजाब अंडर दि ग्रेट मुगल्स, १५२६–१७०७', (थॅकर अँड कं. लि. मुंबई १९६८); पी. एन्. के. बामजोई, 'ए हिस्टरी ऑफ काश्मीर', (मेट्रॉपॉलिटन बुक कं. (प्रा.) लि., दिल्ली, १९६२); आर. के. परमू, 'ए हिस्टरी ऑफ मुस्लिम रूल इन काश्मीर, १३२०–१८१९', (पीपल्स पब्लिशिंग हाऊस, दिल्ली, १९६९); जी. एन्. शर्मा, 'सोशल लाइफ इन मेडिईव्हल राजस्थान, १५००–१८००', (लक्ष्मीनारायण अग्रवाल, एज्युकेशनल पब्लिशर्स, आग्रा, १९६८); के. ए. नीलकंठ शास्त्री, 'हिस्टरी अँड कल्चर ऑफ दि टॅमिल पीपल,' (मुखोपाध्याय, कलकत्ता, १९६४); तसेच, 'कुंवर मुहम्मद अश्रफ, १९०३–१९६२–अॅन इंडियन स्कॉलर अँड रेव्होल्यूशनरी', (पीपल्स पब्लिशिंग हाउस, नवी दिल्ली, १९६६) या ग्रंथातही एच्. के. शेरवानी यांचा 'सम एकॉनॉनिक आस्पेक्ट्स ऑफ दि रेन ऑफ अब्दुल्ला कुतुब शाह, १६२६–१६७२', हा लेख समाविष्ट आहे.

## द्वितीय कालखंड (१७५७–१९००)

ब्रिटिशांनी १७५७ साली बंगाल व बिहार हे प्रांत जिंकून घेतले ही गोष्ट जगजाहीर आहे. परंतु युरोपीय लोकांच्या भारतीय व्यापारी हालचाली त्याआधी कितीतरी वर्षांपासून सुरू झालेल्या होत्या. या हालचालींची हकीकत एस्. ए. खान यांच्या 'दि ईस्ट इंडिया ट्रेड इन दि सेव्हनटीन्थ सेंचुरी इन इट्स पोलिटिकल अँड एकॉनॉमिक आस्पेक्टस', (ऑक्सफोर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, लंडन, १९२३,) या ग्रंथात आलेली आहे. या ग्रंथाबरोबरच पुढील दोन ग्रंथांचे वाचन करणे उपयुक्त ठरेल : जी. जे. हॅमिल्टन, 'दि ट्रेड रिलेशन्स बिट्वीन इंग्लंड अँड इंडिया, १६००–१८९६', (थॅकर, स्पिंक अँड कं., कलकत्ता, १९१९), आणि बाळकृष्ण, 'कमर्शियल रिलेशन्स् बिट्वीन इंडिया अँड इंग्लंड, १६०१–१७५७', (जी. रूटलेज अँड सन्स, लंडन, १९२४). ईस्ट इंडिया कंपनीच्या माहितीसाठी पुढील ग्रंथ वाचता येतील :– सी. एच्. फिलिप, 'दि इंग्लिश ईस्ट इंडिया कंपनी', (ऑक्सफोर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, मुंबई, १९६१); एच्. फर्बर, 'जॉन कंपनी अॅट वर्क', (हार्वर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, केंब्रिज, १९५१), आर. मुखर्जी, 'दि राइझ अँड फॉल ऑफ दि ईस्ट इंडिया कंपनी', (वेब डयूत्स्वेर बेरलाग डेर विस्सेन्शाफ्टेन, बर्लिन, १९५५); बी. बी. मिश्र, 'दि सेंट्रल अॅडमिनिस्ट्रेशन ऑफ दि ईस्ट इंडिया कंपनी, १७७३–१८३४', आणि के. एन्. चौधुरी, 'दि इंग्लिश ईस्ट इंडिया कंपनी', (फ्रँक कास अँड कं. लि., लंडन, १९६५)[९]

---

९. या संदर्भात खालील लेखही पाहावेत :–

(१) चौधुरी, के. एन्., 'इंडियाज फॉरिन ट्रेड अँड दि सेसेशन ऑफ दि ईस्ट इंडिया कंपनीज ट्रेडिंग अॅक्टिव्हिटीज', दि एकॉनॉमिक हिस्टरी रिव्ह्यू, (यानंतर याचा उल्लेख 'एहिरि' असा केला आहे.) खंड १९, अंक २, १९६६.

[पुढील पानावर

परंतु १७५७ नंतरच्या कालखंडातील भारताच्या आर्थिक इतिहासाच्या दृष्टीने सर्वांत अग्रगण्य ग्रंथ म्हणजे आर. सी. दत्त यांचे 'दि एकॉनॉमिक हिस्टरी ऑफ इंडिया अंडर अर्ली ब्रिटिश रूल', व 'दि एकॉनॉमिक हिस्टरी ऑफ इंडिया इन दि व्हिक्टोरियन एज', (पब्लिकेशन्स डिव्हिजन, मिनिस्ट्री ऑफ इन्फर्मेशन अँड ब्रॉडकास्टिंग, नवी दिल्ली, १९६३) हे होत. हे ग्रंथ पूर्णपणे अधिकृत कागदपत्रांवर आधारलेले असून त्यांमध्ये भारतातील देशी संस्थानांचा विचार करण्यात आलेला नाही. भारताच्या अर्थव्यवस्थेवर ब्रिटिशांनी कोणता परिणाम घडवून आणला याचे अगदी राष्ट्रीय दृष्टिकोनातून या ग्रंथांत विवेचन करण्यात आले आहे. त्यामुळे या ग्रंथांच्या धर्तीवरच लिहिण्यात आलेला लाला लाजपतराय यांचा 'इंग्लंड्स डेट टु इंडिया', (पब्लिकेशन्स डिव्हिजन, मिनिस्ट्री ऑफ इन्फर्मेशन अँड ब्रॉडकास्टिंग, नवी दिल्ली, १९६७) हा ग्रंथही त्यांच्याबरोबर वाचणे उपयुक्त ठरेल.

यांखेरीज इतरही अनेक ग्रंथ आहेत. त्यांपैकी ध. रा. गाडगीळ यांचा 'इंडस्ट्रियल इव्होल्यूशन ऑफ इंडिया इन रीसेंट टाइम्स', (ऑक्सफोर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, १९३३) हा प्रख्यात आहे. खरे म्हणजे, या ग्रंथाचे शीर्षक यथार्थ नाही; कारण लेखकाने या ग्रंथात उद्योग व शेती या दोन्ही विषयांवर आपले लक्ष केंद्रित केले आहे. त्यांचे विवेचन १८५० पासून सुरू होते. व्ही. अँनस्टी यांच्या 'दि एकॉनॉमिक डेव्हलपमेंट ऑफ इंडिया', (लाँगमन्स ग्रीन अँड कं., १९३९) या ग्रंथात एकोणिसाव्या शतकाकडे अगदीच दुर्लक्ष केलेले नसले तरी त्यात चालू शतकावर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. अशाच प्रकारचा आणखी एक ग्रंथ म्हणजे एम्. के. चौधुरी यांनी संपादिलेला, 'ट्रेन्ड्स ऑफ सोशियो-एकॉनॉमिक चेंज इन इंडिया, १८७१–१९६१,' प्रोसीडिंग्ज ऑफ ए सेमिनार (इंडियन इन्स्टिटयूट ऑफ अँडव्हान्स्ड स्टडी, सिमला १९६९) हा अहवाल होय. 'स्टडीज इन एकॉनॉमिक पॉलिसी अँड डेव्हलपमेंट ऑफ इंडिया, १८४८–१९२६', (प्रोग्रेसिव्ह पब्लिशर्स, कलकत्ता १९६६) हा एस्. के. सेन यांनी लिहिलेला सर्वसामान्य आर्थिक इतिहासाचा ग्रंथ आहे. त्यातून शेतीचा विषय वगळला आहे. लेखकाचा मुख्य उद्देश या

---

मागील पानावरून ]

(२) चौधुरी, के. एन्., 'ट्रेझर अँड ट्रेड बॅलन्सेस : दि ईस्ट इंडिया कंपनीज एक्सपोर्ट ट्रेड, १६६०-१७२०', कित्ता, खंड २१, अंक ३, १९३८.

(३) चौधुरी, के. एन्., 'टोअर्ड्स अॅन 'इंटर-कॉंटिनेंटल मॉडेल', सम ट्रेंड्स इन इंडो-युरोपियन ट्रेड इन सेव्हनटीन्थ सेंचुरी'', 'इंएसोहिरि', खंड ६, अंक १, १९६९.

(४) बागची, ए. के., कॉमेंट्स ऑन सम ट्रेंड्स इन इंडियाज फॉरिन ट्रेड इन दि सेव्हनटीन्थ सेंचुरी', कित्ता, खंड ६, अंक १, १९६९.

(५) चौधुरी, के. एन्., 'सम ट्रेंड्स इन इंडियाज फॉरिन ट्रेड इन सेव्हनटीन्थ सेंचुरी : ए रिप्लाय', कित्ता, खंड ६, अंक ३, १९६९.

(६) रैटल-स्मिथ-एम्., 'दि बिझनेस ऑफ दि ईस्ट इंडिया कंपनी, १६८०-८१', कित्ता, खंड १, अंक २, १९६३.

(७) आनंद, आय्., दि अॅपीअरन्स ऑफ ऑस्टेंडर्स इन इंडियन वॉटर्स', कित्ता, खंड ६, अंक ३, १९६९.

(८) नारंग, आय्., 'दि ऑस्टेंड कंपनीज रेकॉर्ड्स अँड दि 'इन्स्ट्रक्शन्स' ऑफ अॅलेक्झांडर ह्यूम', कित्ता, खंड १, अंक १, १९६७.

(९) अरसरत्नम्, एस्., 'डच कमर्शिअल पॉलिसी इन सीलोन अँड इट्स इफेक्ट्स ऑन दि इंडो-सीलोन ट्रेड, १६९०-१७५०', कित्ता, खंड ४, अंक २, १९६७.

कालखंडात भारताच्या आर्थिक विकासात ज्या गोष्टींमुळे अडथळा निर्माण झाला त्या ठळकपणे निदर्शनास आणणे हा आहे. त्याच्याशी तुलना करिता डी. एच्. बुकनन यांच्या दि 'डेव्हलपमेंट ऑफ दि कॅपिटॅलिस्टिक एंटरप्राइज इन इंडिया', (दि मॅकमिलन कं., न्यूयॉर्क, १९३४) या ग्रंथाचे क्षेत्र अधिक मर्यादित आहे. त्यामध्ये केवळ बागमळे व कारखाने आणि त्यांच्या समस्या यांचाच विचार करण्यात आला आहे. एन्. सी. सिन्हा यांच्या 'स्टडीज इन इंडो ब्रिटिश एकॉनॉमी हंड्रेड ईयर्स अॅगो' (ए. मुखर्जी अँड कं., कलकत्ता, १९४६) या ग्रंथात आंतरराष्ट्रीय परिस्थितीच्या संदर्भात एकोणिसाव्या शतकामध्ये भारताची आर्थिक स्थिती काय होती त्याची हकीगत देण्यात आली आहे. भारतीय मजुरांच्या परदेशांत होणाऱ्या स्थलांतराच्या प्रश्नासंबंधी लेखकाने जे विवेचन केले आहे ते विशेष उद्बोधक आहे. व्ही. व्ही. भट्ट यांच्या 'आस्पेक्ट्स ऑफ एकॉनॉमिक चेंज अँड पॉलिसी इन इंडिया, १८००–१९६०', (अलाइड पब्लिशर्स प्रा. लि., मुंबई, १९६३) या ग्रंथात सर्वसामान्य दृष्टिकोणातून, ब्रिटिश राजवटीत भारतीय अर्थव्यवस्थेच्या झालेल्या ऱ्हासाचे व अवरुद्धतेचे विश्लेषण करण्यात आले आहे. अशाच प्रकारचा दृष्टिकोण व्ही. बी. सिंग यांच्या 'इंडियन एकॉनॉमी यस्टरडे अँड टुडे', (पीपल्स पब्लिशिंग हाउस, नवी दिल्ली १९६४) या ग्रंथात व्यक्त करण्यात आला आहे. ब्रिज नारायण यांच्या 'इंडियन एकॉनॉमिक लाइफ, पास्ट अँड प्रेझेंट' या ग्रंथाचा उल्लेख यापूर्वी करण्यात आलेलाच आहे. त्यामध्ये चलन, किमती व लोकसंख्या या प्रश्नांची ऐतिहासिक हकीगत देण्यात आली आहे. त्यामध्ये १७०० ते १९२५ या काळातील बंगालमधील हलक्या प्रतीच्या तांदुळाच्या किमती, १८२४ ते १९२१ या काळातील बेळगाव, पुणे व अहमदाबाद येथील तांदुळाच्या किमती आणि १८०३–१९२१ या काळातील फरुखाबाद येथील गव्हाच्या किमती यांसंबंधीची आकडेवारी दिलेली आहे. एस्. सी. झा यांच्या 'स्टडीज इन दि डेव्हलपमेंट ऑफ कॅपिटॅलिझम इन इंडिया' (फिरमा के. एल्. मुखोपाध्याय, कलकत्ता, १९६३) या ग्रंथाचे क्षेत्र खूप व्यापक आहे. ब्रिटिशांच्या आगमनापूर्वी भारतामध्ये झालेला भांडवलशाहीचा विकास, भारतीय अर्थव्यवस्थेवर ब्रिटिशांचा झालेला एकूण परिणाम आणि १९४७ नंतरच्या घडामोडी या गोष्टींना या ग्रंथात जवळजवळ सारखेच महत्त्व देण्यात आले आहे. याच घडामोडींचे मार्क्सवादी चौकटीतून केलेले विवेचन ए. आय्. लेव्हकोव्हस्की यांच्या 'कॅपिटॅलिझम् इन इंडिया : बेसिक ट्रेन्ड्स इन इट्स डेव्हलपमेंट', (पीपल्स पब्लिशिंग हाउस, १९६६) आणि बी. सेन यांच्या 'इव्होल्यूशन ऑफ अॅग्रेरियन रिलेशन्स इन इंडिया', (पीपल्स पब्लिशिंग हाउस, दिल्ली, १९६२) या ग्रंथांमध्ये पाहावयास मिळते. डॅनियल व अॅलिस थॉर्नर यांचा 'लँड अँड लेबर इन इंडिया', (एशिया पब्लिशिंग हाउस, लंडन, १९६२) हा ग्रंथ वेगळ्या भूमिकेवरून लिहिलेला आहे. त्यामध्ये 'भारताचे निर्औद्योगीकरण (de-industrialization)', 'उत्पादनातील दीर्घकालीन प्रवृत्ती', व '१७६० ते १९६० या काळातील भारतीय अर्थव्यवस्थेचा उदय,' यासारख्या विषयांचा अंतर्भाव करण्यात आला आहे. बी. एन्. गांगुली यांनी संपादिलेल्या 'रीडिंग्ज इन इंडियन एकॉनॉमिक हिस्टरी' या ग्रंथाचा उल्लेख पूर्वी केलाच आहे. त्याच्या तिसऱ्या खंडात भारत, उत्तर प्रदेश व मद्रास येथील ग्रामीण अर्थव्यवस्था आणि बंगालमधील औद्योगिक उत्पादन व नागरी मध्यम वर्ग यांसंबंधीच्या निबंधांचा समावेश करण्यात आला आहे. एस्. कुझनेत्स व इतर यांनी संपादिलेल्या 'एकॉनॉमिक ग्रोथ : ब्राझील, इंडिया, जापान', (ड्यूक युनिव्हर्सिटी प्रेस, डरहॅम, १९५५) या संग्रहातील हेलेन् बी. लँब यांचा 'दि 'स्टेट' अँड एकॉनॉमिक डेव्हलपमेंट इन इंडिया' हा लेख, आणि एल्. सी. ए. नॉलेस यांचा 'दि

एकॉनॉमिक डेव्हलपमेंट ऑफ दि ब्रिटिश ओव्हरसीज एम्पायर', (जॉर्ज रूटलेज अँड सन्स लि. लंडन, १९२४) हा ग्रंथ हे आर्थिक इतिहासकारांच्या दृष्टीने उपयुक्त आहेत. विषयाच्या पूर्णतेच्या दृष्टीने व्ही. बी. सिंग यांनी संपादिलेल्या 'दि एकॉनॉमिक हिस्टरी ऑफ इंडिया, १८५७-१९५७', (अलाइड पब्लिशर्स प्रा. लि. मुंबई, १९६५) या ग्रंथाचाही उल्लेख करण्यास हरकत नाही. यात वेगवेगळया लेखकांनी (व्यापारी धोरण वगळता) अर्थव्यवस्थेच्या वेगवेगळया पैलूंचा विचार केला आहे. त्यामुळे संदर्भ ग्रंथ म्हणून या ग्रंथाला महत्त्व आहे. एकूण विचार करिता या ग्रंथामध्ये मूलभूत साधनस्रोतांचे केवळ प्रासंगिक उल्लेख आलेले असले तरी हे एक प्रमाणभूत पाठ्यपुस्तक आहे यात मुळीच शंका नाही.

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धातील भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नासंबंधी उपयुक्त माहिती ज्यांमध्ये आहे असे दोन ग्रंथ आहेत. यांपैकी व्ही. के. आर. व्ही. राव यांच्या 'अँन एस्से ऑन इंडियाज नॅशनल इन्कम, १९२५-२९', (जॉर्ज अॅलन अंड अनविन, लंडन, १९३९) या ग्रंथाच्या पहिल्या प्रकरणात 'पूर्वीचे अंदाज' काय होते याची ओळख वाचकाला करून देण्यात आलेली आहे. त्यांचे म्हणणे असे की दादाभाई नौरोजी यांनी पिकांसंबंधी केलेले अंदाज वाजवीपेक्षा कमी होते म्हणून ते वाढवून घेतले पाहिजेत, आणि एफ्. जी. अॅटकिन्सन यांचे अंदाज वाजवीपेक्षा अधिक असल्यामुळे ते कमी करून घेतले पाहिजेत. राव यांचे असेही मत आहे की विल्यम डिग्बी यांचे अंदाज 'बहुधा नक्कीच' वाजवीपेक्षा कमी होते. 'नॅशनल इन्कम ऑफ इंडिया : ट्रेंड्स अँड स्ट्रक्चर', (स्टॅटिस्टिकल पब्लिशिंग सोसायटी, कलकत्ता, १९६९) हा एम्. मुखर्जी यांचा ग्रंथ अधिक रोचक आहे १९४८-४९ च्या किमती विचारात घेऊन मुखर्जी यांनी १८६०-१९०० या काळातील एकेका दशकाचे भारताचे सरासरी दर माणशी राष्ट्रीय उत्पन्न काढले आहे आणि त्यावरून त्यांनी असा निष्कर्ष काढला आहे की हे राष्ट्रीय उत्पन्न १८९० पर्यंत वाढत होते व त्यानंतर ते घटू लागले.[१०]

---

१०. तसेच पाहा : राय चौधुरी, जी. एस्., 'ऑन सम एस्टिमेट्स ऑफ नॅशनल इन्कम : इंडियन एकॉनॉमी, १८५८-१९४७', एकॉनॉमिक अँड पोलिटिकल वीकली, खंड १, अंक १६. १९६६, एकोणिसावे शतक हा अवरुद्धतेचा, ऱ्हासाचा की सुधारणेचा काळ होता? या महत्त्वाच्या मुद्यासंबंधी वेगवेगळे दृष्टिकोण व्यक्त करण्यात आले आहेत. ते खालील लेखांमध्ये पाहावयास मिळतील :—

(१) मॉरिस, एम्. डी., 'टोअर्ड्स ए रीइंटरप्रिटेशन ऑफ नाइनटीन्थ सेंचुरी इंडियन एकॉनॉमिक हिस्टरी', 'इंएसोहिरि', खंड ५, अंक १, १९६८.

(२) तोरू मात्सुई, "ऑन दि नाइनटीन्थ सेंचुरी इंडियन एकॉनॉमिक हिस्टरी—ए रिव्ह्यू ऑफ ए 'रीइंटरप्रिटेशन'," कित्ता.

(३) बिपिनचंद्र, 'रीइंटरप्रिटेशन ऑफ नाइनटीन्थ सेंचुरी इंडियन एकॉनॉमिक हिस्टरी', कित्ता.

(४) रायचौधुरी, टी., 'ए रीइंटरप्रिटेशन ऑफ नाइनटीन्थ सेंचुरी इंडियन एकॉनॉमिक हिस्टरी', कित्ता.

(५) मॉरिस, एम्. डी., 'ट्रेन्ड्स अँड टेंडन्सीज इन इंडियन एकॉनॉमिक हिस्टरी', कित्ता खंड ५, अंक ४, १९६८.

(६) रोसेन, जी., 'ए केस ऑफ अॅबॉर्टेड ग्रोथ : इंडिया, १८६०-१९०९. सम सजेशन्स फॉर रिसर्च', 'एवी', खंड १४, अंक ३२, ११ ऑगस्ट १९६२.

(७) नोल, डब्ल्यू. सी., 'ए केस ऑफ अॅन अॅबॉर्टेड ग्रोथ : इंडिया, १८६०-१९००, ए कॉमेंट', कित्ता, खंड १४, अंक ३८, १९६२.

(८) पंडित, डी., 'इंडिया, ए सेंटेनरी ऑफ जस्टेशन', कित्ता, खंड १४, अंक ४८, १९६२.

(९) मूर्ती, व्ही. एन्., 'इंडियन एकॉनॉमी ड्यूरिंग ब्रिटिश रूल', 'इंजए', खंड ४१, १९६०-६१.

शेतीच्या क्षेत्राच्या संदर्भात बी. एच्. बेडन पॉवेल यांच्या ' दि लँड सिस्टिम्स ऑफ ब्रिटिश इंडिया,' व्हॉल्यूम्स १ व २ (क्लॅरेंडन प्रेस, ऑक्सफोर्ड, दिनांकरहित.) या ग्रंथाचा उल्लेख करिता येईल. हे खंड जरी गेल्या शतकाच्या अखेरीस प्रकाशित झालेले असले तरी सामान्यतः भूधारणाची आणि विशेषतः जमीनमहसूल प्रशासनाच्या तांत्रिक पैलूंची चर्चा या दृष्टीने ते अजूनही उपयुक्त आहेत. याच लेखकाचे दुसरे पुस्तक ' दि इंडियन व्हिलेज कम्युनिटी ', (लाँगमन्स, ग्रीन अँड कं., लंडन, १८९६) हे आहे. ग्रामसंस्थांचा विकास, त्यांची कार्यपद्धती आणि ब्रिटिश राजवटीचे त्यांच्यावर घडून आलेले परिणाम यांचे विविचेन या पुस्तकात करण्यात आलेले आहे. ई. स्टोक्स यांचा ' दि इंग्लिश युटिलिटेरिअन्स अँड इंडिया ', ( क्लॅरेंडन प्रेस, ऑक्सफोर्ड, १९५९) हा एक असामान्य ग्रंथ आहे. लेखकाने इंग्रजांचा उपयुक्ततावाद आणि भारतीय जमीनमहसूल पद्धत यांच्यातील दुव्यावर लक्ष केंद्रित केले आहे. त्याच्या विवेचनाचा प्रारंभबिंदू १८२० च्या आसपास आहे. परंतु तसे करण्यात लेखकाने त्या धोरणाच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीकडे दुर्लक्ष केले आहे. आर्. ई. फ्रिकेनबर्ग यांनी यांनी संपादिलेला 'लँड कंट्रोल अँड सोशल स्ट्रक्चर इन इंडियन हिस्टरी ', (युनिव्हर्सिटी ऑफ विस्कॉनसिन, १९६९) हा ग्रंथ म्हणजे निबंधांचा संग्रह आहे भारताच्या आर्थिक इतिहासावर एका कल्पनेचे प्राबल्य असल्याचे आढळून येते. ती अशी की या देशात परंपरेने जमिनीवर खाजगी मालकी अशी कधीच नव्हती. या मनोगंडातून मुक्त होऊन या निबंधाच्या लेखकांनी अठराव्या व एकोणिसाव्या शतकातील भारताच्या वेगवेगळ्या भागांत प्रत्यक्ष परिस्थिती काय होती याचे विश्लेषण केले आहे. एच्. आर् सी. राइट यांच्या ' ईस्ट इंडियन एकॉनॉमिक प्रॉब्लेम्स ऑफ दि एज ऑफ कॉर्नवालिस अँड रॅफल्स ', (लुझाक अँड कं., लंडन, १९६१) या ग्रंथात डच ईस्ट इंडीजमध्ये कॉफी व कथील यांचे उत्पादन आणि ईस्ट इंडीज व भारत या दोन्ही ठिकाणी सुती कापड व अफू यांचे उत्पादन या बाबतीतील धोरणांची छाननी केली आहे.[११] जी. ब्लिन यांचा 'अॅग्रिकल्चरल ट्रेंड्स इन इंडिया, १८९१-१९४७ : आउटपुट, अव्हेलॅबिलिटी, अँड प्रॉडक्टिव्हिटी ', (युनिव्हर्सिटी ऑफ पेन्सिल्व्हानिया प्रेस, फिलाडेल्फिया, १९६६), हे एक सांख्यिकी अध्ययन आहे. ब्लिन यांना असे वाटते की जुन्या काळी कृषि उत्पादनाची नोंद करविताना उत्पादन कमी नोंदविण्याकडे प्रवृत्ती असल्यामुळे शेतीविषयक सरकारी किंवा अविकृत आकडेवारी जशीच्या तशी स्वीकारता येत नाही. म्हणून त्यांनी ती आकडेवारी 'जुळवून घेण्याचा' प्रयत्न केला आहे. असे 'जुळवून घेतलेले' (adjusted) तक्ते ग्रंथाच्या अखेरीस दिलेले आहेत. ए. डब्ल्यू. सिल्व्हर यांच्या ' मँचेस्टर मेन अँड इंडियन कॉटन, १८४७-१८७२ ', (मँचेस्टर युनिव्हर्सिटी प्रेस, मँचेस्टर, १९६६) या ग्रंथावरून एक उद्बोधक रहस्य उघडकीला येते. ते असे की निरंकुश अर्थव्यवहाराच्या धोरणाचे इंग्लंडात प्राबल्य असले तरी मँचेस्टरच्या लोकांना मात्र भारतीय कापूस अधिक सुलभतेने उपलब्ध होऊ शकेल असा कार्यक्रम सरकारने हाती घेतला पाहिजे असे वाटत होते. अमेरिकन यादवी युद्धानंतर भारतीय कापसाच्या प्रमाणाऐवजी त्याच्या गुणवत्तेवर भर दिला जाऊ लागला. मुख्य मागणी शेती विभाग सुरू

---

११. तसेच पाहा :— ब्लॅक, आर. जे. कॉल्सिन, ' एकॉनॉमिक पॉलिसी इन आयर्लंड अँड इंडिया इन दि टाइम ऑफ जे. एस. मिल ', ' दि एकॉनॉमिक हिस्टरी रिव्ह्यू ' ( यापुढे याचा उल्लेख ' ए.हि.रि ' असा करण्यात आला आहे. ) खंड २१, अंक २, १९६८.

करावा ही होती. त्याप्रमाणे अखेर १८७२ साली तो सुरू करण्यात आला.[१२] एस्. जे. पटेल यांचा 'अॅग्रिकल्चरल लेबर्स इन मॉडर्न इंडिया अँड पाकिस्तान', (करंट बुक हाउस, मुंबई, १९५२) हा ग्रंथ अंशतः ऐतिहासिक आहे. लेखक असे सांगतो की १८७१–७२ साली शेतमजुरांची संख्या ८२ लाख होती तर १८८१, १८९१ व १९०१ साली ती वाढत वाढत अनुक्रमे १ कोटी २५ लाख, २ कोटी ५५ लाख आणि ५ कोटी २४ लाख झाली. अर्थात् शिरगणतीतील माहिती पुरेशी तपशीलवार नसल्यामुळे ही आकडेवारी मर्यादित स्वरूपातच स्वीकारता येते. या विषयावर अधिक संशोधन होण्याची जरुरी आहे. के. के. घोष यांच्या 'अॅग्रिकलचरल लेबरर्स इन इंडिया : ए स्टडी एन दि हिस्टरी ऑफ देअर ग्रोथ अँड एकॉनॉमिक कंडिशन', (इंडियन पब्लिकेशन्स, कलकत्ता, १९३९) या ग्रंथात १८९१ ते १९४६ या कालखंडाचा विचार करण्यात आला आहे. लेखकाचे म्हणणे असे की हा प्रश्न ब्रिटिश सरकारच्या वेगवेगळ्या धोरणांमुळे निर्माण झाला. या प्रश्नाशी संबंद्ध असणारा दुसरा प्रश्न शेतकऱ्यांच्या असंतोषाचा प्रश्न आहे. या प्रश्नाचे उग्र स्वरूप १८७५ च्या दख्खनच्या दग्यांच्या रूपाने प्रकट झाले. ग्रामीण भागातील अशांततेसंबंधी अधिक संशोधन करण्याच्या बाबतीत एल्. नटराजन यांच्या 'पेझंट अपरायझिंग्ज इन इंडिया, १८५०–१९००', (पीपल्स पब्लिशिंग हाउस, मुंबई, १९५३) या ग्रंथामुळे एक व्यापक भूमिका प्राप्त होऊ शकते.[१३] एच्. एच्. मॅन यांच्या 'दि सोशल फ्रेमवर्क ऑफ अॅग्रिकल्चर : इंडिया, मिडल ईस्ट, इंग्लंड', (व्होरा अँड कं. पब्लिशर्स प्रा. लि., मुंबई, १९६७) या ग्रंथामध्ये भारताच्या शेतीविषयक इतिहासाचा समावेश करण्यात आलेला आहे.[१४]

---

१२. या ग्रंथाबरोबर खालील लेख वाचणे उपयुक्त ठरेल :—

(१) हॅरनॉक, एस. आणि मॅटेल्बॉम, डी. जी., 'ए नाइनटीन्थ सेंचुरी डेव्हलपमेंट प्रॉजेक्ट इन इंडिया : दि कॉटन इम्प्रूव्हमेंट प्रोग्रॅम', एकॉनॉमिक डेव्हलपमेंट अॅण्ड कल्चरल चेंज, खंड ३, अंक ४, १९५५, 3

(२) हार्नेटी, पी., 'दि इंपीरियॅलिझम् ऑफ फ्री ट्रेड : लँकेशायर अँड दि इंडियन कॉटन ड्यूटीज १८५९–१८६२', किता, खंड १८, अंक २, १९६५.

(३) त्रिपाठी, डी., 'ऑपॉर्च्युनिझम ऑफ फ्री ट्रेड : लँकेशायर कॉटन फॅमीन अँड इंडियन कॉटन कल्टिव्हेशन', 'इंएसोहिरि', खंड ४, अंक ३, १९६७.

(४) लोगन, एफ्. ए. 'दि अमेरिकन सिव्हिल वॉर—ए मेजर फॅक्टर इन दि इम्प्रूव्हमेंट ऑफ दि ट्रॅन्स-पोर्टेशन सिस्टिम ऑफ वेस्टर्न इंडिया', 'जइंहि', खंड ३३, भाग १, १९५५.

(५) त्रिपाठी, डी., 'ऑपॉर्च्युनिझम ऑफ फ्री ट्रेड : दि सदाशिवगड हार्बर प्रॉजेक्ट, १८५५–६५', कित्ता, खंड ५, अंक ४, १९६८.

(६) मूर, आर. जे. 'इंपीरियॅलिझम् अँड 'फ्री ट्रेड' पॉलिसी इन इंडिया, १८५३–५४', कित्ता, खंड १७, अंक १, १९६४–६५.

(७) भट्टाचार्य, एस्., 'लेसे फेअर इन इंडिया', 'इंएसोहिरि', खंड २, अंक १, १९६५.

१३. तसेच पाहा :— कॅटॅनॅच, आय्. जे, 'अॅग्रेरियन डिस्टर्बन्सेस इन नाइनटीन्थ सेंचुरी इंडिया', कित्ता, खंड ३, अंक १. १९६६.

१४. या ग्रंथांच्या जोडीने खालील लेख वाचावेत :—

(१) घोष, ए., 'साइक्लिकल ट्रेंड्स इन इंडियन अॅग्रिकल्चर, १८६१–१९१३', कित्ता, खंड ४, अंक २ १९६७.

(२) मेटकाफ, टी. ई., 'लेसे फेअर अँड टेनंट राइट्स इन मिड नाइनटीन्थ सेंचुरी इंडिया', कित्ता, खंड १, अंक २, १९६३.

[ पुढील पानावर

दुष्काळांच्या प्रश्नाच्या बाबतीत ए. लव्हेडे यांचे 'दि हिस्टरी अँड एकॉनॉमिक्स ऑफ इंडियन फॅमीन्स', (जी. बेल अँड सन्स, लंडन, १९१४) हे एक लहानसे व परिचयात्मक पुस्तक आहे. बी. एम्. भट्ट यांचा 'फॅमीन्स इन इंडिया – ए स्टडी इन सम आस्पेक्ट्स ऑफ दि एकॉनॉमिक हिस्टरी ऑफ इंडिया, १८६०–१९४५', (एशिया पब्लिशिंग हाउस, मुंबई, १९६३) हा ग्रंथ म्हणजे अर्थव्यवस्थेच्या सर्वसामान्य प्रवाहांशी दुष्काळांची सांगड घालण्याचा एक यशस्वी प्रयत्न आहे. त्यांनी या प्रश्नाचे कालखंडवार विवेचन केले आहे. याच्या उलट एच्. एस्. श्रीवास्तव यांनी 'हिस्टरी ऑफ इंडियन फॅमीन्स अँड डेव्हलपमेंट ऑफ फॅमीन पॉलिसी, १८५८–१९१८,' (श्रीराम मेहरा अँड कं., आग्रा, १९६८) या आपल्या ग्रंथात प्रत्येक दुष्काळाचे स्वतंत्रपणे विवेचन केले आहे.

या ग्रंथांव्यतिरिक्त एस्. सी. राय यांचा 'ॲग्रिकल्चरल इनडेटेडनेस इन इंडिया अँड इट्स रेमेडीज', (कलकत्ता युनिव्हर्सिटी, कलकत्ता, १९२५) हा एक ग्रंथ आहे. तो निवडक सरकारी कागदपत्रांचा संग्रह आहे. 'रिपोर्ट ऑफ दि डेक्कन रॉयट्स कमिशन, १८७८', या अहवालातील उताऱ्यांपासून या संग्रहाची सुरुवात करण्यात आली आहे. परिणामतः, आधारभूत साधनसामग्री म्हणून या ग्रंथाचा उपयोग होऊ शकेल.

औद्योगिक इतिहासाच्या क्षेत्रात ध. रा. गाडगीळ व म. वि. नामजोशी यांच्या 'ओरिजिन्स ऑफ दि मॉडर्न इंडियन बिझनेस क्लास : ॲन इंटेरिम रिपोर्ट', (इन्स्टिट्यूट ऑफ पॅसिफिक रिलेशन्स, न्यूयॉर्क, १९५९) या अहवालाचा उल्लेख केला पाहिजे. हे पुस्तक लहानसे असले तरी त्यातील विवेचन विभिन्न विद्याशाखांशी संबंधित (inter-disciplinary) व उद्बोधक आहे. या अहवालात १७५० सालाचा उल्लेख प्रामुख्याने करण्यात आला आहे. त्यानंतरची प्रकरणे प्रकाशित झालेली नाहीत. व्ही. आय्. पावलॉव्ह यांच्या 'दि इंडियन कॅपिटॅलिस्ट क्लास', (पीपल्स पब्लिशिंग हाउस, दिल्ली, १९६४) या ग्रंथात पहिल्यांदाच भांडवलदार वर्गाच्या उदयासंबंधी पुष्कळच माहिती समावेशक स्वरूपात उपलब्ध करून देण्यात आली आहे. ब्रिटिश सत्तेचा एक प्रमुख परिणाम म्हणून व्यापाऱ्यांना आधुनिक व्यवसायात प्रवेश करण्याची अधिक मोठी संधी कशी मिळाली आणि आधुनिक उद्योगांच्या प्रस्थापनेसाठी आवश्यक असणाऱ्या भांडवलाचा संचय करण्याची किती मर्यादित संधी कारागिरांना उपलब्ध होऊ शकली, याचे स्पष्टीकरण लेखकाने या ग्रंथात दिले आहे.[१५]

---

मागील पानावरून ]

(३) कानेटकर, बी. डी., 'प्राइसिंग ऑफ इरिगेशन सर्व्हिस इन इंडिया, १८५४-१९५९', अर्थविज्ञान (यापुढे या नियतकालिकाचा उल्लेख 'अवि.' असा करण्यात आला आहे.) खंड २, अंक २, १९६०.

(४) भूटानी, व्ही. सी. 'ॲग्रिकल्चरल इंडिपेंडन्स अँड ॲलिएनेशन ऑफ लँड', 'जइंहि', खंड ४७, भाग १ व २, १९६९.

१५. या विषयासंबंधी खालील लेख पहावेत :—

(१) लँब, एच्. बी., 'दि इंडियन बिझनेस कम्युनिटीज अँड दि इव्होल्यूशन ऑफ ॲन इंडस्ट्रियॅलिस्ट क्लास', पॅसिफिक अफेअर्स, खंड २८, अंक २, १९५५

(२) पंडित, डी. पी., 'क्रिएटिव्ह रेस्पॉन्स इन इंडियन एकॉनॉमी, : ए रीजनल ॲनॅलिसिस,' 'एवी', खंड ९, अंक ८, १९५७.

[ पुढील पानावर

देशाच्या सर्वसामान्य औद्योगिक विकाससंबंधीच्या ग्रंथांचा उल्लेख यापूर्वी करण्यात आलेला आहेच. त्यांमध्ये आर्. एस्. रुंगटा यांच्या 'दि राइज ऑफ बिझनेस कॉर्पोरेशन्स इन इंडिया, १८५२–१९००', (केंब्रिज साउथ एशियन स्टडीज, नं. ८) या ग्रंथाची भर घालता येईल. त्यामध्ये संयुक्त भांडवल कंपन्यांच्या विकासावर लक्ष केंद्रित करण्यात आलेले आहे. तसेच, मुंबई व कलकत्ता येथील शेअरबाजारांचा उदय व कंपनी कायद्याचा विकास यांचीही हकीगत यात दिलेली आहे. ज्या उद्योगांचे स्वतंत्रपणे विवेचन करण्यात आलेले आहे त्यांमध्ये फक्त चहाचे मळे, सुती कापड आणि लोखंड व पोलाद यांचेच उद्योग आहेत. पी. ग्रिफिथ यांच्या 'दि हिस्टरी ऑफ दि इंडियन टी इन्डस्ट्री', (वीडेन-फेल्ड अँड निकोल्सन, लंडन, १९६७), या ग्रंथात या उद्योगाच्या एकूण स्वरूपासंबंधी सर्वसामान्य चर्चा करण्यात आलेली आहे. त्याच्याबरोबरच पुढील दोन ग्रंथांचे वाचन उपयुक्त ठरेल :– एच्. ए. अँट्रॉबस, 'ए हिस्टरी ऑफ दि आसाम कंपनी, १८३९–१९५३', (टी. अँड ए. कॉन्स्टेबल लि., एडिंबर्ग, १९५७) आणि 'ए हिस्टरी ऑफ दि जोरहट टी कंपनी लि., १८५९–१९४६', (टी अँड रबर मेल, लंडन, प्रकाशनतिथी नाही). या दोन ग्रंथांवरून या उद्योगातील सर्वसामान्य प्रवृत्तींची कल्पना येते. एस्. डी. मेहता यांच्या 'दि कॉटन मिल्स ऑफ इंडिया, १८५४–१९५४', (दि टेक्स्टाइल असोसिएशन, मुंबई, १९५४), या ग्रंथामध्ये भारतातील कापडगिरण्यांविषयी, विशेषतः प्रारंभिक काळातील गिरण्यांविषयी पुष्कळच उपयुक्त माहिती दिलेली आहे. दुसरा एक महत्त्वाचा ग्रंथ 'दि आयर्न अँड स्टील इन इंडिया' (दि टाईम्स प्रेस, मुंबई, १९१९) हा असून त्याचे लेखक एच्. फ्रेझर हे आहेत. हा ग्रंथ जुना असला तरी या क्षेत्रातील त्याचे महत्त्व अजून कायम आहे.

पी. एस्. लोकनाथन् यांच्या 'इंडस्ट्रियल ऑर्गनायझेशन इन इंडिया' (जॉर्ज अॅलन अँड अनविन, १९३५) या ग्रंथाचा काही भाग व्यवस्थापक मंडळ (मॅनेजिंग एजन्सी) प्रणालीचा इतिहास देण्यासाठी खर्ची पडलेला आहे. ही व्यवस्थापक मंडळी तंत्रविशारद नव्हती परंतु ते धूर्त धंदेवाईक होते. ते एका उद्योगातून दुसऱ्या उद्योगाकडे वळत; कारण एका उद्योगातून दुसऱ्या उद्योगात जाण्याचा मार्ग मोकळा होत असे, आणि एका उद्योगातील उत्पादनांसाठी दुसऱ्या उद्योगामध्ये बाजारपेठ मिळत असे.[१६]

'सेकंड इंटरनॅशनल कॉन्फरन्स ऑफ एकॉनॉमिक हिस्टरी, १९६२', (मौटन, १९६५) या ग्रंथामध्ये ए. के. सेन यांचा 'दि कमोडिटी पॅटर्न ऑफ ब्रिटिश एंटरप्राइज इन अर्ली इंडियन इंडस्ट्रियलायझेशन, १८५४–१९१४' हा निबंध समाविष्ट आहे. त्यामध्ये सेन असे सांगतात की, सुती कापड आणि लोखंड व पोलाद या दोन उत्पादक उद्योगांनी इंग्लंडातील औद्योगिक क्रांतीचा पाया घातला होता आणि या दोन उद्योगांचा विकास भारतीय भांडवलदारांनी घडवून आणला होता. याच्या उलट, ब्रिटिश भांडवलदारांनी आपले लक्ष वाहतुकीव्यतिरिक्त प्रामुख्याने

मागील पानावरून ]

(३) आचार्य, एन्., 'क्रिएटिव्ह रेस्पॉन्स इन इंडियन एकॉनॉमी : ए कॉमेंट', कित्ता, खंड ९, अंक १७, १९५७.

तसेच पाहा :– गुड, ए., 'पार्सी सेठ्स अॅज आंत्रप्रिनर्स, १७५०–१८५०,' एकॉनॉमिक अँड पोलिटिकल वीकली, खंड ५, अंक ३५, १९७०, आणि 'कॉम्प्रॅडोर रोल ऑफ पार्सी सेठ्स, १७५०–१८५०,' कित्ता, खंड ५, अंक ४८, १९७०.

१६. किंलग, बी. बी., 'दि ओरिजिन ऑफ दि मॅनेजिंग एजन्सी सिस्टिम इन इंडिया', 'दि जर्नल ऑफ एशियन स्टडीज', खंड २६, अंक १, १९६६.

चहा, कॉफी, नीळ व तागाच्या वस्तू यांच्या निर्यातीच्या उद्योगांवर आणि शोषण व व्यापार यांवर केंद्रित केले होते. पहिल्या प्रकारच्या उद्योगांमध्ये ब्रिटिश उद्योगपतींनी का लक्ष घातले नाही याची कारणे सरकारचे धोरण व सामाजिक आचार यांमध्ये सापडू शकतात.[१७]

कामगारचळवळ आणि कामगारकायदे यांसंबंधीच्या प्रश्नांसंबंधीची चर्चा ही त्या मानाने सर्वसामान्य गोष्ट झालेली आहे. या बाबतीतील उपलब्ध ग्रंथांपैकी अधिक महत्त्वाचे ग्रंथ पुढील प्रमाणे आहेत:– जे. सी. किड, 'हिस्टरी ऑफ इंडियन फॅक्टरी लेजिस्लेशन', (युनिव्हर्सिटी ऑफ कलकत्ता, १९२०), ए. मुख्तार, 'ट्रेड युनियनिझम् अँड लेबर डिस्प्यूट्स इन इंडिया', (लाँगमन्स, ग्रीन अंड कं. लि., मद्रास, १९३५), एस्. एस्. पुणेकर, 'ट्रेड युनियनिझम् इन इंडिया', (न्यू बुक कं., मुंबई, १९४८), व्ही. व्ही. गिरी, 'लेबर प्रॉब्लेम्स इन इंडियन इंडस्ट्री', (एशिया पब्लिशिंग हाउस, मुंबई, १९५८) आणि जी. के. शर्मा, 'लेबर मूव्हमेंट इन इंडिया, इट्स पास्ट अँड प्रेझेंट', (युनिव्हर्सिटी पब्लिशर्स, जालंधर १९६३). या ग्रंथांहून अगदी वेगळ्या प्रकारचा ग्रंथ एम्. डी. मॉरिस यांचा, 'दि इमर्जन्स ऑफ अॅन इंडस्ट्रियल लेबर फोर्स इन इंडिया, ए स्टडी ऑफ दि बॉंबे कॉटन मिल्स, १८५४–१९४७', (ऑक्सफोर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, मुंबई, १९६५) हा आहे. यामध्ये लेखकाने असे दाखवून देण्याचा प्रयत्न केला आहे की १९४७ पूर्वी आणि विशेषत: १९२१ पर्यंत भारताच्या औद्योगिक विकासात, पुरेशा कामगारांना संघटित करून कामी लावता न आल्यामुळे, गंभीर अडथळा निर्माण झाला होता, हा जो समज सामान्यत: उद्योगपती, अधिकारी व विद्वान् यांच्यामध्ये प्रचलित असल्याचे दिसून येते, त्याला काही आधार नाही.[१८] आणखी एक ग्रंथ 'एमिग्रेशन ऑफ इंडियन लेबर, १८३४–१९००' (पीपल्स पब्लिशिंग हाउस, नवी दिल्ली, १९७०) हा असून त्याचे लेखक पी. साहा आहेत. ब्रिटिश गियाना (आता गुयाना) त्रिनिदाद, जमैका व मॉरिशस या ब्रिटिशांच्या साखर उत्पादन करणाऱ्या वसाहतींमध्ये भारतातून जे करारबद्ध मजूर १८३४ साली गुलामीची प्रथा बंद झाल्यानंतर स्थायिक होण्यासाठी गेले त्यांच्या संबंधी या ग्रंथात चर्चा करण्यात आली आहे. लेखकाच्या मते भारतीय मजुरांनी या वसाहतींच्या संपत्तीत खूप भर घातली. त्याचे असेही मत आहे की भारतातील सामाजिक व सरंजामशाहीचा जुलूम, शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा, भारी जमीनमहसुलाची आकारणी, उद्योग धंद्यांचा ऱ्हास वगैरे काही सामाजिक – आर्थिक कारणांमुळे हे भारतीय लोक परदेशांत स्थायिक होण्यासाठी गेले.

---

१७. या संदर्भात पुढील लेखही पाहावा :– हार्नेटी, पी., 'इंडिया अँड ब्रिटिश कमर्शियल एंटरप्राइज : दि केस ऑफ दि मँचेस्टर कॉटन कंपनी, १८६०–१८६४', 'इंएसोहिरि', खंड ३, अंक ४, १९६६.

१८. मॉरिस यांच्या मतांवर टीका करणारे पुढील लेख पाहावेत :—

(१) मेहता, एस्. डी., 'प्रोफेसर मॉरिस ऑन टेक्स्टाइल लेबर सप्लाय : ए कॉमेंट', इंडियन एकॉनॉमिक जर्नल, (यापुढे याचा उल्लेख 'इंएज' असा करण्यात आला आहे.) खंड १, अंक ३, १९५४.

(२) थॉर्नर, डी., 'कॅज्युअल एम्प्लॉयमेंट ऑफ ए फॅक्टरी लेबर-फोर्स : दि केस ऑफ इंडिया, १८५०–१९३९', 'दि एकॉनॉमिक वीकली', खंड ९, जाने. १९५७.

(३) कृष्णप्पन, एस्., 'रिव्ह्यू आर्टिकल : अनलिमिटेड लेबर सप्लाय अँड दि प्रॉब्लेम्स ऑफ रेझिंग अॅन इंडस्ट्रियल लेबर फोर्स इन इंडिया', एकॉनॉमिक डेव्हलपमेंट अँड कल्चरल चेंज, खंड १६, अंक ३, १९६८.

मजुरीच्या संबधात पाहा :– भट्टाचार्य, डी., 'ट्रेंड ऑफ वेजेस इन इंडिया (१८७३–१९००)', 'अघि', खंड ७, अंक ३, १९६५.

व्यापार व वाणिज्य विषयक धोरणासंबंधीची अध्ययनेही उद्‌बोधक आहेत. अंतर्गत वाणिज्य व संबद्ध प्रश्नांविषयी टी. बॅनर्जी यांचा 'इंटर्नल मार्केट ऑफ इंडिया, १८३४–१९००', (अॅकॅडेमिक पब्लिशर्स, कलकत्ता, १९६६) हा ग्रंथ आहे. ते भारताच्या आर्थिक एकात्मतेचे अध्ययन आहे. त्यामध्ये पुढील पैलूंचा विचार करण्यात आला आहे:– (१) अंतर्गत व्यापाराच्या मार्गातील अडथळे दूर करणे; (२) वाहतुकीच्या साधनांत सुधारणा घडवून आणणे; (३) वजने व मापे यांच्यांत सुधारणा करणे; आणि (४) व्यापारावरील करआकारणी. त्यात अफू, मीठ व कापूस यांचे उत्पादन व व्यापार यांचेही विश्लेषण करण्यात आलेले आहे.[१९] परदेशी व्यापाराच्या बाबतीत आम्ही यापूर्वीच सी. जे. हॅमिल्टन यांच्या 'दि ट्रेड रिलेशन्स बिट्वीन इंडिया अॅंड इंग्लंड', आणि सी. जी. एफ्. सिमकिन यांच्या 'दि ट्रॅडिशनल ट्रेड ऑफ एशिया' या ग्रंथांचा उल्लेख केला आहे. के. ग्लॅमन यांच्या 'डच-एशियाटिक ट्रेड, १६२०–१७४०', (मार्टिनस निजहॉफ, दि, हेग, १९५८) आणि सी. एन्. पार्किनसन यांच्या 'ट्रेड इन दि ईस्टर्न सीज, १७९३–१८१३', (युनिव्हर्सिटी प्रेस, केंब्रिज, १९५१) या ग्रंथांमध्ये भारताच्या परराष्ट्रीय व्यापाराची चर्चा करण्यात आलेली आहे. आय्. दुर्गाप्रसाद यांच्या 'सम आस्पेक्ट्स ऑफ इंडियन फॉरिन ट्रेड, १७५७–१८९३', (पी. एस्. किंग अॅंड सन लि., लंडन, १९३२) या ग्रंथात भारतीय व्यापाराचे स्वरूप व दिशा यांचे भारताच्या आर्थिक परिस्थितीवरील त्याच्या प्रतिक्रियेच्या संदर्भात विवेचन करण्यात आले आहे.[२०] याच्या जोडीने पी. रॉय. यांचा 'इंडियाज फॉरिन ट्रेड सिन्स १८७०', (जी. रूटलेज अॅंड सन्स, लंडन, १९३४) हा ग्रंथ वाचावा. एन्. जे. शाह यांच्या 'हिस्टरी ऑफ् इंडियन टॅरिफ्स', (थॅकर अॅंड कंपनी लि., मुंबई, १९२४) या ग्रंथात १९२२ पर्यंतच्या परिस्थितीचे सांगोपांग विवेचन करण्यात आलेले आहे. त्यांचे म्हणणे असे की, १८३३ पर्यंत प्रत्येक इलाखा (प्रांत) हा स्वतंत्र सीमाशुल्क (जकात) घटक समजला जात असे; आणि आंतरप्रांतीय व्यापारावर परदेशी व्यापारासारखी जकात वसूल केली जात असे. शिवाय, ब्रिटिशेतर जहाजवाहतूक व माल यांच्या भाडयांशी तुलना करिता ब्रिटिश जहाजवाहतूक व माल यांची भाडी कंपनीकडून खास सवलतीच्या दराने आकारली जात. ही परिस्थिती त्या शतकाच्या उत्तरार्धात निरंकुश अर्थव्यवहाराचे धोरण अवलंबिण्यात आल्यानंतर संपुष्टात आली, असे लेखक सांगतो.[२१]

---

१९. तसेच पाहा :– बॅनर्जी, टी. एस., 'ट्रॅन्झिट अॅंड टाउनड्यूटीज इन बॉंबे अॅंड मद्रास इन दि फर्स्ट हाफ ऑफ दि नाइनटीन्थ सेंचुरी', 'बेंपाप्रे', खंड, ८२, भाग २, १९६३.

२०. भारत-अमेरिका व्यापार-संबंधाविषयी अनेक लेख प्रकाशित झाले आहेत. पुढील लेख पाहावेत :–

(१) मिश्र, पी., 'इंडो-अमेरिकन ट्रेड रिलेशन्स : दि पीरियड ऑफ ग्रोथ, १७८४–१८५०', 'जइंहि' खंड ४२, भाग ३, १९६४.

(२) घोषाल, एच. आर., 'इंडो-अमेरिकन ट्रेड ड्यूरिंग दि फ्रेंच रेव्होल्यूशनरी अॅंड नेपोलियनिक वॉर्स', कित्ता, खंड ४१, भाग २, १९६३.

(३) मिश्र, पी., 'इंडो-अमेरिकन ट्रेड रिलेशन्स, १८६६–१८८०', कित्ता, खंड १७, भाग ३, १९६५.

(४) सिन्हा, डी. पी., 'अर्ली अमेरिकन ट्रेड विथ इंडिया, १७८४–१८१५', 'जाइरि', खंड ६, अंक १, १९६३.

परदेशी व्यापाराच्या बाबतीतील आणखी एक महत्त्वाचा लेख हा आहे :– भाटिया, बी. एम्., 'टर्म्स ऑफ ट्रेड अॅंड एकॉनॉमिक डेव्हलपमेंट : ए केस स्टडी ऑफ इंडिया, १८६१–१९३९', 'इंएज', खंड १६, अंक ४–५, १९६९.

२१. तसेच पाहा :– तळटीप क्र. १२.

पुढील चार ग्रंथांमध्ये एकोणिसाव्या शतकाकडे दुर्लक्ष करण्यात आलेले नसले तरी प्रामुख्याने विसाव्या शतकावरच लक्ष केंद्रित करण्यात आले आहे :– के. टी. शहा, 'ट्रेड, टॅरिफ्स अँड ट्रान्सपोर्ट इन इंडिया', (मुंबई व लंडन, १९२३), एच्. एम्. दे, 'दि इंडियन टॅरिफ प्रॉब्लेम इन रिलेशन टु इंडस्ट्री अँड टॅक्सेशन', (जॉर्ज ॲलन अँड अनविन लि., लंडन, १९३३), के. पी. खारा, 'इंडस्ट्रियल प्रोटेक्शन इन इंडिया', (मुंबई, १९३९), आणि बी. पी. आडारकर, 'दि इंडियन फिस्कल पॉलिसी', (किताबिस्तान, अलाहाबाद, १९४१).

वाहतुकीच्या बाबतीत बरेचसे प्राथमिक स्वरूपाचे अभ्यास करण्यात आले आहेत. त्यांपैकी विशेष प्रसिद्ध अभ्यास पुढीलप्रमाणे आहेत:– एच्. बेल, 'रेल्वे पॉलिसी इन इंडिया', (रिव्हिंग्टन, पर्सीव्हल अँड कं. लंडन, १८९४), एन्. सन्याल, 'डेव्हलपमेंट ऑफ इंडियन रेल्वेज,' (युनिव्हर्सिटी ऑफ कलकत्ता, कलकत्ता, १९३०), जे. एन्. सोहनी, 'इंडियन रेल्वेज वन हंड्रेड ईअर्स, १८५३-१९५३', (मिनिस्ट्री ऑफ रेल्वेज–रेल्वे बोर्ड, गव्हर्नमेंट ऑफ इंडिया, नवी दिल्ली, १९५३), आणि बी. के. मलिक, 'हंड्रेड ईयर्स ऑफ पाकिस्तान रेल्वेज', (मिनिस्ट्री ऑफ रेल्वेज अँड कम्युनिकेशन्स–रेल्वे बोर्ड, गव्हर्नमेंट ऑफ पाकिस्तान, कराची, १९६२). डॅनियल थॉर्नर यांचा, 'इन्व्हेस्टमेंट इन एम्पायर ब्रिटिश रेल्वे अँड स्टीम शिपिंग एंटरप्राइज इन इंडिया, १८२५ ते १८४९', (युनिव्हर्सिटी ऑफ पेन्सिल्व्हानिया प्रेस, फिलाडेल्फिया, १९५०), हा ग्रंथ म्हणजे एक अधिक विद्वत्तापूर्ण प्रयत्न आहे. १८२५ ते १८४९ या कालखंडामध्ये हमीची प्रणाली सुरू होण्यास कोणती परिस्थिती कारणीभूत झाली याचे विश्लेषण लेखकाने या ग्रंथात केले आहे. त्याचे म्हणणे असे की, रेल्वे–प्रवर्तकांच्या हाती एक मोठे हुकमाचे पान होते. ते असे की, "१८४० च्या सुमारास कच्च्या मालाचा पुरवठा करणारा आणि तयार मालाची बाजारपेठ बनू शकणारा देश या नात्याने भारताचा झपाट्याने विकास घडून येणे ही ब्रिटिश अर्थव्यवस्थेची अनिवार्य गरज होती. या हुकुमाच्या पानाचा रेल्वे प्रवर्तकांनी पुरेपूर उपयोग करून घेतला." रेल्वेव्यतिरिक्त थॉर्नर यांनी आगबोटीच्या व्यवसायाच्या विकासाचीही माहिती दिली आहे.[२२] परंपरागत जहाज-

२२. या प्रश्नासंबंधी अनेक लेख प्रसिद्ध झाले आहेत. ते येणेप्रमाणे:–

(१) थॉर्नर, डी., 'ग्रेट ब्रिटन अँड दि डेव्हलपमेंट ऑफ इंडियाज रेल्वेज', 'जर्नल ऑफ एकॉनॉमिक हिस्टरी', ११, शिशिर ऋतु, १९५१.

(२) लेहमन, एफ्., "ग्रेट ब्रिटन अँड दि सप्लाय ऑफ रेल्वे लोकोमोटिव्हज ऑफ इंडिया : ए केस-स्टडी ऑफ 'एकॉनॉमिक इंपीरियॅलिझम्'," 'इंएसोहिरि', खंड २, अंक ४, १९६५.

(३) थॉर्नर, डी., 'दि पॅटर्न ऑफ रेल्वे डेव्हलपमेंट इन इंडिया', 'फार ईस्टर्न क्वार्टर्ली', खंड १४, १९५५.

(४) मॅकफर्सन, डब्ल्यू., जे., 'इन्व्हेस्टमेंट इन इंडियन रेल्वेज, १८४५-१८७५', 'एहिरि', खंड ८, अंक २, १९५५.

(५) आइटा, एम्. सी., 'पॅसेंजर फेअर्स ऑन दि इंडियन रेल्वेज, १८४८-१९६९', 'इंएसोहिरि', खंड ४, अंक १, १९६९.

(६) बावा, व्ही. के., 'सालार जंग अँड दि निझाम्स स्टेट रेल्वे', थित्ता, खंड २, अंक ४, १९६५.

(७) हार्नेटी, पी., "'इंडियाज मिसिसिपी': दि रिव्हर गोदावरी नॅव्हिगेशन स्कीम, १९५२-७१", 'जएंहि', खंड ४३, भाग ३, १९६५.

(८) स्टेपल्स, ए सी., 'इंडियन मॅरिटाइम ट्रान्सपोर्ट इन १८४०', 'इंएसोहिरि', खंड ७, अंक १, १९७०.

वाहतुकीचे संक्षिप्त वर्णन नुकत्याच उल्लेखलेल्या राधाकुमुद मुखर्जींच्या 'ए हिस्टरी ऑफ इंडियन शिपिंग अँड मॅरिटाइम अॅक्टिव्हिटी फ्रॉम दि अर्लिएस्ट टाइम्स' या ग्रंथातही पाहावयास मिळते. आर्. ए. वाडिया यांच्या 'दि बाँबे डाकयार्ड अँड दि वाडिया मास्टर बिल्डर्स'. (स्वतः लेखकाकडून प्रकाशित, १९५७) या ग्रंथात असे दाखवून देण्यात आले आहे की मुंबईच्या गोद्यांचा इतिहास हा खरोखरी वाडिया घराण्याचा व त्या घराण्याने सहा पिढ्यांमध्ये गाजविलेल्या कर्तृत्वाचा इतिहास आहे.

भारतीय रुपयाच्या कहाणीचे पुष्कळच चर्वितचर्वण झालेले आहे. या संबंधीच्या इतर ग्रंथांपैकी विशेष उपयुक्त ग्रंथ पुढीलप्रमाणे आहेत:– एच्. एल्. छाबलानी, 'स्टडीज इन इंडियन करन्सी अँड एक्सचेंज,' (ऑक्सफोर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, मुंबई, १९३१), बी. ई. दादाचंदजी 'हिस्टरी ऑफ इंडियन करन्सी अँड एक्सचेंज,' (डी. बी. तारापोरवाला सन्स् अँड कं, मुंबई, १९३१), बी. आर. आंबेडकर, 'हिस्टरी ऑफ इंडियन करन्सी अँड बँकिंग,' (थॅकर अँड कंपनी, मुंबई, १९४७), आणि डी. के. मलहोत्रा, 'हिस्टरी अँड प्रॉब्लेम्स ऑफ इंडियन करन्सी, १८३८-१९५९', (सिमला बुकशॉप, सिमला–दिल्ली, १९६०).[२३] आधुनिक बँक व्यवसायाच्या दृष्टीने दोन महत्त्वाचे ग्रंथ पुढीलप्रमाणे आहेत :– एच्. सिन्हा, 'अर्ली युरोपियन बँकिंग इन इंडिया विथ सम रिफ्लेक्शन्स ऑन प्रेझेंट कंडिशन्स', (मॅकमिलन अँड कं., लंडन, १९२७); आणि ओ. पी. गुप्ता, 'सेंट्रल बँकिंग इन इंडिया, १७७७–१९३४', (हिंदुस्तान टाइम्स प्रेस, नवी दिल्ली, १९५३). देशी पेढ्यांसंबंधी माहिती देणारे एकमेव पुस्तक म्हणजे जे. एच्. लिटल यांचे, 'हाउस ऑफ जगतशेठ', (कलकत्ता हिस्टॉरिकल सोसायटी, कलकत्ता, १९६७) हे होय. परंतु हे पुस्तक राजकीय व आर्थिक अशा दोन्ही बाजूंची चर्चा करणारे आहे. प्लासीच्या लढाईला कारणीभूत होणाऱ्या परिस्थितीमध्ये त्या पेढीने कोणती भूमिका बजावली आणि त्यानंतर तिचा कसा ऱ्हास होत गेला याचे तपशीलवार वर्णन लेखकाने यात केले आहे.[२४]

या संदर्भात एल्. एच्. जेंक्स यांच्या 'दि मायग्रेशन ऑफ ब्रिटिश कॅपिटल टु १८७५', (ए. ए. नॉफ, न्यूयॉर्क, १९२७) या उपयुक्त ग्रंथाचा उल्लेख करिता येईल. एम्. किड्रोन यांच्या 'फॉरिन इनव्हेस्टमेंट्स इन इंडिया', (ऑक्सफोर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, लंडन, १९६५) या ग्रंथात १८७० पासून भारतात झालेल्या परदेशी गुंतवणुकीचा इतिहास देण्यात आला आहे.

भारतीय लोकवित्तव्यवस्थेच्या बाबतीत पी. बॅनर्जी यांच्या 'इंडियन फायनान्स इन दि डेज ऑफ दि कंपनी', (मॅकमिलन अँड कं. लि., लंडन, १९२८) या ग्रंथाचा प्रथम उल्लेख केला पाहिजे. त्यामध्ये १७६५ ते १८५८ या कालखंडाचा विचार करण्यात आला आहे. लेखकाचे म्हणणे असे आहे की, सर्वसामान्य परिस्थितीत भारताचा महसूल हा खर्च भागविण्यास पुरेसा असे. परंतु युद्धांच्या काळात जमेपेक्षा खर्च जास्त होई व त्यामुळे सरकारी कर्जाचा डोंगर वाढू

---

२३. तसेच पाहा :– बॅनर्जी, पी., 'ए नोट ऑन दि ऑसिलेटिंग बिहेवियर ऑफ इंडियन प्राइसेस', 'इंजए', खंड ४०, अंक ३, १९६०.

२४. तसेच पाहा :–

(१) दास, एन्., 'ए ग्लिम्प्स ऑफ बँकिंग अॅक्टिव्हिटीज इन इंडिया ड्यूरिंग दि फर्स्ट हाफ ऑफ दि नाइनटीन्थ सेंचुरी', किता, खंड १४, अंक १, १९३३.

(२) रामचंद्र राव, बी., 'ऑर्गनाइझ्ड बँकिंग इन दि डेज ऑफ जॉन कंपनी', किता, खंड १०, अंक १, १९२९.

लागे. तसेच, बंगाल प्रांतातून गोळा होणारा महसूल मुंबई व मद्रास प्रांतांची तूट भरून काढण्यासाठी वापरला जाई. ब्रिटिश अमलाखालील भारतासंबंधी पुढील दोन पुस्तके माहिती देतात :– जे. स्ट्रॅची व आर्. स्ट्रॅची, 'दि फायनान्स अँड पब्लिक वर्क्स ऑफ इंडिया फ्रॉम १८६९ टु १८८१', (केगन पॉल, ट्रेंच अँड कं., लंडन, १८८२) आणि के. टी. शहा, 'सिक्स्टी ईयर्स ऑफ इंडियन फायनान्स,' (मुंबई, १९२१).[२५] तसेच, पी. बॅनर्जी यांच्या 'ए हिस्टरी ऑफ इंडियन टॅक्सेशन', (मॅकमिलन अँड कं. लि., लंडन, १९३०) या ग्रंथात वेगवेगळ्या करांचा विचार करण्यात आला आहे. संघीय वित्तव्यवस्थेसंबंधी अनेक पुस्तके विद्यमान आहेत. त्यांपैकी विशेष महत्त्वाची पुढीलप्रमाणे :– बी. आर्. आंबेडकर, 'दि इव्होल्यूशन ऑफ प्रॉव्हिन्शियल फायनान्स इन ब्रिटिश इंडिया,' (पी. एस्. किंग अँड सन लि., लंडन, १९२५), पी. बॅनर्जी, 'प्रॉव्हिन्शियल फायनान्स इन इंडिया,' (मॅकमिलन अँड कं. लि., लंडन, १९२९), के. टी. शहा, 'फेडरल फायनान्स इन इंडिया,' (डी. बी. तारापोरवाला अँड सन्स, मुंबई, १९२९), आणि पी. जे. थॉमस, 'दि ग्रोथ ऑफ फेडरल फायनान्स इन इंडिया,' (ऑक्सफोर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, १९३९).

या ठिकाणी डी. भट्टाचार्य व बी. भट्टाचार्य यांनी संपादिलेल्या 'सेन्सस ऑफ इंडिया १९६१ : रिपोर्ट ऑन दि पॉप्युलेशन एस्टिमेट्स ऑफ इंडिया (१८२०–१८३०),' (ऑफिस ऑफ दि रजिस्ट्रार जनरल, इंडिया) या ग्रंथांचाही उल्लेख केला पाहिजे. अठराव्या शतकापासून १८७० पर्यंतच्या भारताच्या लोकसंख्येचे अंदाज प्रस्तुत करून त्यांचे पृथक्करण करणाऱ्या आठ नियोजित खंडांपैकी हा पहिला खंड आहे. हे काम पूर्ण होईपर्यंत के. डेव्हिस यांचा 'दि पॉप्युलेशन ऑफ इंडिया अँड पाकिस्तान,' (प्रिन्स्टन युनिव्हर्सिटी प्रेस, प्रिन्स्टन, १९५१) हा ग्रंथ या क्षेत्रात महत्त्वाचा समजला जाईल.

काही पुस्तके पूर्णपणे भारताच्या आर्थिक इतिहासासंबंधी नसली तरी तो इतिहास समजून घेण्यास त्यांचा उपयोग होण्यासारखा आहे. त्यांच्यापैकी महत्त्वाची पुढीलप्रमाणे आहेत :– पी. स्पियर, 'ट्विलाइट ऑफ दि मुगल्स : स्टडीज इन दि लेट मुगल दिल्ली,' (ओरिएंटल बुक्स रीप्रिंट कॉर्पोरेशन, नवी दिल्ली, १९६९) ए. टी. एम्ब्री, 'चार्लस ग्रँट अँड ब्रिटिश रूल इन

---

२५. तसेच पाहा :—

(१) भट्टाचार्य, एस्., 'ट्रेव्हेलियन, विल्सन, कॅनिंग अँड दि फॉर्म्युलेशन ऑफ इंडियन फायनॅन्शियल पॉलिसी', 'बेंपाप्रे', खंड ८०, भाग १, १९६१.

(२) क्लीन, आय., 'विल्सन व्हर्सेस ट्रेव्हेलियन : फायनान्स अँड मॉडर्नायझेशन इन इंडिया', 'इंएसोहिरि', खंड ७, अंक २. १९७०.

(३) कानूनगो, बी., 'दि मॉडर्नायझेशन ऑफ ब्रिटिश इंडियन फायनान्स, १८५९–६२', 'अइंहि', खंड ४५, भाग २, १९६७.

(४) सुधीरचंद्र, 'दि इन्कमटॅक्स (१८६०–१८७२) : ए स्टडी इन बेसिक कॉन्ट्रॅडिक्शन्स', 'इंएसोहिरि', खंड ३, अंक २, १९६६.

(५) नैदिस, एम्., 'ए नोट ऑन सर जॉन लॉरेन्स अँड दि इन्कम टॅक्स,' 'बेंपाप्रे', खंड ७९, भाग २, १९६०.

(६) सरकार एस्. आर., 'सेल्स टॅक्स हॅज ए हिस्टरी इन इंडिया', 'इंजए,' खंड ३४, अंक २, १९५३.

(७) रेड्डी, के. एन्, 'ग्रोथ ऑफ गव्हर्नमेंट एक्सपेंडिचर अँड नॅशनल इन्कम इन इंडिया : १८७२–१९६६', 'पब्लिक फायनान्स', खंड २५, अंक १, १९७०.

इंडिया,' ( जॉर्ज ॲलन अँड अनविन लि., लंडन, १९६२ ), डी. एन्. पाणिग्राही, ' चार्लस मेटकाफ इन इंडिया : आयडियाज अँड ॲडमिनिस्ट्रेशन, १८०६–१८३५ ' (मुन्शीराम मनोहरलाल, दिल्ली, १९६८ ), डी. पी. सिन्हा, ' सम आस्पेक्ट्स ऑफ ब्रिटिश सोशल अँड ॲडमिनिस्ट्रेटिव्ह पॉलिसी इन इंडिया ड्यूरिंग दि ॲडमिनिस्ट्रेशन ऑफ लॉर्ड ऑकलंड,' (पुंथी पुस्तक, कलकत्ता, १९६९), एम्. एन्. दास, ' एकॉनॉमिक अँड सोशल डेव्हलपमेंट ऑफ मॉडर्न इंडिया, १८४८–१८५६,' ( फिरमा के. एल्. मुखोपाध्याय, कलकत्ता, १९५९ ), आर्. जे. मूर, ' सर चार्लस वुड्स इंडियन पॉलिसी, १८५३–६६', ( मँचेस्टर युनिव्हर्सिटी प्रेस, मँचेस्टर, १९६६ ), टी. आर् मेटकाफ, ' आफ्टरमाथ ऑफ रिव्होल्ट इंडिया, १८५७–१८७०,' ( प्रिन्स्टन युनिव्हर्सिटी प्रेस, १९६५ ), डी. पॉल, ' ॲडमिनिस्ट्रेशन ऑफ सर जॉन् लॉरेन्स इन इंडिया, १८६४–१८६९', ( मिनर्व्हा बुक-शॉप, सिमला, १९५२ ), ई. सी. मोल्टन, ' लॉर्ड नॉर्थब्रुक्स इंडियन ॲडमिनिस्ट्रेशन, १८७२–१८७६,' ( एशिया पब्लिशिंग हाउस, मुंबई, १९६८ ), व्ही. सी. पी. चौधरी, ' इंपीरियल पॉलिसी ऑफ ब्रिटिश इन इंडिया (१८७६–१८८०) बर्थ ऑफ इंडियन नॅशनॅलिझम्,' ( पुंथी पुस्तक, कलकत्ता, १९६८ ), एस्. गोपाल, ' दि व्हाइसरॉयल्टी ऑफ लॉर्ड रिपन, १८८०–१८८४ ', ( ऑक्सफोर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, लंडन, १९५३ ), आणि बी. बी. मिश्र, ' दि इंडियन मिडल क्लासेस', ( ऑक्सफोर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, १९६१ ).

भारतीय जीवनाच्या वेगवेगळ्या क्षेत्रांवरील ब्रिटिश प्रभावाचे मूल्यमापन करणारे काही ग्रंथ आहेत. त्यांमध्ये भारतीय अर्थव्यवस्थेवरील ब्रिटिश प्रभावाचाही विचार करण्यात आलेला आहे. त्यांपैकी विशेष उल्लेखनीय ग्रंथ पुढीलप्रमाणे होत:– पी. ग्रिफिथ, ' दि ब्रिटिश इम्पॅक्ट ऑन इंडिया ', (मॅकडोनाल्ड अँड कं., पब्लिशर्स, लि. लंडन, १९५२), राम गोपाल, ' ब्रिटिश रूल इन इंडिया, ॲन ॲसेसमेंट ', ( एशिया पब्लिशिंग हाउस, मुंबई, १९६३ ), एम्. एम्. अहलु-वालिया, ' फ्रीडम स्ट्रगल इन इंडिया, १८५८–१९०९ ', (रणजीत प्रिंटर्स अँड पब्लिशर्स, दिल्ली, १९६५), ताराचंद, ' हिस्टरी ऑफ दि फ्रीडम मूव्हमेंट इन इंडिया ', खंड १ व २, ( दि पब्लिकेशन्स डिव्हिजन, नवी दिल्ली, १९६१ व १९६७ ) आणि डी. ए. लो (सं.), 'साउंडिंग्ज इन मॉडर्न साउथ एशियन हिस्टरी ', (वीडेनफेल्ड अँड निकोल्सन, लंडन, १९६८). आर्. सी. दत्त यांच्या ' दि एकॉनॉमिक हिस्टरी ऑफ इंडिया अंडर ब्रिटिश रूल '; आणि ' दि एकॉनॉमिक हिस्टरी ऑफ इंडिया इन दि व्हिक्टोरियन एज ' या ग्रंथांचा उल्लेख यापूर्वी करण्यात आलेला आहेच. एफ्. जी. बेली यांच्या ' कास्ट अँड दि एकॉनॉमिक फ्रांटियर ', (मँचेस्टर युनिव्हर्सिटी प्रेस, मँचेस्टर, १९५७) या ग्रंथात ब्रिटिश राजवटीचा परिणाम म्हणून भारताच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेत घडून आलेल्या संरचनात्मक (structural) परिवर्तनांचे विश्लेषण करण्यात आले आहे.[२६]

याखेरीज प्रादेशिक आर्थिक इतिहासाविषयी पुष्कळच साहित्य उपलब्ध आहे. देशाच्या इतर भागांच्या मानाने बंगाल, बिहार व ओरिसा या तीन प्रांतांचा अभ्यास अधिक तपशीलवार-

---

२६. तसेच पाहा :–

(१) सोवनी, एन्. व्ही., ' दि ब्रिटिश इम्पॅक्ट ऑन इंडिया बिफोर १८५०–१८५७ ', आणि ' दि ब्रिटिश इम्पॅक्ट ऑन इंडिया आफ्टर १८५०–१८५७', ' जर्नल ऑफ वर्ल्ड हिस्टरी ', खंड १, अंक ४, १९५३–५४ आणि खंड २, अंक १, १९५४–५५.

पणे करण्यात आला आहे. एन्. एन्. राय यांचा ' दि अॅनाल्स ऑफ दि अर्ली इंग्लिश सेटलमेंट इन बिहार ', (कमला बुक डेपो लि. कलकत्ता, १९२७) आणि के. दत्त यांचा ' दि डच इन बेंगॉल अँड बिहार, १७४०–१८२५ ', (युनिव्हर्सिटी ऑफ पाटणा, १९४८) या दोन ग्रंथांमध्ये सुरुवातीच्या काळातील या प्रदेशांच्या आर्थिक जीवनाविषयी चर्चा करण्यात आलेली आहे. एस्. भट्टाचार्य यांच्या ' दि ईस्ट इंडिया कंपनी अँड दि एकॉनॉमी ऑफ बेंगॉल, १७०४–१७४० ', (लुझाक अँड कं., लंडन, १९५४) या ग्रंथात अधिक सांगोपांग विवेचन करण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे. जे. सी. सिन्हा यांच्या ' एकॉनॉमिक अॅनाल्स ऑफ बेंगॉल ' या ग्रंथात १७५७–१७९७ हा कालखंड घेण्यात आला आहे. त्यांनी असा निष्कर्ष काढला आहे की इतर गोष्टींबरोबरच, ' विणकरांचे आंगठे तोडण्यात आल्या'च्या सार्वत्रिक दंतकथेला काही आधार नाही. एन्. के. सिन्हा यांच्या ' एकॉनॉमिक हिस्टरी ऑफ बेंगॉल फ्रॉम प्लासी टु दि पर्मनंट सेटलमेंट ', खंड १, (लेखकाने स्वतःच प्रकाशित केलेला ग्रंथ, कलकत्ता, १९५६ ) या ग्रंथात याच कालखंडाचा विचार करण्यात आला आहे. पहिल्या खंडात वाणिज्य व व्यापार यांची चर्चा केलेली असून दुसऱ्या खंडात (प्रकाशक : फिरमा के. एल्. मुखोपाध्याय, कलकत्ता, १९६२) जमीनमहसुलाची आकारणी आणि त्याच्याशी संबद्ध असलेले इतर पैलू यांचा विचार करण्यात आला आहे. अलीकडेच या ग्रंथाचा तिसरा खंडही प्रकाशित झाला आहे. या प्रश्नासंबंधी इतरही अनेक पुस्तके आहेत. त्यांतल्य त्यात जुन्या ग्रंथांपैकी पुढील ग्रंथांचा उल्लेख करणे योग्य होईल :— एफ्. डी. अस्कोली, ' अर्ली रेव्हेन्यू हिस्टरी ऑफ बेंगॉल अँड दि फिफ्थ रिपोर्ट, १८१२ ', (क्लॅरेंडन प्रेस, ऑक्सफोर्ड, १९१२), बी. आर. रामभूतम्, ' स्टडीज इन दि लँड रेव्हेन्यू हिस्टरी ऑफ बेंगॉल, १७६९–१७८७ ', (ऑक्सफोर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, लंडन, १९२६), के. सी. चौधुरी, ' हिस्टरी अंड एकॉनॉमिक्स ऑफ दि लँड सिस्टिम इन बेंगॉल ', (कलकत्ता, १९२७), आणि डी. एन्. बॅनर्जी, ' अर्ली लँड रेव्हेन्यू सिस्टिम इन बेंगॉल अँड बिहार, १७६५–१७७२ ', (लाँगमन्स, ग्रीन अँड कं., लंडन, १९३६). यांमध्ये एस्. गोपाल यांच्या ' पर्मनंट सेटलमेंट इन बेंगॉल अँड इट्स रिझल्ट्स ', (जॉर्ज अॅलन अँड अनविन, लंडन, १९४९) या ग्रंथाची भर घालण्यास हरकत नाही. आर्. गुहा यांच्या अलीकडेच प्रसिद्ध झालेल्या ' ए रूल ऑफ प्रॉपर्टी फॉर बेंगॉल ', (मौल्टन अँड कं, पॅरिस, १९६३) या ग्रंथात कायमधारा पद्धतीचा पाठपुरावा सातत्याने चालू राहाण्याची कारणे व त्याचे परिणाम यांची चर्चा करण्यात आली असून त्यामध्ये प्रामुख्याने या पद्धतीच्या पाच प्रमुख कैवाऱ्यांची हकीगत देण्यात आली आहे. याच्या जोडीने आर्. एन्. सिन्हा यांचा, ' बिहार टेनंट्री, १७९३–१८३३, ' (पीपल्स पब्लिशिंग हाउस, मुंबई १९६८) आणि के. जेना यांचा ' लँड रेव्हेन्यू अॅडमिनिस्ट्रेशन इन ओरिसा ड्यूरिंग दि नाइनटीन्थ सेंचुरी ', (एस्. चंद अँड कं., नवी दिल्ली, १९६८) या दोन ग्रंथांचा उल्लेख करण्यास हरकत नाही. के. सी. घोष यांच्या ' फॅमीन्स इन बेंगॉल, १७७०–१९४३ ', (इंडियन असोशिएटेड पब्लिशिंग कं. लि., कलकत्ता, १९४४) या ग्रंथात प्रादेशिक पार्श्वभूमीवर दुष्काळांचे निरूपण करण्यात आले आहे. लेखकाचा मुख्य उद्देश १९४३ च्या दुष्काळाचा विचार करणे हा असला तरी तो त्या पूर्वीच्या दुष्काळांच्या पार्श्वभूमीवर त्याची चर्चा करतो. बी. चौधुरी यांच्या ' ग्रोथ ऑफ कमर्शियल अॅग्रिकल्चर इन बेंगॉल, १७५७–१९०० ', (इंडियन स्टडीज पास्ट अँड प्रेझेंट, कलकत्ता, १९६४), खंड १, या ग्रंथात अफू व नीळ यांचा विशेषतः निळीच्या पिकाचा अभ्यास करण्यात आला आहे. याच्या जोडीने बी. बी. क्लिंग यांचा ' दि ब्लू म्युटिनी, दि इंडिगो डिस्टर्बन्सेस इन

बेंगॉल, १८५९–१८६२ ', (युनिव्हर्सिटी ऑफ पेनसिलवानिया प्रेस, फिलाडेल्फिया, १९६६) हा ग्रंथ वाचणे उपयुक्त ठरेल.[२७] एच्. आर. घोषाल यांच्या 'एकॉनॉमिक ट्रँझिशन इन दि बेंगॉल प्रेसिडेन्सी, १७९३–१८३३ ', (फिरमा के. एल्. मुखोपाध्याय, कलकत्ता, १९६६) या ग्रंथात व्यापार, उद्योग व शेती यांचा समावेश करण्यात आलेला आहे. ए. त्रिपाठी यांच्या 'ट्रेड अँड फायनान्स इन दि बेंगॉल प्रेसिडेन्सी, १७९३–१८३३ ', (ओरिएंट लाँगमन्स प्रा. लि., कलकत्ता, १९५६) या ग्रंथात संख्यात्मक दृष्टिकोन स्वीकारण्यात आला आहे. त्यांनी वखारीं (Agency Houses) ची जी हकीगत दिली आहे तिची पूर्तता एस्. बी. सिंग यांच्या 'युरोपियन एजन्सी हाउसेस इन बेंगॉल, १७८३–१८३३ ', (फिरमा के. एल्. मुखोपाध्याय, कलकत्ता, १९६६) या ग्रंथात करण्यात आली आहे.[२८] राजेश्वरी प्रसाद यांच्या 'सम आस्पेक्ट्स ऑफ ब्रिटिश रेव्हेन्यू पॉलिसी इन इंडिया, १७७३–१८३३, (दि बेंगॉल प्रेसिडेन्सी), (एस्. चंद अँड कं., नवी दिल्ली १९७०) या ग्रंथात कंपनीच्या मीठ व अफू यांच्या मक्तेदारीचा व जकातींच्या धोरणाचा समावेश करण्यात आला आहे.

---

२७. या प्रदेशाच्या कृषि-इतिहासासंबंधी पुढील लेखही उपलब्ध आहेत :–

(१) राय, यू., 'मराठा रेव्हेन्यू अॅडमिनिस्ट्रेशन इन ओरिसा', 'बेंपाप्रे', खंड ७४, भाग १, १९५५.

(२) रॉदरमंड, 'दि बेंगॉल टेनन्सी अॅक्ट ऑफ १८८५ अँड इट्स इन्फ्लुएन्स ऑफ लेजिस्लेशन इन आदर प्रॉव्हिन्सेस', कित्ता, खंड, ८५, भाग २, १९६७.

(३) रॉय, बी. के., 'आउटलाइन ऑफ ए स्कीम फॉर एस्टॅब्लिशिंग पब्लिक ग्रॅनरीज इन बेंगॉल, बिहार अँड बनारस ड्यूरिंग १७९३–९४', 'जहिरि', खंड ११, अंक १, १९६८.

(४) चौधुरी, बी. बी., 'रूरल क्रेडिट रिलेशन्स इन बेंगॉल, १८५९–१८८५', 'इंएसोहिरि', खंड ६, अंक ३, १९६९.

(५) पूर्वोक्त, 'ग्रोथ ऑफ कमर्शियल अॅग्रिकल्चर अँड इट्स इंपॅक्ट ऑन दि पेझंट एकॉनॉमी ऑफ बेंगॉल', कित्ता, खंड ७, अंक १ व २, १९७०.

(६) मिश्र, जी., इंडिगो प्लँटेशन अँड दि अॅग्रेरियन रिलेशन्स इन चंपारन ड्यूरिंग दि नाइनटीन्थ सेंचुरी', कित्ता, खंड ३, अंक ३, १९६६.

२८. या संदर्भात खालील लेखही पाहावेत :–

(१) ब्लिन, जी., 'रेव्हेन्यू अॅडमिनिस्ट्रेशन ऑफ कलकत्ता इन दि फर्स्ट हाफ ऑफ दि एटीन्थ सेंचुरी', कित्ता, खंड १, अंक ४, १९६४.

(२) घोष, बी., 'दि कलोनियल बिगिनिंग्ज ऑफ कलकत्ता : अर्बनायझेशन विदाउट इंडस्ट्रियलायझेशन', 'एवी', खंड १२, अंक ३३, १३ ऑगस्ट १९६०.

(३) ओम् प्रकाश, 'दि युरोपियन ट्रेडिंग कंपनीज अँड दि मर्चंट्स ऑफ बेंगॉल, १६५०–१७२५', 'इंएसोहिरि', खंड १, अंक ३, १९६४.

(४) फर्बर, एच्., 'प्लिम्प्सेस ऑफ लाइफ अँड ट्रेड ऑन दि हुगली, १७२०–१७७०', 'बेंपाप्रे', खंड ८५, भाग २, १९६७.

(५) मार्शल, पी. जे., 'प्रायव्हेट ब्रिटिश इनव्हेस्टमेंट इन एटीन्थ सेंचुरी बेंगॉल', कित्ता.

(६) फेल्डबाएक, ओ., 'क्लॉथ प्रॉडक्शन अँड ट्रेड इन लेट एटीन्थ सेंचुरी : ए-रिपोर्ट फ्रॉम दि डॅनिश फॅक्टरी इन सेरामपूर', कित्ता.

(७) सन्याल, एच., 'दि इंडीजिनस आयर्न इंडस्ट्री ऑफ बीरभूम', 'इंएसोहिरि', खंड ५, अंक १, १९६८.

[ पुढील पानावर

नंतरच्या काळातील औद्योगिक व वाणिज्य इतिहासाच्या दृष्टीने पुढील ग्रंथांचा उल्लेख करिता येईल :— जी. डब्ल्यू. टायसन, 'दि बेंगॉल चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री : ए सेंटिनरी सर्व्हे', (दि स्टेट्समन लि., कलकत्ता, १९५३); आणि 'बेंगॉल नॅशनल चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री, १८८७–१९६२', (के. सी. मुखर्जी, कलकत्ता, १९६२).[२९]

ज्या सर्वसामान्य इतिहासांमध्ये आर्थिक इतिहासाला काही भाग देण्यात आलेला आहे त्यांच्यापैकी पुढील ग्रंथांचा उल्लेख करणे योग्य होईल :— राजा विनय कृष्ण देव, 'दि अर्ली हिस्टरी अँड ग्रोथ ऑफ कलकत्ता', (रोमेश चंद्र घोष, कलकत्ता, १९०५); के. दत्त, 'दि संथाल इनसरेक्शन ऑफ १८५५–१८५७', (युनिव्हर्सिटी ऑफ कलकत्ता, कलकत्ता, १९४०); ए. गुप्त (सं.), 'स्टडीज इन दि बेंगॉल रेनेसाँ', (दि नॅशनल कौंसिल ऑफ बेंगॉल, जादवपूर, १९५८); पी. सिन्हा, 'नाइनटीन्थ सेंचुरी बेंगॉल : आस्पेक्ट्स ऑफ सोशल हिस्टरी', (फिरमा के. एल्. मुखोपाध्याय, कलकत्ता, १९६५) आणि ए. एम्. खान, 'दि ट्रॅन्झिशन इन बेंगॉल, १७५६–१७७५ : ए स्टडी ऑफ सैयद मुहम्मद रेझा खान', (युनिव्हर्सिटी प्रेस, केंब्रिज, १९६९).

मद्रासशी संबंधित ग्रंथ पुढील प्रमाणे आहेत :— 'जॉन कंपनी इन कोरोमांडेल, १६०५–१६९० : ए स्टडी इन दि इंटररिलेशन्स ऑफ युरोपियन कॉमर्स अँड ट्रॅडीशनल एकॉनॉमीज,' (मार्टिनस निजहॉफ, दि हेग, १९६२). डच ईस्ट इंडिया कंपनीचा उदय आणि अस्त यांची ही कहाणी आहे. ए. शारदा राजू यांचा, 'एकॉनॉमिक कंडिशन्स इन दि मद्रास प्रेसिडेन्सी, १८००–१८५०', (युनिव्हर्सिटी ऑफ मद्रास, मद्रास, १९४१), हा एक विद्वत्तापूर्ण ग्रंथ आहे. त्यांचे म्हणणे असे की, एका बाजूने परंपरागत उद्योगांचा ऱ्हास झाला आणि दुसऱ्या बाजूने व्यापारी पिके व आधुनिक उद्योग यांचा विकास घडवून आणण्याचे प्रयत्न अयशस्वी झाले. एन्. मुखर्जी यांच्या 'दि रयतवारी सिस्टिम इन मद्रास', (फिरमा के. एल्. मुखोपाध्याय, कलकत्ता, १९६२) या ग्रंथात रयतवारी प्रणालीच्या अंमलबजावणीसाठी कोणत्या कार्यपद्धतींचा व मार्गांचा वापर करावा लागतो, त्यासाठी केवढे मनुष्यबळ लागते आणि स्थानिक संस्था व व्यक्ती यांच्यावर किती अवलंबून राहाण्याची जरूर असते इत्यादि तांत्रिक बाबींसंबंधीची मौल्यवान माहिती दिलेली आहे. आर्. रत्नम् यांचा 'अॅग्रिकल्चरल डेव्हलपमेंट इन मद्रास स्टेट प्रायर टु १९००', (न्यू सेंट्रल बुक हाउस प्रा. लि., मद्रास, १९६६) हा ग्रंथ प्रामुख्याने मागील शतकाचे अध्ययन प्रस्तुत करतो. त्यामध्ये प्रत्येक जिल्ह्यातील शेतीच्या पद्धतींचे वर्णन देण्यात आलेले असून १८०० साली, एकोणिसाव्या शतकाच्या मध्यास आणि विसाव्या शतकात शेतीचे उत्पादन (पीक) काय होते त्याची तुलना करण्यात आली आहे. डी. कुमार यांच्या 'लँड अँड कास्ट इन साउथ इंडिया अॅग्रिकल्चरल लेबर इन मद्रास प्रेसिडन्सी इन दि नाइनटीन्थ सेंचुरी', (युनिव्हर्सिटी प्रेस, १९६५),

---

मागील पानावरून ]

(८) दत्त, के. के., 'मार्केट्स अँड प्राइसेस ऑफ आर्टिकल्स इन बेंगॉल, १७४०–१७६५', 'इंजए', खंड ११, अंक ४, १९६१.

(९) सिन्हा, एन्. के., 'युरोपियन बँकिंग इन बेंगॉल १७९३–१८४८', 'बेंपाप्रे', खंड ८८, भाग १ १९६९.

(१०) सिन्हा, एन्. के., 'इंडियन बिझनेस एंटरप्राइज : इट्स फेल्युअर इन कलकत्ता, १८००–१८४८', कित्ता.

२९. तसेच पाहा :– सिन्हा, पी. बी., 'दि क्वेश्चन ऑफ रॉयल्टी ऑन मिनरल्स, १८५९–१८६१,' कित्ता.

या ग्रंथात असे दाखवून देण्यात आले आहे की, एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभी जेव्हा ब्रिटिशांचे आगमन झाले तेव्हा येथे शेतमजूर अस्तित्वात होते आणि नंतरच्या काळात एकूण कृषिलोकसंख्येच्या प्रमाणात त्यांची संख्या फारच थोडी वाढली. एच्. ब्राउन यांचा 'दि पॅरीज ऑफ मद्रास', (पॅरी अँड कं., १९५४) आणि ए. एच्. हेलेस यांनी संकलित केलेला 'मद्रास चेंबर ऑफ कॉमर्स सेंटिनरी हँडबुक, १८३६–१९३६', (असोसिएटेड पब्लिशर्स, मद्रास, १९३६) असे दोन ग्रंथही या विषयावर उपलब्ध आहेत. एम्. वेंकटरंगैया यांचा 'दि बिगिनिंग्ज ऑफ लोकल टॅक्सेशन इन दि मद्रास प्रेसिडेन्सी', (लाँगमन्स ग्रीन अँड कं. लि., १९२८) हा ग्रंथ काहीसा रूपरेखात्मक असला तरी अध्ययनाच्या एका दुर्लक्षित क्षेत्राची दखल घेणारा तेवढाच एक ग्रंथ आहे.[३०] आर्थिक इतिहासकारांच्या दृष्टीने पुढील दोन ग्रंथही महत्त्वाचे ठरावेत :– के. ए. नीलकंठ शास्त्री, 'हिस्टरी अँड कल्चर ऑफ दि तमिळ पीपल' (याचा उल्लेख पूर्वी आला आहे), आणि टी. एच्. बीगलहोल, 'थॉमस मन्रो अँड दि डेव्हलपमेंट ऑफ अॅडमिनिस्ट्रेटिव्ह पॉलिसी इन मद्रास, १७९२–१८१८' (केंब्रिज युनिव्हर्सिटी प्रेस, केंब्रिज, १९६६).

पश्चिम भारतासंबंधी, विशेषतः महाराष्ट्रासंबंधी विचार करतांना कालक्रमानुसार एच्. फर्बर यांचे 'बाँबे प्रेसिडेन्सी इन दि मिडएटीन्थ सेंचुरी', (एशिया पब्लिशिंग हाउस, मुंबई, १९६५) हे पुस्तक प्रथम येते. लेखकाने १७२१ ते १७५० या मर्यादित कालखंडाचाच विचार केला आहे. त्याने मुख्यतः डच कागदपत्रांच्या आधारे या प्रदेशाच्या आर्थिक इतिहासावर उद्बोधक प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे. त्याच्या दृष्टिकोनात आणखी एक नाविन्य आहे. ते असे की त्याने काही अंशी त्या काळात विद्यमान असलेल्या व्यक्तींच्या चरित्रात्मक रूपरेखांच्या आधारे इतिहास-कथन करण्याचा प्रयत्न केला आहे. पी. नाईटिंगेल यांच्या 'ट्रेड अँड एम्पायर इन वेस्टर्न इंडिया, १७८४–१८०६', (केंब्रिज युनिव्हर्सिटी प्रेस, १९७०) या ग्रंथात असे दाखवून देण्यात आल आहे की, मिरी व कापूस यांमुळे ब्रिटिश साम्राज्याचा दक्षिणेत व उत्तरेत विस्तार होण्यास काही अंशी मदत झाली. या प्रदेशासंबंधी सर्वात अधिक पुस्तके आर्. डी. चोकसी यांनी लिहिलेली आहेत. ती अशी :– 'एकॉनॉमिक हिस्टरी ऑफ दि बाँबे डेक्कन अँड कर्नाटक, १८१८–१८६८', (पुणे, १९४५); 'एकॉनॉमिक लाइफ इन दि बाँबे डेक्कन, १८१८–१९३९', (एशिया पब्लिशिंग हाउस, मुंबई, १९५५); 'एकॉनॉमिक लाइफ इन दि बाँबे कोकण, १८१८–१९३९', (एशिया पब्लिशिंग हाउस, मुंबई, १९६०); 'एकॉनॉमिक लाइफ इन दि बाँबे कर्नाटक, १८२८–१९३९, (एशिया पब्लिशिंग हाउस, मुंबई १९६३); आणि 'एकॉनॉमिक

---

३०. तसेच पाहा :–

(१) पूनेन, टी. आय., 'अर्ली हिस्टरी ऑफ दि डच फॅक्टरीज ऑफ मसुलीपट्टम अँड पेटापल्ली, १६०५–१६३६', 'जइंहि', खंड २७, भाग ३, १९४९.

(२) थॉमस, पी. जे. आणि नटराजन्, वी., 'एकॉनॉमिक डिप्रेशन इन दि मद्रास प्रेसिडेन्सी, १८२०–५४,' 'एहिरि', नोव्हें. १९३६.

(३) अंबिराजन्, एस., 'लेसे-फेअर इन मद्रास', 'इंएसोहिरि' खंड २, अंक ३, १९६६.

(४) थॉमस, पी. जे., 'दि प्राइसेस ऑफ फूडग्रेन्स इन मद्रास इन दि नाइनटीन्थ सेंचुरी,' 'इंजए', खंड २१, अंक ४, १९४१.

(५) भाटिया, बी. एम्., 'ग्रोथ अँड कॉंपोझिशन ऑफ मिडल क्लास इन दि नाइनटीन्थ सेंचुरी', 'इंएसोहिरि', खंड २, अंक ४, १९६५.

लाइफ इन दि बाँबे गुजरात, १८००–१९३९', (एशिया पब्लिशिंग हाउस, मुंबई, १९६८). या पुस्तकांमध्ये एकोणिसाव्या शतकापासून सुरुवात केलेली असली तरी सारे विवेचन प्रामुख्याने विसाव्या शतकावर केंद्रित करण्यात आलेले आहे. तसेच मुंबई शहरातील उद्योग व व्यापार यांच्या विकासाकडे पूर्णपणे दुर्लक्ष करण्यात आलेले आहे. तरीपण या विषयातील आद्यप्रवर्तक ग्रंथ या दृष्टीने त्यांचे महत्त्व आहे. एम्. डी. मॉरिस यांचा 'दि इमर्जन्स ऑफ अॅन इंडस्ट्रियल लेबर फोर्स इन इंडिया : ए स्टडी ऑफ दि बाँबे कॉटन मिल्स, १८५४–१९४७', हा ग्रंथ उद्‌बोधक असून त्याचा उल्लेख पूर्वी करण्यात आला आहे.[३१]

याखेरीज आर्थिक परिस्थितीची चर्चाही ज्यांमध्ये करण्यात आलेली आहे असे पुढील ग्रंथ उल्लेखनीय आहेत :– एस्. सेन, 'अॅडमिनिस्ट्रेटिव्ह सिस्टिम ऑफ दि मराठाज', (युनिव्हर्सिटी ऑफ कलकत्ता, कलकत्ता, १९२५) ; के. राजय्यन, 'अॅडमिनिस्ट्रेशन अॅंड सोसाटी इन दि कर्नाटक, १७०१—१८०१,' (श्री वेंकटेश्वर युनिव्हर्सिटी पब्लिकेशन्स हिस्टॉरिकल सीरीज क्र. ७, १९६६); व्ही. के. चावडा, 'गायकवाड्स अॅंड दि ब्रिटिश: ए स्टडी ऑफ देअर प्रॉब्लेम्स, १८७५–१९२०', (युनिव्हर्सिटी पब्लिशर्स, दिल्ली, प्रकाशन वर्ष दिलेले नाही); आणि आर्. एम्. सिन्हा, 'भोंसलाज ऑफ नागपूर, दि लास्ट फेज, १८१८–१८५४', (एस्. चंद अॅंड कं., दिल्ली १९६७).

उत्तर प्रदेशाचा विचार करावयाचा तर तेथील जमीनमहसूल धोरणासंबंधी पुढील चार ग्रंथ उपलब्ध आहेत:– बी. आर्. मिश्र, 'लँड रेव्हेन्यू पॉलिसी इन दि युनायटेड प्रॉव्हिन्सेस अंडर ब्रिटिश रूल', (नंदकिशोर अॅंड ब्रदर्स, बनारस, १९४२), डब्ल्यू. सी. नील, 'एकॉनॉमिक चेंज इन रूरल इंडिया : लॅंड टेन्युअर अॅंड रिफॉर्म इन उत्तर प्रदेश, १८००–१९५५', (येल युनिव्हर्सिटी प्रेस, न्यू हेवन अॅंड लंडन, १९६२), एस्. सी. गुप्ते, 'अॅग्रेरियन रिलेशन्स अॅंड अर्ली ब्रिटिश रूल इन इंडिया : ए स्टडी ऑफ सीडेड अॅंड कॉंकर्ड प्रॉव्हिन्सेस, (उत्तर प्रदेश), १८०१–१८३३', (एशिया पब्लिशिंग हाउस, मुंबई, १९६३), आय्. हुसैन, 'लँड रेव्हेन्यू पॉलिसी इन

---

३१. या संदर्भात पुढील लेखही उपयुक्त ठरतील :–

(१) आपटे, एम्. डी., 'नेचर अॅंड स्कोप ऑफ दि रेकॉर्ड्स फ्रॉम पेशवा दप्तर विथ रफरन्स टु जकातसिस्टिम', क्विता, खंड ६, अंक ४, १९६९.

(२) गोखले, बी. जी., 'सम आस्पेक्ट्स ऑफ अर्ली इंग्लिश ट्रेड विथ वेस्टर्न इंडिया, १६००–१६५०'; आणि 'इंग्लिश ट्रेड विथ वेस्टर्न इंडिया १६५०-१७००', 'जइंहि' खंड ४०. भाग २, १९६०; आणि खंड ४२, भाग २, १९६४.

(३) कर्वे, डी. जी., 'दि डेक्कन अॅट दि अॅडव्हेंट ऑफ ब्रिटिश रूल : दि ग्रेट डिप्रेशन', 'इंजए', खंड १४, अंक ३, १९३४.

(४) फॅक्स. एच्. जी., 'व्हिलेज डेट सेटल्मेंट : ए न्यू अकाउंट ऑफ एल्फिन्स्टन्स पॉलिसी इन दि टेरिटरीज कॉंकर्ड फ्रॉम दि पेशवा इन १८१७', क्विता, खंड ९, अंक १, १९२८.

(५) क्लीन, आय्., 'युटिलिटेरिॲनिझम् अॅंड अॅग्रेरियन् प्रोग्रेस इन वेस्टर्न इंडिया,' 'एहिरि', खंड १८, अंक ३, १९६५.

(६) गाडगीळ, डी. आर्., 'इमिग्रंट ट्रेडर्स इन पूना इन दि एटीन्थ सेंचुरी', 'अवि', खंड १, अंक १, १९५९.

(७) देसाई ए. व्ही., 'दि ओरिजिन्स ऑफ पारसी एंटरप्राइज,' 'इंएसोहिरि, खंड ५, अंक ४, १९६८.

नॉर्थ इंडिया, दि सीडेड अँड कॉकर्ड प्रॉव्हिन्सेस, १८०१–१८३३', (न्यू एज पब्लिशर्स प्रा. लि., कलकत्ता, १९६७) आणि जे. राज, 'दि म्युटिनी अँड ब्रिटिश लँड पॉलिसी इन नॉर्थ इंडिया, १८५६–६८', (एशिया पब्लिशिंग हाउस, मुंबई, १९६५) हुसेन यांच्या मते ब्रिटिशांचे जमीन-महसूल विषयक धोरण विद्यमान कृषि–व्यवस्थेला धक्का न लावता जमीनमहसूल कसा गोळा करिता येईल या प्रश्नाभोवती केंद्रित झालेले होते. गुप्तांच्या पुस्तकावर तपशीलवार व कठोर टीका करणारे एक परिशिष्ट त्यांनी या ग्रंथाला जोडले आहे. राज यांच्या मते ब्रिटिशांनी अवधच्या जमीनदारांचे अधिकार व खास हक्क नाहीसे केले ही गोष्ट शेतकऱ्यांच्या हिताची होती; तरीही बंड सुरू होताच शेतकऱ्यांनी सरकारविरुद्ध जमीनदारांना साथ दिली, याची कारणे देऊन त्यांनी ब्रिटिशांच्या शेतीविषयक धोरणावर बंडाचे काय परिणाम झाले ते सांगितले आहे.[३२] या ठिकाणी व्ही. ए. नारायण यांच्या 'जोनायन डंकन अँड वाराणसी,' (फिरमा के. एल्. मुखोपाध्याय, कलकत्ता, १९५९) या ग्रंथाचाही उल्लेख करिता येईल.

उत्तर प्रदेशाच्या केवळ औद्योगिक इतिहासाचीच माहिती देणारा असा एकही ग्रंथ नाही. 'अपर इंडिया चेंबर ऑफ कॉमर्स कानपूर, १८८८–१९३८', (अन्य माहिती उपलब्ध नाही) या ग्रंथात फक्त कानपूरमधील उद्योगांच्या वाढीची हकीकत दिलेली आहे. याखेरीज डी. भानू यांच्या 'हिस्टरी अँड ॲडमिनिस्ट्रेशन ऑफ दि नॉर्थ वेस्टर्न प्रॉव्हिन्सेस, १८०३–१८५८,' (शिवलाल अग्रवाल अँड कं. प्रा. लि. आग्रा, १९५७) आणि जी. डी. भटनागर यांच्या 'अवध अंडर वाजिद अली शाह,' (भारतीय विद्या प्रकाशन, वाराणसी, १९६८) या ग्रंथातही आर्थिक प्रश्नांची चर्चा करण्यात आलेली आहे.

मैसूरचा आर्थिक इतिहास हे एक दुर्लक्षित क्षेत्र राहिलेले आहे. या विषयाशी संबद्ध केवळ एकच ग्रंथ मिळतो. तो म्हणजे एम्. एच्. गोपाल यांचा 'दि फायनान्सेस ऑफ मैसूर स्टेट, १७९९–१८३१', (ओरेएंट लाँगमन्स, मद्रास, १९६०) हा ग्रंथ होय. लेखकाचे म्हणणे असे की, पूर्णयाने जमविलेली अफाट संपत्ती बेसुमार धर्मादाय व दरबारातील वशिल्याची थेंडे यांच्या पायी उधळली गेली. त्यामुळे राज्याचा महसूल गहाण पडला आणि सरते शेवटी ब्रिटिश सरकारला हस्तक्षेप करणे जवळजवळ भागच पडले. याखेरीज एम्. एच्. खान यांचा 'हिस्टरी ऑफ टिपू सुलतान', (दि बिब्लिओफाईल लि. कलकत्ता, १९५१) आणि एम्. शामाराव यांचा 'मॉडर्न मैसोर फ्रॉम दि बिगिनिंग टु १८६८', (बेंगलोर, १९३६) हे दोन ग्रंथही आर्थिक इतिहासकारांच्या दृष्टीने खूप उपयुक्त आहेत.[३३]

केरळचा आर्थिक इतिहास हेही असेच दुर्लक्षित क्षेत्र राहिलेले आहे. या बाबतीतील एक-

---

३२. तसेच पाहा :–

(१) सिद्दीकी, ए., 'ॲग्रेरियन डिप्रेशन इन उत्तर प्रदेश इन १८२८–३३,' क्वित्ता, खंड ६, अंक २, १९६९.

(२) मेटकाफ, टी. आर्., 'इस्टेट मॅनेजमेंट अँड इस्टेट रेकॉर्ड्स इन अवध', क्वित्ता, खंड ४, अंक २, १९६७.

(३) कोहन, बी. एस्., 'दि इनीशियल, ब्रिटिश इम्पॅक्ट ऑन इंडिया : ए केस स्टडी ऑफ दि बनारस रीजन,' दि जर्नल ऑफ एशियन स्टडीज, खंड ९, अंक ४, १९६०.

३३. तसेच पाहा :— जॉर्ज, पी. टी., 'लँड सिस्टिम अँड लॉज इन मैसोर स्टेट,' 'अवि', खंड १२, अंक १ व २, १९७०.

मेव ग्रंथ म्हणजे ए. दासगुप्ता यांचा 'मलबार इन एशियन ट्रेड, १७४०–१८००,' (केंब्रिज युनिव्हर्सिटी प्रेस, १९६७) हा आहे. त्यामध्ये पोर्तुगीज, डच व इंग्लिश कंपन्यांच्या संदर्भात मलबारचा वाणिज्य इतिहास दिलेला आहे.[३४]

असमच्या आर्थिक इतिहासासंबंधी कोणीही ग्रंथ लिहिलेला नाही. परंतु ही उणीव ए. गुह यांनी या विषयासंबंधी अनेक लेख लिहून काही अंशी भरून काढली आहे.[३५] एस्. के. भुयां यांचा 'अँग्लो आसामीज रिलेशन्स, १७७१–१८२६,' (डिपार्टमेंट ऑफ हिस्टॉरिकल अँड अँटिक्वेरियन स्टडीज इन आसाम, गौहाटी, १९४९); एच्. के. बरपुजारी यांचा 'आसाम इन दि डेज ऑफ दि कंपनी, १८२६–१८५८', (लॉयर्स बुक स्टॉल, गौहाटी, १९६३); आणि व्ही. एलविन (सं.) यांचा 'दि नागाज इन दि नाइनटीन्थ सेंचुरी' (ऑक्सफोर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, मुंबई, १९६९) हे तीन अंशतः आर्थिक इतिहासाचे ग्रंथ म्हणता येतील.

आंध्र प्रदेशासंबंधी ए. व्ही रमण राव यांचा 'दि एकॉनॉमिक डेव्हलपमेंट ऑफ आंध्र प्रदेश, १७६६ – १९५७', (पॉप्युलर बुक डेपो, मुंबई, १९५८) हा एक ग्रंथ आहे. परंतु त्यात संपादनाच्या काही उणीवा आहेत. आर्. ई. फ्रिकेनबर्ग यांचा 'गुंटूर डिस्ट्रिक्ट, १७८८ – १८४८', (क्लॅरेंडन प्रेस ऑक्सफोर्ड, १९६५) हा ग्रंथ आर्थिक इतिहासकारांच्या दृष्टीने अंशतः उपयुक्त आहे.

राहाता राहिला पंजाब. त्याच्या संबंधी एच्. के. ट्रेवास्की यांचे पुढील ग्रंथ आहेत :– 'दि लँड ऑफ दि फाइव्ह रिव्हर्स', (ऑक्सफोर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, १९२८), आणि 'दि पंजाब टु डे : अॅन एकॉनॉमिक सर्व्हे ऑफ दि पंजाब इन रीसेंट ईयर्स, १८९० – १९२५', खंड १ व २,

---

३४. तसेच पाहा :–
(१) कीनोविक्स, जे., 'पोर्च्युगील फॅक्टरी अँड ट्रेड इन पेप्पर इन मलबार ड्यूरिंग दि सिक्सटीन्थ सेंचुरी', फित्ता, खंड ६, अंक १, १९६९.
(२) घोषाल, एच्. आर्., 'सम आस्पेक्ट्स ऑफ मलबार्स ट्रेड ड्यूरिंग १७९३–१८१३', 'जइंहि', खंड ४०, भाग २, १९६२.
(३) राव, टी. व्ही. एस्, 'लँड लेजिस्लेशन इन केरल स्टेट (१८००-१९६०)', 'अवि', खंड १२, अंक १ व २, १९७०.

३५. त्यांनी या प्रश्नासंबंधी खालील लेख लिहिले आहेत :–
(१) 'आहोम मायग्रेशन : इट्स इम्पॅक्ट ऑन राइस एकॉनॉमी ऑफ मेडिईव्हल आसाम', 'अवि', खंड ९, अंक २, १९६७.
(२) 'लँड राइट्स अँड सोशल क्लासेस इन मेडिईव्हल आसाम', 'इंएसोहिरि', खंड ३, अंक ३, १९६६.
(३) 'कॉलोनायझेशन ऑफ आसाम : ईयर्स ऑफ ट्रँझिशनल क्रायसिस, १८२४-१८४०', फित्ता, खंड ५, अंक २, १९६८.
(४) 'कॉलोनायझेशन ऑफ आसाम : सेकंड फेज, १८४०-१८५९', फित्ता, खंड ४, अंक ४, १९६७.
(५) 'ए विंग पुश विदाउट ए टेक ऑफ : ए केस स्टडी ऑफ आसाम', फित्ता, खंड ५, भाग ३, १९६८.

(दि सिव्हिल अँड मिलिटरी गॅझेट प्रेस, लाहोर, १९३१ व १९३२).[३६] पंजाबच्या आर्थिक इतिहासाचे व्यापक समालोचन या ग्रंथांत केलेले असून पहिल्या ग्रंथात राजकीय व प्रशासकीय इतिहासाचाही बराच भाग अंतर्भूत झालेला आहे. यांखेरीज पुढील ग्रंथांचाही या संदर्भात उल्लेख करिता येईल :– जी. एस्. छाबडा यांचा, 'सोशल अँड एकॉनॉमिक हिस्टरी ऑफ दि पंजाब, १८४८ – १९०१', (एज्युकेशनल पब्लिशर्स अँड प्रिंटर्स, जालंधर सिटी, १९६२); आर्. आर्. सेठी यांचा 'जॉन लॅरेन्स अॅज कमिशनर ऑफ दि जालंदर दोआब, १८४६ – ४९', (पंजाब गव्हर्नमेंट रेकॉर्ड ऑफिस पब्लिकेशन्स मोनोग्राफ (नं. १०, १९३०). या ग्रंथामध्ये कृषि अर्थ-व्यवस्था व रस्तेबांधणी या बाबतीत लॅरेन्सने केलेल्या कामाचे वर्णन आहे.

**उपसंहार :**

भारताच्या आर्थिक इतिहाससंबंधीच्या ग्रंथांच्या या संक्षिप्त पाहाणीवरून असे दिसून येते की देशव्यापी व सर्वसमावेशक विषयांऐवजी प्रादेशिक विषयांकडे आणि – अथवा – आर्थिक व्यवहाराच्या एखाद्या विशिष्ट पैलूवर लक्ष केंद्रित करण्याची वृत्ती सार्वत्रिक होत आहे. हा एक स्वागतार्ह बदल आहे. ज्ञानाच्या सर्व शाखांमध्ये विशेषज्ञता प्राप्त करण्याच्या वाढत्या प्रवृत्तीशी ही गोष्ट सुसंगतच आहे; एवढेच नव्हे तर आर्थिक इतिहासाची एक स्वतंत्र ज्ञानशाखा विकसित करण्याच्या कामीही तिची मदत होईल. ही ज्ञानशाखा स्वतंत्रपणे विकसित व्हावी अशी भावना अलीकडील काळात व्यक्त होत आली आहे. अर्थात् त्यामुळे या क्षेत्रातील संशोधकांचा आपल्या प्रश्नांकडे पाहाण्याचा दृष्टिकोन समान असण्याची गरजही स्पष्ट होते.

या ठिकाणी हेही सांगितले पाहिजे की 'नवीन आर्थिक इतिहास' अथवा 'क्लिओमेट्रिक्स' (इतिहास मिती) या विषयाला अमेरिकेत सार्वत्रिक लोकप्रियता प्राप्त झालेली आहे. या नव्या शास्त्रामध्ये आर्थिक इतिहासाच्या समस्यांचे विश्लेषण गणिताच्या आणि संख्याशास्त्राच्या उपकरणांच्या साह्याने करण्याचा प्रयत्न केला जातो. या दिशेने अधिक कार्य होण्याची आवश्यकता आहे.

---

३६. तसेच पाहा :

(१) माथुर वाय्. बी., 'रेव्हेन्यू अँड फायनॅन्शियल अॅडमिनिस्ट्रेशन ऑफ दि पंजाब, १८४९-७५,' 'जइंहि', खंड ४५, भाग ३, १९६७.

(२) माथुर वाय्. बी., 'लॅंड रेव्हेन्यू अॅडमिनिस्ट्रेशन ऑफ दि पंजाब, १८४९-७५,' 'बेंपाप्रे', खंड ८२, अंक २, १९६३.

(३) बॅरियर, एन्. जी., 'दि फॉर्म्युलेशन अँड एनॅक्टमेंट ऑफ दि पंजाब अॅलिएनेशन ऑफ लँड बिल', 'इंएसोहिरि,' खंड २, अंक २, १९६५.

(४) माइल्स, डब्ल्यू. एच्., 'सिक्स्टी ईयर्स ऑफ पंजाब फूड प्राइसेस १८६१-१९२० : ए स्टॅटि-स्टिकल सर्व्हे', 'इंजए,' खंड ६, अंक १, १९२५.

# परिशिष्ट 'अ'

## भारतीय अर्थ–विचाराच्या इतिहासासंबंधीचे ग्रंथ

भारतीय अर्थ-विचाराच्या क्षेत्रातील आद्य कार्य म्हणून पी. के. गोपालकृष्णन् यांच्या 'डेव्हलपमेंट ऑफ एकॉनॉमिक आयडियाज इन इंडिया, १८८० – १९५०', (पीपल्स पब्लिशिंग हाउस, नवी दिल्ली, १९५९) या ग्रंथाचा उल्लेख करावा लागेल. हा प्रामुख्याने राष्ट्रवादी अर्थ-विचाराचा अभ्यास आहे. बी. दत्त यांच्या 'दि इव्होल्यूशन ऑफ एकॉनॉमिक थिंकिंग इन इंडिया', (फेडरेशन हॉल सोसायटी, कलकत्ता, प्रकाशनवर्षाचा उल्लेख नाही) या ग्रंथामध्ये अर्थशास्त्रासंबंधी लिहिणाऱ्या भारतीय लेखकांचे तीन विभाग पाडण्यात आले आहेत :– एकोणिसाव्या शतकातील प्रारंभिक लेखक, १९०५ ते १९३९ या कालखंडांतील राष्ट्रवादी लेखक आणि १९३९ नंतरचे नव्या पिढीतील अर्थशास्त्रज्ञ. यांपैकी पहिला गट लहान होता. त्यामध्ये दादाभाई नौरोजी, मा. गो. रानडे आणि आर्. सी. दत्त यांचा समावेश होतो. पी. सी. घोष यांच्या 'दि डेव्हलपमेंट ऑफ दि इंडियन नॅशनल काँग्रेस, १८९२ – १९०९', (फिरमा के. एल् मुखोपाध्याय, कलकत्ता १९६०), या ग्रंथात 'काँग्रेस व आर्थिक समस्या' या विषयाचे विवेचन करण्यात आले आहे. विपिनचंद्र यांच्या 'दि राइज अँड ग्रोथ ऑफ एकॉनॉमिक नॅशनॅलिझम इन इंडिया', (पीपल्स पब्लिशिंग हाउस, नवी दिल्ली, १९६६) या प्रचंड ग्रंथात १८८० ते १९०५ या काळातील भारतातील राष्ट्रीय नेत्यांच्या आर्थिक धोरणाचा अभ्यास करण्यात आला आहे. तसेच, प्रेम नारायण यांच्या 'प्रेस अँड पॉलिटिक्स इन इंडिया, १८८५ – १९०५', (मुन्शीराम मनोहरलाल, दिल्ली, १९७०) या ग्रंथात 'दि प्रेस अँड दि एकॉनॉमिक पॉलिसी', या नावाचे एक प्रकरण आहे. जी. आर्. मदन यांच्या 'एकॉनॉमिक थिंकिंग इन इंडिया', (एस्. चंद अँड कं., नवी दिल्ली, १९६६) या ग्रंथाचाही येथे उल्लेख करण्यास हरकत नाही. त्यांच्या विश्लेषणाचा प्रारंभ अगदी जुन्या काळापासून होतो आणि त्यांचा दृष्टिकोन अधिक व्यापक स्वरूपाचा आहे. बिशेश्वर प्रसाद यांनी संपादिलेल्या 'आयडियाज इन हिस्टरी' (एशिया पब्लिशिंग हाउस, मुंबई १९६८) या ग्रंथाचाही आर्थिक इतिहासकाराला थोडाफार उपयोग होऊ शकेल. बी. एन्. गांगुली यांचा 'दादाभाई नौरोजी अँड दि ड्रेन थिअरी', (एशिया पब्लिशिंग हाउस, मुंबई, १९६५) हा निबंधांचा संग्रह आहे. त्यांनी या प्रश्नाचा (धन-निःसारण सिद्धांताचा) गणित-शास्त्राच्या आधारे यशस्वी ऊहापोह केला आहे. १९६९ च्या भारतीय अर्थशास्त्र परिषदेत या विषयाची चर्चा झाली होती. यामुळे या परिषदेच्या अहवालाचाही या संदर्भात उपयोग होऊ शकेल.

याखेरीज ए. बी. शहा व एस्. पी अय्यर यांनी संपादिलेल्या 'गोखले अँड मॉडर्न इंडिया : सेंटिनरी लेक्चर्स', (माणकतला, मुंबई, १९६६) या ग्रंथात आणि सी. पी. रामस्वामी अय्यर व इतर यांच्या 'गोखले दि मॅन अँड हिज मिशन' (एशिया पब्लिशिंग हाउस, मुंबई, १९६६) या ग्रंथात गोखले यांच्या अर्थशास्त्रविषयक कल्पनांसंबंधी निबंध संग्रहित असल्यामुळे ते दोन्ही उपयुक्त ठरू शकतील.

या व्यतिरिक्त अनेक विद्वानांनी वेगवेगळ्या नियतकालिकांमध्ये या विषयासंबंधी लेख लिहिले आहेत. [1]

१. 'इंडियन जर्नल ऑफ एकॉनॉमिक्स' खंड २२, अंक ३, १९४२, यामध्ये या विषयाशी संबंधित अनेक लेख आहेत. त्याखेरीज इतर काही निवडक लेख पुढीलप्रमाणे आहेत :—

(१) ब्रह्मानंद पी. आर., 'ए फ्रेश लुक ऑन ड्रेन थिअरि', 'इंएज', खंड १६, अंक २, १९६८.

(२) राय चौधुरी, के. सी., 'दि इंडियन एकॉनॉमी अँड दि ड्रेन थिअरी', कित्ता, खंड १६, अंक ३, १९६८.

(३) जागीरदार, पी. जे., 'रानडे अँड दि हिस्टॉरिकल स्कूल ऑफ एकॉनॉमिक्स', खंड ३४, अंक ३, १९५४.

(४) सोवनी, एन्. व्ही, 'रानडेज मॉडेल ऑफ दि इंडियन प्लॅनिंग', 'अवि', खंड, ४, अंक १, १९६२.

(५) मिनोचा, व्ही. एस., 'रानडे ऑन दि ॲग्रेरियन प्रॉब्लेम', 'इंएसोहिरी', खंड २, अंक ४, १९६५.

(६) प्राइस, आर., 'एम्. जी. रानडेज थिअरी ऑफ डेव्हलपमेंट अँड ग्रोथ', 'एक्स्प्लोरेशन्स इन आंत्रप्रेन्यूरियल हिस्टरी', सेकंड सीरीज, खंड ४, अंक १, १९६६.

(७) मजुमदार, एच्. के., 'ऑन दि स्टेरिलिटी ऑफ इंडियन एकॉनॉमिक थिंकिंग : ए डिस्कशन ऑफ प्रोफेसर प्राइसेस पेपर ऑन रानडे', कित्ता.

(८) पर्वते, टी. व्ही., 'टिळक्स एकॉनॉमिक फिलॉसॉफी', 'दि एकॉनॉमिक टाइम्स', ता. १ ऑगस्ट, १९७०.

(९) भाटिया, एम्. एस., 'रमेशचंद्र दत्त : दि एकॉनॉमिस्ट', 'इंजए' खंड ३७, अंक ३, १९५७.

(१०) गुह, ए. 'कार्ल मार्क्स अँड दि ड्रेन थिअरी', 'अवि', खंड १०, अंक ३ व ४, १९६८.

(११) कविराज, एन्., 'मार्क्स ऑन दि ॲग्रेरियन क्वेश्चन इन इंडिया', कित्ता.

# पुस्तक परीक्षणे

**धर्मकुमार 'लँड अँड कास्ट इन साउथ इंडिया : अॅग्रिकल्चरल लेबर इन मद्रास प्रेसिडेन्सी इन दि नाइनटीन्थ सेंचुरी',** (केंब्रिज युनिव्हर्सिटी प्रेस, १९६५, पृ. २११)

भारतातील ब्रिटिशपूर्व आर्थिक प्रणाली ही मुख्यत: सुसंवादी होती असे आपण सामान्यत: गृहीत धरून चालतो; आणि जमीनमालक व त्यांची कुळे अथवा वेगवेगळया जमाती यांच्यातील संघर्षाकडे फारसे लक्ष देत नाही. त्याचबरोबर भारताला विसाव्या शतकात ज्या दीर्घकालीन आर्थिक संकटांना तोंड द्यावे लागले त्यांपैकी बहुतेक संकटे प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे ब्रिटिश सरकारने अवलंबिलेल्या धोरणांमुळे निर्माण झालेली होती असे समजण्याकडे आपली प्रवृत्ती असते. तथापि प्रस्तुत ग्रंथ अशा प्रकारच्या मनोगंडांपासून अलिप्त असून त्यामध्ये शेतमजुरांच्या वास्तविक स्थितीचे विश्लेषण करण्यात आले आहे.

लेखिकेने समकालीन पुराव्यांच्या आधारे असे प्रतिपादन केले आहे की, ब्रिटिशांच्या आगमनाच्या वेळी भारतात शेतमजूर विद्यमान होते. ती लिहिते, "एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभी मद्रासमध्ये श्रमसंस्थांचे खूप विविध प्रकार होते. अगदी गुलामगिरीपासून तो मुक्त मजुरांपर्यंत ही विविधता होती. त्यामध्ये केवळ शेतमजुरांचाच समावेश होता असे नव्हे, तर घरगुती नोकर व कारागीर यांचाही समावेश होता." (पृ. ३४). लेखिकेच्या मते त्या काळी विद्यमान असलेल्या परिस्थितीत शेतमजुरांचे अस्तित्व जवळजवळ अपरिहार्यच होते. देशाच्या अनेक भागांत, विशेषत: मद्रासच्या तंजावर जिल्ह्यात मोठमोठया जमीनदाऱ्या होत्या. या जमिनी कसण्यासाठी मजुरांची गरज असे. दुसरी गोष्ट अशी की ब्राह्मणांच्या काही जातींमध्ये, उदाहरणार्थ, तमिळनाडच्या चिंगलपेट ब्राह्मणांमध्ये, शेतात काम करणे निषिद्ध मानले जात असे. त्यामुळे त्यांना शेतकामासाठी मजुरांची आवश्यकता असे. तिसरा आणि अधिक महत्त्वाचा मुद्दा असा की, "सामाजिक परंपरांमुळे खालच्या जातींना स्वत:च्या मालकीच्या जमिनी वाळगण्याची अथवा दुसऱ्याच्या जमिनी खंडाने घेण्याची बहुधा बंदीच होती." (पृ. ३१). त्यामुळे त्यांना शेतमजूर म्हणून काम करणे भाग पडत असे.

श्रीमती कुमार यांनी एकूण लोकसंख्येपैकी किती टक्के लोक शेतमजूर होते याचीही गणना केली आहे. एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभीच्या काळासंबंधी प्रमाणभूत स्वरूपातील सुसंबद्ध आकडेवारी उपलब्ध नाही. परंतु "एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीस जात व आर्थिक दर्जा यांत फरक करणे अवघड असल्यामुळे" (पृ. ४८) अशी आकडेवारी मिळविण्यात त्या यशस्वी झाल्या आहेत. त्या लिहितात, "अशा प्रकारच्या अविभाज्य संबंधांमुळे १८७१ च्या व त्यानंतरच्या शिरगणतीवरून शिरगणतीच्या पूर्वीच्या काळातील शेतमजुरांच्या संख्येचा अंदाज करणे शक्य झाले आहे. अधिक काटेकोरपणे सांगावयाचे म्हणजे अशा प्रकारच्या अंदाजांसाठी दोन गोष्टी गृहीत धराव्या लागतात......पहिली अशी की, या जातींचे (चेरुमन, पल्लन, परिया इ.) बहुतेक लोक वस्तुत: शेतमजूर होते......दुसरी गोष्ट अशी की, इतर जातींच्या लोकसंख्येमध्ये ज्या प्रमाणात वाढ झाली त्यापेक्षा वेगळया प्रमाणात या जातींच्या संख्येत वाढ झाली असल्याची शक्यता नाही." श्रीमती कुमार पुढे म्हणतात, "अशा प्रकारे शिरगणतीचे आकडे आणि समकालीन अंदाजांच्या आधारे मिळणारे एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीचे एकूण लोकसंख्येचे

आकडे यांवरून एकूण लोकसंख्येशी या जातींचे जे प्रमाण त्या शतकाच्या अखेरीस उपलब्ध होते त्यावरून शेतमजुरी करणाऱ्या जातींची या काळात किती लोकसंख्या असावी आणि स्थूलमनाने शेतमजुरांची संख्या काय असावी याचा निष्कर्ष आपल्याला काढता येतो.' (पृ. ४९).

अशा प्रकारे मिळणाऱ्या आकडेवारीचे विश्लेषण व स्पष्टीकरण करून त्या असा निष्कर्ष काढतात की, "इ. स. १८०० साली शेतीवर अवलंबून असणाऱ्या लोकांची संख्या एकूण लोकसंख्येच्या ६० टक्के होती असे गृहीत धरले तर शेतमजुरांची संख्या (हे शेतमजूर एकूण लोकसंख्येच्या १०–१५ टक्के असावेत), कृषिनिर्भर लोकसंख्येच्या १७ ते २५ टक्के असली पाहिजे......(आणि) मग १९०१ साली शेतमजुरांची संख्या कृषिनिर्भर लोकसंख्येच्या २७ ते २९ टक्के होती ही वस्तुस्थिती लक्षात घेतल्यास कृषिअर्थव्यवस्थेत आमूलाग्र बदल घडून आला होता असे म्हणता येणार नाही." (पृ. १८१–१८२). याखेरीज दहाव्या प्रकरणात त्या '१८७१ ते १९०१ या कालखंडातील शेतमजुरांची वाढ' या विषयाची चर्चा करतात. त्या म्हणतात, या काळामध्ये "......सावकारांनी व व्यापाऱ्यांनी शेतकऱ्यांकडून फार मोठ्या प्रमाणावर जमिनींचा कबजा काढून घेतला असल्याचे आढळून येत नाही." शेतीव्यवसायात असणाऱ्या लोकांमध्ये घडून आलेल्या बदलांचे वर्णन करून त्या म्हणतात, "शिरगणीच्या आकडेवारीवरून १८८१ ते १९०१ या काळात कृषिनिर्भर लोकसंख्येशी जमीनमालकांचे असणारे प्रमाण वस्तुत: वाढले असल्याचे दिसून येते. हा निष्कर्ष काहीसा आश्चर्यकारक वाटतो. शेतीच्या क्षेत्रात झालेली वाढ हे याचे काही अंशी एक कारण असावे. लागवडीखाली आलेल्या नव्या जमिनींमुळे जुन्या काळातील प्रमाणापेक्षा आता कुळे अथवा शेतमजूर यांच्याशी जमीनमालकांचे असणारे प्रमाण अधिक झाले असण्याची शक्यता आहे." (पृ. १७९).

या ठिकाणी आपण हे लक्षात ठेवले पाहिजे की, श्रीमती कुमार यांची गृहीत कृत्ये काहीशी अतिरेकी स्वरूपाची आहेत. खेड्यातील नोकरचाकरांसारख्या खालच्या जातींच्या लोकांकडे मर्यादित स्वरूपात जमीन अवश्य होती आणि ते विविध प्रकारच्या नोकऱ्याही करीत असत. त्यांमध्ये लष्करातील नोकरीचाही समावेश असे.

लेखिकेने मजुरी व स्थलांतर यांचाही या संदर्भात विचार केला आहे. ती लिहिते. "तरीपण अधिकांश आकडेवारीवरून या मताला पुष्टी मिळते की, जरी काही जिल्ह्यांमध्ये शतकाच्या सुरुवातीच्या मानाने शेवटच्या कालखंडात मजुरी काहीशी वाढली तरी वास्तविक अर्थाने मजुरीचे दर स्थिरच राहिले......शेतमजुराला सामान्यत: त्याचे स्वत:चे व त्याच्या कुटुंबाचे जेमतेम पोट भरेल एवढीच प्राप्ती होत असे. त्याने थोडीफार बचत केली तरी दुष्काळाच्या दिवसांत, जेव्हा वास्तविक मजुरी खूपच कमी होई, तेव्हा त्याची ही बचत संपून जाई" (पृ. १६१). स्थलांतरासंबंधी लेखिकेचे म्हणणे असे आहे की, "......स्थलांतराचा सर्वांत महत्त्वाचा परिणाम म्हणजे त्यायोगे मजुरीची पातळी टिकून राही, किंवा मजुरीचे दर फारसे घसरत नसत. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात मजुरांचे स्थलांतर घडून आले नसते तर मजुरीचे दर खूपच खाली घसरले असते."(पृ. १४२–१४३).

यांखेरीज या ग्रंथामध्ये भूदास्य व गुलामगिरी, भूधारण व जमीनमहसूल आणि लोकसंख्या यासंबंधी बरीच उपयुक्त माहिती देण्यात आलेली आहे. ग्रंथाच्या शेवटी एक शब्दावलीही जोडलेली आहे.

एकूण विचार करिता हा ग्रंथ भारताच्या आर्थिक इतिहासात फार महत्त्वाची भर घालणारा आहे यात शंका नाही.

—नसोब बेंजामिन

* * *

रमेश दत्त, ' दि एकॉनॉमिक हिस्टरी ऑफ इंडिया, ' खंड १ व २ (पब्लिकेशन्स डिव्हिजन मिनिस्ट्री ऑफ इन्फर्मेशन अँड ब्रॉडकास्टिंग, दिल्ली, १९६० व १९६३; पृ. ३१२ व ४६२).

रमेशचंद्र दत्त हे थोर भारतीय देशभक्तांपैकी एक होते. आय्. सी. एस्. झालेल्या पहिल्यावहिल्या भारतीयांपैकी ते एक होते. त्यामुळे जनतेची खरी परिस्थिती जाणून घेण्याची संधी त्यांना मिळाली. ' भारताचा आर्थिक इतिहास ' या आपल्या ग्रंथामध्ये त्यांनी आपली स्वतःची मते अधूनमधून व्यक्त केली आहेत.

भारताच्या आर्थिक इतिहासासंबंधी हा पहिलाच ग्रंथ आहे. त्या काळी भारताची जी शोचनीय अवस्था होती. तिची माहिती ब्रिटिश जनतेला करून द्यावी या हेतूने हा ग्रंथ लिहिण्यात आला होता. ग्रंथातील विवेचन १७५७ सालापासून सुरू होते व १९०० सालापर्यंत येऊन संपते. त्यामध्ये फक्त ब्रिटिशांच्या अमलाखाली असलेल्या भारतीय प्रदेशाचाच विचार करण्यात आला आहे. परिणामतः, देशी संस्थानांनी व्यापलेला जवळजवळ अर्धा भारत यातून वगळण्यात आला आहे.

या ग्रंथाचे मूल्यमापन करतांना चार महत्त्वाचे मुद्दे नीट लक्षात ठेवले पाहिजेत. पहिला मुद्दा असा की, या ग्रंथामध्ये लेखकाने ब्रिटिशपूर्व भारताची थोरवी गायिली आहे. तसे करताना लेखक ग्राम-समाजांच्या महत्त्वावर भर देतो. त्याच्या मते हे ग्रामसमाज म्हणजे " स्वयंशासनाचे साधेसुधे नमुने होते. जमीनदार आणि सरकार यांच्या जुलुमांपासून ते शेतकऱ्यांचे संरक्षण करीत. " (खंड १, पृ. ८४). जमीनमहसुलाचा दर सामान्यतः एकषष्ठांश असे. पूर्वीच्या राजांनी महत्त्वाची पाटबंधाऱ्यांची कामे केलेली होती. उद्योगधंदेही भरभराटीस आलेले होते. लेखक म्हणतो, " लाखो स्त्रिया सूत कातून आपल्या कुटुंबांच्या उत्पन्नात भर घालीत असत. कातडी कमावण्याच्या व धातूच्या वस्तू बनविण्याच्या कामामध्येही लाखो लोकांना रोजगार मिळतो. " (खंड १ पृ. १८३). विशेष महत्त्वाची गोष्ट अशी की, गोळा होणारा सारा महसूल या देशातच खर्च होत असे. या देशातील पैसा बाहेर जात नसे.

दत्तांनी मांडलेला दुसरा मुद्दा म्हणजे ईस्ट इंडिया कंपनीने १७५७ साली बंगाल जिंकून घेतल्यापासून भारताचे वसाहतवादी शोषण सुरू झाले, हा आहे. या विजय-युद्धांचा खर्च भारताच्या महसुलातून भागविला जात असे; आणि जेव्हा हा महसूल अपुरा पडू लागला तेव्हा सार्वजनिक कर्जे काढण्यात येऊ लागली. त्या कर्जांवर व्याज द्यावे लागे. १८५७ चे बंड दडपून टाकण्याचा भुर्दंडही भारतालाच भरावा लागला. इंग्लंडने स्वतःच्या स्वार्थासाठी पूर्वकडील भागात सत्तेचा समतोल कायम ठेवला. परंतु त्याचा खर्चही भारतालाच सोसावा लागला. शिवाय, इंग्रजांच्या विजयानंतर लागलीच बंगाल व बिहार या दोन्ही प्रांतांना कंपनीच्या नोकरांच्या अंतर्गत व्यापाराचा फटका सहन करावा लागला. त्या काळीही शेती हेच उत्पन्नाचे प्रमुख साधन होते. यामुळे दत्तांनी आपल्या ग्रंथाचा जवळजवळ अर्धा भाग कृषि-क्षेत्राचे वर्णन करण्यात खर्ची घातला आहे. त्यांचे म्हणणे असे की, ब्रिटिश राजवटीमध्ये देशाच्या वेगवेगळ्या भागांतील एकूण जमीनमहसुलात वाढ झाली होती. याचा परिणाम म्हणून देशाच्या वेगवेगळ्या भागांत भयंकर दुष्काळ पडले. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस दोन मोठे दुष्काळ पडले. जगातील

प्रचंड दुष्काळांपैकी ते होते, असे म्हणता येते. या दुष्काळांच्या वर्षांतही जमीनमहसूल गोळा करण्यात आला होता.

औद्योगिक क्षेत्रासंबंधी दत्त असे सांगतात की, भारतीय मालाला बाजारपेठा मिळेनातशा झाल्या. कारण " ब्रिटिश माल केवळ २½ टक्के जकात आकारून आयात केला जाऊ लागला; परंतु इंग्लंडला जाणाऱ्या मालावर मात्र त्याच्या किमतीच्या ४०० टक्केपर्यंत आयातकर लादून तो इंग्लंडात आयात होऊ शकणार नाही अशी तरतूद करण्यात आली." (खंड १, पृ. २०९). १८९६ साली लँकेशायरच्या व्यापाऱ्यांच्या दडपणामुळे भारतात निर्माण होणाऱ्या सर्व प्रकारच्या सुती मालावर उत्पादनशुल्क लादण्यात आले. बंगालमधील शेतकऱ्यांना निळीचे उत्पादन करण्यास भाग पाडण्यात आले. तसेच, असाममधील चहाच्या मळयांत काम करण्यासाठी मजूर मिळावेत म्हणून ' गुलामांचा कायदा ' या नावाचा एक खास कायदाही जारी करण्यात आला, असे दत्तांनी नमूद केले आहे.

यानंतर दत्त तिसऱ्या क्षेत्राकडे वळतात. पहिला लोहमार्ग १८५३ साली सुरू झाला. सुरुवातीचे लोहमार्ग निर्माण करण्याचे काम खाजगी कंपन्यांनी आपल्या अंगावर घेतले होते. त्यांच्या भागधारकांना निश्चित दराने लाभांश मिळेल अशी हमी देण्यात आली होती. लोहमार्ग व पाटबंधारे यांच्या विकासांची तुलना करून दत्त असे सांगतात की, लोहमार्गापेक्षा पाटबंधाऱ्यांचा विकास करणे अधिक श्रेयस्कर होते. याचे कारण ते असे सांगतात की, "पाटबंधाऱ्यांमुळे पिकांना संरक्षण मिळते. उत्पादन वाढते आणि अवर्षणाच्या काळात दुष्काळ पडण्याचे टळते. आगगाड्यां-मुळे दुष्काळाच्या काळात आपद्ग्रस्त भागांना अन्न पोहचविण्याच्या कामी मदत होते हे खरे, परंतु त्यांच्यामुळे देशाच्या अन्नोत्पादनात भर मात्र पडत नाही." (खंड २, पृ. १२५).

या ग्रंथातील तिसरी प्रमुख कल्पना दत्तांच्या शब्दांत पुढील प्रमाणे आहे:–" पूर्वीची मुस्लिम राजवट आणि सध्याची ब्रिटिश राजवट यांच्यांतील खास आर्थिक वैशिष्टय हे आहे की, परकीय राजकर्त्यांमुळे देशातील संपत्तीचा ओघ दर साल बाहेर जाऊ लागला आहे." (खंड १, पृ. ६१). भारतातील महसुलाचा उपयोग स्थानिक वस्तू खरेदी करण्यासाठीं केला जाऊ लागला. या वस्तू नंतर इंग्लंडला निर्यात केल्या जात. दत्त सांगतात की, यालाच ' गुंतवणूक ' असे म्हटले जाई. याचा अर्थ असा की, इंग्लंडला आपल्या आयातीसाठी पदरचा पैसा खर्च करावा लागत नसे.

वर सांगितल्याप्रमाणे लोहमार्गांची निर्मिती हमीच्या तत्त्वावर केली जात होती. डब्ल्यू एन्. मॅसी यांचे पुढील वाक्य दत्त उद्धृत करतात:– " जोपर्यंत लाभांश मिळण्याची हमी आहे, तोपर्यंत आपण दिलेल्या पैशातून विटा व चुना विकत घेतला जातो की तो पैसा हुगळी नदीत फेकून दिला जातो याची फिकीर करण्याची भागधारकाला मुळीच गरज नाही." (खंड २, पृ. २५८). याखेरीज भारताच्या महसुलातून इंग्लंडला ' गृहकर ' (होमचार्जेस) हि दिला जात असे.

रमेशचंद्र दत्त यांना भारतीय अर्थव्यवस्थेच्या पुनरुत्थापनाविषयीही आस्था होती. भूमिकराचे ओझे कमी व्हावे, असे त्यांना वाटत होते. व्यापारविषयक धोरणाच्या बाबतीत ते संरक्षणवादाचा पुरस्कार करतात; आणि एफ्. लिस्ट यांचा हवाला देतात. ते पाटबंधाऱ्यांच्या निर्मितीच्या आवश्यकतेवरही जोर देतात.

दत्तांचा हा ग्रंथ अत्यंत दर्जेदार व चिरकालीन महत्त्वाचा आहे यात मुळीच शंका नाही. वर सांगितल्याप्रमाणे या क्षेत्रातील हा पहिलाच ग्रंथ असून त्याचे स्वरूप स्पष्टीकरणात्मक आहे. हा ग्रंथ केवळ सरकारी कागदपत्रांवर आधारलेला असला तरी दादाभाई नवरोजी यांच्या ' पॉव्हर्टी

अँड अन-ब्रिटिश रूल इन इंडिया ' ( लंडन, १९०१) यासारख्या ग्रंथामध्ये सरकारी कागदपत्रांचे केवळ संकलन करण्याचा जसा प्रयत्न करण्यात आला आहे, तसा हा ग्रंथ सरकारी कागदपत्रांचा केवळ संग्रह नाही. यातील काही कागदपत्रे सहजासहजी उपलब्ध होण्यासारखी नसल्यामुळे भारताच्या आर्थिक इतिहासाची साधनसामग्री म्हणूनही त्यांचा उपयोग होऊ शकेल.

तरी पण हा ग्रंथ वाचतांना थोडी सावधगिरी बाळगली पाहिजे. पूर्वी सांगितल्याप्रमाणे लेखकाची भूमिका राष्ट्रवाद्याची आहे. त्यामुळे त्याने केलेली काही विधाने मान्य करावयाची असतील तर त्यासाठी पुष्कळच अधिक अनुभवाधिष्ठित पुराव्याची जरूर आहे. उदाहरणार्थ, खंड १, पृ. २८ वर दत्त म्हणतात की, " भारत हा जगातील सर्वांत अधिक दरिद्री देश आहे. " ते असे सांगतात की, " आमच्या भारतीय साम्राज्याच्या लष्करी संरक्षणावर ब्रिटनच्या तिजोरीतून एक शिलिंगही कधी खर्च करण्यात आलेला नाही. " ( खंड २, पृ. १५८ ) हे फारच अतिव्याप्त विधान आहे.

तरी पण एकूण विचार करता या ग्रंथाने भारताच्या आर्थिक इतिहासामध्ये उपयुक्त भर टाकलेली आहे. भारताच्या आर्थिक विकासाचा अभ्यास करू इच्छिणाऱ्याने ऐतिहासिक पार्श्वभूमी समजून घेण्यासाठीही या ग्रंथाचे वाचन करणे लाभदायक ठरेल.

–चंद्रशेखर रानडे
–कैलाशचंद्र शर्मा

* * *

जॉर्ज ब्लिन, 'अँग्रिकल्चरल ट्रेंड्स इन इंडिया, १८९१–१९४७ : आउटपुट, अॅव्हेलेबिलिटी अँड प्रॉडक्टिव्हिटी ', ( युनिव्हर्सिटी ऑफ पेनसिलव्हानिया प्रेस, फिलाडेल्फिया, १९६६, पृ. ३७०, मूल्य १० डॉलर ).

हा ग्रंथ म्हणजे मूलतः एक सांख्यिकीय अध्ययन आहे. लेखकाचा असा विश्वास आहे की, शेतीविषयक अधिकृत आकडेवारी तिच्या कच्च्या स्वरूपात दीर्घकालीन विश्लेषणासाठी स्वीकारता येण्यासारखी नाही; कारण, काटेकोरपणे बोलावयाचे तर तिची तुलना करता येत नाही. पूर्वीच्या अहवालांमध्ये अनेक उणीवा राहून गेल्या आहेत आणि त्या नंतरच्या वर्षांत दूर करण्यात आल्या आहेत. हे लक्षात घेऊन ब्लिन यांनी सरकारी आकडेवारीत मेळ घालण्याचा प्रयत्न केला आहे. पहिल्या ( अ ) भागात ते कार्यपद्धतिविषयक मुद्यांची चर्चा करतात आणि दुसऱ्या ( ब ) भागात सर्वसामान्य प्रवृत्तींचे विश्लेषण करतात. पुस्तकाच्या शेवटी जोडलेल्या तक्त्यांच्या परिशिष्टांमध्ये मेळ घातलेली आकडेवारी देण्यात आलेली आहे.

या ग्रंथामध्ये १८९१–९२ ते १९४६–४७ या कालखंडाचा विचार करण्यात आला आहे. लेखकाने या कालखंडाची दहा समान ' संदर्भ दशकांमध्ये ' विभागणी केली आहे. त्यांपैकी पाच दशके म्हणजे १८९१ ते १९०१ ही वर्षे खानेसुमारीच्या दशकांप्रमाणे पाडलेली असून बाकीची पाच दशके खानेसुमारीच्या वर्षांभोवती केंद्रित केलेली आहेत. उदाहरणार्थ १८९६ ते १९०६ हे दशक घेण्यात आले आहे. अधिक बिनचूकपणा राखता यावा यासाठी ब्लिन यांनी देशी संस्थानांचा समावेश आपल्या अध्ययनात केलेला नाही. ब्रह्मदेशही वगळण्यात आला आहे आणि ते योग्यच होते. परंतु ब्रिटिश बलुचिस्तानातील पिकांसंबंधी जवळजवळ काहीच आकडेवारी उपलब्ध नसल्यामुळे त्या भागाचा समावेशही होऊ शकलेला नाही. अध्ययनाच्या सोयीसाठी त्यांनी प्रदेशांसंबंधी काही समायोजने (adjustments) केली आहेत. बंगाल, बिहार व ओरिसा यांना

एकत्र करून महाबंगाल बनविण्यात आला आहे; पंजाब, वायव्य सरहद्द प्रांत व दिल्ली यांचा मिळून महापंजाब आणि मुंबई व सिंध यांचा मुंबई-सिंध असे विभाग बनविण्यात आले आहेत. याच्या उलट असम व अजमेर-मेरवाड यांचा प्रादेशिक योजनेत समावेश करण्याऐवजी एकूण ब्रिटिश भारतात समावेश करण्यात आला आहे.

या अध्ययनामध्ये ब्लिन यांनी प्रमुख अशा सर्व अठरा पिकांचा समावेश केला आहे. ती पिके अशी :– भात, गहू, ज्वारी, बाजरी, रागी, मका, सातू, हरभरा, ऊस, तीळ, मोहरी व सरसों, जवस, भुईमूग, कापूस, ताग, नीळ, तंबाखू व चहा. या पिकांचे त्यांनी दोन विभाग केले आहेत : अन्नधान्यांची पिके आणि अन्नेतर धान्यांची पिके.

वर सांगितल्याप्रमाणे 'अ' भागात कार्यपद्धतिविषयक पैलूंचे विवेचन करण्यात आले आहे. ब्लिन यांनी आपल्या समायोजनांचे दोन भाग पाडले आहेत :–(१) गौण (२) प्रमुख. येथे त्यांनी वापरलेली सांख्यिकीय उपकरणे म्हणजे समाश्रयण समीकरणे (Regression Equations) गतिमान् सरासऱ्या (Moving Averages) आणि अर्धलघुगणकीय मान (Semi lograthmic scale) ही होत.

भाग 'ब' मध्ये सर्वसामान्य कृषि–प्रवृत्तींचे विश्लेषण करतांना लेखक प्रथम ' उत्पादन व उपलब्धता ' यांचा उल्लेख करतो. त्याचे म्हणणे असे की, ब्रिटिश भारतात एकूण अन्नधान्यांच्या उत्पादनात सरासरीने दर साल फक्त ०·११ टक्के वाढ होत होती. यामध्ये भात व रागी यांच्या उत्पादनात होणारी घट आणि ज्वारी व सातू यांच्या उत्पादनातील कायम स्थिती यांचा अंतर्भाव होतो. यांच्याशी अन्नेतर धान्यांच्या उत्पादनाची तुलना करता त्यांची दर सालची सरासरी वाढ १·३१ टक्के असल्याचे आढळून येते. ब्लिन असे सांगतात की, लोकसंख्येच्या वार्षिक वाढीचे प्रमाण ०·६७ टक्के होते. याचा अर्थ असा की, अन्नधान्यांच्या उत्पादनातील वाढीपेक्षा लोकसंख्येतील वाढ खूपच अधिक होती. या बाबतीत ते दोन उद्बोधक निष्कर्ष काढतात. ते असे म्हणतात की, अन्नधान्यांच्या दर माणशी उत्पादनातील सरासरी घट १९११–१२ पासून सुरू झाली. हे विधान महत्त्वाचे आहे. कारण सामान्यत: असे समजले जाते की, ब्रिटिश भारतातील अन्नधान्यांचा तुटवडा १८८० पासून सुरू झाला होता. या तुटवड्याचे प्रमाण दर साल सरासरीने एक टक्का किंवा त्याहून किंचित् अधिक होते. ब्लिन म्हणतात, " तुटीचे हे प्रमाण एवढे होते की, बहुधा प्रौढ व्यक्तीला तिच्या आयुष्यात ते दिसून येई. शिवाय अनेक कुटुंबे आपल्या उपभोगाच्या पूर्वीच्या पातळचा टिकवून धरू शकत असत. याचा अर्थ असा की ज्या कुटुंबांना तसे करणे शक्य होत नसे त्यांच्या बाबतीत तुटीचे हे प्रमाण दर साल एक टक्क्याहून अधिक असले पाहिजे, हे उघड आहे. जमिनीतून मिळणाऱ्या उत्पन्नावर हक्क असणारी शेतकरी कुटुंबे आणि वरच्या प्राप्ति–पातळीवरील कुटुंबे यांचा पहिल्या प्रकारात समावेश होत असे आणि शेतमजूर, कृष्येतर ग्रामीण कामगार आणि शहरातील खालच्या प्राप्ति-पातळीवरील कुटुंबे यांचा समावेश दुसऱ्या प्रकारात होत असे. " (पृ. २४३). यानंतर ते असे सांगतात की, " ज्या पिकांच्या उत्पादनवाढीचे प्रमाण अधिक होते त्यांच्यावर परदेशी व्यापाराचा अनुकूल परिणाम होऊन त्यांच्या वाढीला त्याने प्रोत्साहन मिळाले होते आणि उत्पादनवाढीचे प्रमाण कमी असणाऱ्या पिकांवर व्यापाराचा प्रतिकूल परिणाम झाला होता किंवा व्यापाराशी त्यांचा काही संबंध नव्हता, असे सामान्यपणे म्हणता येईल. " (पृ. २४६). आपला हा मुद्दा स्पष्ट करण्यासाठी ते पीकवार माहिती देतात.

'एकरी क्षेत्रफळातील बदला' संबंधी लेखकाचे म्हणजे असे आहे की, सर्व पिकांखाली असणाऱ्या क्षेत्रफळामध्ये दर साल सरासरीने ०·४०% टक्क्यांनी वाढ झाली. या क्षेत्रफळातील ही वाढ दुपिकी शेतीतील वाढ आणि जवळजवळ तेवढ्याच प्रमाणात वहितीखाली आणलेली जादा जमीन यांच्यामुळे घडून आली होती.

शेवटी दर एकरी होणाऱ्या उत्पादनाच्या स्वरूपाची माहिती देऊन ब्लिन सांगतात की, दरएकरी उत्पादनातील वार्षिक वाढीचे प्रमाण फक्त ०·०१ टक्का किंबहुना शून्य टक्का होते. त्याच्या निर्धारकां (Determinants) चा उल्लेख करून ते म्हणतात, "...नैसर्गिक शक्तींचा व जे बदल दर एकरी उत्पादन वाढावे या उद्देशाने घडवून आणलेले नाहीत त्या बदलांचा दर एकरी उत्पादनावर घडून आलेला परिणाम किती असेल याचे मूल्यमापन करणे अवघड आहे... दर एकरी उत्पादन वाढविण्याच्या प्रयत्नांचा ऊर्ध्वगामी प्रभाव इतर प्रभावांच्या एकूण अधोगामी परिणामांची भरपाई करण्यास पुरेसा असावा असे दिसते." (पृ. २३९–२४०).

साकल्याने विचार करता, हा ग्रंथ म्हणजे भारताच्या आर्थिक इतिहासात पडलेली एक मोलाची भर आहे. पूर्वीच्या आकडेवारीचा वापर करण्यापूर्वी तिची छाननी करण्याची किती आवश्यकता आहे, ही गोष्ट या ग्रंथाच्या वाचनाने वाचकांच्या मनावर उत्तम प्रकारे ठसते. या क्षेत्रातील ब्लिन यांचा स्वतःचा प्रयत्न यशस्वी झालेला आहे; आणि ज्या काळाचा आढावा या ग्रंथात घेण्यात आलेला आहे त्या कालखंडातील 'उत्पादनउपलब्धता व उत्पादनक्षमता' यांच्या संबंधीच्या कृषिविषयक आकडेवारीच्या बाबतीत बोलावयाचे तर कोणताही संशोधक सरकारी अहवालांकडे न जाता या ग्रंथाकडेच वळेल यात शंका नाही.

* * *

**एम्. डी. मॉरिस, 'दि इमर्जन्स ऑफ अॅन इंडस्ट्रियल लेबर फोर्स इन इंडिया, ए स्टडी ऑफ दि बॉम्बे कॉटन मिल्स, १८५४–१९४७', (ऑक्सफोर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, मुंबई १९६५, पृ. २६३).**

गेली अनेक वर्षे एम्. डी. मॉरिस हे भारतातील औद्योगिक कामगारांच्या आर्थिक प्रश्नांसंबंधी संशोधनकार्य करीत आहेत; आणि त्यांनी या विषयासंबंधी अनेक निबंध लिहिले आहेत. त्यांपैकी एका निबंधाचे शीर्षक 'सम कॉमेंट्स ऑन दि सप्लाय ऑफ लेबर टू दि बॉंबे कॉटन टेक्स्टाइल इंडस्ट्री, १८५४ – १९५१', असे असून तो 'इंडियन एकॉनॉमिक जर्नल' (खंड १, अंक २, ऑक्टोबर १९५३, पृ. १३८ – १५२) या नियतकालिकात प्रसिद्ध झाला होता. प्रस्तुत ग्रंथामध्ये मॉरिस यांनी या निबंधातील कल्पना अधिक विस्ताराने व साधारपणे मांडल्या आहेत.

लेखकाचा मुख्य उद्देश कारखान्यांतील कामगारांचा 'उदय' कसा झाला हे सांगण्याचा आहे, ही गोष्ट ग्रंथाच्या शीर्षकावरूनच स्पष्ट होते. प्रथमतः ते या प्रश्नाचे स्वरूप विशद करतात. ते म्हणतात, "आज भारतामध्ये उघड व प्रच्छन्न अशा दोन्ही प्रकारची बेकारी सर्वत्र पसरलेली आहे, या बाबतीत संपूर्ण एकमत असले तरी उद्योगपती, सरकारी अधिकारी व विद्वान लोक यांमध्ये याबाबतीत जवळजवळ तितकेच एकमत आहे की, १९४७ पूर्वी पुरेशा प्रमाणात स्थिर व शिस्तबद्ध कामगारांना सुसंघटित करून कामी लावता न आल्यामुळे भारतातील औद्योगिक विकासात अडथळा निर्माण झाला होता." (पृ. २). यानंतरच्या विवेचनामध्ये त्यांनी निश्चित स्वरूपाची भूमीका घेऊन असे सांगितले आहे की, हा प्रश्न विशेषतः १९२१ पर्यंत अस्तित्वात होता असे समजले जाते.

मॉरिस यांचा प्रमुख हेतू या गृहीतकृत्याची सत्यता ऐतिहासिक पुराव्याच्या आधारे

पडताळून पाहाणे हा असून त्यांनी ते खरे नसल्याचे यशस्वीपणे सिद्ध केले आहे. यातील पहिला टप्पा म्हणून त्यांनी भारताच्या आर्थिक इतिहासाच्या तीन उपयुक्त वैशिष्ट्यांवर प्रकाशझोत टाकला आहे. ती वैशिष्ट्ये अशी :– (१) मनुष्यबळ आणि साधनसंपत्ती यांच्यांतील ऐतिहासिक समतोलाचा विचार करता भारताच्या बहुतेक भागांतील परिस्थिती नेहमीच अस्थिर होती. (२) ब्रिटिश राजवटीच्या आगमनापूर्वीदेखील लोकसंख्येचा बराच मोठा भाग भूमिहीनांनी आधीपासूनच व्यापलेला होता; आणि (३) जुन्या काळातही लोक एका जिल्ह्यातून दुसऱ्या जिल्ह्यात स्थलांतर करीत असत. यानंतर ते आवर्जून असे सांगतात की, "सर्व उपलब्ध पुराव्यांची छाननी करता असे स्पष्ट दिसून येते की, उद्योगांच्या प्रारंभापासून १८९२ पर्यंतच्या कालखंडात अकुशल कामगारांच्या भरतीचा प्रश्न केव्हाही उपस्थित झाला नव्हता ... १८९६ च्या अखेरीपर्यंत सहजासहजी कामगारांचा पुरवठा होण्याची परिस्थिती चालू राहिली. त्यानंतर मात्र या स्थितीत नाट्यपूर्ण बदल घडून आला." (पृ. ५५). लेखकाचे म्हणणे असे, आणि ते बरोबरही आहे की, हा बदल मजुरांना शेतीविषयी मुळातच असणाऱ्या अथवा अकस्मात निर्माण झालेल्या जिव्हाळ्यातून घडून आला नव्हता, तर एका अगदी स्वतंत्र कारणामुळे घडून आला होता. ते कारण म्हणजे, प्लेगाची साथ हे होय. या साथीमुळे लोकांना शहरांतून बाहेर पडावे लागले होते. म्हणून ही परिस्थिती निर्माण झाली होती. परंतु एकोणिसावे शतक उलटल्यानंतर या परिस्थितीत पुन: सुधारणा झाली आणि ती अध्ययनासाठी घेतलेल्या कालखंडाच्या अखेरीपर्यंत कायम राहिली.

कागदोपत्री पुराव्यांव्यतिरिक्त लेखकाने आपल्या भूमिकेच्या समर्थनार्थ दोन युक्तिवादांचा उपयोग केला आहे. त्याचे असे म्हणणे आहे की, ऐतिहासिक दृष्ट्या एकूण उत्पादन-खर्चामध्ये मजुरीपायी होणारा खर्च हा सापेक्षत: फार कमी होता; परंतु उद्योगांतून मिळावयाच्या नफ्या-संबंधीच्या अपेक्षा मात्र सामान्यत: फार मोठ्या होत्या. मजुरांचा तुटवडा असता तर मजुरीचे दर स्वाभाविकपणेच वाढले असते. १८९६ व १८९७ साली प्लेगाच्या साथीमुळे ते खरोखरीच वाढलेही. परंतु उपलब्ध पुराव्यांवरून असे दिसून येते की, मजुरीचे दर 'उल्लेखनीयरीत्या स्थिर' होते. शिवाय मॉरिस यांना असे वाटते की, त्यांच्या निष्कर्षाला उद्योगाच्या तंत्रविद्याविषयक इतिहासाचाही आधार आहे. मजुरांचा तुटवडा असता तर उद्योगपतींनीं उत्पादनाच्या भांडवल-प्रधान पद्धतींचा अवलंब केला असता. त्याऐवजी १८९० नंतरच्या काळात कारखान्यांनी गाडीसाचा किंवा त्राक-कताई (mule spinning) ऐवजी झपाट्याने सूतसाचा किंवा वलयकताई (ring spinning) सुरू केली. याचा अर्थ असा की, त्यांनी भांडवलप्रधान मार्गाकडून श्रमप्रधान मार्गाच्या दिशेने वाटचाल सुरू केली.

एकूण विचार करता, लेखकाला असे वाटते की गिरणीकामगारांतील अस्थिरता व बेशिस्त यांमुळे विद्वान् व इतर लोक कामगारांचा तुटवडा असल्याचा युक्तिवाद करू लागले.

भारतामधील श्रमजीवी वर्गाच्या उदयाच्या प्रश्नासंबंधी या ग्रंथामध्ये एक नवीन भाष्य प्रस्तुत करण्यात आले आहे. ही देखील या ग्रंथाची या विषयातील एक मोलाची भर आहे. शिवाय, आर्थिक इतिहासकाराला कामाचे तास, कामाचे नियमन, श्रमिकांचे प्रशासन वगैरे या विषयांच्या इतर संबद्ध पैलूंची ग्रंथकाराने केलेली चर्चाही उद्बोधक वाटेल. हा मुंबईच्या गिरण्यां-संबंधीचा एक प्रकरणाभ्यास (case study) आहे; आणि लेखकाने अशी इच्छा प्रदर्शित केली आहे, व ती योग्यही आहे की; इतर औद्योगिक केंद्रांचेही अशाच प्रकारचे अभ्यास

करण्यात यावेत. त्याला असेही वाटते की, मुंबईतील कामगारांसंबंधी, उदाहरणार्थ 'खाणावळी' या संस्थेसंबंधी, अधिक अभ्यास करण्यासही पुष्कळ वाव आहे.

* *

हॉल्डन फर्बर, 'बॉंबे प्रेसिडेन्सी इन दि मिडएटीन्थ सेंचुरी', (एशिया पब्लिशिंग हाउस, मुंबई, १९६५, पृ. ७६).

या पुस्तकामध्ये १७२० ते १७५० या कालखंडाचा विचार करण्यात आला आहे. लेखकाने १९६२ साली हेरास स्मारक व्याख्यान मालेत दिलेल्या तीन व्याख्यानांचा हा संग्रह आहे. मुंबई इलाख्याच्या आर्थिक इतिहासावर उद्बोधक प्रकाश टाकण्यासाठी लेखकाने मुख्यत: डच कागदपत्रांची मदत घेतली आहे. काही अंशी त्या काळात विद्यमान असणाऱ्या व्यक्तींच्या चरित्ररेखांच्या आधारे लेखकाने या कालखंडाचा इतिहाससांगण्याचा प्रयत्न केला आहे. या दृष्टीने त्याच्या या विवेचनामध्ये विशेष नाविन्य निर्माण झाले आहे.

पहिल्या व्याख्यानाचे शीर्षक 'बॉंबे अँड दि मलबार कोस्ट इन दि सेव्हनटीन ट्वेंटीज' असे आहे. व्यापारी दृष्ट्या पश्चिम भारतात मुंबई व सुरत ही दोन महत्त्वाची शहरे होती असे लेखक सांगतो. त्या काळापर्यंत मुंबई हा सुमारे सात बेटांचा समूह होता; आणि त्या बेटांमधील मोठी खाडी (ग्रेट ब्रीच) भरून काढण्याचे काम अद्यापि पुरे झालेले नव्हते. (या 'ग्रेट ब्रीच' लाच सध्या 'ब्रीच कँडी' असे म्हणतात). व्यापारी केंद्र या नात्याने सुरत शहर मुंबईपेक्षा वरचढ होते; आणि 'अगदी युरोपीय जहाजांच्या तोडीची' जहाजे तेथे बांधली जात असत. हॉल्डेन फर्बर सांगतात, "दर वर्षी या बंदरामध्ये सामान्यत: सुमारे पंचेचाळीस मोठी व्यापारी जहाजे येत असत. त्यांतील सात आठ जहाजे वगळता बाकीची सर्व या देशात बांधलेली असत. डच लोकांच्या याद्यांवरून असे दिसून येते की, देशी जहाजांपैकी दोन तृतीयांश जहाजे युरोपीयेतरांच्या मालकीची असत. हे मालक बहुतेक सर्व मुसलमान असत." (पृ. ८). हॉल्डेन फर्बर यांच्या या विधानामुळे बी. जी. गोखले यांच्या या विधानाचे* खंडन होते की अगदी सतराव्या शतकाच्या अखेरीस पश्चिम भारतीय आंतरराष्ट्रीय व्यापार भारतीयांच्या हातून इंग्रजांच्या हाती गेला होता. अर्थात दृष्टिकोनांतील हे मतभेद या क्षेत्रामध्ये अधिक संशोधन करूनच दूर करता येतील.

या ठिकाणी लेखक अशी भर घालतो की, मलबारच्या किनाऱ्यावर अंजेंगो व तेलिचेरी या ठिकाणी कंपनीच्या व्यापारी वखारी होत्या. मिऱ्यांच्या व्यापाराच्या दृष्टीने त्या महत्त्वाच्या होत्या. लेखकाच्या मते "या वखारी देशांतर्गत व्यापार करणारे त्यांचे प्रमुख व कारखानदार यांच्या खाजगी फायद्यासाठी तोट्यात चालविल्या जात होत्या यात मुळीच शंका नाही." (पृ. १८).

दुसऱ्या व्याख्यानाचा विषय 'दि कंट्री ट्रेड ऑफ बॉंबे अँड सूरत इन सेव्हनटीन थर्टीज,' असा आहे. लेखकाचे म्हणणे असे की, कंपनीमध्ये अगदी उच्च पदांवर काम करणारे नोकरही खाजगीरीत्या देशांतर्गत व्यापार करीत असत. १७२८ ते १७३४ या काळात मुंबईचा गव्हर्नर असलेला रॉबर्ट कॉवन याच्याविरुद्ध जे आरोप होते त्यांपैकी एक आरोप असा होता की, त्याने कंपनीला प्रत्यक्षरीत्या कॉफी विकत घेऊ देण्याऐवजी स्वत: कॉफी विकत घेऊन ती कंपनीला

* पश्चिम भारताशी होणाऱ्या इंग्लिश व्यापारासंबंधी बी. जी. गोखले यांचे 'जर्नल ऑफ इंडियन हिस्टरी' (खंड ४० व ४२, भाग २) या नियतकालिकातील लेख पाहा.

विकली. इतर युरोपीय कंपन्यांचा व्यापारातील भाग कमीअधिक प्रमाणात तोच राहिला; परंतु इंग्लिश कंपनीचा भाग मात्र वाढला. १७२४ ते १७४२ या काळांत इंग्रजांची अंतर्देशीय जहाज वाहतुकीत जी वाढ झाली तिच्यावरून ही गोष्ट उघड होते. टनभाराचा विचार करता ही वाढ दुप्पट झाली. ३००० टनांवरून ती ६ ते ७ हजार टनांपर्यंत गेली. तसेच जहाजांची व त्यांच्या गावठी इंग्रज कप्तानांची संख्या वाढून ती १७ वरून सुमारे २८ पर्यंत गेली.

तिसऱ्या व्याख्यानाचा विषय, 'बाँबे प्रेसिडेन्सी इन वॉर टाइम, १७४० ते १७५०', 'हा आहे. या कालखंडामध्ये पूर्वीच्याच शक्ती कार्य करीत राहिल्या. कंपनीचे नोकर अंतर्देशीय व्यापार करीत राहिले. परंतु हॉल्डेन फर्बर यांच्या म्हणण्याप्रमाणे बिगर-इंग्लिश मार्गांनी किती इंग्लिश पैसा युरोपात गला याची जवळजवळ काहीही माहिती उपलब्ध नाही. बंगालमध्ये देखील कंपनीच्या लष्करी विजयानंतर ही प्रक्रिया सुरू झालेली दिसते. खुल्या समुद्रावरील चाचेगिरी पूर्वीसारखीच बोकाळलेली होती. मराठा सरदार कान्होजी आंग्रे यांच्या जहाजांचा, कॅप्टन रॉबर्ट जेकिन्स याने १७४० सालीं पराभव केल्यानंतरही ही परिस्थिती चालू होती. परिणामतः, देशी व्यापाऱ्यांना युरोपीय कंपन्यांकडे संरक्षण मागणे भाग पडले, असे हॉल्डेन फर्बर सांगतात. उपलब्ध आकडेवारीचे विश्लेषण केल्यानंतर ते असा निष्कर्ष काढतात की, सुरतेच्या स्थानिक व्यापारी भांडवलाचा सुमारे एकतृतीयांश भाग युरोपीय 'संरक्षणाखाली' कार्य करीत होता.

या ग्रंथाच्या अध्यायनावरून असे स्पष्टपणे दिसून येते की अठराव्या शतकामध्ये इंग्रज लोक पश्चिम भारतात आर्थिक विस्तार करण्याइतके समर्थ बनले होते. परंतु त्यांचा राजकीय विस्तार मात्र एकोणिसाव्या शतकातच सुरू झाला. या भागात आधी मुगल सत्ता अस्तित्वात होती आणि त्यानंतर मराठा सत्ता उदयास आली होती, ही गोष्ट लक्षात घेतल्यास या विसंगतीचे कोडे उलगडते.

* * *

४. ए. दास गुप्त, 'मलबार इन एशियन ट्रेड, १७४०–१८००', (केंब्रिज युनिव्हर्सिटी प्रेस, १९६७, पृ. २०४).

हा ग्रंथ म्हणजे केंब्रिज दक्षिण आशिया अध्ययनग्रंथांपैकी एक आहे. लेखकाने इंग्लिश कागदपत्रांव्यतिरिक्त, हेग येथील डच ईस्ट इंडिया कंपनीच्या पुराभिलेखांचा वापर केला असल्यामुळे हा ग्रंथ अत्यंत उपयुक्त झाला आहे.

या ग्रंथात पाच प्रकरणे आहेत. पहिल्या प्रकरणाचे शीर्षक 'दि क्राइसिस इन मलबार' असे असून ते स्वाभाविकपणेच विषय-परिचयात्मक आहे. लेखक असे सांगतो की, सुरुवातीच्या काळात पोर्तुगीज लोक सर्वांत अधिक बलाढ्य होते. त्यांनी स्थानिक राजांशी तह करून बाजारभावापेक्षा कितीतरी कमी किमतीत मिरी खरेदी करण्याचा हक्क मिळविला होता. समुद्रसंचारासाठी त्यांनी परवाना पद्धती लागू केली होती. कोणत्याही आशियाई जहाजाला समुद्रात संचार करण्यासाठी पोर्तुगीजांकडून परवानगी घ्यावी लागे. १९६३ साली पोर्तुगीज मलबारमधून बाहेर पडले आणि त्यांची जागा डचांनी घेतली. आपल्या व्यापारी संबंधांच्या बाबतीत डचांनी पोर्तुगीजांचे अनुकरण केले. परंतु डचांना फारसे यश आले नाही. व्यापारी आपली मिरी जास्तीत जास्त किंमत देणाऱ्याला चोरून विकीत. इंग्रज व फ्रेंच लोक तेथे असल्यामुळे व्यापाऱ्यांना असे करणे सुलभ जाई.

दुसऱ्या प्रकरणाचे शीर्षक 'दि मनॉपली ऑफ ट्रावनकोर' असे आहे. १७४१ साली

त्रावणकोरचा राजा मार्तंडवर्मा (१७२९–१७५८) व डच ईस्ट इंडिया कंपनी यांच्यांत एक युद्ध झाले. त्यात डचांचा पराभव झाला. या पराभवाचे फार दूरगामी परिणाम झाले. दासगुप्त यांच्या म्हणण्याप्रमाणे ते परिणाम असे :– "पहिली गोष्ट अशी की, आपण येथे पुन: आपली मक्तेदारी स्थापन करू शकू हे आपले स्वप्न डचांना सोडून द्यावे लागले. दुसरी गोष्ट अशी की, त्रावणकोरचे राज्य इतरत्र पसरू लागले. तिसरी गोष्ट अशी की, मार्तंडवर्माने एक नवीन प्रकारचे नोकरशाही राज्य निर्माण केले...... या राज्याचा खर्च भागविण्यासाठी त्याने एक व्यापार-खातेही उघडले. मिऱ्यांच्या व्यापारात कडक मक्तेदारी प्रस्थापित करून या खात्याचा प्रारंभ करण्यात आला; आणि नंतर इतर विक्रेय वस्तूंचाही त्या मक्तेदारीत समावेश करण्यात आला......खुद्द त्रावणकोरच्या व्यापाऱ्यांना राज्याचे नोकर बनविण्यात आले, किंवा त्यांना पूर्णपणे सरकारवर अवलंबून राहाण्यास भाग पाडण्यात आले......शेवटची गोष्ट अशी की, डचांनी समुद्रकिनाऱ्याची जी नाकेबंदी केली होती तिला त्रावणकोरने आव्हान दिले आणि ॲलेप्पी येथे एक नवे बंदर निर्माण करून ती नाकेबंदी मोडून काढली.......या नव्या बंदरापासून डचांना दूर राहाण्यास भाग पाडण्यात आले. हे सारे घडून येण्यास सुमारे पन्नास वर्षे लागली. या अर्धशतकाच्या काळात मलबारच्या व्यापारी जगतातील सर्वात महत्त्वाची व एकमेव वस्तुस्थिती म्हणजे त्रावणकोरची मक्तेदारी ही होय." (पृ. ३३).

तिसऱ्या प्रकरणाचे शीर्षक 'जान कंपनी इन एशियन ट्रेड' हे आहे. लेखकाच्या सांगण्यानुसार डच कंपनीने आशियाई व्यापारात भाग घेण्यास सतराव्या शतकाच्या सुरुवातीपासून प्रारंभ केला होता. मलबारशी करावयाच्या व्यापाराच्या बाबतीत परस्पर देवाणघेवाणीऐवजी तिने सक्तीच्या मार्गाचा अवलंब केला. शिवाय तिने समुद्रावर 'नियंत्रण' ठेवले. त्यामुळे आशियाई व्यापार कोचीन बंदरापासून दूर राहिला. परिणामत:, तिच्या 'स्थानिक' उत्पन्नातून तिचा 'स्थानिक' खर्च भागू शकला नाही. ही तूट भरून काढण्यासाठी कंपनीने कापडाचा व्यापार करण्यास सुरुवात केली; परंतु या व्यापारामध्ये तिला अनेक अडचणींना तोंड द्यावे लागले. त्यांतील एक अडचण कापडाचा पुरवठा करणाऱ्या व्यापाऱ्यांची बेजबाबदार वृत्ती ही होती. कापड-उत्पादकांना देण्यासाठी या व्यापाऱ्यांना अगाऊ रकमा दिल्या जात असूनही ते हलक्या प्रतीचे कापड पुरवीत आणि तेही पुरेसे नसे. परिणामत:, कंपनीने १७५९ साली कापडाचा व्यापार करणे सोडून दिले. कंपनीच्या व्यापाराची दुसरी वस्तू मिरी ही होती. या व्यापारातील अडचणी काही अंशी त्रावणकोरच्या राजाच्या मक्तेदारीमुळे आणि काही अंशी डच लोक बाजारभावापेक्षा कमी दराने मिरी खरेदी करीत असल्यामुळे निर्माण झालेल्या होत्या. याच वेळी मलबारमध्ये मिरी व इतर मसाल्याचे पदार्थ यांना असलेली मागणी घटल्यामुळे त्यांच्या अडचणींत भरच पडली. डचांच्या दृष्टीने मलबारच्या व्यापाराच्या बाबतीतील शेवटची महत्त्वाची बाब साखर ही होती. ही साखर इंडोनेशियातून आयात केली जाई. तिचे उत्पादन इंडोनेशियात घटले तेव्हा नेदर्लंड्समध्ये तिच्या किमती वाढल्या; परंतु मलबारमधील किमतींत मात्र वाढ झाली नाही. अशा या अडचणींना तोंड द्यावे लागल्यामुळे डचांनी त्या शतकाच्या अखेरीस मलबारच्या किनाऱ्यावरील आपला सारा व्यापार आवरता घेतला.

चौथ्या प्रकरणाचे शीर्षक 'दि मेडिईव्हल मर्चंट' हे आहे. लेखकाचे म्हणणे असे की, व्यापारी क्षेत्रात मुसलमान व पोर्तुगीज यांच्यानंतर कोकणी ब्राह्मण, ज्यू व डच यांचे प्रामुख्य होते. स्वाभाविकपणेच हे व्यावसायिक लोक कालिकत व कोचीन यांसारख्या महत्त्वाच्या बंदरां-

मध्ये, कोट्टारसारख्या उत्पादनकेंद्रांमध्ये आणि पोरकासारख्या अंतर्गत बाजारपेठांमध्ये केंद्रित झाले होते. ते सामान्यतः वैयक्तिकरीत्या व्यवसाय करीत. तरी पण भागीदारीचीही उदाहरणे क्वचित आढळतात. त्रावणकोरचा उदय, हैदरअली व टिपू यांच्या स्वाऱ्या, डचांची व्यापार-निवृत्ती इत्यादींसारख्या विविध परिस्थितींच्या संयोगामुळे अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात या व्यापारी वर्गांना उतरती कळा लागली.

पाचव्या व शेवटच्या प्रकरणाचे शीर्षक 'दि क्लोज ऑफ दि सेंचुरी' असे आहे. हा उप-संहार आहे. लेखकाचे म्हणणे असे की, डचांना त्यांच्या मलबारातील व्यापारामध्ये आर्थिक नुकसान सोसावे लागल्याने तो व्यापार थांबवावा लागल्याबद्दल त्यांना दुःख न होता, उलट त्यांनी सुटकेचा निःश्वास टाकला. त्रावणकोरच्या राजाने डचांचा प्रतिकार केला, परंतु त्याला इंग्रजांपुढे नमावे लागले. कोचीनचा व्यापार थंडावला आणि परिणामी, बंदर या नात्याने कोचीनचे महत्त्व ओसरले. व्यापारी वर्गांमध्येही फारसा जोर उरला नाही.

अठराव्या शतकातील दक्षिण भारताच्या एका भागाच्या व्यापाराचेच परिपूर्ण विवेचन करणारा हा एकमेव ग्रंथ आहे. त्यामुळे याच्या वाचनाने वाचकाच्या ज्ञानात फार मोठी भर पडते; इतकेच नव्हे, तर भारताच्या आर्थिक इतिहासाच्या संशोधनामध्ये मलबारमधील ज्यू लोकांच्या व्यवसायाचा विकास आणि लेखकाने ज्या डच लोकांच्या उद्योगांवर लक्ष केंद्रित केले आहे त्यांच्याव्यतिरिक्त इतर युरोपीय लोकांची मलबारच्या आशियाई व्यापारातील भूमिका यांसारख्या अनेक विषयांची नवी क्षितिजे या ग्रंथामुळे निर्माण होतात.

* * *

डब्ल्यू. एच्. मोरलँड, (१) 'इंडिया अॅट दि डेथ ऑफ अकबर, अॅन एकॉनॉमिक स्टडी,' (मॅकमिलन अँड कंपनी लि., लंडन, १९२०, पृ. ११+३२८, किंमत दिलेली नाही.)

(२) 'फ्रॉम अकबर टु औरंगजेब, ए स्टडी इन इंडियन एकॉनॉमिक हिस्टरी', (मॅकमिलन अँड कं. लि., लंडन, १९२३, पृ. १३+३६४, किंमत दिलेली नाही.)

(३) 'दि अॅग्रेरियन सिस्टिम ऑफ मुस्लिम इंडिया, ए हिस्टॉरिकल एसे विथ अॅपेंडायसेस', (डब्ल्यू. हेफ्फर अँड सन्स लि., केंब्रिज, १९२९, पृ. १७+२९६, किंमत रु. १५)

डब्ल्यू. एच्. मोरलँड हे मध्ययुगीन भारताच्या आर्थिक इतिहासकारांपैकी सर्वांत जुने इतिहासकार किंवा या क्षेत्रातील अग्रदूत आहेत, असे म्हणण्यास मुळीच हरकत नाही. वर उल्लेखिलेले त्यांचे तीन ग्रंथ अत्यंत उच्च कोटीचे आहेत असे या विषयाशी संबंध असलेले सर्व लोक मानतात. 'इंडिया अॅट दि डेथ ऑफ अकबर', या ग्रंथामध्ये ते सोळाव्या शतकाच्या अखेरीस व सतराव्या शतकाच्या सुरुवातीस भारताची आर्थिक स्थिती कशी होती याचे विश्लेषण करतात; आणि 'फ्रॉम अकबर टु औरंगजेब' या ग्रंथात ते आपल्या विवेचनाची व्याप्ती वाढवून जहांगीर व शहाजहान यांच्या कारकीर्दींचा त्यात समावेश करतात.

उपलब्ध असलेल्या ढोबळ माहितीच्या आधारे ते असे अनुमान काढतात की १६०५ साली भारताची लोकसंख्या सुमारे १० कोटी होती; आणि त्यात हिंदूंची संख्या सर्वांत अधिक होती. मुसलमानांपैकी काही लोक समुद्रकिनाऱ्यावरील प्रदेशात आणि इतर उत्तर भारतात राहात होते. ज्यू व आर्मेनियन लोकांची संख्या फार थोडी होती, परंतु व्यापारी क्षेत्रात त्यांना फार महत्त्वाचे स्थान होते. याच सुमारास पारशीही व्यापारी क्षेत्रात प्रवेश करू लागले होते.

शेतीच्या क्षेत्राच्या बाबतीत मोरलँड यांचे म्हणणे असे की, अकबराने जमिनीच्या एकूण

उत्पन्नाच्या एकतृतीयांश या हिशेबाने शेतसारा ठरविला. दक्षिणेकडे हे प्रमाण बहुधा याहून अधिक असावे. बंगालमध्ये मुख्यत: तांदूळ पिकविला जाई, उत्तर भारतात तृणधान्ये, ज्वारी-बाजरी व डाळी यांचे उत्पादन केले जाई, दख्खनच्या पठारावर ज्वारी व कापूस आणि बाकीच्या दक्षिण भारतात तांदूळ व ज्वारी-बाजरी ही पिके काढली जात. शेतीची नेहमीची अवजारे म्हणजे नांगर, कुदळी, मोटा, इत्यादि असत. सिंधू नदीतून पाणीपुरवठा करणारे काही कालवे अवश्य होते; परंतु पाणीपुरवठ्याच्या बाबतीत देश मुख्यत: विहिरींवर आणि ओढे-नाले यांवर अवलंबून होता. या ओढ्यांना तात्पुरते बांध घालून त्यांचे पाणी शेतीसाठी वापरले जाई. अधूनमधून भयंकर दुष्काळ पडत. दुर्भिक्षनिवारक कामे सुरू केली जात. परंतु त्यांचा एकूण परिणाम अगदीच नगण्य असे. शेतमजुरांची स्थिती जवळजवळ गुलामांसारखी होती किंवा गुलामांमधून शेतमजूर उदयाला येत होते, असेही म्हणता येईल.

परंतु जहांगीर व शहाजहान यांच्या कारकीर्दीत इनाम म्हणून जमिनी देण्याची अथवा शेतसाऱ्याचे मक्ते देण्याची प्रथा सार्वत्रिक झाली होती, असे मोरलँड सांगतात. शेतसाऱ्याचे नेहमीचे प्रमाण वाढून तो उत्पन्नाच्या निम्म्या हिश्श्याइतका झाला होता. अधूनअधून शेतकरी आपली शेती सोडून पळूनही जात. लेखकाच्या म्हणण्याप्रमाणे शेतीच्या क्षेत्रात फक्त एकच सुधारणा झाली होती. ती अशी की तंबाखू हे व्यापारी महत्त्वाचे पीक यावेळी बनले होते.

औद्योगिक क्षेत्राच्या बाबतीत या ग्रंथांतून बरीच उपयुक्त माहिती मिळते. या क्षेत्रामध्ये 'भारत हा तुलनात्मक दृष्ट्या पश्चिम युरोपपेक्षा खूपच पुढारलेला होता' (पृ. १५५-१५६), सुती कापडाची विणाई हा 'भारतातील अत्यंत व्यापक उद्योग होता,' आणि या उद्योगाचे एकूण उत्पादन ही '१६०० सालच्या औद्योगिक जगतातील फार मोठ्या घटनांपैकी एक घटना होती.' (पृ. १७९). ही गोष्ट निर्विवादपणे खरी होती असे मोरलँड मान्य करतात. जव्हेरी, हस्तिदंत, पोवळे, अंबर अथवा कासवाची पाठ यांवर कोरीव काम करणारे कारागीर, औषधविक्रेते, गंधी, वगैरे लोकांचे उद्योगही उल्लेखनीय होते. त्यांसाठी लागणारी अवजारे व बहुतेक कच्चा माल या देशातच तयार झालेला असे. दगडी कोळसा अद्यापि खाणीतून काढला जात नव्हता आणि सोन्याचे उत्पादनही बहुधा नगण्यच होते. लोखंड व तांबे यांच्या खाणींपासून जवळच जेवढे लाकूड उपलब्ध होई तेवढ्यापुरते त्याचे उत्पादन मर्यादित असे. जहाजनिर्मितीचा उद्योग पुष्कळच विकसित झालेला होता. भारताभोवतालच्या सागरांतील बहुतेक व्यापार भारतात तयार झालेल्या जहाजांतूनच होत असे. सरकारतर्फेही कारखाने चालविले जात असले तरी सामान्यत: कारागीर स्वतंत्रपणेच काम करीत.

नंतरच्या काळात या क्षेत्राची काय स्थिती होती यासंबंधी मोरलँड फारशी चर्चा करीत नाहीत. यावरून असे सूचित होते की सदर परिस्थितीत फारसा बदल घडून आला नसावा.

यानंतर मोरलँड व्यापारी क्षेत्राचे विवेचन करतात. भारताच्या पश्चिम सरहद्दीवर खुष्कीचे दोन प्रमुख व्यापारी मार्ग होते. लाहोर ते काबूल आणि मुलतान ते कंधार. भारतातून पश्चिम युरोपला जाण्याचा थेट जलमार्ग पोर्तुगीजांनी शोधून काढला होता आणि त्याचा उपयोग डच व इंग्रज लोकही करीत होते. मिरी हा भारतातून निर्यात होणारा सर्वांत महत्त्वाचा माल होता. भारतीय व्यापारी आपला माल विकण्यास तयार असले तरी युरोपीय व्यापाऱ्यांकडून त्यांना खरेदी करिता येईल असा फारच थोडा माल असे. त्यामुळे देशात चांदीची आयात होऊ लागली,

त्या काळी लहाडी बंदर, खंबायत, सुरत, गोवा, कालिकत, कोचीन, नागापट्टण, मसुलीपट्टण, चितगांव वगैरे महत्त्वाची बंदरे होती असे लेखक सांगतो.

नंतरच्या कारकीर्दीमध्ये महत्त्वाचे बदल घडून आले. भारतीय समुद्रांवरील पोर्तुगीजांच्या वर्चस्वाला डच व इंग्रज यांनी आव्हान दिले. भारतातून मिऱ्यांची निर्यात चालू राहिली. परंतु नीळ, सोरामीठ, सुती कापड आणि इतर वस्तू यांच्या निर्यातीतही वाढ झाली. युरोपीय वस्तूंना भारतात फारशी मागणी नव्हती आणि आपल्या येथील संपत्ती बाहेर जाणे कोणाही देशाला इष्ट वाटत नव्हते. यामुळे युरोपीय लोकांनी आशियाई देशांत व्यापार करण्यास सुरुवात केली. या व्यापारातून मिळणारा नफा भारतीय मालाच्या खरेदीसाठी वापरला जाऊ लागला. या गोष्टीचा भारतीय जहाजमालकांवर प्रतिकूल परिणाम झाला. त्यांच्या नुकसानीचे प्रमाण वेगवेगळ्या प्रदेशांत वेगवेगळे होते. सर्वांत अधिक नुकसान बहुधा गुजरातेतील जहाजमालकांना सोसावे लागले असावे.

मोरलँड मुगल प्रशासनाचेही विश्लेषण प्रस्तुत करतात. ते असे सांगतात की, नेमणुका कच्च्या किंवा पक्क्या असत. ज्या अधिकाऱ्याची नेमणूक कच्ची असे त्याला ठराविक पगार मिळे आणि ज्या अधिकाऱ्याची नेमणूक पक्की असे त्याला महसुलापैकी विवक्षित रक्कम आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्याला द्यावी लागे आणि उरलेली रक्कम स्वत:साठी ठेऊन घेता येत असे. अकबराच्या कारकीर्दीत उत्तर भारतात कच्च्या नेमणुकींची प्रथा प्रचलित होती तर दक्षिण भारतात पक्क्या नेमणुकींची प्रथा चालू होती. परंतु त्याच्या नंतर गादीवर आलेल्या बादशाहांनी इनामे देण्याची प्रथा चालविली. केंद्रीय प्रशासनाची वृत्ती परदेशी व्यापाराला अनुकूल होती. परंतु अंतर्गत व्यापारावरील करांमुळे त्या व्यापाराला मात्र अडचणींना तोंड द्यावे लागत होते. अनेक प्रकारची वजने व मापे चालू होती. सरकारने ठरवून दिलेल्या परिमाणांबरोबरच स्थानिक परिमाणेही चालू होती. सोन्याची नाणीही पाडली जात असली तरी प्रचारातील अधिकांश नाणी चांदीची व तांब्याची असत.

महसुलाच्या साधनांसंबंधी मोरलँड असे सांगतात की, जकाती, टांकसाळी, नजराणे व वारसाकर या बाबी महत्त्वाच्या होत्या. प्रांतांचे सुभेदार अनेक उपकर लादीत. हे उपकर बहुधा बेकायदेशीर असत. शिवाय जादा महसूल गोळा झाल्यास तो केंद्रीय सरकारच्या खजिन्यात भरावा लागे.

बहुतेक भारतीय इतिहासकार असे मानतात की, अकबराची कारकीर्द हे भारतीय इतिहासातील एक 'सुवर्णयुग' होते. परन्तु मोरलँड यांना असे वाटते की, प्रत्यक्ष परिस्थिती मुळीच समाधानकारक नव्हती. अकबरानंतर गादीवर आलेल्या बादशहांच्या कारकीर्दीत परिस्थिती अधिकच खालावली असेही त्यांचे मत आहे. 'इंडिया अॅट दि डेथ ऑफ अकबर' या ग्रंथाच्या अध्ययनातून निष्पन्न होणारे दोन महत्त्वाचे मुद्दे असे :– (१) अकबराच्या काळातील भारताची आर्थिक रचना आधुनिक आर्थिक परिवर्तनाला हातभार लावणारी नव्हती; आणि (२) विसाव्या शतकाच्या प्रारंभी भारताची आर्थिक स्थिती अकबराच्या मृत्यूच्या वेळी असणाऱ्या आर्थिक स्थितीपेक्षा कितीतरी अधिक चांगली होती. मोरलँड यांनी केलेल्या अनेक विधानांवरून यांपैकी पहिल्या मुद्याचा खुलासा होतो. भूधारणातील असुरक्षिततेचा उल्लेख करून ते म्हणतात, "...जो कोणी आपल्या जमिनीतून सरासरी उत्पन्नापेक्षा जास्त पीक काढण्याचा विचार मनात आणी त्याला हे माहीत असे की, आपल्याकडे असणाऱ्या जमिनीचा उपभोग–काळ हा कोणत्याही महसूल अधिकाऱ्याच्या किंवा जमीनमालकाच्या दयेवर अवलंबून आहे; आणि योगायोगाने तो जमिनीच्या

सान्निध्यात येऊ शकतो. अशा परिस्थितीत शेतीचा कोणताही लाभदायक विकास घडून येण्याची फारच कमी शक्यता होती." (पृ. १२९–३०). ते असेही सांगतात की, शेतकरी आपल्या जमिनी सोडून वारंवार पळून जात. औद्योगिक क्षेत्राच्या बाबतीत ते सांगतात, "...कारागिरांजवळ अगदी तुटपुंजी साधनसंपत्ती असे. ते स्वतंत्रपणे उत्पादनाचे काम करीत. त्यामुळे त्यांना माल तयार होताच तावडतोब तो बाजारात नेऊन विकणे भाग पडे." (पृ. १८५). १९१४ साली असणाऱ्या गव्हाच्या किमतीच्या भाषेत बोलावयाचे तर अवजारे बनविण्यासाठी आवश्यक असणारे लोखंड हे तिपटीने अधिक मौल्यवान होते. व्यापाराच्या क्षेत्राच्या बाबतीत असे आढळून येते की, अंतर्गत व्यापारी मार्गांचा फारच थोडा विकास झाला होता आणि त्या मार्गांवर सुरक्षितताही नव्हती. शिवाय भारतीय समुद्रावर पोर्तुगीजांचे वर्चस्व होते. शेवटचा मुद्दा असा की, मोरलँड यांच्या अध्ययनावरून भारतामध्ये साधनसंपत्तीने युक्त असलेल्या साहसी व्यावसायिकांच्या वर्गाचा अभाव होता असे वाचकाचे मत बनते. लेखकाचे म्हणणे असे की, वरच्या वर्गांचे उत्पन्न खूप मोठे असे, परन्तु ही सारी संपत्ती ते ख्यालीखुशालीत उधळून टाकीत. मध्यम वर्गातील लोकांची संख्या 'निश्चितपणे कमी' होती आणि 'त्यांचे जीवन भपक्यापासून अगदी अलिप्त होते.' (पृ. २६३). कनिष्ठ वर्गामध्ये शेतकरी, कारागीर व मजूर यांचा समावेश होता. लोकसंख्येतील बहुसंख्य भाग याच वर्गांनी व्यापलेला होता आणि ते 'कमालीचे गरीब' होते. (पृ. २७०).

अलीकडे या दृष्टिकोनाला इरफान हबीब यांनी यशस्वीपणे आव्हान दिले आहे, ही गोष्ट या ठिकाणी नमूद करणे पुरेसे आहे.[1]

दुसऱ्या मुद्याच्या बाबतीत बोलावयाचे म्हणजे, मोरलँड आपल्या युक्तिवादाच्या प्रारंभीच असे सांगतात की, १६०५ सालची भारताची लोकसंख्या ही १९११ सालच्या लोकसंख्येच्या केवळ एकतृतीयांश होती. शेतीच्या क्षेत्रामध्ये अकबराच्या काळापासून प्रचारातून नाहीसे झालेले एकमेव पीक म्हणजे 'आल' हे होय. या झुडुपापासून रंग तयार केला जाई.* परंतु त्यामुळे झालेल्या तोटयाची वाजवीपेक्षा अधिक भरपाई चहा, कॉफी, बटाटे, तंबाखू, भुईमूग, ओट, मका इत्यादि इतर पिकांच्या विकासाने झाली. शिवाय, अकबराच्या कारकीर्दीनंतरच्या काळातच बहुतेक सर्व कालवे खोदण्यात आले. औद्योगिक अर्थव्यवस्थेच्या बाबतीत सामान्यत: असे दिसून येते की, भांडी बनविणे, शस्त्रनिर्मिती व कलाकुसरीची कामे यांपासून मिळणाऱ्या उत्पन्नात घट झाली होती. परंतु हा तोटाही भरून निघाला असे मोरलँड सांगतात. तांब्या-पितळेच्या वस्तू, हत्यारा-खेरीजच्या लोखंडी वस्तू, लाकडी वस्तू, कागद, स्टेशनरी, कातडयाच्या वस्तू, आणि कच्ची खनिजे यांच्या उत्पादनात व इमारतींच्या निर्मितीत वाढ झाल्यामुळे हा तोटा भरून निघाला. त्याचप्रमाणे अकबराच्या काळातील जहाज वाहतूक २४००० ते ३६००० टनांच्या दरम्यान असे; तर १९११ ते १९१४ या काळातील जहाज वाहतुकीची सरासरी ६७,७५,००० टन होती. वाहतुकीच्या साधनांचा विचार करता, विसाव्या शतकात लोहमार्ग व पक्के रस्ते अस्तित्वात आले होते. सोळाव्या व सतराव्या शतकांत वाहतुकीचे हे मार्ग नव्हते. शिवाय त्या काळात

---

१. या अंकात प्रसिद्ध झालेला त्यांचा 'मुगल कालीन भारताच्या अर्थव्यवस्थेतील भांडवलशाही विकासाच्या संभाव्यता' हा लेख पाहावा.

* मराठीतील 'अळता' (तळहातांना व तळपायांना लावण्याचा मेंदीसारखा रंग) हा शब्द बहुधा या 'आल' पासून बनला असावा.

— अनुवादक

उत्पन्नाच्या बाबतीत भयंकर विषमता असे; आणि "असा निष्कर्ष काढण्यास मुळीच हरकत नाही की, सरकारी नोकऱ्यांतील वरच्या जागांवर काम करणाऱ्यांना जो मोबदला दिला जात असे तो भारतात, किंवा जगाच्या कोणत्याही भागात, आज दिल्या जाणाऱ्या मोबदल्यापेक्षा कितीतरी अधिक होता."... (पृ. ६८). शिवाय, जवळजवळ ७० टक्के नोकऱ्या परदेशी लोकांना दिल्या जात असत.

अशा प्रकारे युक्तिवाद करून मोरलंड हे राष्ट्रवादी टीकाकारांकडून ब्रिटिश राजवटीवर जी टीका केली जाई तिच्यापासून त्या राजवटीचे रक्षण करण्याचा अप्रत्यक्षपणे प्रयत्न करतात. परन्तु त्यांचा ग्रंथ प्रकाशित झाल्यापासूनच भारतीय विद्वानांनी त्यांच्या दृष्टिकोनांवर झोड उठविण्यास सुरुवात केली आहे. त्यांच्याशी असणारा आपला मतभेद पद्धतशीरपणे मांडण्याचा पहिला प्रयत्न सर यदुनाथ सरकार यांनी या ग्रंथाच्या परीक्षणाच्या निमित्ताने केला.[२] या मुद्यावर मोरलंड यांना विरोध करणाऱ्या इतर लेखकांमध्ये पुढील लेखकांचा समावेश होतो :– के. टी. शहा[३], ब्रिज नारायण[४] व एच्. एल्. छावलानी.[५]

'दि ॲग्रेरियन सिस्टिम ऑफ मुस्लिम इंडिया', या मोरलँड यांच्या तिसऱ्या ग्रंथांत मुगल व मुगलपूर्व अशा दोन्ही कालखंडांचा समावेश करण्यात आला आहे. त्यांचे म्हणणे असे की, स्थूलमानाने विचार करता, मुसलमानांच्या आगमनामुळे शेतसाऱ्याच्या आकारणीच्या पद्धतीवर काही परिणाम घडून आला नव्हता. मुस्लिम राज्यकर्त्यांच्या अमलाखालील भारतात उत्पन्नातील भागीदारी आणि जमिनीच्या प्रतवारीनुसार ठराविक खंड, अशा शेतसाऱ्याच्या दोन पद्धती चालू होत्या. त्यानंतर आणखी एक म्हणजे मक्त्याची पद्धत अस्तित्वात आली. तथापि काही सुलतानांनी महत्वाचे बदल घडवून आणले. उदाहरणार्थ, अलाउद्दीन खिलजीने आपल्या राजवटीच्या सुरुवातीस विद्यमान असलेली सर्व इनामे परत घेतली होती; आणि नंतरच्या काळात त्याने फारच थोडी इनामे दिली असण्याची शक्यता आहे. त्याने दिल्ली व दोआब हे प्रदेश खालसा करून टाकले आणि त्याच्या महसूल मंत्रालयाने शेतकऱ्यांशी प्रत्यक्ष संबंध प्रस्थापित केले. दूरच्या प्रांतांमध्ये तेथील सुभेदार बहुधा स्थानिक प्रमुखांशीच पूर्वीप्रमाणे संबंध ठेवून राहिले असावेत. याखेरीज, अलाउद्दीनाने किमतींवर नियंत्रण ठेवण्याची पद्धतही सुरू केली. मुहम्मद तुघलकाची राजवटही उल्लेखनीय होती. एका बाजूने त्याने शेतसाऱ्यांचे दर भयंकर वाढवून दोआब प्रदेशाची कंबर मोडून टाकली तर दुसऱ्या बाजूने, लेखकाच्या शब्दांत सांगावयाचे

---

२. 'इंडियन जर्नल ऑफ एकॉनॉमिक्स', खंड ३, भाग २, १९२०-१९२२, पृ. २३७-२४२.

३. 'ट्रेड, टॅरिफ्स अँड ट्रान्सपोर्ट इन इंडिया' (दि नॅशनल बुक डेपो, मुंबई; पी. एस्. किंग अँड सन, लि. लंडन, १९२३) भाग १, बी.

४. 'इंडियन एकॉनॉमिक लाइफ, पास्ट अँड प्रेझेंट' (उत्तर चंद कपूर अँड सन्स, लाहोर, १९२९), प्रकरणें १–५.

५. 'दि एकॉनॉमिक कंडिशन ऑफ इंडिया ड्यूरिंग दि सिक्सटीन्थ सेंचुरी', (ऑक्सफोर्ड बुक अँड स्टेशनरी कंपनी, दिल्ली, १९२९).

या ग्रंथांमध्ये के. डेव्हिस यांच्या 'दि पॉप्युलेशन ऑफ इंडिया अँड पाकिस्तान' (प्रिन्सटन युनिव्हर्सिटी प्रेस, प्रिन्सटन, १९५१) या ग्रंथाची भर घालता येईल. यामध्ये लोकसंख्येसंबंधीच्या मोरलँड यांच्या मताचे गुणदोषविवेचन करण्यात आले आहे. लेखकाच्या मते 'अधिक निर्दोष अंदाज' करावयाचा तर त्या काळची लोकसंख्या १२ कोटी ५० लाख होती असे म्हणता येईल.

म्हणजे, " ... पिकामध्ये सुधारणा घडवून आणणे हे प्रशासनाच्या कार्यवाहीच्या उद्दिष्टांपैकी एक उद्दिष्ट असले पाहिजे ही कल्पना पहिल्याप्रथम तुगलकाच्या अमदानीतच आपल्याला आढळून येते. " (पृ. ५१). फिरोझशहाने मुख्यतः नेमणूक पद्धतीवर भर दिला. इनामे देण्याची प्रथाही त्याच्या काळी लोकप्रिय होती. तरीपण, मोरलँड यांच्या म्हणण्याप्रमाणे, " फिरोझशहाने पाटबंधाऱ्यांच्या योजना हाती घेऊन कृषिविकासाच्या परंपरेत निश्चित भर घातली. "(पृ.५९).

बाबर आणि हुमायून यांच्या अमदानीत भारताच्या कृषिभूमिविषयक प्रणालीमध्ये जवळजवळ काहीच बदल झाला नाही, परंतु शेरशहाने नेमणुकांची प्रथा चालू ठेवून जमिनीच्या प्रतवारीनुसार शेतसारा आकारण्याची पद्धतही सुरू केली. अकबराच्या कारकीर्दीत ही पद्धत पूर्णावस्थेस पोचली. अकबराच्या मृत्यूनंतर या पद्धतीला उतरती कळा लागली आणि औरंगजेबाच्या कारकीर्दीपर्यंत ती जवळजवळ नामशेष झाली. त्यानंतर सामूहिक नेमणुकीची प्रथा सार्वत्रिक झाली.

मोरलँड यांचे हे ग्रंथ भारताच्या आर्थिक इतिहाससंबंधीचे खरोखरीच अत्यंत मौल्यवान ग्रंथ आहेत. या विषयाच्या ज्ञानाला चालना देण्याव्यतिरिक्त त्यांची दुसरी महत्त्वाची देणगी म्हणजे या क्षेत्रातील विद्वानांसाठी साधनसामग्रीचे एक नवे भांडार त्यांनी उघडून दिले आहे. बिगर-इंग्लिश युरोपीय साधनसामग्रीच्या समृद्ध भांडाराचा उपयोग करून घेण्याचा प्रयत्न करणारे या क्षेत्रातील मोरलँड हे पहिलेच विद्वान आहेत. उपलब्ध असलेल्या स्थूल माहितीवरून निष्कर्ष म्हणून ते जी आकडेवारी प्रस्तुत करतात तिच्यावरून सर्वसामान्य प्रवृत्ती सूचित होतात असे समजण्यास हरकत नाही. त्यांचा शेवटचा ग्रंथ आर्थिक जीवनाच्या फक्त एका विशिष्ट पैलूचा विचार करणारा असला तरी इतर दोन ग्रंथांसह त्याचे वाचन करणे निश्चितच उपयुक्त ठरेल. त्या ग्रंथामध्ये त्यांनी आपल्या पूर्वीच्या काही निष्कर्षांमध्ये दुरुस्त्या केल्या आहेत.

* * *

✓ **रवींद्रकुमार, ' वेस्टर्न इंडिया इन दि नाइनटीन्थ सेंचुरी, ए स्टडी इन दि सोशल हिस्टरी ऑफ महाराष्ट्र ', (रूटलेज अँड केगन पॉल लि., लंडन, १९६८, पृ. ३४७).**

ऑस्ट्रेलियन नॅशनल युनिव्हर्सिटीला सादर केलेल्या पीएच. डी. च्या प्रबंधाचे हे सुधारून वाढविलेले रूपांतर आहे. हे महाराष्ट्राच्या सामाजिक इतिहासाचे अध्ययन आहे. काटेकोरपणे बोलावयाचे तर ग्रंथाचे शीर्षक तितकेसे सार्थ नाही. कारण त्यामध्ये १८१८ ते १९१८ एवढ्याच कालखंडाचा विचार करण्यात आलेला आहे. मात्र ग्रंथ रोचक आहे. लेखकाने काही प्रकरणाभ्यासांच्या आधारे काही ठिकाणी सर्वसामान्य ऐतिहासिक प्रवृत्तींचे विश्लेषण करण्याचा प्रयत्न केला आहे. १८२५ साली शेतीसाठी किती खर्च येई व शेतीतून किती फायदा होई याची जी हकीगत त्यांनी पृ. २२–२३ वर दिली आहे, ते याचे चांगले उदाहरण म्हणून सांगता येईल. शिवाय लेखकाने आर्थिक इतिहासाच्या प्रश्नांवर सामाजिक भाष्य करण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे. या बाबतीत केनेथ बॅलॅत्सेत यांच्या ' सोशल पॉलिसी अँड सोशल चेंज इन वेस्टर्न इंडिया, १८१७–१८३० ', (ऑक्सफोर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, लंडन १९५७) या ग्रंथाहून सदर ग्रंथाचे स्वरूप अगदी वेगळे आहे. कारण बॅलॅत्सेत यांचा ग्रंथ हा वस्तुतः प्रशासकीय इतिहासच आहे.

विषयाचे प्रास्ताविक म्हणून लेखक भौगोलिक–राजकीय पार्श्वभूमीचे विश्लेषण करतो. रामदास व इतर संत यांनी सुरू केलेल्या ज्या धार्मिक आंदोलनांची परिणती हिंदू धर्माच्या पुनरुत्थानात झालेली होती त्या आंदोलनांचाही उल्लेख लेखक करतो. ब्रिटिशपूर्व महाराष्ट्रात

दोन स्थूल सामाजिक थर होते. बुद्धिजीवी वर्गाचा अथवा ब्राह्मणांचा एक थर आणि सामान्य जनतेचा अथवा कुणबी व इतर जातींचा दुसरा थर. ग्रामीण भागातील बहुतेक लोक शेतकरी अथवा कुणबी जातीचे होते. या शेतकऱ्यांचे दोन पोटविभाग होते. थुलवाहीक अथवा परंपरागत शेतकरी आणि उपरी म्हणजे जमिनीवर कोणतेही कायमचे उपभोगहक्क नसलेले शेतकरी. याखेरीज वलुतेदार ही एक संस्थाही विद्यमान होती. हे बलुतेदार कारागीर असत. ते वेगवेगळ्या जातींचे असून खेड्याची सेवा करण्याचे त्यांना वंशपरंपरागत अधिकार असत. त्यांना परंपरेने चालत आलेल्या प्रमाणानुसार गावच्या लोकांकडून त्यांच्या कामाचा मोबदला मिळत असे. दुसऱ्या बाजीरावाच्या कारकीर्दीत शेतसाऱ्याचा मक्ता देण्याची प्रथा सुरू झाली. तेवढा काळ वगळल्यास इतर काळी शेतसारा निश्चित करण्याचे काम ग्रामप्रमुख असणाऱ्या पाटलांच्या सल्ल्याने सरकारी अधिकारी करीत असत. त्या काळातही सावकार होते. परंतु त्यांना शेतकऱ्यांचे शोषण करता येत नसे; कारण वादाचा मुद्दा उपस्थित झाल्यास त्या प्रकरणी न्याय देण्याचे काम ग्रामपंचायतींकडे असे; आणि या पंचायतींमध्ये कुणबी लोकांचे बहुमत असे. अशा परिस्थितीत सामाजिक वातावरण गंभीर संघर्षापासून अलिप्त असणेच स्वाभाविक होते,. असा निष्कर्ष कुमार काढतात.

परंतु १८१८ साली ब्रिटिशांनी महाराष्ट्र जिंकून घेतल्यानंतर ही समाजरचना हळूहळू बदलू लागली. माउंट स्टुअर्ट एलफिन्स्टन याने 'नेमस्तपणाचे राजकारण' अवलंबिले. स्थानिक लोक जी काही मूल्ये उराशी बाळगून आहेत. ती मूल्ये अचानक बदलणे आत्मघातकीपणाचे ठरेल असे त्याला वाटले. न्याय व महसूल प्रशासनाच्या जुन्या पद्धतीमध्ये दुसऱ्या बाजीरावाच्या कारकीर्दीत शिरलेले दोष वगळता ती पद्धत स्थूल मानाने स्थानिक परिस्थितीला अत्यंत अनुकूल होती. त्यामुळे या पद्धतीत फार मोठे फेरबदल किंवा क्रांतिकारक सुधारणा घडवून आणावयाच्या असल्यास त्या हळूहळू घडवून आणणे आवश्यक होते. ही गोष्ट लक्षात घेऊनच सुरुवातीच्या ब्रिटिश प्रशासकांनी ग्रामपंचायतींना त्यांचे कार्य करण्यास मोकळीक दिली. मात्र त्यांच्याकडून पक्षपातपूर्ण निर्णय दिले जाऊ नयेत यासाठी त्यांच्यावर पाश्चात्य पद्धतीची न्यायालयेही स्थापन करण्यात आली. त्याचप्रमाणे शेतकऱ्यांच्या वैयक्तिक प्रयत्नांना प्रोत्साहन मिळावे या हेतूने त्यांनी शेतसाऱ्याची रयतवारी पद्धत सुरू केली; (शेतकऱ्यांमधील व्यक्तिवादाचा विकास म्हणजेच ग्रामीण विकास असे ते समजत असत.) आणि तिच्या द्वारे त्यांनी मोठ्या व श्रीमंत शेतकऱ्यांवर कराचे अधिक ओझे लादले जाईल आणि गरीब शेतकऱ्यावर कमी भार पडेल असा प्रयत्न केला. यामागे त्यांचा हेतू ब्रिटिश सत्ता टिकून राहाण्यात ज्याचे हितसंबंध गुंतलेले आहेत अशा एका सामाजिक वर्गाचा विकास घडवून आणावा, हा होता. परंतु कुमार असे सांगतात की या रयतवारीचा त्यांना हवा होता तसा परिणाम झाला नाही. या बाबतीत ते वायव्य प्रांत सरकारचे चिटणीस जे. थॉर्नटन यांचे पुढील मत उद्धृत करतात :– "रयतवारी पद्धतीचा अत्यंत गंभीर परिणाम म्हणजे कुणबी हा आपल्या खेड्यातील इतर शेतकरी बांधवांपासून वेगळा पडला. या फारकतीमुळे कुणब्याला, एक समाज या स्वरूपात संघटित असलेल्या खेड्याकडून पूर्वी जो नैतिक व भौतिक आधार मिळत असे तो या पद्धतीमुळे मिळेनासा झाला." (पृ. १२३-१२४). आधुनिक न्यायव्यवस्थेचा अवलंब केल्याचेही दूरगामी परिणाम झाले. या न्यायालयांचे निर्णय कुणब्यांपेक्षा वाण्यांच्याच अधिक फायद्याचे असत. कुमार सांगतात, "या दाव्यांपैकी फार मोठ्या भागाच्या निर्णयांचा परिणाम म्हणून कुणब्यांच्या ताब्यातील जमिनी वाण्यांच्या ताब्यात गेल्या.

परंतु वाण्यांची सामाजिक मूल्ये त्यांना शेती करण्यास अडकाठी करीत होती. म्हणून त्यांनी त्या जमिनी जुन्या जमीनमालकांकडेच चालू ठेवल्या, आणि त्यांना पोटापुरते अन्नवस्त्र देऊन त्यांच्या श्रमाचा सारा फायदा स्वतः घेण्यास सुरुवात केली." (पृ. १५७). अशा प्रकारे ग्रामीण अर्थव्यवस्थेत सामाजिक तणातणी वाढू लागली. कुणबी लोकांच्या अडचणी इतर सामाजिक व अन्य गोष्टींमुळे अधिक वाढल्या. अमेरिकन युद्धामुळे (१८६१–१८६५) कुणब्यांच्या भौतिक समृद्धीत तात्पुरती वाढ झाली होती ती टिकून न राहिल्यामुळे सामाजिक स्वरूपाच्या अडचणी निर्माण झाल्या होत्या. तसेच काही परंपरागत सामाजिक मूल्यांमुळे अडचणी निर्माण होत होत्या. उदाहरणार्थ, आपल्याला वारस असला पाहिजे या इच्छेतून लोकसंख्या वाढत होती व तिच्यामुळे अडचणी निर्माण होत होत्या. अशा प्रकारे अडचणी उभ्या राहिल्या असताना कुणब्यांना 'पुणे सार्वजनिक सभा' या संस्थेचा आधार मिळाला. ही सभा महाराष्ट्रातील नव्या सामाजिक नेतृत्वाचे प्रतिनिधित्व करीत होती. कुणब्यांच्या शांततापूर्ण चळवळीचा काही उपयोग झाला नाही. म्हणून ते '१८७५चे दख्खनचे दंगे', यांसारख्या चळवळींकडे वळले.

कुमार यांच्या मते या दंग्यांचा भावी काळातील घटनाप्रवाहावर निर्णायक परिणाम झाला. त्यांच्यामुळे कुणबी व वाणी यांना आपण परस्परावलंबी आहोत याची जाणीव झाली. सरकार बेकायदेशीरपणाला आळा घातल्याखेरीज राहाणार नाही, ही गोष्ट या दंग्यांमुळे कुणबी समजून चुकले आणि आपल्या जीवितवित्ताची सुरक्षितता अजूनही कुणब्यांवर अवलंबून आहे, हे वाण्यांना कळून चुकले. (आणि म्हणून त्यांनी पुण्यामध्ये एक कृषि-बँक स्थापन करण्याची सूचना मांडली). सरकारच्याही हे लक्षात आले की न्यायालयांनी केवळ कागदपत्रांच्या आधारे निर्णय न देता अधिक खोलात शिरून दोन्ही बाजू समजून घेतल्या पाहिजेत. बहुधा याच कारणांमुळे सरकारने १८७९ चा शेतकरी कष्ट निवारण कायदा, (Agriculturists' Relielf Act) पास केला. शेतीसाठी भांडवलपुरवठा करण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी सरकारने सहकारी चळवळीच्या विकासाला प्रोत्साहन दिले. या संदर्भात कुमार लिहितात, "शेतकऱ्यांच्या समृद्धीबद्दल भारत सरकारला वाटणारी चिंता ही भारतावरील ब्रिटिश सत्तेच्या स्थैर्याशी आणि या देशावर ब्रिटिशांचे प्रभुत्व टिकवून धरण्याचा इच्छेशी निगडित होती. खरोखरी, सहकारविषयक चर्चेच्या मागे याच साऱ्या गोष्टींचा विचार होता; आणि या चळवळीविषयी ब्रिटिश सरकारचे धोरण ठरविण्यात या गोष्टींचा फार मोठा हात होता." (पृ. २५२). तथापि याच गोष्टी विचारात घेऊन सरकारने शेतकऱ्यांच्या कष्टनिवारणाचा कायदा संमत केला असावा आणि कृषिबँकेच्या योजनेला पाठिंबा दिला असावा, अशी कल्पना करण्यास हरकत दिसत नाही. परंतु या दोन्ही मुद्यांविषयी लेखकाने काहीच विवेचन केलेले नाही.

पुस्तकाच्या अखेरीस कुमार यांनी सामाजिक परिस्थितीच्या दोन महत्त्वपूर्ण पैलूंची चर्चा केली आहे. बैलगाड्या, विहिरी, कौलारू घरे इत्यादींच्या संख्येत झालेल्या वाढीच्या आधारे ते असे सूचित करतात की या शतकाच्या अखेरीस समृद्ध कुणब्यांचा एक नवा वर्ग उदयास आला होता. दुसरा पैलू ते असा सांगतात की, एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस महाराष्ट्रात सामाजिक विचारांचे तीन महत्त्वाचे प्रवाह विद्यमान होते. यांपैकी पहिल्या विचारप्रवाहाचे प्रतिनिधित्व ज्योतिबा फुले हे करीत होते. (ते कुणबी जातीचे होते). त्यांनी ब्राह्मणांच्या श्रेष्ठत्वाला आव्हान दिले. दुसरा विचारप्रवाह म. गो. रानडे यांचा होता. (ते नेमस्त ब्राह्मण होते). आर्थिक प्रश्नांकडे शास्त्रीय दृष्टिकोणातून पाहिले पाहिजे असे त्यांचे निश्चित मत होते. तिसऱ्या विचारप्रवा-

ह्याचे नेतृत्व बा. गं. टिळक यांच्याकडे होते. (ते ब्राह्मण होते). " हिंदू समाजातील सामाजिक संस्था आणि महाराष्ट्राचा राजकीय व आर्थिक विकास यांमध्ये त्यांना कसलाही विसंवाद किंवा विसंगती दिसत नव्हती. " (पृ. ३१०).

स्थूल मानाने बोलावयाचे तर एकोणिसाव्या शतकातील पश्चिम भारतात विद्यमान असणारे हे प्रमुख राजकीय-सामाजिक-आर्थिक पैलू कुमारांनी विचारात घेतले आहेत. त्यांच्या दृष्टिकोणातील आगळेपणाचा उल्लेख यापूर्वी केलाच आहे. पृ. १८४ वर जे विधान करण्यात आलेले आहे ते चुकीचे असल्यामुळे त्यासंबंधी येथे उल्लेख करणे योग्य होईल. दख्खनच्या दंग्यांच्या संदर्भात कुमार लिहितात " उदाहरणार्थ, गावचा पाटील हा प्रशासनाशी इतका एकरूप होऊन गेलेला होता की कुणब्यांचे नेतृत्व करणे त्याच्या आवाक्याबाहेर होते; आणि वस्तुत: तो गावाशी संबंध नसलेला माणूस असावा अशा दृष्टीने त्याच्याकडे संशयाने पाहिले जाई. " हे विधान १८७८च्या डेक्कन रॉयट्स कमिशनने काढलेल्या निष्कर्षांशी स्पष्टपणे विसंगत आहे. या आयोगाच्या अहवालात असा निष्कर्ष काढण्यात आला आहे की, कुणब्यांचे नेतृत्व पाटील वगैरेंसारख्या त्यांच्या स्वाभाविक नेत्यांनी केल्यामुळे या दंग्यांनी फार मोठा रक्तपात अथवा विध्वंस घडून आला नाही. (अहवाल, परिच्छेद १६ ).

एकंदरीने पाहाता हे पुस्तक सुबोध व साधार विवेचनाने युक्त आहे, असे म्हणण्यास मुळीच हरकत नाही.

* * *

**जॉन हिक्स, ' ए थिअरी ऑफ एकॉनॉमिक हिस्टरी ',** (ऑक्सफोर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, १९६९, पृ १८१, किंमत दिलेली नाही).

हा ग्रंथ म्हणजे प्रा. हिक्स यांनी १९६७ साली वेल्स विद्यापीठात दिलेल्या व्याख्यानांचा संग्रह आहे. याची व्याप्ती बरीच मोठी आहे. एका बाजूने त्यात सबंध जगाचा विचार करण्यात आलेला आहे तर दुसऱ्या बाजूने आर्थिक प्रगतीचा संपूर्ण कालखंड घेण्यात आलेला आहे. हिक्स यांच्या मते सिद्धांत व इतिहास यांमध्ये काही विसंगती नाही. अर्थशास्त्र व इतर सामाजिक शास्त्रे यांतून घेतलेल्या सर्वसामान्य कल्पनांचा उपयोग इतिहासकारांना आपल्या साहित्याची पद्धतशीर मांडणी करण्याच्या कामी होऊ शकतो. याच अर्थाने त्यांनी आर्थिक इतिहासाचा सिद्धांत विशद करण्याचा प्रयत्न केला आहे.

ज्या वेळी बाजारपेठेवर आधारलेली अर्थव्यवस्था अस्तित्वात नव्हती अशा ' परंपरा व आज्ञा ' (custom and command) च्या काळाची हकीगत देऊन तेथून हिक्स आपल्या विवेचनाला प्रारंभ करतात. त्या काळातील अर्थव्यवस्थांसंबंधी ते असे म्हणतात, " त्यांचा केंद्रीय आर्थिक गाभा महसूल हा आहे : कर, खंडणी अथवा शेतसारा. हा शेतसारा शेतकऱ्याकडून किंवा धान्योत्पादन करणाऱ्या कुळाकडून कोणत्या तरी मान्यताप्राप्त अधिकाऱ्याला अथवा अधिकृत शासनसंस्थेला दिला जातो. " (पृ. २२).

यानंतर लेखक ' बाजारपेठेचा उदय ' या विषयाचे विवेचन करतो. ज्या विशेषज्ञताप्राप्त व्यापाऱ्याने आर्थिक जीवनाचे रूपांतर घडवून आणले त्याचा उदय कसा झाला याचे उत्तर तो देतो. त्या अर्थव्यवस्थेला तो वाणिज्यिक किंवा व्यापारी अर्थव्यवस्था असे म्हणतो; आणि नगरराज्यांच्या प्रणालीतून ती निर्माण झाली असे त्याला वाटते. या संदर्भात आर्थिक उत्क्रांतीच्या तीन टप्प्यांची सुस्पष्ट वैशिष्ट्येही हिक्स जोर देऊन सांगतात. ते म्हणतात, " पहिल्या टप्प्याचे

वैशिष्टय हे की, व्यापारी जमातींची घडण प्रामुख्याने (किंवा निदान तुलनात्मक दृष्टया) बिगर व्यापारी वातावरणात घडून आली...... याच्या उलट, मधल्या टप्प्यात हा अडसर पुष्कळच दूर झाला. त्यामुळे पूर्वीच्या बिगर व्यापारी वातावरणाचे स्वरूप बदलून त्यामध्ये अनेक मार्गांनी बाजारपेठेचा प्रवेश झाला." (पृ. ६२). ही गोष्ट 'पैसा कायदा व पत (कर्ज),' यांची सुरुवात करून साध्य करण्यात आली. तिसऱ्या व शेवटच्या टप्प्यात औद्योगिक क्रांती घडून आली. लेखकाच्या मते औद्योगिक क्रांती या संज्ञेचा अर्थ आधुनिक उद्योगांचा विकास हा आहे; आणि परंपरागत उद्योग व आधुनिक उद्योग यांतील भेद असा आहे की, आधुनिक उद्योगांत स्थिर भांडवलाच्या रूपाने अधिकाधिक गुंतवणूक केली जाते. ही प्रक्रिया अजूनही चालू आहे. असे त्याचे म्हणणे आहे. याखेरीज, लेखकाने ऐतिहासिक चौकटीत भांडवलपुरवठा, मजूरपुरवठा व शेतीचे वाणिज्यीकरण या प्रश्नांचेही विवेचन केले आहे.

या ग्रंथाने आर्थिक प्रगतीच्या उज्ज्वल व काळ्या अशा दोन्ही बाजूंवर प्रकाश टाकला आहे. उदाहरणार्थ, गुलामांच्या व्यापाराचे निर्मूलन झाल्यामुळे विद्यमान गुलामांना चांगली वागणूक मिळाली; कारण त्यांच्या जागी नवे गुलाम आणण्याची शक्यता उरली नाही. वसाहतींच्या निर्मितीमुळे तेथील स्थानिक लोकांच्या संपत्तीत भर पडण्याची शक्यता उत्पन्न झाली. याच्या उलट, हिक्स हे मान्य करतात की मुक्त मजुरांचा तुटवडा वाढत गेल्यामुळे मोठमोठ्या वतनवाड्यांमध्ये भूदास-प्रथा सुरू झाली. वसाहतींमध्ये नेहमीच रक्तपात घडून येऊ लागला आणि स्थानिक लोकांचे शोषण केले जाऊ लागले.

तरीपण एकूण विचार करिता हिक्स आधुनिक उद्योगवादाचे पुरस्कर्ते आहेत. त्यांच्या मते गेल्या अनेक वर्षांत यंत्रांच्या वापरामुळे रोजगाराच्या प्रमाणात घट झालेली नाही. याच्या उलट, औद्योगीकरणाने वास्तविक मजुरीची पातळी उंचावली आहे, मजुरांना नियमित रोजगार पुरवला आहे, आणि श्रमिक संघटनांचा मार्ग सुगम बनविला आहे.

* * *

✓ एच्. आर्. घोषाल, 'एकॉनॉमिक ट्रँझिशन इन दि बेंगॉल प्रेसिडेन्सी', (१७९३–१८३३)', (फिरमा के. एल्. मुखोपाध्याय, कलकत्ता, १९६६, पृ. ३३२).

लेखकाने पाटणा विद्यापीठाला सादर केलेल्या प्रबंधाची ही दुसरी आवृत्ती आहे. जे. सी. सिन्हा यांच्या 'इकॉनॉमिक ॲनाल्स ऑफ बेंगाल', (मॅकमिलन ॲंड कं. लि., लंडन, १९२७) या ग्रंथाचे विवेचन जेथे संपते तेथून म्हणजे १७९३ पासून या ग्रंथाचे विवेचन सुरू होते. प्लासीच्या युद्धाच्या वेळी भारत देश शेती व उद्योग या दोन्ही क्षेत्रांत चांगलाच विकसित झालेला होता, या सिन्हा यांच्या मताशी लेखक सहमत आहे. परंतु त्यानंतर मात्र बंगालच्या अर्थव्यवस्थेची हळूहळू अवनती होत गेली. या बदलाचे विश्लेषण लेखकाने या ग्रंथात केले आहे, हे ग्रंथाच्या शीर्षकावरूनच सूचित होते.

या ग्रंथाचे तीन भाग आहेत. पहिल्या भागात लेखकाने उद्योगाचे विवेचन केले आहे. त्याचे म्हणणे असे की, बहुतेक सर्व उद्योगांना ब्रिटिशांनी प्रोत्साहन देण्याचे धोरण स्वीकारले होते. परंतु या प्रोत्साहनाचे स्वरूप असे होते की, अनेकदा त्याचा परिणाम त्या उद्योगांच्या अवनतीत होई. कंपनीचे नोकर उत्पादकांना अगाऊ रकमा देत असत. परंतु त्यामुळे उत्पादकांवर जुलूम होई. लेखकाने इतर उद्योगांच्या मानाने सुती कापडाच्या उद्योगाची अधिक तपशीलवार माहिती दिली आहे; आणि त्या उद्योगाच्या अवनतीला कारणीभूत असलेल्या अनेक गोष्टींचे विश्लेषण केले

आहे. इतर गोष्टींबरोबरच, त्याने असे सिद्ध केले आहे की नेपोलियन बोनापार्टच्या 'युरोपीय प्रणाली' (Continental System)मुळे ही अवनती घडून आली; कारण तिने बंगाली कापड युरोपीय बाजारपेठांत आणण्यावर बंदी घातली होती. याखेरीज बंगालच्या औद्योगिक व्यवस्थेत आणखी दोन महत्त्वाचे बदल घडून येऊ लागले होते. ते म्हणजे युरोपीय कारखान्यांची स्थापना आणि स्थानिक उत्पादकांशी त्यांनी सुरू केलेली स्पर्धा हे होत. याचा परिणाम अनर्थकारक झाला. उदाहरणार्थ, पेट्या व कपाटे बनविण्याचे कारखाने युरोपीय लोकांनी सुरू केल्यामुळे बंगाली सुतारांच्या पोटावर पाय आले. या ठिकाणी लेखक अफूच्या लागवडीचाही उल्लेख करतो. पृ. ८० वर तो लिहितो. "पूर्णिया जिल्ह्यातील उन्हाळी भाताचे पीक व नीळ यांच्या उत्पादनाची तुलना केल्यावर असे आढळून आले की, ज्या जमिनीतून फक्त एक रुपयाची नीळ उत्पन्न होई, त्याच जमिनीतून दोन रुपये बारा आणे किमतीचे उन्हाळी भाताचे पीक उत्पन्न होई." या विधानाला पुरावा म्हणून घोषाल यांनी फ्रान्सिस बुकनन यांच्या 'पूर्णिया रिपोर्ट' (पृ. ३९२–३९३) चा आधार दिला आहे. परंतु हे विधान चूक आहे. बुकनन यांचे म्हणणे असे की, हा अंदाज श्री एलर्टन नावाच्या गृहस्थांनी काढलेला होता आणि तो 'फारच अधिक' होता; कारण उन्हाळी भाताच्या पिकाची किंमत 'निळीच्या किमतीच्या फक्त दुप्पट होती.'

दुसरा भाग 'व्यापारा'संबंधीचा आहे. आठवड्यातून एकदा अथवा दोनदा बाजार भरत असत. त्याशिवाय लष्कराचे बाजारही असत. अंतर्गत व्यापारावर पुढील तीन गोष्टींचा प्रतिकूल परिणाम होत असे :– (१) जमीनदार व सरकार या दोघांनीही बसविले कर; (२) चोर व दरवडेखोर आणि (३) वजना-मापांतील वेगवेगळेपणा. प्रांताचा बाह्य व्यापार देशाच्या इतर भागांशी व परदेशांशीही चालत असे. फ्रेंच क्रांतीच्या व नेपोलियनने केलेल्या युद्धांच्या काळात बंगालमधून युरोपात होणारी मालाची निर्यात पुष्कळच कमी झाली. १८०१ ते १८०६ या पाच वर्षांच्या काळात बंगालची एकूण आयात ११,८१,६९,७७७ रुपयांच्या किमतीची व एकूण निर्यात १८,७७,४४,७०७ रुपये किमतीची होती. तसेच, १८२३–२४ ते १८३१–३२ या आठ वर्षांच्या काळात कंपनीच्या मालाखेरीज बंगालमध्ये आयात झालेला एकूण माल ३,५१,००,४५६ रुपयांचा होता; तर याच काळात दरसाल निर्यात होणाऱ्या मालाची सरासरी किंमत ८३,९६,७८,८३४ रुपये होती. परदेशी व्यापाराच्या विश्लेषणामध्ये घोषाल यांचा मुख्य उद्देश व्यापाराची दिशा व व्यापारामध्ये अधूनमधून होणारे चढउतार सूचित करणे हा आहे. या बाबतीतील एक महत्त्वाचा मुद्दा त्यांच्या नजरेतून सुटला आहे. तो असा की, १७५७ नंतर बऱ्याच काळपर्यंत कंपनी प्रांताच्या महसुलातून स्थानिक वस्तूंची खरेदी करून त्या वस्तू ग्रेट-ब्रिटनला निर्यात करीत असे. त्यामुळे ग्रेट-ब्रिटनच्या आयातीसाठी बंगालकडून भांडवलपुरवठा केला जाई.

तिसऱ्या भागात शेती, कामगार, चलन व बँकव्यवसाय यांचा समावेश आहे. घोषाल सांगतात की बंगाली शेतकरी तांदूळ, गहू, सातू, मका, ज्वारवर्गीय धान्ये, गळिताची धान्ये वगैरे पिके काढीत असत. पाटबंधारे विद्यमान होते. परंतु गरजेच्या मानाने त्यांची संख्या फार थोडी होती. एकूण विचार करिता, शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती 'फारशी चांगली नव्हती.' (पृ.२४५). वेठ व गुलामगिरी चालू होती. घोषाल यांनी जमीनविषयक कायद्यांचा प्रश्न विचारात घेतलेला नाही. परंतु त्या विषयासंबंधी सहजासहजी उपलब्ध होणारे जे साहित्य प्रकाशित झाले आहे ते लक्षात घेता ही उणीव क्षम्य समजता येण्यासारखी आहे. त्यांच्या नजरेतून सुटलेला एक महत्त्वाचा

मुद्दा म्हणजे शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा हा होय. १७९३ साली जमीनदारांना जे मालकी हक्क वहाल करण्यात आले आणि सरकारने जवळजवळ ९० टक्क्यांपर्यंत जाणारा जो भारी शेतसारा बसविला त्यामुळे या काळात शेतकऱ्यांच्या कर्जबाजारीपणाची बीजे पेरली गेली असण्याची पुष्कळच शक्यता आहे

शेवटच्या प्रकरणात ' चलन व बँकव्यवसाय ' या विषयाचे विवेचन करण्यात आले आहे. घोषाल यांचे चलनविषयक विश्लेषण ठराविक ठशाचे आहे. त्यांचे म्हणणे असे की अठराव्या शतकाच्या अखेरीस विविध प्रकारचे चलन प्रचारात होते. त्यामध्ये सोन्याची, चांदीची व तांब्याची नाणी, कागदी चलन व कवड्या यांचा समावेश होता. प्रांतातून सोन्याचांदीचा ओघ सतत बाहेर जात राहिल्यामुळे आणि आत येणारा ओघ बंद पडल्यामुळे चलनाचा तुटवडा पडला होता आणि त्यामुळे लोकांना फार त्रास सहन करावा लागला होता. लेखक या प्रश्नाचे विवेचन एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीपर्यंत आणूनच थांबतो.

बँक व्यवसाय व अडत-वखारी यांच्या विकासाचाही उल्लेख घोषाल करतात. भारतामध्ये आधुनिक धर्तीवर स्थापन करण्यात आलेल्या सर्वांत प्रारंभीच्या बँका म्हणजे दि बँक ऑफ हिंदुस्तान, दि बँक ऑफ बेंगॉल आणि दि जनरल बँक ऑफ इंडिया या होत. १८१३ च्या चार्टर कायद्यामुळे बँक व्यवसायाला अधिक चालना मिळाली. या काळामध्ये अडतवखारींचीही भरभराट झाली या वखारी म्हणजे कंपनीच्या सर्व सनदी व लष्करी नोकरांच्या ठेवी ठेवून घेणाऱ्या बँकाच बनल्या होत्या आणि आपल्याजवळचा पैसा निळीचा व्यवसाय, मद्यनिर्मिती, कातडी कमावण्याचा उद्योग, कोळशाच्या खाणी यांमध्ये त्या गुंतवीत असत. त्यांनी कलकत्त्यात अनेक विमा-कंपन्या चालविल्या होत्या आणि साखर व नीळ यांचे उत्पादन करणाऱ्यांना त्यांच्याकडून भांडवल-पुरवठा केला जात असे. तथापि, १८२९–३० सालच्या त्यांच्यावरील आर्थिक अरिष्टामुळे त्यांच्यापैकी अनेक वखारींचे दिवाळे निघाले.

एकूण विचार करिता घोषाल यांचा हा ग्रंथ उद्बोधक आहे. बंगालवरील ब्रिटिश सत्तेच्या आर्थिक परिणामांसंबंधी त्यांनी ओझरते विवेचन करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांनी आपल्या ग्रंथात जुन्या कागदपत्रांचा भरपूर उपयोग केला आहे. यामुळे प्रारंभिक साधनसामग्रीची ओळख होण्याच्या दृष्टीने हा ग्रंथ उपयुक्त ठरणारा आहे.

– नसीब बेंजामिन